प्रवचनसार

अनुशीलन

(मराठी)

2



आचार्य कुन्दकुन्द



आचार्य अमृतचन्द्र



आचार्य जयसेन



डॉ. हुकमचन्द भारिल्ल

अनुक्रमणिका

गाथा ९३	४
गाथा ९४	११
गाथा ९५	२३
गाथा ९६	३१
गाथा ९७	३६
गाथा ९८	४४
गाथा ९९	५१
गाथा १००	५७
गाथा १०१	६१
गाथा १०२	६८
गाथा १०३	७२
गाथा १०४	७४
गाथा १०५	७७
गाथा १०६	८१
गाथा १०७	८७
गाथा १०८	९२
गाथा १०९	९६
गाथा ११०	९९
गाथा १११	१०२
गाथा ११२-१३	१०६
गाथा ११४	११२
गाथा ११५	११६
गाथा ११६	१२०
गाथा ११७	१२४
गाथा ११८	१२७
गाथा ११९	१३२
गाथा १२०	१३७
गाथा १२१	१४१
गाथा १२२	१४४
गाथा १२३-२४	१४९
गाथा १२५	१५६
गाथा १२६	१६०
कलश ७	१६७
कलश ८	१६८
कलश ९	१७०
गाथा १२७	१७१
गाथा १२८	१७५
गाथा १२९	१७८
गाथा १३०-३१	१८३
गाथा १३२	१८७
गाथा १३३-३४	१९४
गाथा १३५	२०१
गाथा १३६	२०५
गाथा १३७-३८	२०८

अनुक्रमणिका

गाथा १३९	२१२
गाथा १४०	२१७
गाथा १४१	२२०
गाथा १४२-४३	२२४
गाथा १४४	२३०
गाथा १४५	२३७
गाथा १४६-४७	२४३
गाथा १४८-४९	२४७
गाथा १५०-५१	२५०
गाथा १५२-५३	२५४
गाथा १५४	२५९
गाथा १५५-५६	२६३
गाथा १५७-५८	२६७
गाथा १५९	२७१
गाथा १६०-६१	२७५
गाथा १६२	२८१
गाथा १६३-६५	२८४
गाथा १६६-६७	२९३
गाथा १६८-६९	३००
गाथा १७०-७१	३०५
गाथा १७२	३०९
गाथा १७३-७४	३३७
गाथा १७५-७६	३४८
गाथा १७७-७८	३५७
गाथा १७९	३६५
गाथा १८०-८१	३७१
गाथा १८२-८३	३७९
गाथा १८४-८५	३८६
गाथा १८६-८७	३९३
गाथा १८८	४०२
गाथा १८९	४०७
गाथा १९०-९१	४१३
गाथा १९२-९३	४२०
गाथा १९४-९५	४२८
गाथा १९६	४३५
गाथा १९७-९८	४४२
गाथा १९९	४४९
गाथा २००	४५४
कलश १०-११	४६२
कलश १२	४६३-४६४
गाथा पद्यानुवाद	४६७
कलश पद्यानुवाद	४७५

●●●

प्रवचनसार अनुशीलन

(भाग-२)

ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकार

(गाथा ९३ ते गाथा २०० पर्यंत)

द्रव्यसामान्यप्रज्ञापन अधिकार

(गाथा ९३ ते गाथा १२६ पर्यंत)

हे आपणास माहितच आहे की या अधिकाराचे नाव आचार्य अमृतचंद्रांनी **ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकार** ठेवलेले आहे, जे आपणास तत्त्वप्रदीपिकेच्या टीकेत आढळते. या अधिकाराला जयसेनाचार्यकृत तात्पर्यवृत्ती टीकेत **सम्यग्दर्शन महाधिकार** नाव दिलेले आहे.

हे अगोदरच सांगितले आहे की आचार्य कुंदकुंदांनी प्रवचनसाराला अधिकारांमध्ये विभागलेले नाही. त्यांनी तर एकदम एकाच क्रमाने पूर्ण प्रवचनसार लिहिला आहे.

तत्त्वप्रदीपिकेच्या टीकेमध्ये ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकाराच्या सुरुवातीला मंगलाचरणाची कोणतीही गाथा नाही; परंतु जयसेनाचार्यकृत तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये मंगलाचरणाची गाथा आढळते.

असे वाटते की कुंदकुंदचार्यांना येथे मंगलाचरणाच्या गाथेची आवश्यकताच भासली नसावी; परंतु त्यांच्या नंतर कालांतराने एखाद्याला असे वाटले असावे की येथे अधिकाराचा प्रारंभ आहे तर मंगलाचरण देखील असलेच पाहिजे आणि त्यांनी या गाथेला सामिल केले असावे.

जे काही असो, मंगलाचरणसंबंधीची ती गाथा खालीलप्रमाणे आहे –

तम्हा तस्स णमाइं किच्चा णिच्चं पि तम्मणो होज्ज।
वोच्छामि संगहादो परमट्ठविणिच्छयाधिगमं ।।१०।।

(हरिगीत)

सम्यक् सहित चारित्रयुत मुनिराज में मन जोड़कर।
नमकर कहूँ संक्षेप में सम्यक्त्व का अधिकार यह ।।१०।।

त्यामुळे सम्यक्चारित्रयुक्त मुनिराजांना नमस्कार करून त्यांच्यातच तन्मय होऊन संक्षेपात परमार्थाचा निर्णय करविणाऱ्या अशा या सम्यक्त्व अधिकाराला सांगतो.

ध्यानात ठेवावे, या गाथेत केवळ मंगलाचरणच केले नाही तर सम्यक्त्व अधिकार सांगण्याची प्रतिज्ञा देखील केलेली आहे.

एक बाब विशेष लक्ष देण्यायोग्य ही सुद्धा आहे की यात अरहंत व सिद्धांना नमस्कार न करता, त्या मुनिराजांना नमस्कार केला आहे, ज्यांना प्रथम महाधिकाराच्या शेवटच्या दोन गाथांमध्ये केला होता. या गाथांची सांगड त्या गाथांशी बसते.

तम्हा तस्स णमाइं – म्हणून त्यांना नमस्कार करून – या कथनाने पूर्वापर संबंध असल्याचे स्पष्ट होऊनच जाते.

जरी या गाथेमध्ये असा एखादा शब्द आढळत नाही की ज्यामुळे आचार्य कुंदकुंदांना या अधिकाराचे नाव सम्यग्दर्शनाधिकार योग्य वाटत असावे. तरीही आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये **परमार्थाचा निश्चय करविणाऱ्या अधिगमाचा** अर्थ **सम्यक्त्व** केला आहे. असे वाटते की या आधारेच त्यांनी या महाधिकाराचे नाव सम्यग्दर्शन अधिकार ठेवले आहे.

त्यांना स्वत:ला शंका वाटत होती की वरील शब्दाचा अर्थ सम्यग्दर्शन करणे काही लोकांना आवडणार नाही; म्हणून त्यांनी स्वत: टीकेमध्ये प्रश्न उभा करून त्याचे उत्तर दिले आहे, त्यामध्ये हे सुद्धा लिहिले आहे की याचा अर्थ सम्यग्दर्शन करावयाचा नसेल तर सम्यग्ज्ञान सुद्धा करू शकतो. वरील संपूर्ण प्रकरण मुळातून वाचण्याजोगे आहे.

आत्म्याच्या कल्याणाकरिता जगात जे जाणण्याजोगे पदार्थ आहेत; त्या सर्व पदार्थांचे वर्णन या ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकारात होणार आहे.

सुरूवातीला सर्व द्रव्यांची सामान्य चर्चा करतील, त्यानंतर प्रत्येक द्रव्यांची वेगवेगळी विशेष चर्चा करतील. त्यानंतर ज्ञान व ज्ञेयातील भिन्नतेचे स्वरूप स्पष्ट करतील.

अशाप्रकारे हा ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकार तीन अधिकारात विभागलेला आहे – १) द्रव्यसामान्यप्रज्ञापन अधिकार, २) द्रव्यविशेषप्रज्ञापन अधिकार आणि ३) ज्ञान-ज्ञेयविभागाधिकार.

द्रव्यसामान्यप्रज्ञापन अधिकार प्रवचनसाराचा सर्वाधिक महत्त्वपूर्ण अंश आहे; कारण यामध्ये सांगितलेले वस्तुस्वरूप जोपर्यंत आपल्या लक्षात येणार नाही, तोपर्यंत सम्यग्दर्शनाची प्राप्ती होऊ शकत नाही.

सम्यग्दर्शनाचा विषयभूत असा जो भगवान आत्मा आहे व ज्याची चर्चा समयसारामध्ये केलेली आहे; तो भगवान आत्मा या प्रवचनसाराच्या द्रव्यसामान्यप्रज्ञापनाच्या पार्श्वभूमीवरच समजला जाऊ शकतो.

अशाचप्रकारे द्रव्यविशेषाधिकारामध्ये प्रत्येक द्रव्याचे स्वरूप स्पष्ट करण्यासोबतच सहा द्रव्यांना अनेक युगलांमध्ये विभक्त करून भेदविज्ञानाची पार्श्वभूमी तयार केली जाईल.

ज्ञान-ज्ञेय विभागाधिकाराने एकप्रकारे ज्ञानतत्त्वप्रज्ञापन महाधिकार व ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकार – दोहोंना आपल्यात सामावून घेतले आहे, दोहोंचा उपसंहार, निष्कर्ष आहे. त्यामध्ये हे स्पष्ट केले जाईल की ज्ञानतत्त्व वेगळे व ज्ञेयतत्त्व वेगळे आहे. जरी आपला आत्मा ज्ञानही आहे व ज्ञेयही आहे; तरीही स्वत:करिता ज्ञानतत्त्व केवळ आपला आत्माच आहे, इतर सर्व जगात सर्व आत्मे सामिल आहेत, ते ज्ञेयतत्त्वच आहे, केवळ ज्ञेयतत्त्व आहे.

या दृष्टीने विचार केला तर हा ज्ञान-ज्ञेय विभागाधिकार एक स्वतंत्र महाधिकार असावयास हवा; तरी देखील याला येथे ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकाराच्या अंतर्गत एका अधिकाराच्या रूपातच प्रस्तुत केले आहे.

सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानाच्या प्राप्तीकरिता ज्ञानतत्त्व व ज्ञेयतत्त्वाला जाणण्याबरोबरच ज्ञानतत्त्व व ज्ञेयतत्त्वातील अंतर जाणणेही अनिवार्य आहे, त्यामुळे ज्ञान-ज्ञेयविभागाधिकारही अत्यंत महत्त्वपूर्ण अधिकार आहे.

अशाप्रकारे हे तिन्ही अधिकार अत्यंत महत्त्वपूर्ण विषयवस्तुला प्रस्तुत करणारे महत्त्वपूर्ण अधिकार आहेत. ●

प्रवचनसार गाथा-९३

ही गाथा ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकाराची आणि द्रव्यसामान्यप्रज्ञापन अधिकाराची पहिली गाथा आहे, जी संपूर्ण प्रवचनसार ग्रंथाची ९३ वी गाथा आहे आणि ज्यामध्ये पदार्थ द्रव्य-गुण-पर्यायरूप असतो – हे सांगितले आहे. मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

अत्थो खलु दव्वमओ दव्वाणि गुणप्पगाणि भणिदाणि।
तेहिं पुणो पज्जाया पज्जयमूढा हि परसमया॥९३॥

(हरिगीत)

गुणात्मक हैं द्रव्य एवं अर्थ हैं सब द्रव्यमय।
गुण-द्रव्य से पर्यायें पर्ययमूढ़ ही हैं परसमय॥९३॥

वास्तविक पदार्थ द्रव्यमय आहे व द्रव्य गुणात्मक म्हटले आहेत. द्रव्य व गुणांपासून पर्याय होतात आणि पर्यायमूढ जीवच परसमय असतात.

या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आंहे –

"या विश्वामध्ये जे काही ज्ञेय पदार्थ आहेत, ते सर्व विस्तारसामान्य-समुदायात्मक आणि आयतसामान्यसमुदायात्मक द्रव्याने रचले गेले असल्याने द्रव्यमय आहेत, द्रव्यरूप आहेत.

एकमेव द्रव्यच ज्यांचा आश्रय आहे अशा विस्तारविशेषस्वरूप गुणांनी रचलेले असल्याने द्रव्य गुणात्मक आहेत व आयतविशेषस्वरूप पर्याय उपर्युक्त द्रव्य व गुणानीं रचलेल्या असल्याने द्रव्यात्मकही आहेत व गुणात्मकही आहेत.

अनेक द्रव्यात्मक एकतेच्या प्रतिपत्तिचे कारणभूत द्रव्यपर्याय आहेत. ते द्रव्यपर्याय दोन प्रकारचे असतात – समानजातीयद्रव्यपर्याय आणि असमानजातीयद्रव्यपर्याय.

अनेक पुद्गलात्मक द्विअणुक, त्रिअणुक वगैरे स्कंध समानजातीय

द्रव्यपर्याय आहेत आणि जीव-पुद्गलात्मक देव, मनुष्य वगैरे पर्याय असमानजातीयद्रव्यपर्याय आहेत.

गुणांद्वारे आयताच्या अनेकपणाच्या प्रतिपत्तिच्या कारणभूत गुणपर्याय आहेत. त्या देखील दोन प्रकारच्या असतात – स्वभावगुणपर्याय आणि विभावगुणपर्याय.

सर्व द्रव्यांच्या आपापल्या अगुरुलघुत्वगुणांद्वारे प्रत्येक समयाला प्रगट होणाऱ्या षट्स्थानपतित हानि-वृद्धिरूप अनेकपणाची अनुभूती त्या स्वभावपर्याय आहेत आणि रूप वगैरे अथवा ज्ञान वगैरे स्व-पराच्या (उपादान-निमित्ताच्या) कारणाने प्रवर्तमान पूर्वोत्तर अवस्थांमध्ये होणाऱ्या तारतम्यतेच्या कारणामुळे दिसून येणाऱ्या स्वभावविशेषरूप अनेकपणाची आपत्ती विभावपर्याय आहेत.

आता हीच बाब दृष्टांताद्वारे दृढ करतात –

ज्याप्रमाणे सर्व पट (वस्त्र) स्थिर विस्तारसामान्यसमुदायाने व धावत असलेल्या आयतसामान्यसमुदायाने रचित असून पटाशी (वस्त्राशी) तन्मयच आहे; तसेच सर्व द्रव्य स्थिर विस्तारसामान्यसमुदायाने व धावत असलेल्या आयतसामान्यसमुदायाने रचित असून द्रव्यमयच आहेत.

ज्याप्रमाणे पट स्थिरविस्तारसामान्यसमुदाय किंवा धावत असलेल्या आयतसामान्य समुदाय गुणांनी रचित असून गुणांपासून पृथक अप्राप्त असल्याने गुणात्मकच आहे; त्याप्रमाणे स्थिर विस्तारसामान्यसमुदाय किंवा धावत असलेल्या आयतसामान्यसमुदाय द्रव्य, गुणांनी रचित असून गुणांपासून पृथक अप्राप्त असल्याने गुणात्मकच आहे.

ज्याप्रमाणे अनेक पटात्मक (अनेक वस्त्रांनी निर्मित) द्विपटिक, त्रिपटिक वगैरे समानजातीय द्रव्यपर्याय आहेत, त्याप्रमाणे अनेक पुद्गलात्मक द्विअणुक, त्रिअणुक वगैरे समानजातीय द्रव्यपर्याय आहेत.

ज्याप्रमाणे अनेक रेशमी व सूती वस्त्रांनी बनलेल्या द्विपटिक, त्रिपटिक वगैरे असमानजातीय द्रव्यपर्याय आहेत; त्याप्रमाणे अनेक जीव-पुद्गलात्मक देव-मनुष्य वगैरे असमानजातीय द्रव्यपर्याय आहेत.

'जसे कधी पटामध्ये आपल्या स्थूल अगुरुलघुगुणाद्वारे कालक्रमाने प्रवर्तमान अनेक प्रकारच्या रूपाने परिणमित होत असल्याने अनेकपणाची प्रतिपत्ती गुणात्मक स्वभाव पर्याय आहेत; तसेच सर्व द्रव्यांत आपापल्या सूक्ष्म अगुरुलघुगुणाद्वारे प्रत्येक समयाला प्रगट होणारी षट्स्थानपतित हानी-वृद्धीरूप अनेकपणाची अनुभूती गुणात्मक स्वभावपर्याय आहेत.

ज्याप्रमाणे पटामध्ये रूपादिकाच्या स्व-पराच्या कारणाने प्रवर्तमान पूर्वोत्तर अवस्थांमध्ये होणाऱ्या तारतम्यतेमुळे आढळणाऱ्या स्वभावविशेषरूप अनेकपणाची आपत्ती गुणात्मक विभावपर्याय आहेत; त्याप्रमाणे समस्त परद्रव्यांमध्ये रूपादीच्या किंवा ज्ञानादिच्या स्व-परामुळे प्रवर्तमान पूर्वोत्तर अवस्थांमध्ये होणाऱ्या तारतम्यतेमुळे आढळणाऱ्या स्वभावविशेषरूप अनेकपणाची आपत्ती गुणात्मक विभावपर्याय आहेत.

वास्तविक ही सर्व पदार्थांच्या द्रव्य-गुण-पर्यायाची प्रकाशक अशी पारमेश्वरी व्यवस्था चांगली आहे, उत्तम आहे, पूर्ण आहे व योग्य आहे; दुसरी कोणतीच व्यवस्था नाही, कारण बरेचसे जीव पर्यायाचे अवलंबन करून, तत्त्वाच्या अप्रतिपत्तीरूप मोहाला प्राप्त होऊन परसमय होतात.''

याला भावार्थामध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे –

''पदार्थ द्रव्यस्वरूप आहे, द्रव्यं अनंतगुणमय आहे. द्रव्य व गुणांनी पर्याय होतात. पर्यायीचे दोन प्रकार आहेत – १)द्रव्यपर्याय, २)गुणपर्याय.

द्रव्यपर्यायीचे दोन भेद आहेत – १) समानजातीय, उदा. द्विअणुक, त्रिअणुक वगैरे स्कंध व २) असमानजातीय, उदा. मनुष्य, देव वगैरे.

गुण-पर्यायाचे दोन भेद आहेत – १) स्वभावपर्याय, उदा. सिद्धांच्या गुणपर्याय आणि २) विभावपर्याय, उदा. स्व-परहेतुक मतिज्ञानपर्याय.

जिनेंद्र भगवंतांनी सांगितलेले असे सर्व पदार्थांचे द्रव्य-गुण पर्याय-स्वरूप यथार्थ आहे. जे जीव द्रव्य-गुण यांना न जाणता फक्त पर्यायाचेच अवलंबन घेतात, ते निज स्वभावाला न जाणता परसमय आहेत.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये देखील या गाथेचा भाव जवळपास असाच सांगितला आहे.

कविवर वृंदावनदासजी वरील गाथा आणि तिच्या तत्त्वप्रदीपिका टीकेचा सर्व भाव ३ मनहरण कवित्त, ४ दोहे व १ कवित्त – अशातऱ्हेने एकूण ८ छंदामध्ये विस्ताराने सांगतात; जे मूळत: वाचनीय आहेत.

पुनरुक्तीच्या भयास्तव त्यांना येथे देणे योग्य वाटत नाही.

प्रवचनसारभाषाकवित्तमध्ये पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव एका पद्यामध्ये खालीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(छप्पय)

विमलज्ञान महि प्रगट ग्येय पादारथ जे हैं।
सो सामान्य स्वरूप दर्वमय सर्व कहे हैं।।
पुनि सु दर्व संजुक्त गुन सु निज निज अनंत धुअ।
द्रव्य अवर गुन के सु परिनमन करि सुभेद हुअ।।
कहिये सु दरव परजाय इक गुन परजाय सु दूसरिय।
परजाय असुद्ध विषैं मगन परसमय सु मिथ्यामतिय।।२।।

सम्यग्ज्ञान वा केवलज्ञानात जे पदार्थ ज्ञेयरूप जाणले जातात, त्या सर्वांना सामान्यरूपे द्रव्य म्हणतात. ते सर्व द्रव्य आपापल्या अनंत गुणांनी सहित असतात. द्रव्य व गुणांच्या परिणमनाचेही अनेक भेद आहेत. यापैकी एक द्रव्यपर्याय म्हटली जाते आणि दुसरी गुणपर्याय म्हटली जाते व अशुद्धपर्यायींमध्ये मग्न जीवांना परसमय (मिथ्यादृष्टी) म्हणतात.

वरील गाथा व तिच्या टीकेचा भाव आध्यात्मिक सत्पुरुष श्री कानजी स्वामी पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात –

''हा ज्ञेय अधिकार चालू आहे. ज्ञानात ज्ञात होण्यायोग्य सर्व पदार्थांना ज्ञेय म्हणतात. सहा द्रव्यांच्या समुदायरूप हे विश्व आहे. त्यातील सर्व पदार्थ अनादी-अनंत असल्याने स्वयंसिद्ध आहेत. त्यांची

कोणी रचना केलेली नाही. ते सदैव आपापल्या द्रव्य-क्षेत्र-काल-भाव स्वरूपाने आहेत; परंतु परपदार्थांच्या द्रव्य-क्षेत्र-काल-भावरूप नाहीत.[१]

ज्ञेयाचे तीन प्रकार असतात – द्रव्य, गुण व पर्याय. अनंत गुणांचा अभेद पिंड ते द्रव्य आहे. द्रव्यामध्ये त्याच्याबरोबर विस्तार विशेषरूप गुण आहेत व समया-समयाला क्रमश: उत्पाद-व्ययरूप होणाऱ्या अवस्था-वर्तमानदशा पर्याय आहेत; या पदार्थामध्ये पर्याय स्वत: आपल्या द्रव्य-गुणानेच होतात. तरी देखील जो असे मानतो की पर्याय परामुळे होते, तर तो जीव अखंड स्व-पर ज्ञेयाला मानत नाही आणि निव्वळ अंशालाच पूर्ण द्रव्य मानून, देहादी संयोगामध्ये एकताबुद्धी करून पर्यायमूढ होतो, याचेच नाव संसार आहे.[२]

असमानजातीय जड शरीर व जीव हे दोन्ही भिन्न-भिन्न वर्ततात; परंतु असे न मानता तो पराच्या आधाराने एक-दुसऱ्याचे परिणमन मानतो. कर्मामुळे जीवाला विकार होतो, तसेच जीवामुळे कर्मांची रचना होते. अशातऱ्हेने एका अंशाच्या सत्तेला दुसऱ्यामुळे ती आहे – असे मानतो. अंशी व अंश अभेद आहेत – असे न मानता हा पराशी एकत्व मानतो; म्हणून अंशामध्ये पूर्णता मानणारा, अनेकाला एक मानणारा व द्रव्य-गुणाच्या आश्रयाने अंश म्हणजे पर्याय होते – असे अभेद न मानणारा किंवा परामुळे पर्याय होते. अशाप्रकारे भेदालाच मानणारा असल्याने, असा जीव पर्यायमूढ आहे.[३]

अज्ञानीची अंश व संयोगावर दृष्टी असल्याने तो हे मानल्याशिवाय रहात नाही की माझी सद्य परिस्थिती पराधीन आहे व परवस्तुची अवस्था माझ्या आधीन आहे; मी वाणी थांबवू शकतो, मी फूल तोडू नये, मी आहार सोडावा, मी शरीराला स्थिर करू शकतो वगैरे मान्यतावाला मी पराच्या अवस्थेला करू शकतो – अशी कर्तापणाची श्रद्धा पकडून बसला आहे.[४]''

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १३
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १७, १८
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २०, २१
४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २४

वरील संपूर्ण कथनाचा सार हा आहे की द्रव्य-गुण-पर्यायमय सर्व पदार्थ ज्ञेय आहेत. सर्व द्रव्य गुणात्मक आहेत, तसेच द्रव्याच्या आणि गुणाच्या पर्याय असतात. अशातऱ्हेने पर्याय द्रव्यपर्याय आणि गुणपर्याय अशा भेदाने दोन प्रकारच्या असतात. द्रव्यपर्यायांना व्यंजनपर्याय व गुणपर्यायांना अर्थपर्याय देखील म्हणतात.

लक्षात ठेवण्यासारखी बाब ही आहे की फक्त एका द्रव्याच्या परिणमणाला द्रव्यपर्याय म्हणत नाहीत, तर अनेक द्रव्यांच्या मिसळलेल्या अवस्थांना द्रव्यपर्याय म्हणतात.

या द्रव्यपर्याय समानजातीय द्रव्यपर्याय व असमानजातीय द्रव्यपर्याय अशा दोन प्रकारच्या असतात. समानजातीयद्रव्यपर्याय पुद्गलामध्ये असतात; कारण जीवादी द्रव्य तर एकमेकात मिसळून कधी एखाद्या पर्यायरूपाने परिणमित होत नाहीत. न तर जीव द्रव्य धर्मादी अमूर्तिक द्रव्यांबरोबर मिसळून परिणमित होते व न तर दोन जीव द्रव्य परस्परबंधरूप होतात. एकमेव पुद्गल परमाणू एकमेकात मिसळून स्कंधरूप परिणमित होतात. यामुळेच समानजातीय द्रव्यपर्याय पुद्गलामध्येच असतात.

जीव आणि शरीररूप पुद्गलांच्या बंधस्वरूप मनुष्य वगैरे पर्याय असमानजातीय द्रव्यपर्याय आहेत; कारण जीव आणि पुद्गल यांची एक जात नाही. जीव चेतन जातीचा आणि पुद्गल जड जातीचा आहे. सर्व पुद्गल एकाच प्रकारच्या जड जातीचे आहेत, म्हणून जड परमाणुंचा पिंड-स्कंधरूप समानजातीय द्रव्यपर्याय आहे.

प्रत्येक द्रव्याच्या गुणात होणाऱ्या प्रति समयाच्या परिणमनाला गुणपर्याय म्हणतात. उदा. जीवाच्या ज्ञानगुणाचे मतिज्ञान, श्रुतज्ञानादीरूप परिणमन गुणपर्याय आहे. अशाप्रकारे पुद्गलाच्या रस गुणाचे आंबट-गोडरूप परिणमन रसगुणाच्या गुणपर्याय आहेत.

यामध्ये जे शुद्ध परिणमन आहे, पूर्ण आहे तिला स्वभावपर्याय म्हणतात व जे परिणमन अपूर्ण आहे, अशुद्ध आहे ती विभावपर्याय आहे.

जरी सर्व द्रव्यपर्याय व सर्व गुणपर्यायामध्ये एकत्वबुद्धी, ममत्वबुद्धी, कर्तृत्वबुद्धी व भोक्तृत्वबुद्धी मिथ्यात्व आहे, तरी येथे विशेष जोर मनुष्यपर्यायरूप असमानजातीय द्रव्यपर्यायांमध्ये एकत्व, ममत्व, कर्तृत्व व भोक्तृत्वबुद्धी यावरच दिला जात आहे.

या गोष्टीचे खास स्पष्टीकरण पुढील गाथा व तिच्या टीकेमध्ये केले जाईल, म्हणून येथे त्याची विशेष चर्चा करणे योग्य नाही. ●

वस्तू तर पराहून निरपेक्षच आहे. तिला आपल्या गुण-धर्मांना धारण करण्याकरिता कोण्या पराची किंचितही अपेक्षा नाही. वस्तुमध्ये नित्यता-अनित्यता, एकता-अनेकता इत्यादी सर्व धर्म सोबत विद्यमान असतात. द्रव्यदृष्टीने वस्तू ज्या समयी नित्य आहे, पर्याय दृष्टीने त्याच वेळी अनित्य देखील आहे, वाणीने जेव्हा नित्यतेचे कथन केले जाईल, तेव्हा अनित्यतेचे कथन शक्य होणार नाही.

त्यामुळे जेव्हा आपण वस्तुच्या नित्यतेचे प्रतिपादन करू, तेव्हा श्रोता हे समजू शकतो वस्तू नित्यच आहे, अनित्य नव्हे. म्हणून आपण 'कोण्या अपेक्षेने नित्य आहे' – असे म्हणतो. असे म्हटल्याने त्याच्या ज्ञानात ही बाब सहजच येईल की कोण्या अपेक्षेने वस्तू अनित्य देखील आहे, जरी वाणीच्या असामर्थ्यामुळे ही बाब म्हटली जात नाही.

यामुळे वाणीमध्ये स्यात् पदाचा प्रयोग करणे आवश्यक आहे, स्यात् पद अविवक्षित धर्मांना गौण करते, त्यांचा अभाव करीत नाही. त्याचा प्रयोग केला नाही तर अभावाचा भ्रम होऊ शकतो.

– तीर्थंकर महावीर आणि त्यांचे सर्वोदय तीर्थ, पृष्ठ : १४४

प्रवचनसार गाथा-९४

मागील गाथेच्या चवथ्या पदामध्ये हे सांगितले होते की पर्यायमूढ जीव परसमय आहेत, म्हणून येथे असा प्रश्न सहाजिकच उभा राहतो की जर पर्यायमूढ जीव परसमय आहेत तर मग स्वसमय कोण आहेत ?

वरील प्रश्नाला लक्षात ठेऊन आगामी गाथेमध्ये स्वसमय आणि परसमय यांच्या स्वरूपाला विशेष स्पष्ट केले जात आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

जो पज्जएसु णिरदा जीवा परसमइग त्ति णिद्दिट्ठा।
आदसहावम्हि ठिदा ते सगसमया मुणेदव्वा ॥९४॥

(हरिगीत)

पर्याय में ही लीन जिय परसमय आत्मस्वभाव में।
थित जीव ही हैं स्वसमय-यह कहा जिनवरदेव ने ॥९४॥

जे जीव पर्यायांमध्ये लीन आहेत त्यांना परसमय म्हटले आहे आणि जे जीव आत्मस्वभावामध्ये स्थित आहेत, ते स्वसमय जाणावेत.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''जे सकल अविद्यांचे मूळ अशा जीव-पुद्गलात्मक असमानजातीय द्रव्यपर्यायांचा आश्रय करून यथोक्त आत्मस्वभावाच्या संभावनेने नपुंसक असल्याने असमानजातीय द्रव्यपर्यायामध्येच बळ धारण करतात; 'मी मनुष्य व माझा हा नरदेह आहे' – अशा अहंकार-ममकाराने ठगले आहेत. निरर्गल एकांत दृष्टीवाले ते लोक अविचलित केवळ चेतना विलासाच्या आत्मव्यवहाराहून च्युत होऊन संपूर्ण क्रियाकलापाला छातीला कवटाळण्याजोगा मनुष्यव्यवहाराचा आश्रय घेऊन रागी-द्वेषी होऊन परद्रव्यरूप कर्माशी युक्त झाल्याने परसमय होतात, परसमयरूप परिणमित होतात.

जे सकल विद्यांचे मूळ, असंकीर्ण द्रव्यपर्याय व गुणपर्यायांनी सुस्थित होऊन, आत्म्याच्या स्वभावाचा आश्रय घेऊन यथोक्त आत्मस्वभावाच्या संभावनेमध्ये समर्थ असल्याने फक्त पर्यायाप्रतिच्या बळाला दूर करून आत्मस्वभावातच स्थिती करतात; ज्यांनी सहज विकसित झालेल्या अनेकांत दृष्टीने समस्त एकांतदृष्टीच्या परिग्रहांचा आग्रह नष्ट केलेला आहे; ते मनुष्यादी गतिमध्ये व त्या-त्या गतिच्या शरीरात अहंकार-ममकार न करता अनेक खोल्यात संचारित रत्नदीपकाप्रमाणे आत्म्याला एकरूपानेच उपलब्ध करीत असताना अविचलित फक्त चेतनाविलासाचा आत्म-व्यवहार अंगीकार करून ज्यामध्ये समस्त क्रियाकलापांशी भेट केली जाते, अशा मनुष्यव्यवहाराचा आश्रय न करता, राग-द्वेषाचा उन्मेष थांबल्याने परम-उदासीनतेचे अवलंबन घेऊन समस्त परद्रव्यांची संगती दूर केल्यानेच स्वद्रव्याबरोबरच संगती झाल्याने वास्तविक स्वसमय होतात अर्थात स्वसमयरूप परिणमित होतात, म्हणून स्वसमयच आत्मतत्त्व आहे.''

या गाथेचा भाव आचार्य जयसेन तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांप्रमाणेच परंतु थोडक्यात स्पष्ट करतात. उदाहरण तर खोल्यांमध्ये नेलेल्या रत्नदीपकाचेच देतात. एक बाब अवश्य आहे की अहंकार आणि ममकार यांच्या व्याख्या ते खालीलप्रमाणे सांगतात –

''मनुष्यादी पर्यायरूप मी आहे – अशा परिणतीला अहंकार असे म्हणतात आणि मनुष्यादी शरीर, पाच इंद्रिय व त्यांचे विषय तसेच तज्जन्य सुख माझे आहे – अशी परिणती ममकार आहे.''

या गाथेचा भाव कविवर वृंदावनदासजींनी दोन छंदामध्ये व्यक्त केला आहे, त्यातील पहिला छंद पुढीलप्रमाणे आहे –

(षट्पद)

जे अज्ञानी जीव देह ही में रति राचे।
अहंकार ममकार धरें मिथ्यामद माचे॥
तिनही को परसमय नाम भगवंत कहा है।
अरु जो आतमभाव विषैं लवलीन रहा है॥

तिन आतमज्ञानी जीव को स्वसमयरत जानो सही।
वह चिद्विलास निजरूप में रमत वृन्द निज निधि लही ॥१२॥

जे अज्ञानी शरीरात अहंकार-ममकार करतात, त्यामध्ये रति करतात, ते मिथ्यात्व-मदिरेच्या नशेत आहेत. भगवंतांनी त्यांना परसमय म्हटले आहे.

जे आपल्या आत्म्यात एकत्व-ममत्व करून त्यातच लवलीन राहतात, त्या आत्मज्ञानी जीवांना स्वसमय आहेत – असे जाणले पाहिजे.

वृंदावन कवी म्हणतात की निजरूप चैतन्यामध्ये विलास करणारे ते लोक निज निधीला प्राप्त करून त्यामध्येच रममाण होतात.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव एका पद्यात पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(कवित्त छन्द)

जे जिय मनुष्यादि परजायनि विषैं लगे ममिता करि मोहि।
आतमीक गुन विषैं नपुंसक ते परसमय कहे जिन टोहि ॥
सुसमयवंत संत तिन्हि के घट सहज परमपद परगट होहि।
दरसन ग्यान चरन गुन अपनौ राख्यौ तिन्हि सु आप सौं गोहि ॥३॥

जे जीव मनुष्यादी पर्यायींमध्ये ममता करून मोहीत होत आहेत व आत्म गुणांना जाणण्यात नपुंसक होत आहेत, त्यांना वस्तुस्वरूपाचे शोधक जिनराज परसमय म्हणतात. स्वसमय अवस्थेचे धारक संतांच्या हृदयात परमपद सहजच प्रगट होईल, कारण त्यांनी आपल्या हृदयात दर्शन, ज्ञान व चारित्राला लपवून ठेवले आहे.

या गाथेचा भाव आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी पुढील प्रमाणे स्पष्ट केला आहे –

"जो जीव-पुद्गलात्मक असमानजातीय द्रव्यपर्यायाचा आश्रय करतो तो मिथ्यादृष्टी आहे. जो जीव फक्त एकट्या पर्यायालाच मानतो, शरीराला आपले मानतो. शरीर असमानजातीय द्रव्यपर्याय आहे; तरी देखील त्यांची क्रिया जीवामुळे झाली आहे – असे अज्ञानी मानतो.[१]

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४०

समानजातीय स्कंधामध्येही प्रत्येक परमाणुची पर्याय त्यांच्या द्रव्य-गुणांच्या आधाराने आहे व रागपर्याय आपल्या आधाराने आहे – असे तो पहात नाही. परंतु संयोगांनाच पाहतो व स्वभावाला पहात नाही.[१]

तसेच असमानजातीय द्रव्यपर्यायीत आत्मा व शरीर दोन्ही द्रव्यांच्या पर्याय वेगळ्या आहेत व त्यांच्या द्रव्यांच्या आधीन आहेत – असे असूनही अज्ञानी मानतो की शरीर होते म्हणून धर्म झाला व आत्मा होता म्हणून शरीर चालले.[२]

वस्तू त्रिकाळ आहे, शक्ती अनंत आहे व पर्याय समया-समयाला द्रव्यातून येते – अशा स्वभावाची श्रद्धा करणे केवलज्ञानाचे कारण आहे.[३]

अज्ञानी जीव अशा आत्मस्वभावाचा आदर करीत नाही; तो शरीर, निमित्त व असमानजातीय द्रव्यपर्यायाचा आश्रय घेतो, परंतु द्रव्य-गुणांचा आश्रय घेत नाही. स्वत:ला तो पुण्य-पापाएवढाच मानतो; म्हणून तो आत्म्याचा अनुभव करण्याकरिता नपुंसक आहे. जडाचा आश्रय घेणे मनुष्यव्यवहार आहे आणि त्याचे फळ निगोद आहे.[४]

येथे दोन गोष्टी सांगितल्या आहेत, जो पर्यायामध्ये मूढ आहे, तो परसमय आहे व जो द्रव्य-गुणामध्ये लीन आहे, तो स्वसमय आहे.[५]

हा प्रवचनसाराचा ज्ञेय अधिकार आहे. यामध्ये द्रव्य-गुण तसेच विकारी किंवा अविकारी पर्यायांचे यथार्थ ज्ञान करवितात.[६]

अज्ञानी जीव जडाची क्रिया, तसेच पुण्याची क्रिया करायला पाहिजे – असे म्हणून सर्व संयोगांना व निमित्तांना छातीला कवटाळतो.[७]

वेगवेगळ्या खोल्यांमध्ये नेला गेलेला दिवा एकरूपच आहे. तो त्या खोल्यांरूप बिलकूल होत नाही आणि परपदार्थांची क्रिया करीत नाही. त्याप्रमाणे वेगवेगळ्या शरीरामध्ये प्रवेश करणारा आत्मा एकरूपच

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४०
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४०
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४१
४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४२
५) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४३
६) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४८
७) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ५०, ५१

आहे; तो शरीररूप बिलकूल होत नाही व शरीराची क्रिया देखील करीत नाही – असे ज्ञानी जाणतात.[१]

जो जीव आपल्या स्वज्ञेयाचा आश्रय घेतो, त्याला सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्ररूप आत्मव्यवहार प्रगट होतो.[२]

अशातऱ्हेने आपल्या द्रव्य-गुण-पर्यायाचा पिंड अशा स्वद्रव्याचा आश्रय असल्याकारणाने तो जीव वास्तविक स्वसमयच असतो.[३]

जो मनुष्यव्यवहाराचा आश्रय घेतो, त्याचा संसार दूर होत नाही आणि स्वज्ञेयाचा आश्रय घेणाऱ्या ज्ञानीचा संसार उत्पन्न होत नाही.[४]

मनुष्यव्यवहाराचा आश्रय ज्ञानी घेत नाही, तर आत्मव्यवहाराचा आश्रय घेतो अर्थात ते आपल्या द्रव्याचा आश्रय घेतात; आपल्या अंशी स्वभावाचा आश्रय घेतात; म्हणून ते रागी-द्वेषी होत नाहीत. परद्रव्यांशी संबंध न ठेवल्याने, फक्त स्वद्रव्याशीच संबंध ठेवल्याने ते जीव धर्म प्राप्त करतात.[५]

ज्ञेय अधिकाराच्या या दोन गाथांमध्ये मोक्ष-महालाचा स्तंभ रोवला आहे. त्यावर प्रशमाच्या लक्षाने केवज्ञानरूपी महाल बनेल अथवा जे मुमुक्षु या दोन्ही गाथांना यथार्थ समजतील ते निश्चितरूपाने आपल्यामध्ये सम्यग्दर्शन प्रगट करतील.[६]''

वरील संपूर्ण कथनाच्या आधारे असे गृहीत धरले जाऊ शकते की येथे मनुष्यादी असमानजातीय द्रव्यपर्यायांमध्ये एकत्व-ममत्व ठेवणाऱ्यालाच प्रामुख्याने असे म्हटले आहे. जे लोक या गाथेबद्दल बोलताना केवलज्ञानादी पर्यायांच्या भिन्नतेबद्दल जोर देतात, त्यांनी या गाथा व त्यांच्या टीकेवर विशेष लक्ष द्यावे.

आचार्य अमृतचंद्र स्वत: या बाबीवर विशेष जोर देत आहेत की जीव-पुद्गलात्मक असमानजातीयद्रव्यपर्यायच सकल अविद्यांचे मूळ

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ५५
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ५६
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ५९
४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ६०
५) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ६२
६) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ६२

आहे. तात्पर्य हे आहे की श्रद्धा-ज्ञान-चारित्रामध्ये जी काही विकृती आली आहे, अविद्यारूप परिणमन झाले आहे; त्या सर्वांचे मूळ असमानजातीय-द्रव्यपर्यायामध्ये एकत्वबुद्धी आहे, ममत्वबुद्धी आहे.

जरी हे सत्य आहे की गुरुदेवश्रींनी गुणपर्यायांवर अधिक वजन दिले आहे. त्यांचे त्यावर वजन देणे उचित देखील आहे; कारण त्यांच्याकडे जगाचे लक्ष गेलेच नव्हते. ते केवळ असमानजातीयद्रव्यपर्यायाच्या संदर्भातच विचार करीत होते. त्यामुळे ती त्या काळाची अनिवार्य आवश्यकता होती; परंतु आता त्यावर आवश्यकतेपेक्षा अधिक लक्ष गेले आहे; त्यामुळे आता यावर पुन्हा ध्यान देणे आवश्यक आहे.

गुरुदेवश्रींनी प्रथम विवक्षेवर अधिक वजन दिले आहे व मी दुसऱ्या विवक्षेवर अधिक वजन देत आहे. यामध्ये कोणताही विरोध नाही.

केवलज्ञानही पर्याय आहे व त्यामध्ये एकत्वबुद्धी मिथ्यात्व आहे – ही बाब मोठ-मोठ्या विद्वानांच्या लक्षात नव्हती. सम्यग्दर्शनही पर्याय आहे, त्यामध्ये एकत्वबुद्धी मिथ्यात्व आहे – हे सुद्धा कोणाच्या लक्षात नव्हते. लक्षात आणून दिल्यावरही लोक या विवक्षेला समजत नव्हते.

गुरुदेवश्रींच्या पुण्यप्रतापाने आता ही परिस्थिती झाली आहे की सर्वजण त्यालाच मानू लागले आहेत व जे सकल अविद्यांचे मूळ आहे – अशी जी असमानजातीयद्रव्यपर्याय आहे, त्या द्रव्यपर्यायामध्ये एकत्वबुद्धीला आज स्थूल म्हणू लागले आहेत. स्वत:ला मोठा पंडित मानणाऱ्या काही जणांना त्याची चर्चा करण्यात देखील लाज वाटते, कारण त्यांच्या दृष्टीने ते स्थूल कथन आहे.

काय आचार्य अमृतचंद्र लहान पंडित होते ? काय प्रवचनसार स्थूल बाबींचे प्रतिपादन करणारा ग्रंथ आहे ? अरे बंधो ! याच महाग्रंथाच्या टीकेमध्ये अमृतचंद्राचार्यांनी हे लिहिले आहे की **'जे जीव मनुष्यादीक असमानजातीयद्रव्यपर्यायांमध्ये एकत्वबुद्धी धारण करतात, ते आत्म्याचा अनुभव करण्यामध्ये नपुंसक आहेत.'**

आचार्य म्हणतात की असा जो मनुष्यव्यवहार आहे, त्याचा आश्रय

घेऊन हा जीव रागी-द्वेषी होऊन परद्रव्यरूप कर्माने युक्त होऊन वास्तविक पाहता परसमय असून परसमयरूपच परिणमित होतो.

याद्वारे आपण हे समजू शकतो की त्या मनुष्यव्यवहारात एकत्वबुद्धीच मिथ्यात्व आहे. 'मी सम्यग्दर्शन आहे, मी केवलज्ञान आहे.' – हा मनुष्य-व्यवहार नाही. याचा आशय केवळ हाच आहे की येथे आचार्य अमृतचंद्र देवांनी स्वत: संपूर्ण वजन असमानजातीयद्रव्यपर्यायावर दिले आहे.

स्वसमयाचे आणि परसमयाचे तुलनात्मक विवेचन समयसाराची आत्मख्याती टीका, प्रवचनसाराची तत्त्वप्रदीपिका टीका आणि पंचास्तिकायाची समयव्याख्या टीका यांच्या आधारे समयसार अनुशीलन भाग १ मध्ये असे लिहिले आहे –

''समयसाराच्या दुसऱ्या गाथेत दर्शन, ज्ञान व चारित्रात स्थित जीवाला स्वसमय म्हटले आहे व प्रवचनसारामध्ये आत्मस्वभावात स्थित जीवाला स्वसमय म्हटले आहे. अशाप्रकारे समयसारामध्ये पुद्गल कर्माच्या प्रदेशात स्थित जीवाला परसमय म्हटले आहे व प्रवचनसारात पर्यायात मग्न असलेल्या आत्म्याला परसमय म्हटले आहे.

वरील दोन्ही कथनांमध्ये काही फरक नाही, फक्त अपेक्षा भेद आहे. आत्मस्वभावामध्ये स्थित होणे म्हणजेच दर्शन-ज्ञान-चारित्रामध्ये स्थित होणे. श्रद्धा, ज्ञान व चारित्र गुणांच्या पर्याय जेव्हा आत्मस्वभावाच्या सन्मुख होऊन परिणमित होतात, तेव्हा सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र प्रगट होतात. यालाच तर आत्मस्वभावामध्ये स्थित होणे म्हटले जाते व यालाच दर्शन-ज्ञान-चारित्रामध्ये स्थित होणे म्हटले जाते.

समयसाराच्या आत्मख्याती टीकेत पुद्गलकर्माच्या प्रदेशात स्थित होण्याचा अर्थ मोह-राग-द्वेषादी भावांमध्ये एकत्व स्थापित करून परिणमन करणे असा केला आहे व प्रवचनसाराच्या तत्त्वप्रदीपिका टीकेत पर्यायांत मग्न चा अर्थ करताना मनुष्यादी असमानजातीयद्रव्यपर्यायांमध्ये एकत्वपणे परिणमन करण्यावर विशेष जोर दिला आहे.

तात्पर्य हे आहे की परसमयाच्या व्याख्येत आत्मख्यातीमध्ये मोह-

राग-द्वेषरूप आत्म्याच्या विकारी परिणामांबरोबर एकत्वबुद्धीवर जोर दिला आहे, तर तत्त्वप्रदीपिका टीकेत मनुष्यादी असमानजातीयद्रव्य-पर्यायांबरोबर एकत्वबुद्धीवर जोर दिला आहे.

आत्मख्यातीमध्ये उपचरित-सद्भूतव्यवहारनयाच्या विषयाला सांगितले आहे, तर तत्त्वप्रदीपिकेमध्ये अनुपचरित-असद्भूत व्यवहारनयाच्या विषयाला सांगितले आहे. रागादी बरोबरच्या एकत्वाचे कथन उपचरित-सद्भूतव्यवहारनय करतो आणि मनुष्यदेहादी सोबत एकत्वाचे कथन अनुपचरित-असद्भूत व्यवहारनय करतो.

निश्चयरत्नत्रय रहित जीव तर मिथ्यादृष्टीच असतात. या निश्चय रत्नत्रयाने परिणत जीवांना तीन भागात विभागले जाऊ शकते व ते तिन्ही भेद चारित्राच्या पूर्ण-अपूर्णतेच्या आधारे घटित होतात. कारण सम्यग्दर्शन अपूर्ण तर असतच नाही. चवथ्या गुणस्थानातच क्षायिक सम्यग्दर्शन होते. सम्यग्ज्ञानही सम्यक्-मिथ्यात्वाच्या अपेक्षेने पूर्णपणे सम्यक्च असते. अशा वेळी भले केवलज्ञान नाही, तरीही सम्यक्पणामध्ये काहीही फरक नाही, कोणतीही अपूर्णता असत नाही.

अनंतानुबंधी कषायाच्या अभावामध्ये चारित्राचा अंश चवथ्या गुणस्थानामध्ये प्रगट होतो आणि पूर्णता वीतरागी झाल्यावरच होते, तसेच सातव्या गुणस्थानायोग्य शुद्धोपयोगाच्या अपेक्षेने सातव्या गुणस्थानामध्ये निश्चयचारित्र होते.

अशाप्रकारे निश्चयचारित्र परिणत जीवांना खालील तीन भागांत विभागले जाते –

१) निश्चयसम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र प्रगट झाले असता चवथ्या गुणस्थानावाले जीव निश्चयरत्नत्रयाने परिणत होतात. या अपेक्षेने चवथ्या गुणस्थानापासून सिद्धांपर्यंत सर्व जीव स्वसमयच आहेत.

२) आत्मध्यानात मग्न जीवांनाच जर निश्चयरत्नत्रयपरिणत म्हटले गेले तर सातव्या गुणस्थानाच्या वरचे जीवच स्वसमय म्हटले जातील.

३) पूर्ण वीतरागींनाच जर निश्चयरत्नत्रयपरिणत म्हटले तर बाराव्या गुणस्थानाच्या पुढचेच स्वसमय म्हटले जातील.

येथे एक असा प्रश्न उद्‌भवतो की मिथ्यादृष्टी परसमय आहे व सम्यग्दृष्टीपासून सिद्धांपर्यंत स्वसमय आहेत – ही अपेक्षा तर ठीक वाटते; परंतु जेव्हा मिथ्यादृष्टीला परसमय म्हटले व वीतरागींना स्वसमय म्हटले तर मग छद्मस्थ सम्यग्दृष्टींना (चवथ्या गुणस्थानापासून बाराव्या गुणस्थानवाल्यांना) काय म्हटले जाईल ? स्वसयम की परसमय ?

या प्रश्नाच्या समाधानाकरिता पंचास्तिकायाची १६५ वी गाथा पाहण्याजोगी आहे –

अण्णाणादो णाणी जदि मण्णदि सुद्धसंपओगादो।
हवदित्ति दुक्खमोखं परसमयरदो हवदि जीवो।।

'शुद्धसंप्रयोगाने दुःखापासून मुक्ती मिळते' – अज्ञानामुळे जर ज्ञानी देखील असे मानेल तर तो परसमयरत जीव आहे.

आचार्य अमृतचंद्रांनी या गाथेच्या टीकेत लिहिले की हे सूक्ष्म परसमयाच्या स्वरूपाचे कथन आहे. पुढे लिहिले की येथे सिद्धीचे साधनभूत अरहंतादी भगवंतांच्या प्रति भक्तीभावाने अनुरंजित चित्तवृत्तीच शुद्धसंप्रयोग आहे. जेव्हा अज्ञानलवाच्या आवेशाने जर ज्ञानवानही 'त्या शुद्धसंप्रयोगाने मोक्ष होतो' – अशा अभिप्रायाद्वारे खेद प्राप्त करीत त्या (शुद्धसंप्रयोगा)मध्ये प्रवर्ततो तर तोपर्यंत तो देखील रागलवाच्या सद्‌भावामुळे परसमयरत म्हटला जातो; तर मग निरंकुश रागरूपी क्लेशाने कलंकित अंतरंग वृत्तीवाले इतर लोक परसमयरत का बरे म्हटले जाणार नाहीत ?

वरील गाथा आणि तिची टीका हे दोन्ही सखोल मंथनाची अपेक्षा ठेवतात. सर्वात मुख्य बाब तर अशी आहे की **'ज्ञानी देखील अज्ञानाने'** हे गाथेचे वाक्य आणि **'अज्ञानलवाच्या आवेशाने जर ज्ञानवान सुद्धा'** हे टीकेचे वाक्य – ही दोन्ही वाक्य विरोधाभासाची वाटतात. जेव्हा एखादी व्यक्ती ज्ञानी आहे तर त्याला अज्ञान कसे असेल ?

जरी सम्यग्ज्ञानीला देखील औदयिक अज्ञान असते, अल्पज्ञानरूप अज्ञान असते; तरी देखील अशा अज्ञानामुळे परसमयपणा संभवत नाही; कारण येथे शुद्धसंप्रयोगाचा अर्थ अरहंतादींच्या भक्तीने अनुरंजित चित्तवृत्ती असे केला आहे व त्याबरोबर हे सुद्धा लिहिले आहे की याने मोक्ष होतो – अशा अभिप्रायामुळे परसमयपणा आहे. म्हणून हे सिद्ध होते की येथे औदयिक अज्ञानाबाबत चर्चा नाही.

जर येथे औदयिक अज्ञानाची चर्चा नाही व ज्ञानीला क्षायोपशमिक अज्ञान असतच नाही तर मग कोणते अज्ञान आहे ?

अहो ! येथे मुख्यपणे तर मिथ्यादृष्टीलाच परसमय म्हणावयाचे आहे. या गोष्टीवरच भर देण्याकरिता असे म्हटले आहे की जेव्हा अरहंतांच्या भक्तीने मुक्ती प्राप्त होते – अशा अभिप्रायवाल्याला परसमय म्हटले जाते तर मग जे विषय-कषायामध्ये सुखबुद्धीने निरंकुश प्रवृत्ती करतात, ते तर परसमयच आहेत.

वास्तविक येथे चारित्राच्या दोषावरच विशेष भर आहे, श्रद्धा किंवा ज्ञानाच्या दोषावर नाही. भले ही अज्ञान या शब्दाचा वापर केला आहे, परंतु त्याबरोबर ज्ञानी हा शब्दही वापरला आहे ना ? तसेच असेही लिहिले आहे की रागलवाच्या सद्भावामुळे परसमयरत आहे. येथे 'रागलवाच्या सद्भावामुळे' – हे वाक्य विशेष लक्ष देण्याजोगे आहे.

यामुळेच आचार्य अमृतचंद्रांना त्यांना परसमय म्हणण्यात संकोच वाटत असावा. त्यांचा हा संकोच ''हे सूक्ष्मपरसमयाचे कथन आहे'' – या शब्दाद्वारे व्यक्त झाला आहे. परंतु गाथेत असा कोणताही भेद केलेला नाही, तरी आचार्य अमृतचंद्र टीकेच्या प्रारंभीच या गोष्टीचा उल्लेख करतात.

'श्रद्धेच्या दोषवाल्या मिथ्यादृष्टीला स्थूलपरसमय व चारित्राच्या दोषवाल्या सराग सम्यग्दृष्टीला सूक्ष्मपरसमय म्हटले आहे' – अशा प्रकारचा भाव याच गाथेच्या टीकेमध्ये आचार्य जयसेनांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या मूळ कथनाचा भाव पुढीलप्रमाणे आहे –

एखादा पुरुष निर्विकार शुद्धात्मभावना लक्षणवाल्या परमोपेक्षा-संयमामध्ये स्थित होण्यामध्ये कमकुवत होऊन काम-क्रोधादी अशुद्ध (अशुभ) परिणामांपासून बचाव करण्याकरिता संसाराच्या स्थितीचे छेदन करण्याकरिता जेव्हा पंचपरमेष्ठींचे गुणस्तवन करतो, भक्ती करतो, तेव्हा सूक्ष्मपरसमयरूप परिणमित होऊन सराग सम्यग्दृष्टी होतो आणि जर शुभोपयोगानेच मोक्ष होतो – असे एकांताने मानतो, तर तो स्थूल परसमयरूप परिणामांनी स्थूल परसमय होऊन अज्ञानी मिथ्यादृष्टी होतो.

वरील कथनामध्ये मिथ्यादृष्टीला स्थूलपरसमय व सरागसम्यग्दृष्टीला सूक्ष्मपरसमय म्हटले आहे. यावरून हे सहज सिद्ध होते की वीतराग सम्यग्दृष्टी स्वसमय आहे.[१]''

या गाथेमध्ये मुख्यत: हे सांगितले आहे की देह व त्यामध्ये विद्यमान असलेल्या आत्म्याला – दोहोंना मिळून आपण स्वत:ला मनुष्य म्हणतो व जिनवाणीमध्ये देखील व्यवहारनयाने यांना एक म्हटले आहे. समयसाराच्या २७ व्या गाथेमध्ये या गोष्टीचा स्पष्ट उल्लेख आहे.

येथे हे सांगितले जात आहे की देह व आत्म्याला एक म्हणणे तर मनुष्यव्यवहार आहे व देहामध्ये विद्यमान असलेल्या, तसेच पर देहाहून भिन्न अशा आत्म्याला आपला मानणे-म्हणणे हा आत्मव्यवहार आहे.

अशा आत्मव्यवहाराशी अपरिचित जे प्राणी मनुष्यव्यवहाराच्या आधारे पर देहासंबंधी सर्व क्रियाकलापाला छातीशी कवटाळतात, धर्म मानून त्याचे सेवन करतात, वरील क्रियाकांड करून स्वत:ला धर्मात्मा समजतात, ते मिथ्यादृष्टी आहेत, परसमय आहेत व आत्म्याचा व्यवहार तर चेतनाविलासामध्ये अविचलित राहणे आहे; अशाप्रकारे जे ज्ञानी जीव वरील आत्मव्यवहारालाच आपली क्रिया मानतात, त्यालाच धर्मरूप स्वीकारतात; अनेक खोल्यांमध्ये फिरणाऱ्या रत्नदीपकाप्रमाणे आत्म्याला एकमेव चेतनाविलासरूप स्वीकार करणारे ते ज्ञानी धर्मात्मा स्वसमय आहेत.

---

१) समयसार अनुशीलन भाग-१, पृष्ठ : ३४ ते ३८

ज्याप्रमाणे वेगवेगळ्या खोल्यांमध्ये नेलेला रत्नदीपक रत्नदीपकच राहतो, खोल्यांना प्रकाशित केल्याकारणाने खोल्यांरूप होत नाही आणि खोल्यांच्या क्रिया देखील करीत नाही. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या शरीरांमध्ये राहणारा आत्मा आत्मरूपच राहतो, तो किंचित सुद्धा शरीररूप होत नाही आणि शरीराच्या क्रिया करीत नाही.

अशातऱ्हेने हे नक्की झाले की देह आणि आत्मा यांच्या एकरूप मनुष्यादी पर्यायांमध्ये आपलेपणा असणे म्हणजेच अहंबुद्धी, कर्तृत्वबुद्धी आणि भोक्तृत्वबुद्धी ठेवणे परसमयपणा आहे आणि एकमेव आत्म्यामध्ये आपलेपणा ठेवणे अर्थात अहंबुद्धी, ममत्वबुद्धी, कर्तृत्वबुद्धी आणि भोक्तृत्वबुद्धी ठेवणे स्वसमयपणा आहे. ●

परमागम आगमाचाच अंश आहे, त्यालाच अध्यात्म असेही म्हणतात. अध्यात्मामध्ये रंग, राग व भेदाहून भिन्न परमशुद्धनिश्चय नय व दृष्टीच्या विषयभूत आणि ध्यानाचा ध्येयरूप, परमपारिणामिकभावस्वरूप त्रैकालिक व अभेदस्वरूप निज शुद्धात्म्यालाच जीव म्हटले जाते. याशिवाय सर्व भावांना अनात्मा, अजीव, पुद्गल इत्यादी नावांनी संबोधित केले जाते. याचे केवळ एकच प्रयोजन आहे की दृष्टी पर, पर्याय व भेदाहून काढून निज शुद्धात्मतत्त्वावर घेऊन जाणे; कारण सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राची उत्पत्ती, स्थिती, वृद्धी आणि पूर्णता निजशुद्धात्मतत्त्वाच्या आश्रयानेच होते.

अध्यात्मरूप परमागमाचे समस्त कथन याच दृष्टीला समोर ठेवून केले जाते. **– परमभावप्रकाशक नयचक्र, पृष्ठ-१०३**

प्रवचनसार गाथा-९५

ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकार द्रव्य-गुण-पर्यायाच्या चर्चेनेच सुरू झाला आहे. यामध्ये असे सांगितले आहे की पर्यायमूढ जीव परसमय आहे; म्हणून प्रारंभीच पर्यायांची चर्चा विस्ताराने केली आहे. या संदर्भात पर्यायाचे द्रव्यपर्याय व गुणपर्याय भेद सुद्धा केले आणि म्हटले की असमानजातीय द्रव्यपर्यायामध्ये एकत्वच मुख्यत: परसमयपणा आहे.

त्यामुळे हा प्रश्न उत्पन्न होणे स्वाभाविकच आहे की द्रव्य काय आहे की ज्याच्या पर्यायामध्ये आपलेपणा परसमयपणा, मिथ्यात्व आहे?

या शंकेच्या समाधानासाठी पुढील गाथेमध्ये द्रव्याचे स्वरूप स्पष्ट करतात. ती गाथा पुढीलप्रमाणे आहे –

अपरिच्चत्तसहावेणुप्पाद-व्यय-धुवत्तसंबद्धं।
गुणवं च सपज्जायं जं तं दव्वं ति वुच्चंति॥९५॥

(हरिगीत)

निजभाव को छोड़े बिना उत्पादव्ययध्रुवयुक्त गुण-
पर्ययसहित जो वस्तु है वह द्रव्य है जिनवर कहें॥९५॥

जे स्वभावाला (सत्तेला) सोडल्याशिवाय उत्पाद-व्यय-ध्रौव्य – या तिन्हीने तसेच गुण व पर्याय या दोहोंसहित आहे, त्याला द्रव्य म्हणतात.

महाशास्त्र तत्त्वार्थसूत्रामध्ये द्रव्याच्या स्वरूपाला स्पष्ट करताना तीन सूत्र लिहिली आहेत, ती अशी आहेत –

''उत्पादव्ययध्रौव्ययुक्तं सत्। सद् द्रव्यलक्षणं। गुणपर्ययवद् द्रव्यं।''

यांचा अर्थ असा आहे की सत् अर्थात सत्ता हे द्रव्याचे लक्षण आहे आणि ती सत्ता उत्पाद-व्यय तसेच ध्रौव्याने युक्त असते आणि द्रव्य-गुण व पर्यायवान असते.

अशाप्रकारे जरी महाशास्त्र तत्त्वार्थसूत्र व जिनप्रवचनाचा सार

असलेल्या प्रवचनसारात आलेल्या व्याख्यांत (परिभाषांत) थोडाही फरक नाही; तरी प्रवचनसाराच्या एकाच गाथेत तत्त्वार्थसूत्राच्या तिन्ही सूत्रांचा भाव सामावून घेतला आहे.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्र तत्त्वप्रदीपिकेत पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात –

''स्वभावभेद केल्याशिवाय अर्थात स्वभाव सोडल्याशिवाय उत्पाद, व्यय आणि ध्रौव्य – या दोहोंनी लक्षित द्रव्य आहे. यांच्यात द्रव्याचा स्वभाव अस्तित्व सामान्यरूप अन्वय आहे. अस्तित्व दोन प्रकारचे असते – स्वरूपास्तित्व आणि सादृश्यास्तित्व.

प्रादुर्भावाला (प्रगट होण्याला) उत्पाद, प्रच्युतिला (नष्ट होण्याला) व्यय आणि अवस्थिति(सदैव एकरूप राहणाऱ्या)ला ध्रौव्य म्हणतात.

विस्तारविशेषाला गुण म्हणतात. ते दोन प्रकारचे असतात – १) सामान्य गुण आणि २) विशेष गुण.

अस्तित्व, नास्तित्व, एकत्व, अन्यत्व, द्रव्यत्व, पर्यायत्व, सर्वगतत्व, असर्वगतत्व, सप्रदेशत्व, अप्रदेशत्व, मूर्तत्व, अमूर्तत्व, सक्रियत्व, अक्रियत्व, चेतनत्व, अचेतनत्व, कर्तृत्व, अकर्तृत्व, भोक्तृत्व, अभोक्तृत्व व अगुरुलघुत्व वैगेरे सामान्य गुण आहेत.

अवगाहनहेतुत्व, गतिनिमित्तत्व, स्थितिकारणत्व, वर्तनायतनत्व, रूपादिमत्व व चेतनत्वादी विशेष गुण आहेत.

आयतविशेषाला पर्याय म्हणतात, ज्याचे प्रतिपादन मागील गाथांमध्ये आलेले आहे. द्रव्याचा उत्पादादी व गुण-पर्यायांशी लक्ष्य-लक्षणभेद असूनही स्वभावभेद नाही, स्वरूपभेद नाही; कारण वस्त्राप्रमाणे द्रव्य-उत्पादादी व गुण-पर्यायांनी युक्त असते.

ज्याप्रमाणे मलिन वस्त्र धुतल्यानंतर निर्मल अवस्थेने उत्पन्न होताना उत्पादाने लक्षित होते, परंतु त्याचे त्या उत्पादाबरोबर स्वरूपभेद नाही, ते स्वरूपानेच तसे आहे; त्याचप्रमाणे पूर्ण अवस्थारूपाने परिणत जे

द्रव्य आहे ते योग्य बाह्य साधनांच्या सानिध्यामध्ये अनेक प्रकारच्या अवस्था धारण करते; ते अंतरंग साधनभूत स्वरूपकर्ता आणि स्वरूपकारण सामर्थ्यरूप स्वरूपाने उत्तर अवस्थेने उत्पन्न होताना उत्पादाने लक्षित होते; परंतु त्याचा त्या उत्पादाबरोबर स्वरूपभेद नाही, ते स्वरूपानेच तसे आहे.

ज्याप्रमाणे तेच वस्त्र निर्मळ अवस्थेने उत्पन्न होते आणि मलिन अवस्थेने व्ययाला प्राप्त होताना त्या व्ययाने लक्षित होते; परंतु त्याचा त्या व्ययाबरोबर स्वरूपभेद नाही, ते स्वरूपानेच तसे आहे; त्याचप्रमाणे तेच द्रव्य उत्तर अवस्थेने उत्पन्न होताना आणि पूर्व अवस्थेने व्ययाला प्राप्त होताना व्ययाने लक्षित होते; परंतु त्याचे त्या व्ययाबरोबर स्वरूपभेद नाही, ते स्वरूपानेच तसे आहे.

ज्याप्रमाणे तेच वस्त्र एकाच समयात निर्मल अवस्थेने उत्पन्न होत असताना, मलिन अवस्थेने व्ययाला प्राप्त होत असताना आणि टिकणाऱ्या अवस्थेने ध्रुव रहात असताना ध्रौव्याने लक्षित होते; परंतु त्याचे त्या ध्रौव्याबरोबर स्वरूपभेद नाही, स्वरूपानेच ते तसे आहे; त्याचप्रमाणे तेच द्रव्य एकाच समयात उत्तर अवस्थेने उत्पन्न होत असताना पूर्व अवस्थेने व्यय होत असताना आणि टिकणाऱ्या द्रव्यत्व अवस्थेने ध्रुव रहात असताना ध्रौव्याने लक्षित होते; परंतु त्याचे त्या ध्रौव्याबरोबर स्वरूपभेद नाही, ते स्वरूपानेच तसे आहे.

ज्याप्रमाणे तेच वस्त्र विस्तारविशेषस्वरूप शुक्लत्वादी गुणांनी लक्षित होते; परंतु त्याचे त्या गुणांबरोबर स्वरूपभेद नाही, स्वरूपानेच तसे आहे. त्याचप्रमाणे तेच द्रव्य विस्तारविशेषस्वरूप गुणांनी लक्षित होते; परंतु त्याचे त्या गुणांबरोबर स्वरूपभेद नाही, ते स्वरूपानेच तसे आहे.

ज्याप्रमाणे तेच वस्त्र आयतविशेषस्वरूप पर्यायवर्ती तंतुंनी लक्षित होते, परंतु त्याचे त्या तंतुंबरोबर स्वरूपभेद नाही, ते स्वरूपानेच तसे

आहे; त्याचप्रमाणे तेच द्रव्य आयतविशेषस्वरूप पर्यायाने लक्षित होते, परंतु त्याचे त्या पर्यायांबरोबर स्वरूपभेद नाही, ते स्वरूपानेच तसे आहे.''

तत्त्वप्रदीपिकेत दिलेल्या वस्त्राच्या उदाहरणाला आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये तर थोडक्यातच दिले आहे, तसेच शुद्धात्म्याचेही उदाहरण देताना तत्त्वप्रदीपिकेप्रमाणेच या गाथेचा भाव स्पष्ट केला आहे.

कविवर वृंदावनदासजींनीही प्रवचनसार परमागमात गाथा व तिच्या तत्त्वप्रदीपिका टीकेत प्रस्तुत केलेल्या समस्त विषयाला पाच छंदांच्या माध्यमातून सांगोपांग प्रस्तुत केले आहे. ते मूळत: वाचनीय आहेत.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव एका पद्यातून पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(सवैया तेईसा)

जो न तजै अपनै निज पोरिष कौं नित एक स्वरूप रहैगौ।
जो जग मैं उपजै विनसै सु तथा पुनि ध्रौव्य सुभाव गहैगौ॥
जो गुनवंत अनंत सही परजायनि के सु प्रवाह बहैगौ।
लक्षिन ये लखिये जिहि मैं तिहि सौं सु आचारज द्रव्य कहैगौ॥४॥

जे आपल्या पुरुषार्थाला सोडत नाहीत व आपल्या स्वरूपातच लीन राहतात आणि या जगात जे उत्पाद, व्यय व ध्रौव्याला ग्रहण करीत राहतात, जे अनंत गुणवाले आहेत आणि अनंतानंत पर्यायींमध्ये प्रवाहित होत राहतात, परिणमित होत राहतात. ज्यांच्यात ही लक्षणे आढळतात, त्यांना आचार्यदेवांनी द्रव्य म्हटले आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्रीकानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''९४ व्या गाथेमध्ये ज्या द्रव्य-गुण-पर्यायाच्या पिंडाला आत्मस्वभाव म्हटले होते, त्या स्वभावाची येथे चर्चा नाही. येथे सत्ता गुणाला आत्मस्वभाव म्हटले आहे. उत्पाद, व्यय, ध्रुव अस्तित्वाहून

भिन्न नाहीत. गुण व पर्यायदेखील अस्तित्वाहून भिन्न नाहीत. असे या गाथेमध्ये म्हणावयाचे आहे.[१]

येथे द्रव्याला ओळखण्याची दोन लक्षणे सांगितली आहेत –
१) उत्पाद-व्यय आणि ध्रुव, २) गुण आणि पर्याय.

गुण, ध्रुवामध्ये येतात व पर्याय उत्पाद-व्ययामध्ये येते. तरीही विशेष विस्तार व स्पष्टीकरणाकरिता दोन्ही लक्षणे वेगवेगळी सांगितली आहेत.[२]

या गाथेत अभेद द्रव्यामध्ये भेद करून लक्षणांनी समजाविले आहे. उत्पाद, व्यय पर्याय आहेत व त्यांनी लक्षित द्रव्य आहे. ध्रुवता हा गुण आहे व त्याने द्रव्य लक्षित होते.

अशातऱ्हेने अस्तित्वभाव, उत्पाद, व्यय, ध्रौव्य, गुण आणि पर्याय अशा या सहा लक्षणांनी द्रव्य लक्षित होते.[३]

तत्वार्थसूत्रात उपयोगरूप पर्यायाने जीवाला लक्षित केले आहे. द्रव्यानुयोगात त्रिकाळी एकरूप राहणाऱ्या उपयोगाने जीवाला लक्षित केले. प्रवचनसारात अस्तित्व स्वभावाने व उत्पाद-व्यय-ध्रुव; गुण-पर्यायींना तसेच सहा वेगवेगळ्या लक्षणांना सांगून एकेका लक्षणाद्वारे जीवाला लक्षित केले. म्हणून जेथे जी अपेक्षा आहे, तेथे तसे समजावे.[४]

प्रत्येक आत्मा व रजकण (पुद्गल परमाणू) त्यांच्या वर्तमान अवस्था व त्रिकाळी गुणांद्वारेच ओळखले जातात. प्रत्येकाची निरंतर प्रवाहित होणारी अवस्था त्या समयाच्या आधारे होते; परंतु ती अवस्था इतर कोणाच्या आधारे झाली – असे मानणे फार मोठा भ्रम आहे.

जसे नदीत वाहणारे पाणी पाहणे ओझे वाटत नाही व त्याबद्दल ममताही वाटत नाही, परंतु माठ भरून डोक्यावर ठेवला तर ओझे वाटते; तसेच जगातील सर्व पदार्थ आपापल्या शक्तीद्वारे (गुणांद्वारे) परिवर्तित होऊन त्यांच्या द्रव्यसत्तेला सूचित करतात, याला जाणण्यात दुःख वाटत

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ६६
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ६६-६७
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ७३
४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ७७-७८

नाही. याऐवजी जो त्यांच्यात कर्तापणाची स्थापना करतो, तो परपदार्थांना ज्ञेय मानत नाही, मी एवढ्यांचे कार्य केले-करविले – असे मानून ममत्वाचे ओझे वाहतो; परंतु जर वस्तुस्वरूपाचा विचार केला तर ही ममता कमी होऊ शकते. स्वत: ध्रुव सत्तावान आहे – असे जाणले तर कुणाचे ओझे वाटणार नाही. त्रिकाळीची रुची केली असता विकाराची अल्पता भासेल व विकाराची रुची दूर होऊन त्रिकाळी स्वरूपात सुख भासित होईल.[१]''

अशाप्रकारे आपण पाहतो की येथे प्रत्येक द्रव्याच्या अस्तित्वालाच द्रव्याचे लक्षण मानले आहे व वरील अस्तित्वात गुण-पर्याय तसेच उत्पाद, व्यय व ध्रौव्य सुद्धा सामावलेले आहेत. हे सुद्धा स्पष्ट केले आहे की द्रव्य किंवा त्याच्या गुणांत जे उत्पादादीरूप परिणमन, परिवर्तन होते; ते अस्तित्वभावाला सोडल्याविनाच होते.

अस्तित्वाचे भेद स्वरूपास्तित्व व सादृश्यास्तित्व यांचीही चर्चा टीकेमध्ये आहे व सामान्य-विशेष गुण सुद्धा सांगितले आहेत. वस्त्राच्या उदाहरणाने हे सुद्धा समजाविले आहे की अस्तित्व, गुण-पर्याय, उत्पाद, व्यय व ध्रौव्य यांच्याबरोबर द्रव्यस्वरूपाचे निराळेपण नाही. जरी त्यांच्यात लक्ष्य-लक्षणभेद आहे; तरीही स्वरूपभेद नाही.

जे स्वरूप व लक्षणांना एकच मानतात, त्यांनी आचार्य अमृतचंद्रांच्या या कथनावर विशेष ध्यान दिले पाहिजे की लक्षणभेद तर आहे, परंतु स्वरूपभेद नाही. जरी स्वरूपभेद व लक्षणामध्ये फरक आहे, तरी हे उत्पादादी व गुण-पर्याय द्रव्याचे स्वरूपही आहे व लक्षण सुद्धा आहे.

अस्तित्व सर्वांचे एक आहे, म्हणून स्वरूपभेद नाही; परंतु सर्वांची लक्षणं भिन्न-भिन्न आहेत, म्हणून लक्षणभेद आहे.

वरील सर्वांची लक्षणे टीकेमध्ये दिलेलीच आहेत, म्हणून येथे विशेष लिहिण्याची आवश्यकता नाही.

महासत्ता सादृश्यास्तित्वाचेच दुसरे नाव आहे आणि अवांतर सत्ता हे स्वरूपास्तित्वाचे दुसरे नाव आहे.

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ९१-९२

आपल्या स्वभावाला सोडल्याशिवाय – याचा अर्थ हा आहे की वस्तू स्वरूपास्तित्वाला सोडल्याशिवाय सादृश्यास्तित्वात सामावलेली आहे.

मी आपणास एक प्रश्न विचारतो– आपण दिगंबर आहात की जैन ?

आपण सगळे जैन आहोत व दिगंबरही, कारण दिगंबर जैनच आहेत. दिगंबर व जैन – या दोहोंचे एकत्र असण्यात कोणताच विरोध नाही.

असे स्वरूपास्तित्वाला सोडल्याशिवाय आपण सादृश्यास्तित्त्वात सामावलेलो आहोत.अशाप्रकारे आपण अवांतर सत्ता व महासत्ता – दोहोंनी समृद्ध आहोत; कारण आपण ज्ञानानंदस्वभावी आहोत. यामध्ये ज्ञानानंदस्वभावी आपली अवांतर सत्ता आहे व 'आहे' म्हणजेच अस्तित्व महासत्ता आहे.

आपण चेतन असूनही उत्पाद-व्यय-ध्रौव्याने संयुक्त व गुण-पर्याययुक्त द्रव्य आहोत. उत्पाद-व्यय-ध्रौव्याने युक्त व गुण-पर्यायांनी सहित असणे आपली महासत्ता आहे आणि ज्ञानानंदस्वभावी चेतन असणे आपली अवांतर सत्ता आहे. महासत्तेने आपण सर्वांशी जुळलेले आहोत व अवांतर सत्तेमुळे आपले अस्तित्व स्वतंत्र आहे.

अशाप्रकारे आपण स्वरूपास्तित्वाला सोडले नाही व सादृश्य अस्तित्वामध्ये सामिलही आहोत. आपण अशा महासत्तेचे अंश आहोत की ज्यामध्ये स्वरूपास्तित्वाला सोडणे आवश्यक नाही. मी आपल्या स्वरूपास्तित्वातही सामिल आहे व सादृश्यास्तित्वातही सामिल आहे.

अशातऱ्हेने सर्व जीवद्रव्य सादृश्यास्तित्व व स्वरूपास्तित्वाने युक्त आहेत. सर्वांचे अस्तित्व समान आहे. तुम्ही सुद्धा अनंतगुणवान आहात व मी सुद्धा अनंत गुणवान आहे, पुद्गल देखील अनंत गुणवान आहे. तुम्ही सुद्धा गुण-पर्यायांनी युक्त आहात, तसेच मी सुद्धा गुण-पर्यायांनी युक्त आहे. महासत्तेच्या अपेक्षेने आम्ही-तुम्ही सगळे एक आहोत, म्हणून या अस्तित्वाचे नाव सादृश्यास्तित्व आहे.

सादृश्य म्हणजेच एकसारखे असणे. एकसारखे असण्यातही जगात 'एक आहोत' असा व्यवहार केला जातो. आपण सगळे जैन एकच आहोत.

आमच्यात सुद्धा जैनपणाची श्रद्धा आहे व तुमच्यात सुद्धा जैनपणाची श्रद्धा आहे. अशाप्रकारे आम्ही आपणास हेच सांगू इच्छितो की 'आपण एकसारखे आहोत', परंतु सादृश्यास्तित्वाची जगात अशी भाषा आहे की त्याला 'एक आहोत' असेच म्हटले जाते; कारण जर 'एकसारखे' म्हटले तर त्यामध्ये भेद आहे – असे वाटते. परंतु 'एक' म्हणताच ऐक्य दृष्टीस पडते.

त्यामुळे आपणाला हे जाणले पाहिजे की आम्ही जे काही असे सांगत आहोत की आपण सर्व जैन आहोत, आपर्ण सर्व भारतीय एक आहोत – हे सर्व सादृश्यास्तित्वाच्या अपेक्षेने म्हटले जात आहे.

जरी आपण सादृश्यास्तित्वाच्या अपेक्षेने एक आहोत; परंतु स्वरूप अस्तित्वाच्या अपेक्षेने कोणाशीही एक (अभेद) नाही. हे सादृश्यास्तित्वाचे जे कथन जिनागमात केले आहे, ते स्वरूपास्तित्वाला सोडल्याशिवाय आहे. आम्ही त्या स्वरूपास्तित्वाला सोडून पराबरोबर एकत्व स्थापित केले – हेच मिथ्यादर्शन आहे, पर्यायमूढता आहे, परसमयपणा आहे.

सादृश्यास्तित्व अर्थात महासत्तेच्या अपेक्षेने आपण सर्व एक आहोत. असा परपदार्थांशी आपला 'आहे'चा संबंध, अस्तित्वाचा संबंध आहे; परंतु यामध्ये प्रत्येकाचे अस्तित्व वेगवेगळे आहे – हे स्वरूपास्तित्व आहे. ●

प्रत्येक द्रव्य आपल्या पर्यायीचे कर्ता स्वत:च आहे. परिणमन त्याचा धर्म आहे. आपल्या परिणमनामध्ये त्याला परद्रव्याची किंचितही अपेक्षा नाही. नित्यतेप्रमाणेच परिणमन देखील त्याचा सहज स्वभाव आहे किंवा पर्यायीची कर्ता स्वत: पर्यायच आहे. त्यामध्ये तुला काहीही करायचे नाही म्हणजेच काहीही करण्याची चिंता करायची नाही. अजीव द्रव्य तर परामध्ये काही करीतच नाहीत, आपल्या पर्यायींना करण्याचीही चिंता करीत नाहीत, तर काय त्यांचे परिणमन अवरुद्ध होते ? नाही, तर मग जीवाने आपल्या परिणमनाच्या चिंतेने आकुळ-व्याकुळ का व्हावे ?

– क्रमबद्धपर्याय, पृष्ठ : २८

प्रवचनसार गाथा-९६

मागील गाथेमध्ये द्रव्याची व्याख्या सांगितली आहे. त्यामध्ये हे स्पष्ट केले आहे की अस्तित्व दोन प्रकारचे असते – स्वरूपास्तित्व आणि सादृश्यास्तित्व.

आता या गाथेमध्ये स्वरूपास्तित्वाचे स्वरूप स्पष्ट करीत आहेत.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

सब्भावो हि सहावो गुणेहिं सगपज्जएहिं चित्तेहिं।
दव्वस्स सव्वकालं उप्पादव्वयध्रुवत्तेहिं॥९६॥

(हरिगीत)

गुण-चित्रमयपर्याय से उत्पादव्ययध्रुवभाव से।
जो द्रव्य का अस्तित्व है वह एकमात्र स्वभाव है॥९६॥

गुण आणि अनेक प्रकारच्या पर्याय व उत्पाद-व्यय-ध्रौव्याने द्रव्याचे जे अस्तित्व सदैव आहे; तो वास्तविक द्रव्याचा स्वभाव आहे.

उक्त गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''अस्तित्व द्रव्याचा स्वभाव आहे आणि ते अस्तित्व इतर साधनांपासून निरपेक्ष असल्याकारणाने अनादी-अनंत असल्याने, अहेतुक एकरूप वृत्तीने सदैव प्रवर्तित होत असल्याने, विभावधर्मापासून निरपेक्ष असल्याने, भाव आणि भाववानपणाच्या कारणाने अनेकत्व असूनही प्रदेशभेद नसल्याने द्रव्याबरोबर एकत्व धारण करीत असणारा द्रव्याचा स्वभावच का असणार नाही ?

तात्पर्य हे आहे की अनादी-अनंत असल्याने, विभावधर्माहून विलक्षण असल्याने व प्रदेशभेद नसल्याने अस्तित्व द्रव्याचा स्वभावच आहे.

जसे ते अस्तित्व वेगवेगळ्या द्रव्यामध्ये प्रत्येकात समाप्त होते, तसेच द्रव्य-गुण-पर्यायामध्ये प्रत्येकात समाप्त होत नाही; कारण त्यांची सिद्धी परस्पर होते. जर एक नसेल तर दुसराही सिद्ध होत नाही; म्हणून

त्यांचे अस्तित्व सोन्यासारखे एकच आहे.

ज्याप्रमाणे द्रव्य, क्षेत्र, काळ किंवा भाव यांनी जे सोन्याहून वेगळे दिसून येत नाहीत, त्या पीतत्वादी गुणाच्या व कुंडलाच्या पर्यायाच्या स्वरूपाला धारण करून कर्ता-करण-अधिकरणरूपाने प्रवर्तमान सोन्याच्या अस्तित्वाने उत्पन्न झालेल्या पीतत्वादी गुणांनी व कुंडलादी पर्यायांनी जे सोन्याचे अस्तित्व आहे, तो सोन्याचा स्वभाव आहे; तसेच द्रव्य, क्षेत्र, काळ किंवा भाव यांनी जे द्रव्याहून वेगळे दिसून येत नाहीत, त्या गुणांच्या व पर्यायांच्या स्वरूपाला धारण करून कर्ता-करण-अधिकरण रूपाने प्रवर्तमान द्रव्याच्या अस्तित्वाने उत्पन्न झालेल्या गुणांनी व पर्यायांनी जे द्रव्याचे अस्तित्व आहे, तो द्रव्याचा स्वभाव आहे.

जसे द्रव्य, क्षेत्र, काळ किंवा भाव यांनी जे सोने पीतत्वादी गुणांहून कुंडलादी पर्यायांहून भिन्न दिसून येत नाही, त्या सोन्याच्या स्वरूपाला धारण करून कर्ता-करण-अधिकरणरूपाने प्रवर्तमान पीतत्वादी गुण व कुंडलादी पर्यायांपासून उत्पन्न झालेल्या सोन्याचे मूळ साधनपणे सोन्याहून निष्पन्न होणारे अस्तित्व सोन्याचा स्वभाव आहे; तसेच द्रव्य, क्षेत्र, काळ वा भाव यांनी जे द्रव्य, गुण व पर्यायांपासून भिन्न दिसून येत नाही, त्या द्रव्याच्या स्वरूपाला धारण करून कर्ता-करण-अधिकरणरूपाने प्रवर्तमान गुण व पर्यायांपासून उत्पन्न झालेल्या द्रव्याचे मूळ साधनपणे द्रव्याहून निष्पन्न होत असलेले जे अस्तित्व आहे, तो द्रव्याचा स्वभाव आहे.

अशातऱ्हेने येथे गुण-पर्यायांनी द्रव्याचा व द्रव्याने गुण-पर्यायांचे अस्तित्व सिद्ध केले आहे आणि त्याला द्रव्याचा स्वभाव म्हटले आहे.

जसे सोन्याच्या उदाहरणाने द्रव्याचे व गुण-पर्यायांचे एकच अस्तित्व आहे – हे समजाविले आहे; तसेच आता सोन्याच्या उक्त उदाहरणाने हे समजावितात की द्रव्याचे व उत्पाद-व्यय-ध्रौव्याचेही एकच अस्तित्व आहे व तो द्रव्याचा स्वभाव आहे.

जसे द्रव्य, क्षेत्र, काळ व भाव यांनी सोन्याहून अपृथक कर्ता-करण-अधिकरणरूपाने कुंडलादी उत्पादांच्या बाजूबंदादी व्ययांच्या

व पीतत्वादी ध्रौव्यांच्या स्वरूपाला धारण करून प्रवर्तमान सोन्याच्या अस्तित्वापासून निष्पन्न झालेले कुंडलादी उत्पाद, बाजूबंदादी व्यय व पीतत्वादी ध्रौव्याने जे सोन्याचे अस्तित्व आहे, तो सोन्याचा स्वभावच आहे; त्याचप्रमाणे द्रव्य, क्षेत्र, काळ किंवा भाव यांनी द्रव्याहून अपृथक कर्ता-करण-अधिकरण यांनी उत्पाद-व्यय-ध्रौव्य यांच्या स्वरूपाला धारण करून प्रवर्तमान द्रव्याच्या अस्तित्वाने निष्पन्न झालेले उत्पाद-व्यय-ध्रौव्याने जे द्रव्याचे अस्तित्व आहे, तो द्रव्याचा स्वभावच आहे.

ज्याप्रकारे द्रव्य, क्षेत्र, काळ किंवा भाव यांनी कुंडलादी उत्पाद, बाजूबंदादी व्यय व पीतत्वादी ध्रौव्याहून अपृथक कर्ता-करण-अधिकरणरूप सोन्याच्या स्वभावाला धारण करून प्रवर्तमान कुंडलादी उत्पाद, बाजूबंदादी व्यय व पीतत्वादी ध्रौव्याहून निष्पन्न झालेले सोन्याचे मूळ साधनपणाने त्यांच्यापासून निष्पन्न होणारे जे अस्तित्व आहे, तो सोन्याचा स्वभाव आहे; त्याचप्रमाणे द्रव्य, क्षेत्र, काळ किंवा भाव यांपासून उत्पाद-व्यय-ध्रौव्य यांपासून अपृथक कर्ता-करण-अधिकरणरूपाने द्रव्याच्या स्वभावाला धारण करून प्रवर्तमान उत्पाद-व्यय-ध्रौव्य यांच्यापासून निष्पन्न द्रव्याचे मूळ साधनपणे त्यांच्यापासून निष्पन्न होणारे जे अस्तित्व आहे; तो द्रव्याचा स्वभाव आहे.''

वरील टीकेचा संक्षिप्त सारांश हा आहे की द्रव्य व अस्तित्वात प्रदेशभेद नाही. ते अस्तित्व अनादी-अनंत आहे, अहेतुक एकरूप परिणतीने सदैव परिणमित होत असल्याने विभाव धर्माहून भिन्न आहे. असे असल्याने ते अस्तित्व द्रव्याचा स्वभावच आहे.

अशाप्रकारे गुण-पर्याय आणि द्रव्य यांचे अस्तित्व सुद्धा एकच आहे, अभेदच आहे; कारण गुण-पर्याय द्रव्यापासून निष्पन्न होतात आणि द्रव्य गुण-पर्यायांपासून निष्पन्न होतात.

तसेच उत्पाद-व्यय-ध्रौव्याचे व द्रव्याचे अस्तित्वही एकच आहे; कारण उत्पाद-व्यय-ध्रौव्य द्रव्यापासूनच निष्पन्न होतात व द्रव्य उत्पाद-व्यय-ध्रौव्यापासूनच निष्पन्न होते.

आचार्य जयसेनांनी देखील तात्पर्यवृत्तीमध्ये या गाथेचा भाव सोन्याच्या उदाहरणाद्वारे तत्त्वप्रदीपिकेसमानच स्पष्ट केला आहे.

कविवर वृंदावनदासजींनी ह्या गाथेचा भाव प्रवचनसार परमागमात २ मनहरण व २ दोहा अशा एकूण ४ छंदातून प्रस्तुत केला आहे. गाथा व टीका या दोहोंचा संपूर्ण भाव या छंदात सामावलेला आहे, ते मूळातून वाचनीय आहेत, तरी देखील नमूना म्हणून दोन दोहे प्रस्तुत आहेत –

(दोहा)

दरव स्वगुनपरजायकरि, उतपत-वय-ध्रुव-जुत्त।
रहत अनाहतरूप नित, यही स्वरूपास्तित्त॥
पर दरवनि के गुन परज, तिनसों मिलतौ नाहिं।
निज स्वभावसत्ताविषैं, प्रनमन सदा कराहिं॥

द्रव्य आपल्या गुण-पर्यायांद्वारे उत्पन्न होते, नष्ट होते आणि ध्रुवत्वाने युक्त होऊन सदैवच अनाहतरूपाने राहते. हेच त्याचे स्वरूपास्तित्व आहे.

प्रत्येक द्रव्य परद्रव्यांच्या गुण-पर्यायांशी जुळत नाही; आपल्या स्वरूपसत्तेमध्ये सदैव परिणमन करते.

गुरुदेवश्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

''सहा द्रव्यामध्ये दोन प्रकारचे अस्तित्व आहे –

१) स्वरूप अस्तित्व, २) सादृश्य अस्तित्व. प्रत्येक आत्मा वगैरे सर्व द्रव्य त्रिकाळ आपल्या द्रव्य-क्षेत्र-काळ-भाव यांनी अभेद आहेत व परापासून अत्यंत भिन्न आहेत – याचेच नाव स्वरूपअस्तित्व आहे.[१]

प्रत्येक द्रव्यामध्ये स्वभावरूप असे स्वरूपअस्तित्व आहे, ते अन्य साधनाची अपेक्षा ठेवत नाही; म्हणून अनादी-अनंत, अहेतुक, एकरूप अवस्थेने सदैवच परिणमित होत असल्याने ते विभाव धर्माहून पृथक लक्षणवाले आहे, त्यामध्ये अपूर्णता देखील नाही.[२]

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ९७ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ९७-९८

द्रव्याने, क्षेत्राने, काळाने, भावाने सुवर्णाच्या अस्तित्वाद्वारे त्याच्या सर्व गुण-पर्यायांना ओळखले जाऊ शकते आणि पिवळेपणा वगैरे गुणांद्वारे तसेच कुंडलादी पर्यायांद्वारे सुवर्णाचे अस्तित्व आहे – असे ओळखले जाते, परंतु एखाद्या सोनाराच्या संयोगाने ते ओळखले जात नाही – असा सुवर्णाचा स्वभाव आहे.[१]

एका समयाची कुंडलादी पर्याय पूर्ण सोन्याला टिकवून ठेवते – पीतादी गुण व त्यांच्या अवस्था जर नसतील तर सोने देखील असणार नाही, म्हणून गुण-पर्यायांचे जे अस्तित्व आहे, तेच द्रव्याचे अस्तित्व आहे – असा प्रत्येक द्रव्याचा स्वभाव आहे.[२]

एका परमाणुची पर्याय उत्पन्न होण्यामध्ये अथवा बदलण्यामध्ये त्याचे कारण अन्य एखादा परमाणू नाही, तसेच एखाद्याची इच्छा-ज्ञान वगैरे देखील याचे कारण नाही. फुटण्याच्या काळी जर घडा फुटला नाही व ठिकऱ्यांचा उत्पाद झाला नाही, तर वस्तुचे स्वरूप टिकणार नाही. मूळ कारणाला न पाहता संयोगांना पाहणाऱ्या मूढ जीवांना खऱ्या वस्तुस्वरूपाची सत्ता ऐकणे देखील आवडत नाही. ही अरुची त्याच्या द्रव्याची ओळख करविते.[३]''

अशाप्रकारे या गाथेत स्वरूपास्तित्वाचे स्वरूप स्पष्ट करताना हे सांगितले आहे की हे स्वरूपास्तित्व प्रत्येक द्रव्यात आपापले स्वतंत्र आहे.

तात्पर्य हे आहे की आपण एखाद्या महासत्तेचे अंश नाही, परंतु आपली सत्ता पूर्णपणे आपल्यामध्येच आहे.

येथे ही बाब विशेष ध्यान देण्याजोगी आहे की ज्याप्रमाणे प्रत्येक द्रव्याची सत्ता पूर्णपणे स्वतंत्र आहे; तसेच एका द्रव्याच्या अंतर्गत होणाऱ्या गुणांची, प्रदेशांची व पर्यायांची सत्ता भिन्न-भिन्न नाही तर एकच आहे. तात्पर्य हे आहे की द्रव्य, त्याचे गुण व त्याच्या पर्यायांमध्ये देखील प्रदेशभेद नाही. ●

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ९९
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १०५
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १०७

प्रवचनसार गाथा-९७

मागील गाथेत स्वरूपास्तित्वाची चर्चा झाली. आता या गाथेमध्ये सादृश्यास्तित्वाचे स्वरूप स्पष्ट करतात. मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

इह विविहलक्खणाणं लक्खणमेगं सदित्ति सव्वगयं।
उवदिसदा खलु धम्मं जिणवरवसहेण पण्णत्तं।।९७।।

(हरिगीत)

रे सर्वगत सत् एक लक्षण विविध द्रव्यों का कहा।
जिनधर्म का उपदेश देते हुए जिनवरदेव ने।।९७।।

जिनवरवृषभांनी धर्माचा उपदेश देताना या विश्वामध्ये विविध लक्षण-वाल्या द्रव्यांचा 'सत्' असे सर्वगत एक लक्षण आहे – असे सांगितले आहे.

तात्पर्य हे आहे की आपापल्या स्वरूपास्तित्वाने परिपूर्ण असलेल्या द्रव्याचे मिळून एक लक्षण सत् (सादृश्यअस्तित्व) आहे, असे जिनवरदेवांनी सांगितले आहे.

या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये खालीलप्रमाणे सांगितला आहे –

''जरी या विश्वामध्ये वेगवेगळेपणाने विस्तारीत सर्व द्रव्य इतर द्रव्यांपासून व्यावृत्त राहून आपापल्या सीमेमध्ये राहून विशेष लक्षणभूत स्वरूपास्तित्वाने लक्षित होतात. तरी देखील सर्व द्रव्यांच्या वेगवेगळेपणाच्या विस्ताराचा अस्त करीत, सर्व द्रव्यांमध्ये प्रवृत्त होऊन राहणारा, प्रत्येक द्रव्याच्या सीमेची उपेक्षा करीत 'सत्' असे जे सर्वग्राह्य सामान्यलक्षणभूत सादृश्यअस्तित्व आहे, ते वास्तविक एकच आहे.

अशाप्रकारे 'सत्' असे वचन आणि सत् असे ज्ञान सर्व पदार्थांचे स्मरण करविणारे (सर्वपदार्थपरामर्शी) आहे. जर ते सर्व पदार्थांचे स्मरण करविणारे (सर्वपदार्थपरामर्शी) नसेल तर एखादा पदार्थ सत्, एखादा

असत्, एखादा सत्-असत् आणि एखादा अवाच्य असला पाहिजे; परंतु हे तर विरुद्धच आहे; कारण 'सत्' कथन आणि ज्ञानाचे सर्वपदार्थपरामर्शी होण्याची बाब वृक्षाप्रमाणे सिद्ध होते.

ज्याप्रमाणे अनेक प्रकारच्या खूप वृक्षांचे आपापल्या विशेषलक्षणभूत स्वरूपास्तित्वाच्या अवलंबनाने उत्पन्न होणाऱ्या अनेकत्वाला सामान्यलक्षणभूत सादृश्यदर्शक वृक्षत्वापासून उत्पन्न होणारे एकत्व तिरोहित करते; त्याचप्रमाणे अनेक प्रकारच्या खूप द्रव्यांचे आपापल्या विशेषलक्षणभूत स्वरूपास्तित्वाच्या अवलंबनाने उत्पन्न होणाऱ्या अनेकत्वाला, सामान्यलक्षणभूत सादृश्यदर्शक 'सत्'पणापासून उत्पन्न होणारे एकत्व तिरोहित करते.

ज्याप्रमाणे याच वृक्षांच्या बाबतीत सामान्यलक्षणभूत सादृश्यदर्शक अशा वृक्षत्वापासून उत्पन्न होणारे एकत्व तिरोहित होऊन सुद्धा आपापल्या विशेषलक्षणभूत स्वरूपास्तित्वाच्या अवलंबनाने उत्पन्न होणारे अनेकत्व स्पष्टपणे प्रकाशमान राहते, त्याचप्रमाणे सर्व द्रव्यांच्या बाबतीत सुद्धा सामान्यलक्षणभूत सादृश्यदर्शक अशा 'सत्'पणाने उत्पन्न होणारे एकत्व तिरोहित होऊन सुद्धा आपापल्या विशेषलक्षणभूत स्वरूपास्तित्वाच्या अवलंबनाने उत्पन्न होणारे अनेकत्व स्पष्टपणे प्रकाशमान राहते.''

वरील संपूर्ण कथनाचा सारांश हा आहे की ज्याप्रमाणे आंबा, अशोक वगैरे अनेक प्रकारच्या वृक्षांचे आपापले स्वरूपास्तित्व वेगवेगळे आहे, म्हणून स्वरूपास्तित्वाच्या अपेक्षेने त्यांच्यामध्ये अनेकत्व (भिन्नपणा) आहे; तरी देखील सर्व वृक्षांमध्ये समानपणे आढळणाऱ्या वृक्षत्वाच्या अपेक्षेने सर्व वृक्षांमध्ये एकत्व (अभिन्नपणा) आहे.

जेव्हा या एकत्वाला म्हणजेच सादृश्यास्तित्वाला मुख्य केले जाते, तेव्हा अनेकत्व (स्वरूपास्तित्व) गौण होते.

तसेच जीव, पुद्गलादी अनेक प्रकारच्या द्रव्यांचे आपापले स्वरूप

अस्तित्व भिन्न-भिन्न आहे; त्यामुळे स्वरूपास्तित्वाच्या अपेक्षेने त्यांच्यात अनेकत्व (भिन्नत्व) आहे, तरीही सर्व द्रव्यात समानपणे असणाऱ्या द्रव्यत्वाच्या अपेक्षेने सर्व द्रव्यांमध्ये एकत्व (अभिन्नत्व) आहे.

जेव्हा या एकत्व म्हणजेच सादृश्यास्तित्वाला मुख्य करतात, तेव्हा अनेकत्व (स्वरूपास्तित्व) गौण होते.

अशाप्रकारे सामान्य सत्पणाच्या मुख्यतेने लक्षात घेतले असता, सर्व द्रव्यांमध्ये एकत्वाची मुख्यता असल्याने अनेकत्व गौण होते; तरी देखील ते अनेकत्व स्पष्टपणे प्रकाशमान राहते.

आचार्य जयसेन या गाथेचा भाव सिद्धभगवान, सेना आणि वन यांच्या उदाहरणाने अशाचप्रकारे स्पष्ट करतात. ते सांगतात की ज्याप्रमाणे मुक्तात्मा म्हणताच सर्व सिद्धांचे ग्रहण होते; सेना म्हणताच घोडे, हत्ती वगैरे पदार्थांचे आणि वन म्हणताच लिंब, आंबा वगैरे वृक्षांचे ग्रहण होते; त्याप्रमाणे 'सर्व सत् आहेत' असे म्हणताच संग्रहनयाने सर्व पदार्थांचे ग्रहण होते, सादृश्यास्तित्व नावाच्या महासत्तेचे ग्रहण होते.

कविवर वृंदावनदासजींनी प्रवचनसार परमागमात या गाथेचा भाव १ मनहरण व ३ दोहे – अशा ४ छंदांतून प्रस्तुत केला आहे, त्यापैकी तीन दोहे पुढीलप्रमाणे आहेत –

(दोहा)

सहज स्वरूपास्तित्व करि, जुदे-जुदे सब दर्व।
निज-निज गुन लच्छन धरैं, है विचित्र गति पर्व॥
अरु सादृश्यास्त्वित करि, सब थिर थपन अबाध।
सत लच्छन के गहन तैं, यही एक निरुपाध॥
तिहूँकाल में जास को, बाधा लगै न कोय।
सोई सतलच्छन प्रबल, सब दरवनि में होय॥

प्रत्येक द्रव्यामध्ये सहाजिकच प्राप्त असलेल्या स्वरूपास्तित्वाच्या

म्हणजे अवांतरसत्तेच्या अपेक्षेने सर्व द्रव्य वेगवेगळी आहेत; कारण ती सर्व द्रव्य आपापल्या लक्षणांना धारण करून आहेत, त्यांनीच ते ओळखले जातात. हे जगाचे चित्रविचित्र स्वरूप आहे.

सादृश्यास्तित्वाच्या अर्थात महासत्तेच्या अपेक्षेने सर्व स्थिर आहेत, अबाधित आहेत व सत् लक्षणाने ग्रहण केले जातात. हे एक निरुपाधी सत्य आहे.

ज्याला तिन्ही काळामध्ये बाधा पोहचत नाही – असे प्रबळ सत् लक्षण सर्व द्रव्यामध्ये असते.

या गाथेचा भाव स्पष्ट करताना पंडित देवीदासजींनी १ अडिल्ल, २ चौपाई आणि २ दोहे लिहिले आहेत, ते मूळातून वाचण्यायोग्य आहेत.

नमुन्यादाखल दोन्ही दोहे पुढीलप्रमाणे आहेत –

(दोहा)

आम-नीम आदिक सु ज्यौं तरुवर बहुत प्रकार।
सो पुनि वृक्ष विचार करि एक रूप निरधार॥९॥
ज्यों स्वरूप अस्तित्व करि वस्तु प्रकार अनेक।
दीसे सो साद्रस्यता सौं सु प्रगट विधि एक॥१०॥

ज्याप्रमाणे आंबा, लिंब इत्यादीरूपे वृक्ष अनेक प्रकारचे असतात. तर त्यांच्याविषयी एका वृक्षपणे विचार केला तर सर्व एकरूपच आहेत; त्याचप्रमाणे स्वरूपास्तित्वाच्या अपेक्षेने वस्तू अनेक प्रकारच्या आहेत. जर त्यांच्या बाबतीत सादृश्यास्तित्वाच्या अपेक्षेने विचार केला तर सर्व एकरूपच आहेत.

आध्यात्मिकसत्पुरुष श्रीकानजीस्वामींनी या गाथेचा व टीकेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"सर्व पदार्थांना सर्व प्रकारे एका अस्तित्व भावाद्वारे जाणण्यामध्ये कोणतीही मिथ्या कल्पना होत नाही. जसे आहे तसे ज्ञान जाणते. एखाद्याला निगोद पर्याय असेल, तर एखाद्याला सिद्ध पर्याय, तर एखादा साधक असेल तर एखादा विराधक वगैरे जसे आहे, तसे आहे.[१]

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ११७

समस्त पदार्थ आहेत – असे सांगण्याची योग्यता वचनाची आहे. समस्त पदार्थ आहेत असे जाणण्याची योग्यता ज्ञानात आहे व समस्त पदार्थ आहेत – अशी सत् सामान्यरूप ज्ञेयत्वाची योग्यता त्यांच्यात आहे.[१]

सामान्य सत् एकरूप आहे असे मानले असता प्रत्येकाच्या पृथकत्वाचा नाश होत नाही; परंतु प्रत्येक रजकण-रजकण पृथक असतो/राहतो.[२]''

वरील कथनाचा सारांश हा आहे की सत्ता दोन प्रकारची आहे – अवांतर सत्ता व महासत्ता. अवांतर सत्ता स्वरूपास्तित्व आहे, जे प्रत्येक द्रव्यात वेगवेगळे आहे आणि त्याच्या प्रदेश, गुण व पर्यायांमध्ये व्याप्त आहे.

महासत्ता ती सत्ता आहे जी सामान्यपणे सर्व द्रव्यात व्याप्त आहे, त्यांच्या गुण-पर्यायांमध्ये व्याप्त आहे. याला सादृश्यास्तित्वही म्हणतात.

ही बाब ध्यानात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे की आपला आपलेपणा स्वरूपास्तित्वात ठेवायचा, सादृश्यपणाच्या आधारे सर्व पदार्थात नाही.

स्वरूपास्तित्वामध्ये द्रव्य-गुण-पर्यायांना मिळवून एक इकाई बनविली गेली आहे.

ही समयसार ग्रंथामध्ये वर्णित इकाई नाही, ज्यामध्ये द्रव्यापासून पर्यायाला भिन्न, प्रदेशभेद व गुणभेदाला देखील भिन्न म्हटले आहे. येथे द्रव्य-गुण-पर्यायांना मिसळून एक इकाई आहे, त्याला स्वरूपास्तित्व म्हटले आहे.

प्रश्न : आमच्याशिवाय जे द्रव्य आहेत, त्यांच्याशी आमची एकतेची कल्पना कोणत्या आधारे आहे, त्यामध्ये कोणता हेतु आहे ?

उत्तर : यामध्ये हेतु केवळ एवढाच आहे की ते सुद्धा आहेत व आम्हीही आहोत. असा केवळ अस्तित्वाचा हेतु आहे, केवळ 'आहे' चे नाते आहे. मी व गाढवाच्या शिंगांमध्ये कोणताही संबंध नाही; कारण गाढवाच्या शिंगाची न तर अवांतरसत्ता आहे व न महासत्ता आहे; कारण ते तर नाहीतच आणि मी आहे. अशाप्रकारे तुम्ही सुद्धा आहात व मी सुद्धा आहे – अशाप्रकारे येथे 'आहे' चा संबंध सांगितला आहे.

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ११७ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १२४

आता आचार्य म्हणतात की ज्याने केवळ अस्तित्व संबंधाच्या आधारे स्वरूपास्तित्वाला विसरून कोण्या पराशी आपलेपणा स्थापित केला आहे; तो मिथ्यादर्शनाचा धारक मिथ्यादृष्टी आहे.

समयसारामध्ये हे सांगितले होते की सादृश्यास्तित्वाच्या आधारे स्वरूपास्तित्वाला विसरून संबंध स्थापित करणे मिथ्यात्व आहे व प्रवचनसारामध्ये हे सांगत आहेत की त्याने मिथ्यात्व होईल – या भयाने त्या महासत्तावाल्या तथ्याला नाकारणेही मिथ्यादर्शनच आहे.

महासत्तेपासून अवांतरसत्तेमध्ये अनंत सत्ता आहेत. 'आम्ही सर्वजण एक आहोत' – यामध्ये शुद्धमहासत्तेची अपेक्षा आहे. यानंतर 'आम्ही सर्व मनुष्य आहोत' – यामध्येही अशुद्धमहासत्तेची अपेक्षा आहे. 'आम्ही सर्व ज्ञानानंदस्वभावी आत्मा आहोत' – ही देखील महासत्ताच आहे, सादृश्यास्तित्वच आहे. अवांतरसत्ता आपल्या द्रव्य-गुण-पर्यायांच्या बाहेर निघत नाही; आणि महासत्तेत सर्वांना सामिल केले जाते. अशाप्रकारे महासत्ता व अवांतरसत्तेच्या मध्ये लाखो सत्ता आहेत.

ज्यामध्ये सर्वकाही येते, ती महाशुद्धसत्ता आहे आणि ज्यामध्ये सर्वकाही तर येत नाही; परंतु बरेच काही येते; ती अशुद्धमहासत्ता आहे. 'आम्ही सर्व आहोत' हे शुद्धमहासत्तेचे उदाहरण आहे आणि 'आम्ही सर्व मनुष्य आहोत' – हे अशुद्धमहासत्तेचे उदाहरण आहे.

शुद्धसंग्रहनयामध्ये शुद्धमहासत्तेची विवक्षा आहे व अशुद्धसंग्रह-नयामध्ये अशुद्ध-महासत्तेची विवक्षा आहे. ऋजुसूत्रनय केवळ अवांतर सत्तेला ग्रहण करतो. व्यवहारनय शुद्धमहासत्तेत तोपर्यंत भेद करतो, जोपर्यंत तो अवांतरसत्तेपर्यंत पोहोचत नाही. अशाच प्रकारे संग्रहनय अवांतर सत्तांचा तोपर्यंत संग्रह करतो, जोपर्यंत शुद्ध महासत्तेपर्यंत पोहोचत नाहीत.

हे संग्रहनय आणि व्यवहारनय आपसात विरुद्ध कार्य करणारेही आहेत आणि एकमेकांचे सहायक देखील आहेत.

व्यवहारनय आम्हाला शुद्धमहासत्तेपासून अवांतरसत्तेपर्यंत आणतो

आणि संग्रहनय अवांतरसत्तेपासून शुद्ध महासत्तेपर्यंत घेऊन जातो. या प्रक्रियेने वस्तुच्या स्वरूपाचे ज्ञान निर्मल होते.

लक्षात असू द्यावे हा व्यवहारनय निश्चय-व्यवहारवाला व्यवहारनय नाही; हा तर नैगमादी सप्त नयांपैकी एक व्यवहारनय आहे. या व्यवहारनयाचा जोड निश्चयनयाशी नसून संग्रहनयाशी आहे.

'आम्ही सर्व एक आहोत' – असे म्हटले, यामध्ये 'आहोत' च्या आधारावर शुद्धमहासत्ता आहे म्हणजे यामध्ये सर्व सन्मात्रच्या आधारावर एक झाले आहेत. नंतर 'चेतन' असा भेद केला, त्यामध्ये चेतनता सुद्धा महासत्तेचाच भेद आहे, यामध्ये अवांतरसत्ता नाही; कारण चेतनता सर्व जीवांमध्ये आहे आणि दोन जीवांची अवांतरसत्ता वेगवेगळी आहे. माझी चेतना वेगळी आहे व तुमची चेतना वेगळी आहे; अशाप्रकारे आपण एका अवांतरसत्तेपर्यंत तर आलो नाही. ही तर केवळ जीवत्व व द्रव्यत्वाची ओळख आहे. येथे 'स्व' ची ओळख नाही.

'जीवत्व' ही माझी ओळख नाही. जीवत्व या लक्षणामध्ये अनंत जीव सामिल होतात. तरी देखील जीवापासून वेगळे होऊन 'मनुष्यावर' आलो; मनुष्य देवगतीतील जीव व नारकी जीवांपासून भिन्न आहेत; परंतु मनुष्य सुद्धा २९ अंकप्रमाण आहेत. या सर्वांना 'मनुष्य' या महासत्तेमध्ये सामिल केले; त्यामुळे ही शुद्ध नसून अशुद्ध महासत्ता आहे.

वास्तविक पाहता आम्ही महासत्तेपासून अवांतरसत्ता अर्थात सादृश्यास्तित्वपासून स्वरूपास्तित्वापर्यंत आलो, आपल्या अस्तित्वा-पर्यंत आलो; अशा स्थितीत जेवढेही संबंध स्थापित होतील, ते सर्व सदृशतेच्या आधारावर स्थापित झाल्याने महासत्तेच्या आधारावरच स्थापित होतील.

हे सर्व शुद्धमहासत्ता व अशुद्धमहासत्तेच्या आधारेच होते.

स्वरूपास्तित्वाशिवाय कोणीही आपले नाही. याला सोडता सर्व संबंध असद्भूत आहेत.

पराशी आमचा जो महासत्तासंबंधी संबंध आहे; त्याला नाकारणे

देखील मिथ्यात्व आहे. हे मिथ्यात्व सुटल्याशिवाय इतर मिथ्यात्व तर सुटणार नाही.

या महासत्तेकडे कोणाचेही लक्ष नाही. आज तर सर्व स्वरूपास्तित्व म्हणजेच एका आत्मद्रव्याच्या आत जे गुण-पर्यायांचे भेद आहेत, त्यांच्यातच अडकून आहेत. सर्व जण भगवान आत्म्याच्या स्वरूपास्तित्वाच्या आतच स्व-पर भेद करण्यात संलग्न आहेत.

अरे बंधो ! जी प्रदेशभेद, गुणभेद आणि पर्यायांची पृथकतेची चर्चा आहे, ती तर विकल्पांची उत्पत्ती होऊ नये – या अपेक्षेने सांगितली आहे. ते तर प्रयोजनवश केलेले कथन आहे; वस्तुचे मूळ स्वरूप तर स्वरूपास्तित्वाच्या मर्यादेतच आहे.

हे तर आपण जाणताच की स्वरूपास्तित्वामध्ये एका द्रव्याचे द्रव्य-गुण-पर्याय – सर्व सामिल होतात. ●

जेव्हा कोणी व्यक्ती अत्यंत पवित्र भावनेने, निस्वार्थ भावनेने एखादे चांगले कार्य करतो आणि त्या कार्यात त्याला सफलता मिळते, प्रोत्साहन मिळते, यश मिळते आणि ज्या पवित्र उद्देश्याने त्याने या कार्याला सुरूवात केली होती, जर त्यामध्ये काही उन्नती जाणवली तर त्याचा उत्साह खूप वाढू लागतो. उत्साह वाढल्यामुळे त्या कार्याला सुद्धा गती मिळते आणि असे वाटू लागते की आता सफलतेच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचण्यास काहीच उशीर नाही, परंतु 'श्रेयांसि बहु विघ्नानि' ह्या नीतिनुसार जेव्हा त्या कार्यामध्ये विघ्न येऊ लागते, त्या व्यक्तीवर अवांछित शंका केली जाऊ लागते, त्याला बदनाम केले जाऊ लागते तेव्हा त्याचा सर्व उत्साह कमी होऊ लागते. त्याच्या हृदयात एक वितृष्णेचा भाव उत्पन्न होऊ लागतो. जरी ते कार्य चांगले असेल, तरी देखील त्या कार्याबद्दल त्याच्या हृदयात एक प्रकारे अरुची उत्पन्न होते. तो विचार करू लागतो की येथे तर होम करताच हात जळू लागले आहेत. **–सत्याचा शोध, पृष्ठ : १४४**

प्रवचनसार गाथा-९८

मागील ९६-९७ व्या गाथेत स्वरूपास्तित्व (अवांतरसत्ता) व सादृश्यास्तित्व (महासत्ता) यांचे स्वरूप स्पष्ट केल्यानंतर आता या गाथेत सांगत आहेत की प्रत्येक द्रव्य स्वभावानेच सिद्ध आहे व सत् आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

दव्वं सहावसिद्धं सदिति जिणा तच्चदो समक्खादा।
सिद्धं तध आगमदो णेच्छदि जो सो हि परसमओ॥९८॥

(हरिगीत)

स्वभाव से ही सिद्ध सत् जिन कहा आगमसिद्ध है।
यह नहीं माने जीव जो वे परसमय पहिचानिये॥९८॥

'द्रव्य स्वभावाने सिंद्ध व सत् आहे' – असे जिनेंद्रदेवांनी सांगितले आहे. जो हे मानत नाही, तो वास्तविक पाहता परसमय आहे.

गाथेत द्रव्याला स्वभावाने सत् व सिद्ध म्हटले आहे. यामध्ये 'सिद्ध' शब्दाचा अर्थ 'मुक्त' नसून प्रत्येक द्रव्य स्वभावानेच निर्मित आहे, तो कधी कोणाची निर्मिती करीत नाही, तसेच ते द्रव्य अनादी-अनंत असा स्वत:सिद्ध पदार्थ व त्याचे अस्तित्वही स्वत:मुळेच आहे.

या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''वास्तविक बाब अशी आहे की एखाद्या द्रव्यामुळे इतर द्रव्याची उत्पत्ती होत नाही, कारण सर्व द्रव्य अनादी-अनंत असल्याने स्वभावानेच सिद्ध आहेत. कारण अनादीनिधन पदार्थ अन्य साधनाची अपेक्षा ठेवत नाहीत. सर्व पदार्थ मूळ साधनाच्या रूपामध्ये आपल्या गुण-पर्यायात्मक स्वभावामुळे स्वयमेव सिद्धच आहेत.

जे द्रव्याने उत्पन्न होतात, ते अन्य द्रव्य (द्रव्यांतर) नाही; सदैव नसल्याने कधी-कधी असल्याने त्या तर द्विअणुक वगैरे आणि मनुष्य वगैरे

पर्याय आहेत. द्रव्य तर निरवधि त्रिकाळी असल्याने उत्पन्नच होत नाही.

जसे द्रव्य स्वभावाने सिद्ध आहे, तसेच ते स्वभावाने सत् सुद्धा आहे; कारण ते आपल्या सत्तारूप स्वभावानेच निष्पन्न झालेले आहे – असे निश्चित केले पाहिजे.

ज्याच्या समवायाने द्रव्य सत् असावे – अशी अन्य द्रव्यरूप एखादी सत्ता नाही. आता हीच बाब विशेषरूपे स्पष्ट करतात –

पहिली बाब तर अशी आहे की दंड आणि दंडीमध्ये (दंडधारक पुरुषामध्ये) ज्याप्रकारची युतसिद्धता (दोन पदार्थांचा जोड) आढळते, त्याप्रकारची युतसिद्धता सत् द्रव्य व सत्ता गुणामध्ये आढळत नाही; म्हणून सत्ता आणि द्रव्यामध्ये अर्थांतरत्व नाही.

तसेच सत्ता व द्रव्य यांच्यात अयुतसिद्धतेने सुद्धा अर्थांतरत्व सिद्ध होत नाही.

'यामध्ये हे आहे' म्हणजेच 'द्रव्यामध्ये सत्ता आहे' – अशा प्रतीतीमुळे अर्थांतरत्व बनेल – जर एखाद्याने असे म्हटले तर त्याला विचारले जाते की 'यामध्ये हे आहे' – अशी प्रतीती कोणाच्या आश्रयाने होते ?

जर असे म्हटले गेले की भेदाच्या आश्रयाने होते, म्हणजेच द्रव्य आणि सत्ता यामध्ये भेद आहे, म्हणून होते.

असा तो कोणता भेद आहे – प्रादेशिक किंवा अताद्भाविक ?

प्रादेशिक भेद तर नाही, कारण युतसिद्धत्व अगोदरच नाकारलेला आहे. प्रदेशभेद तर युतसिद्धामध्येच असतो.

जर अताद्भाविक भेद म्हटले तर ठीकच आहे; कारण असे तर शास्त्राचे देखील म्हणणे आहे. शास्त्रामध्ये देखील म्हटले आहे की जे द्रव्य आहे, ते गुण नाही; परंतु हा अताद्भाविक भेद एकांताने 'यामध्ये हे आहे' अशा प्रतीतीचे कारण नाही; कारण तो अताद्भाविक भेद स्वतःच उन्मग्न-निमग्न असतो.

जेव्हा पर्यायार्थिक नयाने पाहिले जाईल, तेव्हाच 'हे शुक्ल वस्त्र

आहे, याचा शुक्लत्व हा गुण आहे' – अशाप्रकारे गुणवाले हे द्रव्य आहे, हा त्याचा गुण आहे – अशाप्रकारे अताद्भाविक भेद उन्मग्न (उदित) होतो; परंतु जेव्हा द्रव्यार्थिक नयाने पाहिले जाईल, तेव्हा ज्याचे समस्त गुणवासनेचे उन्मेष अस्त झाले आहेत – अशा त्या जीवाला 'शुक्ल वस्त्रच आहे' इत्यादी प्रमाणे 'असे द्रव्य आहे' अशाप्रकारे पाहिले असता अताद्भाविक भेद समूळपणे निमग्न (अस्त) होतो.

तो निमग्न झाला असता अयुतसिद्धत्वजनित अर्थांतरपणा निमग्न होतो; म्हणून समस्तच एक द्रव्य होऊन जाते.

जेव्हा भेद उन्मग्न होतो, तर त्याच्या आश्रयाने उत्पन्न होणारी प्रतीती उन्मग्न होते.

त्याची उन्मग्नता झाली असता अयुतसिद्धत्वजनित अर्थांतरपणा उन्मग्न होतो; तेव्हा देखील द्रव्याचे पर्यायरूपाने उन्मग्न झाल्याने ज्याप्रमाणे जलसमूहापासून जलतरंग व्यतिरिक्त (भिन्न) नाहीत, त्याप्रमाणे द्रव्यापासून गुण व्यतिरिक्त (भिन्न) नाहीत.

यावरून हे निश्चित झाले की द्रव्य स्वयमेव सत् आहे. जो असे मानत नाही, तो वास्तविक परसमयच (मिथ्यादृष्टीच) आहे.''

आचार्य जयसेन तात्पर्यवृत्ती टीकेत तत्त्वप्रदीपिकेचीच बाब थोडक्यात पुनः सांगतात.

कविवर वृंदावनदासजी या गाथेचा भाव ३ मनहरण छंद, १ दोहा – अशा एकूण ४ छंदांच्या माध्यमातून प्रस्तुत करतात; त्यापैकी काही छंद पुढीलप्रमाणे आहेत –

(दोहा)

जदपि जीव पुद्गल मिले, उपजहिं बहु परजाय।
तदपि न नूतन दरव की, उतपति वरनी जाय।।

जरी जीव आणि पुद्गल मिळून अनेक असमानजातीयद्रव्यपर्यायरूप परिणमित होतात; तरी देखील नव्या द्रव्याची उत्पत्ती होत नाही.

(मनहरण)

द्रव्य गुनखान तामें सत्ता गुन है प्रधान,
गुनी-गुन को यहाँ प्रदेशभेद नाहीं है।
संज्ञा संख्या लच्छन प्रयोजनतैं द्रव्यमाहिं,
कथंचित भेद पै न सर्वथा कहाहीं है॥
दंड के धरे तैं जैसे दंडी तैसे यहाँ नाहिं,
यहाँ तो स्वरूप तैं अभेद ठहराहीं है।
दर्व को सुभाव है अनंत गुनपर्जबंत,
ताको सांचो ज्ञान भेदज्ञानी वृन्द पाहीं है॥

जरी द्रव्य गुणांची खाण आहे; तरी त्यामध्ये सत्ता गुण मुख्य आहे. गुण व गुणीमध्ये प्रदेशभेद नाही. जरी संज्ञा, संख्या, लक्षण व प्रयोजन यांच्या अपेक्षेने यांच्यात कथंचित भिन्नता आहे, तथापी सर्वथा भेद नाही.

ज्याप्रमाणे दंड धारण केल्याने एखाद्याला दंडी म्हटले जाते, तशी येथे बाब नाही. कविवर वृंदावनदासजी म्हणतात की येथे स्वरूपअपेक्षा तर अभेदच आहे. द्रव्याचा स्वभाव तर अनंत गुण-पर्यायवाला आहे. त्याचे खरे ज्ञान तर भेदज्ञानींनाच होते.

(मनहरण)

जब परजायद्वार दरव विलोकिये तौ,
गुनी-गुन भेदनि की उठत तरंग है।
और जब दर्वदिष्ट देखिये तौ गुनी-गुन,
भेदभाव डूबै रहै एक रस रंग है॥
जैसे सिन्धुमाहिं भेद जद्दपि कलोलिनि तैं,
निहचै निहारैं वारि सिंधु ही को अंग है।
तैसे दोनों नैन के समान दोनों नयननि तैं,
वस्तु को न देखै सोई मिथ्याती कुढंग है॥

जेव्हा द्रव्याला पर्यायदृष्टीने पाहिले जाते, तेव्हा गुण-गुणीच्या

भेदाचे तरंग उत्पन्न होतात आणि जेव्हा त्याच द्रव्याला द्रव्यदृष्टीने पाहिले असता गुण-गुणीचा भेदभाव अतींद्रिय आनंदाच्या रसरंगामध्ये बुडतो. जरी समुद्रामध्ये लाटांचा भेद आहे; तरी निश्चयनयाने लाटांमध्ये जे पाणी उसळत आहे, ते समुद्राचेच अंग आहे. म्हणून जी व्यक्ती दोन्ही डोळ्यांप्रमाणे दोन्ही नयांनी वस्तुस्वरूपाला पहात नाही, ती कुढंगी व्यक्ती मिथ्यादृष्टी आहे.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे –

(छप्पय)

स्वयं सिद्ध सो दर्व आप अपनैं सुभाव जुत।
स्वयं सिद्ध सत्ता सु दर्व तिहि तैं न होत चुत॥
सत्ता गुन पुनि गुनिय दर्व सु प्रदेस एक हिय।
जद्यपि सो गुन गुनिय भेद करिकैं सु भांति विय॥
निज वस्तु स्वरूप विचार उरि इहि प्रकार सु न सरदहइ।
सो पुरिष जिनागम के विषैं मिथ्यामती सु परसमय॥११॥

आपल्या स्वभावात राहणारे द्रव्य स्वयंसिद्ध द्रव्य आहे आणि ते द्रव्य स्वत:च्या स्वयंसिद्ध सत्तेहून कधी च्युत होत नाही. सत्ता एक गुण आहे आणि द्रव्य गुणी आहे. गुण व गुणीमध्ये प्रदेशभेद नसतो. संज्ञा, संख्या इत्यादीच्या अपेक्षेने जे भेद करून समजाविले जाते, ती अतद्भावरूप अन्यता आहे, पृथकता नाही. जो आपल्या आत्मवस्तुच्या स्वरूपाचा वरील प्रकारे विचार करून श्रद्धान करीत नाही, त्या मिथ्यामतीला परसमय म्हटले आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''वास्तविक पाहता अनादी सत् द्रव्य असल्याने द्रव्यापासून दुसऱ्या द्रव्याची किंवा गुणाची उत्पत्ती होत नाही. कारण सर्व द्रव्य स्वभावत:च आपापल्या गुण-पर्यायांनी सिद्ध झाले आहेत; परंतु एखादा ईश्वर कर्ता आहे – त्यामुळे ते झाले आहेत, असे नाही.

असे अनादी-अनंत व्यवस्थितरूप स्वत: आपल्या सत्तेनेच आहे. सर्व द्रव्य आपल्या गुण-पर्यायांनीच स्वयंसिद्ध आहेत; एखादा परमेश्वर त्यांचा कर्ता नाही; तर नव्या-नव्या पर्यायांचा उत्पाद आणि जुन्याचा व्यय करणारे ते द्रव्य स्वत:च आहे.[१]

आता जसे द्रव्य त्रिकाळी असल्याने नवे उत्पन्न होत नाही, त्याचप्रमाणे सत्ता नावाचा गुण देखील गुणी अशा द्रव्यामध्ये अनादी स्वभावानेच सिद्ध आहे; कारण प्रत्येक द्रव्याचे सत् आहे – असा भाव द्रव्याच्या सत्तास्वरूप स्वभावाचाच बनलेला आहे. द्रव्यापासून सत्ता वेगळी नाही की ज्याच्या जोडल्या गेल्याने द्रव्याला सत्तावान म्हटले जावे.[२]

गुण-गुणीचा प्रदेशभेद तर नाही; गुणभेद देखील भेददृष्टीला मुख्य केले असताच दृष्टीस पडतात; परंतु अभेद दृष्टीने पाहिले असता असा भेद दिसत नाही. द्रव्यामध्ये बुडून गेले असता भेदाचे विकल्प सुद्धा उत्पन्न होत नाहीत, तर मग परद्रव्य, क्षेत्र वगैरेंना पाहण्याची बाबच उरत नाही.[३]

प्रत्येक आत्मा व परमाणू वगैरे पदार्थांची अनादी स्वसत्ता स्वभावाने रचित आहे, म्हणून द्रव्य स्वयमेव सत् आहे – असे जो मानत नाही, तो आत्म्याला मानत नाही. प्रत्येक परमाणुची क्रिया त्याच परमाणुने होते व आत्म्याची क्रिया आत्म्यानेच होते. प्रत्येक पदार्थ पूर्ण सामर्थ्यवान अनादी सत् असल्याने स्वत:च आपला ईश्वर आहे, म्हणून तो दुसऱ्या कोठल्या संयोग, क्षेत्र, काळ वगैरेंची अपेक्षा ठेवत नाही व आपल्या नव्या-नव्या अवस्था स्वत:च करतो – यालाच सम्यक एकांत असे नाव आहे व हाच धर्म आहे – असे जो मानत नाही, तो मिथ्या एकांतवादी परसमय आहे, मूढ आहे. अशातऱ्हेने मानल्याशिवाय धर्म होत नाही; त्याचे दया-दान, पूजा-भक्ती वगैरे सर्व एक या अंकाशिवाय शून्य आहे.[४]''

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १३१
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १३२
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १३४
४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १३४

अशाप्रकारे या गाथेमध्ये हे सांगितले आहे की प्रत्येक पदार्थ अनादी काळापासून आहे व अनंत काळापर्यंत राहणार आहे. त्याला कोणीही बनविलेले नाही आणि त्याचा कोणी नाशही करू शकत नाही. वास्तविक बाब तर अशी आहे की द्रव्याची उत्पत्तीच होत नाही. जे उत्पन्न व नष्ट होतात, त्या तर पर्याय आहेत.

सत् अर्थात सत्ता हे द्रव्याचे लक्षण आहे व ते द्रव्य स्वत:सिद्ध आहे. ते सत् अर्थात् सत्ता द्रव्यापासून कथंचित भिन्न आहे व कथंचित अभिन्न आहे. द्रव्यार्थिक नयाने अभिन्न आहे व पर्यायार्थिक नयाने भिन्न आहे.

जी व्यक्ती या वस्तुस्वरूपाचा स्वीकार करीत नाही, ती अज्ञानी आहे, मिथ्यादृष्टी आहे, परसमय आहे.

अशाप्रकारे येथे हेच स्पष्ट केले आहे की प्रत्येक पदार्थ स्वभावाने सत् व सिद्ध आहे म्हणजेच स्वत:ने सिद्ध आहे, अकृत्रिम आहे. ●

सफलता संगठनाची व असफलता विघटनाची जननी आहे. जेव्हा एखाद्या कार्यामध्ये लागोपाठ यश मिळत जाते, तेव्हा आमचा उत्साह वाढतो आणि अनेक जण आपल्याशी जुळतात, कार्यकर्त्यांचे मनोबळ वाढते, त्यांच्यात उत्साहाचा नवसंचार होतो. नवीन-नवीन लोक सामिल होत गेल्यामुळे एकीकडे संगठन विशाल रूप धारण करू लागते तर दुसरीकडे त्यामध्ये दृढतेचा विकास देखील होतो; परंतु जेव्हा एखाद्या संगठनाला असफलतेचा सामना करावा लागतो, तेव्हा त्यामध्ये दरार पडू लागते. त्याचे सदस्य एकमेकांपासून दूर जाऊ लागतात, ते आपसात एकमेकांची आलोचनाच करीत नाही तर असफलतेचा दोष एकमेकांच्या नावावर थोपू लागतात. हा आरोप-प्रत्यारोपांचा क्रम येथवर पोहोचतो की कधी-कधी विघटनाची स्थिती देखील निर्माण होते. **– सत्याचा शोध, पृष्ठ : १८६**

प्रवचनसार गाथा ९९

मागील गाथेत म्हटले होते की द्रव्य स्वभावानेच सत् आहे व स्वत: सिद्ध आहे; या गाथेत सांगत आहेत की स्वभावात अवस्थित असल्याने द्रव्य सत् आहे व उत्पाद-व्यय-ध्रौव्यरूप परिणमन द्रव्याचा स्वभाव आहे.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

सदवट्ठिदं सहावे दव्वं दव्वस्स जो हि परिणामो।
अत्थेसु सो सहावो ठिदिसंभवणाससंबद्धो ।।९९।।

(हरिगीत)

स्वभाव में थित द्रव्य सत् सत् द्रव्य का परिणाम जो।
उत्पादव्ययध्रुवसहित है वह ही पदार्थस्वभाव है।।९९।।

स्वभावामध्ये अवस्थित असल्याने द्रव्य सत् आहे. द्रव्याचा परिणाम उत्पाद-व्यय-ध्रौव्यसहित आहे, तो पदार्थांचा स्वभाव आहे.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्र तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये खालीलप्रमाणे स्पष्ट करतात –

"सदैव स्वभावामध्ये स्थित असल्याने द्रव्य सत् आहे आणि द्रव्याचा स्वभाव उत्पाद-व्यय-ध्रौव्याचा एकतारूप परिणाम आहे.

जसे द्रव्याची वास्तू समग्रपणे एक असूनही विस्तारक्रमामध्ये प्रवर्तमान असणारे असे त्याचे जे सूक्ष्म अंश आहेत, ते प्रदेश आहेत; तसेच द्रव्याची वृत्ती समग्रपणे एक असूनही प्रवाहक्रमात प्रवर्तमान असे त्याचे जे सूक्ष्म अंश आहेत, ते परिणाम आहेत.

ज्याप्रमाणे विस्तारक्रमाचे कारण प्रदेशांचा परस्पर व्यतिरेक आहे, त्याप्रमाणे प्रवाहक्रमाचे कारण परिणामांचा परस्पर व्यतिरेक आहे.

ज्याप्रमाणे ते प्रदेश आपल्या जागेवर स्वरूपाने उत्पन्न होत असल्याने, पूर्वरूपाने व्यय होत असल्याने, तसेच परस्पर अनुस्यूतिने रचलेल्या एकवास्तुपणाद्वारे अनुत्पन्न-अविनष्ट असल्याने उत्पत्ती-संहार-

ध्रौव्यात्मक आहे; त्याप्रमाणे ते परिणाम आपापल्या काळी स्वरूपाने उत्पन्न होत असल्याने व पूर्वरूपाने व्यय होत असल्याने तसेच सर्वत्र परस्पर अनुस्यूतिने रचलेल्या एकप्रवाहपणाद्वारे अनुत्पन्न-अविनष्ट असल्याने उत्पत्ती-संहार-ध्रौव्यात्मक आहेत.

ज्याप्रमाणे वस्तुचा छोट्यात छोटा अंश पूर्व प्रदेशाच्या विनाश-स्वरूप आहे, नंतरच्या प्रदेशाच्या उत्पादस्वरूप आहे, तसेच परस्पर अनुस्यूतिने रचलेल्या एक वास्तुने अनुभयस्वरूप आहे. त्याप्रमाणे प्रवाहाचा छोट्यात छोटा अंश पूर्ण परिणामाच्या विनाशस्वरूप आहे, नंतरच्या परिणामाच्या उत्पादस्वरूप आहे, तसेच परस्पर अनुस्यूतिने रचलेल्या एक प्रवाहपणाने अनुभयस्वरूप आहे.

अशाप्रकारे स्वभावानेच त्रिलक्षण परिणामपद्धतिमध्ये प्रवर्तमान असलेले द्रव्य आपापल्या स्वभावाचे अतिक्रमण करीत नाही, म्हणून सत्त्वला त्रिलक्षणामध्ये अनुमोदले पाहिजे, मोत्यांच्या हाराप्रमाणे.

जसे ज्याने (अमुक) लांबी ग्रहण केली आहे – अशा लटकलेल्या मोत्यांच्या हारामध्ये आपापल्या स्थानावर प्रकाशित होत असलेल्या समस्त मोत्यांमध्ये, मागच्या स्थानावर मागील मोती प्रगट होतात व अगोदरचे मोती प्रगट होत नाहीत, यामुळे तसेच सर्वत्र परस्पर अनुस्यूतिचे रचियता सूत्र अवस्थित असल्याने त्रिलक्षणत्व प्रसिद्धिला प्राप्त होते.

तसेच ज्याने नित्यवृत्ती ग्रहण केली आहे, अशा परिणमित द्रव्यात आपापल्या काळात प्रकाशित (प्रगट) होणाऱ्या समस्त परिणामांमध्ये मागच्या-मागच्या काळात अगोदरचे परिणाम प्रगट होतात व नंतर-नंतरचे परिणाम प्रगट होत नाहीत – यामुळे तसेच सर्वत्र परस्पर अनुस्यूतिने रचणारा प्रवाह अवस्थित असल्याने त्रिलक्षणपणा प्रसिद्धीला प्राप्त होतो.''

येथे हे सांगितले आहे की जसे द्रव्याच्या विस्ताराचा छोट्यातील छोटा अंश प्रदेश आहे; तसेच द्रव्याच्या प्रवाहाचा छोट्यात छोटा अंश परिणाम (पर्याय) आहे.

प्रत्येक परिणाम स्व-काळामध्ये आपल्या रूपाने उत्पन्न होतो, पूर्व

रूपाने नष्ट होतो व सर्व परिणामांमध्ये एक प्रवाहपणा असल्याने प्रत्येक परिणाम उत्पाद-विनाश यांनी रहित असा एकरूप ध्रुव राहतो.

उत्पाद-व्यय-ध्रौव्यात समयभेद नाही, तिघे एकाच समयात आहेत – अशी उत्पाद-व्यय-ध्रौव्यात्मक परिणामांच्या परंपरेत द्रव्य स्वभावानेच सदैव राहते; म्हणून द्रव्य सुद्धा मोत्याच्या हाराप्रमाणे उत्पाद-व्यय-ध्रौव्यात्मक आहे.

आचार्य जयसेनांनी या गाथेचा भाव मुक्तात्म्यावर (सिद्धांवर) घटित करून समजाविला आहे. शेवटी त्यांनी लिहिले की जसे हे परमात्मद्रव्य एक समयामध्ये उत्पाद-व्यय-ध्रौव्यरूपे परिणमित होत असतानाच त्याला सत्तालक्षणवान म्हटले आहे; तसेच सर्व द्रव्य एकाच समयात उत्पादीरूपाने परिणमित होत असताना सत्ता लक्षणवाले आहेत – याचा असा अर्थ आहे.

कविवर वृंदावनदासजींनी सुद्धा या गाथेचा भाव मोठ्या विस्ताराने छंदबद्ध केला आहे. ते या संदर्भात मोठे सात छंद लिहितात, ते मुळातून पठनीय आहेत.

आध्यात्मिकसत्पुरुष कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"येथे प्रदेशाचा विस्तारक्रम क्षेत्राच्या अपेक्षेने आहे व परिणामांचा प्रवाहक्रम परिणमनाच्या अपेक्षेने आहे. येथे क्षेत्राचा दृष्टांत देऊन आचार्यदेव परिणामांचे स्वरूप समजाऊ इच्छितात.[१]

प्रवाहक्रम सांगितल्याने समस्त परिणामांचा क्रम व्यवस्थितच आहे, कोणताही परिणाम म्हणजेच कोणतीही पर्याय मागे-पुढे होत नाही. अशा श्रद्धेमध्येच द्रव्यदृष्टी आणि वीतरागता आहे.[२]

जेवढे एका द्रव्याचे परिणाम आहेत, तेवढेच तीन काळाचे समय आहेत जेवढे तीन काळाचे समय आहेत, तेवढेच एका द्रव्याचे परिणाम आहेत. बस ! एवढे निश्चित करताच आपल्या ज्ञायकपणाची प्रतीती येईल.[३]

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १३९ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १३९
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १४४

अहाहा ! पहा तर खरे ! क्रमबद्धपर्यायाच्या निर्णयात केवढे गांभीर्य आहे. द्रव्याची पर्याय परामुळे बदलते – ही बाब तर नाहीच नाही, पण द्रव्य स्वत: आपल्या पर्यायीला पुढे-मागे करू इच्छिते तर तेही होऊ शकत नाही.

ज्याप्रमाणे त्रिकाळी द्रव्य पलटून अन्यरूप होत नाही, त्याचप्रमाणे त्याचा प्रत्येक परिणाम देखील बदलून अन्यरूप होत नाही.

जीव पलटून कधीही अजीवरूप होत नाही व अजीव पलटून कधीही जीवरूप होत नाही. जसे त्रिकाळी सत् बदलत नाही; तसेच त्याचे वर्तमान सत् देखील बदलत नाही. जसे त्रिकाळी द्रव्य बदलत नाही, तसेच त्याच्या प्रत्येक समयाची अनादी-अनंत अवस्था देखील ज्या समयी जी होणार आहे, त्यामध्ये फेरफार होऊ शकत नाही.[१]

दृष्टांतामध्ये अमुक लांबीचा हार होता, सिद्धांतामध्ये नित्यवृत्तीवाले द्रव्य आहे.

दृष्टांतात लटकणारा हार होता, सिद्धांतामध्ये परिणमन करीत असलेले द्रव्य आहे.

दृष्टांतामध्ये मोत्याचे आपापले स्थान होते, सिद्धांतामध्ये परिणामांची आपापली वेळ आहे, स्वकाळ आहे.[२]''

वरील कथनामध्ये क्रमबद्धपर्यायाची सिद्धी होते. हे निश्चित होते की ज्या पदार्थाची जी पर्याय ज्या विधीने ज्यावेळी होणार आहे, त्या द्रव्याची तीच पर्याय, त्याच विधीने, त्याच समयी उत्पन्न होईल, पुढे-मागे नाही.

वरील संदर्भात क्रमबद्धपर्याय पुस्तकातील खालील कथन पाहण्यासारखे आहे –

''वरील प्रकरणात 'सर्वत्र परस्पर अनुस्यूतिरचित एक प्रवाह' हे वाक्य वारंवार आले आहे, ते लक्ष देण्यायोग्य आहे. तसेच मोत्याच्या हाराच्या उदाहरणाने हे स्पष्ट होते की ज्याप्रमाणे हारामध्ये मोत्याचे क्षेत्र (जागा) आपल्या क्रमामध्ये नियमित आहे; त्याप्रमाणे झुलणाऱ्या हारामध्ये त्याच्या प्रगटण्याचा काळ सुद्धा नियमित आहे. त्याचप्रमाणे जसे प्रत्येक द्रव्यात त्याचे प्रदेश (क्षेत्र) नियमित (निश्चित) आहेत; तसेच

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १४८ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १६८

त्याचा काळप्रवाह देखील नियमित आहे, म्हणजेच निश्चित आहे.

येथे क्षेत्राच्या निश्चित क्रमाच्या माध्यमाने काळा(पर्याया)संबंधी नियमितक्रमाला स्पष्ट केले आहे; कारण क्षेत्रासंबंधीची क्रमनियमितता सहजरित्या समजली जाऊ शकते.

जसे द्रव्याला संपूर्ण विस्तारक्षेत्राने लक्षात घेतले गेले तर त्याचे पूर्ण क्षेत्र एकच आहे, तसेच द्रव्याला तिन्ही काळाच्या परिणामांनी एकदम लक्षात घेतले असता त्याचा काळ त्रैकालिक एक आहे. तरी देखील जसे क्षेत्रामध्ये एक नियमित प्रदेशक्रम आहे; त्याप्रमाणे काळामध्ये (पर्यायीमध्ये) देखील पर्यायाचा एक नियमित प्रवाहक्रम आहे.

ज्याप्रमाणे द्रव्याच्या विस्तारक्रमाचा अंश प्रदेश आहे; त्याप्रमाणे द्रव्याच्या प्रवाहक्रमाचा अंश पर्याय आहे.

जरी हे कथन संपूर्ण द्रव्यांच्या अपेक्षेनेच आहे; परंतु येथे विस्तारक्रमाला जर आकाश द्रव्याच्या अपेक्षेने समजले तर सोयीचे होईल; ज्याप्रमाणे अनंतप्रदेशी आकाशाचा जो प्रदेश जेथे स्थित आहे, तो तेथेच राहतो, त्याचे स्थानपरिवर्तन शक्य नाही; त्याचप्रमाणे सर्व द्रव्यांमध्ये प्रदेशांचा क्रम नियमित आहे. हीच बाब येथे मोत्याच्या हाराच्या दृष्टांताद्वारे स्पष्ट केली आहे की मोत्याच्या हारामध्ये जो मोती जेथे स्थित (कायम) आहे, त्याच्या स्थानक्रमाचे परिवर्तन शक्य नाही.

जरी आकाश अचल (निष्क्रिय) द्रव्य आहे व जीव व पुद्गल सचल (सक्रिय) द्रव्य आहेत; तरीही झुलणाऱ्या हाराचे उदाहरण देऊन हे स्पष्ट केले आहे की जसे झुलणाऱ्या हारामध्ये सुद्धा मोत्याचा स्थानक्रम बदलला जात नाही; तसेच सक्रिय जीवामध्ये प्रदेशांचा क्रम बदलत/पलटत नाही.

जसे आकाशादी द्रव्यांचा विस्तारक्रम नियमित आहे; तसेच त्याचा प्रवाहक्रम देखील नियमित आहे. जसे नियमित विस्तारक्रमामध्ये फेरफार शक्य नाही; त्याप्रमाणे नियमित प्रवाहक्रमात सुद्धा फेरफार शक्य नाही. जसे प्रत्येक प्रदेशाचे स्वस्थान निश्चित आहे; त्याप्रमाणे प्रत्येक परिणामाचा (पर्यायाचा) स्वकाळ देखील निश्चित आहे.

जसे सिनेमाच्या रिळामध्ये लांबी आहे, त्या लांबीमध्ये जे चित्र जेथे स्थित आहे, ते तेथेच राहते. त्याचे स्थानपरिवर्तन शक्य नाही. तसेच चालणाऱ्या रिळामध्ये कोणते चित्र कोणत्या क्रमाने येणार आहे, हे सुद्धा निश्चित आहे, त्यामध्येही फेरफार शक्य नाही. पुढील कोणते चित्र येणार आहे, याचे जरी आम्हाला ज्ञान नसेल, त्याने काहीही फरक पडत नाही. येणार तर तेच आहे, जे आपल्या नियमित क्रमामध्ये आहे.

जसे जिन्यावर पायऱ्यांचा क्षेत्र-अपेक्षेने एक अपरिवर्तनीय निश्चितक्रम असतो; त्याचप्रमाणे त्यावर चढण्याचा अपरिवर्तनीय कालक्रम देखील असतो. जसे त्याच्यावर क्रमानेच चढणे होते, अगदी तसेच त्याच्यावर चढण्याचा काळक्रम देखील आहे.

जसे जेवढे लोकाकाशाचे प्रदेश आहेत, तेवढेच एका जीवाचे प्रदेश आहेत. तसेच तीन काळाचे जेवढे समय आहेत, तेवढ्याच प्रत्येक द्रव्याच्या पर्याय आहेत. एकेका समयाची एकेक पर्याय निश्चित आहे. जसे लोकाकाशाच्या एकेका प्रदेशावर एकेक कालाणू खचित आहे, तसेच तिन्ही काळाच्या एकेक समयामध्ये प्रत्येक द्रव्याची एकेक पर्याय खचित आहे. गुणांच्या अपेक्षेने विचार केला असता तिन्ही काळांच्या एकेका समयात प्रत्येक गुणाची एकेक पर्याय सुद्धा खचित आहे.

अशाप्रकारे जेव्हा प्रत्येक पर्याय स्वसमयात खचित-निश्चित आहे. तर मग त्यामध्ये अदलाबदलीचे काम ते काय बाकी राहीले ? या संदर्भात टीकेमध्ये आलेले हे वाक्य देखील पाहण्यासारखे आहे की 'प्रत्येक परिणाम आपापल्या काळीच प्रगट होतो.'

या सर्वांवरून हाच निष्कर्ष निघतो की ज्या द्रव्याची जी पर्याय, ज्या समयी, ज्या कारणाने होणार आहे, ती तदनुसारच होते.[१]''

अशाप्रकारे या गाथेत हे सांगितले की प्रत्येक पदार्थाचा प्रदेशक्रम व पर्यायक्रम पूर्णपणे निश्चितच आहे. जर या विषयामध्ये विशेष जिज्ञासा असेल तर लेखकाची कृती क्रमबद्धपर्यायाचा स्वाध्याय करावा. ●

१) क्रमबद्धपर्याय : एक अनुशीलन, पृष्ठ : २२-२४

प्रवचनसार गाथा १००

मागील गाथेत हे म्हटले आहे की उत्पाद-व्यय-ध्रौव्य हा द्रव्याचा स्वभाव आहे. आता या गाथेमध्ये हे सांगितले जात आहे की उत्पाद-व्यय-ध्रौव्य यांच्यात अविनाभाव आहे. तात्पर्य हे आहे की हे तिन्ही एकत्रच असतात; एका शिवाय दुसरा रहात नाही.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

ण भवो भंगविहीणो भंगो वा णत्थि संभवविहीणो।
उप्पादो वि य भंगो ण विणा धोव्वेण अत्थेण॥१००॥

(हरिगीत)

भंगबिन उत्पाद ना उत्पाद बिन ना भंग हो।
उत्पादव्यय हो नहीं सकते एक ध्रौव्यपदार्थ बिन॥१००॥

उत्पाद भंगाशिवाय (व्ययाशिवाय) असत नाही व भंग उत्पादाविना असत नाही, तसेच उत्पाद व व्यय ध्रौव्याशिवाय असत नाहीत.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्र तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात –

"वास्तविक बाब अशी आहे की सर्ग (उत्पाद) संहारा (व्यया) शिवाय असत नाही व संहार सर्गाशिवाय असत नाही. अशाप्रकारे सृष्टी (उत्पाद) व संहार, स्थिती (ध्रौव्या) शिवाय असत नाही व स्थिती, सर्ग आणि संहार यांच्याशिवाय असत नाही. अधिक काय सांगावे ? जो सर्ग आहे, तोच संहार आहे; जो संहार आहे तोच सर्ग आहे; जे सर्ग व संहार आहेत, तीच स्थिती आहे आणि तेच सर्ग व संहार आहे.

आता ह्याच बाबीचा विशेष खुलासा करतात – जो कुंभाचा सर्ग आहे, तोच मृत्तिकापिंडाचा संहार आहे; कारण भावाचे भावांतराच्या अभाव-स्वभावाने अवभासन आहे. तात्पर्य हे आहे की भाव अन्य भावाच्या अभावरूपच असतो.

जो मृत्तिकापिंडाचा संहार आहे, तो कुंभाचा सर्ग आहे; कारण

अभावाचे भावांतराच्या भावस्वभावाने अवभासन आहे. तात्पर्य हे आहे की नाश अन्यभावाच्या उत्पादरूपच असतो.

जो कुंभाचा सर्ग आणि पिंडाचा संहार आहे, तीच मातीची स्थिती आहे; कारण व्यतिरेक अन्वयाचे अतिक्रमण करीत नाही. जी मातीची स्थिती आहे, तोच कुंभाचा सर्ग आहे आणि पिंडाचा संहार आहे; कारण व्यतिरेकांद्वारेच अन्वय प्रकाशित होतो.

जर असे मानले गेले नाही तर असे सिद्ध होईल की सर्ग वेगळा आहे, संहार वेगळा आहे आणि स्थिती वेगळी आहे. असे असल्याने फक्त सर्गशोधक कुंभाच्या उत्पादन कारणाचा अभाव असल्याने उत्पत्तीच होणार नाही किंवा असत्चा उत्पाद होईल.

जर कुंभाची उत्पत्ती झाली नाही तर समस्त भावांची उत्पत्ती होणार नाही किंवा जर असत्चा उत्पाद झाला तर आकाशपुष्पाचाही उत्पाद होईल.

तात्पर्य हे आहे की ही बाब केवळ कुंभाचीच नाही तर कोणतेही कार्य संपन्न होणार नाही किंवा ज्याचे विश्वात अस्तित्वच नाही – अशा आकाशपुष्प व गाढवाच्या शिंगांचीही उत्पत्ती होऊ लागेल; कारण उत्पन्न होण्याचा किंवा न होण्याचा कोणता नियमच राहणार नाही.

जर माती फक्त स्थितीलाच धारण करेल तर मग व्यतिरेकांसह स्थितीचा अभाव असल्याने स्थितीच राहणार नाही किंवा क्षणिकाला देखील नित्यत्व येईल. तसेच जर मातीची स्थितीच नसेल तर मग सर्व भावांची स्थिती असणार नाही किंवा क्षणिक नित्य झाले तर मनातल्या क्षणिक भावांना देखील नित्यत्वाचा प्रसंग येईल; म्हणून द्रव्याला उत्तरोत्तर व्यतिरेकांचा सर्गाबरोबर, पूर्व-पूर्व व्यतिरेकांचा संहाराबरोबर आणि अन्वयाचे अवस्थान ध्रौव्याबरोबर अविनाभाववाला आणि अबाधित भिन्न त्रिलक्षणवाला अवश्य मानले पाहिजे.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये मातीच्या पिंडाचे व घड्याचे उदाहरण न देता मिथ्यात्वाच्या अभावाच्या आणि सम्यग्दर्शनाच्या प्राप्तीच्या उदाहरणाद्वारे या गाथेचा भाव स्पष्ट केला आहे.

कविवर वृंदावनदासजींनी प्रवचनसार परमागमामध्ये या गाथेचा

भाव सहा छंदाद्वारे प्रस्तुत केला आहे, ते छंद मुळातून पठनीय आहेत.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव केवळ एका दोह्याच्या माध्यमातून प्रस्तुत केला आहे –

(दोहा)

वय मझार उतपत्य है, उतपति सो वय मांहि।
वय उतपति दोउ सु पुनि सुथिर वस्तु विनु नांहि ॥१३॥

व्ययामध्ये उत्पत्ती आहे आणि उत्पत्तीमध्ये व्यय आहे. स्थितीने युक्त वस्तुशिवाय उत्पाद व व्यय दोन्हीही शक्य नाहीत.

आध्यात्मिकसत्पुरुष कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''९९ व्या गाथेमध्ये द्रव्य उत्पाद-व्यय-ध्रुववाले आहे – हे सिद्ध केले होते आणि या १०० व्या गाथेत अधिक स्पष्टपणे द्रव्याचे उत्पाद व्यय-ध्रुव हे एकाच वेळी आहेत – असे सांगितले आहे. जर उत्पाद-व्यय -ध्रुव एकाच वेळी होतात, असे मानले नाही तर वस्तुच सिद्ध होत नाही.[१]

ज्याने एका समयात वस्तुच्या उत्पाद-व्यय-ध्रुव स्वभावाला जाणले नाही, त्याच्या मान्यतेत काही ना काही दोष आल्याशिवाय रहात नाही.[२]

उत्पाद-व्यय-ध्रुव या तिघांना एकदम ते आहेत – असे मानले नाही तर सत्‌ची सिद्धी होत नाही. परकारणाने उत्पाद-व्यय-ध्रुवता मानली तर ते मिथ्या आहे व आपल्यातच उत्पाद-व्यय किंवा ध्रौव्याला एक-दुसऱ्याशिवाय मानले तर तोही वस्तुला जाणत नाही.[३]

विश्वातील चेतन व जड सर्व पदार्थात प्रत्येक समयाला त्यांच्या स्वभावानेच उत्पाद-व्यय-ध्रुव आहे. जर एखादा फक्त उत्पादालाच मानेल तर तो पदार्थांची नवीन उत्पत्तीच मानत आहे व जर एखादा फक्त व्ययालाच मानेल तर तो देखील पदार्थांचा नाशच मानत आहे – असे मानणारा जीव सर्वज्ञांना, गुरूंना, शास्त्राला किंवा ज्ञेयांच्या स्वभावाला मानत नाही व तो आपल्या ज्ञानस्वभावाने आत्म्यालाही मानत नाही.

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १८९
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १९४
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १९४

देव-शास्त्र-गुरू देखील अशीच वस्तुस्थिती सांगतात. ज्ञेयाचा स्वभावही असाच आहे व आत्म्याचा स्वभाव त्यांना (ज्ञेयांना) जाणण्याचा आहे – अशी ही जी वस्तुस्थिती आहे, ती समजण्याजोगी आहे.[१]

पुढील पर्यायाचा उत्पाद, मागच्या पर्यायाचा व्यय व अखंड संबंधाच्या अपेक्षेने ध्रौव्य – या तिघांबरोबर द्रव्य अविनाभावी आहे; असे द्रव्य अबाधितरूपाने उत्पाद-व्यय-ध्रुवरूप (त्रिलक्षणरूप) चिह्नवाले आहे.[२]

केवळ उत्पादच मानला तर जुन्या पर्यायाच्या व्ययाशिवाय नवीन पर्यायाची उत्पत्ती होणार नाही किंवा ध्रुवाच्या आधाराशिवाय असत्ची उत्पत्ती होणार नाही, म्हणून एका समयात उत्पाद-व्यय-ध्रुव हे तिन्ही एका वेळेस बरोबर असतील तरच उत्पाद होईल. जर फक्त व्ययच मानला गेला तर नवीन पर्यायाच्या उत्पादाशिवाय जुन्या पर्यायाचा व्ययच होणार नाही किंवा ध्रुवत्व असल्याशिवाय व्यय असेल तर सत्चाच नाश होईल; म्हणून एका समयात उत्पाद-व्यय-ध्रुव – हे तिन्ही एकाच वेळी असतील तरच व्यय सिद्ध होईल. उत्पाद-व्ययाशिवाय फक्त ध्रुवालाच मानले तर उत्पाद-व्ययरूप व्यतिरेकाशिवाय ध्रुवपणाच राहणार नाही किंवा एक अंश तेच संपूर्ण द्रव्य होऊन जाईल, म्हणून उत्पाद-व्यय-ध्रुव तिघेही एका समयामध्ये एकत्रच असतील तर ध्रुवपणा राहू शकेल.[३]

त्यामुळे द्रव्याला उत्पाद-व्यय-ध्रुवत्वयुक्त एका वेळेसच मानणे युक्तीसंगत आहे. सारांश हा आहे की पूर्व-पूर्व परिणामांच्या व्ययाबरोबर, नंतर-नंतरच्या परिणामांच्या उत्पादाबरोबर व अन्वयाच्या अपेक्षेने ध्रुवाबरोबर द्रव्याला अविनाभावी मानले पाहिजे. फक्त उत्पाद, फक्त व्यय किंवा फक्त ध्रुवत्व हे द्रव्याचे लक्षण नसून उत्पाद-व्यय व ध्रुवता हे तिन्ही एका वेळेस एकदम असणेच द्रव्याचे लक्षण आहे – असे जाणावे.[४]''

अशाप्रकारे या गाथेत हेच सांगितले आहे की सत् उत्पाद-व्यय व ध्रौव्यात्मकच असते; म्हणून हे तिन्ही प्रत्येक वस्तुमध्ये एका समयात एकत्रच असतात. ●

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १९५-१९६　२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १९७
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १९७-१९८　४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : १९८

प्रवचनसार गाथा १०१

मागील गाथांमध्ये हे म्हटले आहे की सत् उत्पाद-व्यय-ध्रौव्यात्मक आहे आणि ते सत्च द्रव्याचे लक्षण आहे. हे उत्पाद-व्यय आणि ध्रुव तिन्ही एका समयामध्ये एकाच द्रव्यामध्ये एकत्रच असतात आणि आता या गाथेमध्ये हे म्हटले जात आहे की हे सर्व एक द्रव्यच आहे.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

उप्पादट्ठिदिभंगा विज्जंते पज्जएसु पज्जाया।
दव्वे हि संति णियदं तम्हा दव्वं हवदि सव्वं ।।१०१।।

(हरिगीत)

पर्याय में उत्पाद-व्यय-ध्रुव द्रव्य में पर्यायें हैं।
बस इसलिए तो कहा है कि वे सभी इक द्रव्य हैं।।१०१।।

उत्पाद, व्यय व ध्रौव्य पर्यायांमध्ये असतात आणि पर्याय द्रव्यामध्ये असतात – असा नियम आहे, म्हणून हे सर्व द्रव्यच आहेत.

आचार्य अमृतचंद्र तत्त्वप्रदीपिकेत या गाथेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट करतात –

''उत्पाद-व्यय व ध्रौव्य पर्यायांच्या आश्रयाने आहेत व पर्याय द्रव्याच्या आश्रयाने आहेत, म्हणून हे सगळे द्रव्यच आहेत, द्रव्यांतर नव्हेत.

प्रथम तर पर्याय द्रव्याश्रित आहेत, कारण वृक्षासमान समुदायी समुदायस्वरूपच असतो. ज्याप्रमाणे समुदायी वृक्ष आहे; खोड, मूळ व फांद्या यांच्या समुदायरूप असल्याने खोड, मूळ आणि फांद्यांनी आलंबित दिसून येतात; अशाप्रकारे समुदायी द्रव्य, पर्यायांच्या समुदायस्वरूप असल्याने पर्यायांद्वारे अवलंबित आहे – असे भासित होते.

तात्पर्य हे आहे की जसे खोड, मूळ व फांद्या हे सर्व वृक्षाश्रितच आहेत; तसेच पर्याय द्रव्याश्रितच आहेत; द्रव्यापासून भिन्न पदार्थरूप नाहीत.

पर्याय उत्पाद-व्यय-ध्रौव्याद्वारे अवलंबित आहेत म्हणजेच उत्पाद-व्यय-ध्रौव्य पर्यायाश्रित आहेत; कारण उत्पाद-व्यय-ध्रौव्य बी, अंकुर आणि वृक्षत्व यांच्याप्रमाणे अंशाचे धर्म आहेत, अंशीचे नव्हे.

ज्याप्रमाणे अंशी अशा वृक्षाचे बी, अंकुर व वृक्षत्वरूप तीन अंश व्यय-उत्पाद-ध्रौव्यरूप निजधर्मांनी आलंबित एकदम एकत्रच भासित होतात; त्याप्रमाणे अंशी अशा द्रव्याचा नष्ट होत असलेला भाव, उत्पन्न होत असलेला भाव आणि अवस्थित रहात असणारा भाव – हे तिन्ही अंश व्यय-उत्पाद-ध्रौव्य स्वरूप निजधर्मांच्या द्वारे आलंबित एकदमच एका समयी दिसून येतात; परंतु जर भंग, उत्पाद व ध्रौव्याला ते द्रव्यानेच होतात – असे मानले तर सर्व काही प्रलयाला प्राप्त होऊन जाईल.

जर द्रव्याचाच भंग मानला तर क्षणभंगाने लक्षित समस्त द्रव्यांचा एका क्षणामध्येच संहार झाल्याने द्रव्यशून्यता होईल किंवा सत्‌चाच उच्छेद होईल.जर द्रव्याचाच उत्पाद मानला तर समया-समयाला होणाऱ्या उत्पादाद्वारे चिह्नित द्रव्यांना प्रत्येकाला अनंतता प्राप्त होईल.जर द्रव्याचेच ध्रौव्यत्व मानले तर क्रमश: होणाऱ्या भावाच्या अभावामुळे द्रव्याचा अभाव होईल किंवा क्षणिकपणा येईल. त्यामुळे हेच बरोबर आहे की उत्पाद, व्यय व ध्रौव्य पर्यायांच्या आश्रयानेच आहेत व पर्याय द्रव्याच्या आश्रयाने आहेत; म्हणून हे सर्व द्रव्यच आहे, द्रव्यांतर नव्हे.''

तत्त्वप्रदीपिका टीकेचा भाव भावार्थरूपाने खालीलप्रमाणे समजावला आहे –

''बीज, अंकुर आणि वृक्षत्व हे वृक्षाचे अंश आहेत. बीजाचा नाश, अंकुराचा उत्पाद व वृक्षत्वाचे ध्रौव्य – तिन्ही एका वेळेसच एकदम होतात. नाश बीजाच्या आश्रित आहे, उत्पाद अंकुराच्या आश्रित आहे व ध्रौव्य वृक्षत्वाच्या आश्रित आहे. नाश, उत्पाद व ध्रौव्य बीज, अंकुर व वृक्षत्व

यांच्यापासून भिन्न पदार्थरूप नाहीत, तसेच बीज, अंकुर व वृक्षत्वही वृक्षाहून भिन्न पदार्थरूप नाहीत; म्हणून हे सर्व एक वृक्षच आहेत.

अशाप्रकारे नष्ट होत असलेला भाव, उत्पन्न होत असलेला भाव व ध्रौव्य भाव हे सर्व द्रव्याचे अंश आहेत. नष्ट होत असलेल्या भावाचा नाश, उत्पन्न होत असलेल्या भावाचा उत्पाद व स्थायी भावाचे ध्रौव्य एका समयी एकदमच आहे. अशाप्रकारे नाश हा नष्ट होणाऱ्या भावाच्या आश्रित आहे, उत्पाद हा उत्पन्न होणाऱ्या भावाच्या आश्रित आहे व ध्रौव्य हे स्थायी भावाच्या आश्रित आहे.

नाश, उत्पाद आणि ध्रौव्य त्या भावांहून भिन्न असा पदार्थरूप नाही आणि ते भाव देखील द्रव्याहून भिन्न असे पदार्थरूप नाहीत, म्हणून हे सर्व एक द्रव्यच आहे.''

उत्पाद-व्यय व ध्रुवत्वाचे एकत्व आचार्य अमृतचंद्रांनी वरील टीकेत बीज, अंकुर व वृक्षत्वाच्या उदाहरणाने समजावले आहे, तर आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीत स्वसंवेदनाचा उत्पाद, अज्ञानपर्यायाचा व्यय व दोहोंच्या आधारभूत आत्मद्रव्याची स्थिती यावर घटित करून समजाविले आहे. शेवटी त्यांनी म्हटले की अन्वयद्रव्यार्थिकनयाने हे सर्व द्रव्य आहेत. अशातऱ्हेने नयाचा उल्लेखही त्यांनी नामोल्लेखपूर्वक केला आहे.

वरील गाथेचा भाव कविवर वृंदावनदासजींनी २ छंदामधून व्यक्त केला आहे, त्यापैकी दुसरा छंद पुढीलप्रमाणे आहे –

(मनहरण)

जैसे वृच्छ अंशी ताके अंश बीज अंकुरादि,
तामें तीनों भेद भाव ऐसे लखि लीजिए।
बीज को विनाश उतपाद होत अंकुर को,
वृच्छ धुवताई ऐसी सरधा धरीजिए॥
नूतन दरव को न होत उतपाद कहूँ,
यह तौ असंभौ कभी चित में न दीजिए।
दर्व की स्वभावरूप परजाय पर्नति में,
तीनों दशा होत वृन्द याही को पतीजिये॥

ज्याप्रमाणे अंशी अशा वृक्षाचे बीज, अंकुर हे अंश आहेत, त्यांच्यात तिन्ही भेदांना अशाप्रकारे पाहिले जाऊ शकते की बीजाचा नाश, अंकुराचा उत्पाद व वृक्षत्वाची ध्रुवता असते – असे श्रद्धान केले पाहिजे.

नव्या द्रव्याचा उत्पाद होत नाही, कारण ते अशक्य आहे; म्हणून या गोष्टीचा विचार मनात सुद्धा येता कामा नये. द्रव्याच्या पर्यायरूप परिणतीमध्येच या तिन्ही दशा असतात, म्हणून वृंदावनदासजी म्हणतात की या गोष्टीचीच श्रद्धा करा.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(कवित्त)

वय उत्पत्य ध्रौव्यता इन्हि कौ परजायनि के विषैं निवास।
परजायनि कौ सदा प्रवर्तन तथा अवस्य दर्व के पास॥
तिहि कारन उत्पाद आदि दै अरु परजाय एक ही रास।
सो सब ही सु दरव निश्चै करि भेद अवर दुसरौ न जास॥१४॥

उत्पाद, व्यय व ध्रौव्याचा निवास पर्यायीमध्ये आहे आणि पर्यायींचे निरंतर पलटणे द्रव्यात होते, त्यामुळे ह्या उत्पादादी पर्याय निश्चयाने द्रव्यच आहेत, यांच्यात दुसरे कोणतेही अंतर नाही.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे सादर केला आहे –

''ज्याप्रमाणे समुदायी वृक्ष; खोड, मुळं व फांद्या यांच्या समुदायस्वरूप असल्याने खोड, मुळं आणि फांद्या यांनी आलंबितच भासित होतो; त्याप्रमाणे समुदायी द्रव्य-पर्यायांच्या समुदायस्वरूप असल्याने पर्यायांद्वारे आलंबितच भासित होते. खोड, मुळं व फांद्या – हे तिन्ही वृक्षाचेच अंश आहेत व हे तिन्ही मिळून पूर्ण असा वृक्ष आहे; त्याप्रमाणे पर्याय वस्तु(द्रव्या)चे अंश आहेत, त्या पर्याय वस्तुच्या आश्रयानेच आहेत. वस्तुचे अंश वस्तुपासून वेगळे नाहीत.[१]

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २०२

उत्पाद-व्यय-ध्रुव तिघेही एकत्र आहेत – ही बाब १०० व्या गाथेत सिद्ध केली आहे. येथे १०१ व्या गाथेत सांगत आहेत की उत्पाद, व्यय व ध्रुव अंश (पर्याय) आहेत आणि त्या पर्याय (अंश) द्रव्याच्या आहेत. असे सांगून त्या तिघांना एका द्रव्यातच सामावून टाकले आहे.[१]

निव्वळ उत्पादात, व्ययात किंवा ध्रुवामध्ये पूर्ण द्रव्य सामावले जात नाही; म्हणून ते द्रव्याच्या आश्रयाने नसून पर्यायांच्या आश्रयाने आहेत – असे म्हटले आहे. उत्पाद हा धर्म एखाद्या पर्यायाच्या आश्रयाने आहे, व्ययधर्म हा सुद्धा एखाद्या पर्यायाच्या आश्रयाने आहे व ध्रौव्यरूपी धर्मही एखाद्या पर्यायाच्या आश्रयाने आहे; म्हणून त्यांना पर्यायाचा धर्म आहे – असे म्हटले आहे व पर्याय द्रव्याच्या आश्रयाने आहेत; अशाप्रकारे अभेदरूपाने द्रव्यात सगळे सामावले जातात.[२] वस्तुमध्ये उत्पादही अंशाचा आहे, व्यय देखील अंशाचा आहे व ध्रुवता सुद्धा अंशाची आहे. त्या एकेक अंशामध्ये पूर्ण वस्तुचा सामावेश होत नाही म्हणजेच द्रव्याची उत्पत्ती, द्रव्याचा नाश किंवा द्रव्याची ध्रुवता नाही.

ज्याप्रमाणे एका वृक्षामध्ये बीज, अंकुर व वृक्षत्व असे तीन अंश आहेत, त्यामध्ये बीजरूपी अंशाचा व्यय, अंकुररूपी अंशाचा उत्पाद आणि वृक्षत्व अंशाची ध्रुवता आहे, ते तिन्ही अंश मिळून वृक्षाचे अस्तित्व आहे; त्याप्रमाणे आत्मवस्तुमध्ये सम्यक्त्व अंशाचा उत्पाद, मिथ्यात्व अंशाचा व्यय आणि श्रद्धापणाची ध्रुवता आहे.

त्याप्रमाणे उत्पाद-व्यय आणि ध्रुव हे अंशाचेच आहेत, अंशीचे नाहीत. द्रव्याच्या अपेक्षेने उत्पाद नाही, परंतु द्रव्यामध्ये उत्पन्न होणाऱ्या भावाच्या अपेक्षेने उत्पाद आहे; द्रव्याच्या अपेक्षेने व्यय नाही, परंतु पूर्वीच्या नष्ट होणाऱ्या भावाच्या अपेक्षेने व्यय आहे आणि संपूर्ण द्रव्याच्या अपेक्षेने ध्रुवता नाही, परंतु द्रव्याच्या अखंड स्थायी भावाच्या अपेक्षेने (द्रव्यत्वाच्या अपेक्षेने) ध्रुवता आहे.

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २०३-२०४ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २०४

अशाप्रकारे उत्पाद, व्यय आणि ध्रुव हे प्रत्येक अंशाच्या आश्रित आहेत. ज्या समयी वस्तू नव्या भावाने उत्पन्न होते, त्याच समयी पूर्वीच्या भावाने व्ययाला प्राप्त होते व त्याच समयी द्रव्यरूपाने ध्रुव राहते. अशातऱ्हेने उत्पाद-व्यय-ध्रुव हे तिन्ही एकदमच अंशाच्या अवलंबनाने आहेत; परंतु अंशीचेच उत्पाद, व्यय किंवा ध्रुव नाहीत.

येथे ध्रुवाला देखील अंशाच्या अपेक्षेने पर्याय असे म्हटले आहे; परंतु त्यामध्ये द्रव्याचा सामान्य भाग आहे; परंतु फक्त त्या ध्रुवामध्येच संपूर्ण वस्तुचा सामावेश होत नाही, म्हणून त्याला देखील अंश म्हटले आहे आणि अंश असल्याने त्याला पर्याय असे म्हटले आहे. या अपेक्षेने ध्रुवता देखील पर्यायाश्रित म्हटली आहे.[१]

जर पूर्वीच्या अंशाचा व्यय न मानता द्रव्याचाच व्यय मानला तर संपूर्ण द्रव्य एका समयातच नष्ट होईल, म्हणजे सत्चाच नाश होईल.[२]

जर द्रव्याचा उत्पाद मानला तर क्षणिक एक समयाची पर्यायच द्रव्य होईल आणि प्रत्येक समयाला नवे-नवे द्रव्यच उत्पन्न होऊ लागेल. द्रव्याच्या अनंत पर्यायांमधून प्रत्येक पर्याय स्वतंत्र वेगवेगळे द्रव्य होईल, म्हणून एका द्रव्यालाच अनंत द्रव्यपणा प्राप्त होईल किंवा वस्तुशिवाय असत्चाच उत्पाद होऊ लागेल.[३]

जर संपूर्ण द्रव्यालाच ध्रुव मानले तर क्रमश: होणाऱ्या उत्पाद-व्यय भावांशिवाय द्रव्याचाच अभाव होईल किंवा द्रव्यालाच क्षणिकपणा प्राप्त होईल.[४]

उत्पाद, व्यय आणि ध्रुव – हे तिन्ही एका वेळेसच आहेत, परंतु ते अशांचे आहेत, द्रव्याचे नाहीत.[५]

या गाथेत आचार्यदेव हे सिद्ध करू पहात आहेत की उत्पाद, व्यय

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २०५-२०६ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २०६
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २०६-२०७ ४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २०७
५) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २०८

व ध्रुव हे सर्व द्रव्यापासून वेगळे असे पदार्थ नाहीत; परंतु द्रव्यामध्येच या सर्वांचा सामावेश होतो.

१) जर द्रव्याचाच उत्पाद मानला गेला तर व्यय आणि ध्रुव यांचा सामावेश द्रव्यात होणार नाही. २) जर द्रव्याचाच व्यय मानला गेला तर उत्पाद आणि ध्रुव यांचा सामावेश द्रव्यामध्ये होणार नाही. ३) जर द्रव्याचाच ध्रुवपणा मानला गेला तर उत्पाद आणि व्यय यांचा सामावेश द्रव्यामध्ये होणार नाही, म्हणून उत्पाद-व्यय-ध्रौव्य यांच्याद्वारे पर्याय आलंबित व्हावी, ज्यायोगे हे सर्व एकच द्रव्य व्हावे.[१]''

अशाप्रकारे या गाथेमध्ये हेच सांगितले आहे की उत्पाद-व्यय-ध्रौव्य पर्यायांचेच होतात, द्रव्याचे नव्हे; कारण द्रव्य तर अनादी-अनंत ध्रुव पदार्थ आहे; त्याचा उत्पाद किंवा नाश कसा शक्य आहे ? होय, ही बाब नक्की आहे की उत्पादादीच्या आधारभूत अशा पर्याय द्रव्याच्याच आहेत, म्हणून ते सर्व द्रव्यच आहे. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २०८-२०९

असफलतेसमान सफलता पचवू शकणे देखील प्रत्येकाच्या आटोक्यातील बाब नाही. असफलतेमुळे व्यक्ती किंवा समाज हताश, निराश, उदास होतो, उत्साह नाहिसा होतो; त्याचप्रमाणे सफलता सुद्धा संतुलन कायम राहू देत नाही. सफलता अहंकाराला दुजोरा देते, विजयाच्या प्रदर्शनाला प्रोत्साहित करते. कधी-कधी तर विपक्षाचा तिरस्कार करण्याकरिता सुद्धा प्रेरित करते.

परंतु सफलता-असफलतेच्या ह्या सर्व प्रतिक्रिया जनसामान्यावरच होतात, गंभीर व्यक्तित्वावाल्या महापुरुषांवर यांचा काहीही प्रभाव दिसून पडत नाही. ते दोन्ही परिस्थितित संतुलित व अडिग राहतात.

–सत्याचा शोध, पृष्ठ : २३३

प्रवचनसार गाथा १०२

१०० व्या गाथेमध्ये 'उत्पाद, व्ययाशिवाय होत नाही; व्यय, उत्पादाशिवाय होत नाही आणि उत्पाद व व्यय हे ध्रुवत्वाशिवाय होत नाहीत. अशाप्रकारे यांच्यामध्ये भावभेद नाही' – हे सांगितले होते. १०१ व्या गाथेमध्ये उत्पाद-व्यय-ध्रौव्य हे पर्यायामध्ये होतात व पर्याय द्रव्यामध्ये असतात; म्हणून ते सर्व द्रव्य आहेत, द्रव्यांतर नाहीत आणि आता या १०२ व्या गाथेत हे सांगितले जात आहे की उत्पाद, व्यय व ध्रौव्य हे एकाच समयात आहेत; त्यांच्यामध्ये कालभेद नाही.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

समवेदं खलु दव्वं संभवठिदिणाससण्णिदट्ठेहिं।
एक्कम्मि चेव समये तम्हा दव्वं खु तत्तिदयं ।।१०२।।

(हरिगीत)

उत्पाद-व्यय-थिति द्रव्य में समवेत हों प्रत्येक पल।
बस इसलिए तो कहा है इन तीनमय हैं द्रव्य सब ।।१०२।।

द्रव्य एकाच समयात उत्पाद, व्यय व स्थिती नावाच्या पदार्थामध्ये एकमेकच आहे, म्हणून हे तिन्ही द्रव्यच आहेत.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्र तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात –

"वस्तुचा जो जन्मक्षण आहे, तो जन्मापासूनच व्याप्त असल्याने स्थितीक्षण आणि नाशक्षण नाही; जो स्थितीक्षण आहे, तो उत्पाद आणि व्यय या दोहोंमध्ये मजबूतपणे स्थापित आहे, म्हणून जन्मक्षण आणि नाशक्षण नाही आणि जो नाशक्षण आहे, तो वस्तू उत्पन्न होऊन व स्थित राहून मग नाशाला प्राप्त होतो, म्हणून जन्मक्षण आणि स्थितीक्षण नाही.

अशाप्रकारे युक्तीसह विचार केला असता उत्पाद वगैरेमध्ये क्षणभेद आहे – ही बाब मनात उत्पन्न होते.

जर कोणी अशी शंका करेल तर त्याला सांगतात की उत्पादादीमध्ये

अशा प्रकारचा क्षणभेद तेव्हाच शक्य आहे की जेव्हा हे मानले जावे की द्रव्य स्वत:च उत्पन्न होते, स्वत:च नष्ट होते व स्वत:च स्थितीला प्राप्त होते; परंतु असे मानलेले नाही. वास्तविक तर असे मानले आहे की उत्पादादी पर्यायांचेच आहेत. अशा स्थितीत क्षणभेद कसा बरे असू शकेल ?

आता ही बाब सोदाहरण विस्तारपूर्वक समजावितात –

ज्याप्रमाणे कुंभार, दंड, चक्र आणि दोरी यांच्याद्वारे केल्या जाणाऱ्या संस्काराच्या उपस्थितीत जो रामपात्राचा (मातीचे एक पसरट तोंडाचे पात्र) जन्मक्षण असतो, तोच मातीच्या पिंडाचा नाशक्षण असतो आणि तोच त्या दोन्ही अवस्थांमध्ये राहणाऱ्या मातीपणाचा स्थितीक्षण असतो.

त्याचप्रमाणे अंतरंग आणि बहिरंग साधनांद्वारे केल्या जाणाऱ्या संस्काराच्या उपस्थितीमध्ये जो उत्तरपर्यायाचा जन्मक्षण असतो, तोच पूर्वपर्यायाचा नाशक्षण असतो आणि तोच दोन्ही अवस्थांमध्ये राहणाऱ्या द्रव्यत्वाचा स्थितीक्षण असतो.

जसे रामपात्र, मातीचा पिंड व मातीपणामध्ये उत्पाद, व्यय व ध्रौव्य वेगवेगळे रहात असून देखील त्रिस्वभावस्पर्शी अशा मातीत ते सर्व एकदम एका समयातच आढळून येतात; तसेच उत्तरपर्याय, पूर्वपर्याय व द्रव्यत्वामध्ये उत्पाद, व्यय आणि ध्रौव्य वेगवेगळे असूनही त्रिस्वभावस्पर्शी द्रव्यात ते तिन्ही एकदम एका समयालाच आढळतात.

ज्याप्रमाणे रामपात्र, मातीचा पिंड आणि मातीपणामध्ये राहणारे उत्पाद, व्यय आणि ध्रौव्य मातीच आहेत, अन्य वस्तू नाहीत; त्याप्रमाणे उत्तरपर्याय, पूर्वपर्याय व द्रव्यत्वामध्ये राहणारे उत्पाद, व्यय आणि ध्रौव्य द्रव्यच आहेत, अन्य पदार्थ नाही.''

आचार्य जयसेन तात्पर्यवृत्तीमध्ये या गाथेचा भाव स्पष्ट करताना 'उत्पाद-व्यय-ध्रुवत्वाचा काळ एक आहे' – हे समजाविण्याकरिता आत्मानुभूती पर्यायाचा उत्पाद, मिथ्यात्व परिणतीचा नाश, तसेच दोहोंच्या आधारभूत आत्मद्रव्यत्वाच्या अवस्थितीचे उदाहरण देतात. त्याचबरोबर वाकडे बोट, ऋजुगती, क्षीणकषायाच्या अंतिम समयी केवलज्ञानाची उत्पत्ती – उदाहरणांद्वारेही या विषयाला समजावितात.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेला ६ छंदामधून व्यक्त केले आहे, त्यातील काही दोहे खालीलप्रमाणे आहेत –

(दोहा)

यहाँ प्रश्न कोई करत उतपादादिक तीन।
जुदे-जुदे समयनि विषैं क्यों नहिं कहत प्रवीन॥
तीन काज एकै समै कैसे हो हैं सिद्ध।
समाधान याको करौ हे आचारज वृद्ध॥
उतपादादिक के पृथक-पृथक दरव जो होय।
तब तो तीनों समय में तीन संभवै सोय॥
जहाँ एक ही दरव है तहँ इक समय मँझार।
तीनों होते संभवत दरवदिष्टि के द्वार॥

येथे कोणी प्रश्न करतो की जर तुम्ही चतुर आहात तर जे तीन उत्पादादी आहेत, त्यांना एका समयातच का म्हणता, वेगवेगळ्या वेळेला आहेत – असे का म्हणत नाहीत ?

एकाच वेळी तीन कार्य कशी होऊ शकतात ? हे ज्ञानवृद्ध आचार्यदेव ! या गोष्टीचा खुलासा करावा.

आचार्यदेवांनी उत्तर दिले की जर हे उत्पादादी वेगवेगळ्या द्रव्याचे असतील तरच त्यांना वेगवेगळ्या वेळी होतात – असे म्हटले जाऊ शकते.

जेथे एक द्रव्यामध्ये तिघांना घटीत करावयाचे असेल तर द्रव्यदृष्टीने एका समयामध्येच तिघांचे असणे शक्य आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"द्रव्य एकाच समयात उत्पाद, स्थिती व नाश नावाच्या अर्थांबरोबर वास्तविक पाहता एकमेक आहे, म्हणून या तिघांचा समुदाय वास्तविक द्रव्यच आहे.[१]

बालक जन्मतो, काही वर्षे जगतो, म्हणजेच टिकतो व नंतर मृत्युला प्राप्त होतो अशाचत-हेने उत्पाद-व्यय-ध्रुव यांचा काळ वेगवेगळा आहे – असे अज्ञानी म्हणतो.[२]

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २१६ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २१७

वरील शंकेचे समाधान करताना अज्ञानीला म्हणतात की उत्पाद होतेवेळी जर पूर्ण द्रव्य उत्पन्न होत असेल, व्यय होतेवेळी पूर्ण द्रव्याचाच नाश होत असेल व ध्रुव असतेवेळी जर पूर्ण द्रव्य फक्त ध्रुवत्वच रहात असेल तर तुमचा तर्क उत्पाद, व्यय व ध्रुवत्वाच्या क्षणभेदाची गोष्ट खरी ठरते.[१]

जर संपूर्ण द्रव्य एका अंशामध्ये येत असेल तर अज्ञानीचे वरील म्हणणे योग्य आहे; परंतु असे नाही, कारण संपूर्ण द्रव्य दुसऱ्या उत्पादामध्ये किंवा नुसत्या व्ययामध्ये किंवा नुसत्या ध्रुवामध्ये येत नाही, परंतु तिन्ही एक होऊन एक द्रव्य आहे, त्यामुळे त्यांच्यात समयभेद नाही. अशातऱ्हेने आत्म्यातही सम्यग्दर्शनाची उत्पत्ती, मिथ्या-दर्शनाचा व्यय व आत्म्याचे ध्रुवत्व एकाच समयात आहे, त्यांच्यात समयभेद नाही. अशातऱ्हेने प्रत्येक आत्म्यात व परमाणुमध्ये उत्पाद-व्यय-ध्रुव एकाच समयात आहेत.[२]

जे उत्पादाचे लक्षण आहे, ते व्ययाचे किंवा ध्रुवाचे लक्षण नाही.

जे व्ययाचे लक्षण आहे, ते उत्पाद किंवा ध्रुवाचे लक्षण नाही.

जे ध्रुवाचे लक्षण आहे, ते उत्पाद किंवा व्ययाचे लक्षण नाही.

लक्षण वेगवेगळे आहेत, म्हणून लक्ष्यही वेगवेगळे आहेत. जर तिघांचे एकच लक्षण असेल तर तिन्ही एकच होतील, परंतु असे नाही. एक लक्षणवाल्याला दुसऱ्याच्या लक्षणाने ओळखणे हे उपचाराचे कथन आहे.[३]

यामधून दोन न्यायांची सिद्धी होते – १) उत्पाद-व्यय-ध्रुवत्वांचा क्षणभेद दूर केला, म्हणजे तिन्ही एकाच समयी आहेत.

२) तिन्ही एक होऊन एक द्रव्य आहेत, वेगळे द्रव्य नव्हेत.[४]''

पहा ! येथे प्रत्येक पर्यायाच्या जन्मक्षणाची चर्चा आहे. तात्पर्य हे की प्रत्येक पर्यायाच्या उत्पत्तीचा क्षण सुनिश्चित आहे. ज्या क्षणी जी पर्याय होणार आहे, त्या क्षणी तीच पर्याय होईल, इतर नव्हे. जन्मक्षणासमान व्ययक्षणही सुनिश्चित आहे. जेव्हा पर्यायाचा जन्मक्षण व व्ययक्षण सुनिश्चितच आहे तर आता काय बाकी उरते बरे ?

वरील कथनाने सहजपणेच क्रमबद्धपर्यायाची सिद्धी होते. ●

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २१८ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २१८-२१९
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २३१ ४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २३२

प्रवचनसार गाथा १०३

उत्पाद-व्यय-ध्रौव्यामध्ये कालभेद नाही – हे मागील गाथेत सांगितले होते आणि आता या गाथेमध्ये अनेक द्रव्यपर्यायींद्वारे द्रव्याचे उत्पाद-व्यय-ध्रौव्य सांगत जात आहेत.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

पाडुब्भवदि य अण्णो पज्जाओ पज्जओ वयदि अण्णो।
दव्वस्स तं पि दव्वं णेव पणट्ठं ण उप्पण्णं॥१०३॥

(हरिगीत)

उत्पन्न होती अन्य एवं नष्ट होती अन्य ही।
पर्याय किन्तु द्रव्य ना उत्पन्न हो ना नष्ट हो॥१०३॥

द्रव्याची अन्य पर्याय उत्पन्न होते आणि एखादी अन्य पर्याय नष्ट होते, तरी देखील द्रव्य न तर नष्ट होते आणि न उत्पन्न होते.

आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिकेत या गाथेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''ज्याप्रमाणे एक तीन अणुवाली त्रिअणुक समानजातीय अनेकद्रव्यपर्याय विनष्ट होते आणि दुसरी चार अणुवाली (चतुरणुक) समानजातीय अनेकद्रव्यपर्याय उत्पन्न होते; परंतु ते तीन किंवा चार पुद्गल परमाणू तर अविनष्ट आणि अनुत्पन्नच राहतात.

अशातऱ्हेने सर्व समानजातीय द्रव्यपर्याय विनष्ट होतात आणि उत्पन्न होतात; परंतु समानजातीय द्रव्य तर अविनष्ट आणि अनुत्पन्नच राहतात.

ज्याप्रमाणे एक मनुष्यत्वरूप असमानजातीय द्रव्यपर्याय विनष्ट होते आणि दुसरी देवत्वरूप असमानजातीय द्रव्यपर्याय उत्पन्न होते; परंतु ते जीव आणि पुद्गल तर अविनष्ट आणि अनुत्पन्नच राहतात.

अशाप्रकारे सर्व असमानजातीय द्रव्यपर्याय विनष्ट होतात व उत्पन्न होतात; परंतु असमानजातीय द्रव्य तर अविनष्ट व अनुत्पन्नच राहतात.

अशाप्रकारे आपल्या द्रव्यरूपाने ध्रुव आणि द्रव्यपर्यायांद्वारे उत्पाद-व्ययरूप द्रव्य उत्पाद-व्यय-ध्रौव्यरूपच आहे.''

आचार्य जयसेन तात्पयवृत्ती टीकेमध्ये या गाथेचा भाव स्पष्ट करताना मोक्ष-पर्यायाच्या उत्पादाचे, मोक्षमार्गरूप पर्यायाच्या व्ययाचे आणि शुद्ध द्रव्यार्थिकनयाच्या विषयभूत असलेल्या द्रव्याचे ध्रुव राहण्याचे उदाहरण देतात. त्याचबरोबर किंवा असे म्हणून आचार्य अमृतचंद्रांद्वारे प्रस्तुत केलेल्या उदाहरणाला देखील प्रस्तुत करतात.

आचार्य अमृतचंद्र समानजातीय व असमानजातीय द्रव्यपर्यायांवर घटीत करतात आणि आचार्य जयसेन द्रव्यपर्यायांबरोबर गुणपर्यायांवरही घटित करतात.

कविवर वृंदावनदासजींनी व पंडित देवीदासजींनी सहजतेने या गाथेचा भाव योग्य प्रकारे प्रस्तुत केला आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''येथे एखादा तर्क देतो की अगोदर दहा परमाणुंचा स्कंध होता, नंतर त्यामध्ये पाच परमाणू मिळाले, तर मग तो पंधरा परमाणुंचा स्कंध झाला, यावरून पर्यायामधून पर्याय झाली आहे. परंतु त्याचे हे म्हणणे खोटे आहे; कारण या परमाणुंच्या पूर्वीच्या स्कंधरूप अवस्थेचा व्यय झाला आहे, पाच परमाणू येऊन मिळाले असता या पंधरा परमाणुंच्या नव्या स्कंधरूप अवस्थेचा उत्पाद झाला आहे व या परमाणू द्रव्यामधून नवीन पर्याय झाली आहे; परंतु पूर्व पर्यायातून ती नवीन पर्याय झालेली नाही.[१]''

वरील संपूर्ण कथनाचा सारांश हा आहे की उत्पन्न होण्याची व नष्ट होण्याची क्रिया तर पर्यायात होते, द्रव्य तर नेहमी अनुत्पन्न व अविनष्टच राहते. दुसरी बाब ही आहे की पर्यायातून पर्यायाचा उत्पाद होत नाही; पर्यायाची उत्पत्ती तर द्रव्यामधूनच होते.

लक्षात असू द्यावे की या उदाहरणाद्वारे संपूर्ण चर्चा असमानजातीय द्रव्यपर्यायांचीच होत आहे, म्हणून सर्व बाबींना असमानजातीय द्रव्यपर्यायांवरच घटीत केले पाहिजे. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २३७

प्रवचनसार गाथा १०४

मागील गाथेमध्ये अनेकद्रव्यपर्यायां(द्रव्यपर्यायां)द्वारे द्रव्याचे उत्पाद-व्यय-ध्रौव्य सांगितले होते व या गाथेत एकद्रव्यपर्यायां (गुणपर्यायां)द्वारे द्रव्याचे उत्पाद-व्यय-ध्रौव्य सांगत आहेत.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

परिणमदि सयं दव्वं गुणदो य गुणंतरं सदविसिट्ठं।
तम्हा गुणपज्जाया भणिया पुण दव्वमेव त्ति।।१०४।।

(हरिगीत)

गुण से गुणान्तर परिणमें द्रव स्वयं सत्ता अपेक्षा।
इसलिए गुणपर्याय ही हैं द्रव्य जिनवर ने कहा।।१०४।।

सत्ता अपेक्षेने अविशिष्टरूप द्रव्य स्वत:च गुणापासून गुणांतररूप परिणमित होतो. तात्पर्य हे आहे की द्रव्य स्वत:च एका गुण-पर्यायामधून अन्य गुण-पर्यायरूप परिणमित होते आणि द्रव्याची सत्ताही गुण-पर्यायांच्या सत्तेबरोबर अभिन्नच राहते.

यामुळे गुण-पर्याय द्रव्यच आहे – असे सांगितले आहे.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्र तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये खालीलप्रमाणे स्पष्ट करतात –

''एक द्रव्यपर्याय गुणपर्याय आहेत; कारण गुणपर्यायांचा एक द्रव्यपणा आहे. त्यांचा एक द्रव्यपणा आंब्याप्रमाणे सिद्ध होतो; तो खालीलप्रमाणे आहे –

ज्याप्रमाणे आंबा स्वत:च हिरव्याहून पिवळेपणारूप परिणमित होत असताना अगोदर व नंतर हिरवेपणा व पिवळेपणा यांच्याद्वारे स्वसत्तेचा अनुभव करतो; यामुळे हिरवेपणा आणि पिवळेपणा यांच्याबरोबर अभिन्न सत्तावाली असल्याने एक वस्तुच आहे, अन्य वस्तू नाही.

अशाप्रकारे द्रव्य स्वत:च पूर्वीच्या अवस्थेत स्थित असलेल्या गुणांपासून उत्तर अवस्थेत स्थित गुणरूप परिणमित होताना पूर्वीच्या व नंतरच्या अवस्थेत स्थित त्या गुणांद्वारे आपल्या सत्तेचा अनुभव करतो.

म्हणून पूर्वीच्या व नंतरच्या अवस्थेत स्थित असलेल्या गुणांबरोबर अभिन्न सत्तावाले असल्याने एकच द्रव्य आहे, द्रव्यांतर नाही.

ज्याप्रमाणे पिवळेपणाने उत्पन्न होत असल्याने, हिरवेपणाने नष्ट होत असल्याने व आंबारूप स्थिर रहात असल्याने आंबा एक वस्तुच्या पर्यायांद्वारे उत्पाद-व्यय-ध्रौव्य आहे. त्याप्रमाणे नंतरच्या अवस्थेत स्थित असलेल्या गुणाने उत्पन्न, पूर्वीच्या अवस्थेमध्ये स्थित, गुणाने नष्ट व द्रव्यत्व गुणाने स्थित असल्याने द्रव्य एकद्रव्यपर्यायाने उत्पाद-व्यय-ध्रौव्य असे आहे.''

हे तर अगोदरच स्पष्ट केलेले आहे की अनेक द्रव्यांच्या मिसळलेल्या पर्यायांना द्रव्यपर्याय किंवा व्यंजनपर्याय असे म्हणतात आणि एका द्रव्याच्या पर्यायांना गुणपर्याय किंवा अर्थपर्याय असे म्हणतात.

या गाथेचा भाव आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये तत्त्वप्रदीपिकेप्रमाणेच स्पष्ट केला आहे; परंतु त्याबरोबरच रंगाच्या उदाहरणाबरोबर संसारी जीवांच्या विभाव-गुणपर्यायांवर घटीत केले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेतील भाव प्रस्तुत करताना गाथा व टीकेच्या विषयवस्तुला अगदी सहजतेने सादर केले आहे.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव अत्यंत सोप्या भाषेत पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(दोहा)

जैसें फल इक आम कौ हरित लखै सब कोइ।
समै पाइ करि सो कछु पीत वरन पुनि होइ॥१९॥
पूरव उत्तर आम के विषैं अवस्था दोइ।
तिन्हि करिकैं वह आम पुनि और वस्तु नहिं होई॥२०॥
पीतता सु करि उपजही विनसै हरित सुभाय।
आम दसा करि थिर लियैं दरव सुगुन परजाय॥२१॥

ज्याप्रमाणे आंब्याला प्रारंभित अवस्थेत सर्व जण हिरव्या रूपातच पाहतात, तोच आंबा काही काळानंतर पिवळा होतो. आंब्यामध्ये पूर्वावस्था व उत्तरावस्था – अशा दोन अवस्था होतात, त्यांच्यामुळे आंबा अन्य वस्तू होत नाही. एक आंबा पिवळेपणाने उत्पन्न होतो,

हिरव्यापणाने नष्ट होतो आणि आंबा रूपे स्थिर राहतो. तसेच द्रव्याला गुण-पर्यायांनी जाणले पाहिजे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेतील भाव खालीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

''गुणपर्याय ह्या एकद्रव्यपर्याय आहेत; कारण गुणपर्यायांना एकद्रव्यपणा आहे. दर्शन, ज्ञान, चारित्र वगैरे अनेक गुणांच्या पर्याय आहेत; म्हणून द्रव्य पृथक-पृथक आहे – असे नाही. परमाणुची लाल, हिरवी वगैरे वेगवेगळी वर्णवाली, तसेच वेगवेगळी रसवाली अवस्था होत असते, म्हणून परमाणू अनेक होतात – असे नाही; परंतु लाल, हिरवी वगैरे अवस्था पदार्थाचेच अंश आहेत; म्हणून ते अनेक द्रव्य बनत नाहीत.[१]

१०२ व्या गाथेत उत्पाद-व्यय-ध्रुव स्वतंत्र आहेत – हे सांगितले होते. १०३ व्या गाथेत समानजातीय किंवा असमानजातीय द्रव्यपर्याय असतात, त्या पूर्वीच्या पर्यायामुळे होत नसून द्रव्यातून येतात – असे म्हटले आहे.

गुणांचे परिणमन अनेकरूपे होऊनही द्रव्य एकपणेच राहते व ते परिणमन द्रव्याचीच अवस्था आहे – हे १०४ व्या गाथेत सांगणार आहेत.[२]

१०३ व्या गाथेत समानजातीय व असमानजातीय द्रव्यपर्यायांबरोबर द्रव्याच्या उत्पाद-व्यय-ध्रौव्याला सांगितले होते व स्कंधामधून स्कंधरूप अवस्था होत नाही – असे म्हटले. या गाथेत गुण-पर्यायांद्वारे उत्पाद-व्यय-ध्रौव्याला सांगितले आहे.[३]''

मागील गाथांमधून अनेकद्रव्यपर्याय अर्थात् मनुष्यादी पर्यायांबद्दल सांगितले होते व या गाथेत एकद्रव्यपर्याय अर्थात् मतिज्ञानादी गुणपर्यायांबद्दल सांगितले जात आहे.

येथे गुण-पर्यायांची चर्चा करताना ही बाब विशेष स्पष्ट केली आहे की प्रत्येक गुणपर्याय गुणांमधून उत्पन्न होते, पूर्वपर्यायीतून नव्हे. ●

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २४२-२४३ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २४३
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २४५

प्रवचनसार गाथा-१०५

मागील गाथांमधून एकद्रव्यपर्याय आणि अनेकद्रव्यपर्याय यांच्याद्वारे एका द्रव्यामध्ये उत्पाद-व्यय व ध्रौव्य सांगितले होते. आता या गाथेमध्ये हे सांगत आहेत की द्रव्य आणि सत्ता एकच आहे.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

ण हवदि जदि सद्दव्वं असद्धुव्वं हवदि तं कहं दव्वं।
हवदि पुणो अण्णं वा तम्हा दव्वं सयं सत्ता॥१०५॥

(हरिगीत)

यदि द्रव्य न हो स्वयं सत् तो असत् होगा नियम से।
किम होय सत्ता से पृथक् जब द्रव्य सत्ता है स्वयं॥१०५॥

जर द्रव्य स्वरूपानेच सत् असणार नाही तर नियमाने ते असत् असेल आणि जे असत् आहे ते द्रव्य कसे बरे होऊ शकते ? सत्तेहून द्रव्यांचे भिन्न असणे शक्य नाही, म्हणून द्रव्य स्वत: सत्ताच आहे.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"जर द्रव्य स्वरूपानेच सत् असणार नाही तर दुसरी शक्यता ही असेल की ते द्रव्य एक तर असत् असेल किंवा सत्तेपासून पृथक् असेल ?

जर ते असत् असेल तर ध्रौव्य असण्याची शक्यता नसल्याने ते स्वत: स्थिर नसल्याने द्रव्याचाच नाश होईल.

दुसरे असे की जर द्रव्य सत्तेपासून वेगळे असेल तर सत्तेशिवाय स्वत: रहात असल्याने; एवढेच ज्याचे प्रयोजन आहे, अशा सत्तेचाच नाश करेल.

परंतु जर द्रव्य स्वरूपानेच सत् असेल तर ध्रौव्याच्या सद्भावामुळे स्वत: स्थिर राहून द्रव्य सिद्ध होते व सत्तेपासून अपृथक् राहून स्वत: स्थिर रहात असल्याने, एवढेच ज्याचे प्रयोजन आहे – अशा सत्तेलाच सिद्ध करते.

म्हणून द्रव्य स्वत:च सत्ता आहे, सत्तास्वरूप आहे – असे स्वीकार करावे; कारण भाव व भाववान यांचे अपृथकत्वाद्वारे अनन्यत्व आहे.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेत या गाथेचा भाव स्पष्ट करताना वरील संदर्भात बौद्ध व नैयायिक मतांना प्रस्तुत करून त्यांचे निराकरणही केले आहे. ते म्हणतात की सत्तेच्या समवायामुळे द्रव्य सत् नाही; परंतु सत्ता स्वत:च द्रव्य आहे. ते हे सुद्धा म्हणतात की द्रव्य उपचाराने सत्तास्वरूप नाही, परंतु परमार्थाने सत्तास्वरूप आहे.

ध्यान ठेवावे की नैयायिक असे मानतात की द्रव्य सत्तेच्या समवायामुळे सत् आहे, स्वत: द्रव्य सत् नाही व बौद्ध मानतात की द्रव्याचे अस्तित्व उपचाराने आहे, परमार्थाने नाही. द्रव्य स्वत: सत्तास्वरूप आहे व द्रव्याचे अस्तित्व वास्तविक आहे, परमार्थ आहे, उपचाराने नव्हे – येथे असे कथन करून नैयायिक व बौद्ध – दोन्ही मतांचे खंडन केले आहे.

वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव खालीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(छप्पय)

जो यह दरव न होय आपु सत्ता को धारक।
तौ तामें ध्रुवभाव कहा आवै थितिकारक॥
जो ध्रुवता नहिं धरै कहो तब दरब होय किमि।
तातैं सत्तारूप दरब स्वयमेव आपु इमि॥
है दरव गुनी सत्ता सुगुन सदा एकता भाव धरि।
परदेशभेद इनमें नहीं यों भवि वृन्द प्रतीत करि॥

जर हे द्रव्य स्वत:च सत्ताधारक नसेल तर त्यामध्ये स्थिती करणारा ध्रुवभाव कसा होऊ शकेल ? जर द्रव्य ध्रुवतेला धारण करणार नाही तर ते द्रव्य तरी कसे असेल ? म्हणून द्रव्य स्वयमेव सत्तास्वरूप आहे.

अहो ! द्रव्य गुणी आहे आणि सत्ता गुण आहे व हे दोन्ही सदैव एक भावरूपच आहेत; यांच्यामध्ये प्रदेशभेद नाही. वृंदावन कवी सांगतात की हे भव्य जीवांनो ! या गोष्टीवर विश्वास ठेवा.

पंडित देवीदासजींनी या गाथेला पुढीलप्रमाणे सादर केले आहे –

(सवैया इकतीसा)

जौ न होहि दर्व सत्तारूप तौ सु सत्तारूप
दर्व ताहि भयौ सो असत्तारूप चहिए।
सत्ता विना वस्तु है सु कैसैं दर्व रूप होहि
अथवा सु वस्तु सत्ता तैं सु भिन्न लहिये॥
ताथैं दर्व आप ही अभेद एक सत्ता रूप
जानि जिन उकति प्रमान सरदहिये।
द्रव्य है सु गुनी जाकौ गुन है स्वरूप सत्ता
गुन गुनी भेद न प्रदेस भेद कहिये॥२२॥

जर द्रव्य सत्तास्वरूप नसेल तर त्या सत्तावाल्या द्रव्याला असत्तारूप व्हायला पाहिजे, परंतु सत्तेशिवाय कोणतीही वस्तू द्रव्यरूप कशी होऊ शकते ? किंवा वस्तुला सत्तेहून भिन्न मानावे लागेल. त्यामुळे ज्याप्रमाणे जिनेंद्र भगवंतांनी म्हटले आहे की द्रव्य स्वत:च एक अभेदरूप आहे – असेच श्रद्धान करावे. द्रव्य गुणी आहे आणि त्याचा गुण आहे सत्ता – अशाप्रकारे यांच्या जरी गुण-गुणी भेद आहे, तरी यांच्यात प्रदेशभेद नाही.

स्वामीजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"जर गुण-गुणीला मानले तर गुणीचा नाश होईल. म्हणून जेव्हापासून वस्तू (द्रव्य) आहे, तेव्हापासून सत्ता आहे. या जीवाला वा कोणत्याही पदार्थाला कोणीही उत्पन्न केलेले नाही, म्हणजेच एखाद्याच्या सत्तेमुळे आपली सत्ता नाही व कोणीही आपल्या सत्तेपासून स्वत: भिन्न नाही.

गुण व गुणीमध्ये नाव, संख्या व लक्षणभेद आहे, परंतु प्रदेशभेद नाही. आपल्या सत्तावान द्रव्यावर नजर स्थिर करण्याणेच धर्म होतो.

१) जर द्रव्य स्वत:च सत् नसेल तर ध्रुवत्वाचे असणे असंभव असल्याने द्रव्य स्वत:च नाशाला प्राप्त होते, वस्तू उरत (रहात) नाही.

२) जर द्रव्य आपल्या सत्ता गुणाहून भिन्न असेल तर सत्तागुणाचे प्रयोजनच रहात नाही, कारण सत्तेचे कार्य तर द्रव्याचे अस्तित्त्व राखणे आहे.

जर द्रव्य त्याच्या सत्ता गुणापासून भिन्न राहिले तर सत्तागुणाचे प्रयोजनच रहात नाही व त्यामुळे सत्ता गुणाच्या अभावाचा प्रसंग निर्माण होतो.[१]

प्रश्न : काय स्वप्नाची पर्याय देखील सत्तावाली असू शकते ?

उत्तर : होय, ती पर्याय देखील सत्तावालीच आहे. ज्ञानाच्या पर्यायात अस्तित्वाचा अभाव असत नाही. आपल्या ज्ञानपर्यायामध्ये रागपर्याय, तसेच अन्य पदार्थ जे स्वप्नामध्ये येतात, ते जाणण्यात येतात; म्हणून ती अस्तित्त्ववाली पर्याय आहे. स्वप्न हे काही भ्रम नाही, अवस्तू नाही; ते देखील एक वस्तू आहे. जीवाच्या क्षायोपशमिक ज्ञानाच्या त्या समयाची योग्यतारूप पर्याय आहे, तेव्हा तर तो स्वप्न पाहतो.

या गाथेमध्ये गुण-गुणी अभेद आहेत – असे सिद्ध केले आहे. द्रव्य आणि सत्ता यांचा प्रदेशभेद नाही – असे सांगितले आहे.[२]

येथे अस्तित्त्व गुणाबद्दल सांगितले आहे; परंतु सगळ्या गुणांच्या सत्तेपासून द्रव्य अभेद आहे – असे समजले पाहिजे.[३]

दुसऱ्याच्या सत्तेमुळे आपली सत्ता आहे – असे मानणारा सत्तागुण व सत्तावान असे द्रव्य यांना भिन्न-भिन्न मानतो.[४] भाव तसेच भाववान वेगळे नाहीत, शक्ती तसेच शक्तीवान वेगळे नाहीत, स्वभाव व स्वभाववान वेगळे नाहीत. यामुळे द्रव्य स्वत:च सत्ता आहे – असा निर्णय किंवा गुण-गुणी अभेद आहेत, त्यांच्यात वेगळेपणा नाही – असा निर्णय केला पाहिजे.[५]

ही गाथा व तिच्या टीकेमध्ये विविध तर्कांद्वारे हेच सिद्ध केले आहे की सत्ता व द्रव्य अभिन्नच आहेत, एकच आहेत.

जरी हे परम सत्य आहे की सत्ता गुण आहे, अस्तित्व नामक सामान्य गुण आहे व द्रव्य गुणी आहे; अशाप्रकारे जरी यांच्यामध्ये गुण-गुणी असा भेद आहे, लक्षणभेद आहे, तरी देखील प्रदेशभेद नाही.

जोपर्यंत प्रदेशभेद नसेल, तोपर्यंत गुण-गणी यांना भिन्न मानले जात नाही, अभिन्नच मानले जाते. ●

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २४७
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २४८
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २४८
४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २४९
५) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २४९

प्रवचनसार गाथा-१०६

मागील गाथांमध्ये हे सांगितले होते की सत्ता आणि द्रव्य अभिन्नच आहेत व आता या गाथेत हे सांगत आहेत की जरी सत्ता व द्रव्य यांच्यात पृथकता नाही; तरी देखील त्यांच्यामध्ये परस्पर अन्यपणा अवश्य आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

पविभत्तपदेसत्तं पुधत्तमिदि सासणं हि वीरस्स।
अण्णत्तमतब्भावो ण तब्भवं होदि कधमेगं॥१०६॥

(हरिगीत)

जिनवीर के उपदेश में पृथक्त्व भिन्नप्रदेशता।
अतद्भाव ही अन्यत्व है तो अतत् कैसे एक हों॥१०६॥

विभक्तप्रदेशत्व पृथकत्व आहे व अतद्भाव अन्यत्व आहे – असा भगवान महावीरांचा उपदेश आहे. जे तत्रूप नसेल तर त्याच्याशी अभिन्न कसे होऊ शकेल ?

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे –

"विभक्तप्रदेशत्व हे पृथकत्वाचे लक्षण आहे, म्हणून हे पृथकत्व तर सत्ता व द्रव्य यांच्यात शक्य नाही. कारण गुण व गुणी यांच्यात शुभ्रपणा व उपरण्याप्रमाणे विभक्तप्रदेशपणाचा अभाव असतो. तो असा आहे –

ज्याप्रमाणे शुभ्रपणा गुणाचे जे प्रदेश आहेत; तेच उपरणे या गुणीचेही आहेत; म्हणून त्यांच्यात प्रदेशभेद नाही. अशाप्रकारे सत्ता गुणाचे जे प्रदेश आहेत, तेच प्रदेश गुणी द्रव्याचेही आहेत, म्हणून त्यांच्यात प्रदेशभेद नाही.

असे असूनही सत्ता व द्रव्यात अन्यत्व आहे; कारण यांच्यात अन्यत्वाचे लक्षण घटीत होते. अतद्भाव अन्यत्वाचे लक्षण आहे. ते तर सत्ता व द्रव्य या दोहोंत आहेच; कारण गुण व गुणीमध्ये शुभ्रपणा व उपरणे यांच्याप्रमाणे तद्भावाचा अभाव असतो.

ते असे आहे की ज्याप्रमाणे एक चक्षुइंद्रियाच्या विषयामध्ये मोडणारा व दुसरे सर्व इंद्रियांना गोचर नसणारा जो शुभ्रपणा आहे, तो तर समस्त इंद्रियगोचर असणाऱ्या उपरणेरूपी गुणी नाही व जे समस्त इंद्रिय समूहाला गोचर असणारे उपरणे आहे, ते एका चक्षुइंद्रियाच्या विषयामध्ये मोडणारे आहे, तसेच इतर समस्त इंद्रियांच्या विषयामध्ये नसणाऱ्या शुभ्रपणारूपी गुण नाही, म्हणून त्यांच्यामध्ये तद्भावाचा अभाव आहे.

अशाप्रकारे एखाद्याच्या आश्रयाने राहणारी, स्वत: निर्गुण, एक गुणमय, विशेषण, विधायक आणि वृत्तिस्वरूप जी सत्ता (सत्ता गुण-अस्तित्व गुण) आहे; ते एखाद्याच्या आश्रयाने राहणारे, गुणवाले, अनेक गुणमय, विशेष्य, विधीयमान व वृत्तिमानस्वरूप द्रव्य नाही; तसेच एखाद्याच्या आश्रयाविना राहणारे, गुणवाले, अनेक गुणमय, विशेष्य, विधीयमान व वृत्तिमानस्वरूप जे द्रव्य आहे; ते एखाद्याच्या आश्रयाने राहणारी, निर्गुण, एक गुणमय, विशेषण, विधायक आणि वृत्तिस्वरूप सत्ता नाही; म्हणून त्यांच्या तद्भावाचा अभाव आहे.

असे असल्याने जरी सत्ता आणि द्रव्यामध्ये कथंचित अनर्थांतरत्व (अभिन्नता) आहे; तथापि त्यांचे सर्वथा एकत्व असावे – अशी शंका करता कामा नये; कारण तद्भाव एकत्वाचे लक्षण आहे. जे तद्भावरूप नाही, ते सर्वथा एक कसे बरे असू शकेल ? ते तर गुण-गुणी अशा भेदाने अनेकच आहेत."

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये तत्त्वप्रदीपिकेचेच अनुकरण केले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेच्या भावाला प्रस्तुत करण्याकरिता २ मनहरण, १ छप्पय व १ दोहा, अशाप्रकारे ४ छंदांचा प्रयोग केला आहे. त्यामध्ये त्यांनी गाथा आणि टीकेच्या भावाला उदाहरणासह प्रस्तुत केले आहे, ते मूळत: वाचण्याजोगे आहे.

पंडित देवीदासजींनी सुद्धा प्रवचनसारभाषाकवित्तमध्ये या गाथेचा भाव सादर करण्याकरिता ६ दोहे, २ चौपाई, १ कवित्त व १ सवैया –

असे १० पद्य लिहिले आहेत, ते सर्व मूळातून वाचण्यायोग्य आहेत. विस्तारभयाने त्यांना येथे देणे शक्य नाही.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"प्रदेश पृथक-पृथक असणे पृथकत्वाचे लक्षण आहे. आत्मा व शरीर यांचे प्रदेश एकदम पृथक आहेत, आत्मा व कर्मांचे प्रदेशही पृथक आहेत. शरीरातील एका परमाणुचा दुसऱ्या परमाणुशी प्रदेशभेद आहे, म्हणून एक आत्मा दुसऱ्या आत्म्याचे वा शरीरादीचे काहीही करू शकत नाही.[१]

गुण-गुणीमध्ये प्रदेशभेद नाही – असे बरोबर ज्ञान झाले अथवा निश्चयाने भान झाले तरीही जर अस्थिरतेचा राग असला तरी त्यामुळे काही धर्म नष्ट होत नाही. गुण-गुणीतील प्रदेशाची अभेदता समजल्याशिवाय नुसता शुभभाव केल्याने धर्म होत नाही.

अशातऱ्हेने सत्ता व द्रव्य यांच्यामध्ये प्रदेशभेद अपेक्षेने भेद नसताना देखील सत्ता गुण व द्रव्य यांच्यामध्ये अन्यत्व नाही; कारण सत्ता व द्रव्य यांच्यामध्ये अन्यत्वाच्या लक्षणाचा सद्भाव आहे.[२]

संपूर्ण वस्तू एका गुणात येत नाही; म्हणून वस्त्र आणि शुभ्रपणा यांच्यामध्ये एकत्व नाही, म्हणजेच वस्त्र व शुभ्रपणा यामध्ये अतद्भाव आहे. अशाप्रकारे सत्ता गुण आणि द्रव्याच्या स्वभावामध्ये फरक आहे.[३]

१) सत्ता द्रव्याश्रित आहे आणि द्रव्य निराश्रित आहे.

२) सत्ता निर्गुण आहे आणि द्रव्य गुणवाले आहे.

३) सत्ता एक गुणरूप आहे आणि द्रव्य अनंत गुणरूप आहे.

४) सत्ता विशेषण आहे आणि द्रव्य विशेष्य आहे.

५) सत्ता विधायक आहे आणि द्रव्य विधीयमान आहे.

६) सत्ता वृत्तिस्वरूप आहे आणि द्रव्य वृत्तिमान आहे.[४]

अशाप्रकारे एखाद्याच्या आश्रयाने राहणारी, निर्गुण, एकाच गुणाने बनलेली, विशेषण, विधायक आणि वृत्तिस्वरूप अशी जी सत्ता आहे;

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २५२-२५३ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २५३
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २५४ ४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २५४-२५५

ती कोणाच्या आश्रयाविनाच राहणारे, गुणवाले, अनेक गुणांनी बनलेले, विशेष्य, विधीयमान आणि वृत्तिमानस्वरूप असे द्रव्य नाही. वरील सहा लक्षणवाले द्रव्य ते वरील सहा लक्षणवाली सत्ता नाही.

येथे तर फक्त सत्ता या गुणाचा दृष्टांत दिला आहे. अशातऱ्हेने एक-एक गुण ते संपूर्ण द्रव्य नाही आणि द्रव्य ते गुण नाही. आत्मा ज्ञान नाही आणि ज्ञान आत्मा नाही. गुण द्रव्य नाही आणि द्रव्य गुण नाही; म्हणून त्यांच्यामध्ये तद्भावाचा अभाव आहे.[१]

यावरून हे नक्की होते की द्रव्य व अस्तित्व वगैरे गुणांमध्ये प्रदेशभेद नसून सुद्धा त्यांच्यामध्ये अन्यत्व आहे; कारण द्रव्य व गुणाचे प्रदेशभेद नसून देखील द्रव्य व गुणामध्ये संज्ञा, संख्या व लक्षण वगैरे भेद असल्याने द्रव्य कथंचित गुणरूप नाही आणि गुण कथंचित द्रव्यरूप नाही.[२]

अनेक प्रकारचे वैविध्यस्वरूप ज्ञान रागाचे कारण नाही, अनेक प्रकारच्या ज्ञेयांचा विविधपणा रागाचे कारण नाही. अनेक प्रकारच्या कर्माचा विविधपणाही कारण नाही. रागाचे कारण तर रागी जीवाच्या रागाची त्या समयाची योग्यताच आहे. शास्त्रात म्हटले आहे की परद्रव्यानुसारी बुद्धी हेच रागाचे कारण आहे, परद्रव्य रागाचे कारण नाही.

गुण-गुणी यांच्या भेदांचा अथवा द्रव्य-गुण-पर्यायांचा विचार करणे ही तर ज्ञानाची पर्याय आहे, यामुळे राग होत नाही, परंतु रागी जीवाला रागांश आहे, म्हणून राग होतो.

आत्म्यामध्ये जो गुण-गुणीचा भेद आहे, ते रागाचे कारण नाही. गुण-गुणी भेदरूप आहे – असे ज्ञान होणे हे देखील रागाचे कारण नाही. ज्याप्रमाणे द्रव्य-गुण-पर्याय रागाचे कारण नाही, त्याप्रमाणे द्रव्य-गुण-पर्यायाचे ज्ञान देखील रागाचे कारण नाही.[३]''

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २५६ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २५८
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २५९-२६०

अशाप्रकारे या गाथेत हेच सांगितले आहे की सत्ता व द्रव्यामध्ये पृथकतारूप भिन्नता नसून देखील अन्यतारूप भिन्नता विद्यमान आहे.

भिन्नपणा दोन प्रकारचा असतो. एक आहे तो पृथकतारूप भिन्नपणा व दुसरा अन्यतारूप भिन्नपणा. पृथकतेचा अर्थ दोन पदार्थ वेगवेगळे आहेत व अन्यता म्हणजे ज्यांची सत्ता तर एकच आहे, परंतु स्वभाव भिन्न-भिन्न आहेत. ज्यांची सत्ता वेगवेगळी असते, त्यांच्यात पृथकता असते व ज्यांची सत्ता एक असते, त्यांच्यात अन्यता असते.

द्रव्य व गुण यांच्यात तसेच द्रव्य व पर्याय यांच्यात अन्यता असते, पृथकता नव्हे. दोन द्रव्यात पृथकता असते, अन्यता नव्हे. एका द्रव्याच्या दोन पर्यायात अन्यता असते, पृथकता नाही. एका द्रव्याच्या दोन गुणात अन्यता असते, पृथकता नाही.

एकाच द्रव्य, गुण व पर्यायात भाव भिन्नताच असते; तसेच द्रव्य, क्षेत्र व काळ यांची अभिन्नता असते, तेथे अन्यता आहे. ज्ञानाचा जाणणेरूप भाव आहे व दर्शनाचा पाहणेरूप भाव आहे. अशातऱ्हेने भावभिन्नता असल्याने ज्ञान व दर्शनात अन्यता आहे.

मी देहापासून एवढ्यासाठी पृथक आहे की देह व आत्मा दोन्ही पृथक-पृथक द्रव्य आहेत. रागापासून आत्मा यामुळे अन्य आहे, कारण यामध्ये दोन द्रव्य नाहीत.

लक्षात ठेवण्यायोग्य बाब ही आहे की 'भिन्नता' या शब्दाचा वापर पृथकता व अन्यता दोन्हीसाठी नि:संकोच समानपणे केला जातो; म्हणून हे ध्यान देणे आवश्यक आहे की 'भिन्नता' या शब्दाचा अर्थ त्या-त्या वेळच्या प्रकरणानुसार केला जावा.

प्रश्न : उत्पादही सत् आहे, व्ययही सत् आहे व ध्रौव्य सुद्धा सत् आहे. तिन्ही जर सत् आहेत, तर तिन्हीत तीन सत् आहेत, दोन सत् आहेत की एक सत् आहे ?

उत्तर : अस्तित्व नावाचा जो गुण आहे, तो तिघात एकच आहे. उत्पाद, व्यय व ध्रौव्य या तिघात तीन सत् नाहीत, एकच सत् आहे.

सत् च्या अंशाला सुद्धा सत् म्हटले जाते; म्हणून उत्पाद देखील सत्

आहे, व्ययही सत् आहे व ध्रौव्य सुद्धा सत् आहे. जी सत्ता आहे, ती उत्पाद-व्यय व ध्रौव्य या तिघात व्याप्त आहे, तीच सत्ता द्रव्यात व्याप्त आहे.

आपण म्हणतो की ज्ञानाचे अस्तित्व आहे, दर्शनाचे अस्तित्व आहे; असे अनंत गुणांचे अस्तित्व आहे. ही अशी विचित्र बाब आहे की अनंतांचे अस्तित्व असूनही संपूर्ण अस्तित्व मिळून एकच अस्तित्व आहे.

गुरुदेवश्रींनी ४७ शक्तींना समजाविताना म्हटले आहे की सत्ता गुणाचे रूप सर्वात आहे, म्हणून ती सत्ता सर्वात आहे. सत्ता ही तर स्वत:च सत्तास्वरूप आहे, परंतु बाकीच्या सर्व गुणांमध्ये सत्तेचे रूप असल्याने तेही सत्तास्वरूप आहेत. ज्ञानाचे अस्तित्व आहे, चारित्राचे अस्तित्व आहे. त्यांच्यात अस्तित्व गुणाचे रूप असल्याने सर्व गुणांचे अस्तित्व आहे.

सर्व द्रव्यांमध्ये सत्ता नावाचा गुण वेगवेगळा आहे; परंतु आत्म्याच्या सर्व गुणांमध्ये सत्ता नावाचा एकच गुण आहे. आत्म्याच्या सर्व पर्यायांमध्ये एकच सत्ता गुण आहे.

स्वरूपअस्तित्व नावाची जी सत्ता आहे, ती एकच आहे. ती आपल्या संपूर्ण द्रव्य, गुण व पर्यायात व्याप्त असते; परंतु सादृश्यास्तित्वरूप जी महासत्ता आहे ती सर्व द्रव्यात व्याप्त आहे. ती एक नाही, अनेक आहे. आचार्यांनी जातीच्या अपेक्षेने तिला एक म्हटले आहे.

एका द्रव्याच्या दोन गुणात अतद्भाव असतो; परंतु दोन द्रव्यात अतद्भाव नसतो, अत्यंताभाव असतो. ज्यामध्ये द्रव्य-क्षेत्र-काळ व भावरूप चतुष्टय वेगवेगळे असतील, त्याला अत्यंताभाव म्हणतात.

एका द्रव्याच्या पर्यायांमध्ये परस्पर अतद्भाव असतो आणि गुणांमध्ये देखील परस्पर अतद्भाव असतो. द्रव्य आणि गुण यांच्यामध्ये परस्पर अतद्भाव असतो, तसेच गुण व पर्याय यांच्यामध्ये परस्पर अतद्भाव असतो. द्रव्य व पर्याय यांच्यात सुद्धा अतद्भाव असतो; परंतु दोन द्रव्यांमध्ये अत्यंताभाव असतो.

अशाप्रकारे हे नक्की झाले की एका द्रव्याच्या द्रव्य-गुण-पर्याय यांच्यात परस्पर अतद्भाव आहे व दोन द्रव्यात अत्यंताभाव आहे.●

प्रवचनसार गाथा १०७

मागील गाथेत प्रदेशभेदवाल्या पृथकत्वाचे व अतद्भाववाल्या अन्यत्वाचे स्वरूप स्पष्ट केले; आता या १०७ व्या गाथेत अतद्भावाला विस्ताराने उदाहरणासहित स्पष्ट करतात. गाथा पुढीलप्रमाणे आहे –

सद्दव्वं सच्च गुणो सच्चेच य पज्जओ त्ति वित्थारो।
जो खलु तस्स अभावो सो तदभावो अतब्भावो॥१०७॥

(हरिगीत)

सत् द्रव्य सत् गुण और सत् पर्याय सत् विस्तार है।
तदरूपता का अभाव ही तद्-अभाव अर अतद्भाव है॥१०७॥

सत् द्रव्य, सत् गुण आणि सत् पर्याय – अशाप्रकारे सत्ता गुणाचा विस्तार आहे. यांच्यामध्ये जो त्याचा अभाव आहे म्हणजेच तो रूप होण्याचा अभाव आहे, तो तद्-अभाव आहे म्हणजेच अतद्भाव आहे.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिकेत पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''ज्याप्रमाणे एक मोत्याची माळ हाररूपे, दोरारूपे आणि मोतीरूपाने – अशातऱ्हेने तीन प्रकारे विस्तारित केली जाते; त्याचप्रमाणे एका द्रव्याचा सत्ता गुण सत् द्रव्य, सत् गुण व सत् पर्याय – अशाप्रकारे तीन तऱ्हेने विस्तारित केला जातो.

ज्याप्रमाणे मोत्यांच्या माळेचा पांढरा गुण; पांढरा हार, पांढरा दोरा व पांढरे मोतींच्या रूपात तीन प्रकारे विस्तारित केला जातो; त्याचप्रमाणे एका द्रव्याचा सत्ता गुण; सत् द्रव्य, सत् गुण आणि सत् पर्याय – असे तीन प्रकारे विस्तारित केला जातो.

ज्याप्रमाणे एका मोत्याच्या माळेमध्ये जो पांढरा गुण आहे; तो हार नाही, दोरा नाही, मोती नाही आणि जो हार आहे, तो दोरा, मोती किंवा पांढरा गुण नाही – अशाप्रकारे एकमेकांमध्ये जो त्याचा अभाव

म्हणजेच तो रूप होण्याचा अभाव आहे, तो तद्-अभाव लक्षणस्वरूप अतद्भाव आहे; जे अन्यत्वाचे कारण आहे.

त्याप्रमाणे एखाद्या द्रव्यात जो सत्ता गुण आहे, ते द्रव्य नाही, अन्य गुण नाही किंवा पर्याय नाही व जे द्रव्य, इतर गुण व पर्याय आहेत ते सत्ता गुण नाहीत – अशाप्रकारे एकमेकात जो तद्रूप होण्याचा अभाव तो तद्अभाव लक्षणस्वरूप अतद्भाव आहे; जे अन्यत्वाचे कारण आहे.''

आचार्य जयसेन तात्पर्यवृत्ती टीकेत अगोदर तर वरील उदाहरणाच्या माध्यमातूनच ही बाब स्पष्ट करतात; परंतु नंतर सिद्ध परमात्म्यांवर देखील सिद्ध करून दाखवितात.

कविवर वृंदावनदासजींनी वरील गाथेतील भाव खालीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(छप्पय)

सत्ता तीन प्रकार सहित विस्तार कहा है।
दरवसत्त गुनसत्त सत्त परजाय गहा है॥
जो तीनों के माहिं परस्पर भेद विराजै।
सोई है अन्यत्व भेद इमि जिन धुनि गाजे॥
है दरवसत्त गुन-परज-गत गुनसत एक सुधरम-रत।
परजायसत्त क्रम को धरै, यातैं भेद प्रमानियत॥

भगवंतांच्या दिव्यध्वनीत आले आहे की द्रव्य सत्, गुण सत् व पर्याय सत् – अशाप्रकारे सत्तेचा विस्तार तीन प्रकारे होतो व या तिन्हींत जो परस्पर भेद आहे, तो भेद अन्यत्व म्हटला जातो. गुण-पर्यायगत द्रव्य सत्, सर्व धर्मांमध्ये व्याप्त असलेला गुण सत् व क्रमभावी पर्यायांत व्याप्त पर्याय सत् अशा भेदांनी प्रमाणित केले पाहिजे.

(मनहरण)

जैसे एक मोतीमाल तामें तीन भांत सेत,
सेत हार सेत सूत सेतरूप मनिया।
तैसे एक दर्वमाहिं सत्ता तीन भांत सोहै,
दर्वसत्ता गुनसत्ता पर्जसत्ता भनिया॥

दरव की सत्ता है अनंत धर्म सर्वगत,
गुन की है एक ही धरमरूप गनिया।
परज की सत्ता क्रमधारी ऐसी भेदाभेद,
साधी मुनि वृन्द श्रुतसिंधु के मथनिया॥

आगमरूपी समुद्राचे मंथन करणाऱ्या मुनिराजांनी सत्ता व द्रव्य यांच्यातील कथंचित भेद व कथंचित अभेदाला अशाप्रकारे सिद्ध केले आहे की जसे एका मोत्याच्या माळेत पांढरा हार, पांढरा दोरा व पांढरे मणी – अशाप्रकारे तीन तऱ्हेचे सत् आढळतात; त्याप्रमाणे एका द्रव्यामध्ये द्रव्य सत्, गुण सत् आणि पर्याय सत् – अशाप्रकारे तीन तऱ्हेचे सत् सांगितले आहेत.

यामध्ये द्रव्य सत् अनंत धर्मांमध्ये व्याप्त असल्याने सर्वगत आहे. गुण सत् एकाच धर्मात असते व पर्याय सत् क्रमसर पर्याय असतात. अशाप्रकारे हा सत्ता गुण द्रव्याहून कथंचित भिन्न व कथंचित अभिन्न आहे.

पण्डित देवीदासजींनी देखील मोत्यांच्या माळेच्या उदाहरणाने वरील बाब समजाविली आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"एका आत्म्याची सत्ता दुसऱ्या आत्म्याच्या व इतर द्रव्यांच्या सत्तेहून वेगळी आहे, ती इतर कोणाबरोबर एकमेक होत नाही.

सत्ता गुणाचा तीन प्रकाराने विस्तार केला आहे. शक्तिवान, शक्ती व अंश तिन्ही एक होऊन सत् अखंड द्रव्य आहे; तरीही त्यांच्यात परस्पर अतद्भाव आहे. जे द्रव्य आहे, ते गुण किंवा पर्याय नाही; जो गुण आहे, तो द्रव्य किंवा पर्याय नाही आणि जी पर्याय आहे, ती द्रव्य किंवा गुण नाही.

त्यारूपाने होण्याचा अभावच अतद्भाव आहे.

अशातऱ्हेने वस्तुचा स्वभाव यथार्थपणे जाणणे हे सम्यग्ज्ञानाचे कारण आहे. अनंत द्रव्य, गुण व पर्याय यांचे ज्ञान करणे रागाचे कारण नाही.[१]

सम्यग्दृष्टी जीवांना अंतर अनुभवाच्या काळी गुण-गुणीमध्ये

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २६३

कथंचित भेद आहे – असे सम्यग्ज्ञान असते; परंतु गुण-गुणी हे सर्वथा एक आहेत – असे ज्ञान नसते. द्रव्यात अनेक ज्ञेय जाणण्यात येतात, या अनेकपणाचे ज्ञान रागाचे कारण नाही.[१]

जीवाने ज्ञानाने सर्व ज्ञेयांना जाणावे हा काही दोष नाही. ज्ञानाचा स्वभावच तर जाणणे आहे. एका अभेद आत्म्याला जाणले तर राग न व्हावा व अनेकांना जाणले तर राग व्हावा – असे वस्तुस्वरूपच नाही.[२]

प्रश्न : एवढे सगळे ज्ञान केले तर ज्ञानाला विश्रांती केव्हा मिळेल?

उत्तर : अरे ! आपल्या अमर्यादित ज्ञानस्वभावाला संकुचित करून ते अल्प करणे ही विश्रांती नव्हे. असा जीव तर आपल्या ज्ञानाला झाकतो. आत्म्याचा ज्ञानस्वभाव तर अखंडपणे स्वत:ला परिपूर्णतेने जाणणे आहे व तीन काळ व तिन्ही लोकातील पदार्थांना एकाच समयात जाणण्याचा आहे – अशा स्वभावाच्या सामर्थ्याचा महिमा यावयास हवा.

असा प्रचंड शक्तीवान ज्ञानस्वभाव आहे – अशी श्रद्धा करणेच दृष्टीची विश्रांती व परिपूर्ण स्वभावात अभेद होणे परिपूर्ण विश्रांती आहे.[३]

अशा ज्ञानाशिवाय खरे ध्यान होत नाही. आत्मा सामान्य द्रव्यरूप, ज्ञानादी गुणरूप व सिद्धत्व वगैरे पर्यायरूप, असा तीन प्रकारे विस्ताराने सांगितला आहे. अशाच तऱ्हेने सर्व द्रव्यांचे स्वरूप समजले पाहिजे.[४]

हा ज्ञेय अधिकार आहे; म्हणून स्वज्ञेय व परज्ञेय यांचा भेद करून यथार्थ ज्ञान करणे, हेच सम्यग्दर्शन व वीतरागतेचे कारण आहे – असे येथे सांगितले आहे.[५]''

अशाप्रकारे या गाथेत हेच सांगितले की प्रत्येक पदार्थाचे अस्तित्व म्हणजेच सत्ता गुण आपापल्यात आहे, त्याला आपण अवांतरसत्ता किंवा स्वरूपास्तित्व सुद्धा म्हणतो.

जसा रुपया हा भारतीय चलनाचा एकक आहे. पैशांचा जो भेद आहे तो रुपयामध्येच सामिल आहे; म्हणूनच ५० पैशांवर $\frac{१}{२}$ रुपया लिहिलेले असते. तसेच स्वरूपास्तित्व किंवा अवांतरसत्ता जैनदर्शनाचा एकक आहे.

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २६५
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २६६
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २६९
४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २७१
५) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २७३

द्रव्य-गुण-पर्याय असे जे भेद आहेत, ते यातच सामिल आहेत.

महासत्तेचे दुसरे नाव सादृश्यास्तित्व सुद्धा आहे. ते आपल्या नावानेच हे सुचविते की ही सत्ता सर्वांमधील समानतेच्या आधारावरच मानली आहे. तात्पर्य हे आहे की सर्व द्रव्यांचे अस्तित्व समानच आहे; त्यामुळे सर्व महासत्तेच्या अंतर्गतच येतात.

ही एकता उपचरित-असद्भूतव्यवहारनयाने आहे व स्वरूपास्तित्वाच्या अंतर्गत द्रव्य-गुण-पर्यायांचे जे भेद केले जातात, ते सर्व अनुपचरित-सद्भूतव्यवहारनयाच्या अंतर्गत येतात.

तात्पर्य हे आहे की सर्व द्रव्यांची एकता असद्भूत आहे, उपचरित आहे व एका द्रव्यात भेद करणे सद्भूत आहे, अनुपचरित आहे; म्हणून सादृश्यास्तित्वाच्या आधारे आपल्या सत्तेसमान इतर सर्वांच्या सत्तेचा स्वीकार करून आपले आपलेपण आपल्या स्वरूपास्तित्वात स्थापित करणेच योग्य आहे, उचित आहे.

प्रश्न : सर्व द्रव्यांची एकता उपचरित-असद्भूत आणि एका द्रव्यामध्ये भेद करणे अनुपचरित-सद्भूत का आहे, कसे आहे ?

उत्तर : सादृश्यास्तित्वाच्या आधारावरील विभिन्न द्रव्यांची एकता वास्तविक नाही, म्हणून असद्भूत आहे व ते सर्व द्रव्य एकक्षेत्रावगाही नसल्यामुळे त्यांच्या आपसात दूरचा संबंध असल्याने उपचरित आहेत.

एका वस्तुत असणारे द्रव्य, गुण, पर्यायाचे भेद वास्तविक आहेत, म्हणून सद्भूत आहेत व ते एकक्षेत्रावगाही असल्याने अनुपचरित आहेत.

वास्तविक बाब ही आहे की वेगवेगळ्या द्रव्यांमध्ये सदृशतेच्या आधारे जी एकता केली जाते, त्यांच्यात आपसात अत्यंताभाव असतो व एका वस्तुच्या द्रव्य, गुण, पर्यायांमध्ये अतद्भाव असतो. जेथे अत्यंताभाव असतो, तेथे असद्भूतव्यवहारनय लागू होतो व जेथे अतद्भाव असतो, तेथे सद्भूतव्यवहार लागू पडतो.

वरील संदर्भात विशेष माहितीकरिता लेखकाची अन्य कृती **'परमभावप्रकाशक नयचक्रा'**च्या व्यवहारनय : भेद-प्रभेद संबंधी प्रकरणाचा स्वाध्याय करावयास हवा. ●

प्रवचनसार गाथा १०८

मागील गाथेत अतद्भावाचे स्वरूप स्पष्ट केले आहे; आता या गाथेत हे सांगत आहेत की सर्वथा अभावाचे नाव अतद्भाव नाही.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

जं दव्वं तं ण गुणो जो वि गुणो सो ण तच्चमत्थादो।
एसो हि अतब्भावो णेव अभावो त्ति णिद्दिट्ठो ॥१०८॥

(हरिगीत)

द्रव्य वह गुण नहीं अर गुण द्रव्य ना अतद्भाव यह।
सर्वथा जो अभाव है वह नहीं अतद्भाव है॥१०८॥

स्वरूप अपेक्षेने जे द्रव्य आहे, ते गुण नाही व जो गुण आहे, तो द्रव्य नाही – हा अतद्भाव आहे, सर्वथा अभाव अतद्भाव नाही – असे जिनेंद्रदेवांनी सांगितले आहे.

या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''एका द्रव्यात जे द्रव्य आहे, ते गुण नाही आणि जो गुण आहे, तो द्रव्य नाही – अशाप्रकारे जे द्रव्याचे गुणरूपे अभवन (नसणे) किंवा गुणाचे द्रव्यरूपे अभवन आहे; तो अतद्भाव आहे; कारण एवढ्यानेच अन्यत्वरूप व्यवहार सिद्ध होतो.

'द्रव्याचा अभाव गुण आहे आणि गुणाचा अभाव द्रव्य आहे' – असा लक्षणवान अभाव अतद्भाव नाही; कारण जर असे असेल तर एका द्रव्याला अनेकत्व येईल, उभयशून्यता (दोहोंचा अभाव) होईल किंवा अपोहरूपता येईल.

आता हीच बाब विस्ताराने समजावितात –

चेतनद्रव्याचा अभाव अचेतनद्रव्य आहे व अचेतनद्रव्याचा अभाव चेतनद्रव्य आहे – अशाप्रकारचा अभाव तर भिन्न-भिन्न अनेक द्रव्यांमध्ये

आढळतो. यामुळे 'द्रव्याचा अभाव गुण व गुणाचा अभाव द्रव्य' जर असे मानले तर ज्याप्रमाणे भिन्न-भिन्न द्रव्यात अनेकत्व आहे, त्या प्रकारचे अनेकत्व द्रव्य व गुण यांच्यात सुद्धा येईल.

ज्याप्रमाणे सोन्याचा अभाव झाला असता सोनेपणाचा अभाव होतो व सोनेपणाचा अभाव झाला असता सोन्याचा अभाव होतो – अशाप्रकारची उभयशून्यता (दोहोंचा अभाव) येते; तसेच द्रव्याचा अभाव झाला असता गुणाचा अभाव व गुणाचा अभाव झाला असता द्रव्याचा अभाव होतो म्हणजे दोहोंचा अभाव होईल, उभयशून्यता येईल.

जसे पटाचा (वस्त्राचा) अभाव फक्त घट (घडा) आहे व घटाभाव फक्त पट आहे; अशाप्रकारे दोहोंची अपोहरूपता (केवळ नकारात्मकता) आहे. तसेच द्रव्याभाव फक्त गुण व गुणाभाव फक्त द्रव्य आहे – अशाप्रकारे यात सुद्धा अपोहरूपता येईल.

अशाप्रकारे द्रव्याचा अभाव गुण व गुणाचा अभाव द्रव्य असे मानले असता द्रव्य व गुण यांना अनेकत्व, उभयशून्यता व अपोहरूपाता (केवळ नकारात्मकता) यांचे प्रसंग उभे राहतील; म्हणून द्रव्य व गुण यांच्यात एकत्व, अशून्यत्व व अनपोहत्व यांना इच्छिणाऱ्यांनी अतद्भावाचे तेच लक्षण स्वीकारावे जे येथे सांगितले आहे."

आचार्य जयसेनांनी देखील या गाथेचा भाव अमृतचंद्रांच्या तत्त्वप्रदीपिकेसमानच स्पष्ट केला आहे.

कविवर वृंदावनदासजींनी २ मनहरण व १ दोहा – अशाप्रकारे ३ छंदांद्वारे या गाथेचा व टीकेचा भाव प्रस्तुत केला आहे, त्यापैकी एक दोहा पुढीलप्रमाणे आहे –

(दोहा)

दरव और गुन के विषैं है अन्यत्व विभेद।
जुदे दोउ नहिं सरवथा, श्रीगुरु करी निषेद॥

द्रव्य व गुण यांच्यात अन्यत्वाचाच भेद आहे, पृथकतेचा नाही. दोन्ही सर्वथा पृथक असावेत – याचा निषेध श्रीगुरूंनी कठोरतेने केला आहे.

पंडित देवीदासजींनी देखील दोन दोह्यांच्या माध्यमातून ही बाब पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे –

(दोहा)

जो है दरव सु गुन नहीं, गुन सु न दरव स्वरूप।
दरव सुगुन दोऊ सदा अपनैं अपनैं रूप ।।३४।।
यहु सु गुन गुनी भेद है दुधा सरवथा नांहि।
सम्यक दिष्टि जगैं सहज प्रगट होइ घट मांहि।।३५।।

जे द्रव्य आहे, ते गुण नाही आणि जो गुण आहे, तो द्रव्यरूप नाही. द्रव्य आणि गुण दोन्ही सदैव आपआपल्या रूपात राहतात.

हा गुण-गुणीरूप दोन प्रकारचा भेद सर्वथा नाही. जेव्हा दृष्टीमध्ये सम्यक्पणा येतो, तेव्हा हृदयामध्ये ही बाब सहजच प्रगट होते म्हणजेच सहजतेने समजून येते.

आध्यात्मिकसत्पुरुष कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''एका आत्म्याचा इतर आत्म्यांबरोबर तसेच शरीराबरोबर सर्वथा अभाव आहे; परंतु द्रव्याचा गुणाबरोबर, तसेच गुणाचा पर्यायाबरोबर आणि द्रव्याचा पर्यायाबरोबर एकमेकांचा सर्वथा अभाव नाही.[१]

आत्मा व जड (अजीव) दोन्ही वेगवेगळे पदार्थ आहेत. दोहोंत अभावस्वभावाची जाडजूड भिंत उभी ठाकली आहे – असा अभावस्वभाव द्रव्य व गुण यांच्यामध्ये नाही. आत्मा व शरीर यांच्यात जसा अभावस्वभाव आहे, तसा द्रव्य व गुण यांच्यात मानला तर त्यामध्ये खालील तीन दोष आढळून येतात – १) द्रव्य व गुण यांचा सर्वथा अनेकत्वाचा प्रसंग येईल. २) उभयशून्यतेचा प्रसंग येईल आणि ३) अपोहरूपतेचा प्रसंग येईल.[२]''

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २७६ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २७७

अशाप्रकारे या गाथेत सांगितले की द्रव्य व सत्ता गुणात परस्पर सर्वथा अभाव नाही, अतद्भाव आहे. ही बाब सिद्ध करताना टीकेत सांगितले आहे की जर द्रव्य व सत्ता गुण यांच्यात परस्पर सर्वथा अभाव मानाल तर तीन दोष उपस्थित होतील; ते खालीलप्रमाणे आहेत –

१) जसे दोन द्रव्यात परस्पर पृथकता आहे, अनेकत्व आहे; तशा प्रकारची पृथकता किंवा अनेकत्व द्रव्य व सत्ता गुणामध्ये देखील येईल.

२) द्रव्याच्या अभावामध्ये गुणाचा सद्भाव शक्य नाही व गुणाच्या अभावी द्रव्याचा सद्भाव शक्य नाही. अशाप्रकारे एकाचा अभाव झाला असता दोहोंचा अभाव होईल. तात्पर्य हे आहे की दोहोंची शून्यता (उभयशून्यता) येईल.

३) द्रव्य वा सत्ता गुणास जर परस्पर अभावरूप स्वीकारले तर अपोहता अर्थात सर्वथा पूर्ण अभावात्मकता उपस्थित होईल.

तात्पर्य हे आहे की द्रव्य व गुण केवळ अभावरूप (निगेटिव्ह)च राहतील, त्यांचे कोणतेही भावात्मक (पॉजिटिव्ह) स्वरूप राहणार नाही.

त्यामुळे हेच योग्य आहे की आपण द्रव्य व सत्ता गुणाला पृथक-पृथक मानू नये, परंतु वेगवेगळे तर मानावेच. अशाप्रकारे या दोहोंमध्ये कथंचित भिन्नता आणि कथंचित अभिन्नता सिद्ध होते. ●

या देहादी परपदार्थांहून भिन्न निज भगवान आत्म्यामध्ये आपलेपणा स्थापित होणेच एक अभूतपूर्व क्रांती आहे, धर्माची सुरूवात आहे, सम्यग्दर्शन आहे, सम्यग्ज्ञान आहे, सम्यक् चारित्र आहे, साक्षात मोक्षाचा मार्ग आहे, भगवान बनण्याचा, समस्त दुःखांना दूर करण्याचा व अतींद्रिय आनंदाला प्राप्त करण्याचा केवळ हाच उपाय आहे.

– आत्मा ही है शरण, पृष्ठ : ५१

प्रवचनसार गाथा १०९

मागील गाथेमध्ये हे सांगितले होते की सर्वथा अभाव म्हणजे अतद्भाव नव्हे; आता या गाथेमध्ये हे सांगत आहेत की सत्ता गुण व द्रव्य गुणी आहे. अशातऱ्हेने त्यांच्यामध्ये गुण-गुणी संबंध आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

जो खलु दव्वसहावो परिणामो सो गुणो सदविसिट्ठो।
सदवट्ठिदं सहावे दव्वं ति जिणोवदेसोयं ॥१०९॥

(हरिगीत)

परिणाम द्रव्य स्वभाव जो वह अपृथक् सत्ता से सदा।
स्वभाव में थित द्रव्य सत् जिनदेव का उपदेश यह ॥१०९॥

जो द्रव्याचा उत्पाद-व्यय-ध्रौव्यात्मक स्वभावभूत परिणाम आहे; तो परिणाम सत्तेपासून अभिन्न गुण आहे. स्वभावात स्थित असल्याने द्रव्य सत् आहे – असा जिनदेवांचा उपदेश आहे.

आचार्य अमृतचंद्रांनी या गाथेचा भाव आपल्या तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे –

''स्वभावात अवस्थित असल्याने द्रव्य सत् आहे – असे पूर्वी (९९ व्या गाथेत) सांगितले होते व तेथेच हे सुद्धा सांगितले होते की परिणाम हा द्रव्याचा स्वभाव आहे. आता येथे हे सिद्ध करीत आहेत की जो द्रव्याचा स्वभावभूत परिणाम आहे, तोच सत् पासून अभिन्न गुण आहे.

द्रव्याच्या स्वरूपाचे वृत्तिभूत अस्तित्व द्रव्यप्रधान कथनाद्वारे सत् शब्दाने सांगितले जाते; त्या अस्तित्वापासून अनन्य गुणच द्रव्यस्वभावभूत परिणाम आहे; कारण द्रव्याची वृत्ती तीन काळाच्या समयांना स्पर्श करणारी असल्याने दर समयाला त्या-त्या स्वभावरूपाने परिणमित होते.

अशाप्रकारे द्रव्याचा स्वभावभूत उत्पाद-व्यय-ध्रौव्यात्मक परिणाम द्रव्याचा अस्तित्वभूत वृत्तिरूप असल्याने सत्पासून अभिन्न द्रव्यविधायक गुणच आहे. अशाप्रकारे सत्ता व द्रव्यांचा गुण-गुणीपणा सिद्ध होतो.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेत या गाथेचा भाव स्पष्ट

करताना तत्त्वप्रदीपिकेचेच अनुकरण केले आहे, पण एक बाब अवश्य आहे की त्यांच्या शैलीनुसार त्यांनी सर्व विषयाला आत्मद्रव्यावर घटित करून समजाविले आहे व या गाथेतही असेच झाले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(मनहरण)

द्रव्य को सुभाव परिनाम जु है निश्चैकरि,
अस्तित स्वरूप सोई सत्ता नाम गुन है।
सर्व गुन में प्रधान फहरै निशान जाको,
उतपाद-वय-धुवसंजुत सुगुन है॥
ताही असतित्तरूप सत्ता में विराजै दर्व,
यातैं सत नाम द्रव्य पावत अपुन है।
ऐसे सत्ता गुन औ दरव गुनी एकताई,
साधी कुन्दकुन्द वृन्द वन्दत निपुन है॥

निश्चयाने द्रव्याचा स्वभावभूत परिणाम अस्तित्व आहे. ते अस्तित्वच सत्ता नावाचा गुण आहे. हा गुण इतर सर्व गुणांमध्ये प्रधान आहे आणि याची ध्वजा फडकतच राहते. हा गुण उत्पाद-व्यय-ध्रौव्यस्वरूप आहे. या अस्तित्वरूप सत्तेमध्येच द्रव्य विराजमान असते आणि म्हणूनच द्रव्याचे नाव सत् असे पडले आहे. आचार्य कुंदकुंदांनी अशा सत्ता गुणाची व गुणी-द्रव्याची एकता सिद्ध केली आहे. वृंदावन कवी सांगताहेत की मी त्या निपुण अशा कुंदकुंदाचार्यांना वंदन करतो.

पंडित देवीदासजींनी सुद्धा एका पद्यातून या गाथेचा भाव अशाच प्रकारे प्रस्तुत केला आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे सादर केला आहे –

"उत्पाद-व्यय-ध्रुवाचे परिणाम धारावाही निरंतर होतच असतात. जर ते परिणाम झाले नाहीत तर सत्ता राहणार नाही व जर सत्ता नसेल तर गुणी द्रव्यही राहणार नाही.[१]

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २८४

द्रव्याचे स्वरूप कायम राहण्याचे कारण अस्तित्व गुण आहे. या गुणाला द्रव्यप्रधान कथनाद्वारे सत् या शब्दाने म्हटले आहे. द्रव्याचा स्वभावभूत परिणाम अर्थात् उत्पाद-व्यय-ध्रुव त्या सत्हून भिन्न नाही व उत्पाद-व्यय-ध्रुव हे तिन्ही मिळून जो परिणाम झाला, तीच सत्ता आहे.[१]

उत्पाद-व्यय-ध्रुवरूप परिणामामध्ये द्रव्य स्थित आहे, असे म्हणा वा उत्पाद-व्यय-ध्रुव परिणाम जो की अस्तित्व गुण आहे, त्यामध्ये द्रव्य स्थित आहे – असे म्हणा, दोहोंचा अभिप्राय एकच आहे; कारण अस्तित्व गुण स्वत: उत्पाद-व्यय-ध्रुवपरिणामरूपच आहे; म्हणून उत्पाद-व्यय-ध्रुवरूप परिणाम सत् या शब्दाने म्हटला गेला आहे.[२]

प्रत्येक जड आणि आत्मा वेळोवेळी कशातऱ्हेने परिणमन करीत आहोत, त्या परिणामाला सांगून तो परिणाम स्वत:च सत्ता आहे व सत्ता द्रव्याहून भिन्न नाही – असे येथे सिद्ध करीत आहेत.[३]''

अशातऱ्हेने या गाथेत हेच सांगितले आहे की उत्पाद, व्यय व ध्रौव्य यांनी युक्त असा जो परिणाम आहे, तो सत् आहे व ते सत् द्रव्याचे लक्षण आहे. सत्चे दुसरे नाव अस्तित्व किंवा सत्ता आहे. सत्ता गुण आहे व द्रव्य गुणी आहे. अशाप्रकारे यांच्यामध्ये गुण-गुणी संबंध आहे.

पुढील गाथेमध्ये हे सांगतील की द्रव्याचे जे मूलभूत लक्षण आहे, तो सत्ता गुण अर्थात अस्तित्व आहे. तो गुण आणि द्रव्य अन्य-अन्य नाहीत, अनन्यच आहेत.

जर भेदनयाने पाहिले तर सत्ता गुण आहे व द्रव्य गुणी आहे. अशाप्रकारे यांच्यात गुण-गुणीचा भेद असल्याने दोन्ही भिन्न-भिन्न आहेत; परंतु अभेदनयाने पाहिले असता दोन्ही एकच आहेत.

अशाप्रकारे गुण व गुणी कथंचित भिन्न-भिन्न म्हणजेच अनेक आणि कथंचित अनन्य म्हणजेच एक आहेत. जिनधर्म स्याद्वादरूप आहे आणि स्याद्वादामध्ये हे सर्व सहज घटित होते. ●

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २८५
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २८५
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २८६

प्रवचनसार गाथा ११०

मागील गाथेमध्ये सत्ता आणि द्रव्य यांच्यात गुण-गुणीपणा सिद्ध केला आहे, आता या गाथेत हे सांगत आहेत की यांच्यात गुण-गुणी संबंध असून देखील गुण व गुणी दोन्ही एकच आहेत.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

णत्थि गुणो त्ति व कोई पज्जाओ त्तीह वा विणा दव्वं।
दव्वत्तं पुण भावो तम्हा दव्वं सयं सत्ता॥११०॥

(हरिगीत)

पर्याय या गुण द्रव्य के बिन कभी भी होते नहीं।
द्रव्य ही है भाव इससे द्रव्य सत्ता है स्वयं॥११०॥

या जगामध्ये द्रव्यापासून पृथक गुण किंवा पर्याय नसते. द्रव्यत्वच भाव आहे म्हणजेच अस्तित्व गुण आहे; म्हणून द्रव्य स्वत: सत्ताच आहे.

आचार्य अमृतचंद्र तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये या गाथेतील भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात –

"ज्याप्रमाणे पिवळेपणा व कुंडल वगैरे सोन्यापासून पृथक नाहीत; त्याप्रमाणे गुण व पर्याय द्रव्यापासून पृथक नसतात.

द्रव्याच्या स्वरूपाच्या वृत्तिभूत अस्तित्वाच्या नावाने ओळखले जाणारे द्रव्यत्व, द्रव्याचा भाव या नावाने म्हटला जाणारा गुण असल्याने काय ते अस्तित्व द्रव्यापासून पृथक असेल ? असणार नाही; तर मग द्रव्य स्वत:च सत्ता का बरे नसावे ? तात्पर्य हे आहे की द्रव्य स्वत: सत्तास्वरूप आहे."

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेत मुक्तात्मद्रव्याचे उदाहरण देऊन या गाथेच्या भावाला तत्त्वप्रदीपिकेप्रमाणेच स्पष्ट केले आहे.

या गाथेचा भाव वृंदावनदासजींनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(कुण्डलिया)

ऐसो गुन कोऊ नहीं दरव बिना जो होय।
बिना दरव परजाय हू जग में लखै न कोय॥
जग में लखै न कोय बहुरि दिढतर ऐसे सुन।
दरवहि का अस्तित्वभाव सोई सत्ता गुन॥
तिस कारन स्वयमेव दरव सत्ता ही है सो।
अनेकांत तैं सधत वृन्द निरदूषन ऐसो॥

जो द्रव्याशिवाय असू शकेल, असा कोणताही गुण असत नाही. त्याचप्रमाणे पर्याय देखील द्रव्याशिवाय आढळत नाही. आजपावेतो कोणतेही गुण-पर्यायरहित द्रव्य पाहिलेले नाही.

ही बाब दृढतेने ऐका की द्रव्याचा अस्तित्वभावच सत्ता गुण आहे. त्यामुळे द्रव्य स्वत: सत्तास्वरूप आहे. वृंदावन कवी सांगतात की हे सगळे अनेकांताने निर्दोष सिद्ध होते.

या गाथेचा भाव पंडित देवीदासजींनी अत्यंत स्पष्ट शब्दात खालीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(सवैया इकतीसा)

यह लोक मांहिं कोई और अैसौ गुन नांहि
तासौं द्रव्य सौं जुदागी करिकैं बताइये।
तैसैं ही सु अैसौ और पुनि परजाय नांहीं
दरव सौ जासौं भिन्न भिन्नता लगाइये॥
द्रव्य गुन परजाय तीन ही अभेद जाथैं
वस्तु आपु सत्ता के स्वरूप समुझाइये।
गुन पीततादि कुंडलादि परजाय जैसैं
कंचन स्वरूप तैं जुदे न कहूँ पाइये॥३७॥

ज्याप्रमाणे पीतादी गुण व कुंडलादी पर्यायींहून भिन्न कोणतेही सुवर्ण नाही, त्याप्रमाणे या लोकात असा कोणताही गुण नाही, ज्याला द्रव्याहून भिन्न केले जाऊ शकेल. तसेच अशी कोणतीही पर्याय नाही

की तिला द्रव्याहून वेगळे केले जाऊ शकेल. द्रव्य, गुण व पर्याय तिन्ही अभेद आहेत, म्हणून वस्तू स्वत: सत्तास्वरूप आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे –

''येथे द्रव्यत्व शब्दाचा अर्थ द्रव्यत्व नामक सामान्य गुणाच्या अर्थाने घ्यावयाचा नाही तर जे सत् आहे, ते द्रव्य आहे व जी सत्ता आहे, ते द्रव्यत्व आहे. द्रव्य व द्रव्यत्व म्हणजेच सत् आणि सत्ता भिन्न-भिन्न नाही.[१]

आत्मा व पुद्गल द्रव्य आपापल्या स्वभावात रहात आहेत, हा स्वभाव उत्पाद-व्यय-ध्रुवरूप परिणाम आहे, त्याला सत्तागुण म्हटले आहे.[२]

प्रत्येक आत्मा व जड पदार्थांची सत्ता वेगवेगळी आहे व प्रत्येक पदार्थाची सत्ता आपापल्यात आहे, आपले उत्पाद-व्यय-ध्रुव आपल्या परिणामांपासून वेगळे नाहीत आणि ते इतरांच्या उत्पाद-व्यय-ध्रुव परिणामांहून वेगळे आहेत – असे भेदज्ञान करणे सम्यग्ज्ञान आहे.[३]''

या गाथेमध्ये सोन्याचे उदाहरण देऊन हे समजाविले गेले आहे की सत्ता गुण आणि सत् द्रव्य हे अनन्यच आहेत; अन्य-अन्य नाहीत. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २८७ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २८८
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २८९

त्याग वाईट वस्तूचा केला जातो आणि दान चांगल्या वस्तुचे दिले जाते. हेच म्हटले जाते की क्रोध सोडा, मान सोडा, लोभ सोडा. असे कोणी म्हणत नाही की ज्ञान सोडा. जे दु:खस्वरूप आहेत, दु:खकर आहेत, आत्म्याचे अहित करणारे आहेत, ते मोह, राग, द्वेषरूप आस्रवभावच हेय आहेत, त्यागण्यायोग्य आहेत, त्यांचाच त्याग केला जातो. यांच्यासोबतच यांच्या आश्रयभूत म्हणजेच ज्यांच्या लक्षाने मोह-राग-द्वेष भाव होतो, असे पुत्रादी चेतन व धन-गृह इत्यादी अचेतन पदार्थांचाही त्याग होतो. परंतु मुख्य बाब मोह-राग-द्वेषाच्या त्यागाचीच आहे, कारण मोह-राग-द्वेषाच्या त्यागाने यांचा त्याग नियमाने होतो, परंतु यांचा त्याग केल्यावरही ही गॅरंटी नाही की मोह-राग-द्वेष सुटतीलच.

– धर्माचे दशलक्षण, पृष्ठ : १२२

प्रवचनसार गाथा १११

मागील गाथेमधून गुण-गुणीच्या अनेकत्वाचा निषेध करून एकता स्थापित केली होती आणि आता या गाथेमध्ये हे सांगत आहे की द्रव्याच्या सत्-उत्पाद व असत्-उत्पादामध्ये कोणताच विरोध नाही.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

एवंविहं सहावे दव्वं दव्वत्थपज्जयत्थेहिं।
सदसब्भावणिबद्धं पादुब्भावं सदा लभदि॥१११॥

(हरिगीत)

पूर्वोक्त द्रव्यस्वभाव में उत्पाद सत् नयद्रव्य से।
पर्यायनय से असत् का उत्पाद होता है सदा॥१११॥

असे द्रव्य द्रव्यार्थिक आणि पर्यायार्थिक नयांद्वारे स्वभावामध्ये सद्भावसंबद्ध आणि असद्भावसंबद्ध उत्पादाला सदैव प्राप्त करते.

सत्चाच अर्थ जी वस्तू पूर्वीपासूनच विद्यमान आहे, तिच्या उत्पादाला सत्-उत्पाद म्हणतात व जी वस्तू पूर्वीपासून विद्यमान नसेल, तिच्या उत्पादाला असत्-उत्पाद म्हणतात. द्रव्यार्थिक नयाने प्रत्येक वस्तुचा सत्-उत्पाद होतो व पर्यायार्थिक नयाने प्रत्येक वस्तुचा असत्-उत्पाद होतो.

कार्य तर एकच झाले आहे; त्यालाच द्रव्यार्थिकनयाने सत्-उत्पाद आणि पर्यायार्थिक नयाने असत्-उत्पाद असे म्हणतात.

या गाथेतील भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''निर्दोष लक्षणवाले, अनादिनिधन, पूर्वकथित असे हे द्रव्य आपल्या सत् स्वभावात उत्पन्न होते. द्रव्याचा हा उत्पाद द्रव्यार्थिकनयाने कथन करतेवेळी सद्भावसंबद्धच आहे व पर्यायार्थिकनयाने कथन करतेवेळी असद्भावसंबद्धच आहे.

आता हीच बाब खुलासेवार स्पष्ट करतात –

जेव्हा द्रव्यासंबंधी चर्चा होते, पर्यायांची नव्हे; तेव्हा उत्पत्ती-

विनाश रहित, युगपत प्रवर्तणारे, द्रव्याला उत्पन्न करणाऱ्या अन्वय शक्तींद्वारे; उत्पत्ती-विनाश लक्षणवाल्या, क्रमश: प्रवर्तणारे, पर्यायांचे उत्पादक त्या-त्या व्यतिरेक व्यक्तींना प्राप्त होणाऱ्या द्रव्याला सोन्याप्रमाणे सद्भावसंबद्धच उत्पाद आहे.

जेव्हा सोन्याची चर्चा होते; बाजूबंद वगैरे पर्यायांची नव्हे; तेव्हा सोन्याप्रमाणे जीवित, युगपद् प्रवर्तमान, सोन्याच्या उत्पादक अन्वयशक्तींद्वारे, बाजूबंद वगैरे पर्यायांप्रमाणे जीवित, क्रमश: प्रवर्तमान, बाजूबंद वगैरे पर्यायांची उत्पादक त्या-त्या व्यतिरेक व्यक्तींना प्राप्त होणाऱ्या सोन्याचा सद्भावसंबद्धच उत्पाद होतो.

जेव्हा पर्यायांबद्दल चर्चा होते, द्रव्याची नाही; तेव्हा उत्पत्ती-विनाशलक्षण, क्रमश: प्रवर्तमान, पर्यायांना उत्पन्न करणाऱ्या त्या-त्या व्यतिरेक पर्यायांद्वारे; उत्पत्ती-विनाशरहित, युगपत् प्रवर्तमान, द्रव्याच्या उत्पादक अन्वयशक्तींना प्राप्त होणाऱ्या द्रव्याला सोन्याप्रमाणे असद्भावसंबद्धच उत्पाद होतो.

ते अशाप्रकारे आहे की जेव्हा बाजूबंद वगैरे पर्याय म्हटल्या जातात, सोने नव्हे; तेव्हा बाजूबंद वगैरे पर्यायाप्रमाणे जीवित, क्रमश: प्रवर्तमान, बाजूबंद वगैरे पर्यायांच्या उत्पादक त्या-त्या व्यतिरेक व्यक्तींद्वारे; सोन्याप्रमाणे जीवित युगपत् प्रवर्तमान सोन्याच्या उत्पादक अन्वय शक्तीला प्राप्त असलेल्या सोन्याचा असद्भाववयुक्तच उत्पाद आहे.

आता पर्यायांच्या चर्चेच्या वेळी देखील असत् उत्पादामध्ये पर्यायांना उत्पन्न करणाऱ्या त्या-त्या व्यतिरेक व्यक्ती युगपत् प्रवृत्ती प्राप्त करून अन्वयशक्तीपणाला प्राप्त होऊन पर्यायांना द्रव्य करते.

ज्याप्रमाणे बाजूबंद वगैरे पर्यायांना उत्पन्न करणाऱ्या त्या-त्या व्यतिरेक व्यक्ती युगपत् प्रवृत्ती प्राप्त करून अन्वयशक्तीपणाला प्राप्त होऊन बाजूबंद वगैरे पर्यायांना सोने करते; त्याचप्रमाणे द्रव्याच्या चर्चेच्या वेळी देखील सत्-उत्पादामध्ये द्रव्याची उत्पादक अन्वयशक्ती क्रमप्रवृत्तीला प्राप्त करून त्या-त्या व्यतिरेक व्यक्तित्वाला प्राप्त होऊन, द्रव्याला पर्याय (पर्यायरूप) करतात.

ज्याप्रमाणे सोन्याच्या उत्पादक अन्वयशक्ती क्रमप्रवृत्ती प्राप्त करून त्या-त्या व्यतिरेक-व्यक्तित्वाला प्राप्त होऊन, सोन्याला बाजूबंद पर्यायरूप करतात, त्याचप्रमाणे द्रव्याच्या संदर्भातही समजावे.

म्हणून द्रव्यार्थिकनयाच्या कथनाने सत्-उत्पाद आहे व पर्यायार्थिक नयाच्या कथनाने असत्-उत्पाद आहे – ही बाब निर्दोष आहे.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये या गाथेचा भाव स्पष्ट करताना लिहिले की ज्यावेळी द्रव्यार्थिकनयाने पाहतो, तेव्हा हे स्पष्टच आहे की कड्यामध्ये जे सोने आहे, कंकणामध्ये देखील तेच सोने आहे, म्हणून सत्-उत्पाद म्हटला जातो आणि जेव्हा पर्यायार्थिकनयाने पाहतो, तेव्हा कंकण पर्याय जी आता उत्पन्न झाली आहे, ती अगोदर नव्हती; म्हणून हा असत्-उत्पाद आहे. या गोष्टी स्पष्ट करताना ते गृहत्याग व मुनिदीक्षेचे सुद्धा उदाहरण देतात.

सत्-उत्पाद व असत्-उत्पाद यांचे स्वरूप कविवर वृंदावन-दासजींनी असे स्पष्ट केले आहे –

(दोहा)

दो प्रकार उतपादजुत दरव रहत सब काल।
सत उतपाद प्रथम कह्यो दुतिय असत की चाल॥
दरव अनादि अनंत जो निज परजै के मांहि।
उपजत है सो दरवट्टग सद उतपाद कहाहिं॥
जो पूरव ही थो नहीं ताको जो उतपाद।
सो परजय-नयद्वार तैं असदभाव निरवाद॥

द्रव्य नेहमीच दोन प्रकारच्या उत्पादाने सहित असते. त्यामध्ये पहिला सत्-उत्पाद आहे आणि दुसरा असत्-उत्पाद आहे.

अनादी-अनंत जे द्रव्य आहे, ते आपल्या पर्यायांमध्ये उत्पन्न होते, त्याला द्रव्यदृष्टीने सत्-उत्पाद असे म्हटले जाते.

जे अगोदर नव्हते व आता ज्याचा उत्पाद झाला आहे; पर्यायार्थिक नयाने तो असत्-उत्पाद आहे. ही बाब निर्विवाद सिद्ध आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेतील भाव पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे –

''उत्पाद तर एकच आहे, कथनशैली दोन प्रकारची आहे. दोहोत उत्पादाचा संबंध तर द्रव्याबरोबरच आहे. मूळ गाथेत असे आहे की द्रव्य स्वत:च सद्भावसंबद्ध व असद्भावसंबद्ध उत्पादाला सदैव प्राप्त होते. [१]

ज्याचे अगोदर अस्तित्व असेल त्याच्याच उत्पत्तीला सत्-उत्पाद म्हणतात व ज्याचे अगोदर अस्तित्व नसेल आणि त्याची उत्पत्ती झाली असता त्याला असत्-उत्पाद असे म्हटले आहे. जेव्हा अवस्थेला गौण करून द्रव्याचे मुख्यरूपाने कथन केले जाते, म्हणजेच मतिज्ञान, श्रुतज्ञानादी अवस्थांना गौण करून आत्मद्रव्याचे कथन केले तर जे अस्तित्व आहे, तेच उत्पन्न होते अर्थात ज्ञान, दर्शन, चारित्र वगैरे शक्तीच उत्पन्न होतात. [२]

एकाच उत्पादाला दोन संबंध लागू पडतात. द्रव्याबरोबर संबंध सांगायचा असेल तर सत्-उत्पाद व पर्यायाबरोबरचा संबंध सांगायचा असेल तर द्रव्याचा असत्-उत्पाद झाला असे म्हटले जाते. [३]''

वरील गाथेमध्ये हे स्पष्ट केलेले आहे की जेव्हा एखादे कार्य होते तर ते अगोदरपासून होते की एकदम नवीन उत्पन्न होते ?

वरील संदर्भात जैनदर्शनाचे म्हणणे आहे की ज्यापासून वस्तू बनते, ती मूळ सामुग्री तर अगोदर होती व आताही आहे, त्यामध्ये काही परिवर्तन झालेले नाही. सोने तेव्हाही होते, जेव्हा ते कड्याच्या रूपाने होते व आताही आहे की जेव्हा ते कंकण बनले आहे; म्हणून सोन्याचाच पूर्वपर्यायरूपाने नाश झाला आहे व सोन्याचा उत्तरपर्यायरूपाने उत्पाद झाल्यामुळे सत्चाच उत्पाद झाला आहे; परंतु ज्याची दृष्टी कड्यावरच आहे, त्याचे तर सर्व काही नष्टच होईल व ज्याची दृष्टी कंकणावरच आहे, त्याला सर्व काही मिळाले.

अशाप्रकारे हे स्पष्ट झाले की पर्यायदृष्टीने असत्चा उत्पाद झाला आहे व द्रव्यदृष्टीने पाहिल्यास सत्चा उत्पाद झाला आहे. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २८७ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २८८
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : २८९

प्रवचनसार गाथा ११२-११३

१११ व्या गाथेमध्ये सत्-उत्पाद आणि असत्-उत्पाद यांच्यामध्ये कोणताही विरोध नाही – हे सिद्ध केले होते. आता या ११२ व ११३ व्या गाथेद्वारे सत्-उत्पादाला अनन्यत्वाद्वारे तसेच असत्-उत्पादाला अन्यत्वाद्वारे नक्की करीत आहेत.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहेत –

जीवो भवं भविस्सदि णरोऽमरो वा परो भवीय पुणो।
किं दव्वत्तं पजहदि ण जहं अण्णो कहं होदि॥११२॥
मणुवो ण होदि देवो देवो वा माणुसो व सिद्धो वा।
एवं अहोज्जमाणो अणण्णभावं कधं लहदि॥११३॥

(हरिगीत)

परिणमित जिय नर देव हो या अन्य हो पर कभी भी।
द्रव्यत्व को छोड़े नहीं तो अन्य होवे किसतरह॥११२॥
मनुज देव नहीं है अथवा देव मनुजादिक नहीं।
ऐसी अवस्था में कहो कि अनन्य होवे किसतरह॥११३॥

परिणमित होणारा जीव मनुष्य, देव, तिर्यंच, नारकी किंवा सिद्ध होईल; परंतु काय तो मनुष्यत्वरूप झाल्याने जीवत्वाला सोडेल ? नाही, कदापी नाही; तर मग तो अन्य कसा बरे होऊ शकतो ?

मनुष्य देव नाही, देव मनुष्य किंवा सिद्ध नाही – अशा परिस्थितीत ते अनन्य कसे होऊ शकतात ?

एकत्र आलेल्या या दोन्ही गाथा एकदम परस्पर विरुद्ध वाटतात. एक गाथा सांगते की ते अन्य-अन्य कसे बरे होऊ शकतात आणि दुसरी गाथा सांगते की ते अनन्य कसे होऊ शकतात ? खरी बाब अशी आहे की ह्या गाथांमध्ये सत्-उत्पादामध्ये अनन्यपणा आणि असत्-उत्पादामध्ये अन्यपणा सिद्ध केला आहे.

या गाथांमधील भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''द्रव्यत्वभूत अन्वयशक्तिला कधीही न सोडणारे द्रव्य सत्च आहे, विद्यमानच आहे. द्रव्याचा जो पर्यायभूत व्यतिरेक व्यक्तित्वाचा उत्पाद होतो; त्यामध्येही द्रव्यत्वभूत अन्वयशक्ती अच्युत रहाते, म्हणून द्रव्य अनन्यच आहे. यामुळे अनन्यपणाने द्रव्याचा सत्-उत्पाद निश्चित होतो.

आता याचाच विशेष खुलासा करतात – जीव द्रव्य असल्याने व द्रव्य पर्यायीत वर्तत असल्याने जीव नारकत्व, तिर्यंचत्व, मनुष्यत्व, देवत्व व सिद्धत्व यापैकी एका पर्यायीत अवश्य परिणमित होईल; परंतु तो जीव त्या पर्यायरूप होऊनही द्रव्यत्वभूत अन्वयशक्तिला सोडतो काय ?

जर तो सोडत नाही तर तो अन्य कसा होऊ शकतो की ज्यायोगे त्रिकोटी सत्ता (त्रैकालिक-अस्तित्व) ज्याला प्रगट आहे – असा तो जीव तोच नसावा ?

पर्याय पर्यायभूत व्यतिरेक व्यक्तित्वाच्या काळीच सत् (विद्यमान) असल्याने अन्य काळात असत्(अविद्यमान)च आहे. पर्यायांचा द्रव्यत्वभूत अन्वयशक्तिबरोबर जोडलेला जो क्रमानुसार उत्पाद होतो, त्यामध्ये पर्यायभूत स्व-व्यतिरेक व्यक्तिचा पूर्वी असत्पणा असल्याने पर्याय अन्यच आहेत; म्हणून पर्यायांच्या अन्यतेद्वारे पर्यायांच्या स्वरूपाचा कर्ता, करण आणि अधिकरण असल्याने पर्यायांपासून अपृथक् असणाऱ्या द्रव्याचा असत्-उत्पाद निश्चित होतो.

आता हीच बाब उदाहरणाद्वारे विशेष स्पष्ट करतात –

मनुष्य, देव किंवा सिद्ध नाही आणि देव, मनुष्य किंवा सिद्ध नाही, अशातऱ्हेने न होणारा जीव अनन्य कसा होऊ शकतो ? कंकणादी पर्यायांमध्ये उत्पन्न होणाऱ्या सोन्याप्रमाणे जीव देखील मनुष्यादी पर्यायामध्ये उत्पन्न होताना पर्याय अपेक्षेने अन्य-अन्यच आहे.''

उक्त गाथांचा भाव हा आहे की ज्याप्रमाणे सोन्याच्या दृष्टिने पाहिले असता कंकणादी पर्यायरूपाने परिणमित झालेले सोने सोनेच राहते,

अनन्यच राहते; अन्य-अन्य होत नाही. त्याप्रमाणे द्रव्यदृष्टिने पाहिले असता मनुष्यादी पर्यायरूपाने परिणमित होणारे जीवद्रव्य जीवच राहते, अनन्यच राहते; अन्य-अन्य होत नाही – या अपेक्षेने सत्‌चाच उत्पाद होतो.

जसे कंकण वगैरे दागिन्यांच्या दृष्टिने पाहिले तर कंकण वगैरे पर्यायरूपाने परिणमित सोने कंकण वगैरेच होते, अन्य-अन्यच होते, अनन्य रहात नाही; तसेच मनुष्यादी पर्यायाच्या दृष्टिने पाहिले तर मनुष्यादी पर्यायरूपाने परिणमित झालेला जीव मनुष्यादिकच होतो, अन्य-अन्यच होतो, अनन्य रहात नाही. या अपेक्षेने असत्‌चाच उत्पाद होतो.

कविवर वृंदावनदासजींनी या दोन गाथांचा भाव एक-एक मनहरण कवित्ताद्वारे फारच सोप्या रीतिने प्रस्तुत केला आहे –

(मनहरण कवित्त)

जीव दर्व आपने सुभाव प्रनवंत संत,
मानुष अमर वा अपर पर्ज धारैगो।
तिन परजायनिसों नानारूप होय तऊ,
कहा तहाँ आपनी दरवशक्ति छाँरैगो॥
जो न कहूँ आपनी दरवशक्ति छोड़ैं तब,
कैसे और रूप भयो निहचै बिचारैगो।
ऐसे दर्वशक्ति नानारूप परजाय व्यक्त,
जथारथ जाने वृन्द सोई आप तारैगो॥७१॥

हे जीवद्रव्य आपल्या स्वभावरूप परिणमित होत असताना मनुष्य, देव किंवा एखाद्या कोणत्याही पर्यायाला धारण करेल व त्या पर्यायांच्या अपेक्षेने अनेक प्रकारचा होईल, तथापी तो अशा वेळेला आपल्या द्रव्यशक्तिला सोडेल काय ? अर्थात् कधीही सोडणार नाही व जर तो आपल्या द्रव्यशक्तिला सोडणार नाही तर मग तो अन्यरूप कसा होईल? या गोष्टीचा निश्चयनयाने विचार करून पाहिले पाहिजे. अशाप्रकारे अनेक पर्यायामध्ये व्यक्त अशा द्रव्यशक्तिला जो यथार्थपणे जाणेल, वृंदावनदासजींनी म्हटले आहे की ती व्यक्ती निश्चितच संसारसागरातून पार होईल.

एक परजाय जिहिकाल परिनवै जीव,
तिहिकाल और परजायरूप नहीं है।
मानुष परज परिनयौ तब देव तथा,
सिद्धपरजाय तहाँ कहां ठहराही है॥
देव परजाय में मनुष-सिद्ध पर्ज कहाँ,
ऐसे परजाय द्वार भेद विलगाही है।
या प्रकार एकता न आई तब कैंसे नाहिं,
पर्जद्वार नाना नाम दरव लहाही है॥७२॥

ज्यावेळी जो जीव ज्या पर्यायरूपाने परिणमित होतो, त्यावेळी अन्य पर्यायरूप तो नाही. जेव्हा मनुष्य पर्यायरूप परिणमित आहे, तेव्हा देव किंवा सिद्ध पर्यायरूप कसा होऊ शकेल ? देव पर्यायामध्ये मनुष्य किंवा सिद्धपर्याय कुठे आहे ? अशाप्रकारे पर्याय अपेक्षेने भेद आढळतो. अशाप्रकारे जर एकता होत नाही तर मग द्रव्य पर्यायापेक्षा अनेक नाव धारण का बरे करणार नाही ?

पंडित देवीदासजींनी देखील या गाथांचा भाव १ इकतीसा सवैया व १ छप्पय पद्यामध्ये फारच सहजतेने अशाचप्रकारे प्रस्तुत केला आहे.

स्वामीजींनी या गाथेतील भाव पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे –

"समयसारात दृष्टिचा विषय सांगण्याकरिता ध्रुवस्वभावाची चर्चा केलेली आहे; तेथे जीवस्थान, गुणस्थान हे जीवाचे कायम स्वरूप नसल्याने त्याला अजीव म्हटले आहे व येथे प्रवचनसारात असे म्हटले की क्रोधरूप, मानरूप, मिथ्यात्वरूप, अज्ञानरूप, मार्गणास्थानरूप, वेगवेगळ्या गुणस्थानांच्या दशारूप जीव स्वत: राहतो – अशाप्रकारे अखंड ज्ञेय दाखवून अंशी अशा द्रव्याला दाखविले आहे. तेच ते द्रव्य ध्रुव शक्तिवान राहते – असे ध्रुव द्रव्य दाखवावयाचे आहे. शक्तिवानावर जोर आहे. द्रव्य-गुण-पर्याय या तिन्हींचे ज्ञान करवून द्रव्यदृष्टी करावयाची आहे.[१]

प्रत्येक द्रव्य परिणामी नित्य आहे. द्रव्य नुसतेच परिणामी असते तर नित्यतेशिवाय परिणाम कोणाचा ? जर द्रव्य निव्वळ नित्य असेल

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३०९-३१०

तर विकार किंवा निर्विकार हे सिद्ध होत नाही, तसेच विकार बदलून सिद्धदशा प्रगट करणे देखील ठरत नाही.

आत्मा ज्ञाता-दृष्टा स्वरूप आहे, अनंत शक्तींचा पिंड आहे; यामध्ये समया-समयाला वेगवेगळी अवस्था होते. त्यावेळी जीव देखील पर्यायदृष्टिने त्या-त्या रूपाने वेगवेगळा होतो; परंतु ध्रुव पृथक रहात नाही.

ध्रुव वस्तुस्वभावाने पाहिले असता आत्मा जसाच्या तसा आहे अर्थात जड चेतन होत नाही आणि चेतन जड होत नाही; परंतु स्वत:मध्ये आपल्या अवस्थेच्या समयी पर्यायदृष्टिने संपूर्ण द्रव्य पर्यायरूपाने असते. जेव्हा पर्याय अन्य-अन्य होते, तेव्हा द्रव्य देखील पूर्णपणे अन्य-अन्य होते. जर पर्यायाप्रमाणे ध्रुव अन्य-अन्य नसेल तर पर्याय आणि द्रव्य हे दोन्ही पृथक-पृथक होतील; परंतु असे होत नाही.[१]

वस्तू स्वतंत्र आहे व समया-समयाला स्वतंत्र अवस्था करण्यासाठी स्वतंत्र आहे. प्रत्येक वस्तू ध्रुव राहून बदलते, भावांतररूप होते; परंतु आपला सर्वथा अभाव करून ती रूपांतरीत होत नाही.[२]

सामान्य स्वभावाच्या अपेक्षेने प्रत्येक वस्तू जशीच्या तशी राहते आणि पर्याय अपेक्षेने आपल्या पर्याय स्वभावामुळे अन्य-अन्य होते.

जर शुद्ध स्वभाव प्रगटरूप असेल तर वर्तमानात परमानंद प्रगट व्हावयास हवा; परंतु वर्तमानात तर संसार आहे; त्यामुळे आकुलता आहे व मूळ स्वभाव शक्तिरूप सुखाचा सागर नसेल तर आकुलता नष्ट होऊन निराकुलता प्रगट होणार नाही. शुद्ध स्वभाव शक्ती कायम (ध्रुव) राहून अवस्थांमध्ये परिणमन होत असते व पर्याय होताना ध्रुव पृथक रहात नाही. तसेच ध्रुव एकटा रहावा व पर्याय दुसरी व्हावी – असेही होत नाही.[३]

मिथ्यात्वाच्या पर्यायाचा व्यय होऊन सम्यक्त्वाची पर्याय प्रगट झाली आहे; परंतु मिथ्यात्वाची पर्याय सम्यक्त्वाच्या पर्यायाचा कर्ता, करण आणि आधार नाही. त्याचप्रमाणे देव-गुरु-शास्त्र देखील सम्यक्त्वाच्या पर्यायाचे कर्ता, करण आणि आधार नाहीत. ध्रुव स्वभाव

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३१४
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३१४
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३१५

भाव, गुण, शक्ती, सादृश्य स्वत:च सम्यग्दर्शनाचा कर्ता आहे, तोच कारण व तोच आधार आहे.[१]

सत्-उत्पाद म्हणाल तर तो त्याच ध्रुवामधून उत्पाद झाला आहे व असत्-उत्पाद म्हणाल, तरीही अगोदर नव्हता व आता झाला तर हेच ध्रुव अन्यरूप झाले. हाच तो ध्रुव अन्यरूप झाला, अन्य कोणी नाही.[२]

प्रश्न : चारित्रगुण शुद्ध आहे, त्याला विकाराचा कर्ता का म्हणता?

उत्तर : अहो ! गुणामध्ये अशुद्धता द्रव्यदृष्टिने नाही, हे तुमचे म्हणणे बरोबर आहे, परंतु पर्यायार्थिक नयाने गुण स्वत: एका समयापुरता तो अशुद्ध परिणमित होतो; म्हणून विकाराचा कर्ता, करण व आधार चारित्रगुण आहे, कारण ती त्याचीच पर्याय आहे. तिन्ही काळाच्या पर्यायांचा पिंड आहे, त्यातील वर्तमान रागरूप पर्याय त्याची नाही, असे म्हणून एका पर्यायाचा अभाव केला तर तो गुण पूर्ण सिद्ध होणार नाही.[३]

येथे जो गुण, शक्ती, समान, ध्रुव, सादृश्य सांगितले आहे, त्याला सामान्य द्रव्य सुद्धा म्हटलेले आहे, हा द्रव्यार्थिक नयाचा विषय आहे व सादृश्यरूप जी पर्याय आहे, जो उत्पाद-व्यय होतो, तो पर्यायार्थिक नयाचा विषय आहे. गुण व पर्याय मिळून संपूर्ण द्रव्य उत्पाद-व्यय-ध्रुव सहित संपूर्ण द्रव्य प्रमाण ज्ञानाचा विषय आहे.[४]''

या गाथांमध्ये अनेक तर्क आणि उदाहरण देऊन हीच बाब समजाविण्याचा प्रयत्न केला आहे की द्रव्य आणि पर्याय कथंचित अन्य-अन्य आहेत आणि कथंचित अनन्य. ज्या अपेक्षेने ते अनन्य आहेत, त्या अपेक्षेने सत्-उत्पाद आहे आणि ज्या अपेक्षेने अन्य-अन्य आहेत, त्या अपेक्षेने असत्-उत्पाद आहे.

जैनदर्शनाचे संपूर्ण प्रतिपादन नय सापेक्ष आहे, स्याद्वादरूप आहे. त्यामध्ये एकांतवादाला स्थान नाही, सर्वत्र अनेकांतवादाचेच साम्राज्य आहे.

●

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३२६
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३२७
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३२८
४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३२८

प्रवचनसार गाथा ११४

११२ व्या गाथेत सत्-उत्पादाच्या अनन्यपणाला सिद्ध केले व ११३ व्या गाथेत असत्-उत्पादाचा अन्यपणा सिद्ध केला. ११४ व्या गाथेत एकाच द्रव्यात अन्यपणा व अनन्यपणा असल्याने जो विरोध जाणवतो, त्याचे निराकरण करीत आहेत. तात्पर्य हे की आता सांगत आहेत की एखाद्या विशिष्ट अपेक्षेने पाहिले तर दोहोंत कोणताही विरोध नाही.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

दव्वट्ठिएण सव्वं दव्वं तं पज्जयट्ठिएण पुणो।
हवदि य अण्णमणण्णं तक्काले तम्मयत्तादो॥११४॥

(हरिगीत)

द्रव्य से है अनन्य जिय पर्याय से अन-अन्य है।
पर्याय तन्मय द्रव्य से तत्समय अत: अनन्य है॥११४॥

द्रव्यार्थिकनयाने सर्व द्रव्य आहेत व पर्यायार्थिकनयाने ते अन्य-अन्य आहेत; कारण त्या समयी तन्मय असल्याने द्रव्य पर्यायांशी अनन्य आहे.

या गाथेतील भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"वास्तविक सर्व वस्तू सामान्य-विशेषात्मक असल्याने वस्तुचे स्वरूप पाहणाऱ्यांचे क्रमश: सामान्य आणि विशेष यांना पाहणारे-जाणणारे दोन डोळे आहेत – १) द्रव्यार्थिक आणि २) पर्यायार्थिक.

यापैकी पर्यायार्थिक चक्षुला एकांतपणे (पूर्णत:, सर्वथा, पूर्णपणे, योग्यप्रकारे) बंद करून जेव्हा फक्त उघडलेल्या द्रव्यार्थिक चक्षुद्वारे पाहिले जाते, तेव्हा नारकीपणा, तिर्यंचपणा, मनुष्यपणा, देवपणा व सिद्धपणारूप विशिष्ट पर्यायांमध्ये व्यवस्थित (निश्चितपणे राहणाऱ्या) एक जीवसामान्याला पाहणाऱ्या (जाणणाऱ्या) व विशेषाला न पाहणाऱ्या (जाणणाऱ्या) जीवाला 'हे सर्व जीव द्रव्यच आहे' असे भासित होते.

आणि जेव्हा द्रव्यार्थिक चक्षुला एकांतपणे (पूर्णत:, सर्वथा, पूर्णपणे, योग्यप्रकारे) बंद करून फक्त पर्यायार्थिक चक्षुद्वारे पाहिले जाते, तेव्हा

जीव द्रव्यात व्यवस्थित (निश्चितपणे राहणाऱ्या) नारकीपणा, तिर्यंच-पणा, मनुष्यपणा, देवपणा व सिद्धपणारूप विशिष्ट पर्यायांना पाहणाऱ्या (जाणणाऱ्या) व सामान्याला न पाहणाऱ्या (जाणणाऱ्या) जीवाला ते जीवद्रव्य अन्य-अन्य भासित होते; कारण जसे गोवरी, गवत, पाने व काष्ठ यांची अग्नी गोवरी, गवत व काष्ठमय आहे, म्हणून यांच्याहून अनन्य आहे, पृथक नाही. तसेच जीव द्रव्य सुद्धा त्या-त्या विशिष्ट पर्यायांच्या समयी त्या विशेष पर्यायांशी तन्मय असल्याने त्यांच्याशी अनन्य आहे, पृथक नाही.

आणि जेव्हा त्या द्रव्यार्थिक व पर्यायार्थिक दोन्ही चक्षुंना एकावेळेस उघडून दोहोंनी पाहिले जाते तेव्हा नारकीपणा, तिर्यंचपणा, मनुष्यपणा, देवपणा तसेच सिद्धपणा रूप पर्यायामध्ये व्यवस्थित (सुनिश्चितरूप राहणारा) जीव सामान्य आणि जीव सामान्यामध्ये व्यवस्थित नारकीपणा, तिर्यंचपणा, मनुष्यपणा, देवपणा आणि सिद्धपणारूप पर्याय एकाच काळात एकदम दिसून येतात, जाणले जातात.

निष्कर्ष हा आहे की एका चक्षुने पाहणे एकदेशावलोकन आहे आणि दोन्ही चक्षुने पाहणे सर्वावलोकन आहे, म्हणून सर्वावलोकनामध्ये द्रव्याच्या अन्यत्व आणि अनन्यत्वामध्ये विरोध उत्पन्न होत नाही.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये या गाथेतील भाव स्पष्ट करतेवेळी तत्त्वप्रदीपिका टीकेचे तंतोतंत अनुकरण केले आहे. येथवर की उदाहरण देखील तेच दिले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेतील भाव एकाच छंदाद्वारे फारच सोप्या भाषेत सादर केला आहे, तो छंद खालीलप्रमाणे आहे –

(मनहरण कवित्त)

दर्वार्थिकनय नैन खोलकर देखिये तो,
सोई दर्व और रूप भयो नाहिं कबही।
फेर परजायनय नैन तैं निहारिये तो,
सोई नानारूप भयो जैसो पर्ज जब ही॥
जातैं नर नारकादि काय जिहि काल लहै,
तासों तनमई होय रहै तैसो तबही।
जैसे आगि एक पै प्रवेश नाना ईंधन में,
ईंधन अकार तैं भयौ है भेद सब ही॥७३॥

द्रव्यार्थिकनयाचा डोळा उघडून पाहिले असता ते द्रव्य अन्यरूप कधीच झालेले नाही. जर पर्यायार्थिकनयाच्या डोळ्याने पाहिले तर जेव्हा जशी पर्याय होते, तेव्हा तसे परिणमन होते; म्हणून ज्यावेळी ज्या पर्यायाशी तन्मय आहे, तेव्हा तसाच आहे.

जसे अग्नी तर एकच आहे; परंतु अनेक प्रकारच्या ईंधनामध्ये प्रवेश केल्याने ईंधनाच्या आकाररूप होतो; तसेच एक आत्मा वेगवेगळ्या पर्यायाने भिन्न-भिन्न होत असून सुद्धा द्रव्यापासून अभिन्न राहतो.

या गाथेचा भाव पंडित देवीदासजींनी केवळ एका दोह्याद्वारे पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(दोहा)

दरव दिष्टि करिकैं सवै वस्तु स्वरूप सु एक।
पुनि परजाय सुदिष्टि करि सो परकार अनेक॥४१॥

द्रव्यदृष्टीने पाहिले असता सर्व वस्तू स्वरूपाने एकरूपच आहेत आणि पर्यायदृष्टीने पाहिले असता त्या अनेकरूप आहेत.

स्वामीजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''पर्यायार्थिकनयाला गौण करून नुसत्या द्रव्यार्थिकनयाने जेव्हा वस्तुचे ज्ञान केले जाते; तेव्हा नरकगती, तिर्यंचगती, मनुष्यगती, देवगती आणि सिद्धत्व या सर्व अवस्थांमध्ये जीवाला सामान्यपणाने पाहिले असता हे सर्व जीव आहेत – असे निश्चित होते म्हणजेच हे अन्य जीव नाहीत, अजीव देखील नाहीत. जीव एका गतीतून दुसऱ्या गतीत गेला असता तो दुसरा अन्य जीव बनत नाही.[१]

जेव्हा द्रव्यार्थिकनयाला गौण करून पर्यायार्थिकनयाने पाहिले असता वेगवेगळ्या अवस्थांना पाहणाऱ्या नयाने ते द्रव्य वेगवेगळे भासित होते. उदाहरणार्थ – मनुष्यपर्याय देवपर्याय नाही, देवपर्याय सिद्धपर्याय नाही. अशाप्रकारे अवस्थेने पाहिले असता जीव वेगवेगळा भासित होतो, कारण तो विशिष्ट पर्यायाच्या वेळी तन्मय असल्या कारणाने तो त्यांच्यापासून पृथक नाही तर अनन्य आहे.[२]

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३३४-३३५ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३३५

विशेषांमध्ये रहात असलेल्या द्रव्याला जाणणे तो द्रव्यार्थिकनय आहे. द्रव्यामध्ये असणाऱ्या विशेषांना जाणणे तो पर्यायार्थिकनय आहे.[१]

स्वचे ज्ञान झाले असता पराचे ज्ञान आपल्या निश्चयज्ञानाने होते. **स्व-परप्रकाशक ज्ञानस्वभाव आपला आहे, म्हणून निश्चय आहे, पर्याय देखील निश्चय आहे. सामान्य ध्रुव देखील निश्चय आहे.** वस्तुचे सर्वदेश-प्रमाणज्ञानाने अवलोकन केले असता स्वतंत्र एकेक द्रव्यामध्ये त्याचा भेद-अभेदपणा विरोधाला प्राप्त होत नाही. वास्तविक विरोध तर परद्रव्याची गरज (आवश्यकता) स्वीकारणाऱ्या अज्ञानात आहे.[२]

चैतन्य स्व-परप्रकाशक आहे. स्व-पर ज्ञायक शक्ती स्वतंत्ररूपाने राहून परिणमित होते, ज्याने असे मानले नाही, त्याने आत्म्यालाच मानले नाही. जड पदार्थ आपल्या सर्व शक्तिंनी जडेश्वर आहे आणि चैतन्य आपल्या चैतन्यरूपाने पूर्ण ईश्वर आहे.[३]''

या गाथेत आचार्यदेव हे सांगत आहेत की वस्तुचे स्वरूप सामान्य-विशेषात्मक आहे. त्याला जाणण्यासाठी दोन चक्षुंची गरज आहे. एक द्रव्यार्थिकनयाचा चक्षु वस्तुच्या सामान्य स्वरूपाला पाहतो व दुसरा पर्यायार्थिकनयाचा चक्षु वस्तुच्या विशेष स्वरूपाला पाहतो. अशाप्रकारे दोन्ही चक्षु सामान्य-विशेषात्मक वस्तुला चांगल्या प्रकारे जाणतात.

ध्यानात ठेवावे येथे असे सांगितले नाही की फक्त द्रव्यार्थिकनयाचा चक्षुच नेहमी उघडायचा आहे व पर्यायार्थिकनयाचा बंदच ठेवायचा आहे.

शेवटी आचार्यदेवांनी प्रमाणदृष्टिची चर्चा केली आहे, त्यामध्ये दोन्ही चक्षु एकदम उघडे ठेवलेले असतात. म्हणून या गाथेतून असा अर्थ काढावा की सदैव एक द्रव्यार्थिक चक्षुच उघडा ठेवावयाचा आहे, हे साफ चुकीचे आहे; कारण वस्तुस्वरूप समजण्याकरिता त्याला प्रत्येक दृष्टिकोणातून पाहणे अत्यंत आवश्यक आहे. लक्ष देण्यायोग्य बाब ही आहे की या गाथेच्या प्रवचनात स्वामीजींनी आत्म्याच्या स्व-परप्रकाशकस्वभावाला निश्चय म्हटले आहे. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३३६ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३३७
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३३९

प्रवचनसार गाथा ११५

११४ व्या गाथेमध्ये सत्-उत्पाद आणि असत्-उत्पाद किंवा एकाच द्रव्यामध्ये अन्यपणा आणि अनन्यपणा यांच्यात आढळणाऱ्या विरोधाचे शमन नयविवक्षेने केले होते. आता या ११५ व्या गाथेमध्ये त्याच गोष्टीला पुढे नेऊन समस्त विरोधाला समाप्त करणाऱ्या सप्तभंगाची चर्चा करीत आहेत. मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

अत्थि त्ति य णत्थि त्ति य हवदि अवत्तव्वमिदि पुणो दव्वं।
पज्जाएण दु केण वि तदुभयमादिट्ठमण्णं वा॥११५॥

(हरिगीत)

अपेक्षा से द्रव्य 'है' 'है नहीं' 'अनिर्वचनीय' है।
'है है नहीं' इसतरह ही अवशेष तीनों भंग हैं॥११५॥

द्रव्य एखाद्या पर्यायाने अस्ति, एखाद्या पर्यायाने नास्ति व एखाद्या पर्यायाने अवक्तव्य आहे. अशाप्रकारे एखाद्या पर्यायाने अस्ति-नास्ति किंवा एखाद्या पर्यायाने इतर तीन भंगरूप आहे – असे सांगितले आहे. ध्यानात ठेवावे येथे पर्याय हा शब्द अपेक्षा या अर्थाने सांगितला आहे.

या गाथेतील भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''द्रव्य स्व रूपाच्या अपेक्षेने **स्यात्-अस्ति**; पर रूपाच्या अपेक्षेने **स्यात्-नास्ति**; स्वरूप-पररूपाच्या युगपत् अपेक्षेने **स्यात्-अवक्तव्य**; स्वरूप-पररूपाच्या क्रमाच्या अपेक्षेने **स्यात्-अस्ति-नास्ति**; स्वरूपाच्या आणि स्वरूप-पररूपाच्या युगपत अपेक्षेने **स्यात्-अस्ति-अवक्तव्य**; पररूप व स्वरूप-पररूपाच्या युगपत अपेक्षेने **स्यात्-नास्ति-अवक्तव्य** आणि स्वरूपाच्या, पररूपाच्या तसेच स्वरूप-पररूपाच्या युगपत् अपेक्षेने **स्यात्-अस्ति-नास्ति-अवक्तव्य** आहे.

द्रव्याचे कथन करण्यामध्ये जे स्वरूपाने **सत्** आहे; पररूपाने **असत्** आहे; ज्याचे स्वरूप आणि पररूपाने युगपत् **कथन अशक्य** आहे; जे स्वरूपाने पररूपाने क्रमशः **सत्-असत्** आहे; जे स्वरूपाने आणि स्वरूप-पररूपाने युगपत **सत्-अवक्तव्य** आहे; जे पररूपाने आणि स्वरूप-पररूपाने युगपत **असत्-अवक्तव्य** आहे; आणि जे स्वरूपाने, पररूपाने आणि स्वरूप-पररूपाने युगपत् **सत्-असत्-अवक्तव्य** आहे.

अशा अनंत धर्मवाल्या द्रव्याचा एकेक धर्माचा आश्रय घेऊन विवक्षित-अविवक्षितपणाच्या विधि-निषेधाद्वारे प्रगट होणारी सप्तभंगी सतत सम्यकपणे उच्चारित केली असता स्यात्काररूपी अमोघ मंत्र पदाद्वारे 'एवकार' मध्ये राहणाऱ्या समस्त विरोध-विषयाच्या मोहाला दूर करते.''

ही महत्त्वाची गाथा व गाथेच्या टीकेतील भाव कविवर वृंदावनदासजींनी एक छप्पय व एक मनहरण कवित्त, अशाप्रकारे दोन छंदांच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(छप्पय)

दरब कथंचित अस्तिरूप राजै इमि जानो।
बहुर कथंचित नास्तिरूप सोई परमानो॥
होत सोई पुनि अवक्तव्य ऐसे उर धरनी।
फिर काहू परकार सोइ उभयातम वरनी॥
पुनि और सुभंगनि के विषैं जथाजोग सोई दरव।
निरबाध बसत निजरूपजुत श्रीगुरु भेद भने सरव॥७४॥

द्रव्य कथंचित अस्तिरूप आणि कथंचित नास्तिरूप शोभायमान होत आहे – या गोष्टीला प्रमाण समजा. तेच द्रव्य एका अपेक्षेने अवक्तव्य आहे – ही बाब हृदयामध्ये धारण करा.

तसेच एका अपेक्षेने उभयरूप असते. अशाप्रकारे इतर भंगांच्या बाबतीत जाणले पाहिजे. श्रीगुरुंनी संपूर्ण रहस्य उघडून सांगितले आहे की हा निजरूप आत्मा निर्बाध रहात आहे.

(मनहरण कवित्त)

आपनी चतुष्टै दर्व-क्षेत्र-काल-भावकरि,
तिहूँकालमाहिं दरव अस्तितसरूप है।
सोई परद्रव्य के चतुष्टै करि नास्ति सदा,
फेर सोई एकै काल उभैरूप भूप है॥
एकै काल नाहिं जात कह्यो तातैं अकथ है,
फेर सोई अस्ति अवक्तव्य सु अनूप है।
फेर नास्ति अकथ औ अस्ति नास्ति अकथ है,
कथंचितवानी सो सुधारस को कूप है॥७५॥

प्रत्येक द्रव्य आपल्या द्रव्य-क्षेत्र-काल व भावरूप चतुष्टयाच्या अपेक्षेने त्रिकाळ अस्तिरूप आहे व तेच द्रव्य परचतुष्टयाच्या अपेक्षेने सदैव नास्तिरूप आहे; तेच द्रव्य दोघांच्या अपेक्षेने सदैव उभय(अस्ति-नास्ति) रूप आहे.

एका वेळेला एकदम सांगितले जाऊ शकत नाही, यामुळे अवक्तव्य आहे. अशाप्रकारे तेच द्रव्य अस्ति-अवक्तव्यरूप, नास्ति-अवक्तव्यरूप आणि अस्ति-नास्ति-अवक्तव्यरूप आहे. हा कथंचित वाणी म्हणजेच स्याद्वादवाणीचा अमृतकूप आहे.

पंडित देवीदासजींनी वरील सप्तभंगीला एक इकतीसा सवैया पद्याच्या माध्यामातून असेच प्रस्तुत केले आहे.

अशाचप्रकारे स्वामीजींनी देखील या गाथेचा भाव सोदाहरण विस्ताराने स्पष्ट केला आहे, तो मुळातून पठनीय आहे.

वरील संपूर्ण कथनाचा सारांश हा आहे की सप्तभंगी दोन प्रकारची असते – प्रमाण सप्तभंगी आणि नय सप्तभंगी. नयसप्तभंगी-मध्ये अपेक्षा स्पष्टपणे सांगितली जाते आणि प्रमाणसप्तभंगीमध्ये अपेक्षा स्पष्ट न करता त्याऐवजी स्यात् किंवा कथंचित शब्दाचा वापर केला जातो.

वरील सप्तभंगी नय सप्तभंगी आहे; कारण त्यामध्ये अपेक्षा स्पष्ट केली आहे की स्वरूपाने सत् आहे व पररूपाने असत् आहे वगैरे.

आचार्य जयसेन या गाथेच्या टीकेमध्ये स्पष्टपणे लिहितात की ही नयसप्तभंगी आहे, शिवाय हे सुद्धा स्पष्ट करतात की पंचास्तिकायच्या १४ व्या गाथेच्या टीकेमध्ये 'स्यादस्ति' वगैरे प्रमाणवाक्यांद्वारे प्रमाणसप्तभंगी सांगितली आहे.

नयसप्तभंगीमध्ये 'एव' म्हणजेच 'च' या शब्दाचा वापर केला जातो आणि प्रमाणसप्तभंगीमध्ये 'देखील' शब्दाचा प्रयोग केला जातो.

वस्तू एका अपेक्षेने सत् देखील आहे व एका अपेक्षेने असत्ही आहे – हा प्रमाणसप्तभंगीचा प्रयोग आहे व स्वरूपाच्या अपेक्षेने सत्च आहे व पररूपाच्या अपेक्षेने असत्च आहे. हा नयसप्तभंगीचा प्रयोग आहे.

अपेक्षेविना 'च' शब्दाचा प्रयोग करणे दुर्नयसप्तभंगी आहे. स्यात् किंवा कथंचित् लावल्याशिवाय 'देखील' लावणे दुष्प्रमाणसप्तभंगी आहे.

आचार्य जयसेनांनी लिहिले आहे की ''द्रव्य आहे – असे लिहिणे दुष्प्रमाणसप्तभंगी आहे आणि द्रव्य आहेच – ही दुर्नयसप्तभंगी आहे.[१]''

वस्तुस्वरूप समजण्या व समजाविण्याकरिता सप्तभंगी न्याय जैनदर्शनाचा अद्भुत शोध आहे, अनुपम निधी आहे. जैनदर्शनाच्या मर्माला समजण्याकरिता या सप्तभंगी न्यायाला समजणे केवळ अत्यंत आवश्यकच नव्हे तर अनिवार्य आहे.

सप्तभंगीचे स्वरूप व्यवस्थित समजण्याकरिता लेखकाची अन्य कृती 'परमभाव-प्रकाशक नयचक्र'च्या सप्तभंगी नामक सहाव्या अध्यायाचा बारकाईने अभ्यास करावयास हवा.

येथे ती चर्चा विस्ताराने करणे शक्य नाही. ●

१) पंचास्तिकाय, गाथा क्रमांक १४ ची तात्पर्यवृत्ती टीका

स्वत:मध्ये आपलेपणा आनंदाचा जनक आहे, परामध्ये आपलेपणा विपत्तींचे घर आहे; यामुळेच स्वत:मध्ये आपलेपणा साक्षात धर्म आहे आणि परामध्ये आपलेपणा महा अधर्म आहे. **– आत्मा ही है शरण, पृष्ठ : ४६**

प्रवचनसार गाथा ११६

मागील ११५ व्या गाथेमध्ये सप्तभंगीचे स्वरूप स्पष्ट करून आता या गाथेमध्ये हे समजावितात की मनुष्यादी पर्यायरूप विविध अवस्था रागादी भावांचे फळ आहे, कारण या अनेक प्रकारच्या अवस्था वीतराग भावांचे फळ तर असू शकत नाहीत.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

एसो त्ति णत्थि कोई ण णत्थि किरिया सहावणिव्वत्ता।
किरिया हि णत्थि अफला धम्मो जदि णिप्फलो परमो ॥११६॥

(हरिगीत)

पर्याय शाश्वत नहीं परन्तु है विभावस्वभाव तो।
है अफल परमधरम परन्तु क्रिया अफल नहीं कही ॥११७॥

मनुष्यादी पर्यायांमध्ये 'हीच' अशी कोणती शाश्वत पर्याय नाही; कारण संसारी जीवांची स्वभाव निष्पन्न क्रिया नाही – अशी बाब नाही. तात्पर्य हे आहे की संसारी जीवांची विभावस्वभावाने उत्पन्न होणारी राग-द्वेषमय क्रिया होतेच.

जर परम धर्म अफल आहे तर राग-द्वेषमय क्रिया अवश्य अफल नाही. तात्पर्य हे आहे की वीतरागभावरूप क्रिया तर मनुष्यादी पर्यायरूप फळ उत्पन्न करीत नाही; परंतु राग-द्वेषरूप क्रिया तर मनुष्यादी पर्यायरूप फळ उत्पन्न करतेच.

या गाथेचा भाव अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिकेत असा स्पष्ट केला आहे –

''या विश्वात अनादी कर्म पुद्‌गलाच्या उपाधिच्या सद्‌भावामुळे प्रत्येक समयाला परिवर्तन होते, अशा संसारी जीवाची राग-द्वेषरूप क्रिया वास्तविक स्वभावापासून (विभावस्वभाव) निष्पन्नच आहे, म्हणून त्याच्या मनुष्यादी पर्यायापैकी कोणतीही पर्याय 'हीच आहे' – अशी टंकोत्कीर्ण नाही; कारण त्या पर्याय पूर्व-पूर्व पर्यायांच्या नाशामध्ये प्रवर्तमान क्रियेच्या फळस्वरूपी असल्याने उत्तर-उत्तर पर्यायांद्वारे नष्ट होतात.

राग-द्वेषरूप क्रियेचे फळ तर मोहाबरोबर मिलनाचा नाश न झाल्याकारणाने ते मानले पाहिजे; कारण प्रथम तर ती क्रिया चेतनाच्या पूर्वोत्तर दशेमुळे निर्माण झालेला विशिष्ट चैतन्य परिणामस्वरूपच आहे.

शिवाय जसे दुसऱ्या अणुबरोबर युक्त अशा एखाद्या अणुची परिणती द्वी-अणुक कार्याची निष्पादक आहे; तसेच मोहाबरोबर संमिलित आत्म्यासंबंधी मनुष्यादी कार्याची निष्पादक असल्याने सफलच आहे.

जसे ज्याचा संबंध दुसऱ्या अणुबरोबर नष्ट झाला आहे, अशा अणुची परिणती द्वीअणुककार्याची निष्पादक नाही; तसेच मोहाबरोबर मिलनाचा नाश झाला असता द्रव्याची परिणती परमस्वभावभूत असल्याने परमधर्म म्हटली जाणारी मनुष्यादी कार्याची निष्पादक नसल्याने अफलच आहे.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीत तत्त्वप्रदीपिकेचेच अनुकरण केले आहे; परंतु शेवटी मतार्थाला स्पष्ट करताना म्हटले की यामुळे सांख्यमताचे निराकरण देखील होते. आत्मा रागादी भावांचा सर्वथा अकर्ता आहे – असे सांख्यमती मानतात; परंतु जैनदर्शनाचे असे म्हणणे आहे की जरी शुद्धनयाने आत्मा रागादिंचा कर्ता नाही, तरी देखील अशुद्धनयाने आत्मा रागादिभावांचा कर्ता आहे व ते रागादी भाव सुद्धा अफल नाहीत, कारण त्यांच्यामुळे मनुष्यादी पर्यायरूप वेगवेगळ्या अवस्थांची उत्पत्ती होते.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मनहरण कवित्त)

ऐसी परजाय कोऊ नाहीं है जगत में जो,
रागादि विभाव बिना भई उतपन है।
रागादि विभाव क्रिया अफल न होय कहूं,
याको फल चारों गतिमाहिं भरमन है॥
जैसे परमानू रूछ चीकन सुभाव ही सों,
बंध खंध माहिं तैसे जानो जगजन है।
जातैं वीतराग आतमीक पर्म धर्म सो तो,
बंधफल सों रहित तिहूँकाल धन है॥८९॥

या जगात अशी एखादी सांसारिक पर्याय नाही, जी रागादी विभावभावांशिवाय उत्पन्न झाली असेल, कारण रागादीभावरूप क्रिया अफल होत नाही, त्याचे फळ चारही गतिंमध्ये परिभ्रमण आहे.

जसे रूक्ष व स्निग्ध परमाणू स्वभावानेच स्कंधामध्ये बंधनाला प्राप्त होतात; त्याप्रमाणे संसारी जीवांच्या बाबतीत जाणले पाहिजे; परंतु आत्म्याचा वीतरागतारूप परमधर्म तर सदैवच बंधफळाने रहित आहे; म्हणून हे आत्म्याचे सर्वोत्कृष्ट धन आहे.

या गाथेचा भाव स्पष्ट करण्याकरिता पंडित देवीदासजींनी १ दोहा व १ सवैया इकतीसा पद्य लिहिले आहेत, त्यापैकी दोहा प्रस्तुत आहे –

(दोहा)

असद्भूत परजाय जो लखौ आतमा पास।
मोह क्रिया तिहि कौ सु फल सो है जगत विलास ॥४४॥

जर आत्म्याकडे असद्भूत पर्याय दिसेल तर हे समजावे की ही मोहाची क्रिया आहे आणि याचे फळ संसार परिभ्रमण आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"प्रत्येक आत्मा व परमाणू वगैरे अनादी-अनंत, स्वत: सिद्ध असल्याने स्वचतुष्टयाने आहेत, परद्रव्य क्षेत्र-काळ-भावाने नाहीत; त्यामुळे कोणीही एखाद्या अन्य द्रव्याचे परिणमन करावे – अशी वस्तुस्थिती कोणत्याही अपेक्षेने नाही; कारण एकामध्ये दुसऱ्याचा अत्यंत अभाव आहे.[१]

संसारी जीवाला विकारी क्रिया वास्तविक पाहता स्वभावानेच आहे, ती स्वत:मुळेच प्राप्त झाली आहे, परामुळे नव्हे. निश्चय कारण कार्यरूप झाले असता दुसऱ्याला व्यवहार कारण म्हटले जाते, अनारोप असेल तर आरोप केला जातो.[२]

जेवढा राग तेवढी स्वरूपात असावधानी व भगवान आत्म्यात जेवढी सावधानी, तेवढा धर्म आहे व त्यापासून च्युत होऊन जेवढा बहिर्मुख आहे, तेवढा मोहाबरोबर मिळालेला राग-द्वेषमय परिणाम आहे, तो जीवाचा वर्तमान पर्यायस्वभाव आहे.

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३४७
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३५३

ज्याप्रमाणे दुसऱ्या अणुबरोबर जोडलेल्या एखाद्या अणुची परिणती दोन अणुंनी बनलेल्या स्कंधरूप कार्याला उत्पन्न करणारी आहे; त्याप्रमाणे वर्तमान पर्यायामध्ये स्वला सोडून परभावरूप मोहाबरोबर जोडलेल्या अशा आत्म्याला रागाची उत्पत्ती होते आणि ती मनुष्य वगैरे कार्याला उत्पन्न असल्याने सफलच आहे.[१]

आपल्या ज्ञाता-दृष्टा स्वभावाशी अभेद होऊन जी अविकारी शांतदशा प्रगट झाली, ती परमधर्म म्हटली जाते व हे मुक्तिचे कारण आहे. ही क्रिया उत्पन्न झाल्याने भव रहात नाही; त्यामुळे ही क्रिया गतीची निष्पादक नाही, संसाराचे फळ देत नाही, त्यामुळे त्या क्रियेला अफल म्हटले आहे.[२]

ज्याला अशी अंतरंग दशा प्रगट होते, त्याला गती प्राप्त होत नाही म्हणजे ती संसारासाठी अफल आहे. ज्ञानस्वभावी क्रिया मोहरहित असल्याने गतीच्या फळाला उत्पन्न करीत नाही म्हणजे संसार फळत नाही व दर्शनमोह सहित क्रिया चारीही गतीचे फळ देते. मोहसहित भाव एकाच प्रकारचे नसून अनेक प्रकारचे असतात; त्यामुळे त्यांच्या फळस्वरूपी मनुष्यगती, देवगती वगैरे पर्याय टंकोत्किर्ण शाश्वत एकरूप नसून अनेकरूप असतात, मोक्षगती टंकोत्किर्ण शाश्वत एकरूप आहे व दुसरीकडे संसारी गती देव, मनुष्य, तिर्यंच नारकी वगैरे एकरूप नसून अनेकरूप आहेत.[३]''

वरील संपूर्ण कथनाचा सारांश हा आहे की आत्म्याची चैतन्यरूप क्रिया जर मोहरहित असेल तर मनुष्यादी संसारी पर्यायरूप फळ उत्पन्न करीत नाही व मोहसहित असेल तर मनुष्यादी पर्यायरूप फळ उत्पन्न करते.

कारण मोहसहित भाव अनेकप्रकारचे असतात, म्हणून त्यांच्या फळस्वरूपी उत्पन्न होणाऱ्या मनुष्यादी पर्याय देखील टंकोत्किर्ण, शाश्वत व एकरूप असत नाहीत, तर अनेक प्रकारच्या असतात.

तात्पर्य हे आहे की संसारात जीवांच्या परिणतीमध्ये संयोगाचे वैविध्य आढळून येते. त्यामुळे त्यांच्या होणाऱ्या मोह-राग-द्वेष भावांची विविधता आहे. मुक्तदशेत सर्व जीवांचा एक सारखा वीतरागभाव असल्याने त्यांच्या संयोगातही वैविध्य नसते. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३५५ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३५८
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३६१

प्रवचनसार गाथा ११७

मागील गाथेत हे समजाविले होते की वीतराग भावांचे फळ तर केवळ सिद्धदशारूप मुक्तदशाच आहे; या मनुष्यादिरूप विविध अवस्था तर रागादी क्रियेचेच फळ आहे व आता या गाथेमध्ये हे सांगत आहेत की हे नाम नावाचे कर्मच आपल्या स्वभावाने जीवस्वभावाचा पराजय करून मनुष्य, तिर्यंच, नारकी व देव – या पर्यायांना उत्पन्न करते.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

कम्मं णामसमक्खं सभावमध अप्पणो सहावेण।
अभिभूयं णरं तिरियं णेरइय वा सुरं कुणदि॥११७॥

(हरिगीत)

नाम नामक कर्म जिय का पराभव कर जीव को।
नर नारकी तिर्यंच सुर पर्याय में दाखिल करे॥११७॥

येथे नाम नावाचे कर्म आपल्या स्वभावाने जीवस्वभावाचा पराभव करून मनुष्य, तिर्यंच, नारकी व देव पर्यायांना धारण करते.

या गाथेचा भाव अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''वास्तविक पाहता आत्म्याद्वारे प्राप्य असल्याने मोहसहित क्रियाच आत्म्याचे कर्म आहे, कार्य आहे. त्याच्या निमित्ताने द्रव्यकर्मरूप परिणमनारे पुद्गल देखील कर्म आहे. त्या पुद्गलकर्माच्या कार्यभूत मनुष्यादी पर्याय मूळ कारणीभूत जीवाच्या क्रियेने प्रवर्तमान होत असल्याने क्रिया-फळच आहेत; कारण क्रियेअभावी पुद्गलांना कर्मपणाचा अभाव असल्याने त्या पुद्गलकर्माच्या कार्यभूत असलेल्या मनुष्यादी पर्यायांचा अभाव होतो.

जसे दिव्याच्या ज्योतीच्या स्वभावाद्वारे तेलाच्या स्वभावाचा पराभव करून जळणारा दिवा ज्योतिचे कार्य आहे; तसेच कार्यस्वभावाद्वारे जीवस्वभावाचा पराभव करून केल्या जाणाऱ्या मनुष्यादी पर्याय कर्माचे कार्य आहेत.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये या गाथेचा भाव दिव्याच्या उदाहरणाच्या माध्यमातून सर्वांग खालीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

"ज्याप्रमाणे अग्निरूपी कर्ता, कर्मरूपी तेलाच्या स्वभावाचा तिरस्कार करून वातीच्या माध्यमातून दिव्याला ज्योतिरूपाने परिणमित करतो; त्याप्रमाणे कर्माग्निरूपी कर्ता शुद्धात्मस्वभावरूप तेलाचा तिरस्कार करून वातीरूप शरीराच्या माध्यमातून दीपशिखेप्रमाणे मनुष्य, नारकी वगैरे पर्यायरूप परिणमन करतो. यावरून ज्ञात होते की मनुष्यादी पर्याय निश्चयनयाने कर्मजनित आहेत."

वृंदावनदासर्जीनी या गाथेचा भाव खालीलप्रमाणे व्यक्त केला आहे –

(मनहरण कवित्त)

नाम कर्म आपनै सुभाव सों चिदातमा के,
सहज सुभाव को आच्छाद करि लेत है।
नर तिरजंच नरकौर देवगति माहिं,
नाना परकार काय सोई निरमेत है॥
जैसे दीप अगनि सुभाव करि तेल को सु-
भाव दूर करिके प्रकाशित धरेत है।
ज्ञानावरनादि कर्म जीव को सुभाव घाति,
मनुष्यादि परजाय तैसे ही करेत है॥९०॥

नाम नावाचे कर्म आपल्या स्वभावाद्वारे आत्म्याच्या सहज स्वभावाला आच्छादित करते व मनुष्य, तिर्यंच, नरक आणि देवगतीमध्ये अनेक प्रकारची शरीर उत्पन्न करते.

ज्याप्रमाणे दिवा आपल्या जाळण्याच्या स्वभावाद्वारे तेलाच्या स्वभावाचा पराभव करून प्रकाश पसरवितो; त्याप्रमाणे ज्ञानावरणादी कर्म जीवाच्या स्वभावाचा घात करून मनुष्यादी पर्याय उत्पन्न करतात.

पंडित देवीदासर्जीनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(कवित्त)

नामकर्म तिहि कौ सुभाव गति नारकादि परिनमन अनादि।
जासौं सुद्ध स्वरूप जीव कौ राख्यौ निज स्वभाव आछादि॥
नर नारक तिरजंच देव के करि स्वरूप गति गति उतपादि।
यह संसार रूप दुखदाइक अचल वोझु सिर दियो सु लादि॥४६॥

नामकर्माचा स्वभाव हाच आहे की ते जीवाला अनादी काळापासून चार गतींमध्ये परिभ्रमण करवित आहे. यामुळे जीवाचा शुद्धस्वभाव आच्छादित झाला आहे. याने मनुष्य, देव, नरक व तिर्यंच गतीत उत्पन्न करवून आत्म्यावर दुखदायक संसाररूप अचल ओझे लादले आहे.

स्वामीजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''जडकर्माचे फळ चार गतिरूप संसार आहे. संसाराच्या चार गतिंचे मूळ कारण तर 'पुण्य-पाप माझे आहेत' – असा अज्ञानभावच आहे. जेवढ्या प्रमाणात जीव मोह-राग-द्वेषरूप परिणाम करतो, तेवढ्या प्रमाणात जडकर्मांचा त्यांच्यामुळे स्वत: बंध होतो व त्या प्रमाणात गती-जाती वगैरे प्रकृतीही बांधल्या जातात.[१] संपूर्ण ज्ञान सिद्धदशेचे कारण आहे व तीव्र अज्ञान निगोददशेचे कारण आहे.[२]

विभाव संयोगात नसतो, विभाव निमित्तात (कर्म) नसतो, तसेच विभाव आपल्या त्रिकाळी स्वभावातही नसतो, विभाव तर आपल्या एका समयाच्या अवस्थेत आपल्या भावामुळेच असतो.[३] आत्मा आपल्या ज्ञाता-दृष्टा स्वभावाला विसरतो व परपदार्थात आपलेपणा मानून मोहरूपी क्रिया करतो. असे निमित्त मिळाल्याने जडकर्म बांधली जातात व जडकर्माच्या फळस्वरूपी मनुष्यादी पर्याय मिळतात; म्हणून कर्माच्या स्वभावाने जीवाच्या स्वभावाचा पराभव झाला – असे म्हटले जाते.[४]''

वरील कथनाचा सारांश हा की या मनुष्यादी पर्याय राग-द्वेषमय क्रियांच्या फळस्वरूपी प्राप्त झाल्या आहेत; कारण त्या क्रियांनी कर्मबंध होतो व कर्म जीवाच्या स्वभावाचा पराभव करून मनुष्यादी पर्याय उत्पन्न करतात. अशाप्रकारे या जीवाचा संसार चालू आहे. जर या संसारसमुद्रातून पार व्हावयाचे असेल तर परलक्ष्याने उत्पन्न होणाऱ्या या मोह-राग-द्वेषांना आत्म्याचा आश्रय घेऊन निराश्रय केले पाहिजे, यांचा अभाव केला पाहिजे; कारण संसारदु:खांपासून मुक्त होण्याचा हाच एकमेव उपाय आहे. ●

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३६३
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३६४
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३६६
४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३६७

प्रवचनसार गाथा ११८

मागील गाथेत हे सांगितले होते की कर्म जीवाच्या स्वभावाचा पराभव करून मनुष्यादी पर्यायांना उत्पन्न करतात व या गाथेत हे स्पष्ट आहेत की मनुष्यादी पर्यायांमध्ये जीवाच्या स्वभावाचा पराभव कसा होतो ?

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

णरणारयतिरियसुरा जीवा खलु णामकम्मणिव्वत्ता।
ण हि ते लद्धसहावा परिणममाणा सकम्माणि ॥११८॥

(हरिगीत)

नाम नामक कर्म से पशु नरक सुर नर गती में।
स्वकर्म परिणत जीव को निजभाव उपलब्धि नहीं ॥११८॥

मनुष्य, नारक, तिर्यंच व देवरूप जीव वास्तविक पाहता नाम-कर्माने निष्पन्न आहेत. ते आपल्या कर्मरूपे परिणमित होतात; म्हणून त्यांना स्वभावोपलब्धी नाही.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी असा स्पष्ट केला आहे –

"ज्याप्रमाणे सोन्यामध्ये जडलेल्या माणिकांच्या कंगनामध्ये माणिकाच्या स्वभावाचा पराभव होत नाही; त्याचप्रमाणे या मनुष्यादी पर्याय नामकर्माने निष्पन्न झाल्या आहेत; परंतु एवढ्याने सुद्धा तेथे जीवाच्या स्वभावाचा पराभव होत नाही. तेथे जीव जो स्वभावाला प्राप्त करीत नाही, अनुभव करीत नाही; तो पाण्याच्या पुराप्रमाणे परिणमित झाल्याने स्वकर्मरूप आहे.

ज्याप्रमाणे पाण्याचा पूर प्रदेशाने व स्वादाने लिंबचंदनादी वनराजीरूप म्हणजेच कडुलिंब, चंदन वगैरे वनराईरूप (वृंक्षाचे घनदाट अरण्यरूप) परिणमित होत असताना आपल्या द्रव्यत्व व स्वादुत्वरूप स्वभावाला उपलब्ध करीत नाही; त्याप्रमाणे आत्मा सुद्धा प्रदेशाने व

भावाने स्वकर्मरूप परिणमित झाल्याने आपल्या अमूर्तत्व व निरूपराग विशुद्धीमत्वरूप स्वभावाला उपलब्ध करीत नाही.''

येथे आचार्य देवांनी 'माणिकाप्रमाणे' आणि 'पाण्याच्या पुराप्रमाणे' – अशाप्रकारे दोन उदाहरणे दिली आहेत.

माणिकाला सोन्यामध्ये जडले असता माणिकाचा पराभव होत नाही. सोने सुद्धा दिसते व माणिक सुद्धा दिसतो. अशाप्रकारे मनुष्यपर्यायामध्ये भगवान आत्मा जणु सोन्यात जडलेला माणिक आहे; त्यामध्ये मनुष्यपर्याय व भगवान आत्मा दोन्ही वेगवेगळे चमकत आहेत.

जसे सोन्यामध्ये जडल्याने माणिकाचा पराभव होत नाही; तसेच भगवान आत्म्याचा मनुष्यादी पर्यायामध्ये राहिल्याने पराभव होत नाही.

येथे असा प्रश्न उत्पन्न होतो की पराभवाचे मूळ कारण काय आहे ?

याचे उत्तर देताना आचार्यांनी पाण्याच्या पुराचे उदाहरण दिले आहे.

हिमालयातून निघालेले पाणी निर्मळ असते, परंतु ते जंगलातील कडुलिंब, चंदन वगैरे झाडाजवळून वहात जाते. ते पाणी चंदनाच्या वनातून वाहून बाहेर येते तर सुगंधित होते व तेच पाणी कडुलिंबाच्या वनराईतून वाहते तेव्हा कडू होते. यामध्ये त्या पाण्याचा मूळ गंध रहात नाही व त्याचा मूळ स्वभावही रहात नाही. अशाप्रकारे त्या पाण्याचा पराभव झाला, कारण त्याचा मूळ स्वभाव तिरोहित झाला. अशातऱ्हेने आत्म्याचा पराभव या मनुष्यपर्यायामध्ये जोडल्याने झाला आहे. हा आत्मा मोह-राग-द्वेष भावात गेला आहे, म्हणून त्याचा पराभव झाला आहे. येथे हे विशेष आहे की आचार्यदेव संयोगावर अपराधाचे खापर फोडत नाहीत.

आचार्य येथे सांगत आहेत की पाणी चंदन व कडुलिंबामध्ये गेलेले आहे म्हणजेच चंदन व लिंबामध्ये सुद्धा पाणीपणा, ओलावा आहे. जर लिंबाचा आणि चंदनाचा रस काढला तर यात पाण्याने तीन गोष्टी गमावल्या आहेत. पाण्याने आपला स्वाद गमावला आहे, आपला गंध गमावला आहे व प्रवाही स्वभावही गमावला आहे; कारण ते पाणी वृक्षांमध्ये गेले व तेथेच रमले. पाण्याचा जो वाहण्याचा स्वभाव

होता, तो समाप्त झाला; जेवढे पाणी त्या झाडांनी शोषून घेतले, त्या पाण्याचा प्रवाही स्वभाव समाप्त झाला. पाण्याचा मूळ स्वाद राहिला नाही, कडुलिंबाच्या संयोगाने कडू झाला. अशाप्रकारे गंधामध्ये सुद्धा परिवर्तन झाले. त्याप्रमाणे आत्मा देखील प्रदेशाने व भावाने स्वकर्मरूप परिणमित झाल्याने अमूर्तत्वापासून मूर्तत्वात बदलला, तेव्हा तो अमूर्तत्व, निरूपराग विशुद्धिमत्वरूप स्वभावाला उपलब्ध करीत नाही. हेच जीवाच्या समस्येचे मूळ कारण आहे.

अशाप्रकारे हे सिद्ध झाले की आत्मस्वभावाच्या पराभवाचे कारण शरीरादिंचा संयोग नसून शरीरादी संयोगांमध्ये आत्म्याचा आपलेपणा आहे, त्यांना आपले जाणणे-मानणे, त्यांच्याशी जोडले जाणे आहे, त्यांच्यामध्येच रममाण होणे आहे.

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेत पूर्णपणे तत्त्वप्रदीपिकेचे अनुकरण केले आहे, येथवर की उदाहरणेही तीच दिली आहेत.

वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मनहरण कवित्त)

नामकर्म निश्चे यह जीव को मनुष्य पशु,
नारकी सु देवरूप देह को बनावै है।
तहां कर्मरूप उपयोग परिनवै जीव,
सहज सुभाव शुद्ध कहूँ न लहावै है॥
जैसे जल नीम चंदनादि माहिं गयौ सो,
प्रदेश और स्वाद निज दोनों न गहावै है।
तैसे कर्मभाव परिनयौ जीव अमूरत,
चिदानंद वीतराग भाव नाहिं पावै है॥९१॥

ही बाब अगदी नक्की आहे की नामकर्म जीवाच्या मनुष्य, तिर्यंच, नारकी व देवरूप देहाला बनविते. तेथे जीव आपल्या उपयोगालाही त्यारूपाने परिणमित करतो. तात्पर्य हे आहे की तो असेच जाणू-मानू लागतो की मी मनुष्य वगैरे आहे. अशाप्रकारे तो सहज स्वाभाविक

शुद्धतेला प्राप्त करीत नाही. ज्याप्रमाणे कडुलिंब व चंदनादी वृक्षांमध्ये गेलेले पाणी प्रदेश व स्वाद – या दोहोंना प्राप्त करीत नाही, तसेच कर्मभावाने परिणमित अमूर्तिक जीव वीतरागभावाला प्राप्त करीत नाही.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(छप्पय)

नरगति गति तिरजंच देव गति गति सु नारकिय।
नाम कर्म तिहि के निमित्त करि कैं सु होत जिय॥
निश्चयकरि जे करे कर्म आपु करि कै सु छांही।
तिनि स्वरूप परिनमन जीव परिनाम सु नाहीं॥
ज्यौं नीम चंदनादिक विषैं सहज स्वाद जलु परिहरै।
त्यौं चिदानंद तजि कैं सु पद कर्मरूप परनति धरैं॥४७॥

या जीवाला मनुष्य, तिर्यंच, देव व नरकगती गतीनामकर्माच्या निमित्ताने मिळते. निश्चयनयाने पाहिले तर जीव स्वत:च मोहादीने आच्छादित होऊन जे कर्म करतो, त्यानुसारच या मनुष्यादी गतीरूप परिणमित होतो. मनुष्यादीरूप परिणमन करणे जीवाचा स्वभाव आहे. ज्याप्रमाणे कडुलिंब व चंदनादी वृक्षांमध्ये गेलेले पानी आपल्या स्वादाला सोडून देते, त्याचप्रमाणे हा चिदानंद आपल्या स्वभावाला सोडून कर्मानुसार परिणमित होतो.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजी स्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"ज्याप्रमाणे सोन्यामध्ये जडलेल्या माणिकवाल्या कंकणामध्ये माणिक सोन्यामध्ये जडलेले आहे; परंतु त्यामुळे माणिकाचा स्वभाव बदलत नाही. त्याचप्रमाणे जीवाला मनुष्यादी शरीर एकक्षेत्रावगाह संबंधामुळे मिळाले आहे. यामुळे जीव विकारी होत नाही, म्हणजेच शरीरामुळे जीवाचा ज्ञाता-दृष्टा स्वभाव नष्ट होत नाही.[१]

ज्याप्रमाणे पाण्याच्या पुराची व्यंजनपर्याय अर्थात आकृतीचा

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३६९-३७०

स्वभाव तर पूररूपाने वाहणे आहे व अर्थपर्याय म्हणजेच स्पर्श, रस, गंध वगैरेची पर्याय तर स्वादिष्टरूप राहणे आहे; तरी देखील ते स्वत:च्या योग्यतेमुळे कडुलिंब व चंदन वगैरे वृक्षांबरोबर परिणमित होतो.

पाणी ऊंच व रुंदरूप आकार व कडू किंवा सुगंध वगैरे पर्यायरूप स्वत:मुळेच परिणमित होते. लिंबाच्या झाडामुळे पाणी वर चढत नाही किंवा कडू होत नाही, तर पाणी स्वत:च्या योग्यतेने तसे परिणमित होते. यामुळे प्रवाहरूप राहणे पाण्याचा मूळ आकार आहे, तसेच स्वादिष्टरूप होणे सुद्धा पाण्याचा मूळ स्वभाव आहे, त्याला ते प्राप्त करीत नाही.

त्याचप्रमाणे आत्मा स्वत: आपल्या योग्यतेने विभावव्यंजन पर्यायरूप म्हणजेच वेगवेगळ्या आकाराने मनुष्य, देवादी आकाररूप परिणमित होतो व ज्ञान-दर्शनाच्या हीन अवस्थारूप तसेच राग-द्वेष अवस्थारूप स्वत:च्या योग्यतेने परिणमित होतो. यामुळे आपल्या अरूपित्व व निर्विकार विशुद्ध अशा स्वभावाला प्राप्त होत नाही.[१]

गाथा ११६ व ११७ मध्ये जीवाची अर्थपर्याय दाखविली होती च ११८ व्या गाथेत व्यंजनपर्याय व अर्थपर्याय या दोहोंना सांगितले आहे.[२]

हा ज्ञेय अधिकार आहे. ज्ञेयाची एकेक समयाच्या व्यंजनपर्याय आणि अर्थपर्याय कशा स्वतंत्र असतात, याचे यथार्थ ज्ञान करवितात.[३]''

अशाप्रकारे ही गाथा व तिच्या टीकेमध्ये सोन्यात जडलेल्या माणिकाचे आणि पाण्याच्या पुराचे उदाहरण देऊन हे समजाविले आहे की भगवान आत्म्याची ही संसार अवस्थारूप दुर्दशा देहादी संयोगामुळे झालेली नाही, तर त्याच्या विभाव स्वभावामध्येच अशी योग्यता विद्यमान होती, त्यामुळेच हे सर्व झाले आहे. तात्पर्य हे आहे की परद्रव्यामुळे सुख-दु:ख होत नसते तर स्वत:मुळेच होते. ●

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३७०
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३७१
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३७१

प्रवचनसार गाथा ११९

आता या गाथेमध्ये हे सांगत आहेत की जीवद्रव्य द्रव्यरूपाने अवस्थित असून देखील पर्यायरूपाने अनवस्थित आहे.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

जायदि णेव ण णस्सदि खणभंगसमुब्भवे जणे कोई।
जो हि भवो सो विलओ संभवविलय त्ति ते णाणा ॥११९॥

(हरिगीत)

उत्पाद-व्यय ना प्रतिक्षण उत्पाद-व्ययमय लोक में।
अन-अन्य हैं उत्पाद-व्यय अर अभेद से हैं एक भी ॥११९॥

प्रत्येक समयाला उत्पाद व विनाशयुक्त जीवलोकात कोणी उत्पन्न होत नाही व कोणी नष्टही होत नाही, कारण जो उत्पाद आहे, तोच विनाश आहे. अशाप्रकारे उत्पाद व विनाश एकही आहेत व अनेक सुद्धा आहेत.

आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिकेत या गाथेतील भाव पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

''जरी या विश्वात कोणी जन्म घेत नाही व मरतही नाही; तरीही मनुष्य, देव, तिर्यंच व नारकात्मक जीवलोक प्रत्येक समयाला परिणामी असल्याने क्षणा-क्षणाला होणाऱ्या विनाश व उत्पादाशीही जोडलेला आहे.

यामध्ये कोणता विरोधही नाही, कारण उद्‌भावामध्ये व विलयात एकता व अनेकता आहे. जेव्हा उत्पाद व विनाशाच्या एकतेची अपेक्षा ग्रहण करतात, तेव्हा निष्कर्ष निघतो की कोणी उत्पन्न होत नाही व नष्ट होत नाही व जेव्हा उत्पाद व विनाशाच्या अनेकतेची विवक्षा घेतली जाते, तेव्हा प्रत्येक क्षणाला होणाऱ्या विनाशाचा व उत्पादाचा निष्कर्ष निघतो.

ते पुढीलप्रमाणे आहे – ज्याप्रमाणे 'जो घडा आहे, तीच कुंडी आहे' – असे म्हटले असता घडा व कुंडी यांच्या स्वरूपाची एकता असंभव असल्याने त्या दोहोंची आधारभूत अशी माती प्रगट होते; त्याचप्रमाणे 'जो उत्पाद आहे, तोच विनाश आहे' – असे म्हटले

असता उत्पाद व विनाश यांच्या स्वरूपाची एकता असंभव असल्याने त्या दोहोंचे आधारभूत असे ध्रौव्य प्रगट होते; म्हणून देवपर्याय उत्पन्न व मनुष्यादी पर्याय नष्ट झाली असता 'जो उत्पाद आहे, तोच विलय आहे' – या अपेक्षेने त्या दोहोंचे आधारभूत असे ध्रौव्यवान जीवद्रव्य प्रगट होते म्हणजेच लक्षात येते; म्हणून सदैव द्रव्यपणे जीव टंकोत्कीर्ण राहतो.

जसे 'घडा अन्य आहे व कुंडी अन्य आहे' – असे म्हटले असता त्या दोहोंच्या आधारभूत अशा मातीचा अन्यपणा असंभव असल्याने घड्याचे व कुंडीचे भिन्न-भिन्न स्वरूप प्रगट होते, तसेच 'उत्पाद अन्य आहे व व्यय अन्य आहे' – असे म्हटले असता त्या दोहोंच्या आधारभूत अशा ध्रौव्याचा अन्यपणा असंभव असल्याने उत्पाद व व्यय यांचे भिन्न स्वरूप प्रगट होते; म्हणून देवादी पर्याय उत्पन्न झाल्या असता व मनुष्यादी पर्याय नष्ट झाल्या असता 'उत्पाद अन्य आहे व व्यय अन्य आहे' या अपेक्षेने उत्पाद व व्ययवाली देवादी पर्याय व मनुष्यादी पर्याय प्रगट होतात, लक्षात येतात; म्हणून जीव प्रत्येक समयाला पर्यायाने अनवस्थित आहे.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीत या गाथेतील भाव स्पष्ट करताना नयाचा वापर करून निष्कर्ष असा काढला आहे की आत्मा द्रव्यार्थिक नयाने नित्य असूनही पर्यायार्थिकनयाने विनाशशील आहे. ही बाब स्पष्ट करण्याकरिता ते तत्त्वप्रदीपिकेमधील दिलेल्या उदाहरणाबरोबरच मोक्षमार्ग व मोक्षपर्याय यांच्यावर सुद्धा ही बाब घटित करतात.

या गाथेचा भाव कविवर वृंदावनदासजी एका छप्पय छंदाद्वारे खालीलप्रमाणे प्रस्तुत करतात –

(छप्पय)

इमि संसार मझार दरव के द्वार जु देखा।
तौ कोऊ नहिं नसत न उपजत यही विशेखा॥
जो परजै उतपाद होत सोई वय हो है।
उतपत वय की दशा विविध परजय में सोहै॥
धुव दरव स्वांग बहु धारिके गत गत में नाचत विगत।
परजय अधार निरधार यह दरव एक निजरस पगत॥

द्रव्यदृष्टिने पाहिले असता या विश्वात कोणी उत्पन्न होत नाही व कोणी नष्टही होत नाही; कारण पर्यायाचा जो उत्पाद आहे तोच व्यय आहे. उत्पाद व व्यय यांच्या दशा तर अनेक पर्यायामध्येच शोभायमान आहेत. ध्रुव द्रव्य त्यांचे सोंग धारण करून अनेक गतिमध्ये नाचत फिरते. पर्यायार्थिक नयाच्या आधारे असा निर्धार होतो; परंतु द्रव्यार्थिकनयाने तर द्रव्य एकमेव निजरसात तल्लीन आहे.

पंडित देवीदासजींनी प्रवचनसारभाषाकवित्तामध्ये या गाथेचा भाव १ कुंडलिया पद्याद्वारे प्रस्तुत केला आहे –

(कुण्डलिया)

विनसै छिन छिन प्रति सु जिय जाकी ही उतपत्य।
पुनि उपजै विनसै नहीं निश्चयनय करि सत्य॥
निश्चयनय करि सत्य जो सु उतपाद बताई।
सोई वस्तु विनास रूप ताथैं थिरताई॥
भेद लगै व्यवहार सौं सु जग मैं जिय जिन सै।
विविध भांति परजाय लियै उपजै अरु विनसै॥४८॥

ज्या जीवाचा उत्पाद व विनाश क्षणा-क्षणाला होतो, तोच जीव निश्चयनयाने उत्पन्न होत नाही व नष्टही होत नाही – हेच परमसत्य आहे. निश्चयनयाने जी वस्तू उत्पन्न होते, तीच वस्तू विनाशरूप आहे, त्यामुळे स्थिर आहे. निश्चयनयाने हेच सत्य आहे, परंतु व्यवहारनयाने भेद उत्पन्न केला जातो, तेव्हा अनेक प्रकारच्या पर्याय उत्पन्न व नष्ट होतात.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"जीव जसाच्या तसा राहतो म्हणजेच ध्रुवदृष्टिने पाहिले असता जीव अवस्थित आहे व क्षणाक्षणाला अवस्था बदलत आहे, म्हणून अवस्थादृष्टिने द्रव्य अनवस्थित आहे, अस्थिर आहे; परंतु कर्मामुळे अस्थिर आहे – असे म्हटलेले नाही.[१]

जसाच्या तसा रहावा हा जीवाचा द्रव्यस्वभाव आहे व पूर्व अवस्था दूर होऊन नवी अवस्था व्हावी हा जीवाचा पर्यायस्वभाव आहे.

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३७६

आत्मा आपल्या द्रव्य व पर्याय स्वभावाला यथार्थ समजेल तर तो आपला बंधु आहे व अज्ञानाने पराधीनता मानेल व समजणार नाही तर तो स्वत:चाच वैरी आहे.[१]

'जो घडा आहे, तीच सुरई आहे' – असे जर म्हणायचे असेल तर घड्याचे स्वरूप व सुरईचे स्वरूप वेगवेगळे आहे, त्याला एकत्व लागू होत नाही. जर घडा व सुरईमध्ये एकता सिद्ध करावयाची असेल तर मातीच्या अपेक्षेने त्यांच्यात एकता आहे, कारण माती दोहोंमध्ये अवस्थित आहे.

'जो उत्पाद आहे, तोच व्यय आहे' – जर असे म्हणावयाचे असेल, तर उत्पाद व नाशात द्वैत सिद्ध होते, एकत्व नव्हे; परंतु उत्पाद व नाश या दोहोंचे आधारभूत ध्रुव दोहोंत एकच आहे. ध्रुवात एकत्व सिद्ध होते, ते जसेच्या तसेच स्थिर राहते.[२]

'तसेच घडा अन्य व सुरई अन्य आहे' – असे म्हणायचे असेल तेव्हा दोहोंचा आधार अशी जी माती आहे, तिच्यात अनेकत्व सिद्ध होत नाही, परंतु घडा व सुरई यांचे अनेकत्व प्रगट होते. मातीत पर्यायदृष्टिने अनवस्थित-पणा असतो. माती घडारूप व सुरईरूपे तिच्या पर्याय स्वभावामुळे झाली आहे; कुंभार, चाक, दंड वगैरेच्या कारणाने अन्यरूप झालेली नाही.[३]

'अन्य उत्पाद आहे व अन्य विलय आहे' – असे म्हणावयाचे असल्यास त्या दोहोंचा आधार जे ध्रुव आहे, त्यामध्ये अनन्यपणा आहे, अन्यत्व असंभव आहे. उत्पाद व व्यय दोहोंना घेतल्यास त्या दोहोंचे स्वरूप वेगवेगळे आहे – हे निश्चित होते.[४]

जीवाच्या स्वत:च्या अनवस्थित पर्यायस्वभावामुळे पूर्व अवस्थेचा नाश होतो व नव्या अवस्थेचा उत्पाद होतो, परंतु परपदार्थांमुळे उत्पाद किंवा व्यय होतच नाहीत. उत्पाद-व्ययरूप होणे हे सर्व द्रव्यांचा पर्याय अपेक्षेने अनवस्थित धर्म आहे. येथे तर स्वभावाची चर्चा आहे.[५]

जीवामध्ये एकत्व पहावयाचे असल्यास त्यामध्ये ध्रुव स्वभावाने एकत्व आहे व जीवात अनेकत्व पहावयाचे असल्यास त्याच्या अध्रुव स्वभावाने अनेकत्व आहे.[६]''

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३७६
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३७७
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३७७
४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३७८
५) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३७८
६) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३७९

असे या गाथेत फक्त हेच सांगितले आहे की प्रत्येक द्रव्य अवस्थितही आहे व अनवस्थितही आहे; द्रव्यदृष्टिने अवस्थित आहे व पर्यायदृष्टिने अनवस्थित आहे. एकाच द्रव्यात एकाच वेळेस अवस्थित व अनवस्थित असण्यात कोणताही विरोध नाही; कारण हे दोन्ही प्रत्येक द्रव्याचे सहजस्वभाव आहेत. एक द्रव्यस्वभाव आहे व दुसरा पर्यायस्वभाव आहे.

द्रव्याचे अवस्थित व अनवस्थित होण्यात परद्रव्याचा कोणताही हातभार नाही, हस्तक्षेप नाही. ही बाब अशीही म्हटली जाऊ शकते की द्रव्यस्वभावाच्या दृष्टिकोणातून पाहिले तर उत्पाद व व्यय एकच आहेत; कारण ते द्रव्याचे सहज स्वभाव आहेत. द्रव्यात उत्पाद-व्यय होण्यासाठी पराच्या मदतीची आवश्यकता तर नाहीच, कर्मोदयाची अपेक्षाही नाही.

आता जर दोहोंना पर्यायस्वभावाकडून पाहिले तर ते वेगवेगळेच आहेत, एक नाहीत, कारण एकाचा स्वभाव उत्पन्न होणेरूप आहे व दुसऱ्याचा स्वभाव नष्ट होणेरूप आहे, एकाचा येण्याचा आहे तर दुसऱ्याचा जाण्याचा आहे.

हे सर्व आपणाला प्रत्यक्ष दिसून येते, त्यामुळे कोणत्याही प्रकारची शंका-कुशंका करण्याची गरज नाही. ●

निजात्म्याबद्दल अरुचीच त्याबद्दल अनंत क्रोध आहे. ज्याबद्दल आमच्या हृदयात अरुची असते, त्याची उपेक्षा आमच्याकडून सहजच होते. आपल्या आत्म्याला क्षमा करणे आणि क्षमा मागण्याचा आशय केवळ हाच आहे की त्याला जाणावे, ओळखावे आणि त्यातच रमावे. स्वत:ला क्षमा करणे आणि स्वत:ला क्षमा मागण्याकरिता वाणीच्या औपचारिकतेची आवश्यकता नाही. निश्चय क्षमावाणी तर स्वत:बद्दल सजग होणेच आहे. त्यामध्ये पराची अपेक्षा रहात नाही व आत्म्याच्या आश्रयाने क्रोधादी कषाय उपशांत झाल्यामुळे व्यवहार क्षमावाणी देखील सहजच प्रस्फुटित होते.

– धर्म के दशलक्षण, पृष्ठ-१८५

प्रवचनसार गाथा १२०

मागील गाथेत सांगितले होते की द्रव्य द्रव्यस्वभावाच्या अपेक्षेने अवस्थित असूनही पर्यायस्वभावाच्या अपेक्षेने अनवस्थितही आहे व आता या गाथेत हे सांगत आहेत की असे का आहे ? तात्पर्य हे की द्रव्याचे अनवस्थित असण्याचे कारण काय आहे ?

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

तम्हा दु णत्थि कोई सहावसमवट्ठिदो त्ति संसारे।
संसारो पुण किरिया संसरमाणस्स दव्वस्स॥१२०॥

(हरिगीत)

स्वभाव से ही अवस्थित संसार में कोई नहीं।
संसरण करते जीव की यह क्रिया ही संसार है॥१२०॥

यामुळे या विश्वामध्ये स्वभावाने अवस्थित असे कोणी नाही. तात्पर्य हे आहे की विश्वामध्ये कोणाचाही स्वभाव सदैव एकरूप राहणारा नाही; कारण संसार संसरणाचेच नाव आहे. तात्पर्य हे आहे की संसार संसरण करणाऱ्या परिवर्तनशील द्रव्याची क्रिया आहे.

या गाथेचा भाव अमृतचंद्रचार्यांनी खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''वास्तविक पाहता जीव द्रव्यपणे अवस्थित असूनही पर्यायांनी अनवस्थित आहे. यावरून लक्षात येते की संसारात कोणीही स्वभावाने अवस्थित नाही. तात्पर्य हे आहे की कोणत्याही द्रव्याचा स्वभाव फक्त एकरूप राहण्याचाच नाही. आणि आता या अनवस्थिततेचे मूळ कारण संसारच आहे, कारण ते मनुष्यादी पर्यायात्मक आहे, ते स्वरूपानेच तसे आहे. त्यामध्ये परिणमित द्रव्याच्या पूर्वोत्तर दशेच्या त्याग-ग्रहणरूप क्रियेचे नावच संसार आहे, हेच संसाराचे स्वरूप आहे.''

या गाथेतील भाव आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेत आचार्य अमृतचंद्रांच्या तत्त्वप्रदीपिका टीकेनुसारच स्पष्ट केला आहे.

या गाथेतील भाव कविवर वृंदावनदासजींनी १ छप्पय व १ मनहरण कवित्त अशा २ छंदांद्वारे पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे –

(छप्पय)

तिस कारन संसार माहिं थिर दशा न कोई।
अथिररूप परजैसुभाव चहुंगति में होई॥
दरवनि की संसरनक्रिया संसार कहावै।
एक दशा को त्यागि, दुतिय जो दशा गहावै॥
या विधि अनादि तैं जगत में तन धरि चेतन भमत है।
निज चिदानंद चिद्रूप के ज्ञान भये दुख दमत है॥८३॥

मागील गाथेमध्ये सांगितलेल्या कारणांनी ही बाब सिद्ध होते की विश्वामध्ये कोणतीही दशा स्थिर नाही, कारण चतुर्गतिमध्ये पर्यायाचा स्वभाव अस्थिरच असतो. एक दशा सोडून दुसरी दशा ग्रहण करणेरूप द्रव्यांच्या संसरण क्रियेचे नावच तर संसार आहे.

अशाप्रकारे या संसारामध्ये अनादी काळापासून हा चेतन आत्मा शरीर धारण करून परिभ्रमण करीत आहे व चैतन्यस्वरूप निज चिदानंद आत्म्याचे ज्ञान झाले असता दु:खाचे दमन होते.

(मनहरण कवित्त)

ताही तैं जगतमाहिं ऐसो कोऊ काय नाहिं,
जाको अवधारि जीव एकरूप रहैगो।
याको तो सुभाव है अथिररूप सदा ही को,
ऐसो सरधान धरै मिथ्यामत बहैगो॥
जीव की अशुद्ध परनतिरूप क्रिया होत,
ताको फल देह धारि चारों गति लहैगो।
याको नाम संसार बखाने सारथक जिन,
जाकी भवथिति घटी सोई सरदहैगो॥९४॥

यामुळेच या विश्वात असा कोणी शरीरधारी नाही, ज्याच्या आधारे जीवाची एकरूपता निर्धारित केली जाऊ शकेल; कारण याचा स्वभाव तर सदैव अस्थिरच आहे. अशी श्रद्धा करणारा मिथ्या मान्यतेला सोडेल. जीवाची जी अशुद्ध परिणतीरूप क्रिया होते, त्याचे फळ देहधारी प्राणी

चारही गतिंमध्ये फिरून-फिरून प्राप्त करेल. याचेच नाव संसार आहे व हे नाव सार्थक आहे; कारण संसरणालाच तर संसार म्हणतात. या बाबीवर विश्वास तोच करेल ज्याचा संसारात राहण्याचा काळ थोडासाच उरला आहे.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे –

(सवैया इकतीसा)

जीव द्रव्य है सु जाथैं जद्यपि सु थिर आप
परजाय भेदसौं तथापि सो अथिर है।
कोई भी सुभाव विधि कौन हुँ न थिर रूप
न ही नर-नारकादि की सु गति चिर है॥
भ्रम्यौ जीव पर्‌यो सो विभावता के चक्रमांहि
पाटि वांधि जैसे कोल्हू कौ सु बैल फिर है।
पीछिली दसा कौं त्यागि आगली दसा सौं लागि
जल मैं कलोल ज्यों झकोर तव हि रहै॥४९॥

जरी जीवद्रव्य द्रव्यस्वभावाने स्वयं सुस्थिर (अवस्थित) आहे, तरीही पर्यायभेदाने अस्थिर (अनवस्थित) सुद्धा आहे. स्वभावाने कोणतीही वस्तू स्थिर नाही, कारण नर-नारकादी पर्याय चिरकाळापासून नाहीत. विभावतेच्या चक्रात फसून हा संसारी जीव चार गतीरूप संसारामध्ये त्याचप्रमाणे भ्रमण करीत आहे, जसे डोळ्यावर पट्टी बांधून घाणीचा बैल एकाच वर्तुळात गोल-गोल फिरत असतो.

ज्याप्रमाणे समुद्राच्या पाण्यात दगड फेकला असता तरंगे उत्पन्न होतात व नष्ट होतात, तसेच हा जीव पूर्वपर्याय सोडून नवीन पर्यायीला धारण करून परिभ्रमण करीत राहतो.

स्वामीजींनी या गाथेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"आत्म्याचा शुद्ध स्वभाव ज्ञानानंद आहे. या स्वभावाला विसरूनच तो पर्यायात विकारी भाव करतो, तो संसार आहे. स्त्री, कुटुंब वगैरे संसार नाही. तसेच आपल्या द्रव्य-गुणामध्येही संसार नाही. द्रव्य-गुण तर शुद्धच आहेत, स्वत:च्या पर्यायामध्ये चार गतिंचे असणे हाच संसार आहे.[१]

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३८०

संसार दोन समयाचा नाही, तो एकाच समयाचा आहे. पूर्वीच्या संसाराचा व्यय होऊन नवा संसार उत्पन्न होतो. संसार स्थित एकरूप राहणे त्याचा स्वभावच नाही.[१] निगोदापासून चौदाव्या गुणस्थानापर्यंत संसार आहे, तो आपल्या आत्म्याच्या अपराधामुळे आहे, कर्म किंवा शरीर वगैरे संसाराचे कारण नाहीत. द्रव्यदृष्टिने आत्म्यामध्ये संसार नाहीच आणि पर्यायदृष्टिने अवस्थेमध्ये संसार आहे. येथे जीवाचे एकरूप न राहणेच संसाराचे कारण आहे. मनुष्याचे शरीर मनुष्यगति नाही, तर आत्म्यामध्ये मनुष्यरूप होण्याच्या योग्यतेचे नावच मनुष्यपर्याय आहे.[२]

परवस्तू तर आत्म्यात अत्यंत अभावस्वरूप आहे, ती तर सुटली आहे. कर्म, शरीर, पुत्रादी अभावस्वरूपच आहेत, त्यांचा त्याग काय करावा ? ज्ञाता-दृष्टा स्वभावाला विसरून शरीर, स्त्री, पुत्रादी माझे आहेत – असा ममताभाव पर्यायात ग्रहण करतो व पूर्वीचे विकारी भाव त्यागतो. अशा अज्ञान, राग, द्वेषाच्या परिणामांना व गतिच्या योग्य परिणामास संसाराची एका समयाची विकारी क्रिया म्हटले आहे.[३]

'मी स्वत: ज्ञानानंदस्वभावी आहे' – असे ज्ञान तर होतेच म्हणजेच अभिप्रायाने संसार सुटला होता; परंतु अस्थिरतेच्या राग-द्वेषांना सोडून आत्म्यात स्थिर झाल्यावरच त्यांनी कुटुंबादी सोडले – असे म्हटले जाते.[४]

येथे देखील कर्मामुळे संसार नाही; कारण जर कर्मामुळे संसार असेल तर कर्म सुटल्यावर संसार सुटेल. आपल्या अज्ञानभावांमुळे संसार आहे; अज्ञान सोडल्यावर संसार सुटून निर्विकारी दशा प्राप्त होते.[५]''

जरी या गाथेत हेच सांगितले आहे की प्रत्येक द्रव्याप्रमाणे आत्माही द्रव्यदृष्टिने अवस्थित (सदैव एकरूप) व पर्यायदृष्टिने अनवस्थित (प्रत्येक समयी परिवर्तनशील) आहे; तरीही येथे अवस्थित असण्याच्या अपेक्षेने अनवस्थित असण्यावरच अधिक जोर दिला आहे.

तात्पर्य हे आहे की येथे पर्यायदृष्टिच्या मुख्यतेने कथन केलेले आहे. गाथा व टीका दोहोंच्या प्रतिपादनाचा ओघ असाच आहे. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३८१
२) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३८१
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३८२
४) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३८२
५) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३८२

प्रवचनसार गाथा १२१

विश्वामध्ये कोणी सर्वथा अवस्थित नाही – मागील गाथेमध्ये हे सांगितल्यानंतर आता या गाथेमध्ये सांगत आहेत की या विश्वामध्ये आत्म्याशी देहाचा काय संबंध आहे ? मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

आदा कम्ममलिमसो परिणामं लहदि कम्मसंजुत्तं।
दत्तो सिलिसदि कम्मं तम्हा कम्मं तु परिणामो॥१२१॥

(हरिगीत)

कर्ममल से मलिन जिय पा कर्मयुत परिणाम को।
कर्मबंधन में पड़े परिणाम ही बस कर्म हैं॥१२१॥

कर्माने मलीन झालेला आत्मा कर्मसंयुक्त परिणामांना प्राप्त करतो; त्याला कर्म चिकटतात; म्हणून परिणामच कर्म आहेत.

गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"द्रव्यकर्म चिकटण्याचे कारण आत्म्याचा संसार नामक विकारी परिणाम आहे.

आता प्रश्न उभा राहतो की वरील परिणामाचे कारण कोण आहे ?

त्याच्या उत्तरादाखल म्हटले की त्याचे कारण द्रव्यकर्म आहे, कारण द्रव्यकर्माच्या संयोगानेच संसार नामक विकारी परिणाम आढळून येतो.

येथे प्रश्न उपस्थित होतो की असे मानल्याने तर इतरेतराश्रय दोष येईल?

उत्तरादाखल आचार्यांनी म्हटले की असे होणार नाही; कारण अनादीसिद्ध द्रव्यकर्माबरोबर संबंध असलेल्या आत्म्याचे जे आधीचे द्रव्यकर्म आहे, त्यालाच येथे कारण म्हटले आहे. अशाप्रकारे नवीन द्रव्यकर्म ज्याचे कार्य व जुने द्रव्यकर्म ज्याचे कारण आहे – आत्म्याचा असा परिणाम उपचाराने द्रव्यकर्मच आहे व आत्माही आपल्या परिणामाचा कर्ता असल्याने द्रव्यकर्माचाही कर्ता उपचाराने आहे."

आचार्य जयसेनांनी सुद्धा तात्पर्यवृत्तीमध्ये या गाथेचा भाव स्पष्ट करताना आचार्य अमृतचंद्रांचेच अनुसरण केले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी ही गाथा व टीकेतील भाव बारा दोहे व दोन मनहरण कवित्त अशा एकूण १४ छंदांच्या माध्यमातून समजाविला आहे, ते मुळातून पठनीय आहेत. विस्तारभयामुळे त्या सर्वांना येथे देणे शक्य नाही, तरी सुद्धा नमुन्यादाखल काही छंद प्रस्तुत आहेत –

(दोहा)

तुम भाषत हो हे सुगुरु जीवकरमसंजोग।
सो क्या प्रथम पृथक हुते पाछे भयो नियोग॥१०३॥
जासु नाम संजोग है ताको तो यह अर्थ।
जुदी वस्तु मिलि एक है कीजे अर्थ समर्थ॥१०४॥

हे गुरुदेव! आपण **'जीवकरमसंयोग'** या शब्दाचा वापर केला आहे. तर काय हे जीव व कर्म अगोदर वेगवेगळे होते व नंतर त्यांचा संयोग झाला; कारण संयोग शब्दाचा अर्थ होतो की वेगवेगळ्या वस्तू मिळून एक होतात. म्हणून कृपा करून याचे मर्म आम्हाला समजावऊन सांगावे.

(मनहरण कवित्त)

जैसे तिलीमाहिं तैल आगि है पखानमाहिं,
छीरमाहिं नीर हेम खानि में समल है।
इन्हैं जब कारन तैं जुदे होत देखैं तब,
जानै जो मिलापहू में जुदे ही जुगल है॥
तैसे ही अनादि पुग्गलीक दर्व करम सों,
जीव को संबंध लसै एक थल रल है।
भेदज्ञान आदि शिव साधन तैं न्यारो होत,
ऐसे निरबाध संग सधत विमल है॥१०५॥

ज्याप्रमाणे तिळांमध्ये तेल, दगडात अग्नी, दुधात पाणी व खाणीमध्ये समल सोने प्रारंभीपासूनच आहे; कारण मिळाल्यावर हे वेगवेगळे होतात, तेव्हा माहित पडते की हे मिळालेले असूनही वेगवेगळे होते.

त्याप्रमाणे पौद्गलिक द्रव्यकर्मांशी जीवाचा एकक्षेत्रावगाह संबंध

अनादी काळापासूनच आहे. भेदज्ञानपर्वूक शिवसाधन केले असता हे वेगवेगळे होतात. अशाप्रकारे यांचा संयोग निर्बाध सिद्ध होतो.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव असाच स्पष्ट केला आहे.

स्वामीजींनी या गाथेतील भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

अशुद्ध उपादान किंवा आपली एका समयाची विकारी योग्यता नव्या द्रव्यकर्मबंधाचे कारण आहे.

आता अशुद्ध उपादानाचे निमित्त कोण आहे – ते सांगतात. जुने द्रव्यकर्म अशुद्धतेचे निमित्त आहे. स्वत: आपल्या ज्ञाता-दृष्टा स्वभावाला विसरतो व संयोगाचा आश्रय घेऊन राग-द्वेष करतो, तेव्हा जुने द्रव्यकर्म कारण म्हणजेच निमित्त आहे – असे म्हटले जाते. उपादान कारण तर स्वत:ची योग्यता व निमित्त कारण जडकर्म आहे.[१]

विकारी परिणाम नसतील तर पूर्वकर्म निमित्तही म्हटले जाणार नाहीत व नवीन कर्मही बांधली जात नाहीत. परंतु जेव्हा विकारी परिणाम करतो, त्यामुळे नवीन कर्मांचे बंधन त्यांचे कार्य आहे व पूर्वीचे द्रव्यकर्म त्यांचे कारणभूत आहेत. असे आत्म्याचे परिणाम असल्याने भावकर्माला द्रव्यकर्माचे कारण उपचाराने म्हटले जाते.[२]''

या गाथेमध्ये हेच सांगितले आहे की जुने द्रव्यकर्म जेव्हा उदयाला येते, तेव्हा त्या निमित्ताने व आपल्या अशुद्ध उपादानाने मोह-राग-द्वेषरूप भावसंसार होतो. वरील मोह-राग-द्वेष भावांच्या निमित्ताने व स्वत:च्या योग्यतेने पौद्गलिक कार्माण वर्गणा कर्मरूपाने परिणमित होऊन आत्म्याशी बांधल्या जातात.

'द्रव्यकर्माने भावकर्म व भावकर्माने द्रव्यकर्म' – असे मानले असता अर्थात द्रव्यकर्मांची भावकर्माच्या आश्रयाने व भावकर्मांची द्रव्यकर्माच्या आश्रयाने उत्पत्ती मानली तर इतरेतराश्रय दोष येऊ शकतो; परंतु येथे हा दोष नाही; कारण ज्या द्रव्यकर्माच्या उदयाने भावकर्म झाले, त्या भावकर्माच्या उदयाने बांधले जाणारे द्रव्यकर्म तेच नाहीत तर नवीन आहेत, त्यामुळे वरील मान्यता पूर्णपणे निर्दोष आहे. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३८४ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३८७

प्रवचनसार गाथा १२२

मागील गाथेत द्रव्यकर्माने भावकर्म व भावकर्माने द्रव्यकर्म कशाप्रकारे उत्पन्न होतात – हे स्पष्ट केल्यानंतर आता या गाथेत हे स्पष्ट करतात की आत्मा भावकर्माचा कर्ता तर आहे; परंतु द्रव्यकर्माचा कर्ता कदापी नाही.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

परिणामो सयमादा सा पुण किरिय त्ति होदि जीवमया।
किरिया कम्म त्ति मदा तम्हा कम्मस्स ण दु कत्ता ॥१२२॥

(हरिगीत)

परिणाम आत्मा और वह ही कही जीवमयी क्रिया।
वह क्रिया ही है कर्म जिय द्रवकर्म का कर्ता नहीं ॥१२२॥

परिणाम स्वत: आत्मा आहे आणि ती जीवमय क्रिया आहे. क्रियेला कर्म मानले गेले आहे; त्यामुळे आत्मा द्रव्यकर्मांचा कर्ता नाही.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''आत्म्याचा परिणाम वास्तविक पाहता आत्माच आहे; कारण परिणामाच्या स्वरूपाचा कर्ता असल्याने परिणामी परिणामाशी अनन्य आहे आणि जो त्याचा तथाविध परिणाम आहे; ती जीवमयी क्रिया आहे, कारण सर्व द्रव्यांची परिणामलक्षण क्रिया आत्ममयतेनेच (निजमयतेनेच) स्वीकार केलेली आहे.

जीवमयी क्रिया आत्म्याद्वारे स्वतंत्ररूपे प्राप्य अर्थात प्राप्त करण्यायोग्य असल्याने कर्म आहे; म्हणून परमार्थाने आत्मा आपल्या परिणामस्वरूप भावकर्माचा कर्ता आहे, पुद्गलपरिणामरूप द्रव्यकर्माचा जीव कर्ता नाही.

आता जर कोणी असे म्हणेल की – द्रव्यकर्माचा कर्ता कोण आहे ?

त्याच्या उत्तरार्थ म्हणतात की पुद्गलाचा परिणाम वास्तविक पाहता पुद्गलच आहे; कारण परिणामी परिणामाच्या स्वरूपाचा कर्ता असल्याने परिणामाशी अनन्य आहे, जो त्याचा तथाविध परिणाम आहे, ती

पुद्‌गलमयी क्रिया आहे; कारण सर्व द्रव्यांची परिणामस्वरूप क्रिया निजमय असते – असे स्वीकारले आहे. पुद्‌गलमयी क्रिया पुद्‌गलाद्वारे स्वतंत्ररूपे प्राप्य अर्थात प्राप्त करण्यायोग्य असल्याने कर्म आहे; त्यामुळे परमार्थाने पुद्‌गलपरिणामस्वरूप द्रव्यकर्माचाच कर्ता आहे; परंतु आत्म्याच्या परिणामस्वरूप भावकर्माचा नव्हे.

निष्कर्षाच्या स्वरूपात हे समजणेच योग्य आहे की आत्मा आत्मस्वरूपच परिणमित होतो, पुद्‌गलस्वरूप परिणमित होत नाही.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रकृत तत्त्वप्रदीपिका टीकेसमानच स्पष्ट केला आहे.

शेवटी त्यांनी निष्कर्ष-रूपात लिहिले की कथंचित परिणामी असल्याने जीवाचे कर्तापण सिद्ध आहे, तरीही निश्चयनयाने तो आपल्या परिणामांचाच कर्ता आहे, पुद्‌गलकर्मांचा कर्ता तर व्यवहाराने म्हटला जातो.

जेव्हा जीव शुद्धोपादान कारणरूप शुद्धोपयोगाने परिणमित होतो, तेव्हा मोक्षास प्राप्त करतो आणि अशुद्धोपादान कारणरूप अशुद्धोपयोगरूप परिणमित होतो, तेव्हा बंधास प्राप्त होतो.

जीवांसमान पुद्‌गलही निश्चयनयाने आपल्या परिणामांचा कर्ता आहे आणि व्यवहारनयाने जीवाच्या परिणामांचा कर्ता म्हटला जातो.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव १ दोहा आणि २ मनहरण कवित्तांच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मनहरण कवित्त)

परिनामरूप स्वयमेव आप आतमा है,
जातैं परिनाम परिनामी में न भेद है।
सोई परिनामरूप क्रिया जीवमयी होत,
आपनी क्रिया तैं तनमयता अछेद है॥
जीव की जो क्रिया ताको भावकर्म नाम कह्यौ,
याको करतार जीव निहचै निवेद है।
तातैं दर्व करम को आतमा अकरता है।
याको करतार पुद्‌गल कर्म वेद है॥१०९॥

आत्मा स्वत: परिणामस्वरूप आहे, त्यामुळे परिणाम आणि परिणामीमध्ये अंतर नाही. प्रत्येक द्रव्याची आपल्या क्रियेशी तन्मयता असते, त्यामुळे जीवाची परिणमनरूप क्रिया जीवमयच असते.

जीवाच्या वरील क्रियेचे नावच भावकर्म आहे; त्यामुळे निश्चयाने त्याचा कर्ता जीवालाच म्हटले आहे. त्यामुळे आत्मा द्रव्यकर्मांचा अकर्ता आहे; कारण पुद्गलकर्मांचा कर्ता पुद्गलच आहे.

(दोहा)

भावकरम आतम करै यह हम जानी ठीक।
दरव करम अब को करै यह संदेह अधीक॥११०॥

आम्ही हे तर जाणलेच आहे की भावकर्मांचा कर्ता आत्मा आहे आणि हे योग्यच आहे; परंतु आता हे सांगा की द्रव्यकर्मांचा कर्ता कोण आहे ? आम्हाला याबद्दल अधिक शंका आहे.

(मनहरण कवित्त)

जैसे भावकर्म को करैया जीव राजत है,
पुग्गल न ताको करै कभी यों पिछानियौ।
निज निज भाव के दरब सब करता है,
पर के सुभाव को न करै कोऊ मानियौ॥
यह तो प्रतच्छ भेदज्ञान तैं विलच्छ देखो,
सबै निज कारज के करता प्रमानियौ।
दरव करम पुद्गल पिंड तातैं याको,
करतार पुग्गल दरव सरधानियौ॥१११॥

भावकर्माचा कर्ता जीव असतो, त्याचा कर्ता पुद्गल कधीही नसतो; कारण सर्व द्रव्य आप-आपल्या परिणामांचे कर्ता आहेत, परद्रव्यांच्या परिणामांना कोणीही करीत नाही – हे मानणेच योग्य आहे.

ही बाब तर भेदज्ञानाने वेगवेगळी करून प्रत्यक्ष दिसून येते की सर्व

द्रव्य निजकार्यांचे कर्ता आहेत. द्रव्यकर्म पुद्गलाचे स्कंध आहेत; त्यामुळे त्यांचा कर्ता पुद्गलालाच मानले पाहिजे.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव १ इकतीसा सवैया छंदातून अशाचप्रकारे स्पष्ट केला आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजी स्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"दया-दान-पूजेचे भाव जीव स्वत: करतो; त्यामुळे ते स्वत: आत्माच आहेत. समयसारमध्ये द्रव्यदृष्टी करविण्यासाठी राग आपले त्रिकाळी स्वरूप नाही, या अपेक्षेने रागाला अचेतन म्हटले आहे; परंतु येथे पर्यायांचे ज्ञान करवावयाचे आहे; त्यामुळे विकारी भावास जीवमयी म्हटले आहे; या क्रियेला कर्म मानले आहे, म्हणजेच त्याला भावकर्म म्हटले आहे. जीव त्याचा कर्ता आहे; परंतु द्रव्यकर्माचा कर्ता नाही.

जेवढ्या प्रमाणात जीव राग-द्वेष करतो, तेवढ्या प्रमाणातच द्रव्यकर्म बांधले जातात. मंद राग-द्वेष केले असता मंद कर्मबंध होतो आणि तीव्र राग-द्वेष केले असता तीव्र कर्मबंध होतो – असा निमित्त-नैमित्तिक संबंध असूनही जीव कर्माचा कर्ता नाही.[१]

आत्म्याचे परिणाम जसे मिथ्यात्व, राग-द्वेष-अव्रताचे भाव, प्रमादाचे भाव, आत्म्याच्या प्रदेशांचे कंपन होणे – हे वास्तविक पाहता स्वत: आत्माच आहे. येथे पर्यायाला आत्म्याशी अभेद करून म्हटले आहे की राग-द्वेष इत्यादी परिणाम आत्माच आहेत, कारण आत्मा स्वत: परिणामी आहे म्हणजेच परिणमनवाला आहे.

दया-दान इत्यादी शुभ परिणाम आणि हिंसा-असत्य-चोरी इत्यादी अशुभ परिणाम करणारा आत्मा स्वत:च आहे; त्यामुळे आत्मा आपल्या परिणामापासून पृथक नाही, अनन्य आहे म्हणजेच आत्मा आपल्या परिणामाशी तन्मय आहे आणि तो परिणाम जीवमयी क्रियाच आहे;

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३८९

परंतु कर्मामुळे किंवा बाह्य संयोगांमुळे आत्म्याचे परिणाम होत नाहीत; अशाप्रकारे पर्यायाचे यथार्थ ज्ञान करविले आहे.[१]

हा ज्ञेय अधिकार आहे. द्रव्यकर्म स्वतंत्ररूपे परिणमित होते आणि जीव देखील स्वतंत्ररूपे राग करतो – असे ज्ञेयाचे यथार्थ ज्ञान करवितात; त्यामुळे वास्तविक पाहता पुद्गल द्रव्यच द्रव्यकर्माचा कर्ता आहे.

तसेच पुद्गल द्रव्य आत्म्याच्या अशुद्ध परिणामाचा कर्ता नाही, म्हणजेच कर्माचा उदय आला; त्यामुळे आत्म्यास परिणाम करावाच लागेल – असा आत्मा पराधीन नाही; कारण पुद्गल, पुद्गलरूपे परिणमित होतो; पुद्गल आत्म्यास परिणमित करवित नाही.

त्यामुळे हे समजले पाहिजे की आत्मा आत्मस्वरूपे परिणमित होतो; तो पुद्गलस्वरूप होत नाही; त्यामुळे आत्मा द्रव्यकर्माचा कर्ता नाही.[२]''

अशाप्रकारे या गाथेमध्ये हेच म्हटले आहे की भावकर्माचा कर्ता आत्मा आणि द्रव्यकर्माचा कर्ता पुद्गलद्रव्याच्या कार्माणवर्गणा आहेत; कारण मोह-राग-द्वेषरूप भावकर्म आत्म्याच्या विकारी पर्याय आहेत आणि ज्ञानावरणादी द्रव्यकर्म कार्माण वर्गणारूप पुद्गलाच्या पर्याय आहेत. हे कथन निश्चयनयाचे आहे.

व्यवहारनयाने निमित्ताच्या अपेक्षेने भावकर्माचा कर्ता पौद्गलिक कर्म आणि द्रव्यकर्माचा कर्ता जीवाचे मोह-राग-द्वेषरूप परिणाम आहेत.

हे तर आपण जाणताच की जी परिणति ज्या द्रव्याची आहे, तिला त्या द्रव्याची म्हणणे निश्चयनय आहे आणि तिलाच निमित्तादिकांच्या अपेक्षेने इतर द्रव्यांची म्हणणे व्यवहारनय आहे. याचा उल्लेख मोक्षमार्गप्रकाशक ग्रंथाच्या सातव्या अधिकारात निश्चय-व्यवहारा-संबंधी प्रकरणात स्पष्टपणे केला आहे.

या गाथेत प्रतिपादित विषयवस्तुवर निश्चय-व्यवहाराच्या वरील परिभाषा पूर्णपणे घटित होतात. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३८९-३९० २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३९१

प्रवचनसार गाथा १२३-१२४

'भावकर्माचा कर्ता आत्मा आणि द्रव्यकर्माचा कर्ता पुद्गल' – मागील गाथेत हे तथ्य स्पष्ट केल्यानंतर आता या गाथांमध्ये हे सांगतात की आत्मा ज्ञानचेतना, कर्मचेतना आणि कर्मफलचेतनारूप परिणमित होतो. मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

परिणमदि चेदणाए आदा पुण चेदणा तिधाभिमदा।
सा पुण णाणे कम्मे फलम्मि वा कम्मणो भणिदा॥१२३॥
णाणं अट्ठवियप्पो कम्मं जीवेण जं समारद्धं।
तमणेगविधं भणिदं फलं ति सोक्खं व दुक्खं वा॥१२४॥

(हरिगीत)

करम एवं करमफल अर ज्ञानमय यह चेतना।
ये तीन इनके रूप में ही परिणमे यह आतमा॥१२३॥
ज्ञान अर्थविकल्प जो जिय करे वह ही कर्म है।
अनेकविध वह कर्म है अर करमफल सुख-दुक्ख हैं॥१२४॥

आत्मा चेतनारूप परिणमित होतो आणि चेतना ज्ञानसंबंधी, कर्मसंबंधी आणि कर्मफळसंबंधी – अशी तीन प्रकारची सांगितली आहे.

अर्थविकल्प ज्ञान आहे, जीवाद्वारे जे केले जात आहे, ते कर्म आहे आणि ते अनेक प्रकारचे आहे. सुख व दु:खांना कर्मफळ म्हटले आहे.

या गाथांचा भाव आचार्य अमृतचंद्रकृत तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेला आहे –

''आत्म्याचा स्वधर्मव्यापकपणा चेतनाच आहे; त्यामुळे चेतनाच आत्म्याचे स्वरूप आहे; कारण आत्मा चेतनरूप परिणमित होतो. तात्पर्य हे आहे की आत्म्याचा कोणताही परिणाम चेतनेचे उल्लंघन करीत नाही.

चेतना ज्ञानरूप, कर्मरूप आणि कर्मफलरूपे तीन प्रकारची असते.

यामध्ये ज्ञानपरिणति ज्ञानचेतना, कर्मपरिणति कर्मचेतना आणि कर्मफळ-परिणति कर्मफळचेतना आहे.

अर्थविकल्प ज्ञान आहे आणि स्व-पराच्या विभागापूर्वक अवस्थित विश्व अर्थ आहे. अर्थाच्या आकारांचे अवभासन विकल्प आहे.

ज्याप्रमाणे आरशाच्या निज विस्तारामध्ये स्व आणि पराचे आकार सोबतच प्रकाशित होतात; त्याचप्रमाणे ज्यामध्ये सोबतच स्व-पराकार अवभासित होतात – असे अर्थविकल्प ज्ञान आहे.

जे आत्म्याद्वारे केले जाते, ते कर्म आहे. प्रत्येक क्षणाला त्या-त्या भावाने परिणमित होत आत्म्याद्वारे केला जाणारा जो भाव आहे, तोच आत्म्याच्या द्वारे प्राप्य असल्याने कर्म आहे. जरी ते कर्म एकाच प्रकारचे आहे; तरी देखील द्रव्यकर्मरूप उपाधिच्या निकटतेच्या सद्भावाने अणि असद्भावामुळे ते अनेकप्रकारचे होते.

वरील कर्माद्वारे उत्पन्न केले जाणारे सुख-दु:ख कर्मफळ आहे. द्रव्यकर्मरूप उपाधिच्या निकटतेच्या असद्भावामुळे जे कर्म होते, त्याचे फळ अनाकुलत्वलक्षण स्वभावभूत सुख आहे व द्रव्यकर्मरूप उपाधीच्या निकटतेच्या सद्भावामुळे जे कर्म होते, त्याचे फळ विकारभूत दु:ख आहे; कारण तेथे सुखाच्या लक्षणाचा अभाव आहे.

अशाप्रकारे ज्ञान, कर्म आणि कर्मफळाचे स्वरूप निश्चित झाले.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये तत्त्वप्रदीपिकेचेच अनुसरण केले आहे. त्यांनी कर्मचेतनेचे तीन प्रकार अवश्य सांगितले आहेत, ते शुभोपयोग, अशुभोपयोग आणि शुद्धोपयोगरूपच आहेत.

आचार्य कुंदकुंद स्वत:च पंचास्तिकाय गाथा ३९ मध्ये म्हणतात की सर्व स्थावर जीव कर्मफळाला अनुभवतात; त्रसजीव कर्मसहित कर्मफळाला अनुभवतात व ज्यांनी प्राणांचा अतिक्रम केला आहे; ते सर्वज्ञ भगवंत ज्ञानाला अनुभवतात.

येथे परिपूर्ण ज्ञानचेतनेच्या अपेक्षेने केवलज्ञानी अरहंत-सिद्ध भगवंतांनाच ज्ञानचेतना सांगितली जात आहे. आंशिक ज्ञानचेतनेच्या

अपेक्षेने साधुंना, व्रतींना, श्रावक व अविरत सम्यग्दृष्टी श्रावकांना देखील ज्ञानचेतना म्हटली जाते. हे सर्व विवक्षाभेदच आहेत, मतभेद नाहीत.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथांचा भाव एक-एक छंदाद्वारे पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(सवैया)

आतम निज चेतन सुभाव करि, प्रनवतु है निहचै निरधार।
सो चेतनता तीन भाँति है, यों वरनी जिनचंद उदार॥
ज्ञानचेतना प्रथम बखानी, दुतिय करमचेतना विचार।
त्रितिय करमफलचेतनता है, वृन्दावन ऐसे उच्चार॥११२॥

आत्मा आपल्या स्वभावानेच परिणमित होतो – हे निश्चयाचे कथन आहे. जिनेंद्र भगवंतांनी चेतना तीन प्रकारची सांगितली आहे. पहिली ज्ञानचेतना, दुसरी कर्मचेतना आणि तिसरी कर्मफळचेतना. असे वृंदावन कवी म्हणतात.

(मनहरण कवित्त)

जीवादिक सुपर पदारथ को भेदजुत,
तदाकार एकै काल जानै जो प्रतच्छ है।
सोई ज्ञानचेतना कहावत अमलरूप,
वृन्दावन तिहूँकाल विशद विलच्छ है॥
जीव के विभाव को अरंभ कर्मचेतना है,
दर्वकर्मद्वार जामें भेदन को गच्छ है।
सुख-दुखरूप कर्मफल अनुभवै जीव,
कर्मफलचेतना सो भाषी श्रुति स्वच्छ है॥११३॥

जीवादी स्व-पर पदार्थांना एक काळात भेदसहित तदाकार प्रत्यक्ष जाणणे अमल ज्ञानचेतना आहे; ती ज्ञानचेतना तिन्ही काळ अत्यंत निर्मल आणि विलक्षण असते. ज्यामध्ये द्रव्यकर्मांद्वारे अनेक भेद पडतात, अशी कर्मचेतना जीवांच्या विभावभावरूप आहे. जीवांद्वारे सुख-दुःखरूप कर्मफळाचा अनुभव करणे कर्मफळचेतना आहे. शास्त्रांमध्ये असे अत्यंत स्पष्टपणे म्हटले आहे.

पंडित देवीदासजींनी या गाथांचा भाव १ अडिल्ल, २ कवित्त आणि १ दोहा – अशा एकून ४ छंदातून विस्ताराने व्यक्त केला आहे. तत्त्वप्रदीपिका व वृंदावनदासजीकृत प्रवचनसार परमागमामध्ये हा विषय याच रूपात प्रस्तुत केलेला आहे, त्यामुळे पुनरावृत्तीच्या भयाने येथे तो देणे शक्य नाही. जिज्ञासू पाठकांनी त्याचे अध्ययन मुळातूनच करावे.

आध्यात्मिसत्पुरुष श्री कानजी स्वामी या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात –

''चेतना तीन प्रकारची आहे. ज्ञानासंबंधी जागृती ज्ञानचेतना आहे; विकारी परिणामांमध्ये चेतनाचे अडकणे कर्मचेतना आहे आणि हर्ष-शोकरूप परिणामांमध्ये चेतना अडकणे कर्मफळचेतना आहे.[१]

संपूर्ण ज्ञानचेतना केवली भगवंतांना असते, साधक दशेमध्ये मुख्यपणे ज्ञानचेतना असते, अस्थिरतेच्या राग-द्वेषांमध्ये आणि हर्ष-शोकामध्ये जी जोडली गेली आहे, तेवढी कर्मचेतना आणि कर्मफळचेतना गौणरूपे म्हटली गेली आहे. मिथ्यादृष्टी जीवास ज्ञानचेतना नसते. त्यास कर्मचेतना आणि कर्मफळचेतनाच असते. कर्मचेतना आणि कर्मफळचेतना एकाच समयी होते. आत्मा ज्या समयी विकारी भाव करतो, त्याच समयी हर्ष-शोकांना भोगतो. येथे परपदार्थास भोगण्याची चर्चाच नाही; कारण परद्रव्यास जीव भोगूच शकत नाही, हर्ष-शोकांना तो भोगतो.

कर्तृत्व व भोक्तृत्वात समयभेद नाही, ते एकाच समयात आहेत; अशाप्रकारे आत्मा चेतनारूप परिणमित होतो, ती तीन प्रकारची सांगितली आहे.[२]

हा ज्ञेय अधिकार आहे, यापैकी स्वत:च द्रव्य-गुण-पर्याय स्वज्ञेय व पराचे द्रव्य-गुण-पर्याय परज्ञेय आहेत – दोहोंना विशेषतेने जाणण्याला विकल्प म्हणतात. ज्ञानाचाच स्वभाव विकल्प आहे; त्यामुळे केवलज्ञानासही विकल्पात्मक म्हटले आहे.

जसे आरशासमोर आपल्या विस्तारात स्व व पराचे भेद सोबतच

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३९३ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३९५

ज्ञात होतात; तसेच ज्यामध्ये स्व व पर त्यांच्या भेदासहित युगपत (सोबत) ज्ञात होतात, त्यास अर्थविकल्प म्हणतात किंवा ज्ञानचेतना म्हणतात.

कोणी म्हणेल की आम्ही केवळ आत्म्यालाच जाणले आहे, विकार व परपदार्थांना जाणले नाही किंवा ते ज्ञात होत नाहीत; तर त्या जीवाने आत्म्यालाही यथार्थपणे जाणले नाही, ती ज्ञानचेतना म्हटली जात नाही. कोणी म्हटले की आम्ही परपदार्थ, निमित्त व विकारांना जाणले आहे; परंतु आम्हाला आत्मा ज्ञात झाला नाही; तर त्याने परपदार्थांनाही यथार्थ जाणले नाही, त्यालाही ज्ञानचेतना म्हटली जात नाही. स्वत:ला यथार्थ जाणल्यावर परपदार्थ ज्ञात होणार नाहीत आणि स्वत:च्या भानाशिवाय एकांत परासंबंधी ज्ञानाच्या उघाडास मिथ्याज्ञान म्हणतात.[१]

सम्यग्दृष्टी जीवास स्व-पराचे ज्ञान युगपत होते. जेव्हा धर्मी जीवाचा उपयोग परपदार्थांमध्ये असतो, तेव्हा स्वत:चे ज्ञान पर्यायात लब्धिरूप असते. ज्ञानाची पर्याय लब्धिला सोडून एकांत पर-उपयोगरूप झाली नाही आणि जेव्हा उपयोग स्व-आत्म्यामध्ये असतो, तेव्हा परपदार्थांचे ज्ञान पर्यायात लब्धिरूप आहे, ही ज्ञानाची पर्याय लब्धिला सोडून एकांत स्व-उपयोगरूप झाली नाही.

ज्ञानाचा लब्धि आणि उपयोगपणा एकाच पर्यायात व एकाच वेळी आहे; त्यामुळे साधक म्हणजेच धर्मी जीवांना स्व-पर पदार्थांचे प्रकाशित होणे, म्हणजेच ज्ञान होणे युगपत आहे, एकाच समयात आहे, समयभेद नाही. स्व-पदार्थाच्या उपयोगरूप ज्ञानाच्या समयी पराच्या लब्धिरूप ज्ञानाचा नाश होत नाही, तर त्या पराच्या लब्धिरूप ज्ञानाचा त्याच पर्यायात त्याच वेळी सद्भाव आहे व पर-पदार्थाच्या उपयोगरूप ज्ञानाच्या वेळी स्वत:च्या लब्धिरूप ज्ञानाचा नाश होत नाही, तर त्या स्वत:च्या लब्धिरूप ज्ञानाचा त्याच पर्यायात, त्याच समयी सद्भाव आहे; त्यामुळे साधक दशेतही ज्ञानचेतना युगपत स्व-परास प्रकाशित करते.

अशाप्रकारे आत्मा आणि परपदार्थांची यथार्थ विभागणी करून जी ज्ञानाची पर्याय आत्म्याशी अभेद होते, त्यास ज्ञानचेतना म्हणतात.[२]

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३९८ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३९९

दया-दानाचे विकारी भाव किंवा ज्ञान-दर्शनाच्या शुद्धतेचे परिणाम आत्मा स्वत:च करतो आणि त्या विकारी किंवा अविकारी परिणामांना आत्मा स्वत:च प्राप्त होतो; त्यामुळे ते आत्म्याचे कर्म आहेत.[१]

परिणामांद्वारे उत्पन्न केले जाणारे सुख किंवा दु:ख कर्मफळ आहेत.[२]

कर्मचेतना व कर्मफळचेतनेत समयभेद नाही, म्हणजेच ज्या समयी कर्मचेतना विकाररूप आहे, त्याच समय कर्मफळचेतना आकुलतेच्या फळस्वरूप परिणमित होते व जेव्हा कर्मचेतना अविकाररूप आहे, त्याच समयी कर्मफळचेतना शांतीच्या फळस्वरूप परिणमित होते.

ज्ञानचेतना आणि शुद्ध अविकारी भावकर्मरूप कर्मचेतना दोहोंमध्ये शुद्धतेचे परिणाम आहेत. अभेद अपेक्षेने दोहोत अंतर नाही; परंतु ज्ञान गुणाच्या मुख्यतेने ज्ञान स्व-पराचा विवेक करून आत्म्यामध्ये अभेद होते, या ज्ञानपर्यायास ज्ञानचेतना म्हणतात आणि कर्ता गुणाच्या मुख्यतेने म्हटले जाते की आत्मा आपल्या निर्मल पर्यायरूप शुद्धतेचा कर्ता आहे, या अपेक्षेने ते शुद्धभावरूप कर्म किंवा अविकारी कर्मचेतना म्हटली जाते आणि कर्मफळचेतना किंवा ज्याला स्वाभाविक सुख म्हणतात, ती शुद्धतेच्या परिणामाचे फळ आणि तो भोक्ता गुणाच्या मुख्यतेने म्हटला जातो. ज्ञान करणारा, निर्मल पर्याय (शुद्धता) करणारा आणि निराकुल सुखास भोगणारा अभेद अपेक्षेने आत्मा एकच आहे; परंतु गुणभेदाच्या अपेक्षेने पृथक भेद सांगितला आहे.

अशाप्रकारे ज्ञानचेतना, कर्मचेतना व कर्मफळचेतनेचे स्वरूप सांगितले आहे.[३]''

येथे एक बाब विशेष लक्ष देण्यायोग्य आहे की कविवर वृंदावनदासजी तर म्हणतात की **'जीव के विभाव को अरंभ कर्मचेतना है'** म्हणजे कर्मचेतना विभावरूप आहे. आरंभी स्वामीजी सुद्धा याचे समर्थन करताना दिसतात; परंतु नंतर ते तत्त्वप्रदीपिका आणि तात्पर्यवृत्ती टीकेच्या आधारे

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ३९९-४०० २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४००
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४०१-४०२

कर्मचेतना व कर्मफळचेतनेचे दोन-दोन भेद करतात. शुद्धभावरूप कर्मचेतना व अशुद्धभावरूप कर्मचेतना। तसेच अतींद्रिय सुखरूप कर्मफळचेतना आणि इंद्रियसुखरूप कर्मफळचेतना.

अशाप्रकारे या गाथांमध्ये हेच म्हटले आहे की ज्ञानचेतना, कर्मचेतना व कर्मफळचेतना, अशी चेतना तीन प्रकारची असते. हा भगवान आत्मा चेतन आहे, चेतनारूप परिणमित होतो; त्यामुळे ही चेतना आत्म्याचे स्वरूप आहे. आत्म्याचे कोणतेही परिणमन चेतनेचे उल्लंघन करीत नाही. तात्पर्य हे आहे की आत्म्याच्या प्रत्येक परिणमनात चेतना विद्यमान असते.

ज्यामध्ये स्व स्वरूपे आणि पर पररूपे भिन्नतापूर्वक एकाच वेळी प्रतिभासित होतात, ते ज्ञान आहे. जीवाद्वारे केला जाणारा भाव कर्म आहे. तो दोन प्रकारचा आहे – निरुपाधिक शुद्धभावरूप कर्म आणि औपाधिक शुभाशुभभावरूप कर्म.

या कर्माद्वारे (कार्याद्वारे) उत्पन्न सुख-दु:ख कर्मफळ आहे. शुद्धभावरूप कर्माचे फळ निराकुल सुख आहे व शुभाशुभभावरूप कर्माचे फळ आकुलतारूप दु:ख आहे.

अशाप्रकारे ज्ञानचेतना धर्मरूप आहे आणि कर्मचेतना व कर्मफळचेतना धर्मरूप देखील आणि अधर्मरूप सुद्धा आहे; कारण ज्ञानचेतना तर ज्ञानी जीवालाच असते; परंतु कर्मचेतना आणि कर्मफळचेतना ज्ञानी-अज्ञानी दोहोंना असते. ज्ञानी जीवास शुद्धोपयोगरूप कर्मचेतना आणि अतींद्रियसुखरूप कर्मफळचेतना असते आणि कदाचित शुभाशुभभावरूप कर्मचेतना आणि इंद्रियसुख-दु:खरूप कर्मफळचेतना देखील असते; परंतु अज्ञानी जीवास सदा शुभाशुभभावरूप कर्मचेतना व इंद्रियसुख-दु:खरूप कर्मफळचेतनाच असते.

जर आपण ज्ञानी-अज्ञानी असा भेद केला नाही तर सामान्यपणे म्हटले जाऊ शकते की चेतना जीवाचे लक्षण आहे आणि ते लक्षण कोणत्या न कोणत्या रूपात प्रत्येक जीवामध्ये असतेच. ●

प्रवचनसार गाथा १२५

मागील गाथांमध्ये ज्ञानचेतना, कर्मचेतना व कर्मफळचेतनेचे स्वरूप स्पष्ट केल्यानंतर आता या गाथेत हे सांगतात की तिन्ही चेतना प्रकारांतराने आत्माच आहेत; कारण त्या आत्म्याच्याच पर्याय आहेत.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

अप्पा परिणामप्पा परिणामो णाणकम्मफलभावी।
तम्हा णाणं कम्मं फलं च आदा मुणेदव्वो॥१२५॥

(हरिगीत)

आत्मा परिणाममय परिणाम तीन प्रकार हैं।
ज्ञान कर्मरु कर्मफल परिणाम ही हैं आत्मा॥१२५॥

आत्मा परिणामात्मक आहे. परिणाम ज्ञानरूप, कर्मरूप व कर्मफळरूप होतो; त्यामुळे ज्ञान, कर्म आणि कर्मफळचेतना आत्मा आहे – असे समजावयास हवे.

आचार्य अमृतचंद्र तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात –

''वास्तविक पाहता आत्मा परिणामस्वरूपच आहे; कारण 'परिणाम स्वत: आत्मा आहे' – असे ११२ व्या गाथेत आचार्यांनी स्वत:च म्हटले आहे. परिणाम चेतनास्वरूप असल्याने ज्ञान, कर्म आणि कर्मफळरूप होण्याच्या स्वभाववाला आहे; कारण चेतना तन्मय अर्थात ज्ञानमय, कर्ममय आणि कर्मफळमय होते; त्यामुळे ज्ञान, कर्म आणि कर्मफळ आत्माच आहेत.

अशाप्रकारे शुद्धद्रव्याच्या निरूपणात परद्रव्याच्या संपर्काचा अभाव असल्याने व पर्याय द्रव्यातच प्रलीन झाल्याने आत्मा शुद्धद्रव्यच राहतो.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये या गाथेचा अर्थ स्पष्ट करताना आचार्य अमृतचंद्रकृत तत्त्वप्रदीपिकेचेच पूर्णपणे अनुकरण केले आहे. शेवटी निष्कर्षाच्या स्वरूपात ते केवळ एवढे जोडतात की परिणामी

आत्मा निश्चयरत्नत्रयस्वरूप शुद्धोपयोगाने मोक्षास व शुभ-अशुभ परिणामांनी बंधास साधतो, प्राप्त करतो.

वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव असा प्रस्तुत केला आहे –

(मनहरण कवित्त)

परिनाम आतमीक आप यह आतमा है,
सदा काल एकताई तासों तदाकार है।
सोई परिनाम ज्ञान कर्म कर्मफल तीनों,
चेतनता होन को समरथ उदार है॥
याही एकताई तैं सुज्ञान कर्म कर्मफल,
तीनोंरूप आतमा ही जानो निरधार है।
अभेद विवच्छा तैं दरव ही के अंतर में,
भेद सर्व लीन होत भाषी गनधार है॥११४॥

आत्म्याचे परिणाम स्वत: आत्मा आहेत व ते सदा त्याच्याशी एकता ठेवतात, ते तदाकार आहेत. ते परिणाम ज्ञानचेतना, कर्मचेतना व कर्मफळचेतनारूप आहेत. या एकतेच्या परिणामस्वरूपी त्या तिन्हींना एक आत्माच जाणा; कारण अभेद अपेक्षेने सर्व भेद द्रव्यातच लीन होतात – असे गणधरदेव म्हणतात.

पंडित देवीदासजींनी वृंदावनदासजीप्रमाणेच एकाच इकतीसा सवैयामध्ये वरील तथ्याला योग्यप्रकारे समाहित केले आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजी स्वामी या गाथेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट करतात –

''१) जेव्हा जीव ज्ञाता-दृष्टास्वभावाने परिणमित होतो, तेव्हा चेतना तदरूप म्हणजेच ज्ञानमय होते, चेतना परिणामापासून पृथक नसते.

२) जेव्हा जीव विकारी किंवा अविकारी कार्यरूप परिणमित होतो, तेव्हा चेतना तदरूप म्हणजेच विकारी कर्ममय किंवा अविकारी कर्ममय होते, चेतना त्या परिणामापासून पृथक नसते.

३) जेव्हा जीव आकुलतेच्या फळस्वरूपी वा शांतिच्या फळस्वरूपी परिणमित होतो, तेव्हा चेतना तदरूप म्हणजेच आकुलतामय किंवा शांतिमयच असते. चेतना त्या फळापासून पृथक नसते.[१]

हा आत्मा परपदार्थांपासून पृथक आहे – असा निर्णय करताच शुद्ध द्रव्याचा निर्णय होतो. परपदार्थाकडे पाहणे राहिले नाही आणि स्वपरिणति स्वत:ने होते, त्याचे यथार्थ ज्ञान स्वत:च्या भानाशिवाय होऊ शकत नाही; अशाप्रकारे वास्तविक पाहता शुद्धद्रव्याच्या कथनामध्ये परद्रव्याच्या संपर्काचा अभाव आहे.

आत्मा अनंत शक्तींचा पिंड आहे; परद्रव्याच्या संपर्काचा अभाव असल्याने अनंत गुणांचे परिणमन त्या आत्म्याचे स्वत:चे आहे – असा निर्णय झाला असता द्रव्य-गुण शुद्ध आहेत, असे लक्षात आले असता विकारी पर्यायाचे लक्ष सुटते आणि द्रव्याची दृष्टी होते. द्रव्यदृष्टी झाली असता विकारी पर्याय गौण होते आणि अविकारी पर्याय द्रव्याशी अभेद असते. ही विकारी पर्याय आहे आणि तिला दूर करून अविकारी पर्याय प्रगट करू – असे होत नाही; कारण द्रव्य स्वत:मध्ये एकाकार झाले असता अविकारी पर्याय प्रगट होते आणि ती द्रव्याशी अभेद असते.[२]

गौण-मुख्यता नसेल तर साधक दशा रहात नाही, केवलज्ञान असायला हवे. केवली भगवंतांना मुख्य-गौणता असत नाही, कारण वीतरागी भगवंतांना यथार्थ, संपूर्ण प्रमाणज्ञान असते, परंतु साधक दशेत मुख्य-गौणता असते; परंतु यथार्थपणे मुख्य-गौण कोण करू शकतो ?

जो जीव असे मानतो की पर्याय म्हणजेच अंश, तो अंशीचा आहे, परद्रव्यामुळे नव्हे. ध्रुव सामान्य आहे आणि उत्पाद व व्यय सामान्याचेच विशेष आहेत – अशाप्रकारे द्रव्य-गुण-पर्याय तिन्हींच्या अखंडतेचे यथार्थ ज्ञान या प्रवचनसार ग्रंथात सांगितले आहे – असे यथार्थ जाणले असता तो जीव समयसारमध्ये सांगितल्यानुसार द्रव्यदृष्टी करण्यासाठी अवस्थेच्या राग-द्वेषास गौण करतो व द्रव्य-गुण शुद्ध आहेत, त्यांची दृष्टी

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४०५ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४०७-४०८

करतो व ही दृष्टी झाल्यावर निर्मलतारूप पर्याय प्रगट होते, ती आत्म्याशी अभेद असते. हे द्रव्य व ही शुद्ध पर्याय आहे – असा भेदही रहात नाही.

अशाप्रकारे पर्याय द्रव्यामध्ये अत्यंत लीन झाल्याने आत्मा शुद्ध द्रव्यच राहतो.[१]''

अशाप्रकारे या गाथेत ही बाब स्पष्ट केली आहे की स्वद्रव्य-परद्रव्याच्या पृथकतेच्या संदर्भात स्वत: चे द्रव्य-गुण-पर्याय 'स्व' मध्ये व पराचे द्रव्य-गुण-पर्याय 'परामध्ये' सामिल आहेत. आपले गुण-पर्याय सुद्धा पर आहेत – अशी चर्चा येथे नाही.

समयसार ग्रंथामध्ये गुणभेद, प्रदेशभेद व पर्यायांना पर म्हटले आहे आणि त्यांच्याहून भिन्न स्वद्रव्याला शुद्ध द्रव्य म्हटले जाते आणि येथे स्वत:च्या गुण-पर्यायासहित द्रव्यालाच शुद्ध द्रव्य म्हटले आहे.

येथे जे स्व-पर भेदविज्ञान करावयाचे आहे, ते अशाप्रकारचे आहे की स्वद्रव्य-गुण-पर्याय 'स्व' आणि परद्रव्य-गुण-पर्याय 'पर.'

यामुळेच येथे अत्यंत स्पष्ट सांगितले आहे की आत्मा परिणामात्मक आहे; म्हणून ज्ञानरूप परिणमन, कर्मरूप परिणमन व कर्मफलरूप परिणमन आत्माच आहे व शेवटी तर येथपर्यंत लिहिले आहे की शुद्धद्रव्याच्या निरूपणात परद्रव्याचा संपर्क अशक्य आहे व आपल्या पर्यायी त्यामध्ये सामावल्या आहेत; त्यामुळे आत्मा शुद्धच आहे व शुद्धच राहतो.

समयसार व प्रवचनसाराच्या कथनपद्धतीत मूलभूत अंतर हे आहे की समयसार आत्मानुभवाच्या दृष्टीने केवळ निज त्रिकाली ध्रुव आत्म्यालाच स्व मध्ये सम्मिलित करतो व प्रवचनसार वस्तुस्वरूपाच्या मुख्यतेने आपले द्रव्य, गुण, पर्याय – या तिन्हींना 'स्व' मध्ये सामिल करतो.

येथे ही बाब नेहमी लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा अनेक प्रकारचे भ्रम उत्पन्न होऊ शकतात, मतभेद उत्पन्न होऊ शकतात.

येथे जी बाब ज्या अपेक्षेने सांगितली आहे, ती त्याच अपेक्षपूर्वक समजण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४०८-४०९

प्रवचनसार गाथा १२६

ही द्रव्यसामान्यप्रज्ञापन अधिकाराच्या उपसंहाराची गाथा आहे. याच्या प्रस्तावनेत आचार्य अमृतचंद्रांनी लिहिले आहे की अशाप्रकारे ज्ञेयपणाला प्राप्त आत्म्याच्या शुद्धतेच्या निश्चयाने ज्ञानतत्त्वाची सिद्धी झाल्यावर शुद्ध आत्मतत्त्वाची उपलब्धी होते. अशाप्रकारे त्याचे अभिनंदन करीत द्रव्यसामान्याच्या वर्णनाचा उपसंहार करतात.

आत्मा ज्ञानरूपही आहे आणि ज्ञेयरूप देखील आहे. ज्ञानतत्त्व-प्रज्ञापनमध्ये आत्म्याच्या ज्ञानस्वभावाला स्पष्ट केले आहे आणि येथे त्याच्या ज्ञेयस्वभावाला समजाविले जात आहे.

येथे या द्रव्यसामान्यप्रज्ञापनाधिकारात आत्म्याच्या ज्ञेयत्वाचे सामान्य स्वरूप सांगत आहेत. पुढील द्रव्यविशेषप्रज्ञापनाधिकारात इतर द्रव्यांच्या सोबतच आत्म्याच्या ज्ञेयत्वाच्या विशेष स्वरूपाला समजावतील.

या उपसंहाराच्या गाथेमध्ये केवळ हे सांगत आहेत की आत्म्याच्या ज्ञेयतत्त्वाच्या निश्चयाने ज्ञानतत्त्वाची सिद्धी झाल्यावर शुद्ध आत्म्याची उपलब्धी होते.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

कत्ता करणं कम्मं फलं च अप्प त्ति णिच्छिदो समणो।
परिणमदि णेव अण्णं जदि अप्पाणं लहदि सुद्धं॥१२६॥

(हरिगीत)

जो श्रमण निश्चय करे कर्ता करम कर्मरु कर्मफल।
ही जीव ना पररूप हो शुद्धात्म उपलब्धि करे॥१२६॥

'कर्ता, करण, कर्म व कर्मफल आत्माच आहे' – असा निश्चयवान होऊन जर श्रमण अन्यरूप परिणमित झालाच नाही तर तो शुद्ध आत्म्याला प्राप्त करतो.

आचार्य अमृतचंद्रांनी या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''अशाप्रकारे जो पुरुष – 'कर्ता, करण, कर्म व कर्मफळ आत्माच आहे' – हा निश्चय करून परद्रव्यरूप परिणमित होत नाही; तोच पुरुष ज्याचा परद्रव्याशी संपर्क तुटला आहे आणि ज्याच्या पर्याय स्वद्रव्यामध्येच प्रलीन झाल्या आहेत – अशा शुद्धात्म्याला प्राप्त करतो; इतर कोणताही पुरुष अशा शुद्धात्म्याला प्राप्त करीत नाही.

जेव्हा जवाकुसुमाच्या निकटतेने उत्पन्न झालेल्या लालिमेने रंजित परिणतीवाल्या स्फटिक मण्यासमान अनादिसिद्ध पौद्गलिक कर्माच्या बंधनरूप उपाधीच्या निकटतेने उत्पन्न उपरागाने रंजित परिणतीवाला मी पराद्वारे आरोपित विकारवान झाल्यामुळे संसारी होतो; तेव्हा देखील माझा कोणी संबंधी नव्हता.

मी एकटाच कर्ता होतो, कारण मी एकटाच रंजित (प्रभावित) चैतन्यरूप स्वभावाने स्वतंत्र होतो; मी एकटाच कारण होतो, कारण मी एकटाच रंजित चैतन्यरूप स्वभावाद्वारे साधकतम होतो; मी एकटाच कर्म होतो, कारण मी एकटाच रंजित चैतन्यरूप परिणमित होणाऱ्या स्वभावामुळे आत्म्याद्वारे प्राप्य म्हणजेच प्राप्त होण्यायोग्य होतो व मी एकटाच सुखापासून विपरीत लक्षणवान दु:ख नामक कर्मफळ होतो, जो रंजित चैतन्यरूप परिणमित होणाऱ्या स्वभावाने उत्पन्न केला जात होता.

आणि जेव्हा जवाकुसुमाच्या निकटतेच्या नाशाने सुविशुद्ध सहजरूप परिणतीवाल्या स्फटिक मण्यासमान अनादी सिद्ध पौद्गलिक कर्माच्या बंधनरूप उपाधीच्या निकटतेच्या नाशाने सुविशुद्ध सहज स्वपरिणतीवाला मी पराद्वारे आरोपित विकार थांबल्यामुळे एकांतत: मुमुक्षू आहे आणि आताही माझा कोणी संबंधी नाही.

आताही मी एकटाच कर्ता आहे, कारण मी एकटाच सुविशुद्ध चैतन्यरूप स्वभावाने स्वतंत्र आहे; मी एकटाच करण आहे; कारण मी एकटाच सुविशुद्ध चैतन्यरूप स्वभावाने साधकतम आहे; मी एकटाच कर्म आहे, कारण मी एकटाच सुविशुद्ध चैतन्यरूप परिणमित होण्याच्या स्वभावामुळे आत्म्याद्वारे प्राप्य अर्थात प्राप्त होण्यायोग्य आहे व मी

एकटाच अनाकुलत्वलक्षणवाला सुख नामक कर्मफळ आहे, जे सुविशुद्ध चैतन्यरूप परिणमित होण्याच्या स्वभावाद्वारे उत्पन्न केले जाते.

'अशाप्रकारे बंधमार्ग व मोक्षमार्गामध्ये आत्मा एकटाच आहे' – असे भान असणाऱ्या पुरुषाला परमाणूप्रमाणे एकत्व भावनेत उन्मुख (तत्पर) असल्याने परद्रव्यरूप परिणती किंचितही होत नाही व परमाणू समान एकत्वाची भावना करणारा पुरुष पराशी संपृक्त (एकमेक) होत नाही (परासोबत मिसळत नाही); त्यामुळे परद्रव्याशी असंबद्धता असल्याने तो सुविशुद्ध होतो व कर्ता, करण, कर्म व कर्मफळाला आत्माच्या रूपात भावना करीत तो पुरुष पर्यायांनी संकीर्ण होत नाही, खंडित होत नाही; त्यामुळे पर्यायांनी संकीर्ण न झाल्याने सुविशुद्ध होतो."

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये तत्त्वप्रदीपिकेनुसारच वर्णन केले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेनंतर लहान-मोठे १० छंद लिहिले आहेत, त्यापैकी २ मनहरण, १ छप्पय, १ कवित्त, १ मत्तगयन्द सवैया व ५ दोहे आहेत.

यापैकी शेवटचे ४ छंद तर द्रव्यसामान्यप्रज्ञापन अधिकाराचा उपसंहार आहेत व बाकी ६ छंद या गाथेचा भाव स्पष्ट करतात.

उपसंहारासंबंधी छंद तत्त्वप्रदीपिकेमध्ये आलेल्या उपसंहारासंबंधी कलशांचा भाव स्पष्ट करतात. हे सर्व छंद मुळातून वाचण्यायोग्य आहेत.

नमुन्यादाखल गाथेचा भाव स्पष्ट करणारा एक छंद प्रस्तुत आहे –

(मनहरण कवित्त)

करता करन तथा करम करमफल,
चारोंरूप आतमा विराजै तिहूँपन में।
ऐसे जिन निहचै कियो है भलीभाँति करि,
एकता सुभाव अनुभवैं आपु मन में॥
परदर्वरूप न प्रनवै काहू कालमाहिं,
लागी है लगन जाकी आतमीक धन में।

सोई मुनि परम धरम शिवसुख लहै,
वृन्दावन कबहूँ न आवै भववन में॥११५॥

'हा आत्मा कर्ता, करण, कर्म आणि कर्मफळ – या चाररूप विराजमान असतो' – ज्या व्यक्तीने हा निर्णय चांगल्याप्रकारे केला आहे, तो आत्मा एकत्वस्वभावाचा अनुभव करतो. ज्याला आत्म्याची आवड निर्माण झाली आहे, तो कोणत्याही काळामध्ये परद्रव्यरूप परिणमित होत नाही.

वृंदावनदासजींनी म्हटले आहे की असे मुनिराज कधी संसारात भटकत नाहीत; ते परमधर्माच्या फळस्वरूपी मुक्तिसुख प्राप्त करतात.

आध्यात्मिक सत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे

''अशाप्रकारे कर्ता, करण, कर्म आणि कर्मफळ आत्माच आहे, पुद्गल नाही अर्थात आत्म्याचा परद्रव्याशी संबंध नाही – असा ज्या जीवाने यथार्थ ज्ञानाद्वारे निर्णय केला आहे, तो जीव वास्तविक पाहता विकाररूप परिणमित होत नाही.[१]

अज्ञानदशेमध्येही मी एकटा आत्मा स्वत:च रागाचा कर्ता, कर्म इत्यादी होतो, इतर कोणाताही परपदार्थ माझ्या अज्ञान आणि राग-द्वेषांचा कर्ता नव्हता – अशाप्रकारे प्रथम अज्ञानदशेचे ज्ञान करवितात.[२]

स्फटिकमण्यामध्ये स्वत:च लाल होण्याची योग्यता आहे, तेव्हा त्या फुलाने स्फटिकाला लाल केले – असे म्हटले जाते; परंतु फुलाने स्फटिकाला लाल केले नाही तर स्फटिकमणी स्वत: लाल रंगरूप परिणमित झाला आहे, तेव्हा फुलाच्या निकटतेने उत्पन्न झालेल्या लालिमेद्वारे स्फटिकमणी लाल झाला – असे म्हटले जाते.[३]

ज्याप्रमाणे स्फटिकमणी लाल फुलाच्या उपस्थितीमध्ये स्वत:च्या योग्यतेमुळे लालिमारूप परिणमित होतो, तसेच अनादी कर्माच्या

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४१३ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४१४
३) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४१४

संयोगामुळे कर्माकडे असणाऱ्या माझ्या झुकावामुळे माझ्या स्वभावामध्ये विकार नसतानाही माझ्या पर्यायबुद्धीमुळे मी विकारवान होतो आणि कर्माद्वारे आरोपित झालो होतो, त्यामुळेच संसार होता.

अज्ञान दशेत किंवा अधर्म दशेत देखील कर्ता, करण, कर्म आणि कर्मफळ आत्माच आहे.[१]

ज्याप्रमाणे स्फटिकमणी जेव्हा लाल फुलाजवळ नसतो, तेव्हा स्फटिकमणी आपल्या निर्मल स्वभावाला प्रकाशित करतो; त्याचप्रमाणे माझ्यात शुद्धता प्रगट असल्याने पराद्वारे आरोपित विकार माझ्यामध्ये थांबला आहे – असा मी सर्वथा मोक्षाचा इच्छुक आहे. विकाराकडे असलेला झुकाव नाहीसा झाला म्हणजेच कर्माद्वारे आरोपित विकार माझ्यात थांबला आहे, कारण तो माझा वास्तविक स्वभाव नव्हता.

अज्ञान दशेत माझे कोणी नव्हते आणि वर्तमान काळात ज्ञानदशेतही वास्तविक पाहता माझे कोणीही नाही.

पहा, मुनिराज एकत्व भावना करतात – पूर्व संसार-दशेत मी एकटा होतो; स्त्री, कुटुंब, शरीर कोणीही माझे संबंधी नव्हते आणि माझे राग-द्वेष इत्यादी परिणामांचा कर्ता, कर्म, साधन आणि फळरूप मीच होतो. जडकर्म किंवा अन्य पदार्थामुळे अज्ञान, राग-द्वेष नव्हते. येथे ज्ञान दशेत देखील मी एकटाच आहे. देव-गुरु-शास्त्र देखील माझे नाहीत.

येथे ज्ञान दशेत निर्मल पर्यायाचा कर्ता, निर्मल शुद्धतारूप कार्य, शुद्धतेचे साधन आणि शुद्धतेचे फळ भोगणारा मीच आहे. अशाप्रकारे आत्म्याच्या शुद्धतेचा किंवा धर्माच्या अवस्थेचा कर्ता, करण, कर्म आणि कर्मफळ आत्माच आहे.[२]

एकत्वाच्या भावनेचे फळ आत्म्याची शुद्धता किंवा सुख आहे. अशाप्रकारे विकारी दशेत विकाराचा कर्ता आत्मा आहे, विकार होण्यात करण आत्मा आहे, विकारी होणेरूप कार्य आत्मा आहे व विकाराचे फळ आकुलताही आत्मा आहे; तसेच शुद्धतेच्या दशेमध्ये शुद्धतेचा कर्ता आत्मा

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४१६ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४१७-४१८

आहे, शुद्धता होण्यामध्ये साधन आत्मा आहे, शुद्धतारूप कार्य आत्मा आहे व शुद्धतेचे फळ सुख, ते सुद्धा आत्माच आहे. अशाप्रकारे धर्मी जीव विचार करतो. आत्मा संसारात एकटा व मोक्षमार्गामध्येही एकटा आहे.

ज्ञानी जीवाचा किंवा अज्ञानी जीवाचा परपदार्थाशी काहीही संबंध नाही.[१]

एक परमाणुचा दुसऱ्या परमाणुशी संबंध नाही. ज्याप्रमाणे तो परमाणू स्वयंसिद्ध पदार्थ आहे; त्याच प्रमाणे आत्मा देखील स्वयंसिद्ध सुखस्वरूप एकटा पदार्थ आहे. स्त्री, कुटुंब व देव-गुरु-शास्त्राशी माझा संबंध नाही – अशाप्रकारे एकत्व भावना जो जीव करतो, अनुभवतो, समजतो, चिंतवन करतो; त्या जीवाला किंचितही विकार होत नाही.

एक परमाणू जोपर्यंत एकटा राहतो, तोपर्यंत स्कंधरूप अशुद्ध अवस्थेला प्राप्त होत नाही. त्याचप्रमाणे एकत्वाची भावना करणारा जीव आपले सुख व आनंदासाठी परपदार्थाकडे पहात नाही, त्याचा पराशी संबंध नसतो व परद्रव्याशी संगती नसल्याने म्हणजेच संयोगी बुद्धी दूर झाल्यावर स्वभावबुद्धी उत्पन्न होते म्हणजेच शुद्धदशा होते.

या शुद्धदशेचा कर्ता, करण, कर्म आणि कर्मफळ आत्माच आहे – असे भेदांचा विचार देखील धर्मी जीव करीत नाहीत, तर या चारहीमध्ये सामान्य राहणाऱ्या अभेद आत्म्याचीच ते भावना करतात आणि अनुभवतात; त्यामुळे ते पुरुष पर्यायांशी खंडित होत नाहीत.

जोपर्यंत विकल्पाचा आश्रय होता, तोपर्यंत कर्ता, करण इत्यादी चार भेद पडत होते आणि पर्यायाने खंडित होत होता, परंतु अभेद आत्मारूप झाला म्हणजेच विकल्पाचे उत्थान राहिले नाही म्हणजेच रागवान पर्याय उत्पन्न होत नाही, परंतु धर्माची निर्मल पर्याय प्रगट होते आणि ती आत्म्याशी अभेद होते; त्यामुळे पर्याय भेदांमुळे खंडित न झाल्याने आत्मा सुविशुद्ध असतो.

अशाप्रकारे एकत्व भावनेचे फळ अनाकुल सुख सांगितले आहे.[२]''

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४१९ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४२०

अत्यंत स्पष्टरूपे एक बाब येथे सांगितली आहे की ज्ञानदशेत व अज्ञानदशेतही आत्म्याचा परद्रव्याशी कोणाताही संबंध नाही; तो आपल्या परिणमनाचा स्वत:च कर्ता, करण, कर्म व कर्मफळ आहे.

दुसरी बाब ही आहे की समस्त पर्याय त्यामध्येच विलीन आहेत; अशाप्रकारे तो कर्ता, करण, कर्म आणि कर्मफळाचा अभेद पिंड आहे.

तात्पर्य हे आहे की बंधमार्गामध्ये देखील आत्मा स्वत:ला स्वत:मुळेच बांधतो व भोगतो आणि मोक्षमार्गामध्येही आत्मा स्वत:ला स्वत:च मुक्त करतो आणि भोगतो. बंधमार्गामध्ये सांसारिक सुख-दु:खाला भोगतो आणि मोक्षमार्गामध्ये अतींद्रिय सुखाला भोगतो.

अशाप्रकारे हा आत्मा बंधमार्गामध्ये देखील एकटा आहे आणि मोक्षमार्गामध्ये देखील एकटाच राहतो – असा निश्चय करून ज्ञानी आत्मा पराशी अन्यत्व आणि स्वत:शी एकत्व स्थापित करतो, एकत्व आणि अन्यत्व भावना भातो.

द्रव्यसामान्यप्रज्ञापनाधिकाराच्या या गाथेत प्रत्येक द्रव्याच्या स्वतंत्रतेची घोषणा केली आहे. तसेच हे सुद्धा स्पष्ट केले की आत्माही एक स्वतंत्र द्रव्य आहे; त्यामुळे आत्माही आपल्या विकारी-अविकारी परिणमनामध्ये पूर्णपणे स्वतंत्र आहे. विकारी परिणमनामध्ये परद्रव्यरूप कर्मोदयाचा सद्भाव व निर्मल परिणमनात परद्रव्य-रूप कर्मोदयाच्या उदयाचा अभाव तर केवळ निमित्त आहे. कर्म वरील परिणमनाचा कर्ता-भोक्ता नाही; वरील परिणमनाचा कर्ता-भोक्ता भगवान आत्माच आहे.

यानंतर या द्रव्यसामान्यप्रज्ञापनाधिकाराच्या तत्त्वप्रदीपिका टीकेत उपसंहारासंबंधी ३ कलश आहेत, त्यांच्यापैकी शेवटच्या अनुष्टुप छंदात तर केवळ एवढेच सांगितले आहे की अशाप्रकारे द्रव्यसामान्याच्या ज्ञानाने मनाला गंभीर करून आता द्रव्यविशेषाच्या परिज्ञानाला प्रारंभ करतात.

वरील छंदाची चर्चा येथे न करता द्रव्यविशेषप्रज्ञापनधिकाराच्या आरंभी करणे अधिक युक्तिसंगत वाटते. इतर दोन छंदात एक वसंततिलका व एक मंदाक्रांता छंद आहे. त्यापैकी पहिला छंद पुढीलप्रमाणे आहे –

(वसंततिलका)

द्रव्यान्तरव्यतिकरादपसारितात्मा-
सामान्यमज्जितसमस्तविशेषजातः।
इत्येष शुद्धनय उद्धतमोहलक्ष्मी-
लुण्टाक उत्कटविवेकविविक्ततत्त्वः ॥७॥

(मनहरण कवित्त)

जिसने बताई भिन्नता भिन्न द्रव्यनि से।
और आतमा एक ओर को हटा दिया॥
जिसने विशेष किये लीन सामान्य में।
और मोहलक्ष्मी को लूट कर भगा दिया॥
ऐसे शुद्धनय ने उत्कट विवेक से ही।
निज आतमा का स्वभाव समझा दिया॥
और सम्पूर्ण इस जग से विरक्त कर।
इस आतमा को निजातम में लगा दिया॥७॥

ज्याने इतर द्रव्यापासून भिन्नतेद्वारे आत्म्याला परद्रव्यापासून वेगळे दाखविले व समस्त विशेषांना सामान्यामध्ये लीन केले; असे या उद्दंड मोहलक्ष्मीला लुटणाऱ्या शुद्धनयाने उत्कट विवेकाद्वारे आत्मतत्त्वाला परापासून भिन्न एकटे दाखविले आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या कलशाचा अर्थ स्पष्ट करताना म्हटले आहे की –

"शुद्धनय आत्म्याला स्त्री, कुटुंब, देव-गुरु-शास्त्र, शरीर व कर्मादी परपदार्थांपासून वेगळे करतो म्हणजेच त्यांच्यापासून पृथक दर्शवितो.

येथे क्षेत्राने वेगळे होण्याची चर्चा नाही; तर संयोगबुद्धी, निमित्ताधीन बुद्धी दूर होऊन स्वभावबुद्धी झाली, त्या परिणामाला, परद्रव्यापासून आत्म्याला वेगळे केले – असे म्हटले आहे आणि शुद्धनय पर्यायाच्या भेदाला स्वीकार करीत नाही, एकट्या अभेद आत्म्यालाच स्वीकारतो.

आत्मा विकाराला दूर करणारा आणि शुद्धतेला प्रगट करणारा आहे – असा भेद शुद्धस्वभावामध्ये नाही. कर्ता-करण इत्यादीचे भेद

पर्यायामध्ये होतात, ते स्वभावावर दृष्टी केंद्रित केल्यावर नष्ट होतात आणि पर्यायी द्रव्यामध्ये बुडून जातात.

त्यामुळे शुद्धनय विशेषांना द्रव्य सामान्यामध्ये मग्न करतो म्हणजेच पर्यायबुद्धी, अंशबुद्धी, रागबुद्धीचा नाश करतो व स्वभावबुद्धी उत्पन्न करतो. असा शुद्धनय वर्तमान पर्यायास अभेद शुद्धस्वभावामध्ये लीन करतो, त्यामुळे मिथ्यात्व, राग-द्वेष उत्पन्न होत नाहीत.[१] शुद्धनयाने आत्म्याच्या स्वरूपाला राग-द्वेष व गुण-भेद यांच्यापासून सम्यग्ज्ञानाद्वारे पृथक केले आहे. जेवढा शुद्धनयाद्वारे अभेद आत्म्यामध्ये एकाकार होतो, तेवढा-तेवढा आत्मा पर्यायामध्ये शुद्ध होत जातो आणि संपूर्ण एकाकार झाल्यावर परिपूर्ण वीतरागदशा आणि केवलदशा प्राप्त होते.[२]''

अशाप्रकारे या छंदामध्ये हेच म्हटले आहे की केवळ शुद्धनयच असा नय आहे की तो आत्म्याला परद्रव्यापासून पृथक आणि संपूर्ण विशेषांना आत्म्यामध्ये अंतर्लीन दर्शवून आत्म्यामध्येच स्थापित करतो आणि मोहलक्ष्मीला लुटतो म्हणजेच मोहाचा नाश करतो.

त्यामुळे शुद्धनयाच्या कथनाला सत्यार्थ जाणून शुद्धनयाच्या विषयभूत आपल्या आपल्या शुद्धात्म्यामध्ये सामावणेच श्रेयस्कर आहे.

दुसरा छंद पुढीलप्रमाणे आहे –

(मंदाक्रान्ता)

इत्युच्छेदात्परपरिणतैः कर्तृकर्मादिभेद-
भ्रान्तिध्वंसादपि च सुचिराल्लब्धशुद्धात्मतत्त्वः।
सञ्चिन्मात्रे महसि विशदे मूर्च्छितश्चेतनोऽयं
स्थास्यत्युद्यत्सहजमहिमा सर्वदा मुक्त एव॥८॥

(मनहरण कवित्त)

इस भाँति परपरिणति का उच्छेद कर।
करता-करम आदि भेदों को मिटा दिया॥
इस भाँति आतमा का तत्त्व उपलब्ध कर।
कल्पनाजन्य भेदभाव को मिटा दिया॥

---

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४२१-४२२ २) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४२२

ऐसा यह आतमा चिन्मात्र निरमल।
सुखमय शान्तिमय तेज अपना लिया॥
आपनी ही महिमामय परकाशमान।
रहेगा अनंतकाल जैसा सुख पा लिया॥८॥

परिणतीचा उच्छेद आणि कर्ता, कर्म इत्यादी भेदांच्या भ्रांतीच्या नाशाने ज्याने शुद्धात्मतत्त्व उपलब्ध केले आहे; असा तो आत्मा चैतन्यमात्ररूप निर्मल तेजामध्ये लीन होत आपल्या सहज महिमेच्या प्रकाशमानरूपे सदा मुक्तच राहील.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या कलशाचा अर्थ स्पष्ट करीत म्हटले आहे की –

"आत्मा शुद्धतेचा कर्ता आहे, करण आहे, कर्म आहे, कर्मफळ आहे – असे चार भेद रागमिश्रित विचारामध्ये झाले असता त्या भेदांनी युक्त किंवा रागयुक्त दशा एवढेच माझे स्वरूप आहे – अशा मिथ्या भ्रांतीचाही नाश करून आत्म्याने शुद्ध आत्मतत्त्वाची प्राप्ती केली आहे.

अनुकूल द्रव्य-क्षेत्राने आत्म्याला लाभ होईल व प्रतिकूल द्रव्य-क्षेत्राने आत्म्याचे नुकसान होईल – अशी मान्यता तर स्थूल भ्रांती आहे; परंतु आत्म्याच्या शुद्धतेचा रागरहित विचार केला असता कर्ता, करण इत्यादी भेद पाडून त्या भेदांनी अभेद आत्म्यात जाऊ व जे ज्ञान भेदात अडकत होते, ते हळू-हळू स्वभावामध्ये यावे – अशी मान्यताही मिथ्या भ्रांती आहे. अशा भ्रांतीचा देखील शुद्ध अभेद आत्म्याच्या आश्रयाने नाश केला आहे – असा हा आत्मा आपल्या ज्ञानस्वभावात सुद्धा लीन राहिल्याने आपल्या स्वाभाविक महिमेच्या प्रकाशमानरूप सर्वदा मुक्तच राहील.[१]"

अशाप्रकारे या छंदात हे सांगितले आहे की ज्या आत्म्याने परपरिणतीचा उच्छेद व कर्ता-कर्मसंबंधी भ्रांतीच्या नाशाने शुद्धनयाच्या विषयभूत शुद्धात्म्याला उपलब्ध केले आहे; तो आत्मा स्वत:मध्येच सामावून जाईल व दु:खांपासून सदा मुक्तच राहील, प्रकाशमानच राहील.

अशाप्रकारे हा द्रव्यसामान्यप्रज्ञापनाधिकार समाप्त होतो. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-३, पृष्ठ : ४२३-४२४

द्रव्यविशेषप्रज्ञापनाधिकार

(गाथा १२७ से गाथा १४४ तक)

द्रव्यसामान्याचे प्रज्ञापन केल्यानंतर आता द्रव्यविशेषप्रज्ञापन-अधिकार आरंभ करतात. वरील दोन्ही अधिकारांच्या संधीला स्पष्ट करीत आचार्य अमृतचंद्रांनी एक छंद लिहिला आहे, तो पुढीलप्रमाणे आहे –

(अनुष्टुप्)

द्रव्यसामान्यविज्ञाननिम्नं कृत्वेति मानसम्।
तद्विशेषपरिज्ञानप्राग्भार: क्रियतेऽधुना ।।९।।

(दोहा)

अरे द्रव्य सामान्य का अबतक किया बखान।
अब तो द्रव्यविशेष का करते हैं व्याख्यान ।।९।।

अशाप्रकारे द्रव्यसामान्याच्या ज्ञानाने मनाला गंभीर करून आता द्रव्यविशेषाच्या परिज्ञानाला आरंभ केले जात आहे.

द्रव्यसामान्यप्रज्ञापनाधिकारात सर्व द्रव्यात प्राप्त होणाऱ्या सामान्य विशेषांना समजाविले आहे व आता द्रव्यविशेषप्रज्ञापनाधिकारात गाथा १२७ ते १४४ पर्यंत म्हणजेच १८ गाथांमध्ये द्रव्यांचे भेद-प्रभेद व त्यांचे स्वरूप स्पष्ट करतील.

प्रवचनसार गाथा १२७

द्रव्यविशेषप्रज्ञापनाधिकारामध्ये सर्वप्रथम 'जीव आणि अजीव असे दोन भेद पडल्याने द्रव्य दोन प्रकारचे असतात' – हे सांगत आहेत.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

दव्वं जीवमजीवं जीवो पुण चेदणोवओगमओ।
पोग्गलदव्वप्पमुहं अचेदणं हवदि य अजीवं।।१२७।।

(हरिगीत)

द्रव्य जीव अंजीव हैं जिय चेतना उपयोगमय।
पुद्गलादी अचेतन हैं अत:एव अजीव हैं।।१२७।।

द्रव्य जीव आणि अजीव आहेत. त्यापैकी चेतना आणि उपयोगमय जीव आहे आणि पुद्गलादि अचेतन द्रव्य अजीव आहेत.

अमृतचंद्राचार्यांनी या गाथेचा भाव असा स्पष्ट केला आहे –

''या जगात एकत्वाला कारणीभूत द्रव्यत्वसामान्याला सोडल्या-शिवाय विशेष लक्षणांच्या सद्भावामुळे एकमेकांपासून पृथक केले असता द्रव्य जीवत्व व अजीवत्वरूप विशेषाला प्राप्त होतात. त्यापैकी जीवाचा 'आत्मद्रव्य' हा एकच प्रकार आहे व अजीवाचे पुद्गलद्रव्य, धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, आकाशद्रव्य व कालद्रव्य – हे पाच प्रकार आहेत.

यापैकी जीवाचे विशेष लक्षण चेतना-उपयोगमयत्व आहे आणि अजीवाचे विशेष लक्षण अचेतनत्व आहे.

स्वधर्मांमध्ये व्याप्त असल्याने स्वरूपरूपे प्रकाशित होणाऱ्या अविनाशी, भगवती, संवेदनरूप चेतनेद्वारे तसेच चेतनापरिणामलक्षण द्रव्यपरिणतीरूप उपयोगाद्वारे ज्यामध्ये निष्पन्नपना अवतरित प्रतिभासित होतो; तो जीव आहे आणि ज्यामध्ये उपयोगाबरोबर राहणारी यथोक्त चेतनेचा अभाव असल्याने बहिरंगात आणि अंतरंगात अचेतनपना अवतरित प्रतिभासित होतो; तो अजीव आहे.''

आचार्य जयसेनांनी या गाथेचा भाव जरी आचार्य अमृतचंद्रांसमानच स्पष्ट केला आहे; तरी त्यांनी ही बाब नयविभागाने स्पष्ट केली आहे.

या गाथेचा भाव वृंदावनदासजींनी पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मनहरण कवित्त)

सत्तारूप दर्व दोय भांति है अनादि सिद्ध,
जीव औ अजीव यही साधी श्रुति मंथ है।
तामें जीव लच्छन विलच्छन है चेतनता,
जासको प्रकाश अविनाशी पुंज पंथ है॥
ताही को प्रवाह ज्ञान दर्शनोपयोग दोय,
सामान्य विशेष वस्तु जानिवे तैं कंथ है।
पुग्गल-प्रमुख दर्व अजीव अचेतन हैं,
ऐसे वृन्द भाषी कुन्दकुन्द निरगंथ हैं॥३॥

अनादीसिद्ध सत्तास्वरूप द्रव्य जीव व अजीव अशा भेदांनी दोन प्रकारचे आहेत. शास्त्रांच्या मंथनाने ही बाब सिद्ध झालेली आहे. त्यापैकी जीवाचे विलक्षण लक्षण अविनाशी प्रकाशवान चेतना आहे. तिच्या प्रवाहरूप सामान्याचा ग्राहक दर्शनोपयोग व विशेषाचा ग्राहक ज्ञानोपयोग आहे. पुद्गलादी अजीवद्रव्य अचेतन आहेत.

वृंदावन कवींनी म्हटले की निर्ग्रंथ कुंदकुंदांनी हेच सांगितले आहे. पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(अडिल्ल)

दरव जीव निरजीव उभै विधि जानिये।
पुनि चेतना स्वरूप जीव पहिचानिये ।।
सहित बहुरि उपयोग जानिवौ देखिवौ।
पंचभाव तन आदि अचेतन लेखिवौ ।।६२।।

द्रव्य जीव आणि अजीव असे दोन प्रकार जाणावेत आणि त्यांच्यात चेतनालक्षणवाला जीव जाणणे-पाहणेरूप चेतनेने ओळखला जातो. शरीर इत्यादी पाच प्रकारचे अचेतन द्रव्य अजीव आहेत.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''सर्वज्ञ भगवंतांद्वारे आपल्या केवलज्ञानात जाणलेल्या व दिव्यध्वनीमध्ये प्रतिपादित केलेल्या सहा द्रव्यांचे वास्तविक स्वरूप सांगतात. त्यापैकी सर्वप्रथम द्रव्यांचे दोन प्रकार आहेत – जीव व अजीव. या जगात केवळ जीव नाही व एकटे अजीव द्रव्यही नाही; तर जीव व अजीव दोन्ही आहेत.[१] त्यापैकी चेतनामय व उपयोगमय जीव आहे आणि पुद्गलादी अचेतन द्रव्य अजीव आहेत.[२]

द्रव्यांना द्रव्यरूपे पाहिले असता त्यांच्यात भेद पडत नाहीत. द्रव्यपणा सर्वांमध्ये समान असूनही प्रत्येक द्रव्याच्या विशेष लक्षणाच्या अस्तित्वामुळे त्यामध्ये भेद पडतात. 'द्रव्य' – एवढेच म्हटल्याने जीव-अजीव भिन्न होत नाहीत; परंतु विशेषामुळे भिन्न होतात.[३]

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३

जीवाचे विशेष लक्षण चेतनामयपणा व उपयोगमयपणा आहे. समस्त ज्ञेयांना एका समयात जाणणे जीवाचा स्वभाव आहे. एका ज्ञेयाला जाणणे जर अस्वीकृत झाले तर चेतना उपयोगच सिद्ध होत नाही.[१]

आशय हा आहे की द्रव्यपणारूप सामान्याच्या अपेक्षेने द्रव्यात एकता असूनही विशेष लक्षणांच्या अपेक्षेने द्रव्यांचे जीव व अजीव – हे दोन भेद आहेत. जे द्रव्य महिमावंत चेतनासहित व चेतनेच्या उपयोगासहित आहेत, ते जीव व चेतनारहित असल्याने अचेतन आहेत, ते द्रव्य अजीव आहेत.

अशाप्रकारे जीवाचा एक व अजीवाचे पाच भेद आहेत.[२]''

अशाप्रकारे या गाथेत केवळ एवढेच म्हटले आहे की जरी द्रव्यसामान्याच्या अपेक्षेने सर्व पदार्थ द्रव्य आहेत; तरीही द्रव्य एक नसून अनेक आहेत, अनेक प्रकारचे आहेत. त्या अनेक प्रकारांमध्ये एक प्रकार हा सुद्धा आहे की चेतना लक्षणवान काही द्रव्य जीव आहेत व चेतना लक्षणाने रहित बाकी सर्व पुद्गलादी द्रव्य अजीव आहेत.

वास्तविक द्रव्य सहा प्रकारचे आहेत – जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल. यामध्ये जीव सोडता बाकी पाच द्रव्यांना अजीव म्हटले जाते; कारण ते जीव नाहीत, त्यांच्यात जीवत्व, चेतना नाही.

त्यांना जे अजीव नाव दिले आहे, ते जीवाच्या अपेक्षेने दिले आहे, जीवाच्या मुख्यतेने केलेल्या कथनाच्या अपेक्षेने आहे; कारण त्या द्रव्यांची आपापली स्वतंत्र नावे व त्यांच्या स्वतंत्र व्याख्याही आहेत त्यांची चर्चा पुढे योग्य ठिकाणी येईलच.

प्रश्न : अजीव नावाचे एखादे स्वतंत्र द्रव्य नाही काय ?

उत्तर : जीवापासून भिन्न पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल – या पाच द्रव्यांना सोडता वेगळे असे अजीव नावाचे कोणतेही स्वतंत्र द्रव्य नाही. जेव्हा आपण एखाद्याला विचारतो की येथे जैनांची किती घरे आहेत ? तेव्हा उत्तर मिळते की येथे १०० घरे आहेत. परंतु जर असे विचारले की येथे अजैनांची किती घरे आहेत तर असेच म्हटले जाईल की बाकीचे सर्व अजैनच तर आहेत.

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३

२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ७

परंतु माझे म्हणणे आहे की जेव्हा आपण एखाद्याला विचारतो की आपण कोण आहात ? तर असे म्हणणारे अनेक जण सापडतील की आम्ही जैन आहोत, वैष्णव, हिंदू, मुस्लिम, सिख, बौद्ध आहोत; परंतु कोणीही हे म्हणणार नाहीत की आम्ही अजैन आहोत. तात्पर्य हे की स्वत:ला कोणी अजैन मानत नाही, अजैन नावाने बोलावित नाही व स्वत:ला अजैन म्हणवून घेणे देखील लोकांना आवडत नाही; कारण अजैन हे नाव तर त्यांना आपल्यापासून भिन्न दर्शविण्यासाठी दिले होते. हे तर नकारात्मक नाव आहे, तो याचा स्वीकार का करणार ?

अशाच प्रश्नाच्या उत्तरामध्ये काय आपण हे उत्तर देऊ की आम्ही अहिंदू आहोत, असिख, अबौद्ध आहोत ? जर नाही तर मग ते सर्व जण असे कसे म्हणू शकतील की ते अजैन आहेत ?

वास्तविक पाहता बाब ही आहे की सकारात्मकरूपे (पॉजिटिव्ह) अजैन कोणी नाही; त्यांना आपल्यापासून भिन्न दर्शविण्यासाठी आम्ही नकारात्मक (निगेटिव्ह) भाषेचा प्रयोग करून अजैन म्हणतो.

त्याचप्रमाणे जीवापासून भिन्न पुद्गलादि सर्व पदार्थांना अजीव म्हटले जाते; ज्याप्रमाणे पुद्गलादी पासून जीव भिन्न आहेत; त्याचप्रमाणे पुद्गलादीपासून भिन्न कोणी अजीव नाही.

प्रश्न : जर असे आहे तर कोणत्याही पदार्थांना अजीव म्हणणे योग्य नाही ?

उत्तर : का ? वस्तुस्वरूपाच्या प्रतिपादनासाठी त्याची अत्यंत आवश्यकता आहे. जर आपल्याला आपल्यापासून भिन्न पुद्गलादी सर्व द्रव्यांना एकाच नावाने सांगावयाचे असेल तर अजीवाशिवाय इतर कोणता शब्द असा आहे की तो येथे लागू पडू शकेल ?

वस्तुस्वरूपाच्या स्पष्टतेसाठी हे अत्यंत आवश्यक आहे.

असा हा केवळ एकच प्रयोग नाही. याच प्रवचनसार ग्रंथात पुढे सहा द्रव्यांच्या संदर्भात याच प्रकारचे अनेक प्रयोग सापडतील. जसे – द्रव्य दोन प्रकारचे आहेत – मूर्तिक आणि अमूर्तिक. केवळ पुद्गलच मूर्तिक आहे, बाकी सर्व द्रव्यांचे एक नाव अमूर्तिक आहे. ●

प्रवचनसार गाथा १२८

मागील १२७ व्या गाथेमध्ये जीवद्रव्याच्या मुख्यतेने द्रव्यांच्या जीव व अजीव भेदांचे स्वरूप स्पष्ट केल्यानंतर आता त्यांचे विभाजन आकाश द्रव्याच्या मुख्यतेने लोक आणि अलोक अशाप्रकारे करतात.

लोक व अलोकांचे स्वरूप स्पष्ट करणारी मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

पोग्गलजीवणिबद्धो धम्माधम्मत्थिकायकालड्ढो।
वट्टदि आगासे जो लोगो सो सव्वकाले दु॥१२८॥

(हरिगीत)

आकाश में जो भाग पुद्गल जीव धर्म अधर्म से।
अर काल से समृद्ध वह सब लोक शेष अलोक है॥१२८॥

आकाशात जो भाग जीव व पुद्गलाने संयुक्त आहे, तसेच धर्मास्तिकाय, अधर्मास्तिकाय व कालद्रव्याने समृद्ध आहे; तो भाग सर्व सदैव लोक आहे.

या गाथेचा भाव अमृतचंद्राचार्यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"लोक व अलोक –द्रव्यांचे हे वर्गीकरण आपले विशेष वैशिष्ट्य बाळगून आहे, कारण लोक व अलोकांची खास लक्षणे आहेत.

लोकाचे लक्षण षड्द्रव्यसमुदायात्मकता व अलोकाचे लक्षण केवळ आकाशात्मकता आहे. सर्व द्रव्यात व्याप्त असणाऱ्या महान आकाशापैकी जेवढ्या आकाशात गती-स्थिती करणारे असे जीव व पुद्गल गती-स्थितीला प्राप्त होतात, त्यांच्या गती-स्थितीत निमित्तभूत असे धर्म व अधर्मद्रव्य व्याप्त होऊन रहातात व सर्व द्रव्यांच्या परिणमनात निमित्तभूत असणारे कालाणुद्रव्य सदैव राहतात, तेवढे आकाश व बाकीची सर्व द्रव्य – या सर्वांचा समुदाय लोक आहे व हेच लोकाचे लक्षण आहे.

जेवढ्या आकाशात जीव व पुद्गलाची गती-स्थिती असत नाही, धर्म व अधर्मद्रव्य रहात नाहीत व कालाणू देखील रहात नाहीत; तेवढे

निव्वळ आकाशच अलोक आहे व हेच अलोकाचे लक्षण आहे.''

येथे खास लक्ष देण्यायोग्य बाब अशी की जेवढ्या आकाशात सहा द्रव्य रहातात, फक्त त्या आकाशाला लोक म्हणत नाहीत तर सहा द्रव्यांच्या समूहाला लोक म्हणतात. हे महान आध्यात्मिक कवी दौलतरामजींच्या लक्षात आली होती, म्हणून तर त्यांनी छहढालेत लोकभावनेसंबंधी लिहिलेल्या श्लोकात **'षटद्रव्यमयी'** असे लिहिलेले आहे.

आचार्य जयसेनांच्या तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये देखील ही बाब अत्यंत स्पष्ट शब्दात लिहिली आहे की सहा द्रव्यांचा समूहच लोक आहे.

जरी कविवर वृंदावनदासजींच्या छंदामध्ये ही बाब स्पष्टपणे दिसून आली नाही, तरीही त्यांच्या कथनामध्ये वरील तथ्याविरुद्ध काही सांगितले असावे असे देखील नाही. या गाथेचा भाव ते छंदाच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे व्यक्त करतात –

(छप्पय)

जो नभ के परदेश जीव पुद्गल समेत हैं।
धर्माधर्म सु अस्तिकाय के जो निकेत हैं॥
कालानूजुत पंच दरव परिपूरन जामें।
सोई लोकाकाश जानु, संशय नहिं यामें॥
सब कालमाहिं सो अचल है अवगाहन गुन को धरैं।
तसु परे अलोकाकाश जहँ पंच रंच नहिं संचरै॥४॥

आकाशाचे जे प्रदेश जीव व पुद्गलासहित आहेत; धर्म, अधर्मास्तिकायांचे घर आहेत व ज्यामध्ये कालाणू सहित पाच द्रव्य पूर्णपणे भरलेली आहेत; त्यालाच लोकाकाश जाणा, यामध्ये बिलकूल शंका नाही.

ते लोकाकाश सदैव अचल आहे, अवगाहन गुणाला धारण करून आहे व या लोकाच्या बाहेर अलोकाकाश आहे, तेथे उरलेल्या पाच द्रव्यांचा संचार नाही.

पंडित देवीदासजींनी एका छप्पय छंदामध्ये वरील तथ्य सहजपणे स्पष्ट केले आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"लोकाचे लक्षण सहा द्रव्यांचा समुदायस्वरूपपणा आहे. लोकात सहा द्रव्यांचा समुदाय असतोच. सर्व द्रव्यात ते व्यापक आहे, परम महान आकाशाच्या जेवढ्या भागात जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, काल राहतात, तेवढे आकाश व इतर पाच द्रव्य–अशा सहा द्रव्यांचा समुदाय लोक आहे.[१]

आकाशाच्या ज्या भागात जीव व पुद्गल स्वत:मुळेच गती वा स्थिती करीत नाहीत; धर्म, अधर्म द्रव्य स्वत:मुळेच तेथे नाहीत व जेथे कालाणू नाहीत; तेवढेच फक्त आकाश ज्याचे स्वलक्षण आहे, त्याला अलोक असे म्हणतात. अलोकात लोकाकाशाव्यतिरिक्त बाकीचे फक्त आकाश आहे, इतर कोणतीही द्रव्ये नाहीत.[२]

लोक मर्यादित व अलोक अमर्यादित आहे. एकंदरीत जसे ज्ञेय आहे तसे जाणले नाही तर ज्ञान विपरीत होते व ज्याचे ज्ञान विपरीत असते, त्याला धर्म होत नाही.[३]

ज्ञानाच्या विशालतेकरिता ज्ञेयांचे विशेष जसे आहेत, तसे समजले पाहिजेत.[४]"

येथे एक प्रश्न संभवतो की सहा द्रव्यांचा समुदाय लोक आहे; यामध्ये खास ध्यान देण्यासारखे काय आहे ? सर्वजण असेच जाणतात, मानतात.

असे नव्हे. बहुतांशी जण लोकाकाश व लोकामध्ये फरक समजू शकत नाहीत. ते लोकाकाश व लोक यांना एकच मानतात; वास्तविक त्यांच्यात फरक आहे. लोक हे सहा द्रव्यांच्या समूहाचे नाव आहे व लोकाकाश नुसत्या आकाशद्रव्याचा तो भाग आहे, ज्यामध्ये सहाही द्रव्य आढळतात.

प्रश्न : विश्व आणि लोक ही तर एकच बाब आहे ना ?

उत्तर : नाही, विश्वात अलोकाकाशही सामिल आहे. लोकात अलोकाकाश सामिल नाही. विश्व हे सहा द्रव्यांचा समुदाय आहे व लोक आकाशाचा तो भाग आहे, जेथे सहाही द्रव्य आढळतात. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ९
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १०
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १०
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १०

प्रवचनसार गाथा १२९

वस्तुस्वरूपाला स्पष्ट करण्याकरिता द्रव्यविशेषप्रज्ञापन अधिकारात सहा द्रव्यांचे वर्गीकरण अनेक प्रकारे केलेले आहे. आतापर्यंत त्यापैकी जीव-अजीव व लोक-अलोक यांची चर्चा झाली आहे. आता या गाथेमध्ये क्रियावान व भाववान यांची चर्चा करीत आहेत.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

उप्पादट्ठिदिभंगा पोग्गलजीवप्पगस्स लोगस्स।
परिणामा जायंते संघादादो व भेदादो॥१२९॥

(हरिगीत)

जीव अर पुद्गलमयी इस लोक में परिणमन से।
भेद से संघात से उत्पाद-व्यय-ध्रुवभाव हों॥१२९॥

पुद्गल-जीवात्मक लोकाच्या परिणामाने व संघात आणि भेदाने उत्पाद, ध्रौव्य व व्यय होतात.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"द्रव्यात या अपेक्षेने सुद्धा भेद होऊ शकतो की काही द्रव्ये भाववान व क्रियावान आहेत व काही द्रव्ये फक्त भाववान आहेत. पुद्गल व जीव भाववान पण आहेत व क्रियावान सुद्धा आहेत; कारण ते परिणामांद्वारे आणि भेद व संघाताद्वारे उत्पन्न होतात, टिकतात व नष्ट होतात. बाकीची द्रव्ये फक्त भाववानच आहेत; कारण ती परिणामांद्वारेच उत्पन्न होतात, टिकतात आणि नष्ट होतात – असा निश्चय आहे.

यामध्ये भावाचे लक्षण परिणाम आहे व क्रियेचे लक्षण परिस्पंदन (कंपन) आहे. भाववान तर सर्वच द्रव्ये आहेत, कारण परिणाम-स्वभाववाले असल्याने परिणामांद्वारे अन्वय आणि व्यतिरेकांना प्राप्त होत असताना ती उत्पन्न होतात, टिकतात व नष्ट होतात.

पुद्गल भाववान असून क्रियावान देखील आहेत; कारण की परिस्पंदन

स्वभाववान असल्याने, परिस्पंदनाद्वारे पृथक पुद्गल एकत्रित होतात व एकत्रित पुद्गल पुन: पृथक होतात. या अपेक्षेने ते उत्पन्न होतात, टिकतात व नष्ट होतात. जीव देखील भाववान व त्याचबरोबर क्रियावानही आहेत; कारण परिस्पंदनस्वभाववाले असल्याने परिस्पंदनाद्वारे नवीन कर्म-नोकर्मरूप पुद्गलाहून भिन्न असलेले जीव त्यांच्याबरोबर एकत्रित झाल्याने व कर्म-नोकर्मरूप पुद्गलाबरोबर एकत्रित झालेले जीव नंतर वेगळे होतात, त्या अपेक्षेने ते उत्पन्न होतात, टिकतात व नष्ट होतात.''

येथे एक प्रश्न असा संभवतो की लोक जीव-पुद्गलात्मकच आहे – असे का लिहिले आहे ? ते तर षडद्रव्यात्मक आहे.

या प्रश्नाचे उत्तर आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये दिले आहे की लोक तर षडद्रव्यात्मकच आहे, येथे उपलक्षणाने त्याला जीव-पुद्गलात्मक म्हटले आहे. या वर्गीकरणाला आचार्य जयसेनांनी सक्रिय व निष्क्रिय द्रव्यांच्या रूपात प्रस्तुत केले आहे. त्याचबरोबर हे देखील स्पष्ट केले आहे की जीव व पुद्गल यांच्या अर्थ व व्यंजन दोन्ही पर्याय होतात. बाकीच्या द्रव्यांच्या फक्त अर्थ पर्यायच होतात.

आपला मुद्दा स्पष्ट करताना त्यांनी लिहिले आहे की अर्थपर्याय प्रत्येक समयाला परिणमनरूप होतात व जेव्हा जीव या शरीराचा त्याग करून दुसऱ्या भवात शरीराला ग्रहण करतो, तेव्हा विभावव्यंजनपर्याय होते. त्याचप्रमाणे पुद्गलामध्ये देखील विभावव्यंजनपर्याय होते, म्हणूनच जीव व पुद्गलाला सक्रीय द्रव्य म्हटले जाते.

मुक्त जीवांना स्वभावव्यंजनपर्याय होतात, कारण त्यांच्यात भेदच असतो संघात नव्हे.

वरील गाथेचा भाव कविवर वृंदावनदासजींनी दोन दोहे व एक मनहरण – अशा तीन छंदातून प्रस्तुत केला आहे. सर्व छंद मुळातून पठनीय आहेत, परंतु नमुन्यादाखल एक छंद प्रस्तुत केला आहे –

(मनहरण कवित्त)

क्रियावंत भाववंत ऐसे दोय भेदनि तैं,
दर्वनि में भेद दोय भाषी भगवंत है।

मिलि विछुरन हलचलन क्रिया है औ,
सुभाव परनति गहै सोई भाववंत है।।
जीव पुद्गलमाहिं दोनों पद पाइयत,
धर्माधर्म काल नभ भाव ही गहत है।
धन्य धन्य केवली के ज्ञान को प्रकाश वृन्द,
एकै बार सर्व सदा जामें झलकंत है।।७।।

द्रव्यांचे क्रियावान व भाववान – हे दोन भेदही भगवंतांनी सांगितले आहेत. एकत्रित होणे व विखुरणे आणि हलन-चलन होणेच क्रिया आहे व स्वभावपरिणतीच भाव आहे. जीव व पुद्गल यांच्यात क्रिया व भाव दोन्ही आढळतात; परंतु धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, आकाशद्रव्य व कालद्रव्य यांच्यात फक्त भावपणाच आढळतो.

वृंदावन कवी म्हणतात की केवली भगवंतांच्या ज्ञानाचा प्रकाश धन्य आहे की ज्यामध्ये सर्व पदार्थ सदैव एकदम एकावेळेस झळकतात.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(अडिल्ल)

पुग्गल दरव सु जीव सु गुरु ये दो कहैं।
इनकी परनति रूप क्रिया सो लोक है।।
उपजै अरु थिर रूप 'णसै इहि' घाट हैं।
विछुरन और मिलाप सौं सो बहु ठाट हैं।।६४।।

श्रीगुरुंनी म्हटले आहे की जीव आणि पुद्गल – हे दोन्ही द्रव्य क्रियावती शक्तीवाले आहेत, यांच्यात क्षेत्राहून क्षेत्रांतररूप क्रिया होते, जेथपर्यंत हे आहेत, तेवढे लोक आहे, याच घाटावर (क्षेत्रात) हे उत्पन्न होतात, स्थिर राहतात आणि नष्ट होतात. जीव व पुद्गल एकत्र आल्याने व वेगळे झाल्याने लोकात अनेक विचित्रता आहेत.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''तेथे भावाचे लक्षण परिवर्तन एवढेच आहे व क्रियेचे लक्षण एकत्रित

होणे व वेगळे होणे आहे. सर्व द्रव्ये भाववानच आहेत, कारण सर्वांचा स्वभाव पलटण्याचा (परिणमनाचा) आहे. अशा पलटण्याच्या स्वभावाच्या परिणमनामुळे अन्वय व व्यतिरेकांना प्राप्त झाल्याने उत्पन्न होतात, टिकतात व नष्ट होतात. अन्वय ध्रौव्यपणाला व व्यतिरेक उत्पाद-व्ययपणाला दर्शवितात. जीव व पुद्गल दोन्ही द्रव्ये क्रियावान आहेत.[१] पुद्गलद्रव्य परिणमनस्वभावाशिवाय क्षेत्रांतर होण्याच्या क्रियावाले देखील आहेत. त्यांच्या क्षेत्रांतर होण्याच्या योग्यतेमुळे वेगवेगळे परमाणू एकत्रित होतात व एकत्रित असलेले परमाणू वेगळे होतात. असे वेगळे व एकत्रित होत असल्याने पुद्गलद्रव्य उत्पन्न होते, टिकते व नष्ट होते.[२]

अशाप्रकारे वेगळे होणे, एकत्रित होणे, टिकणे हे चालूच राहते – अशी क्रियावती शक्ती पुद्गलामध्ये विद्यमान आहे व त्यामुळे क्षेत्रांतर होणे चालूच राहते, परंतु अज्ञानी जीव-पुद्गलाच्या या स्वभावाला न पाहता, संयोगाकडे पाहतो व मानतो की अमुक निमित्त होते, म्हणून ही क्रिया झाली आहे.[३]

येथे कंपनाचा अर्थ क्षेत्रांतर समजला पाहिजे.[४] येथे पुद्गलाचा स्वभाव सांगून हे सांगावयाचे आहे की जीव परद्रव्यात काहीही करण्यास समर्थ नाही. अशाप्रकारे सर्वांचा स्वतंत्र स्वभाव सांगावयाचा आहे.

जीवाचा प्रत्येक समयाला परिणमनस्वभाव तर आहेच, शिवाय जीवात क्रियावती शक्ती सुद्धा आहे. आपल्या कंपन स्वभावामुळे तो उत्पन्न होतो, टिकतो व बदलतो.[५] शरीर वं आत्मा यांच्या क्रियावती शक्तीला चांगल्याप्रकारे जाणल्याने ह्या विपरीत मान्यतेचा अभाव होतो की एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यामुळे चालते किंवा जीव नसल्याने मुडदा चालत नाही. वास्तविक पाहता दोन्ही द्रव्य क्रियावती शक्तीची गमनरूप किंवा स्थिररूप राहण्याची योग्यता स्वत:मुळेच धारण करतात.

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १३
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १३
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १४
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १४
५) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १४

ज्ञेयांचा असा स्वतंत्र स्वभाव आहे. ज्ञेयाचे असे यथार्थ ज्ञान सम्यग्ज्ञानाचे कारण आहे. परिणमन शक्ती व क्रियावती शक्ती हा ज्ञेयांचा स्वभावच आहे – हा निर्णय केल्याने अनादी काळापासून परपदार्थांना हलविणे-चालविणे, परिणमन करविणे व परपदार्थ असतील तर आपल्यात परिणमन होईल – अशा अनेक विपरीत मान्यता नष्ट होतात आणि अशा खऱ्या ज्ञानाने धर्मदशा उत्पन्न होते.[१]''

वरील गाथेत हेच सांगितले आहे की जीव व पुद्गल द्रव्यांना सोडता बाकी चारही द्रव्यात क्षेत्रापासून क्षेत्रांतर गमनरूप क्रिया होत नाही.

ज्यामध्ये कालद्रव्य निमित्त असते अशी परिणमनरूप क्रिया तर सर्व सहा द्रव्यांत होते; परंतु ज्यामध्ये धर्मद्रव्य निमित्त असते, अशी क्षेत्राहून क्षेत्रांतर गमनरूप क्रिया व ज्यामध्ये अधर्मद्रव्य निमित्त असते – अशी गमनपूर्वक थांबणेरूप क्रिया जीव व पुद्गलामध्येच होते. यामुळेच जीव व पुद्गलांना सक्रिय द्रव्य म्हटले आहे.

वरील क्रियेचा अभाव असल्याने बाकीच्या द्रव्यांना निष्क्रिय द्रव्य म्हटले आहे.

परिणमनरूप क्रिया तर सर्व द्रव्यांमध्ये होतच असते; परंतु त्यामुळे कोणत्याही द्रव्याला सक्रिय म्हटले जाऊ शकत नाही.

सर्व द्रव्यांमध्ये एक भाववती शक्ती आहे, त्यामुळे परिणमनरूप क्रिया होते, तसेच जीव व पुद्गलामध्ये भावशक्तीबरोबर क्रियावती शक्तीदेखील आहे, ज्यायोगे परिस्पंदन म्हणजेच एका क्षेत्राहून क्षेत्रांतररूप गमन, हलन-चलनरूप क्रिया होते.

कालद्रव्य, धर्मद्रव्य व अधर्मद्रव्य तर केवळ निमित्तमात्र असतात. परिणमनरूप क्रिया व परिस्पंदनरूप क्रिया तर भाववती व क्रियावती शक्तीमुळेच होते. ज्ञेयतत्त्वाचे असे स्वरूप समजल्याने चित्तामध्ये स्वाधीनतेचा भाव जागृत होतो. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १४

प्रवचनसार गाथा १३०-१३१

मागील गाथांमध्ये द्रव्यांना जीव-अजीव, लोक-अलोक व क्रियावान-भाववान या रूपात प्रस्तुत केले आहे आणि आता या आगामी दोन गाथांमध्ये त्यांना मूर्त-अमूर्त रूपात प्रस्तुत करीत आहेत.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहेत –

लिंगेहिं जेहिं दव्वं जीवमजीवं च हवदि विण्णादं।
तेऽतब्भावविसिट्ठा मुत्तामुत्ता गुणा णेया॥१३०॥
मुत्ता इंदियगेज्झा पोग्गलदव्वप्पगा अणेगविधा।
दव्वाणममुत्ताणं गुणा अमुत्ता मुणेदव्वा॥१३१॥

(हरिगीत)

जिन चिह्नों से द्रव ज्ञात हों रे जीव और अजीव में।
वे मूर्त और अमूर्त गुण हैं अतद्भावी द्रव्य से॥१३०॥
इन्द्रियों से ग्राह्य बहुविधि मूर्त्त गुण पुद्गलमयी।
अमूर्त्त हैं जो द्रव्य उनके गुण अमूर्त्तिक जानना॥१३१॥

ज्या लिंगांपासून द्रव्य जीव आणि अजीव या रूपाने ज्ञात होतात; ते अतद्भाव विशिष्ट मूर्त-अमूर्त गुण जाणले पाहिजेत.

जे इंद्रियाने ग्रहण केले जातात – असे मूर्तगुण पुद्गलद्रव्यात्मक आहेत व ते अनेक प्रकारचे आहेत व अमूर्त द्रव्यांचे गुण अमूर्त जाणले पाहिजेत.

या गाथांचा भाव अमृतचंद्रचार्यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"पराच्या आश्रयाविना स्वद्रव्याचा आश्रय घेऊन प्रवर्तमान असल्याने ज्यांच्याद्वारे द्रव्य लिंगित होते, ओळखले जाते, त्या लिंगांना गुण म्हणतात. 'जे द्रव्य आहेत, ते गुण नाहीत व जे गुण आहेत, ते द्रव्य नाहीत – या अपेक्षेने द्रव्यापासून अतद्भावाद्वारे ते गुण विशिष्ट वर्तत असताना, लिंग व लिंगी या रूपामध्ये प्रसिद्धिच्या वेळी द्रव्याच्या लिंगत्वाला प्राप्त होतात.

ते लिंग किंवा गुण द्रव्यात 'हे जीव आहेत व हे अजीव आहेत' – असा भेद उत्पन्न करतात, कारण स्वत:च तद्भावाद्वारे विशिष्ट असल्याने विशेषपणाला प्राप्त होतात. ज्या-ज्या द्रव्याचा जो-जो स्वभाव आहे,

त्या-त्या द्रव्याचा त्या-त्या गुणांद्वारे विशिष्टत्व असल्याने त्यांच्यामध्ये भेद आहे, म्हणून मूर्त किंवा अमूर्त द्रव्यांचा मूर्तत्वरूप-अमूर्तत्वरूप तद्भावाद्वारे विशिष्टत्व असल्याने त्यांच्यामध्ये अशा प्रकारचा भेद निश्चित केला पाहिजे की हे गुण मूर्त आहेत व हे गुण अमूर्त आहेत.

मूर्त गुणांचे लक्षण इंद्रियग्राह्यत्व आहे व अमूर्त गुणांचे त्याहून विपरीत म्हणजेच अमूर्त गुण इंद्रियांच्या माध्यमातून ज्ञात होत नाहीत.

मूर्त गुण पद्गलद्रव्याचे आहेत, कारण पुद्गलच मूर्त आहे व अमूर्त गुण इतर द्रव्यांचे आहेत, कारण पुद्गलाशिवाय बाकी सर्व द्रव्ये अमूर्त आहेत.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीत या गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिके-प्रमाणेच स्पष्ट केला आहे, तथापि तद्भाव व अतद्भाव यांचे स्वरूप स्पष्ट करताना त्यांनी लिहिले आहे की शुद्ध जीव द्रव्यात जे केवलज्ञानादी गुण आहेत, त्यांचे शुद्ध जीवांच्या प्रदेशाबरोबर जे एकत्व आहे, अभिन्नत्व आहे, तन्मयत्व आहे, तो तद्भाव म्हटला जातो. त्याच गुणांचा त्या प्रदेशांबरोबर जेव्हा संज्ञा, लक्षण, प्रयोजन वगैरेने भेद केला जातो, तेव्हा त्यालाच अतद्भाव म्हटले जाते.

तात्पर्य हे की द्रव्य व गुणात अभिन्नप्रदेशत्व असल्याने तद्भाव आहे व संज्ञा, संख्या, लक्षण वगैरेंच्या अपेक्षेने भेद असल्याने अतद्भाव आहे. अशाप्रकारे द्रव्य व गुण यांच्यात तद्भाव सुद्धा आहे व अतद्भावही आहे.

येथे एक प्रश्न असा संभवतो की परमाणू इंद्रियग्राह्य नाही, मग त्याला मूर्त का मानले जाते ? कारण 'मूर्त' ची व्याख्या तर **'इंद्रियाने ग्राह्य'** अशी केलेली आहे.

आचार्य प्रभाचंद्रांनी प्रवचनसाराच्या **सरोजभास्कर** टीकेत याचे उत्तर पुढीलप्रमाणे दिले आहे – इंद्रियांद्वारे ग्रहण होण्याच्या योग्यतारूप शक्तीच्या प्रगटतेच्या अपेक्षेने सूक्ष्म परमाणू सुद्धा इंद्रियग्राह्य मानले आहेत.

वरील दोन्ही गाथांचा भाव कविवर वृंदावनदासजींनी १ मनहरण, १ छप्पय व ४ दोह्यांच्या माध्यमातून प्रस्तुत केला आहे. ते सर्व मुळातून पठनीय आहेत, नमुन्यादाखल त्यापैकी ४ दोहे प्रस्तुत आहेत –

(दोहा)

मिली परस्पर वस्तु को जाकरि लखिये भिन्न।
लच्छन ताही को कहत न्यायमती परविन्न ॥९॥
जो सुकीय नित दरव के हैं अधार निरबाध।
सोई गुन कहलावई वर्जित दोष उपाध ॥१०॥
तेई दरवनि के सुगुन लच्छन नाम कहाहिं।
जातैं तिनकरि जानियै लच्छ दरब सब ठाहिं ॥११॥
भेद विवच्छा तैं कहे गुनी सुगुन में भेद।
वस्तु विचारत एक हैं ज्ञानी लखत अखेद ॥१२॥

जे न्यायशास्त्रात निपुण आहेत, ते परस्पर मिसळलेल्या वस्तुंना ज्याद्वारे वेगवेगळे केले जाते त्याला लक्षण म्हणतात.

जे आपल्या द्रव्याच्या आधारे बाधारहित राहतात, त्यांनाच गुण म्हटले जाते – यामध्ये कोणताही दोष किंवा अडचण नाही.

त्या द्रव्यांचे ते सुगुणच लक्षण आहेत, त्यांच्याद्वारे द्रव्याला लक्षित केले जाते. भेदाच्या अपेक्षेने गुण आणि गुणी यांच्यात भेद मानला गेला आहे, परंतु वस्तुस्वरूपाचा विचार केला असता, ते दोन्ही एकच आहेत – असे ज्ञानी लोक खेदाविना जाणतात.

स्वामीजींनी या गाथांचा भाव खालीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

"गुण आपल्या द्रव्याचा आश्रय करतात, पराचा आश्रय करीत नाहीत. आत्म्याचे गुण आत्म्याचा व पुद्गलाचे गुण पुद्गलाचा आश्रय करतात. पुद्गलाचे गुण आत्म्याचा आश्रय केल्याशिवाय राहतात आणि आत्म्याचे गुण पुद्गलाचा आश्रय केल्याविना राहतात. ज्यांच्यामुळे द्रव्य ओळखले जाते – असे लिंग (चिह्न) गुण आहेत.[१]

जरी द्रव्य व गुण यांच्यात प्रदेशभेद नाही, तरी देखील संज्ञा, संख्या, लक्षणभेद यांनी भेद आहे.[२]

एकाचे नाव द्रव्य व दुसऱ्याचे गुण आहे. यावरून संज्ञाभेदाने भेद आहे.

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १३
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १३

द्रव्य संख्या अपेक्षेने एक व गुण संख्या अपेक्षेने अनेक आहेत, यावरून संख्या अपेक्षेने भेद आहे. द्रव्य सामान्य आहे, गुण विशेष आहेत. द्रव्य आश्रय देणारे आहे व गुण आश्रय घेणारे आहेत. द्रव्यामध्ये गुण असू शकतात, परंतु एकाच गुणात द्रव्य असू शकत नाही. द्रव्य अनंत गुणांचा पिंड आहे, गुणामध्ये एकच गुण आहे. यावरून लक्षणभेदाने भेद आहे.[१]

स्पर्श, रस, गंध, वर्णादिवान पुद्गलद्रव्य मूर्त द्रव्य आहे व जीव, धर्म, अधर्म आकाश व काल अमूर्त द्रव्ये आहेत. मूर्त द्रव्यामध्ये मूर्त गुण आहे व अमूर्त द्रव्यात अमूर्तत्व/अरूपीपणा आहे. त्या गुणांमध्ये रूपीपणा व अरूपीपणा – असे वैशिष्ट्य असल्याने, तसेच भिन्नता असल्याने पुद्गल द्रव्यात रूपीपणा आहे आणि जीव, धर्म, अधर्म, आकाश व काल यांच्यात अरूपीपणा आहे – असा निर्णय करणे ज्ञानाच्या निर्मलतेचे कारण आहे.[२]

मूर्तगुण पुद्गलद्रव्याचा आहे, कारण एक पुद्गलद्रव्यचे मूर्त आहे व अमूर्तगुण इतर पाच द्रव्यांचा म्हणजेच जीव, धर्म, अधर्म, आकाश व काल यांचा आहे, कारण पुद्गलाव्यतिरिक्त इतर पाच द्रव्ये अमूर्त आहेत.

अशाप्रकारे आत्म्यात स्पर्श, रस, गंध, वर्ण नाही. त्याचप्रमाणे इतर चार द्रव्यातही स्पर्शादी गुण नाहीत. असे ज्ञेयांना मूर्त-अमूर्त या भेदाने यथार्थपणे जाणणे हेच ज्ञानाच्या वैशिष्ट्याचे कारण आहे.[३]''

अशाप्रकारे वरील दोन्ही गाथांमध्ये हे स्पष्ट केले आहे की ज्या लिंगांनी (चिह्नांनी) द्रव्याला ओळखले जाते, त्यांना गुण म्हणतात.

जरी हे गुण आपल्या आश्रयभूत द्रव्याशी तन्मय आहेत, तरी त्यांच्यात आपसात अतद्भाव आहे. ज्या वस्तुंचे प्रदेश भिन्न-भिन्न असतात, त्यांच्यात अत्यंताभाव असतो व ज्यांचे प्रदेश अभिन्न असतात त्यांच्यात अतद्भाव असतो. ही बाब द्रव्यसामान्यप्रज्ञापन अधिकारात विस्ताराने सांगितलीच आहे. येथे तर हे सांगत आहेत की मूर्त द्रव्याचे सर्व गुण मूर्त असतात व अमूर्त द्रव्यांचे सर्व गुण अमूर्त असतात व जे इंद्रियाद्वारे जाणले जातात ते मूर्त व जे इंद्रियांद्वारे जाणले जात नाहीत, ते अमूर्त आहेत. ●

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १७
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १८
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २०

प्रवचनसार गाथा १३२

ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकारामध्ये आलेल्या द्रव्यविशेषप्रज्ञापन अधिकारामध्ये आतापर्यंत सहा द्रव्यांना जीव-अजीव, लोक-अलोक, सक्रिय-निष्क्रिय व मूर्त-अमूर्त द्रव्यांच्या रूपात प्रस्तुत केल्यानंतर आता आगामी तीन गाथांमध्ये सर्व द्रव्यांच्या त्या गुणांबद्दल सांगतील की ज्यायोगे ते ओळखले जातात. सर्वप्रथम १३२ व्या गाथेत मूर्त पुद्गलद्रव्याच्या गुणांना सांगितले आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

वण्णरसगंधफासा विज्जंते पुग्गलस्स सुहुमादो।
पुढवीपरियत्तस्स य सद्दो सो पोग्गलो चित्तो॥१३२॥

(हरिगीत)

सूक्ष्म से पृथ्वी तलक सब पुद्गलों में जो रहें।
स्पर्श रस गंध वर्ण गुण अर शब्द सब पर्याय हैं॥१३२॥

सूक्ष्म पुद्गलापासून पृथ्वीपर्यंत स्थूल पुद्गलांमध्ये वर्ण, रस, गंध व स्पर्श गुण असतात व विविध प्रकारचे शब्द पुद्गल द्रव्याच्या पर्याय आहेत.

आचार्य अमृतचंद्रांनी या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिकेमध्ये खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"इंद्रियांचे विषय असल्याने स्पर्श, रस, गंध व वर्ण इंद्रियग्राह्य आहेत. इंद्रियग्राह्यतेचा व्यक्तपणा व शक्तीवशात भले ते इंद्रियाद्वारे ग्राह्य केले जात असावे वा न केले जात असावे; तथापि ते एक द्रव्यात्मक सूक्ष्म परमाणुपासून अनेक द्रव्यात्मक स्थूलपर्यायरूप पृथ्वीस्कंधा-पर्यंतच्या सर्व पुद्गलांच्या अविशेषपणे विशेष गुणरूपाने असतात व ते मूर्त असल्यानेच पुद्गलाव्यतिरिक्त बाकीच्या द्रव्यांचे नसल्याने ते पुद्गलालाच दर्शवितात.

अशी शंका देखील करणे योग्य ठरणार नाही की शब्द सुद्धा

इंद्रियग्राह्य असल्याने गुण असावा; कारण शब्द विविधतेद्वारे अनेकानेकपणा दर्शवित असून सुद्धा अनेक द्रव्यात्मक पर्यायरूपाने स्वीकारले जातात.

प्रश्न : शब्दाला पर्याय न मानता गुण मानल्यास काय अडचण येईल?

उत्तर : पहिली बाब अशी की शब्दाला अमूर्तद्रव्याचा गुण मानले जाऊ शकत नाही, कारण गुण-गुणांचे अभेदप्रदेशत्व असल्याने एका ज्ञानाने ज्ञात होण्यायोग्य असल्याने अमूर्त द्रव्यही कर्णेंद्रियाचे विषय होतील.

दुसरी बाब ही आहे की पर्यायाच्या लक्षणाद्वारे गुणाचे लक्षण उत्थाप्रित होत असल्याने शब्द मूर्त द्रव्याचाही गुण नाही. पर्यायाचे लक्षण कादाचित्कपणाच (अनित्य) आहे व गुणाचे लक्षण नित्यपणा आहे; म्हणून शब्दात अनित्यतेपासून नित्यता उत्थापित होत असल्याने शब्द गुण नाहीत. शब्दांमध्ये जो नित्यपणा आढळतो, तो नित्यपणा शब्दांना उत्पन्न करणाऱ्या पुद्गलांचा व त्यांच्या स्पर्शादिक गुणांचाच आहे, शब्द पर्यायाचा नाही. अशाप्रकारे अतिदृढपणे ग्रहण केले पाहिजे.

जर एखाद्याने असा तर्क लढविला की शब्द जर पुद्गल पर्याय आहे तर मग ती पृथ्वीस्कंधाप्रमाणे स्पर्शादी इंद्रियांचा विषय व्हायला पाहिजे. तात्पर्य हे आहे की ज्याप्रमाणे पृथ्वीरूप पुद्गलपर्याय सर्व इंद्रियांनी जाणली जाते, त्याप्रमाणे शब्दरूप पुद्गलपर्याय देखील सर्व इंद्रियांनी जाणली गेली पाहिजे ?

हा तर्क योग्य नाही, कारण पुद्गलाची पर्याय असून देखील पाणी घ्राणेंद्रियाचा विषय नाही, पुद्गलाची पर्याय असूनही अग्नी घ्राणेंद्रिय व रसनेंद्रियाचा विषय नाही, तसेच पुद्गलाची पर्याय असून देखील वायु घ्राणेंद्रिय, रसनेंद्रिय व चक्षुइंद्रियांचा विषय नाही आणि असे देखील नाही की पाणी गंधरहित आहे, त्यामुळे ते घ्राणेंद्रियाने अग्राह्य आहे. अग्नी गंध व रसरहित असेल म्हणून घ्राणेंद्रिय व रसनेंद्रियाने अग्राह्य आहे व वायु गंध, रस व वर्णरहित असेल, म्हणून घ्राणेंद्रिय, रसनेंद्रिय व चक्षुइंद्रिय यांनी अग्राह्य आहे; कारण सर्व पुद्गल स्पर्श, रस, गंध व

वर्ण सहित मानले गेले आहेत; कारण ज्यांचे स्पर्शादी चतुष्क व्यक्त आहेत, अशा चंद्रकांत मण्याला, अरणीला आणि जवाला पुद्गल उत्पन्न करतात. त्यांच्याच द्वारे अनुक्रमे ज्यांचा गंध अव्यक्त आहे असे पाणी, ज्याचा गंध व रस अव्यक्त आहे असा अग्नी व ज्याचा गंध, रस व वर्ण अव्यक्त आहे असा उदरवायु यांची उत्पत्ती झालेली आढळते.

तात्पर्य हे आहे की स्पर्श, रस, गंध व वर्ण असणाऱ्या चंद्रकांत मण्यामधून पाण्याची, अरणीच्या लाकडापासून अग्नीची व जव नावाचे धान्य खाल्ले असता उदरवायुची उत्पत्ती झालेली आढळते.

मूळ बाब ही आहे की कोणत्याही पर्यायामध्ये एखाद्या गुणाच्या कादाचित्क परिणामाच्या विविधतेमुळे होणारा व्यक्तपणा व अव्यक्तपणा नित्य द्रव्यस्वभावाचा व्याघात करीत नाही. तात्पर्य हे आहे की अनित्य परिणाम असल्याने होणाऱ्या गुणाचा प्रगटपणा व अप्रगटपणा नित्य द्रव्यस्वभावाबरोबर कधीही विरोधाला प्राप्त होत नाही. म्हणून शब्द पुद्गलाची पर्यायच असली पाहिजे.''

आचार्य जयसेनांनी सुद्धा तात्पर्यवृत्तीमध्ये या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांप्रमाणेच तर्काच्या कसोटीवर पारखून प्रस्तुत केला आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेतील भाव ३१ छंदांद्वारे प्रस्तुत केला आहे, त्यामध्ये १ मत्तगयंद, १ सवैया, २ मनहरण, २ चौपाई, २ छप्पय, १ कवित्त व २३ दोहे आहेत. त्या सर्वांना येथे प्रस्तुत करणे तर शक्य नाही, परंतु ते सर्व मुळातून पठनीय आहेत.

ह्या ३१ छंदांमध्ये त्यांनी आचार्य अमृतचंद्रकृत टीकेमध्ये आलेल्या समस्त विषयवस्तुला सतर्क व सोदाहरण प्रस्तुत केले आहे. त्याचबरोबर ८ प्रकारचे स्पर्श, ५ प्रकारचे रस, ५ प्रकारचे वर्ण आणि २ प्रकारच्या गंधाच्या भेद-प्रभेदांना सुद्धा प्रस्तुत केले आहे.

मूळ गाथेमध्ये व आचार्य अमृतचंद्रकृत टीकेमध्ये तर पुद्गलाचे सूक्ष्म व स्थूल – हे दोन भेदच सांगितले आहेत; परंतु वृंदावनदासजींनी

आचार्य जयसेनांच्या तात्पर्यवृत्ती टीकेच्या आधारे सहा प्रकारचे पुद्गल सांगितले आहेत व त्यांचे स्वरूप देखील स्पष्ट केले आहे.

अशाचप्रकारे कवीवर पंडित देवीदासजींनी देखील या गाथेचा भाव १६ छंदातून सादर केला आहे. त्यामध्ये ९ दोहे, ६ चौपाई व १ कवित्त सामिल आहेत. त्या छंदामध्ये टीकेमध्ये आलेला संपूर्ण भाव सामावला आहे. विस्तारभयाने त्या सर्वांना येथे देणे शक्य नाही, त्यामुळे ते मुळातूनच पठनीय आहेत.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''वर्ण, रस, गंध व स्पर्श गुण सूक्ष्मापासून पृथ्वीपर्यंत सर्व पुद्गलांचे असतात. जो विशिष्ट प्रकारचा शब्द आहे, तो पुद्गल अर्थात पौद्गलिक पर्याय आहे.

शीत-ऊष्ण वगैरे स्पर्श, आंबट-गोड वगैरे रस, सुगंध-दुर्गंध हे गंध, पांढरा-लाल वगैरे वर्ण इंद्रियांनी जाणले जाऊ शकतात, कारण ते इंद्रियांचे विषय आहेत.

एक परमाणू व कार्माणवर्गणा वगैरे सूक्ष्म स्कंध आहेत, ते वर्तमान अवस्थेत इंद्रियग्राह्य नसूनही त्या परमाणुंमध्ये व सूक्ष्म स्कंधातही इंद्रियांनी ज्ञात होण्याची शक्ती योग्यता आहे, वर्तमानात प्रगट होण्याची योग्यता नाही, परंतु त्यांच्यात इंद्रियांनी ज्ञात होण्याची शक्तीरूप योग्यता आहे.[१]

जर त्यांच्यात इंद्रियांद्वारे ज्ञात होण्याची ताकत नसती तर स्थूलरूप धारण केल्यानंतरही इंद्रियांनी ज्ञान व्हायला नको, परंतु स्थूल असूनही इंद्रियांद्वारे ज्ञात होतात, म्हणून त्यांच्यात सूक्ष्म अवस्थेच्या वेळी सुद्धा इंद्रियांद्वारे ज्ञात होण्याची शक्ती विद्यमान आहे – हे निश्चित होते.[२]

शब्द गुण नाही तर अनेक द्रव्यात्मक पुद्गलपर्याय आहे. शब्द इंद्रियांनी ज्ञात होतो; म्हणून गुण असेल अशी शंका करता कामा नये.[३]

कित्येक लोकं शब्दाला आकाश द्रव्याचा गुण मानतात, परंतु ही

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २४
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २४
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २५

मान्यता मिथ्या आहे; कारण गुण व गुणी यांच्यात प्रदेशभेद असत नाही, एकच प्रदेश आहेत. गुण व गुणी यांचे एक प्रदेश असल्याने गुण ज्या इंद्रियाने ज्ञात होतो त्याच इंद्रियाने गुणी देखील ज्ञात व्हायला पाहिजे. शब्द तर कानाने ऐकला जाऊ शकतो, म्हणजेच इंद्रियाने ज्ञात होतो, म्हणून शब्दाला जर आकाशाचा गुण मानले तर आकाश जे गुणी आहे, तेही कानाने ऐकले गेले पाहिजे; परंतु आकाश कानाने ऐकले जाऊ शकत नाही, तसेच इतर कोणत्याही इंद्रियाने आकाश ज्ञात होत नाही.[१]

ही बाब सिद्ध करण्यासाठी काही मुद्दे खालीलप्रमाणे आहेत –

१) ज्याचे स्पर्श, रस, गंध, वर्ण चारही व्यक्त आहेत, अशा चंद्रकांत मणीरूप पृथ्वीमधून पाणी झिरपते व त्या पाण्यात गंध अव्यक्त आहे.

२) अरणीच्या लाकडामधून जो पुद्गल अग्नी उत्पन्न होतो आणि त्या अग्नीमध्ये गंध तसेच रस अव्यक्त आहे.

३) जव नावाचे धान्य खाल्ल्याने पोटात वायु उत्पन्न होतो, त्यामध्ये गंध, रस व वर्ण अव्यक्त आहेत.

यावरून हे नक्की होते की १) चंद्रकांतमण्यात, २) अरणीमध्ये, ३) जवामध्ये असलेले चारही गुण १) पाण्यात, २) अग्नीत व ३) वायुमध्ये असावयास हवेत.[२] या दृष्टांताद्वारे हे सिद्ध होते की ज्या पुद्गलांच्या पर्याय आहेत, त्या सर्व इंद्रियांद्वारे व्यक्त होत नसल्या तरी त्यांना पुद्गलांच्या पर्याय म्हटले जाण्यात काही वावगे नाही. शब्द भलेही कर्णेंद्रियाद्वारे ग्राह्य होतो व इतर इंद्रियांद्वारे होत नाही, तरीही शब्दाच्या पर्यायामध्ये स्पर्शादी गुण राहतात, म्हणून शब्द पुद्गलाचीच पर्याय आहे.[३]

अशाप्रकारे शब्द न तर अमूर्त द्रव्याचा गुण आहे आणि न तर मूर्त द्रव्याचा गुण आहे. शब्द तर पुद्गलाची अवस्था आहे.

प्रश्न : शब्दाचे एवढे अधिक विवेचन करण्यात धर्म कोठे आला ?

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २६ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २८-२९
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २९

उत्तर : अनादी काळापासून जीव भ्रमाने मानतो की आत्मा बोलू शकतो व शब्दाला परिणमित करू शकतो. अशाप्रकारे आत्मा अज्ञानाने शब्दाचा कर्ता बनतो आहे. सत्याचे ज्ञान झाल्यावर पुद्गलाच्या पर्यायाचा कर्ता आत्मा नसून ज्ञाता आहे – असा निर्णय केल्याने शब्दाच्या कर्तृत्वाचा अभिमान नाहीसा होऊन स्वत: ज्ञाता राहतो.

भ्रमामुळे निंदा-प्रशंसेच्या शब्दांमुळे जीव राग-द्वेष करीत होता. तो मानत होता की अमुक शब्द आत्म्याला सुखकर्ता आहे व अमुक शब्द आत्म्याला दु:खकर्ता आहे; परंतु कोणतेही शब्द असोत, त्या पुद्गलाच्याच पर्याय आहेत, त्या ज्ञेय व आत्मा त्यांचा ज्ञाता आहे – ज्ञेयतत्त्वाचे असे खरे ज्ञान झाले असता, एकत्वबुद्धीच्या राग-द्वेषांचा अभाव होऊन आपल्यात शांती प्रगट होते व तोच धर्म आहे.

हा तर ज्ञेय अधिकार आहे. शब्द तर पुद्गलाची अवस्था असून ती ज्ञेय आहे. त्या अवस्थेला करणे किंवा त्यामुळे सुख-दु:ख मानणे हे आत्म्याचे कर्तव्य नाही; तर तिला ज्ञेयरूपाने जाणणेच आत्म्याचे कर्तव्य आहे व हाच धर्म आहे.[१]''

मूळ गाथेत फक्त हेच सांगितले की भले इंद्रियाद्वारे ज्ञान होवो वा न होवो, सूक्ष्माहून सूक्ष्म व स्थूलाहून स्थूल अशा सर्व पुद्गलात स्पर्श, रस, गंध, वर्ण – हे चारही गुण अवश्य आढळतात. हे गुण पुद्गलाला ओळखण्याचे चिह्न आहेत; पुद्गलाचे स्वरूप आहेत, लक्षण आहेत.

जरी शब्द कर्णेंद्रियाचे विषय आहेत, तरी ते पुद्गलाचे गुण नाहीत; तर भाषावर्गणारूप अनेक पुद्गलांची एकत्रित असलेली समानजातीय द्रव्यपर्याय आहे.

कित्येक भारतीय दर्शनांमध्ये शब्दाला आकाशाचा गुण मानले जाते, म्हणून मतार्थाच्या दृष्टिकोणातून टीकाकारांनी सयुक्तिक सिद्ध केले आहे की शब्द हा एखाद्या अमूर्त द्रव्याचा गुण नाही; कारण शब्द

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३०

कर्णेंद्रियाचा विषय आहे. जर शब्द आकाशाचा गुण असता तर गुणी अशा आकाशाला सुद्धा कर्णेंद्रियाचा विषय व्हायला पाहिजे; कारण गुण व गुणी यांचे प्रदेश अभिन्न असतात.

त्याचबरोबर हे देखील स्पष्ट केले आहे की शब्द अमूर्त आकाशादी द्रव्याचा गुण तर नाहीच, त्याचबरोबर तो मूर्त अशा पुद्गलाचाही गुण नाही, त्याची पर्याय आहे; कारण शब्द अनित्य असतात, गुण अनित्य नसतात तर नित्यच असतात.

काही जण म्हणतात की शब्द फक्त कर्णेंद्रियाचा विषय का आहे, पाचही इंद्रियांचा विषय का नाही ? त्यांना विचारतात की स्पर्शादी गुण देखील एकेक इंद्रियाचेच विषय आहेत, सर्व इंद्रियांचे नाहीत, तर मग शब्दही सर्व इद्रियांचे विषय का बनावेत ?

टीकेमध्ये वरील बाबींना अनेक न्यायांद्वारे (तर्कांद्वारे) उदाहरणासह सिद्ध केलेले आहे, त्यासाठी चंद्रकांत मणी, अरणी व जव यांची उदाहरणे मुख्यतेने दिली आहेत.

स्पर्शादी मूर्त अशा पुद्गलद्रव्याचे गुण आहेत – ही बाब निर्विवाद आहे; त्यामुळे या बाबतीत विशेष काही सांगण्याची आवश्यकता नाही; परंतु शब्दांच्या बाबतीत वाद आहे, अनेक मते आहेत, म्हणून त्या बाबतीत विस्ताराने चर्चा केली आहे. ●

वैराग्यवर्धक बारा भावना मुक्तीपथाचे पाथेय तर आहेतच, लौकिक जीवनात देखील ह्या अत्यंत उपयोगी आहेत. इष्ट-वियोग व अनिष्ट संयोगांनी उत्पन्न उद्वेगांना शांत करणाऱ्या ह्या बारा भावना व्यक्तीला विपत्तीमध्ये धैर्य व संपत्तीमध्ये विनम्रता प्रदान करतात, विषय-कषायांहून विरक्त व धर्मामध्ये अनुरक्त ठेवतात, जीवनाचा मोह व मृत्युच्या भयाला क्षीण करतात, बहुमूल्य जीवनाच्या एकेक क्षणाला आत्महितामध्ये संलग्न राहून सार्थक करण्याकरिता निरंतर प्रेरित करतात. जीवनाचे निर्माण करण्याकरिता यांची उपयोगिता असंदिग्ध आहे.

– बारा भावना : एक अनुशीलन, पृष्ठ : २

प्रवचनसार गाथा १३३-१३४

मागील गाथेमध्ये मूर्तद्रव्य पुद्गलाच्या गुणांची चर्चा केल्यानंतर आता उरलेल्या द्रव्यांच्या गुणांची चर्चा केली जात आहे.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहेत –

आगासस्सवगाहो धम्मद्दव्वस्स गमणहेदुत्तं।
धम्मेदरदव्वस्स दु गुणो पुणो ठाणकारणदा॥१३३॥
कालस्स वट्टणा से गुणोवओगो त्ति अप्पणो भणिदो।
णेया संखेवादी गुणा हि मुत्तिप्पहीणाणं॥१३४॥

(हरिगीत)

आकाश का अवगाह धर्माधर्म के गमनागमन।
स्थानकारणता कहे ये सभी जिनवरदेव ने॥१३३॥
उपयोग आतमराम का अर वर्तना गुण काल का।
है अमूर्त द्रव्यों के गुणों का कथन यह संक्षेप में॥१३४॥

आकाशाचे अवगाहनहेतुत्व, धर्मद्रव्याचे गमनहेतुत्व व अधर्मद्रव्याचे स्थानकारणता – हे गुण आहेत.

काळद्रव्याचे वर्तनाहेतुत्व व आत्म्याचा गुण उपयोग सांगितला आहे, अशाप्रकारे अमूर्त द्रव्यांचे गुण थोडक्यात जाणावयास हवेत.

आचार्य अमृतचंद्रांनी या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"एकाच वेळी सर्व पदार्थांच्या सामान्य अवगाहनेचा हेतुपना आकाशद्रव्याचा विशेष गुण आहे. एकाच वेळी सर्व गमनपरिणामी जीव-पुद्गलांच्या गमनाचा हेतुपणा धर्मद्रव्याचा विशेष गुण आहे.

एकाच वेळी सर्व स्थानपरिणामी जीव-पुद्गलांना स्थिर होण्याला हेतुत्व होणे अधर्मद्रव्याचा विशेष गुण आहे. काळद्रव्याव्यतिरिक्त बाकी सर्व द्रव्यांच्या दरसमयामध्ये परिणमनाचा हेतुपणा काळद्रव्याचा विशेष गुण आहे आणि चैतन्य परिणाम जीवाचा विशेष गुण आहे.

अशाप्रकारे अमूर्त द्रव्यांच्या विशेष गुणांचे संक्षिप्त ज्ञान झाले असता अमूर्त द्रव्यांना जाणण्याचे लिंग (चिह्न, साधन, लक्षण) प्राप्त होतात.

तात्पर्य हे आहे की या विशेष गुणांद्वारे अमूर्त द्रव्यांचे अस्तित्व ज्ञात होते, सिद्ध होते.

आता या सर्वांना विशेषपणे समजावितात –

तेथे एकाच वेळी सर्व द्रव्यांना साधारण अवगाहनेचे संपादन म्हणजेच हेतुत्वरूप चिह्न आकाशाला दर्शविते, कारण इतर द्रव्य सर्वगत नसल्याने त्यांना हे शक्य नाही.

अशाप्रकारे एकाच वेळी गतिपरिणत सर्व जीव व पुद्गलांना लोकापर्यंत गमनाचे हेतुत्व धर्मद्रव्य दाखविते, कारण काळ व पुद्गल अप्रदेशी आहेत, म्हणून त्यांना हे शक्य नाही. जीव समुद्घाताची वेळ सोडता इतरत्र लोकाच्या असंख्यातव्या भागाएवढाच आहे, म्हणून त्याला हे शक्य नाही. लोक व अलोक यांची सीमा अचलित असल्याने आकाशद्रव्याला हे शक्य नाही आणि विरुद्ध कार्याचा हेतु असल्याने अधर्मद्रव्याला हे शक्य नाही.

अशातऱ्हेने एकाच काळामध्ये स्थितिपरिणत समस्त जीव-पुद्गलांना लोकापर्यंत स्थितिचे हेतुत्व अधर्मद्रव्याला दर्शविते, कारण काळ व पुद्गल अप्रदेशी असल्याने त्यांना हे शक्य नाही, जीव समुद्घातची वेळ सोडून इतरत्र लोकाच्या असंख्यात भागाएवढाच आहे, म्हणून त्याला हे शक्य नाही. लोक व अलोक यांची सीमा अचलित असल्याने आकाशाला हे शक्य नाही आणि विरुद्ध कार्याचा हेतु असल्याने धर्मद्रव्याला हे शक्य नाही.

अशातऱ्हेने काळाच्या व्यतिरिक्त इतर सर्व द्रव्यांच्या प्रत्येक पर्यायामध्ये समयवृत्तिचा हेतुपणा काळद्रव्याला दर्शवितो; कारण त्या बाकीच्या सर्व द्रव्यांची समयविशिष्टवृत्ती कालांतराने साधली जात असल्याने त्यांना तो समयवृत्ती हेतुपणा शक्य नाही.

अशातऱ्हेने चैतन्यपरिणाम जीवाला दर्शवितो, कारण तो चेतन असल्याने बाकीच्या द्रव्यांना ते शक्यच नाही.

अशाप्रकारे गुणविशेषाने द्रव्यविशेषाला जाणले पाहिजे.''

कविवर वृंदावनदासजींनी वरील गाथांचा भाव अत्यंत सोप्या भाषेत सहजतेने प्रस्तुत केला आहे –

(मनहरण कवित्त)

एकै काल सरव दरवनि को थान दान,
कारन विशेष गुन राजत अकास में।
धरम दरव को गमन हेत कारन है,
जीव पुद्गल के विचरन विलास में।।
अधरम दर्व को विशेष गुन थिति होत,
दोनों क्रियावंतनि के थित परकास में।
काल को सुभाव गुन वरतना हेतु कह्यौ,
आतमा को गुन उपयोग प्रतिभास में।।४५।।

आकाश द्रव्यात एका वेळी सर्व द्रव्यांना स्थान देणारा गुण शोभत आहे, धर्मद्रव्य, जीव व पुद्गलांच्या गमनामध्ये निमित्तकारण आहे, गमनाचा हेतु आहे व अधर्मद्रव्याचा स्थितिहेतुत्व नावाचा विशेष गुण जीव व पुद्गल या दोन्ही क्रियावान द्रव्यांना गमनपूर्वक थांबण्यात निमित्त आहे. काळद्रव्याचा स्वभाव सर्व द्रव्यांच्या परिवर्तनात निमित्त आहे व आत्म्याचा स्वभाव सर्वांना जाणण्या-पाहण्याचा आहे.

(दोहा)

ऐसे मूरति रहित के गुन संक्षेप भनंत।
वृन्दावन तामें सदा हैं गुन और अनंत।।४६।।
जो गुन जासु सुभाव है सो गुन ताही माहिं।
औरनि के गुन और में कबहूँ व्यापैं नाहिं।।४७।।
नभ को तो उपकार है पाँचों पर सुन मीत।
धर्माधर्मनि को लसै जिय पुद्गल सों रीत।।४८।।
काल सबनि पैं करतु है निज गुन तैं उपकार।
नव जीरन परिणमन को यातैं होत विचार।।४९।।

जीव लखै जुगपत सकल केवलदृष्टि पसार।
याही तैं सब वस्तु को होत ज्ञान अविकार।।५०।।

अशाप्रकारे अमूर्तिक द्रव्यांचे गुण थोडक्यात सांगितले. वृंदावन कवींनी म्हटले आहे की त्या द्रव्यात फक्त तेच गुण नाहीत, ते तर ओळखण्याची खास चिह्न आहेत. आणखी अनंत गुण त्यांच्यात आहेत.

जो गुण ज्या द्रव्याचा स्वभाव आहे, तो गुण त्याच द्रव्यात आढळतो. एका द्रव्याचे गुण दुसऱ्या द्रव्यात कधीही व्याप्त नसतात.

हे मित्रा ! ऐक, आकाशाचा उपकार बाकीच्या पाच द्रव्यांवर आहे व धर्म-अधर्म द्रव्यांचा उपकार जीव-पुद्गलांवर आहे. काळद्रव्य सर्व द्रव्यांवर उपकार करते, ते जीर्णापासून नवीन परिणमनात निमित्त आहे.

हे जीवद्रव्य सर्व द्रव्यांना केवलदर्शन दृष्टिने पाहते व याच जीवद्रव्याद्वारे सर्व द्रव्यांचे अविकारी ज्ञान होते.

पंडित देवीदासजींनी या गाथांचा भाव अशाचप्रकारे व्यक्त केला आहे. हे प्रकरण अत्यंत सोपे आहे, त्यामुळे विशेष पुनरावृत्तीची आवश्यकता नाही. ज्यांना रुची आहे, त्यांनी मूळातून वाचावे.

प्रश्न : एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यावर उपकार करते – असे म्हटले आहे, परंतु आम्ही तर ऐकले आहे की महाशास्त्र तत्त्वार्थसूत्रात उपकाराची चर्चा करताना म्हटले आहे की जीवन-मरण व सुख-दुःख हे पुद्गल द्रव्याचे जीवावर उपकार आहेत. आता प्रश्न पडतो की काय जीवनाबरोबर मरणदेखील उपकार आहे व सुखाबरोबर दुःख सुद्धा उपकार आहे काय ?

उत्तर : अरे बाबा ! येथे उपकाराचा अर्थ भलेपणा नसून फक्त निमित्त आहे. तात्पर्य हे आहे की पुद्गल जीवांच्या जीवन-मरण व सुख-दुःखामध्ये निमित्त आहे. जीवाच्या जीवन-मरणरूप, तसेच सुख-दुःखरूप कार्याचे उपादानकारण म्हणजेच कारक आत्मा आहे व निमित्तकारण म्हणजेच उपकारक कर्मोदयरूप पुद्गल आहे.

प्रश्न : काय उपकारक कारक नाही काय ?

उत्तर : ज्याप्रमाणे उपराष्ट्रपति राष्ट्रपति नाही, त्याचप्रमाणे उपकारक देखील कारक नाही.

प्रश्न : संसारात तर कारकापेक्षाही मोठे उपकारकाला मानतात ?

उत्तर : जर कोणी राष्ट्रपतिपेक्षा उपराष्ट्रपतिला मोठा मानू इच्छित असेल तर आपण काय करू शकतो ? तसेच जर एखादा स्वद्रव्यरूप उपादानकारणापेक्षा परद्रव्यरूप निमित्तकारणाला महान मानू इच्छित असेल तर आपण काय करू शकतो? पण आपण हे का विसरतो की आचार्य जयसेनांनी याच गाथेच्या टीकेत उपकारकाला दु:खकारकच म्हटले आहे.

त्यांचे कथन पुढीलप्रमाणे आहे –

"येथे अर्थ असा आहे की जरी पाच द्रव्य जीवाचा उपकार करतात, तथापी ते दु:खाचेच कारण आहेत – असे जाणून अक्षय-अनंत सुखादीचे कारणभूत विशुद्ध ज्ञान-दर्शन उपयोगस्वभावी परमात्मद्रव्याचेच मनाद्वारे ध्यान केले पाहिजे, त्या बाबतीतच बोलले पाहिजे व शरीराने त्यालाच साधक असे अनुष्ठान केले पाहिजे."

पुद्गलाच्या उपकाराच्या बाबतीत जी सुखाची चर्चा केली, ते सुख इंद्रियसुख असल्याने दु:खच आहे. जसे या ग्रंथाच्या ७६ व्या गाथेतही म्हटले आहे की –

सपरं बाधासहिदं विच्छिण्णं बंधकारणं विसमं।
जं इंदिएहिं लद्धं तं सोक्खं दुक्खमेव तहा।।७६।।

(हरिगीत)

इन्द्रियसुख सुख नहीं दुख है विषम बाधा सहित है।
है बंध का कारण दुखद परतंत्र है विच्छिन्न है।।७६।।

जे सुख इंद्रियांनी प्राप्त होते, ते सुख परसंबंधयुक्त, बाधासहित आहे, विच्छिन्न आहे, बंधाचे कारण आहे व विषम आहे, अशाप्रकारे ते इंद्रियसुख दु:खच आहे.

एवढे करून सुद्धा जर एखादा दु:खाच्या कारणालाच सुखाचे कारण मानून त्याला महान मानू इच्छित असेल तर त्याला कोण काय करणार?

अतींद्रिय सुखाच्या प्राप्तीमध्ये तर कोणत्याही परद्रव्याचा काहीच उपकार नाही. त्याची प्राप्ती तर स्वद्रव्यामध्ये स्वद्रव्याच्या आश्रयानेच होते. सर्व परद्रव्यांवरून आपला उपयोग हटवून स्वद्रव्यात लावण्यानेच ती होते, आत्मज्ञान, आत्मश्रद्धान आणि आत्मध्यान यांनीच होते.

वास्तविकता अशी आहे की जैनदर्शन हे अकर्तावादी दर्शन आहे. अकर्तावादाचा अर्थ एवढाच होत नाही की कोणी तथाकथित ईश्वर जगाचा कर्ता-धर्ता नाही, तर हा सुद्धा होतो की निश्चयाने एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा कर्ता-धर्ता नाही. आपल्या सुख-दुःखाचा जबाबदार हा आत्मा स्वतःच आहे. या महान सिद्धांताच्या आधारे हे म्हटले जाऊ शकते की येथे जी उपकाराची चर्चा आहे, ती केवळ निमित्ताचे ज्ञान करविण्या-करिता आहे. एका द्रव्याला दुसऱ्या द्रव्याचा कर्ता-हर्ता दर्शविण्यासाठी नव्हे.

अधिक काय सांगावे ? सूज्ञास अधिक सांगणे नलगे !

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"ज्ञानाचा स्वभाव सामान्य व विशेष सर्वांना जाणणे आहे. एवढ्या सर्व विशेषांना जाणल्याने राग उत्पन्न होईल – असे मानून अज्ञानी जीव आपल्या ज्ञानस्वभावाचा अस्वीकार करतो.

वास्तविक पाहता ज्ञान स्व-परप्रकाशक आहे. जीवामध्ये एकाच वेळी सर्वांना जाणण्याची क्षमता आहे. विशेषाचे ज्ञान रागाचे कारण नाही, परंतु आपल्या रागाची योग्यताच रागाचे कारण आहे.[१]

एखाद्याला प्रश्न पडू शकतो की ज्ञेयांचे एवढे जास्त भेद का आहेत? एवढे अधिक सर्व जाणल्याने ज्ञान उद्धट झाले तर एवढी जास्त डोकेदुखी का ? फक्त आत्म्याला जाणून गप्प बसले तर काय अडचण आहे ?

त्याला सांगतात की अनंत प्रकारांच्या ज्ञेयांना जाणण्याचा तुझा स्वभाव आहे, जर तू असे म्हणशील की मला भेदाला जाणावयाचेच नाही, तर मग तू स्वतःच्या ज्ञानस्वभावाचाच अस्वीकार करीत आहेस.

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३४

अनंतांना जाणण्याचा तुझा अमर्यादित स्वभाव आहे. अधिक जाणल्याने ज्ञान उद्धट होत नाही; परंतु प्रशमाचे लक्ष केले असता मनाला गंभीर करून ज्ञेयांना जाणल्याने वीतरागदशा प्रगट होते.

सर्व ज्ञेयांना जाणण्याकडे ज्ञान झुकते (वळते), म्हणून राग होत नाही, परंतु रागाची भूमिका आहे, म्हणून राग होतो.

केवली भगवान अनंत पदार्थांना अनंत भेद-उपभेदासहित जाणतात, त्यांना बिलकूल राग होत नाही, सहा द्रव्य तुझे ज्ञेय आहेत, तेवढे जाणण्याचे तुझे ज्ञान आहे.

जर तू सहा द्रव्याच्या ज्ञानापेक्षा कमी जाणशील तर तू ज्ञानगुणाला मानलेच नाहीस आणि त्यामुळे जीवाला देखील तू मानले नाहीस.

परपदार्थांची पर्याय बदलणे हा तुझा स्वभाव नाही, तसेच भविष्यकाळाची पर्याय वर्तमानात आणावी – असा विकल्प करणे हा देखील तुझा स्वभाव नाही. तुझा स्वभाव तर ज्ञाता-दृष्टा राहणे आहे.

हा ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन अधिकार आहे, जसे ज्ञेय आहे, तशाच ज्ञेयांना जाणणे हे तुझे कर्तव्य आहे – हेच धर्माचे व शांतिचे कारण आहे.[१]''

जे पराला जाणणेच बंधाचे कारण मानतात किंवा अपेक्षा सांगितल्याविना म्हणतात की आत्मा पराला जाणतच नाही; त्यांनी स्वामीजींच्या वरील अत्यंत स्पष्ट कथनाचा गांभीर्याने विचार करायला हवा. ●

आगम व अध्यात्मशैलीमध्ये मूलभूत अंतर हेच आहे की अध्यात्मशैलीची विषयवस्तू आत्मा, आत्म्याच्या विकारी-अविकारी पर्यायी आणि आत्म्याचा परवस्तूंशी संबंध आहे. आगमशैलीची विषयवस्तू सहा प्रकारचे समस्त द्रव्य, त्यांच्या पर्यायी व त्यांचे आपसातील संबंध इत्यादी स्थिती आहेत. हीच बाब सूत्रामध्ये सांगितली तर म्हणू शकतो की आगमाचे प्रतिपाद्य सन्मात्र वस्तू आहे आणि अध्यात्माचे प्रतिपाद्य चिन्मात्र वस्तू आहे.

– परमभावप्रकाशक नयचक्र, पृष्ठ-१८०

प्रवचनसार गाथा १३५

द्रव्यविशेषाधिकारामध्ये आतापर्यंत द्रव्यांचे जीव-अजीव, लोक-अलोक, सक्रिय-निष्क्रिय, मूर्त-अमूर्त अशा रीतीने वर्गीकरणाची चर्चा झाली. आता या गाथेपासून सप्रदेशी-अप्रदेशी अर्थात् अस्तिकाय आणि नास्तिकाय भेदाच्या चर्चेला आरंभ करतात.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

जीवा पोग्गलकाया धम्माधम्मा पुणो य आगासं।
सपदेसेहिं असंखा णत्थि पदेस त्ति कालस्स॥१३५॥

(हरिगीत)

हैं बहुप्रदेशी जीव, पुद्गल गगन धर्माधर्म सब।
है अप्रदेशी काल जिनवरदेव के हैं ये वचन॥१३५॥

जीव, पुद्गलकाय, धर्म, अधर्म व आकाश हे आपापल्या प्रदेशांच्या अपेक्षेने असंख्यात अर्थात् अनेक आहेत, परंतु काळ द्रव्याला प्रदेश नाहीत.

वरील गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"जीव, पुद्गल, धर्म, अधर्म व आकाश अनेक प्रदेशवाले असल्याने प्रदेशवान म्हणजेच सप्रदेशी आहेत व कालाणुद्रव्य एकप्रदेशी असल्याने अप्रदेशी आहे.

आता हीच बाब विशेष स्पष्ट करून सांगतात –

संकोच-विस्तारमय असून सुद्धा जीव लोकाकाशतुल्य असंख्य प्रदेशांना सोडत नाही, म्हणून तो प्रदेशवान आहे, सप्रदेशी आहे.

जरी पुद्गल द्रव्यअपेक्षेने एकप्रदेशी असल्याने अप्रदेशी आहे; तथापी दोन प्रदेशांपासून संख्यात, असंख्यात आणि अनंत प्रदेशी पर्यायांच्या अपेक्षेने अनिश्चित प्रदेशवाला असल्याने प्रदेशवान (सप्रदेशी) आहे.

सकल लोकव्यापी असंख्यप्रदेशांचा विस्ताररूप असल्याने धर्मद्रव्य प्रदेशवान (सप्रदेशी) आहे.

अशाप्रकारे सकल लोकव्यापी असंख्य प्रदेशांनी विस्ताररूप असल्याने अधर्मद्रव्य सुद्धा प्रदेशवान (सप्रदेशी) आहे आणि सर्वव्यापी अनंत प्रदेशांच्या विस्ताररूप असल्याने आकाश प्रदेशवान आहे.

कालाणू एकप्रदेशी असल्याने व पर्यायांचा परस्पर संपर्क नसल्याने अप्रदेशीच आहे.

अशाप्रकारे कालद्रव्य अप्रदेशी व बाकीची द्रव्य सप्रदेशी आहेत.''

आचार्य जयसेनांनी देखील या गाथेचा भाव प्रस्तुत करताना आचार्य अमृतचंद्रांचेच अनुकरण केले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी १ दोहा व १ मनहरण कवित्त या २ छंदात टीकेमध्ये आलेला भाव प्रस्तुत केला आहे –

(दोहा)

जीवरु पुद्गल काय नभ धरम अधरम तथेस।
हैं असंख परदेशजुत काल रहित परदेश।।५१।।

जीव, पुद्गल, आकाश, धर्म व अधर्म द्रव्यांचे अनेक प्रदेश आहेत; म्हणून ते अस्तिकाय आहेत; परंतु काळद्रव्य प्रदेशरहित आहे, म्हणून ते नास्तिकाय आहे.

(मनहरण)

एक जीव दर्व के असंख परदेश कहे,
संकोच विथार जथा दीपक पै ढपना।
पुग्गल प्रमान एक अप्रदेशी है तथापि,
मिलन शकति सों बढ़ावै वंश अपना।।
धर्माधर्म अखंड असंख परदेशी नभ,
सर्वगत अनंत प्रदेशी वृन्द जपना।
कालानू में मिलन शकति को अभाव तातैं,
अप्रदेशी ऐसे जानैं मिटे ताप तपना।।५२।।

एक जीवद्रव्याचे असंख्यप्रदेश सांगितले आहेत. जसे दिव्याचा प्रकाश आपल्या संकोच-विस्तार स्वभावामुळे यथालब्ध स्थानात राहतो, तसेच जीव सुद्धा आपल्या संकोच-विस्तार स्वभावामुळे प्राप्त झालेल्या शरीरात राहतो. जरी पुद्गल अप्रदेशी आहे, तरी जोडल्या जाण्याच्या शक्तिमुळे तो आपला वंश वाढवितो म्हणजेच स्कंधरूपाने बदलतो.

धर्म व अधर्मद्रव्य असंख्यप्रदेशी अखंड आहेत व आकाश सर्वगत अनंतप्रदेशी आहे. कालाणूमध्ये जोडले जाण्याची शक्ती नाही, म्हणून अप्रदेशीच आहे – असे जाणले असता संसारतापामध्ये तापणे संपते.

पंडित देवीदासजींनी देखील या गाथेचा भाव १ कवित्त व १ दोह्याच्या माध्यमातून सोप्या रीतीने सादर केला आहे.

अशातऱ्हेने आपण पाहतो की या गाथेत काही खास नाही. फक्त हेच म्हटले की एका जीवाचे लोकाकाशप्रमाण असंख्यप्रदेश आहेत, धर्म व अधर्मद्रव्यांचेही असंख्यप्रदेशच आहेत, परंतु आकाशाचे अनंत प्रदेश आहेत – अशी ही चार द्रव्य तर सप्रदेशी म्हणजेच अस्तिकायच आहेत.

जरी पुद्गल परमाणुद्रव्य एकप्रदेशीच आहे, तरी स्कंधाच्या अपेक्षेने ते संख्यात, असंख्यात व अनंतप्रदेशी सुद्धा म्हटले गेले आहे, त्यामुळे सप्रदेशी आहे, परंतु कालाणू द्रव्य एकप्रदेशी असल्याने अप्रदेशीच आहे.

अशाप्रकारे जीवादी पाच द्रव्य अस्तिकाय आहेत व कालाणू नास्तिकाय आहे.

या गाथेनंतर आचार्य जयसेनकृत तात्पर्यवृत्ती टीकेत एक गाथा आढळते. ती आचार्य अमृतचंद्रकृत तत्त्वप्रदीपिका टीकेत नाही. मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

एदाणि पंचदव्वाणि उज्झियकालं तु अत्थिकाय त्ति।
भण्णंते काया पुण बहुप्पदेसाण पचयत्तं॥११॥

(हरिगीत)

रे कालद्रव को छोड़कर अवशेष अस्तिकाय हैं।
अर बहुप्रदेशीपना ही है काय जिनवर ने कहा॥११॥

कालद्रव्याला सोडून बाकीची पाच द्रव्य अस्तिकाय आहेत आणि बहुप्रदेशाच्या समूहाला काय असे म्हणतात.

या गाथेच्या टीकेत आचार्य जयसेनांनी एवढेच लिहिले की पाच अस्तिकायांपैकी जीवास्तिकाय उपादेय आहे. त्यामध्ये सुद्धा पंचपरमेष्ठीरूप पर्याय उपादेय आहे; त्यातही अरहंत व सिद्धदशा उपादेय आहे, त्यामध्ये सुद्धा सिद्धदशा उपादेय आहे.

शेवटी त्यांनी लिहिले की वास्तविकता ही आहे की रागादी संपूर्ण विकल्पसमूहाच्या निषेधाच्या वेळी सिद्ध जीवासमान असे आपले शुद्धात्मस्वरूपच उपादेय आहे.

या गाथेमध्ये असे काही खास नाही की जे नसल्याने ग्रंथाच्या विषयामध्ये काही विशेष अडचण आली असती. जे मागील गाथांमधून अगोदरच सांगितले गेले होते, त्यालाच परत दुसऱ्यांदा सांगितले आहे.

होय, एक बाब खास आहे की या टीकेमध्ये शुद्धात्मस्वरूपी भगवान आत्म्याला परम उपादेय म्हटले आहे.

अध्यात्माच्या नयाचे सर्व उदाहरण आगमामध्येही आढळू शकतात, आगमाचे देखील मानले जाऊ शकतात; कारण अध्यात्म आगमाचाच एक भाग आहे व आत्मा सुद्धा सहा द्रव्यांपैकी एक द्रव्य आहे, परंतु आगमाचे सर्व नय अध्यात्मावर घटित होणे आवश्यक नाही.

सर्व लोकालोकाला आपल्यात सामावून घेणाऱ्या आगमाचे क्षेत्र विस्तृत आहे व त्याची प्रकृती देखील विस्तारात जाण्याची आहे. केवळ आपल्या आत्म्याएवढेच सीमित होणे व स्वत:मध्येच राहण्याची प्रकृती असल्याने अध्यात्मात नयांमध्ये भेद-प्रभेदांचा विस्तार तेवढा आढळत नाही, जेवढा आगमामध्ये आढळतो.

आगम विस्ताराच्या आणि अध्यात्म स्वत:मध्ये संकुचित होण्याच्या प्रक्रियेचे नाव आहे.

– परमभावप्रकाशक नयचक्र, पृष्ठ : १७८

प्रवचनसार गाथा १३६

मागील गाथेमध्ये सप्रदेशी आणि अप्रदेशी द्रव्यांची चर्चा केली होती. आता या गाथेमध्ये ती द्रव्य कोठे-कोठे राहतात, म्हणजे कोण कोठे राहतो, याची चर्चा करतील.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

लोगालोगेसु णभो धम्माधम्मेहिं आददो लोगो।
सेसे पडुच्च कालो जीवा पुण पोग्गला सेसा॥१३६॥

(हरिगीत)

गगन लोकालोक में अर लोक धर्माधर्म से।
है व्याप्त अर अवशेष दो से काल पुद्गलजीव हैं॥१३६॥

आकाश लोकालोकामध्ये व धर्म, अधर्म, जीव, पुद्गल व काळ लोकाकाशामध्ये राहतात.

आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"आकाश लोक व अलोकामध्ये आहे, कारण ते सहा द्रव्यांच्या समवायामध्ये व असमवायामध्ये विभाग न करता राहतो.

धर्म व अधर्म लोकाकाशामध्ये सर्वत्र आहेत, कारण त्यांच्या निमित्ताने ज्यांची गति आणि स्थिती होते, अशा जीव व पुद्गलांची गति व स्थिती लोकाकाशाच्या बाहेर होत नाही, तसेच लोकाकाशाच्या एका प्रदेशात सुद्धा होत नाही. तात्पर्य हे आहे की धर्म व अधर्म द्रव्यांची स्थिती सर्वत्र आहे.

काळद्रव्य देखील लोकाकाशामध्ये आहे, कारण जीव व पुद्गल यांच्याद्वारे काळद्रव्याच्या समय वगैरे पर्याय व्यक्त होतात व काळद्रव्य लोकाकाशाच्या एका प्रदेशामध्ये आहे, कारण ते अप्रदेशी आहे.

जीव व पुद्गल तर युक्तिनेच लोकाकाशामध्ये आहेत, कारण लोकाकाश सहा द्रव्यांच्या समवायरूप आहे.

यामध्ये हे खास समजले पाहिजे की प्रदेशांचा संकोच-विस्तार होणे जीवद्रव्याचा धर्म आहे व बंधाचे हेतुभूत असे स्निग्ध व रुक्ष गुण पुद्गलाचे धर्म असल्याने जीव व पुद्गल यांचे समस्त लोकाकाशात वा त्याच्या एकदेशात असण्याचा नियम नाही. काळद्रव्य, जीवद्रव्य व पुद्गलद्रव्य यामध्ये एक द्रव्याच्या अपेक्षेने लोकाकाशाच्या एकदेशात राहतात व अनेक द्रव्यांच्या अपेक्षेने काजळाने भरलेली डबी या न्यायाप्रमाणे समस्त लोकाकाशातच राहतात.

जरी आचार्य जयसेनांनी या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिकेप्रमाणेच प्रस्तुत केला आहे, परंतु शेवटी त्यांनी हा विषय नयाच्या माध्यमातून स्पष्ट करीत लिहिले आहे की ज्याप्रमाणे सिद्ध भगवान निश्चयनयाने लोकाकाशप्रमाण आपल्या शुद्ध असंख्यात प्रदेशात व केवलज्ञानादी गुणांच्या आधारभूत अशा आपल्या भावात राहतात, तसेच व्यवहार नयाने सिद्ध सिद्धशीलेवर राहतात.

त्याप्रमाणे सर्व पदार्थ निश्चयाने आपापल्या स्वरूपात राहतात, तरी व्यवहाराने लोकाकाशात राहतात. जीव अनंत आहेत व पुद्गल त्यांच्या अनंतपट आहेत, तरी देखील एका दिव्याच्या प्रकाशामध्ये अनेक दिव्यांच्या प्रकाशाप्रमाणे विशिष्ट अवगाहनशक्तिमुळे असंख्यात प्रदेशी अशा एका लोकाकाशामध्ये सुद्धा या सर्वांच्या सोबत राहण्याला विरोध येत नाही.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव १ मनहरण व १ दोहा अशाप्रकारे २ छंदातून खालीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मनहरण)

लोक औ अलोक में आकाश ही दरव और,
धर्माधर्म जहाँ लगु पूरित सो लोक है।
ताही विषैं जीव पुद्गल की प्रतीत करो,
काल की असंख जुदी अनुहू को थोक है॥

समयादि परजाय जीव पुद्गल ही के,
परिनामनि सों परगटत सुतोक है।
काजर की रेनुकरि भरी कजरौटी जथा,
तथा वृन्द लोक में विराजै दर्व थोक है॥५३॥

आकाशद्रव्य लोक व अलोक यांच्यामध्ये राहते व धर्म-अधर्मद्रव्य जेथपर्यंत आढळतात, तो लोक आहे, त्या लोकामध्ये जीव व पुद्गल राहतात, यावर विश्वास ठेवा. ह्या लोकामध्ये असंख्य कालाणूंचा समूह राहतो. या कालद्रव्याच्या समयादी पर्याय जीव व पुद्गलाच्या परिणमनाने प्रगट होतात. ज्याप्रमाणे काजळाच्या डबीमध्ये काजळ सर्वत्र व्याप्त आहे, त्याप्रमाणे लोकामध्ये द्रव्याचा समूह राहतो.

(दोहा)

धर्माधर्म दरव दोऊ गति थिति के सहकार।
ये दोनों जहँ लगु सोई लोकसीम निरधार॥५४॥

जीव व पुद्गल यांच्या गति व स्थिती यामध्ये सहकारी असलेले धर्म-अधर्म द्रव्य जेथपर्यंत आहेत, तीच लोकाकाशाची सीमा आहे.

या गाथांमधून हेच सांगितले आहे की तसे पाहिले असता जरी निश्चयाने प्रत्येक द्रव्य आपापल्या गुण-पर्यायामध्ये राहतात, तथापी व्यवहाराने आकाश लोकालोकामध्ये व इतर द्रव्य लोकाकाशात राहतात.

आगमाचा विरोधी अध्यात्मी असू शकत नाही, अध्यात्माचा विरोधी आगमी असू शकत नाही. जो आगमाचे मर्म जाणत नाही, तो अध्यात्माचे मर्म देखील जाणू शकत नाही आणि जो अध्यात्माचे मर्म जाणत नाही, तो आगमाचे मर्म सुद्धा जाणू शकत नाही. सम्यग्ज्ञानी आगमी सुद्धा आहे आणि अध्यात्मी देखील, तसेच मिथ्याज्ञानी आगमी नाही आणि अध्यात्मी सुद्धा नाही.

– परमभावप्रकाशक नयचक्र, पृष्ठ : १७७

प्रवचनसार गाथा १३७-१३८

मागील अनेक गाथांपासून सप्रदेशी आणि अप्रदेशीची चर्चा चालू आहे. त्याच चर्चेमध्ये पुढे हे स्पष्ट करीत आहेत की तो सप्रदेशीपणा व अप्रदेशीपणा कशाप्रकारे शक्य आहे ?

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहेत –

जध ते णभप्पदेसा तधप्पदेसा हवंति सेसाणं।
अपदेसो परमाणू तेण पदेसुब्भवो भणिदो॥१३७॥
समओ दु अप्पदेसो पदेसमेत्तस्स दव्वजादस्स।
वदिवददो सो वट्टदि पदेसमागासदव्वस्स॥१३८॥

(हरिगीत)

जिसतरह परमाणु से है नाप गगन प्रदेश का।
बस उसतरह ही शेष का परमाणु रहित प्रदेश से॥१३७॥
पुद्गलाणु मंदगति से चले जितने काल में।
रे एक गगनप्रदेश पर परदेश विरहित काल वह॥१३८॥

ज्याप्रमाणे आकाशाचे प्रदेश आहेत; तसेच इतर द्रव्यांचेही प्रदेश आहेत. तात्पर्य हे आहे की जसे आकाशाचे प्रदेश परमाणुरूप मापाने मोजले जातात, तसेच इतर द्रव्यांचे प्रदेशही अशाप्रकारे मोजले जातात. परमाणु अप्रदेशी आहे व त्याच्याद्वारे प्रदेशोद्भव सांगितला आहे.

काळ तर अप्रदेशी आहे आणि प्रदेशमात्र पुद्गल परमाणू आकाश द्रव्याच्या प्रदेशाचे मंदगतिने उल्लंघन करीत असेल तेव्हा कालद्रव्य वर्तते म्हणजेच निमित्तभूततया परिणमित होते.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''आचार्य कुंदकुंद १४० व्या गाथेत सांगतील की आकाशाच्या प्रदेशाचे लक्षण एका परमाणुने व्याप्त होणे आहे व या गाथांमध्ये 'ज्याप्रमाणे

आकाशाचे प्रदेश आहेत, तसेच इतर द्रव्यांचेही प्रदेश आहेत' – अशाप्रकारे प्रदेशाचे लक्षण एकप्रकारेच आहे – असे सांगितले जात आहे.

जसे एका परमाणुने व्यापलेल्या अंशाद्वारे मोजले असता आकाश अनंतप्रदेशी आहे, तसेच एका परमाणुने व्यापलेल्या अंशाद्वारे मोजले असता धर्म, अधर्म व एक जीव यांचे असंख्यात अंश असल्याने ती सर्व द्रव्य असंख्यातप्रदेशी आहेत.

ज्याप्रमाणे निश्चित प्रमाणवाले धर्म व अधर्मद्रव्य असंख्यातप्रदेशी आहेत, त्याप्रमाणे संकोच-विस्तारामुळे अनिश्चित प्रमाणवाल्या जीवाचे देखील सुकलेल्या व ओल्या चामड्याप्रमाणे निज अंशाचे अल्पबहुत्व होत नाही, म्हणून असंख्यात प्रदेशीपणाच आहे.

अमूर्त पदार्थाच्या संकोच-विस्ताराची सिद्धी तर आपल्या अनुभवानेच साध्य आहे, कारण हे सगळे स्वानुभवाने जाणतात की जीव स्थूल व कृश तसेच बालक व कुमार यांच्या शरीरात व्याप्त असतो.

पुद्गल तर द्रव्याच्या अपेक्षेने एक प्रदेशी असल्याने पूर्वी सांगितल्यानुसार अप्रदेशीच आहे, तरी दोन (अनेक) प्रदेशादिच्या उद्भावाच्या हेतुभूत त्या प्रकारचे स्निग्ध-रूक्ष गुणरूप परिणमित होण्याच्या शक्तीरूप स्वभावामुळे त्याच्या प्रदेशांचा उद्भव आहे, म्हणून पर्यायाच्या अपेक्षेने अनेकप्रदेशीपणा शक्य असल्याने पुद्गलाला द्विप्रदेशीपणापासून संख्यात, असंख्यात व अनंतप्रदेशीपणाही न्याययुक्त आहे, युक्तीसंगत आहे.

प्रदेशमात्र असल्याने कालद्रव्य अप्रदेशीच आहे व त्याला पुद्गलाप्रमाणे पर्यायाने सुद्धा अनेकप्रदेशीपणा नाही. कारण परस्पर अंतर असल्याशिवाय विस्तारूप विस्तृत प्रदेशमात्र असंख्यात कालद्रव्य असूनही परस्पर संपर्क नसल्याने एक-एक आकाशाच्या प्रदेशाला व्याप्त करून राहणाऱ्या कालद्रव्याची वृत्ती तेव्हा होते की जेव्हा एकप्रदेशी परमाणू कालाणुने व्याप्त अशा एका आकाशप्रदेशाचे मंदगतीने उल्लंघन करतो.''

या गाथांचा भाव स्पष्ट करताना जयसेनाचार्यांनी काही विशेष लिहिले नाही, त्यांनी अमृतचंद्रांनी केलेल्या स्पष्टीकरणाला पुनः सांगितले आहे.

त्याचप्रमाणे कविवर वृंदावनदासजींनी देखील वरील गोष्टींनाच छंदाद्वारे सांगितले आहे, त्यांनी या गाथांचा भाव व्यक्त करण्यासाठी २ मनहरण व १० दोहे – असे एकूण १२ छंद लिहिलेले आहेत व मोठ्या चातुर्याने संपूर्ण विषय स्पष्ट केला आहे. येथे सर्व छंद देणे शक्य नाही; परंतु ते सर्व मुळातून वाचनीय आहेत.

पंडित देवीदासजींनी देखील या गाथांचा भाव व्यक्त करण्याकरिता १ कवित्त, १ छप्पय व ४ दोहे – असे एकूण ६ पद्य लिहिले आहेत, ते मुळातून पठनीय आहेत.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''ज्ञेयांचा जसा स्वभाव आहे, तसा जाणला पाहिजे. ज्ञेयांना जाणणे जो नाकारतो, तो आपल्या ज्ञानस्वभावालाच नाकारतो. त्यामुळे बहिरंगात मंदकषाय होऊन देखील अज्ञानामुळे संसारात राहतो.[१]

जेव्हा ज्ञेयांच्या स्वभावाची चर्चा कानावर पडते, तेव्हा ती न नाकारता आपल्या ज्ञानस्वभावाचे माहात्म्य जाणले पाहिजे.[२]

अशाप्रकारे अप्रदेशी आणि सप्रदेशी द्रव्य देखील ज्ञेय आहेत आणि त्या ज्ञेयांना जसेच्या तसे जाणणे सम्यग्ज्ञानाचे कारण आहे.[३]''

पहा, येथे स्वामीजींनी सर्व स्व-पर ज्ञेयांना चांगल्याप्रकारे जाणण्याची प्रेरणा दिली आहे, त्याचबरोबर हे देखील सांगितले आहे की ज्ञेयांना जाणणे नाकारणारा संसारामध्ये भटकतो.

वरील संपूर्ण कथनाचा संक्षिप्त सार हा आहे की लोकाकाशाचे असंख्य प्रदेश आहेत. एकेका प्रदेशावर एक-एक कालाणू स्थित आहे. त्या कालाणुमध्ये स्निग्धता-रूक्षता नसल्याने ते जोडले जात नाहीत, तर रत्नराशीप्रमाणे वेगवेगळेच राहतात. त्याचे कारण हे आहे की कालाणुमध्ये तशीच योग्यता आहे.

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४९
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४९
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४९

जेव्हा पुद्गल परमाणू मंदगतीने आकाशाच्या एका प्रदेशापासून दुसऱ्या प्रदेशावर जातो, तेव्हा त्या प्रदेशावर असणारा कालाणु त्याला निमित्त असतो. येथे गतीची चर्चा नाही, तर गति करण्याकरिता जो वेळ लागला, त्यावरून काळाची पर्याय निश्चित होते व पर्यायावरून कालद्रव्य नक्की होते. अशाप्रकारे प्रत्येक कालाणू पुद्गलाच्या परमाणुला एक प्रदेशापर्यंत जाण्यामध्ये निमित्तरूपे असतो. अधिक प्रदेशापर्यंत जाण्याला एक कालाणू निमित्तरूप असत नाही, दुसऱ्या प्रदेशामध्ये दुसरा आणि तिसऱ्या प्रदेशामध्ये तिसरा कालाणू निमित्तरूप असतो.

यावरून हे स्पष्ट होते की कालद्रव्य पर्यायाने देखील एकच प्रदेशी आहे, अनेक प्रदेशी नाही.

दुसरी मुख्य बाब ही आहे की धर्म, अधर्म व लोकाकाश तर सदैव स्थित व असंख्य प्रदेशात पसरलेले आहेत; परंतु जीवद्रव्य तर एखाद्या निश्चित आकारात नेहमी रहात नाही, त्याचे आकार बदलत असतात. अशा परिस्थितित त्याला असंख्यप्रदेशी कसे मानले जाऊ शकते ?

असा प्रश्न विचारला असता येथे सुकलेल्या व ओल्या चामड्याचे उदाहरण देऊन समजाविले आहे.

जसे चामडे ओले असताना पसरते व वाळले असता आकुंचन पावते. तरीही दोन्ही स्थितीत त्याचे प्रदेश तर सारखेच असतात, कमी-अधिक होत नाहीत, तसेच लहान-मोठ्या शरीरात रहात असताना आत्म्याचे प्रदेश कमी-अधिक होत नाहीत, तर असंख्यातच राहतात.

त्याबरोबर हे देखील म्हटले आहे की ही बाब अनुभवाने सिद्ध आहे, कारण आपण सगळे स्वत: पाहतो की लहान मुलाच्या शरीरामध्ये राहणारा आत्मा तारुण्य येताच प्रसरण पावतो, कारण संसार अवस्थेमध्ये आत्म्याच्या प्रदेशांमध्ये संकोच-विस्तार होतच असतो. ●

प्रवचनसार गाथा १३९

मागील गाथांमध्ये कालद्रव्याचा अप्रदेशीपणा सिद्ध केला होता. आता या गाथेत कालद्रव्याच्या द्रव्य व पर्यायांना स्पष्ट करीत आहेत.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

वदिवददो तं देसं तस्सम समओ तदो परो पुव्वो।
जो अत्थो सो कालो समओ उप्पण्णपद्धंसी॥१३९॥

(हरिगीत)

परमाणु गगनप्रदेश लंघन करे जितने काल में।
उत्पन्नध्वंसी समय परापर रहे वह ही काल है॥१३९॥

जेव्हा परमाणू एका आकाशप्रदेशाचे मंद गतिने उल्लंघन करतो, तेव्हा त्याला जेवढा काळ लागतो, तो समय आहे, त्या समयापूर्वी आणि नंतर राहणारा जो नित्य पदार्थ आहे, ते कालद्रव्य आहे.

कालद्रव्य नित्य आहे व त्याच्या पर्याय समय उत्पन्नध्वंसी आहेत.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"निव्वळ एकप्रदेशी कालद्रव्याद्वारे आकाशाचा जो प्रदेश व्याप्त होतो, त्या प्रदेशाला जेव्हा पुद्गल परमाणू मंदतम गतिने ओलांडतो, तेव्हा त्या प्रदेशमात्र ओलांडणाऱ्या मापाएवढा कालपदार्थाच्या सूक्ष्मवृत्तीरूप जो समय आहे, तो समय त्या कालद्रव्याची पर्याय आहे.

त्या पर्यायाच्या अगोदर आणि नंतरच्या वृत्तीरूपाने प्रवर्तमान असल्याने ज्याचे नित्यत्व प्रगट आहे, असा पदार्थ द्रव्य आहे.

अशाप्रकारे कालद्रव्य अनुत्पन्न-अविनष्ट व पर्यायरूप समय उत्पन्नध्वंसी आहे.

तो समय निरंश आहे, कारण जर असे नसेल तर आकाशद्रव्याच्या प्रदेशाचे निरंशत्व सिद्ध होणार नाही. एका समयात एक परमाणू

लोकाकाशाच्या अंतापर्यंत जातो व समयाचे अंश होत नाहीत, कारण जसा परमाणुचा विशिष्ट अवगाहपरिणाम असतो, तसाच परमाणुचा विशिष्ट गतिपरिणामही असतो. याला पुढे विशेषप्रकारे समजावितात –

ज्याप्रमाणे विशिष्ट अवगाहपरिणामामुळे एका परमाणुच्या परिमाणाएवढा अनंत परमाणुंचा स्कंध बनतो, तरी तो स्कंध परमाणुच्या अनंत अंशांना सिद्ध करीत नाही; कारण परमाणू निरंश आहे.

त्याचप्रमाणे ज्याप्रकारे एका कालाणुने व्याप्त असलेल्या एका आकाशप्रदेशाच्या उल्लंघनाच्या मापाप्रमाणे एका समयात परमाणू विशिष्ट गतिपरिणामामुळे लोकाकाशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जातो, तेव्हा त्या परमाणुद्वारे उल्लंघित होणारे असंख्य कालाणु समयाच्या असंख्य अंशांना सिद्ध करीत नाहीत, कारण समय निरंश आहे.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये या गाथेचा भाव स्पष्ट करताना तत्त्वप्रदीपिकेचेच अनुसरण केले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेतील भाव २ मनहरण व १४ दोहे – असे एकूण १६ छंदांद्वारे स्पष्ट केला आहे.

नमुन्यादाखल एक मनहरण छंद प्रस्तुत केला आहे –

(मनहरण)

एक काल अनू तैं दुतीय काल अनू पर,
जात जबैं पुग्गलानु मंदगति करिकै।
तामें जो विलंब होत सोई काल दरव को,
समै नाम परजाय जानो भर्म हरिकै।
ताके पुव्व परे जो पदारथ हैं नित्तभूत,
सोई काल दरव है ध्रौव धर्म धरिकै।
समय परजाय उतपाद वयरूप कहे,
ऐसे सरधान करो शंका परिहरिकै।।६७।।

जेव्हा एका कालाणु द्रव्यापासून त्याच्या शेजारी असणाऱ्या दुसऱ्या

कालाणु द्रव्यावर पुद्गल परमाणू मंदगतिने जातो, तेव्हा त्याला जेवढा वेळ लागतो, तीच कालद्रव्याची समय नावाची पर्याय आहे. अहो ! भ्रम दूर करून ही बाब जाणा. त्या अगोदर व नंतर देखील जे विद्यमान राहते, त्या ध्रौव्यतेला धारण करणाऱ्या पदार्थाला कालद्रव्य जाणले पाहिजे. समय नावाची पर्याय उत्पाद-व्ययरूप आहे. नि:शंक होऊन अशा प्रकारचे श्रद्धान करा.

जरी पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव १ छंदातून प्रस्तुत केला आहे, तरी त्यामध्ये उल्लेखनीय असे विशेष काही नाही.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"एका समयाची पर्याय तर दुसऱ्या समयाला नष्ट होते, म्हणून ती तर अनित्य आहे, परंतु त्या अनित्याला कारणरूप शक्तीरूप नित्य पदार्थ असला पाहिजे आणि ते आहे कालद्रव्य, ज्या आधारे दर समयाला अवस्था होते.

तसेच अवस्था जेवढ्या क्षेत्रामध्ये होते, तेवढ्या क्षेत्रामध्ये संपूर्ण द्रव्य असले पाहिजे. द्रव्य त्याहून वेगळे अथवा कमी-अधिक क्षेत्रामध्ये असू शकत नाही.[१]

अशातऱ्हेने कालद्रव्य उत्पन्न होत नाही व नष्ट देखील होत नाही; परंतु त्याची अवस्था प्रत्येक समयाला उत्पन्न व नष्ट होते. तसेच जेथे पर्याय आहे, तेथे तेवढ्यातच कालद्रव्य स्थित आहे.

हा समय 'निरंश' आहे अर्थात समयाचे विभाग होऊ शकत नाहीत. जर असे नसते तर आकाश द्रव्याच्या एका प्रदेशाचा निरंशपणा सिद्ध होऊ शकला नसता.

एक परमाणू शीघ्र गतिने गमन करेल तर तो एका समयात लोकाकाशाच्या शेवटाला पोहचू शकतो, तरीही समयाचे अंश होत नाहीत. लोकाच्या शेवटापर्यंत जाण्याला एक समय लागतो, तर मध्येच कोठे गेला

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ५९

तर एका समयापेक्षा कमी वेळ लागेल – असे नाही. ते तर परमाणुच्या शीघ्र गतीला दर्शविणारे आहे, परंतु समयाचा विभाग दर्शवित नाही.

ज्याप्रमाणे एक परमाणुमध्ये विशिष्ट प्रकारची अवगाह शक्ती असते, तसेच परमाणूमध्ये विशिष्ट प्रकारची गती परिणामाची शक्ती देखील असते.[१] शीघ्र गतिने जाणारा परमाणू त्या श्रेणीत असणाऱ्या असंख्य कालाणूंना एकाच समयात अतिक्रमण करतो व मंदगतिने दुसऱ्या प्रदेशापर्यंत जाण्यात सुद्धा एकच समय लागतो. समयाचे विभाग/अंश पडत नाहीत.

येथे शीघ्र गति सिद्ध करावयाची नाही, परंतु हे सांगावयाचे आहे की असंख्यांना शीघ्र गतिने उल्लंघिले तरीही आणि एकाला मंद गतिने उल्लंघिले तरीही समयाचे दोन भाग होत नाहीत, कारण समय निरंश आहे.

जेव्हा परमाणू गति करतो, तेव्हा त्यामध्ये धर्मद्रव्य निमित्त म्हटले जाते व गतिपूर्वक स्थिती करण्यामध्ये अधर्मद्रव्य निमित्त म्हटला जातो.

एक परमाणू मंद गतिने एका प्रदेशाहून दुसऱ्या प्रदेशावर जातो, तर त्या जाण्यामध्ये-परिणमनामध्ये एक कालाणू निमित्त म्हटला जातो.

तसेच अनंत परमाणुंचा स्थूल स्कंध असेल, तेव्हा त्याच्या अवगाहनेत एकापेक्षा अधिक आकाशाचे प्रदेश निमित्त आहेत – असे म्हटले जाते व जेव्हा तोच स्कंध सूक्ष्म परिणमन करून एका प्रदेशामध्ये राहतो, तेव्हा त्याला एक प्रदेशच निमित्त आहे – असे म्हटले जाते.

तसेच ज्ञानात अनंत ज्ञेय ज्ञात होतात, तेव्हा त्यामध्ये अनंत निमित्त म्हणतात व एक ज्ञात होत असेल तेव्हा त्यामध्ये एक निमित्त म्हटले जाते.

अशाप्रकारे उपादानामध्ये ज्याप्रकारचे कार्य होते, तसा आरोप निमित्तावर केला जातो. निमित्त उपादानामध्ये काहीही करीत नाही.[२]

अशाप्रकारे परमाणुच्या शीघ्रगतिचा, परमाणुच्या सूक्ष्म अवगाहन-शक्तीचा, ज्ञेयांना एकदम जाणण्याचा निर्णय कोण करतो बरे ?

काय परमाणुला माहित आहे की माझ्याबरोबर अन्य अनंत परमाणू

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ६० २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ६१

येऊन एका प्रदेशामध्ये सामावले गेले आहेत ? काय ज्ञेयांना माहित आहे की आपण सगळे एकावेळेस एकदम ज्ञानात ज्ञात झालो आहोत ?[१]

ज्ञानस्वभावाचे सामर्थ्य आहे की तो समस्त द्रव्यांच्या सूक्ष्म स्वभावाला जाणतो. ज्ञेयांना जाणण्यात अरुची दर्शविणारा आपल्या ज्ञानाचाच अस्वीकार करतो, म्हणून ज्ञेयांचा स्वभाव जाणून आपल्या ज्ञानस्वभावाचे माहात्म्य जाणले पाहिजे.[२]''

एकंदरीत वरील गाथेमध्ये हे सांगितले आहे की अनादी-अनंत, नित्य कालाणू कालद्रव्य आहे व पुद्गलाचा परमाणू एक कालाणू द्रव्यापासून दुसऱ्या कालाणू द्रव्यापर्यंत अत्यंत मंदगतिने गमन केले असता त्याला जो वेळ लागेल, त्याला कालांश, समय वा पर्याय म्हणतात.

कालद्रव्य अनुत्पन्न-अविनष्ट आहे व त्याची समय नावाची पर्याय उत्पन्नध्वंशी आहे.

ही गाथा व गाथेच्या टीकेत विशेष समजण्यायोग्य बाब ही की जसे आकाशप्रदेशात अनेक पुद्गलपरमाणु एकत्र राहूनही तो प्रदेश निरंशच आहे; तसेच एका समयात पुद्गलाणुने चौदा राजू गमन केले तरीही समय निरंशच आहे. ते प्रदेश क्षेत्राने व हे समय कालाने निरंश आहेत. ●

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ६१ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ६२

थोडा विचार तर करा ! हे राग-द्वेषभाव हाड-मांस-रक्त इत्यादीहून अधिक अपवित्र आहेत, कारण हाड-रक्त-मांस उपस्थित असूनही पूर्ण पवित्रता, केवलज्ञान व अनंत सुख प्रगट होतात, आत्मा अमल होतो; परंतु जर किंचितही राग राहिला, जरी तो मंदाहून मंदतर वा मंदतम का असेना, कितीही शुभ असेल, तरी देखील केवलज्ञान व अनंत सुख प्रगट होऊ शकत नाही.

आत्मा अगोदर वीतरागी होतो व नंतर सर्वज्ञ. सर्वज्ञ होण्याकरिता वीतरागी होणे आवश्यक आहे; वीतदेह नव्हे, वीतहाड नव्हे, वीतरक्त देखील नव्हे. यावरून सिद्ध होते की रागभाव हाडे आणि रक्ताहून देखील अधिक अपवित्र आहे.

– धर्म के दशलक्षण, पृष्ठ-६६

प्रवचनसार गाथा १४०

मागील गाथेमध्ये 'समयाची' व्याख्या केली आहे आणि आता या गाथेमध्ये प्रदेशाची व्याख्या केली जात आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

आगासमणुणिविट्ठं आगासपदेससण्णया भणिदं।
सव्वेसिं च अणूणं सक्कदि तं देदुमवगासं॥१४०॥

(हरिगीत)

अणु रहे जितने गगन में वह गगन ही परदेश है।
अरे उस परदेश में ही रह सकें परमाणु सब॥१४०॥

एक परमाणू जेवढ्या आकाशात राहतो, तेवढ्या आकाशाला 'आकाश प्रदेश' या नावाने ओळखले जाते व तो समस्त परमाणुंना अवकाश देण्यात समर्थ आहे.

आचार्य अमृतचंद्रांनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे – ''एका परमाणुने व्याप्य आकाशाचा अंश आकाशप्रदेश आहे व तो एक आकाशप्रदेश बाकीच्या पाच द्रव्यांच्या प्रदेशांना आणि परमसूक्ष्मतेने परिणमित अनंत परमाणुंच्या स्कंधांना अवकाश देण्यास समर्थ आहे.

आकाश एक अखंड द्रव्य आहे, तरी त्यामध्ये अंश कल्पना आहे. कारण जर असे नसेल तर सर्व परमाणुंना अवकाश देणे शक्य होणार नाही.

असे असून देखील एखादा म्हणेल की आकाशाला अंश नाहीत, तर आकाशामध्ये दोन बोटे वर करून आम्ही विचारतो की ह्या दोन बोटांचे क्षेत्र एक आहे की अनेक आहे ? जर एक आहे – असे म्हणाल तर मग असा प्रश्न उभा राहतो की आकाश अभिन्न अंशवाले अविभागी एक द्रव्य आहे, म्हणून दोन बोटांचे क्षेत्र एक आहे अथवा भिन्न अंशवाले अविभागी एक द्रव्य आहे, म्हणून दोन बोटांचे क्षेत्र एक आहे.

जर आकाश अभिन्न अंशवाले अविभागी एक द्रव्य आहे, म्हणून दोन बोटांचे एक क्षेत्र आहे – असे म्हटले तर जो अंश एका बोटाचे क्षेत्र आहे, तोच अंश दुसऱ्या बोटाचे देखील क्षेत्र आहे, म्हणून दोहोंपैकी

एका अंशाचा अभाव होईल. अशातऱ्हेने एक-दोन वा अधिक अंशाचा अभाव झाल्याने आकाशद्रव्य देखील परमाणुप्रमाणे एकप्रदेशी सिद्ध होईल, म्हणून हे बरोबर नाही. आणि जर असे म्हटले की आकाश भिन्न अंशवाले अविभागी एक द्रव्य आहे, म्हणून दोन बोटांचे एक क्षेत्र आहे, तर ते योग्य आहे; कारण अविभागी एका द्रव्यात अंशकल्पना सिद्ध होते.

जर असे म्हटले की दोन बोटांची क्षेत्र अनेक आहेत, एकाहून अधिक आहेत तर प्रश्न पडतो की आकाश द्रव्य खंड-खंडरूप, सविभागी अनेक द्रव्य आहेत, म्हणून दोन बोटांचे क्षेत्र अनेक आहे किंवा आकाश अविभागी एक द्रव्य असूनही दोन बोटांची क्षेत्र अनेक आहेत.

आकाश सविभागी अनेक द्रव्य असल्याने बोटांची क्षेत्र अनेक आहेत – जर असे मानले गेले तर आकाशद्रव्य अनंत होतील. परंतु हे तर योग्य नाही; म्हणून आकाश अविभागी एक द्रव्य असल्याने दोन बोटांचे क्षेत्र एक आहे – असे मानले तर ते योग्य आहे. अशातऱ्हेने अविभागी एका द्रव्यामध्ये अंशकल्पना फलित झाली.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये बाकीच्या गोष्टी तर आचार्य अमृतचंद्रांप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत, पण उदाहरणे मात्र दुसरी दिली आहेत. तत्त्वप्रदीपिकेत अमृतचंद्रांनी बोटाचे उदाहरण देऊन समजाविले आहे व जयसेनांनी दोन मुनिराजांच्या उदाहरणाने ही बाब स्पष्ट केली आहे.

वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव १ मनहरण, १ नाराच व ७ दोहे – अशा ९ छंदाद्वारे स्पष्ट केला आहे. सर्व छंद मुळातून पठनीय आहेत.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे –

(कवित्त)

परमानू जह सु अविभागी तिन्हि करि रह्यौ व्यापि भर जास।
अैंसें हैं प्रदेस तसु जामैं पंच अरथ परदेस निवास॥
पुग्गल खंध परिनये जे पुनि सहज रूप सूछमता पास।
सरव दरव तिन्हि कौं जागा के दीवे कौं समर्थ आकास॥९४॥

अनंत अविभागी परमाणूंनी व्याप्त लोकालोकात असंख्यात प्रदेश आहेत व त्या लोकाकाशात जीवादी पाच प्रकारच्या पदार्थांचा वास आहे.

सूक्ष्म व स्थूल पौद्गलिक स्कंध सहजपणे एकाच क्षेत्रात सोबत राहतात, अशाप्रकारे आकाश सर्व द्रव्यांना अवकाश (स्थान) देण्यात समर्थ आहे.

स्वामीजींनी या गाथेचा भाव असा स्पष्ट केला आहे –

''जसे आहेत तसे ज्ञेयाला न जाणल्याने, विपरीत जाणल्याने वस्तुस्वरूप बदलत नाही, परंतु आत्म्यामध्ये भ्रांती उत्पन्न होते व त्यामुळे दुःख होते. ज्ञानाला नकार देणारा जीव वनस्पतीकायवत जड (स्थिर) होईल.[१] ज्ञेयांना जसेच्या तसे जाणणाऱ्या ज्ञानाला यथार्थ ज्ञान म्हणतात. जाणण्यायोग्य पदार्थ ज्ञानात ज्ञात झाल्याशिवाय रहात नाही, म्हणून आत्मा त्यांना अवश्य जाणू शकतो. असे सम्यग्ज्ञान झाल्याने सुख-शांती होते व तेच ज्ञेयांना जाणण्याचे फळ आहे.[२]

दोन खोल्यांचे एक घर आहे. त्यामध्ये एका खोलीची जागा तीच दुसऱ्या खोलीची आहे व विभाजन केल्याशिवाय एकच घर म्हणाल तर दोन खोल्या सिद्ध होत नाहीत व एका खोलीचा नाश मानला तर घर खोल्याशिवाय मानावे लागेल, तर तसे काही घराचे स्वरूप असू शकत नाही, म्हणून एका खोलीचे क्षेत्र, तेच दुसऱ्या खोलीचे क्षेत्र आहे – असे आपले म्हणणे सिद्ध होत नाही. अशातऱ्हेने आकाशात एका बोटाचे क्षेत्र तेच दुसऱ्या बोटाचे क्षेत्र मानाल तर अंशाचा अभाव झाल्याने आकाश परमाणुप्रमाणे केवळ एका प्रदेशाएवढे झाले; परंतु असे होऊ शकत नाही, कारण पाचही द्रव्यांना अवगाहन देणारे द्रव्य सर्वात मोठे असते, म्हणून जर ते एकप्रदेशी असेल तर सर्वांना अवगाहना देऊ शकत नाही, यामुळे आपला तर्क योग्य नाही.[३]''

या गाथेत मुख्यपणे हेच सांगितले आहे की अखंड आकाशात सुद्धा अंशकल्पना होऊ शकते, होते. आकाशाचा सर्वात लहान अंश प्रदेश आहे. जरी तो क्षेत्राने एक परमाणू एवढा आहे, तरी त्यामध्ये अनंत परमाणुंचा स्कंध व जीवादी द्रव्यही सामावू शकतात. असे आकाशद्रव्य अखंड असूनही अनंतप्रदेशी आहे व अनंतप्रदेशी असूनही अखंड आहे. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ६५
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ६६
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ६७

प्रवचनसार गाथा १४१

मागील गाथांमधून समय व प्रदेशांचे स्वरूप स्पष्ट केले आहे आणि आता या गाथेत तिर्यक्प्रचय व ऊर्ध्वप्रचयांना समजावित आहेत.

लक्षात असू द्यावे की तिर्यक्प्रचयामध्ये प्रदेशाची अपेक्षा आहे व ऊर्ध्वप्रचयामध्ये समयाची (काळाची) अपेक्षा आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

एक्को व दुगे बहुगा संखातीदा तदो अणंता य।
दव्वाणं च पदेसा संति हि समय त्ति कालस्स॥१४१॥

(हरिगीत)

एक दो या बहुत से परदेश असंख्य अनंत हैं।
काल के हैं समय अर अवशेष के परदेश हैं॥१४१॥

द्रव्यांचे एक, दोन, खूप, असंख्य किंवा अनंत प्रदेश आहेत व कालद्रव्याचे समय आहेत.

वरील गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''प्रदेशांचा समूह तिर्यक्प्रचय आहे आणि समया-समयाला होणाऱ्या पर्यायांचा समूह ऊर्ध्वप्रचय आहे.

आकाशद्रव्य अवस्थित (स्थिर) अनंत प्रदेशी असल्याने, धर्म व अधर्मद्रव्य अवस्थित असंख्यप्रदेशी असल्याने आणि जीव अनवस्थित (अस्थिर) असंख्यप्रदेशी असल्याने हे तिर्यक्प्रचयवाली द्रव्ये आहेत.

द्रव्यदृष्टीने पुद्गलद्रव्य अनेकपद्रेशी होण्यायोग्य अशा शक्तीने युक्त एकप्रदेशवान आहे; तरीही पर्यायदृष्टीने अनेक (संख्यात, असंख्यात व अनंत) प्रदेशवान आहे; म्हणून त्याला देखील तिर्यक्प्रचय आहे. परंतु कालद्रव्याला तिर्यक्प्रचय नाही, कारण ते शक्ती व प्रगटपणा या दोन्ही अपेक्षेने एक प्रदेशीच आहे.

ऊर्ध्वप्रचय तर सर्व द्रव्यांचे अनिवार्यपणे आहेच, कारण द्रव्याची वृत्ती (पर्याय) तीन (भूत, भविष्य आणि वर्तमान) कोटिंना स्पर्श करते, म्हणून अंशाने युक्त आहे.

हे विशेष आहे की समयांचा प्रचय (समूह) कालद्रव्याचा ऊर्ध्वप्रचय आहे व समयविशिष्ट वृत्तींचा (पर्यायांचा) प्रचय इतर द्रव्यांचा ऊर्ध्वप्रचय आहे; कारण कालद्रव्याची वृत्ती स्वत: समयभूत आहे व इतर द्रव्यांची वृत्ती समयाहून अर्थांतरभूत (अन्य) असल्याने समयविशिष्ट आहे.''

जरी आचार्य जयसेनांनी या गाथेचा भाव स्पष्ट करताना आचार्य अमृतचंद्रांचेच अनुकरण केले आहे, तरी त्यांनी आपले म्हणणे सिद्ध करताना सिद्ध भगवंतांचे उदाहरण दिले आहे. त्यांनी असे देखील सांगितले आहे की तिर्यक्प्रचयाला तिर्यक् सामान्य, विस्तारसामान्य व अक्रमानेकांत देखील म्हणतात. अशा प्रकारे ऊर्ध्व-प्रचयाला ऊर्ध्वसामान्य, आयतसामान्य व क्रमानेकांत देखील म्हणतात.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव २ मनहरण व ६ दोहे – असे एकून ८ छंदांच्या माध्यमातून समजाविला आहे, त्यामध्ये त्यांनी गाथा व टीकेमध्ये आलेल्या संपूर्ण विषयाला सामावून घेतले आहे.

नमुन्यादाखल ते दोहे पुढीलप्रमाणे आहेत –

(दोहा)

जिनके बहुत प्रदेश हैं, तिर्यकप्रचई सोय।
सो पाँचों ही दरब में, व्यापत हैं भ्रम खोय॥९०॥
कालानू में मिलन की, शकति नाहिं तिस हेत।
तिर्यकपरचै के विषैं, गनती नाहिं करेत॥९१॥
समयनि के समुदाय को, ऊरधपरचै नाम।
सो यह सब दरवनिविषैं, व्यापत है अभिराम॥९२॥
काल दरव के निमित्त तैं, ऊरधपरचै होत।
ताही तैं सब दरव को, परनत होत उदोत॥९३॥
पंचनि के ऊरधप्रचय, काल दरव तैं जानु।
कालमाहिं ऊरधप्रचय, निजाधार परमानु॥९४॥

तीरक-परचै पाँच में, निजप्रदेश सरवंग।
निजाधीन धारै सदा, जथाजोग बहुरंग ।।९५।।

ज्या द्रव्यांचे बहुप्रदेश असतात, ती द्रव्ये तिर्यक्प्रचयी असतात. कालद्रव्याला सोडून इतर पाच द्रव्ये निर्भ्रांतपणे तिर्यक्प्रचयीच आहेत.

कालाणुमध्ये जोडण्याची शक्ती नाही, म्हणून तिर्यक्प्रचयामध्ये कालाणुला सामिल केलेले नाही.

समयांच्या समुदायाचे नाव ऊर्ध्वप्रचय आहे. हा ऊर्ध्वप्रचय सर्व द्रव्यांमध्ये असतो.

ऊर्ध्वप्रचय कालद्रव्याच्या निमित्ताने होतो, कारण सर्व द्रव्यांच्या परिणमनामध्ये एकमेव तेच निमित्त आहे.

कालद्रव्याला सोडून बाकीच्या द्रव्यांचा ऊर्ध्वप्रचय कालद्रव्याच्या निमित्ताने होतो आणि कालद्रव्यामध्ये ऊर्ध्वप्रचय स्वत:मुळेच होतो.

पाच द्रव्यांमध्ये प्राप्त होणाऱ्या तिर्यक्प्रचयाचा आधार तीच द्रव्य स्वत:चे आहेत. यथायोग्य अनेक प्रकारचा तिर्यक्प्रचय सर्व पाचही द्रव्यांमध्ये आपापल्यामुळेच होतो.

पंडित देवीदासजींनी येथे एक नवीन प्रयोग केला आहे. एकाच पद्यात १४१, १४२ व १४३ गाथेचा भाव त्यांनी समेटला आहे –

(छप्पय)

कालानू जिहि रूप दरव इक है सु काल ही।
समय नाम परजाय विषैं जानौं सु हाल ही।।
उपजैं अरु विनसैं सु बहुरि थिर रूप बखानौं।
तीनि भाव तिन्हि की प्रवर्त्ति निश्चै करि जानौं।।
अस्तित्व यह सु इहि काल कौ काल सरवदा रहैगौ।
अपनौं सुभाव निज छोड़कर अवर सुभाव न गहैगौ ।।९५।।

कालाणूच कालद्रव्य आहे, समय कालाणूची पर्याय आहे. कालाणू द्रव्य समयरूप पर्यायीच्या रूपात उत्पन्न होते, नष्ट होते आणि स्थिर देखील राहते. त्या परमाणूद्रव्याची उत्पाद-व्यय-ध्रुवरूप प्रवृत्ती

निश्चिंतच होते; कारण ते अस्तित्वसंपन्न द्रव्य आहे. असे कालद्रव्य सर्वदा राहणारे द्रव्य आहे आणि निजस्वभावाला सोडून ते कधी दुसऱ्याच्या स्वभावाला ग्रहण करणार नाही.

या गाथेचा भाव आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"प्रचय शब्दाचा अर्थ समूह आहे. तिर्यक्प्रचय क्षेत्राच्या अपेक्षेने प्रदेशांचा समूह आहे व ऊर्ध्वप्रचय हा काल अपेक्षित विशिष्ट समयाच्या पर्यायांचा समूह आहे.[१] आकाश, धर्म, अधर्म, जीव व पुद्गल अनेक प्रदेशवाले असल्याने त्यांना तिर्यक्प्रचय आहे, परंतु कालद्रव्याला प्रदेशांचा समूह नाही; कारण ते शक्तीअपेक्षेने एकप्रदेशी आहे व प्रगटतेच्या अपेक्षेने सुद्धा एक प्रदेशीच आहे. ऊर्ध्वप्रचय तर सहाही द्रव्यांना असतोच. कारण द्रव्यांची परिणती/अवस्था भूत-वर्तमान व भविष्य अशा तिन्ही काळात असते. एखाद्या काळात द्रव्याची अवस्था नसावी – असे कधी होत नाही; म्हणून ते अंशासहित आहे.[२]"

अशाप्रकारे या गाथेत तिर्यक्प्रचय व ऊर्ध्वप्रचयांचे स्वरूप स्पष्ट करताना हे सांगितले आहे की ऊर्ध्वप्रचय तर पर्यायांचा समूह असल्याने सर्व द्रव्यांमध्ये असतो, परंतु तिर्यक्प्रचय प्रदेशांच्या समूहरूप असल्याने कालद्रव्यात तो नाही. कारण ते एकप्रदेशी म्हणजेच अप्रदेशी आहे. बाकीच्या पाच द्रव्यात तिर्यक्प्रचय व ऊर्ध्वप्रचय दोन्ही आहेत.

ऊर्ध्वप्रचयाच्या अपेक्षेने प्रत्येक द्रव्य अनादी-अनंत आहे, त्रिकाळी ध्रुव आहे व तिर्यक्प्रचयाच्या अपेक्षेने पाच द्रव्य अस्तिकायरूप आहेत.

कालद्रव्याला सोडून बाकीच्या पाच द्रव्यांच्या ऊर्ध्वप्रचयामध्ये कालद्रव्य निमित्त आहे व आपापले उपादान तर सर्व द्रव्य स्वतःच आहेत. कालद्रव्याच्या परिणमनाचे उपादान देखील कालद्रव्य आहे आणि निमित्त देखील कालद्रव्यच आहे. ●

---

१) दिव्यध्वनिसार, भाग-४, पृष्ठ : ७०

२) दिव्यध्वनीसार, भाग-४, पृष्ठ : ७०

प्रवचनसार गाथा १४२-१४३

मागील गाथेत ऊर्ध्वप्रचय व तिर्यक्प्रचयाचे स्वरूप स्पष्ट करून आता या गाथांमध्ये हे सांगत आहेत की कालद्रव्याचा ऊर्ध्वप्रचय निरन्वय नाही. कालद्रव्य देखील ध्रुव आहे, अनादी-अनंत अखंड पदार्थ आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

उप्पादो पद्धंसो विज्जदि जदि जस्स एगसमयम्हि।
समयस्स सो वि समओ सभावसमवट्ठिदो हवदि॥१४२॥
एगम्हि संति समये संभवठिदिणाससण्णिदा अट्ठा।
समयस्स सव्वकालं एस हि कालाणुसब्भावो॥१४३॥

(हरिगीत)

इक समय में उत्पाद-व्यय यदि काल द्रव में प्राप्त हैं।
तो काल द्रव्यस्वभावथित ध्रुवभावमय ही क्यों न हो॥१४२॥
इक समय में उत्पाद-व्यय-ध्रुव नाम के जो अर्थ हैं।
वे सदा हैं बस इसलिए कालाणु का सद्भाव है॥१४३॥

जर कालद्रव्यामध्ये एका समयात उत्पाद व विनाश आढळतो तर तो काल देखील स्वभावाने अवस्थित आहे. अशातऱ्हेने कालद्रव्याच्या प्रत्येक समयामध्ये उत्पाद-व्यय आणि ध्रौव्य होतात. यामुळे कालाणू द्रव्याची सिद्धी होते.

अमृतचंद्राचार्यांनी या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"समय कालपदार्थाच्या वृत्तीचा अंश आहे, वृत्त्यंश आहे. उक्त वृत्त्यंशामध्ये (समयामध्ये) एखाद्याचा उत्पाद व विनाश अवश्य शक्य आहे. कारण समयरूपी वृत्त्यंश परमाणुच्या अतिक्रमणाद्वारे उत्पन्न होतो, म्हणून कारणपूर्वक आहे.

तात्पर्य हे आहे की परमाणुद्वारे आकाशाच्या एका प्रदेशाचे मंदगतिने उल्लंघन करणे कारण आहे व समयरूपी वृत्त्यंश त्या कारणाचे कार्य आहे, म्हणून त्यामध्ये एखाद्या पदार्थाचा उत्पाद-विनाश होत राहिला पाहिजे.

जर कोणी म्हणेल की एखाद्या पदार्थाचा उत्पाद-विनाश होण्याची काय आवश्यकता आहे ? त्या जागी उक्त वृत्त्यंशालाच उत्पाद-विनाश होतो, असे मानले तर काय हरकत आहे ?

असा प्रश्न उद्‌भवल्यावर सांगतात की जर उत्पाद-विनाश वृत्त्यंशाचेच मानला तर मग पुन: प्रश्न उद्‌भवतो की उत्पाद-विनाश एकदम होतात की क्रमश: ?

एकदम तर घडू शकत नाहीत; कारण एका समयामध्ये एकाचे परस्पर विरोधी धर्म असत नाहीत.

जर क्रमश: होतात – असे म्हटले तर क्रम शक्य होत नाही, कारण वृत्त्यंश सूक्ष्म झाला असता त्यामध्ये विभागाचा अभाव आहे; त्यामुळे वृत्तिमानाचा शोध केला पाहिजे व वृत्तिमान कालपदार्थच आहे.

त्या काल पदार्थाचा वास्तविक एका वृत्त्यंशामध्ये देखील उत्पाद व विनाश होणे अशक्य नाही; कारण ज्या वृत्तिमानाच्या ज्या वृत्त्यंशामध्ये त्या वृत्त्यंशाच्या अपेक्षेने जो उत्पाद आहे, तोच उत्पाद त्याच वृत्तिमानाच्या त्या वृत्त्यंशामध्ये पूर्वीच्या वृत्त्यंशाच्या अपेक्षेने विनाश आहे.

जर अशाप्रकारे उत्पाद आणि विनाश एका वृत्त्यंशामध्ये देखील शक्य आहे तर मग कालद्रव्य/पदार्थ हे निरन्वय कसे होऊ शकते ?

अगोदरच्या व नंतरच्या वृत्त्यंशांच्या अपेक्षेने युगपत विनाश व उत्पाद यांना प्राप्त होत असताना सुद्धा कालद्रव्य स्वभावाने अविनष्ट आणि अनुत्पन्न असल्याने अवस्थितच आहे, ध्रुवच आहे. अशातऱ्हेने कालद्रव्य एका वृत्त्यंशामध्ये उत्पाद-व्यय-ध्रौव्यवाले सिद्ध होते.

ज्याप्रमाणे कालद्रव्याच्या एका वृत्त्यंशामध्ये उत्पाद-व्यय-ध्रौव्य असतात; त्याप्रमाणे कालद्रव्याच्या सर्व वृत्त्यंशांमध्ये उत्पाद-व्यय-ध्रौव्य आढळतात. ही बाब युक्तीसंगत आहे, कारण विशेष अस्तित्व सामान्य अस्तित्वाशिवाय असू शकत नाही. सामान्य आणि विशेष कालद्रव्याच्या सिद्धीनेच कालद्रव्याची सिद्धी होते.''

या गाथांचा भाव स्पष्ट करताना आचार्य जयसेनांनी बोट, सुखी आत्मा व मोक्षपर्याय – ह्या तीन उदाहरणांच्या माध्यमाने ही बाब सिद्ध

केली आहे की द्रव्यामध्ये एका समयामध्येच उत्पाद-व्यय आणि ध्रौव्य विद्यमान आहेत.

उदाहरणे व सिद्धांत पुढीलप्रमाणे आहेत –

जसे हाताचे बोट या द्रव्यात बोटाच्या वाकड्या पर्यायीचा उत्पाद, बोटाच्या पूर्व सरळपणाचा व्यय व या दोहोंचे आधारभूत बोट-द्रव्यरूप ध्रौव्य आहे.

अथवा अतींद्रिय सुखरूपाने उत्पाद, पूर्व पर्यायामध्ये प्राप्त दु:खाचा व्यय आणि दोहोंचे आधारभूत परमात्मद्रव्यरूपे ध्रौव्य आहे.

अथवा मोक्षपर्यायरूपाने उत्पाद, मोक्षमार्गरूप पूर्वपर्यायाने व्यय आणि त्या दोहोंचे आधारभूत परमात्मद्रव्यरूपाने ध्रौव्य आहे.

तसेच कालाणुद्रव्यात वर्तमान पर्यायरूपाने उत्पाद, पूर्व पर्यायरूपाने व्यय व दोहोंचे आधारभूत कालद्रव्याने ध्रौव्य – असे कालाणुद्रव्य सिद्ध झाले. एकप्रदेशी कालद्रव्याचा स्वीकार केल्याशिवाय त्याची सिद्धी होणार नाही व त्याचा अभाव मानला तर कोणतेही द्रव्य सिद्ध होणार नाही.''

कविवर वृंदावनदासजींनी ह्या गाथा व त्यांची टीका या सर्वांचा भाव ४ दोहे, १ छप्पय, १ मनहरण व १ माधवी छंद – अशा एकूण ७ छंदातून विस्ताराने प्रस्तुत केला आहे. ते मुळातून वाचण्यायोग्य आहेत.

जर कालाणू द्रव्याचा स्वीकार केला नाही व समय नावाच्या पर्यायाचीच उत्पत्ती व विनाश मानला तर काय अडचण येईल ? तात्पर्य हे आहे की अनादी-अनंत त्रिकाळी ध्रुव कालद्रव्याला मानण्याची काय गरज आहे ? अशाप्रकारे सांगून कालद्रव्याच्या सत्तेला नाकारणाऱ्या लोकांना त्यांनी सयुक्तीक योग्य उत्तर टीकेत दिले आहे, तरीही वृंदावनदासजींनी या गोष्टीला अत्यंत सोप्या भाषेत प्रस्तुत केले आहे –

(दोहा)

कालदरव को क्यों कहो, उपजनविनशनरूप।
समय परज ही कों कहो, वयउतपादसरूप॥९७॥
ध्रौव दरव को छांडि के एकै समय मँझार।
उतपत ध्रुव वय सधत नहिं, कीजै कोट विचार॥९८॥

उतपत अरु वय के विषैं, राजत विदित विरोध।
अंधकार परकाशवत, देखो निज घट शोध॥९९॥
तातैं कालानू दरव, ध्रौव गहोगे जब्ब।
निरावाध एकै समय, तीनों सधिहैं तब्ब॥१००॥

जर कोणी असे म्हटले की आपण कालद्रव्याला उत्पाद-व्यय का म्हणत आहात ? समय नावाच्या पर्यायालाच उत्पाद-व्ययरूप म्हणा ना!

कोट्यावधी विचार केले तरीही ध्रुव द्रव्याला सोडून एका समय नावाच्या पर्यायामध्ये उत्पाद-व्यय व ध्रौव्यता घटित होऊ शकत नाही.

अंधार व प्रकाश यांच्यात जसा जगजाहीर विरोध आहे, त्याप्रमाणे उत्पाद व व्ययामध्येही आहे. ह्या गोष्टीचा गांभीर्याने आपल्या मनाशी विचार करा. त्यामुळे जेव्हा ध्रुव कालद्रव्याला ग्रहण कराल तेव्हा एकाच द्रव्यात एका समयात उत्पाद, व्यय व ध्रौव्य – तिन्ही सिद्ध होतील.

पंडित देवीदासजींनी या गाथांचा भाव मागील पद्यामध्येच समाविष्ट केलेला आहे.

स्वामीजींनी या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"आता कालद्रव्याचे ऊर्ध्वप्रचय अन्वयरहित असण्याचे खंडन करतात अर्थात व्यवहारकाल आहे; परंतु निश्चय कालाणुसमान एखादे द्रव्य जगात नाही – असे मानणाऱ्यांच्या मताचे खंडन करतात.[१]

एका समयाची अवस्था अगोदर नव्हती व नंतर झाली, तर अशी अवस्था एखाद्या द्रव्याच्या आधारेच झाली पाहिजे, ती आधाराविना होऊ शकत नाही. एखाद्या द्रव्याच्या आधाराविना उत्पाद होऊ शकत नाही; म्हणून जर समय वगैरे व्यवहारकाल आहे तर त्याचा आधार असलेले एखादे द्रव्य असले पाहिजे – असे सिद्ध होते व तो कालाणू आहे.

यावरून काल औपचारिक नाही तर निश्चय द्रव्य आहे.[२]

अशाप्रकारे समयरूपी सूक्ष्म परिणतीचा उत्पाद व विनाश एकाच

१) दिव्यध्वनिसार, भाग-४, पृष्ठ : ७३-७४ २) दिव्यध्वनीसार, भाग-४, पृष्ठ : ७४

समयामध्ये होणे अशक्य आहे; म्हणून त्या अवस्थेचा धारक एखादे अवस्थायी द्रव्य असले पाहिजे आणि ते कालद्रव्य आहे.[१]

एका समयामध्ये नवी अवस्था उत्पन्न होते, जुन्या अवस्थेचा व्यय होतो आणि कालाणू ध्रुव राहते. वर्तमानात चपातीच्या अवस्थेचा उत्पाद होणे, पूर्वीच्या लोई (उंडा) या अवस्थेचा व्यय होणे व पिठाच्या परमाणुंचे ध्रुव राहणे होते, परंतु परमाणुला ध्रुव मानल्याविना पिठाची अवस्था चपाती होऊ शकत नाही, कारण दोन्ही विरुद्ध अवस्था आहेत व एका सूक्ष्म अवस्थेमध्ये थोडे पीठ व थोडी चपाती – असे दोन भाग होऊ शकत नाहीत. परमाणुला ध्रुव असे स्वीकारले असता दोन्ही विरोधी धर्म द्रव्यामध्ये सिद्ध होतात.[२]

अशातऱ्हेने एका पर्यायामध्ये पूर्व पर्यायाच्या अपेक्षेने व्ययरूप, वर्तमानातील पर्यायाच्या अपेक्षेने उत्पादरूप व सादृश्यरूपाने रहाण्याच्या अपेक्षेने ध्रुवरूप – अशाप्रकारे कालद्रव्य उत्पाद-व्यय-ध्रौव्यवाले आहे असे नक्की होते.[३]

आता जसे एका पर्यायात कालद्रव्य उत्पाद-व्यय-ध्रौव्यवाले आहे हे सिद्ध केले, त्याप्रमाणे सर्व पर्यायांमध्ये काल द्रव्य उत्पाद-व्यय-ध्रौव्यवाले आहे हे सिद्ध करतात.[४]

एक वृत्ती अंश चांगल्याप्रकारे निश्चित केल्याने उत्पाद-व्यय-ध्रुव हे तिन्ही अंश निश्चित होतात – हीच कालाणू द्रव्याच्या अस्तित्वाची सिद्धी आहे.[५] जसे एका समयात पूर्वकालीन पर्याय गेली, वर्तमानकालीन पर्याय प्रगट झाली व ध्रुव कायम राहिले, तसे प्रत्येक समयात तिन्ही धर्म असतात. पूर्वीही असे होते, वर्तमान काळी देखील असेच आहे व भविष्यातही असेच असेल – अशाप्रकारे तिन्ही काळातील अवस्थांमध्ये कालद्रव्य उत्पाद-व्यय-ध्रुवसहित आहे – हे निश्चित होते.[६]''

---

१) दिव्यध्वनिसार, भाग-४, पृष्ठ : ७५
२) दिव्यध्वनीसार, भाग-४, पृष्ठ : ७५
३) दिव्यध्वनिसार, भाग-४, पृष्ठ : ७६
४) दिव्यध्वनीसार, भाग-४, पृष्ठ : ७६
५) दिव्यध्वनिसार, भाग-४, पृष्ठ : ७८
६) दिव्यध्वनीसार, भाग-४, पृष्ठ : ७८

वरील सर्व कथनाचा सारांश असा आहे कि इतर द्रव्यांप्रमाणे एकप्रदेशी किंवा अप्रदेशी असलेले कालाणू देखील एक द्रव्य आहे. अशी कालाणू द्रव्ये असंख्य आहेत व लोकाकाशाच्या एकेका प्रदेशावर कालाणू द्रव्य रत्नांच्या राशीप्रमाणे व्याप्त आहेत.

समय वरील कालाणू द्रव्याची सर्वात छोटी पर्याय आहे. तो समय आकाशाच्या एका प्रदेशाहून दुसऱ्या प्रदेशाच्या अत्यंत मंदगतीने गमन करणाऱ्या पुद्गल परमाणुच्या गतिआधारे मोजला जातो.

तो समय अनादी-अनंत त्रिकाळी ध्रुव कालद्रव्याचा सर्वात छोटा अंश आहे, तो स्वत: निरंश आहे. ही अंश कल्पना ऊर्ध्वप्रचय संबंधी आहे.

प्रत्येक द्रव्याप्रमाणे कालद्रव्यदेखील दरसमयाला उत्पाद, व्यय व ध्रौव्यासहित आहे. पूर्व पर्यायाचा व्यय, उत्तर पर्यायाचा उत्पाद व द्रव्याचे ध्रुवत्व – अशी प्रत्येक द्रव्याची स्वरूपसंपदा आहे; म्हणून हे अगदी नक्की आहे की एका समयामध्ये होणारे उत्पाद, व्यय व ध्रौव्य द्रव्यामध्येच घटित होतात, एका पर्यायात नव्हे.

म्हणून कालाणू द्रव्याचे अस्तित्व स्वीकारल्याशिवाय एका समयात उत्पाद, व्यय व ध्रौव्याचे असणे शक्य नाही.

अशाप्रकारे हे कालद्रव्य निरन्वय नाही. अन्वयसहितच आहे.

हे आपणास माहितच आहे की ८० व्या गाथेच्या टीकेत द्रव्य-गुण-पर्यायाच्या स्वरूपाला स्पष्ट करताना लिहिले होते की **अन्वय द्रव्य आहे, अन्वयाचे विशेषण गुण व अन्वयाचा व्यतिरेक पर्याय आहे.**

वरील परिभाषेनुसार देखील कालाणू द्रव्य हे अन्वयसहित आहे, निरन्वय नाही, कारण द्रव्याची व्याख्याच मुळी अन्वय अशी आहे.

शेवटी हे सांगितले आहे की ज्याप्रमाणे कालाणू द्रव्याच्या एकांशामध्ये उत्पाद-व्यय-ध्रौव्य घटित होतात, त्याप्रमाणे कालाणू द्रव्यांच्या प्रत्येक अंशामध्ये देखील ते घटित होतीलच.

अशाप्रकारे हे नक्कीच आहे की सर्व द्रव्याप्रमाणे सर्व कालाणू द्रव्य सुद्धा उत्पाद-व्यय-ध्रौव्याने संयुक्त आहेत. ●

प्रवचनसार गाथा १४४

मागील गाथांमधून हे सांगितले आहे की कालद्रव्य प्रत्येक वृत्त्यंशामध्ये उत्पाद-व्यय-ध्रौव्यवान आहे, कारण ते निरन्वय नाही, अन्वयरहित नाही, अन्वयासहितच आहे. आता या गाथेमध्ये हे सांगत आहेत की कालद्रव्य अप्रदेशी नाही, एकप्रदेशी आहे; कारण प्रदेशाशिवाय त्याचे अस्तित्वच सिद्ध होत नाही.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

जस्स ण संति पदेसा पदेसमेत्तं व तच्चदो णादुं।
सुण्णं जाण तमत्थं अत्थंतरभूदमत्थीदो॥१४४॥

(हरिगीत)

जिस अर्थ का इस लोक में ना एक भी परदेश हो।
वह शून्य ही है जगत में परदेश बिन न अर्थ हो॥१४४॥

ज्या पदार्थाचा (द्रव्याचा) परमार्थाने एकही प्रदेश नसेल, तो पदार्थ शून्य आहे – असे समजा. कारण तो अस्तित्वाहून अर्थांतरभूत आहे.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''उत्पाद, व्यय व ध्रौव्य यांची ऐक्यस्वरूप वृत्तीरूपच अस्तित्व आहे. ही वृत्ती म्हणजेच अस्तित्व कालद्रव्यामध्ये प्रदेशाखेरीजच असते – असे म्हणणे शक्य नाही; कारण प्रदेशाच्या अभावी वृत्तीमानाचा अभाव होतो. प्रदेशाविना पदार्थ शून्यच ठरतो. कारण तो पदार्थ अस्तित्व नामक वृत्तीपासून अर्थांतरभूत आहे म्हणजेच अन्य आहे.

यावर जर एखादा म्हणेल की समयपर्यायरूप वृत्ती मानावयास हवी; वृत्तीमान कालाणू पदार्थाची काय आवश्यकता आहे ?

त्याला सांगतात की फक्त वृत्ती (समयरूप परिणती)च काल असू शकत नाही, कारण वृत्ती परिमाणाशिवाय असू शकत नाही.

जर असे म्हटले की वृत्तीमानाशिवायच वृत्ती असू शकते तर आम्ही विचारू इच्छितो की फक्त वृत्ती उत्पाद-व्यय-ध्रौव्य यांच्या एकतारूप कशी असू शकेल ? जर एखादा म्हणेल की अनादी-अनंत अनंतर अनेक अंशामुळे एकात्मकता असते; म्हणून अगोदरच्या अंशाचा नाश होतो आणि नंतरच्या अंशाचा उत्पाद होतो आणि एकात्मकतारूप ध्रौव्य राहते. अशाप्रकारे फक्त वृत्ती देखील उत्पाद-व्यय-ध्रौव्याची एकतारूप असू शकते.

त्याला म्हणतात की हे शक्य नाही, कारण त्या नुसत्या वृत्तीमध्ये तर ज्या अंशात नाश आहे व ज्या अंशात उत्पाद आहे, ते दोन्ही अंश एकदम प्रवृत्त होत नाहीत, त्यामुळे उत्पाद-व्ययात असे कसे होऊ शकते ?

नष्ट अंशाचा सर्वथा अस्त झाल्याने व उत्पन्न होणारा अंश आपल्या स्वरूपाला प्राप्त न झाल्याने नाश व उत्पाद यांच्या एकतेमध्ये राहणारे ध्रौव्य कसे असू शकेल ? असे झाले असता त्रिलक्षणता नष्ट होते व बौद्धमतसंमत क्षणभंग उल्लसित होतो, नित्य द्रव्य अस्त होतो व क्षणध्वंसी भाव उत्पन्न होतात; म्हणून तत्त्वविप्लवाच्या भयाने निश्चितच वृत्तीचा आश्रयभूत एखादा वृत्तीमान शोधणे आवश्यक आहे, स्वीकारणे आवश्यक आहे.

वृत्तीमान द्रव्य सप्रदेशीच असते, कारण अप्रदेशाचे अन्वय व व्यतिरेक असणे असिद्ध आहे.

येथे हा प्रश्न शक्य आहे की जर कालद्रव्य सप्रदेशी आहे तर मग लोकाकाशाप्रमाणेच कालद्रव्याचे देखील एकद्रव्यत्वाचे हेतुभूत असंख्य प्रदेश मानण्यामध्ये काय हरकत आहे ?

याचे उत्तर हे आहे की असे मानले असता पर्याय समय सिद्ध होत नाही, म्हणून कालद्रव्याचे असंख्य प्रदेश मानणे योग्य नाही. परमाणुद्वारे मंदगतीने आकाशाच्या एका प्रदेशाचे उल्लंघन केले असता, त्या आधारे कालद्रव्याची समय नामक पर्याय मानली जाते.

द्रव्यसमय अर्थात कालपदार्थ लोकाकाशाप्रमाणे असंख्यातप्रदेशी एक द्रव्य असेल तरी सुद्धा परमाणुद्वारे त्याचा एक प्रदेश उल्लंघित झाला असता, पर्याय समयाची सिद्धी कशी होईल ?

जर कोणी म्हणेल की द्रव्यसमय म्हणजेच कालपदार्थ लोकाकाशा-एवढे असंख्य प्रदेशवाले एक द्रव्य असते, तरीही परमाणुद्वारे त्याचा एक प्रदेश उल्लंघित झाला असता. पर्याय समयाची सिद्धी झाली तर काय हरकत आहे ?

असे मानले असता खालील दोन मुद्दे उपस्थित होतील –

१) मुळात द्रव्याच्या एकदेश परिणतीला संपूर्ण द्रव्याची परिणती मानण्याचा प्रसंग उद्भवतो आणि एकदेशाच्या वृत्तीला संपूर्ण द्रव्याची वृत्ती मानण्यामध्ये विरोध आहे. संपूर्ण कालद्रव्याचा जो सूक्ष्म वृत्त्यंश आहे, तो समय आहे. परंतु त्याच्या एकदेशाचा वृत्त्यंश समय नाही.

२) दुसरे असे की तिर्यक्प्रचयाला ऊर्ध्वप्रचयपणाचा प्रसंग उद्भवेल, तात्पर्य असे आहे की असे मानले असता कालद्रव्य एका प्रदेशात राहिल, नंतर दुसऱ्या प्रदेशात राहिल, मग इतर प्रदेशांमध्ये राहिल. अशाप्रकारची उपस्थिती उद्भवेल. व अशी अडचण होईल, म्हणून तिर्यक्प्रचयाला ऊर्ध्वप्रचयपणा न मानणाऱ्यांनी पूर्वीपासूनच कालद्रव्याला ते प्रदेशमात्र आहे – हे निश्चित केले पाहिजे, मानले पाहिजे.''

जरी या गाथेचा भाव स्पष्ट करण्याकरिता आचार्य जयसेनांनी तत्त्वप्रदीपिकेचेच अनुकरण केले आहे, तरीही मागील गाथांप्रमाणे येथे देखील उदाहरण वेगळे दिले आहे.

टीकेच्या शेवटी त्यांनी जी बाब लिहिली आहे, ती बाब ह्या गाथेचा उपसंहारच नाही तर संपूर्ण द्रव्यविशेषाधिकाराचा उपसंहार आहे. तात्पर्य हे आहे की निम्नांकित कथन सूत्रतात्पर्य नसून शास्त्रतात्पर्य आहे –

''अनंत काळामध्ये जे जीव आत्मोपादानाने सिद्ध सुखाला प्राप्त झाले आहेत व भविष्यकाळामध्ये जे जीव सिद्ध सुखाला प्राप्त होतील; ते सर्व काललब्धीवशातच झाले आहेत; तथापि निजपरमात्माच उपादेय

आहे – अशा रुचीरूप वीतरागी चारित्राचे अविनाभावी असलेले जे निश्चय सम्यक्त्व आहे, त्याचीच मुख्यता आहे; काळाची नाही, त्यामुळे ते हेय आहे. म्हटले देखील आहे –

किं पलविएण बहुणा जे सिद्धा णरवरा गये काले।
सिज्झहहि जे वि भविया तं जाणह सम्ममाहप्पं॥[१]

(हरिगीत)

मुक्ती गये या जायेंगे माहात्म्य है सम्यक्त्व का।
यह जान लो हे भव्यजन! इससे अधिक अब कहें क्या॥

आणखी अधिक काय सांगावे? जे श्रेष्ठ पुरुष भूतकाळात सिद्ध झाले आहेत व जे भविष्यात होतील, ते सम्यक्त्वाचेच माहात्म्य जाणा.''

या गाथेचा भाव कविवर वृंदावनदासजींनी ३ मनहरण, १ गीता, १ पदावलिप्रकपोल, १ कवित्त व ११ दोहे – अशाप्रकारे एकूण १७ छंदांमध्ये गाथा व टीकेत आलेला विषय विस्ताराने प्रस्तुत केला आहे. ते मुळातून वाचण्याजोगे आहेत. नमुन्यादाखल ३ दोहे प्रस्तुत आहेत –

(दोहा)

जो प्रदेश तैं रहित है, सो तो भयो अवस्त।
ताके ध्रुव उतपाद वय, लोपित होत समस्त॥१०४॥
तातैं काल दरव गहो, अनुप्रदेश परमान।
तब तामैं तीनों सधैं, निराबाध परधान॥१०५॥
तातैं कालानू दरव, ध्रौव गहोगे जब्ब।
निराबाध एकै समय, तीनों सधिहैं तब्ब॥१०८॥

जे प्रदेशरहित आहे, ती तर अवस्तू आहे. त्याचे उत्पाद-व्यय-ध्रौव्य सर्व लुप्त होतात.

त्यामुळे जर कालद्रव्याचा एकप्रदेशी म्हणून स्वीकार केला तरच त्यामध्ये उत्पाद-व्यय-ध्रौव्य – हे तिन्ही असतील.

जेव्हा कालाणुला ध्रुवरूपाने ग्रहण केले जाईल, तेव्हा एका समयात तिन्ही साधले जातील.

१) अष्टपाहुड, मोक्षपाहुड, गाथा : ८८

पंडित देवीदासजींनी एका छंदातून या गाथेचा भाव प्रस्तुत केला आहे, ते पद्य पुढीलप्रमाणे आहे –

(छप्पय)

जिहि वस्तु कैं अनेक एक परदेस न लहिये।
जासु विषैं उतपाद वय सु ध्रुवता किम कहिये॥
उतपति वय धुव माहि दरव अस्तित्व सही है।
सो अस्तित्व विना प्रदेस नाहीं सु कही है॥
जातैं अप्रदेसी कें कहैं सून्य असत्ता जानियैं।
लखिकैं इम परदेसी सु इक काल दरव सो मानियै॥९६॥

ज्या वस्तूचे एक वा अनेक प्रदेश नाहीत, त्या वस्तूमध्ये उत्पाद, व्यय आणि ध्रुवता कशी असू शकते ? उत्पाद, व्यय आणि ध्रौव्याने तर वस्तूचे अस्तित्व आहे व अस्तित्व प्रदेशाशिवाय असू शकत नाही. त्यामुळे अप्रदेशी मानल्यावर कालद्रव्य सत्ताशून्य होईल, त्याची असत्ता सिद्ध होईल. ही बाब चांगल्याप्रकारे समजून कालद्रव्याला एकप्रदेशी मानणेच उपयुक्त राहील.

या गाथेचा भाव आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

"जर असे मानले जाईल की पदार्थाला (द्रव्याला) अनेक प्रदेश किंवा एकप्रदेश देखील परमार्थाने नाहीत म्हणजेच त्याला क्षेत्र नाही तर त्या पदार्थाचे अस्तित्वच उरत नाही, तो पदार्थ शून्य होतो.[१]

जेथे अस्तित्व आहे, तेथे प्रदेश असलेच पाहिजेत. कालद्रव्यामध्ये उत्पाद-व्यय-ध्रौव्याचे एकतारूप अस्तित्व आहे – हे अगोदरच्या गाथेत सिद्ध झालेलेच आहे. त्यामुळे हे शक्य नाही की ते प्रदेशरहित असावे.

तात्पर्य हे आहे की कालद्रव्य एकप्रदेशी आहे – हे निश्चित झाले.[२]

प्रश्न : नुसत्या समय ह्या अवस्थारूप परिणतीला माना; वृत्तीमान कालाणू पदार्थाला मानण्याची काय आवश्यकता आहे ?

---

१. दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ-८१ २. वही, पृष्ठ-८२

उत्तर : समयरूप अवस्थाच कालद्रव्य असावे – असे होऊ शकत नाही. कारण पर्याय पर्यायवानाशिवाय असू शकत नाही. नव्या अवस्थेचे होणे, जुन्या अवस्थेचा नाश होणे – हे एखाद्याच्या आधाराशिवाय शक्य नाही, म्हणून उत्पाद-विनाशरूप वृत्ती, वृत्तीमान कालद्रव्याच्या आधारेच शक्य आहेत. त्याशिवाय असणे शक्यच नाही. म्हणून काल हे औपचारिक द्रव्य नाही, तर निश्चय द्रव्य आहे.[१]

जर कालद्रव्य प्रदेशी आहे, तर त्याला एका द्रव्याच्या कारणभूत लोकाकाशतुल्य असंख्य प्रदेश का बरे मानू नयेत ? म्हणजेच काल द्रव्याला धर्मास्तिकायवत असंख्य प्रदेशी एक द्रव्य का बरे मानू नये ?

वरील प्रश्नाचे उत्तर असे आहे की तुमचे म्हणणे योग्य नाही, कारण जर असंख्यात प्रदेशी एक द्रव्य असेल तर पर्यायसमय निश्चित होत नाही. म्हणून कालद्रव्याला असंख्यप्रदेशी मानणे योग्य ठरणार नाही.

एक परमाणू एकप्रदेशी कालाणुपासून जवळच्या दुसऱ्या प्रदेशातील कालाणुपर्यंत मंदगतीने गेला असता पर्यायसमय निश्चित होतो. ही काळाच्या मापाची गोष्ट आहे. जर कालद्रव्य लोकाकाशतुल्य असंख्यप्रदेशी असते तर पर्यायसमयाची सिद्धी होत नाही.[२]

धर्मास्तिकायद्रव्य लोकप्रमाण आहे व त्याची पर्याय सुद्धा लोकप्रमाण आहे. परंतु कालद्रव्याची पर्याय लोकप्रमाण कधीच नसते. कालद्रव्याची पर्याय तर एक अंशा(प्रदेशा)त पूर्ण होते, म्हणून त्या पर्यायीचे धारक कालद्रव्य असंख्यप्रदेशी लोकप्रमाण सिद्ध होत नाही. परंतु कालद्रव्याची पर्याय एका अंशा(प्रदेशा)त आहे. म्हणून पर्यायवान कालद्रव्यसुद्धा एका अंशा(प्रदेशा)मध्ये आहे – हे नक्की होते.[३]

अशाप्रकारे काल एक निश्चय द्रव्य असून एकप्रदेशी आहे – हे निश्चित झाले.[४]''

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ८२
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ८५
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ८२
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ८२

वरील संपूर्ण कथनाचा सारांश असा आहे की कालद्रव्य एकप्रदेशी द्रव्य आहे व त्याला अप्रदेशी सुद्धा म्हटले जाते. अनेकप्रदेशीपणाच्या निषेधासाठी त्याला अप्रदेशी म्हटले होते, परंतु काही जणांनी त्याला खरोखरच अप्रदेशी मानले. या कारणास्तवच या गोष्टीवर जोर दिला जात आहे की ते एकप्रदेशी आहे, प्रदेशरहित नक्कीच नाही; म्हणून ते प्रदेशवान द्रव्य आहे, अप्रदेशी नाही. ते धर्मद्रव्यासमान असंख्यप्रदेशी नाही आणि एकप्रदेशी देखील नाही.

येथे एक प्रश्न असा उपस्थित होतो की मागील गाथांमधून तर कालद्रव्याला अप्रदेशी, नास्तिकाय असे पुऱ्या शक्तीनिशी सिद्ध केले आहे व आता तेवढाच जोर देऊन म्हटले आहे की ते अप्रदेशी नसून सप्रदेशीच आहे. – याचे काय कारण आहे ?

अहो ! गोष्ट तर अशी आहे की कालद्रव्य मुळात एकप्रदेशीच आहे. न तर ते बहुप्रदेशी आहे आणि न ते प्रदेशरहित अप्रदेशी आहे.

जर कालद्रव्य अप्रदेशी नाही तर त्याला अप्रदेशी का म्हटले जात आहे ?

बहुप्रदेशीपणाचा निषेध करण्याकरिता त्याला अप्रदेशी म्हटले जात आहे, परंतु ते पूर्णपणे प्रदेशरहित नाही, एकप्रदेश तर त्यालाही असतोच.

या बाबतीत फार विकल्प करण्याची गरज नाही, कारण वरील कथनामध्ये परस्पर विरोध नसून केवळ विवक्षाभेद आहे.

अशाप्रकारे येथे ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन अधिकारामध्ये द्रव्यसामान्य अधिकार व द्रव्यविशेष अधिकार समाप्त झाला. ●

ज्ञानाचे ज्ञेयरूप आत्म्यामध्ये राग-द्वेष देखील होऊ शकतात, होतात देखील; परंतु श्रद्धेय आत्मा राग-द्वेषादी भावांहून भिन्नच असतो. ज्ञान आत्म्याच्या स्वभावाला स्वभाव-विभाव सर्व पर्यायींना देखील जाणतो; परंतु केवळ श्रद्धा स्वभावामध्येच आपलेपणा स्थापित करते. त्यामुळे श्रद्धेचा आत्मा केवळ स्वभावमयच आहे.

– गागर में सागर, पृष्ठ : २४

ज्ञानज्ञेयविभागाधिकार

(गाथा १४५ ते गाथा २०० पर्यंत)

प्रवचनसार गाथा १४५

ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकारामध्ये द्रव्यसामान्याधिकार व द्रव्यविशेष अधिकार हे समाप्त झाले असता आता येथे ज्ञानज्ञेयविभाग अधिकार सुरू करीत आहेत.

ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकार येथे समाप्त झालाच आहे – असे समजावे, कारण सामान्य आणि विशेष ज्ञेय अशा दोन्ही प्रकारची चर्चा झाली आहे, परंतु आत्मकल्याणाच्या दृष्टीने ज्ञानतत्त्व ज्ञेयतत्त्व – या दोहांचा वेगवेगळेपणा दाखविणे अत्यंत आवश्यक आहे. या कारणास्तव आचार्यदेवांनी वरील दोन्ही महाधिकारानंतर या ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकाराच्या अंतर्गतच ज्ञान व ज्ञेय यांचा वेगळेपणा दाखविणारा हा ज्ञानज्ञेयविभागाधिकार प्रारंभ केला आहे.

जरी मी ज्ञानतत्त्व आहे, तरी देखील मी ज्ञेयतत्त्वही आहे. आता येथे असा प्रश्न उभा राहतो की ज्ञानतत्त्वामध्ये देखील आत्म्याची चर्चा व ज्ञेयतत्त्वामध्ये देखील आत्म्याचीच चर्चा – अशा दोन्ही ठिकाणी एका आत्म्याचीच चर्चा का करीत आहेत ?

अरे बाबा ! ज्ञानतत्त्वप्रज्ञापनामध्ये जाणणाऱ्या आत्म्याची चर्चा केली होती आणि ज्ञेयतत्त्वप्रज्ञापनामध्ये जाणण्यात येणाऱ्या आत्म्याची चर्चा केली जात आहे. वास्तविक बाब अशी आहे की 'तो आत्मा जाणणारा आहे' – असे आपल्याला जाणावयाचे आहे.

हा भगवान आत्मा ज्ञानतत्त्वप्रज्ञापनाधिकारामध्ये जाणणाऱ्या तत्त्वरूपाने उपस्थित आहे आणि ज्ञेयतत्त्वप्रज्ञापनाधिकारामध्ये जाणण्यात येणाऱ्या तत्त्वरूपाने उपस्थित आहे. या आत्म्याचा स्वभाव जाणणे आहे. जाणण्यात जो आत्मा येत आहे तो आत्मा सुद्धा जाणणाऱ्या

स्वभाववाले तत्त्व आहे, म्हणून त्याला जाणणाऱ्याच्या रूपाने जाणले जाईल, कारण त्यामध्ये जाणण्याचा गुण विद्यमान आहे.

आता येथे विशेष बाब अशी आहे की आचार्यांनी जेव्हा ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकार सुरू केला होता, तेव्हा सुरवातीला **पर्यायमूढच परसमय आहे** – असे म्हटले होते.

त्यानंतरच्या गाथा व त्यावरील टीकेच्या आधारे असे म्हटले जाऊ शकते की तेथे पर्यायाच्या नावाखाली असमानजातीयद्रव्यपर्यायाचीच चर्चा आहे. या बाबतीत यापूर्वी विस्ताराने चर्चा झालेली आहे.

यानंतर येथे पुन्हा आचार्यांनी मनुष्य, देव, नारकी वगैरेंना व्यवहारजीव म्हणून त्या असमानजातीय द्रव्यपर्यायाच्याच मुख्यतेने कथन केले आहे; कारण मनुष्यजीवात जीव व अनंत पुद्गल परमाणुंचा पिंड सामील आहे. अशातऱ्हेने या पूर्ण प्रकरणात देह-देवळात विराजमान देहापासून भिन्न भगवान आत्म्याची चर्चा आहे.

लक्षात असू द्यावे प्रमेयत्वगुणसंपन्न आपल्या ज्ञानस्वभावी आत्म्याला परज्ञेयांहून भिन्न जाणायचे आहे, स्वज्ञेयरूप निजात्म्याहून नव्हे.

जो तिन्ही काळात कमीत कमी चार प्राणांनी जगतो, तो व्यवहारजीव आहे. इंद्रिय, बल, आयु व श्वासोच्छवास – हे चार प्राण आहेत.

इंद्रियांमध्ये पाच इंद्रिय व बलामध्ये तीन बल सामील असल्याने चार प्राणांनी जो जगतो, तो जीव आहे. याचे तात्पर्य हेच आहे की जो दहाही प्राणांनी जगतो, तो जीव आहे.

हे दहा प्राण देहाचेच अंग आहेत. स्पर्शन, रसना, घ्राण, चक्षु व कर्ण ही पाच इंद्रिय व मन, वचन, काय – हे तीन बल तसेच श्वासोच्छवास – हे सर्व देहाचेच अवयव आहेत. देह व आत्म्याच्या निश्चित काळाच्या संयोगाचे नाव आयु असल्याने आयु सुद्धा देहातच सामील आहे.

अशाप्रकारे जी देह आणि आत्मा यांची एकत्रित झालेली असमानजातीय द्रव्यपर्याय आहे, त्याचेच नाव व्यवहारजीव आहे.

स्व-पराला जाणण्याची अनंत शक्ती ज्यामध्ये विद्यमान आहे, त्याचे नाव निश्चयजीव आहे, तसेच जी देह आणि आत्म्याची एकत्रित झालेली असमानजातीय द्रव्यपर्याय आहे, त्याचे नाव व्यवहारजीव आहे.

दहा प्राणांपासून भेदविज्ञानाच्या मांध्यमातून आचार्यदेव मनुष्यादी पर्यायरूप असमानजातीय द्रव्यपर्याय आणि त्रिकाळी ध्रुव भगवान आत्म्यामध्ये विभाजन रेखा आखू इच्छितात.

अशाप्रकारे हा ज्ञानज्ञेयविभागाधिकार भगवान आत्म्याला मनुष्यादी पर्यायरूप व्यवहारजीवापासून विभक्त करणारा अधिकार आहे.

आता सर्वप्रथम आत्म्याला परापासून विभक्त करण्याकरिता व्यवहार जीवतत्त्वाच्या हेतुचा विचार करतात.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

सपदेसेहिं समग्गो लोगो अट्ठेहिं णिट्ठिदो णिच्चो।
जो तं जाणदि जीवो पाणचदुक्काभिसंबद्धो ॥१४५॥

(हरिगीत)

सप्रदेशपदार्थनिष्ठित लोक शाश्वत जानिये।
जो उसे जाने जीव वह चतुप्राण से संयुक्त है॥१४५॥

सप्रदेश पदार्थांनी निष्ठित संपूर्ण लोक (जग) नित्य आहे. त्याला जो जाणतो, तो जीव आहे; जो संसार अवस्थेमध्ये कमीत कमी चार प्राणांनी युक्त असतो.

तात्पर्य हे आहे की सप्रदेशी सहा द्रव्यांच्या समुदायरूप या लोकात (जगात) जाणणारे एकमेव जीवद्रव्य आहे व बाकीची द्रव्य अजीव आहेत.

जीव द्रव्य ज्ञान सुद्धा आहे आणि ज्ञेय सुद्धा आहे, बाकीची द्रव्य फक्त ज्ञेयच आहेत. जाणणारा जीव संसार अवस्थेमध्ये कमीत-कमी चार प्राणांनी जगतो.

वरील गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''आकाशापासून कालद्रव्यापर्यंत सर्व पदार्थ सप्रदेशी आहेत व सर्वांचा समुदाय लोकाकाशात असून सुद्धा स्व-पराला जाणणाच्या अचिंत्य शक्तीरूप संपदेद्वारे एकमेव जीवच जाणतात, इतर कोणतीही द्रव्य जाणत नाहीत. अशाप्रकारे जीवांना सोडून बाकीची द्रव्य ज्ञेयच आहेत.

जीवद्रव्य ज्ञेय सुद्धा आहे व ज्ञानही आहे. असा ज्ञान व ज्ञेय यांचा विभाग आहे.

स्वभावत:च प्रगट अनंत ज्ञानशक्ती ज्यांचा हेतु आहे आणि तिन्ही काळामध्ये अवस्थायीपणा ज्यांचे लक्षण आहे – अशा जीव द्रव्यांचा सहज स्वभाव असल्याने सर्वदा अविनाशी जीवत्व असून देखील संसार अवस्थेमध्ये अनादी प्रगटरूपाने वर्तमान पुद्गलाच्या संश्लेषाद्वारे स्वत: दूषित असल्याकारणाने चार प्राणांचा संयोग असल्याने व्यवहार जीवत्व आहे आणि ते विभक्त करण्याजोगे आहे.''

या गाथेचा भाव स्पष्ट करताना आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये तत्त्वप्रदीपिकेचेच अनुकरण केले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी प्रवचनसार परमागमामध्ये या गाथेचा भाव दोन छंदांच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(मनहरण कवित्त)

सहित प्रदेश सर्व दर्व जामें पूरि रहे,
ऐसो जो आकाश सो तो अनादि अनंत है।
नित्त नूतन निराबाध अकृत अमिट,
अनरच्छित सुभाव सिद्ध सर्व गतिवंत है॥
तिस षटदर्व जुत लोक को जो जानत है,
सोई जीव दर्व जानो चेतनामहंत है।
वही चार प्रानजुत जगत में राजै वृन्द,
अनादि संबंध पुद्गल को धरंत है॥२॥

अनादी-अनंत आकाश द्रव्यात आपापल्या प्रदेशांसह सर्व द्रव्य सामावलेली आहेत. ती सर्व द्रव्य नित्य असूनही नवी आहेत, निराबाध

आहेत, अकृत आहेत, अमिट आहेत, अनरक्षित आहेत, स्वभावाने सिद्ध व परिणमनशील आहेत. अशाप्रकारे षट्द्रव्यसमूहरूप लोकाला जे जाणते, ते चेतनायुक्त जीवद्रव्य आहे. ते अनादी काळापासूनच पुद्गलाशी संबंधित असल्याने चार प्राणांनी संयुक्त शोभायमान होत आहे.

(दोहा)

पंच दरव सब ज्ञेय हैं, ज्ञाता आतमराम।
सो अनादि चहु प्रान जुत, जग में कियो मुकाम॥३॥

जीव सोडून बाकीची पाच द्रव्य तर ज्ञेय आहेत व आत्मा ज्ञाता आहे – असा हा ज्ञाता जीव अनादी काळापासूनच चार प्राणांनी संयुक्त होऊन संसारात भटकत आहे.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(कवित्त)

लै नभ दरव काल ताईं सब नहीं निज प्रदेशनि सौं दूर।
तीनि लोक महि आदि अंत विनु भरे सघन करिकैं भरिपूर॥
जो तिन्हि षट पदारथनि कौ है ग्याइक जीव सहित निज नूर।
चारि प्रान इंद्री बल आयु स्वासु आप तसु रहै हजूर॥९७॥

अनंतप्रदेशी आकाशापासून एकप्रदेशी काळापर्यंत सर्व पदार्थ आपल्या प्रदेशात राहतात, कधी त्यांच्यापासून दूर होत नाहीत. तिन्ही लोकात अनादी-अनंत स्वभावावाले सर्व पदार्थ सघनपणे व्याप्त आहेत. त्या सहा प्रकारच्या सर्व पदार्थांना जाणणारा हा ज्ञायक जीव पदार्थ आपल्या तेजाने परिपूर्ण आहे व संसारात इंद्रिय, बल, आयु व श्वासोच्छवास – या चार प्राणांनी हाजिर हजूर आहे, सदा उपस्थित राहणारा भगवान आत्मा आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"स्वत:च्या अचिंत्य अशा स्व-पराला जाणण्याच्या शक्तीरूप संपदेद्वारे जीवच जाणतो – यामध्ये महासिद्धांत आहे. स्वत: द्रव्य गुण-पर्यायस्वरूप आहे आणि परपदार्थ परद्रव्य-गुण-पर्यायस्वरूप आहेत –

असे जीव जाणतो. जगामध्ये रुपया-पैसा वगैरे पुद्गल आहेत, त्यांना जाणण्याची शक्ती जीवात आहे; परंतु ते रुपये जीवाचे आहे – असे जाणण्याचा जीवाचा स्वभाव नाही.

येथे जाणण्याचा स्वभाव सांगितला आहे. जीव निमित्तामुळे परपदार्थांच्या उपस्थितीमुळे, मनामुळे, इंद्रियामुळे अथवा आपल्या रागामुळे जाणतो – असे म्हटले नाही; परंतु आपल्या अचिंत्य महान ऋद्धीमुळे स्व-परप्रकाशक शक्तीने जाणतो.[१]

अशाप्रकारे अनंत ज्ञान शक्तीला निश्चय जीवत्वाचा हेतु म्हटलेले आहे व चार प्राणसंयुक्तपणाला व्यवहार जीवत्वाचा हेतु म्हटले आहे.[२]

अशाप्रकारे निश्चय जीवत्व व व्यवहार जीवत्व हे दोन्ही स्वज्ञेय आहेत. त्यांचे यथार्थ ज्ञान करणे ज्ञानाच्या निर्मलतेचे कारण आहे.[३]''

वरील कथनाचे तात्पर्य हे आहे की या जगात सर्व द्रव्य सप्रदेशी व ज्ञेय आहेत, परंतु जीवद्रव्य ज्ञेयाबरोबर ज्ञानही आहेत, जाणण्यात येण्याबरोबर ते जाणतात सुद्धा.

जरी सर्व जीव निश्चयाने ज्ञानस्वभावीच आहेत, तरीही संसारदशेत व्यवहाराने अनादी काळापासून शरीरादी म्हणजेच कमीत कमी चार प्राणांच्या संयोगाने देखील राहतात, म्हणून शरीर वगैरेपासून भगवान आत्मा वेगळा आहे – हे जाणणे अत्यंत आवश्यक आहे. ●

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ९०-९१ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ९२
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ९३

पर्यायींची परिवर्तनशीलता वस्तूचा पर्यायगत स्वभाव असल्याने आत्मार्थ्याकरिता हितकरच आहे, कारण जर पर्यायी परिवर्तनशील नसत्या तर संसारपर्यायीचा अभाव होऊन मोक्षपर्याय प्रगट होण्याचा अवकाशच राहिला नसता. अनंत सुखरूप मोक्षअवस्था सर्व संयोगांच्या अभावरूपच होते. जर संयोग अस्थायी न राहता स्थायी असते तर मग मोक्ष कसा झाला असता ? त्यामुळे संयोगांची विनाशिकता देखील आत्म्याला हितकर आहे.

– बारह भावना : एक अनुशीलन, पृष्ठ : २८

प्रवचनसार गाथा १४६-१४७

मागील गाथेत सांगितले होते की चार प्राण व्यवहार जीवत्वाचे हेतु आहेत आणि निश्चय जीव त्या चार प्राणरूप शरीरापासून भिन्न आहे.

आता सांगत आहेत की प्राण किती आहेत ? कोण-कोणते आहेत व या प्राणांमुळे जीव जगतो, तरीही प्राण पुद्गलापासून निष्पन्न झाले आहेत.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

इंदियपाणो य तधा बलपाणो तह य आउपाणो य।
आणप्पाणप्पाणो जीवाणं होंति पाणा ते।।१४६।।
पाणेहिं चदुहिं जीवदि जीविस्सदि जो हि जीविदो पुव्वं।
सो जीवो पाणा पुण पोग्गलदव्वेहिं णिव्वत्ता।।१४७।।

(हरिगीत)

इन्द्रिय बल अर आयु श्वासोच्छ्वास ये ही जीव के।
हैं प्राण इनसे लोक में सब जीव जीवे भव भ्रमें।।१४६।।
जीव जीवे जियेगा एवं अभीतक जिया है।
इन चार प्राणों से परन्तु प्राण ये पुद्गलमयी।।१४७।।

इंद्रिय, बल, आयु व श्वासोश्वास – हे जीवाचे चार प्राण आहेत. जरी त्या चार प्राणांनी जो जगतो, जगेल व भूतकाळात जगत होता, तो जीव आहे; तरीही हे प्राण तर पुद्गलद्रव्यापासून निष्पन्न झालेले आहेत.

वरील गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"स्पर्शन, रसना, घ्राण, चक्षु व कर्ण – हे पाच इंद्रिय प्राण आहेत. काय, वचन व मन हे तीन बळ प्राण आहेत. भवधारण करण्याचे निमित्त आयुप्राण आहे आणि खाली-वर जाणे ज्याचे स्वरूप आहे – असा वायु हा श्वासोश्वासप्राण आहे.

आता व्युत्पत्तिने प्राणांना जीवत्वाचा हेतुपणा आणि त्यांचा पौद्गलिकपणा सांगतात.

प्राणसामान्याने जगतो, जगेल व अगोदर जगत होता तो जीव आहे. जरी अनादी संतानरूपाने प्रवर्तमान असल्याने संसारावस्थेमध्ये त्रिकाळ स्थायी असल्याने प्राणसामान्य जीवाच्या जीवत्वाचा हेतु आहे; तरी देखील तो प्राणसामान्य जीवाचा स्वभाव नाही, कारण तो पुद्गलद्रव्यापासून बनला आहे.''

जरी आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये या गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिकेप्रमाणेच स्पष्ट केला आहे, तरी देखील त्यांच्या टीकेमध्ये वरील दोन गाथांच्या मध्ये एक गाथा येते ती तत्त्वप्रदीपिकेमध्ये नाही. ती खालीलप्रमाणे आहे –

पंच वि इंदियपाणा मणवचिकाया य तिण्णि बलप्राणा।
आणप्पाणप्पाणो आउगपाणेण होंति दस प्राणा।।१२।।

(हरिगीत)

पाँच इन्द्रिय प्राण मन-वच-काय त्रय बल प्राण हैं।
आयु श्वासोच्छ्वास जिनवर कहे ये दश प्राण हैं।।१२।।

पाच इंद्रिय प्राण; मन, वचन व काय – हे तीन बल प्राण; श्वासोश्वास व आयुरूप प्राण – असे दहा प्राण असतात.

वरील गाथेच्या टीकेमध्ये सुद्धा गाथेचे शब्द पुन्हा सांगितले आहेत व शेवटी हे लिहिले आहे की निश्चयाने हे दहा प्राण ज्ञानानंदस्वभावी भगवान आत्म्याहून भिन्न आहेत.

या गाथेमध्ये जे प्राणांचे भेद व उपभेद सांगितले आहेत ते तत्त्वप्रदीपिकेमध्ये त्यांच्या गाथांच्या टीकेमध्ये दिलेले आहेत.

वरील गाथांचा भाव कविवर वृंदावनदासजींनी तीन छंदामधून सांगून गाथा व टीकेमध्ये आलेल्या विषयाची फक्त पुनरावृत्ती केली आहे.

अशाचप्रकारे पंडित देवीदासजींनी देखील दोन पद्यांमध्ये वरील विषयवस्तूला सोप्या भाषेत सादर केले आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथांच्या भावाला पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे –

"इंद्रिय प्राण, बल प्राण, आयु प्राण आणि श्वासोश्वास प्राण – हे जीवाचे चार प्राण आहेत.

संक्षेपाने चार प्राण व विस्ताराने पाच इंद्रिय, मन, वचन, काया, श्वास व आयु – हे दहा जडप्राण आहेत.

संसारदशेमध्ये अनादी काळापासून अज्ञानी जीव शरीर, इंद्रिय वगैरे जडप्राणांना आपले मानून, त्यातून सुख प्राप्त करू इच्छितो. त्यामुळे याचा संसार चालूच आहे आणि विकारापोटी जडकर्म बांधली जातात, तसेच जडकर्मांच्या फळस्वरूपी नोकर्मरूपी दहा प्राणांचा जीवाशी एकक्षेत्रावगाह संबंध होत आहे.

एखादा अज्ञानी जीव असे मानतो की संसार दशेमध्ये दहा प्राणांचा संबंध व्यवहाराने सुद्धा असत नाही, तर ही त्याची चूक आहे; परंतु व्यवहाराने दहा प्राण असून देखील ते जीवाचे वास्तविक स्वरूप नाही.

अशाप्रकारे येथे दहा प्राणांची दृष्टी सोडविण्यासाठी आणि चैतन्यप्राणाची दृष्टी करविण्यासाठी व्यवहार प्राणांचे ज्ञान करवित आहेत.[१]

इंद्रिय सबळ असणे अथवा दुर्बळ असणे ही आत्म्याच्या अधिकारातील बाब नाही. तसेच सबळ इंद्रिय धर्माचे कारण अथवा दुर्बळ इंद्रिय अधर्माचे कारण नाहीत.

आत्मा हा इंद्रियरहित ज्ञाता-दृष्टा साक्षीस्वरूप आहे – तोच फक्त धर्माचे कारण आहे.[२]

अशाप्रकारे इंद्रिय, बल, आयु व श्वासोश्वास – हे चार प्राण जीवाचे व्यवहारदशेमध्ये असतात. यांचे १० भेद असतात. अज्ञानी जीव अन्नाला अकरावा व पैशाला बारावा प्राण आहे – असे मानतो. हे तर स्थूल अज्ञान आहे. रे बांधवा ! हे प्राण नाहीत, हे तर प्रत्यक्ष भिन्न पुद्गल पदार्थ आहेत.

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ९४-९५ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ९५

व्यवहाराने संसारदशेत जीवाला एकक्षेत्ररूप दहा प्राण असतात; परंतु ते जड आहेत. त्यांच्यामुळे आत्म्याला लाभ वा नुकसान होत नाही. त्यांच्यावरून दृष्टी हटवून अनादी-अनंत चैतन्यप्राणाचे लक्ष करणेच या गाथेचा सार आहे.[१]''

अशाप्रकारे या गाथेमध्ये फक्त एवढेच सांगितले गेले आहे की प्राण चार प्रकारचे असतात, जे एकूण दहा असतात. इंद्रिय प्राणाचे पाच भेद, बलप्राणाचे तीन भेद आणि आयु व श्वासोश्वास प्राण प्रत्येकी एक, अशातऱ्हेने दहा प्राण आहेत. या प्राणांमुळे जो जगतो, तो व्यवहारजीव आहे; परंतु हे प्राण तर पुद्गलाचे आहेत, जड आहेत; म्हणून भगवान आत्म्याहून भिन्नच आहेत.

यामुळेच ज्ञान-दर्शन चेतनेला धारण करणाऱ्यालाच निश्चय जीव असे म्हटले जाते. ●

१. दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ९८

जरी बारा भावनांचे चिंतन ज्ञानी-अज्ञानी सर्वांकरिता समानपणे हितकारी आहे, तरी यांचे सम्यक स्वरूप न जाणू शकल्यामुळे अज्ञानी जीवांना लाभ होण्याऐवजी हानीच अधिक होते. पूर्वी शरीरादी संयोगांना चांगले मानून त्यांच्याबद्दल अनंत अनुराग करीत होते; परंतु जेव्हा बारा भावनांमध्ये निरूपित शरीरादी संयोगांची अनित्यता, अशरणता, असारता, अशुचिता इत्यादी दोषांना जाणतात, तेव्हा त्यांच्याशी द्वेष करू लागतात. बारा भावनांच्या चिंतनाचे वास्तविक फळ तर वीतरागता आहे, त्या वीतरागतेची प्राप्ती होत नाही.

– बारह भावना : एक अनुशीलन, पृष्ठ-१८

प्रवचनसार गाथा १४८-१४९

मागील गाथांमध्ये हे सांगितले होते की संसारी जीवांचे चार प्राण असतात, त्यांद्वारे तो जगतो, जगला व जगेल; तरी देखील हे प्राण तर पौद्गलिकच आहेत.

आता या गाथांमध्ये ह्या प्राणांना पौद्गलिक सिद्ध करताना हे सांगितले की ते पौद्गलिक प्राण पौद्गलिक कर्मांच्या बंधाचे हेतु आहेत.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

जीवो पाणणिबद्धो बद्धो मोहादिएहिं कम्मेहिं।
उवभुंजं कम्मफलं बज्झदि अण्णेहिं कम्मेहिं॥१४८॥
पाणाबाधं जीवो मोहपदेसेहिं कुणदि जीवाणं।
जदि सो हवदि हि बंधो णाणावरणादि कम्मेहिं॥१४९॥

(हरिगीत)

मोहादि कर्मों से बंधा यह जीव प्राणों को धरे।
अर कर्मफल को भोगता अर कर्म का बंधन करे॥१४८॥
मोह एवं द्वेष से जो स्व-पर को बाधा करे।
पूर्वोक्त ज्ञानावरण आदि कर्म वह बंधन करे॥१४९॥

मोहादी कर्मांनी बांधलेला असल्याने जीव प्राणांनी युक्त होऊन कर्मफळ भोगतो व इतर कर्मांनी बांधला जातो.

जर जीव मोह व द्वेषांनी स्व-पर जीवांच्या प्राणांना बाधा पोहचवित असतील तर पूर्वी सांगितलेल्या ज्ञानावरणादी कर्मांनी बांधले जातात.

आचार्य अमृतचंद्रांनी या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''मोहादिक पौद्गलिक कर्मांनी बांधलेला असल्याने जीव प्राणसंयुक्त असतो व प्राणांनी संयुक्त असल्याने पौद्गलिक कर्मफळांना भोगत असता पौद्गलिक कर्मांनी बांधला जातो; म्हणून पौद्गलिक कर्माचे कार्य व कारण असल्याने प्राण हे निश्चितच पौद्गलिकच आहेत.

आता सांगत आहेत की प्राण पौद्गलिक कर्मांचे कारण कसे आहेत?

प्राणांनी कर्मफळ भोगणारा जीव मोह व द्वेष करतो आणि मोहाने व द्वेषाने स्वजीवाला आणि परजीवांच्या प्राणांना बाधा करतो.

परंतु परप्राणांना बाधा करो वा न करो; उपरक्तपणे आपल्या भावप्राणांना बाधा करणारा असा हा जीव ज्ञानावरणादी कर्म तर नक्कीच बांधतो. अशाप्रकारे प्राण पौद्गलिक कर्मांच्या कारणपणाला प्राप्त होतात.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये तसे तर तत्त्वप्रदीपिकेचेच अनुकरण केले आहे; परंतु शेवटी उक्त तथ्याचा निष्कर्ष काढताना त्याला खालीलप्रमाणे तथ्यासह व उदाहरणासह प्रस्तुत केले आहे –

''ज्याप्रमाणे तापलेल्या गोळ्याने दुसऱ्याला मारु इच्छिणारी व्यक्ती सर्वप्रथम स्वत:लाच जाळेल, दुसरा जळो किंवा न जळो.

अशाच प्रकारे मोहादीमुळे परिणत झालेला अज्ञानी जीव प्रथम विकाररहित स्व-संवदेन ज्ञानस्वरूप अशा स्वत:च्या शुद्ध प्राणांचा घात करतो व तदनंतर इतरांच्या प्राणांचा घात होवो वा न होवो.''

कविवर वृंदावनदासजींनी या दोन्ही गाथांचा भाव १ मनहरण, १ द्रुमिल व ४ दोहे अशा एकूण सहा छंदांच्या माध्यमातून प्रस्तुत केला आहे. नमुन्यादाखल चार दोहे प्रस्तुत आहेत –

(दोहा)

कारन के सादृश जगत, कारज होत प्रमान।
तातैं पुद्गल करम करि, पुद्गल बँधत निदान॥८॥
मोहादिक करि आपनो, करत अमलगुन घात।
ता पीछे परप्रान को, करत मूढ़ विनिपात॥१०॥
परप्राननि को घात तौ, होहु तथा मति होहु।
पै निज ज्ञान-प्रान तिन, निहचै घाते सोहु॥११॥
तब ज्ञानावरनादि तहँ, बँधैं करम दिढ़ आय।
प्रकृतिप्रदेशनुभागथिति, जथाजोग समुदाय॥१२॥

जगामध्ये कार्य कारणानुसारच होते; म्हणून पुद्गल कर्माद्वारे पुद्गलकर्म बांधली जातात. मूढ जीव प्रथम मोहादींद्वारे स्वत:च्या निर्मल

गुणांचा घात करतात व नंतर परप्राणांचा घात करतात. परप्राणांचा घात होवो अथवा न होवो, आपल्या ज्ञानप्राणाचा घात तर निश्चितरूपाने होतोच होतो. अशा परिस्थितीमध्ये ज्ञानावरणादी कर्म प्रकृती, प्रदेश, स्थिती आणि अनुभाग या रूपाने यथायोग्य बांधलेच जातात.

स्वामीजींनी या गाथेतील भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''जीव मोहादी भाव करतो, म्हणून मोहनीयादी आठ पुद्गल कर्मांनी बांधला जातो. येथे मोहनीय मुख्यत्वेकरून सांगितले आहे, ज्ञानावरणादी गौण आहेत. जीवाच्या अज्ञान दशेमध्ये कर्म निमित्त आहेत. त्या कर्म-फळामध्ये पाच इंद्रिय, तीन बळ, शासोश्वास व आयु प्राणांची प्राप्ती होते.[१]

अशातऱ्हेने चारही प्राण पुद्गलकर्मामुळे प्राप्त होतात, आत्म्याच्या स्वभावामुळे नव्हे.[२] अशाप्रकारे प्राणप्राप्तीचे कारण पुद्गल कर्म आहे आणि नवीन कर्मबंधनाचे कारण प्राण आहेत, म्हणून प्राण पौद्गलिक आहेत – असे सिद्ध होते.[३] वास्तविक पाहता आपल्या चैतन्यप्राणाची हिंसा म्हणजेच भावहिंसा नवीन कर्माच्या बंधाचे कारण आहे. द्रव्यप्राण नवीन कर्मबंधाचे खरे कारण नाही; परंतु जीव द्रव्यप्राणाने लाभ-हानी होते असे मानून राग-द्वेष करतो व नवीन कर्मबंध करतो – याचा उपचार करून द्रव्यप्राणाला नवीन कर्मबंधाचे कारण आहे – असे म्हटले आहे. अशातऱ्हेने प्राण नवीन कर्मबंधनाचे कारण आहे.[४]''

अशाप्रकारे या गाथांमधून व टीकेमधून हेच सांगितले आहे की मोहादी पौद्गलिक कर्मांनी बांधला असल्याने जीव प्राणसंयुक्त होतो व कर्मफळाला भोगून पुनश्च नवीन कर्मांनी बांधला जातो.

अशाप्रकारे प्राण जुन्या पौद्गलिक कर्माच्या उदयाचे कार्य आहे व नव्या पुद्गल कर्माच्या बंधाचे कारण आहे. अशाप्रकारे प्राण पूर्णपणे पौद्गलिकच आहेत.

●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १०२
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १०३
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १०४
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १०८

प्रवचनसार गाथा १५०-१५१

'प्राण पौद्‌गलिक कर्मांचे कारण देखील आहे आणि कार्य देखील आहे.' मागील गाथांमधून हे स्पष्ट केल्यानंतर आता या गाथांमध्ये हे स्पष्ट करीत आहेत की पौद्‌गलिक प्राणांच्या संततीच्या प्रवृत्तीचा आणि निवृत्तीचा अंतरंग हेतु काय आहे ? मूळ गाथा खालीलप्रमाणे आहेत –

आदा कम्ममलिमसो धरेदि पाणे पुणो पुणो अण्णे।
ण चयदि जाव ममत्तिं देहपधाणेसु विसयेसु॥१५०॥
जो इंदियादिविजई भवीय उवओगमप्पगं झादि।
कम्मेहिं सो ण रज्जदि किह तं पाणा अणुचरंति॥१५१॥

(हरिगीत)

ममता न छोड़े देह विषयक जबतलक यह आतमा।
कर्ममल से मलिन हो पुन-पुनः प्राणों को धरे॥१५०॥
उपयोगमय निज आतमा का ध्यान जो धारण करे।
इन्द्रियजयी वह विरतकर्मा प्राण क्यों धारण करे॥१५१॥

जोपर्यंत हा कर्मफळाने मलीन झालेला आत्मा देहप्रधान विषयांचे ममत्व सोडत नाही, तोपर्यंत वारंवार इतर अनेक वेगवेगळ्या प्राणांना धारण करतो.

जो आत्मा इंद्रिय वगैरेंवर विजय मिळवून उपयोगमयी आत्म्याचे ध्यान करतो; तो कर्मांद्वारे रंजित होत नाही; अशा आत्म्याचा प्राणांशी संबंध कसा होऊ शकेल ?

आचार्य अमृतचंद्रांनी या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''पौद्‌गलिक प्राणांच्या संतानरूप प्रवृत्तीचा अंतरंग हेतु शरीरादीमध्ये ममत्वरूप उपरक्तपणाच आहे आणि त्या उपरक्तपणाचे मूळ अनादी पौद्‌गलिक कर्म आहे. पौद्‌गलिक प्राणांच्या संततीच्या निवृत्तीचा अंतरंग हेतु पौद्‌गलिक कर्माच्या उदयाने होणाऱ्या उपरक्तपणाचा अभावच आहे व अनेक वर्णवाल्या आश्रयानुसार (फूला-डागानुसार) सर्व परिणतिने

व्यावृत्त झालेल्या स्फटिक मण्याप्रमाणे जो आत्मा अत्यंत विशुद्ध उपयोगमय एका आत्म्यामध्ये अगदी निश्चलपणे राहतो, त्याला त्या उपरक्तपणाचा अभाव होतो.

तात्पर्य हे आहे की आत्म्याचा अत्यंत विभक्तपणा सिद्ध करण्याकरिता व्यवहार जीवत्वाचे हेतुभूत पौद्गलिक प्राण उच्छेद करण्यायोग्य आहेत.''

आचार्य जयसेनांनी देखील तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये तत्त्वप्रदीपिके-प्रमाणेच या गाथांचा भाव स्पष्ट केला आहे. निष्कर्ष सांगताना शेवटी त्यांनी लिहिले आहे की यावरून हे नक्की झाले की शरीरादीमध्ये ममत्वच इंद्रियादी प्राणांच्या उत्पत्तीचे अंतरंग कारण आहे व कषाय आणि इंद्रिय यांच्यावर जय प्राप्त करणेच इंद्रियादी प्राणांच्या अभावाचे कारण आहे.

या गाथांचा भाव वृंदावनदासजींनी २ मत्तगयंद सवैया, १ माधवी व २ दोहे – अशा एकूण पाच छंदांद्वारे प्रस्तुत केला आहे. त्यापैकी २ दोहे आणि १ मत्तगयंद पुढीलप्रमाणे आहेत –

(दोहा)

जावत ममता भाव है, देहादिक के माहिं।
तावत चार सुपान धरि, जगतमांहि भरमांहि॥१४॥
तातैं ममताभाव को, करो सरवथा त्याग।
निज समतारसरंग में, वृन्दावन अनुराग॥१५॥

जोपर्यंत देहादीकामध्ये ममताभाव आहे, तोपर्यंत चार प्राणांना धारण करून जगामध्ये परिभ्रमण होते. त्यामुळे ममताभावाचा सर्वथा त्याग करा आणि समतारसरूपी रंगामध्ये निरंतर अनुराग करा.

(मत्तगयन्द)

जो भवि इन्द्रिय आदि विजै करि, ध्यावत शुद्धपयोग अभंगा।
कर्मनि सों तजि राग रहै, निरलेप जथा जल कंज प्रसंगा॥
झांक-विहीन जथा फटिकप्रभ, त्यों उर जोत की वृन्द तरंगा।
क्यों मल प्रान बँधै वह तो, नित न्हात विशुद्ध सुभाविक गंगा॥१६॥

जे भव्य जीव इंद्रियादी प्राणांवर विजय प्राप्त करून अखंडरूपे शुद्धोपयोगाचे ध्यान करतात व सर्व प्रकारच्या कर्मांमध्ये रागाला त्यागून

पाण्यातील कमळाप्रमाणे निर्लिप्त राहतात. ज्यांच्या हृदयज्योतीची तरंग डागरहित स्फटिकासमान निर्मळ आहे; ते तर विशुद्ध स्वभाव-गंगेत निरंतर स्नान करतात. ते प्राणरूपी मलाने बांधलेले कसे राहू शकतात ?

पंडित देवीदासजींनी या गाथांचा भाव १ कवित्त आणि १ सवैया इकतीसा, अशा दोन छंदाच्या माध्यमातून प्रस्तुत केला आहे, त्यापैकी कवित्त पुढीलप्रमाणे आहे –

(कवित्त)

चेतन यहु सु अनादि काल तैं कर्म मेल तिहि कर सु मलीन।
तावत काल प्रान ये फिरि फिरि और और पुनि धरै नवीन॥
संसारी सु भोग-विषयादिक तिन्हि के विषैं सरीर प्रवीन।
जिनि सौं सदा ममत्व बुद्धि अति छोड़ै नहीं महा मति हीन॥१०२॥

हा चेतन अनादी काळापासून कर्मरूपी मळाने मलीन होत आहे व जोपर्यंत मलीन राहील, तोपर्यंत वारंवार नवीन प्राणांना धारण करीत राहील. हा संसारी जीव शरीरादी विषयभोगांमध्ये प्रवीण आहे आणि हा मतिहीन संसारी जीव शरीर व विषयभोगांची ममत्वबुद्धी सोडत नाही.

पुढील पद्यात म्हटले आहे की जेव्हा हा जीव शरीरामध्ये ममत्वबुद्धी आणि विषयभोगांमध्ये सुखबुद्धी सोडून देतो, तेव्हा नवीन शरीर धारण करीत नाही.

या गाथांचा भाव स्वामीजींनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''अज्ञानी जीव चैतन्य स्वभावाच्या भानाशिवाय शरीर किंवा स्त्री-पुत्रादीकांवर ममता करतो व देव-शास्त्र-गुरुंमुळे अथवा दया, दानादींच्या भावामुळे मला धर्मप्राप्ती होईल – असे मानून त्यांच्यावर देखील ममता करतो. जोपर्यंत हा जीव ममतारूपी विकारी परिणमनाचा पूर्ण त्याग करीत नाही, तोपर्यंत विकाराच्या निमित्ताने वारंवार आठ कर्मांचे बंधन होतच राहते आणि यामुळे पुन: पुन्हा द्रव्यप्राणांचा संबंध देखील होतो.[१]

या गाथांमध्ये उपयोगमात्र आत्मा ध्यान करण्यायोग्य आहे – असे म्हटले आहे. येथे उपयोगमात्र वर खास जोर दिला आहे. आत्मा पाच

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ११०

इंद्रिय व प्राणरूप तर नाहीच; परंतु संकल्प, विकल्प, दया, दानस्वरूपही नाही. तो तर जाणणे-पाहणेरूप सहज स्वभाववाला आहे. उपयोगमात्र आत्म्याचे ध्यान केले तर कर्म शरीर व प्राण जीवाला चिकटत नाहीत.[१]

अशाप्रकारे अत्यंत विशुद्ध उपयोगाची आत्म्यामध्ये लीनताच प्राणांच्या परंपरेच्या निवृत्तीचे अंतरंग कारण आहे. १५० व्या गाथेमध्ये म्हटले आहे की देहप्रधान दृष्टी प्राणांच्या परंपरेचे कारण आहे. १५१ व्या गाथेमध्ये म्हटले आहे की ज्ञानस्वभावप्रधानदृष्टी हीच प्राणांच्या अभावाचे कारण आहे अर्थात ती संसाराच्या नाशाचा उपाय आहे.

तात्पर्य हे की ज्या जीवाला आत्मा भिन्नपणे साधावयाचा आहे किंवा सिद्धदशा प्रगट करावयाची आहे, त्याने व्यवहार जीवत्वाच्या हेतुभूत प्राणांचा नाश केला पाहिजे. पाच इंद्रिय, शरीर, मन, वाणी सर्व जड आहेत, ते आत्मस्वरूप नाहीत; आत्मा ज्ञानस्वभावी आहे, त्याची प्रतीती करून एकाग्रता करणेच पूर्णपदाच्या प्राप्तीचा उपाय आहे. तिन्ही काळी परमार्थाचा हाच एकमेव पंथ आहे व या उपायानेच जीव प्राणरहित होतात.[२]

यथार्थ ज्ञानाशिवाय सम्यक्त्व होत नाही, सम्यक्त्वाशिवाय चारित्र होत नाही, चारित्राशिवाय केवलज्ञान होत नाही व केवलज्ञानाशिवाय सिद्धदशा प्राप्त होत नाही. म्हणून सर्वज्ञ भगवंतांनी जसे जाणले आहे व सांगितले आहे, तसे जाणा. प्राणांहून भिन्न होण्याचा हाच एक उपाय आहे, इतर कोणताही उपाय नाही.[३]''

अशाप्रकारे या गाथांमध्ये हेच सांगितले की जोपर्यंत हा आत्मा शारीरिक विषयातील ममत्व सोडत नाही, त्यांना आपले मानणे व त्यांच्याशी राग-द्वेष करणे सोडत नाही, तोपर्यंत कर्मबंध होणारच व कर्मोदयाने वारंवार वेगवेगळ्या गतीत शारीरिक प्राण धारण करावे लागणार. परंतु जो ज्ञानानंदस्वभावी निज आत्म्यालाच आपला जाणतो-मानतो, त्यातच आपलेपण स्थापित करतो, त्याचेच ध्यान करतो, विषयात रंजित होत नाही, त्याला प्राणांचा संयोग होत नाही म्हणजेच तो मुक्त होतो. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ११३
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ११६
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ११७

प्रवचनसार गाथा १५२-१५३

मागील गाथांमध्ये सांगितले होते की इंद्रिय वगैरे प्राणरूप शरीरादी संयोगांचे अंतरंग कारण त्यांच्याबद्दल एकत्व-ममत्व आहे. आता ह्या गाथांमधून व्यवहार जीवत्वापासून आत्म्याची अत्यंत विभक्तता (भिन्नता) दाखविण्याकरिता देव-मनुष्यादी गतिरूप पर्यायांचे स्वरूप व भेद सांगत आहेत. मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

अत्थित्तणिच्छिदस्स हि अत्थस्सत्थंतरम्हि संभूदो।
अत्थो पज्जाओ सो संठाणादिप्पभेदेहिं॥१५२॥
णरणारयतिरियसुरा संठाणादीहिं अण्णहा जादा।
पज्जाया जीवाणं उदयादिहिं णामकम्मस्स॥१५३॥

(हरिगीत)

अस्तित्व निश्चित अर्थ की अन्य अर्थ के संयोग से।
जो अर्थ वह पर्याय जो संस्थान आदिक भेदमय॥१५२॥
तिर्यंच मानव देव नारक नाम नामक कर्म के।
उदय से पर्याय होवें अन्य-अन्य प्रकार की॥१५३॥

अस्तित्वाने निश्चित अर्था(द्रव्या)चे अन्य अर्था(द्रव्या)मध्ये उत्पन्न होणारा जो अर्थ (भाव) आहे, ती पर्याय आहे व ती संस्थानादी भेदांसहित असते.

मनुष्य, नारक, तिर्यंच व देव – ह्या नामकर्माच्या उदयादिकामुळे होणाऱ्या जीवाच्या पर्याय आहेत, ह्या संस्थानांद्वारे वेगवेगळ्या प्रकारच्या असतात.

या गाथांमधील भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''स्वलक्षणभूत स्वरूप-अस्तित्वाने निश्चित एका अर्था(द्रव्या)च्या स्वलक्षणभूत स्वरूप-अस्तित्वानेच निश्चित दुसऱ्या अर्थात विशिष्टरूपे उत्पन्न होणारा जो अर्थ (भाव) आहे, तो अनेक द्रव्यात्मक पर्याय आहे.

जशी एका पुद्‌गलाची अन्य पुद्‌गलाबरोबर मिसळल्याने अनेक-द्रव्यात्मक समानजातीय द्रव्यपर्याय आढळून येते; त्याप्रमाणे जीवाची पुद्‌गलामध्ये संस्थानादीकांनी विशिष्ट उत्पन्न झालेली अनेकद्रव्यात्मक असमानजातीय द्रव्यपर्याय सुद्धा अवश्य अनुभवाला येते.

अशी पर्याय असणे अशक्य नाही, उलट न्याययुक्तच आहे; कारण जी फक्त जीवाची व्यतिरेकमात्र आहे, अशी अस्खलित एक द्रव्यपर्याय अनेक द्रव्यांच्या संयोगात्मकरूपाने अंतरंगात अवभासित होते. नारक, तिर्यंच, मनुष्य व देव – ह्या जीवांच्या पर्याय आहेत. त्या नामकर्मरूप पुद्‌गलाच्या विपाकामुळे अनेक द्रव्याच्या संयोगात्मक आहेत, म्हणून जसे गवताचा अग्नी व विस्तवाचा अग्नी यांच्या पर्याय ठिणग्या व तुकडे वगैरे आकाराने वेगवेगळ्या प्रकाराने असतात; तसेच जीवाच्या नारकादी पर्याय संस्थानादीकाद्वारे वेगवेगळ्या प्रकारच्या असतात.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये या गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिकेनुसारच स्पष्ट केला आहे.

या गाथांचा भाव कविवर वृंदावनदासजींनी २ मनहरण व १ मत्तगयंद अशातऱ्हेने एकूण तीन छंदांच्या माध्यमातून प्रस्तुत केला आहे; छंद पुढीलप्रमाणे आहेत –

(मनहरण कवित्त)

संसार अवस्था माहिं जीवनि के निश्चैकरि,
पुग्गलविपाकी नामकर्म उदै आये तैं।
नर नारकौर तिरजंच देवगति विषैं,
जथाजोग देह बनै परजाय पाये तैं॥
संसथान संहनन आदि बहु भेद जाके,
पुग्गलदरवकरि रचित बताये तैं।
जैसें एक आगि है अनेक रूप ईंधन तैं,
नानाकार तैसे तहाँ चेतन सुभाये तैं॥१८॥

निश्चयाने जीवांच्या संसार अवस्थांमध्ये पुद्‌गलविपाकी नामकर्माच्या उदयाने नर, नारक, तिर्यंच व देवगतितील पर्यायानुसार

यथायोग्य देहाचा संयोग होतो. ह्या देहामध्ये पुद्गल द्रव्याने रचित असे संस्थान, संहनन वगैरे अनेक भेद असतात.

ज्याप्रमाणे एका प्रकारचा अग्नी अनेक प्रकारच्या इंधनांच्या संयोगाने अनेक प्रकारे दिसून येतो; त्याप्रमाणे चेतन सुद्धा निश्चयाने एक प्रकारचा असून देखील व्यवहाराने अनेक प्रकारचा दिसून येतो.

(मत्तगयन्द)

जे भवि भेदविज्ञान धरैं, सब दर्वनि को जुत भेद सुजानै।
जे अपनो सद्भाव धरैं, निज भाव विषैं थिर हैं परधानै॥
द्रव्य गुनौ परजायमई, तिनको धुव वै उतपाद पिछानै।
सो परदर्व विषैं कबहूँ नहिं, मोहित होत सुबुद्धिनिधानै॥१९॥

भेदज्ञानाचे धारक जे जीव सर्व द्रव्यांना भेदसहित जाणतात, आपल्या अस्तित्वाला धारण केलेले आहेत आणि मुख्यत: निजभावामध्ये स्थिर आहेत; जे द्रव्य, गुण व पर्यायमयी आहेत व त्यांच्या उत्पाद, व्यय व ध्रुवतेला ओळखतात; ते सुबुद्धीचे निधान असलेले परद्रव्यांमध्ये कधीही मोहित होत नाहीत.

(मनहरण कवित्त)

जानै काललब्ध पाय दर्शमोह को खिपाय,
उपशमवाय वा सुश्रद्धा यों लहाही है।
मेरो चिदानंद को दरव गुन परजाय,
उतपाद वय धुव सदा मेरे पाहीं है॥
और परदर्व सर्व निज निज सत्ता ही में,
कोऊ दर्व काहू को सुभाव न गहाही है।
तातैं जो प्रगट यह देह खेह-खान दीसै,
सो तो मेरा रूप कहूँ नाहीं नाहीं नाहीं है॥२०॥

ज्या जीवाने काललब्धी प्राप्त करून दर्शनमोहाचा क्षय केला, उपशम -भाव व सुश्रद्धा प्राप्त केली, तो विचार करतो की माझ्या चिदानंद आत्म्याचे द्रव्य-गुण-पर्याय व उत्पाद-व्यय-ध्रौव्य सदैव माझ्याजवळच राहतात.

अशाप्रकारे सर्व परद्रव्य देखील आपापल्या सत्तेमध्ये राहतात.

कोणतेही द्रव्य इतर द्रव्याचा स्वभाव ग्रहण करीत नाही, म्हणून उघडपणे मळाची खाण असलेला हा देह, मजरूप कधीही होऊ शकत नाही, होऊ शकत नाही; होऊ शकत नाही.

पंडित देवीदासजींनी या गाथांचा भाव ४ दोह्यांच्या माध्यमातून सादर केला आहे, त्यापैकी २ दोहे पुढीलप्रमाणे आहेत –

(दोहा)

सहजरूप आतम दसा आदि अंत इक सूत।
अपनै निज अस्तित्वकरि रहित चतुर्गति तूत।।१०५।।
नर नारकादिक हैं सु जे गति चार दुखदाय।
कही जिनागम के विषैं यह विभाव परजाय।।१०७।।

आत्म्याची दशा तर सुरूवातीपासून शेवटपर्यंत सहजपणे एका सूत्रामध्ये अनुभूत राहते आणि चारही गतींच्या फळाहून असंपृक्त राहते.

स्वामीजींनी या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"ज्याप्रमाणे एक पुद्गल परमाणू दुसऱ्या परमाणुशी मिळून अनेक द्रव्यात्मक पर्याय धारण करतो. चपाती, वरण, भात यांच्या परमाणुमुळे शरीर अनेकद्रव्यात्मक अवस्था धारण केलेले आढळते. तसेच अनेक पुद्गल परमाणू पुस्तकरूप, घररूप अनेकद्रव्यात्मक अवस्था धारण केलेले प्रत्यक्ष आढळून येतात; त्याप्रमाणे आत्मा अनेकद्रव्यात्मक पर्यायरूपाने संसारदशेत उत्पन्न होत असलेला आढळून येतो; एकेंद्रिय असेल तर एकेंद्रियाच्या आकाररूपाने, मनुष्य असेल तर मनुष्य आकाररूपाने वगैरे अनेकद्रव्यात्मक अवस्था धारण केलेला आढळून येतो.[१]

आत्म्याची व्यंजनपर्याय व पुद्गलाची व्यंजनपर्याय वेगवेगळी आहे. एका द्रव्याच्या पर्यायाचा दुसऱ्या द्रव्याच्या पर्यायात अत्यंताभाव आहे. जसे भांड्यात ठेवलेल्या पाण्याचा आकार भांड्यासमान असूनही पाणी भांडेरूप झालेले नाही. पाणी व भांडे वेगवेगळेच आहेत. जळणाऱ्या

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ११९

लाकडाचा अग्नी लाकडाच्या आकाररूप दिसत असून सुद्धा लाकडाहून वेगळाच आहे. लाकूड व अग्नी हे जर एकच असतील तर अग्नी विझला असता लाकडाचा नाश झाला असता; परंतु असे होत नाही, म्हणून लाकूड व अग्नी एक नाहीत, वेगवेगळे आहेत.

त्याप्रमाणे चैतन्यस्वरूप आत्मा स्वत:मुळे क्षेत्रांतर गमन करतो व शरीर येथेच पडून राहते. जर शरीर व आत्मा एक असतील तर आत्म्याबरोबर शरीर सुद्धा जावयास हवे; परंतु शरीर तर येथेच पडून राहते – असे प्रत्यक्ष दिसून येते. जर दोन्ही एक असतील तर कधीही भिन्न होता कामा नये. भिन्नच आहेत म्हणून तर ते भिन्न होतात.[१]''

अशाप्रकारे ह्या गाथांमध्ये हेच सांगितले आहे की कमीत कमी चार व जास्तीत जास्त दहा प्राणांनी संयुक्त जीवांच्या असमानजातीय नर-नारकादी पर्याय वेगवेगळ्या आकारात असतात. ज्या गतिमध्ये जीव जातो, त्या गतियोग्य त्याचा आकार होतो. मनुष्यगतिचा जीव मनुष्याकार असतोच; परंतु मनुष्य देहाचे तर दिवसातून अनेक आकार बनतात व त्याबरोबर जीव सुद्धा त्याच आकाराने परिणमित होत असतो.

अशा असमानजातीय मनुष्य पर्यायीमध्ये आत्मा वेगळा आहे आणि शरीर वेगळे आहे; परंतु ते एकक्षेत्रावगाह आहेत, त्यांची सत्ता वेगवेगळी आहे, त्यांचे आकार देखील वेगवेगळे आहेत. तात्पर्य हे आहे की शरीर आणि आत्मा वेगवेगळे आहेत – असे भेदविज्ञान ज्ञानींना निरंतर विद्यमान असते. जर आपणास आपले कल्याण करावयाचे असेल तर असे भेदविज्ञान निरंतर कायम ठेवावयास हवे.●

१. दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ-१२५

अज्ञानजन्य व्याकुळता दूर करण्यासोबतच राग-द्वेषजन्य व्याकुळता दूर करण्याकरिता सुद्धा संयोग आणि पर्यायींच्या अस्थिरतेचे-क्षणभंगुरतेचे चिंतन निरंतर करणे आवश्यक आहे. यामुळेच अनित्यादी भावनांचे चिंतन ज्ञानी-अज्ञानी, संयमी-असंयमी सर्वांना उपयोगी आहे, आवश्यक आहे, सुखकर आहे, शांतिदायक आहे, परम अमृत आहे.

– बारा भावना : एक अनुशीलन, पृष्ठ : २४

प्रवचनसार गाथा १५४

आता ह्या गाथेमध्ये आत्म्याचा इतर द्रव्यांबरोबर संयुक्तपणा असूनही अर्थ-निश्चायक स्वरूपास्तित्वाला ते स्व-पर विभागाच्या हेतुरूप आहे, हे समजावित आहेत. मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

तं सब्भावणिबद्धं दव्वसहावं तिहा समक्खादं।
जाणदि जो सवियप्पं ण मुहदि सो अण्णदवियम्हि॥१५४॥

(हरिगीत)

त्रिधा निज अस्तित्व को जाने जो द्रव्यस्वभाव से।
वह हो न मोहित जान लो अन-अन्य द्रव्यों में कभी॥१५४॥

जे जीव वरील अस्तित्व निष्पन्न, तीन प्रकाराने कथित, सविकल्प भेद असणाऱ्या द्रव्यस्वभावाला जाणतात, ते अन्य द्रव्याच्या मोहामध्ये पडत नाहीत.

ह्या गाथांचा भाव अमृतचंद्राचार्यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे– "द्रव्याला निश्चित करणारे स्वलक्षणभूत स्वरूपास्तित्व वास्तविक द्रव्याचा स्वभाव आहे, कारण द्रव्याचा स्वभाव अस्तित्वानेच बनला आहे. द्रव्य-गुण-पर्याय व उत्पाद-व्यय-ध्रौव्यरूपाने त्रयात्मक भेदभूमिकेत आरूढ असलेला द्रव्यस्वभाव ज्ञात होत असताना परद्रव्याबद्दलचा मोह दूर करून स्व-पराच्या विभागाचा हेतु असतो, म्हणून स्वरूपास्तित्वच स्व-परविभागाच्या सिद्धीकरिता वेळोवेळी लक्षात घेतले पाहिजे.

आता हीच बाब विशेष स्पष्ट करतात. चेतनतत्त्वाचे अन्वयरूप द्रव्य, चेतना विशेषत्वरूप गुण व चेतनतत्वाची व्यतिरेकरूप पर्याय – असे त्रयात्मक तसेच पूर्व आणि उत्तर व्यतिरेकाला स्पर्श करणारे चेतनरूप ध्रौव्य व चेतनचे उत्तर तसेच पूर्व व्यतिरेकरूप उत्पाद व व्यय अशा त्रयात्मक स्वरूपास्तित्ववाला मी वेगळा आहे व अचेतनत्वाचे अन्वयरूप द्रव्य, अचेतनाचे विशेषत्वरूप गुण व अचेतनत्वाची व्यतिरेक पर्याय – असे

त्रयात्मकत्व तसेच पूर्ण व उत्तर व्यतिरेकाला स्पर्श करणारे अचेतनत्वरूप ध्रौव्य व अचेतनत्वाचे उत्तर तसेच पूर्व यांचे व्यतिरेकरूप उत्पाद व व्यय – असे त्रयात्मक स्वरूपास्तित्व स्वभावी अन्य अचेतन पदार्थ अन्य आहे, म्हणून मला मोह नाही, स्व-पराचा विभाग आहे.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये आचार्य अमृतचंद्रकृत तत्त्वप्रदीपिकेचेच अनुकरण केले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेला एकाच छंदामध्ये अत्यंत मार्मिक पद्धतीने सांगितले आहे. मूळ छंद खालीलप्रमाणे आहे –

(द्रुमिला)

उपयोगसरूप चिदातम सो, उपयोग दुधा छबि छाजत है।
नित जानन देखन भेद लिये, सो शुभाशुभ होय विराजत है॥
तिनही करि कर्मप्रबंध बँधै, इमि श्री जिनकी धुनि गाजत है।
जब आपमें आपुहि राजत है, तब श्यौपुर नौबत बाजत है॥२१॥

उपयोगस्वभावी आत्म्याचा उपयोग दोन प्रकारे सांगितला आहे. एक ज्ञानोपयोग व दुसरा दर्शनोपयोग. या उपयोगाचे शुभोपयोग व अशुभोपयोग – असे भेद देखील केले जातात. या शुभाशुभ उपयोगामुळे कर्म बांधली जातात. अशा प्रकारची गर्जना अरहंत भगवंतांच्या दिव्यध्वनीमध्ये होते. अशाप्रकारे जेव्हा ही बाब आपल्या अंतरंगात येते, सुशोभित होते, तेव्हा मुक्तीपुरीची नौबत वाजते, मुक्तीपुरीचे नगारे वाजतात.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे सादर केला आहे –

(सवैया इकतीसा)

कह्यौ जैसौ पूरव ही दरव कौ स्वरूपा सु
असतित्त्व ताहि लियैं लछिन सु जानैं हैं।
जीव निरजीव जे पदारथ उभै प्रकार
भेदग्यान दिष्टि सौं जुदे जुदे सु भानैं हैं॥
उतपत्य नास ध्रौव्य द्रव्य गुन परजाय
ये ही तीनि भावनि समेत सदा मानैं हैं।

सोई भेदग्यानी विषैं दरव अचेतनि के
हिये समदिष्टि सौं न मोह भाव आनैं हैं ॥१०९॥

जो भेदज्ञानी जीव पूर्वी सांगितलेल्या द्रव्याच्या स्वरूपास्तित्वाच्या आधारे जीव व अजीव – दोन्ही प्रकारच्या द्रव्यांच्या भेदज्ञानाच्या दृष्टीने भिन्न-भिन्न लक्षणांना जाणतो आणि वरील द्रव्यांना उत्पाद-व्यय-ध्रौव्य आणि द्रव्य-गुण-पर्याय – या भावांसहित सदा मानतो, ते भेदज्ञानी जीव अजीव द्रव्यांमध्ये समदृष्टी ठेवतात, त्यांच्यात भेदभाव करीत नाहीत.

स्वामीजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"प्रत्येक द्रव्याचे स्वलक्षणभूत स्वरूप-अस्तित्व प्रत्येक द्रव्याला निश्चित करते. आत्म्याचे स्वरूप-अस्तित्व आत्म्याला निश्चित करते व जड द्रव्याचे स्वरूप अस्तित्व जडद्रव्याला निश्चित करते.[१]

जीवांच्या स्वरूप-अस्तित्वाने प्रत्येक ज्ञेयाला वेगवेगळे जाणून यथार्थ निर्णय केला पाहिजे. आत्मा नेहमीच स्वतःच्या द्रव्य-गुण पर्यायामध्ये राहतो, तो शरीराच्या द्रव्य-गुण-पर्यायांना कधीच स्पर्श करीत नाही. छद्मस्थ जीव प्रदेश वगैरेंना भले प्रत्यक्ष जाणू शकत नाही; परंतु परोक्षज्ञानपूर्वक केवली भगवंतांप्रमाणे प्रतीती तर अवश्य करू शकतो. आत्मा प्रतिक्षण शरीर वगैरे पदार्थांहून वेगळा आहे – असे भेदज्ञान करवितात; म्हणून स्व-पराच्या विभागाच्या परिपूर्णतेकरिता पर्याया-पर्यायामध्ये स्वरूप-अस्तित्वाला लक्षात ठेवले पाहिजे.[२]

प्रत्येक आत्मा आणि परमाणू भिन्न-भिन्न पदार्थ आहेत. कोणी कोणाचा कर्ता नाही. आत्मा फक्त ज्ञाता-दृष्टास्वरूप पदार्थ आहे. प्रत्येक पदार्थाला त्याच्या स्वरूप-अस्तित्वाद्वारे भिन्न जाणल्याने स्व-पराचे भेदविज्ञान होते. स्वरूप-अस्तित्ववाला स्वभाव द्रव्य-गुण-पर्यायपणे तसेच ध्रौव्य-उत्पाद-व्ययपणे असा तीन स्वरूप आहे.[३]

पहा, धर्मी जीव अन्यत्व भावनेचे चिंतवन करतो. तो मानतो की

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १२९ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १३०
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १३०-१३१

माझे द्रव्य-गुण-पर्याय तसेच उत्पाद-व्यय-ध्रौव्य माझ्यामुळे आहेत व माझ्यात आहेत आणि जडाचे द्रव्य-गुण-पर्याय तसेच उत्पाद-व्यय-ध्रौव्य जडामुळे आहेत व जडामध्ये आहेत. मी चेतन आहे, जडामुळे माझी अवस्था होत नाही व माझ्यामुळे जडाची अवस्था होत नाही.

पैसा, घर, दुकान, देव-शास्त्र-गुरु, शरीर व कर्माहून मी वेगळा आहे. त्यांचे द्रव्य-गुण-पर्याय त्यांच्यात आहेत. माझा व त्यांचा काहीही संबंध नाही. शुभाशुभ भाव माझ्या चेतन पर्यायात नाहीत. सर्वांना जाणणारी माझी चेतन पर्याय आहे, त्याद्वारे मी सर्वांना फक्त जाणतो. मी शरीर, कर्म, विकाराहून भिन्न ज्ञानस्वभावी चेतन द्रव्य आहे. 'मी सर्वांहून वेगळा आहे' – धर्मी जीव अशा भावनेचे चिंतवन करतो.

अनंत ज्ञानी सांगतात की स्वरूप-अस्तित्वाने भेदज्ञान करणे – हा धर्म आहे. ज्ञानी स्वत:मध्ये येऊन भेदविज्ञानपूर्वक भावनांचे चिंतवन करतो. मी अनुकूल-प्रतिकूल संयोगरूप नाही, शरीरादीरूप नाही. जे अल्प राग-द्वेष होतात, तो देखील मी नाही. मी तर देहरूपी देवळामध्ये चैतन्य-ज्ञानस्वरूप विराजमान आहे – अशी जाणीव पात्र जीव करतो. अगोदर अशी जाणीव असेल तर नंतर स्थिरता होते, तदनंतर मुनिपणा अंगीकार करून वीतरागी अवस्था प्राप्त करतो.

अशाप्रकारे स्वरूप-अस्तित्व स्वभाववाल्या चेतनद्रव्याला स्वज्ञेय-रूप व परज्ञेयाला परज्ञेयरूप जाणणेच सम्यग्ज्ञान आहे व हाच धर्म आहे.[१]''

या गाथेमध्ये आणि तिच्या टीकेमध्ये ही बाब अत्यंत स्पष्टपणे सांगितली होती की प्रत्येक वस्तू आपल्या स्वरूपास्तित्वप्रमाणच आहे. प्रत्येक वस्तुमध्ये आढळणारे द्रव्य-गुण-पर्याय तसेच उत्पाद-व्यय-ध्रौव्य हेच त्याचे स्वरूपास्तित्व आहे.

मनुष्यादी असमानजातीय द्रव्यपर्यायात जीवाचे स्वरूपास्तित्व वेगळे आहे व देहादीचे स्वरूपास्तित्व वेगळे आहे. असे जाणणेच भेदविज्ञान आहे व असे भेदविज्ञान निरंतर करण्याजोगे आहे. कारण अनादी काळापासून देहामध्ये जी एकत्वबुद्धी आहे, ती याशिवाय समाप्त होणार नाही. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १३४

प्रवचनसार गाथा १५५-१५६

'चार प्राणरूप शरीर वेगळे व मी वेगळा आहे' – मागील गाथेत हे स्पष्ट केल्यावर आता ह्या गाथांमधून हे सांगत आहेत की उक्त शरीराच्या समागमाचे मूळ कारण काय आहे ? मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

अप्पा उवओगप्पा उवओगो णाणदंसणं भणिदो।
सो वि सुहो असुहो वा उवओगो अप्पगो हवदि॥१५५॥
उवओगो जदि हि सुहो पुण्णं जीवस्स संचयं जादि।
असुहो वा तध पावं तेसिमभावे ण चयमत्थि॥१५६॥

(हरिगीत)

आतमा उपयोगमय उपयोग दर्शन-ज्ञान हैं।
अर शुभ-अशुभ के भेद भी तो कहे हैं उपयोग के॥१५५॥
उपयोग हो शुभ पुण्यसंचय अशुभ हो तो पाप का।
शुभ-अशुभ दोनों ही न हों तो कर्म का बंधन न हो॥१५६॥

आत्मा उपयोगात्मक आहे व ज्ञान-दर्शनाला उपयोग म्हणतात. आत्म्याचा हा उपयोग शुभ व अशुभ अशा भेदाने दोन प्रकारचा आहे. उपयोग जर शुभ असेल तर पुण्याचा संचय होतो व अशुभ असेल तर पापाचा संचय होतो. तसेच या दोहोंच्या अभावी कर्मांचा संचय होत नाही.

वरील गाथांचा भाव अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''परद्रव्याच्या संयोगाचे वास्तविक कारण उपयोग विशेष आहे. चैतन्यानुविधायी परिणाम असल्याने उपयोग आत्म्याचा स्वभाव आहे व तो ज्ञान-दर्शनरूप आहे; कारण तो साकार व निराकार असा उभयरूप आहे.

तो उपयोग शुद्धोपयोग व अशुद्धोपयोग असा दोन प्रकारचा असतो. त्यांच्यामध्ये शुद्धापेयोग निरूपराग (निर्विकार) आहे व अशुद्धोपयोग सोपराग (सविकार) आहे. शुभ व अशुभ यांच्या भेदामुळे अशुद्धोपयोग देखील दोन प्रकारचा आहे, कारण तो विशुद्धरूप व संक्लेशरूप असतो.

परद्रव्यांच्या संयोगाचे कारण अशुद्धोपयोग आहे. तो अशुद्धोपयोग विशुद्ध अणि संक्लेशरूप उपरागामुळे शुभ व अशुभ अशा द्विविधपणाला प्राप्त होऊन पुण्य-पापाच्या बंधाचे कारण असतो.

पुण्यामुळे अनुकूल व पापामुळे प्रतिकूल संयोग प्राप्त होतात. जेव्हा दोन्ही प्रकारच्या अशुद्धोपयोगाचा अभाव होतो, तेव्हा उपयोग शुद्धच असतो व तो शुद्धोपयोग परद्रव्याच्या संयोगाचे अकारणच आहे.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये ह्या गाथांचा अर्थ सामान्यपणे असाच स्पष्ट केला आहे.

कविवर वृंदावनदासजींनी ह्या दोन गाथांचा भाव एका छंदामध्ये खालीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मनहरण कवित्त)

जब इस आतमा के पूजा दान शील तप,
संजम क्रियादिरूप शुभ उपयोग है।
तब शुभ आयु नाम गोत पुन्यवर्गना को,
कर्मपिंड बँधै यह सहज नियोग है॥
अथवा मिथ्यात विषैं अव्रत कषायरूप,
अशुभोपयोग भये पाप को संजोग है।
दोऊ के अभाव तैं विशुद्ध उपयोग वृन्द,
तहां बंध खंड के अखंड सुख भोग है॥२२॥

जेव्हा या जीवाला पूजा, दान, शील, भक्ती, तप व संयम वगैरे क्रियारूप शुभोपयोग होतो; तेव्हा त्याला शुभ आयु, शुभ नाम, उच्च गोत्र व साता वेदनीय पुण्य वर्गणांचा कर्मपिंड बांधला जातो – असा सहज नियोग आहे.

अथवा मिथ्यात्व दशेत अव्रत व कषायरूप अशुभोपयोग असल्याने पापाचा संयोग होतो. शुभ व अशुभ – ह्या दोहोंच्या अभावाने उपयोग शुद्ध होतो. अशा वेळेस बंधाचा अभाव होऊन अखंड सुखाची प्राप्ती होते.

पंडित देवीदासजींनी या गाथांचा भाव १ अडिल्ल व १ सवैया इकतीसा-मध्ये प्रस्तुत केला आहे, त्यापैकी सवैया इकतीसा पुढीलप्रमाणे आहे –

(सवैया इकतीसा)

दान पूजा वरत विधान आदि क्रिया सुभ
चेतना विकार सो असुद्ध परिणाम है।
जाकौ फल पुन्य साता कौ करनहार
तन पिंड जीव एक ठौर बंध धाम है।।
मिथ्या भाव विषय कषाय आदि तैं सही सु
असुभोपयोग सौं आतमा कौ धमाम है।
सुभासुभ भाव गऐं सुद्ध उपयोग भऐं
'वीतराग सुद्ध' एक आतमा ही राम है।।१११।।

दान, पूजा, व्रत-विधान इत्यादी शुभक्रिया चेतनेचा विकार आहे, त्यामुळे अशुद्ध परिणाम आहे व त्याचे फळ पुण्यबंध आहे, तो पुण्यबंध अलौकिक सुख-साता करणारा आहे व शरीर व जीवाचा एका ठिकाणीच आवास आहे. मिथ्याभावांनी विषय-कषायादीमध्ये प्रवृत्तीरूप अशुभोपयोग असाताचे कारण आहे. शुभाशुभभाव निघून गेल्यावर व शुद्धोपयोग झाल्यावर आत्माराम केवळ वीतराग शुद्धभावरूपच आहे.

ह्या गाथांचा भाव स्वामीजींनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"उपयोग आत्म्याचा स्वभाव आहे, चैतन्याचे अनुसरण करणारा असा परिणाम आहे. हा परिणाम शरीर, इंद्रिय व मन यांचे अनुसरण करीत नाही; तर चैतन्याचे अनुसरण करतो – असे म्हटले आहे. ही बाब लक्षात ठेवण्यासारखी आहे. उपयोग दोन प्रकारचा आहे –

ज्ञान उपयोग – साकारपणाचे नाव ज्ञानोपयोग आहे. आकारसहितचा अर्थ असा नाही की जडाचा आकार ज्ञानामध्ये येतो; तर हा आहे की ज्ञान भेद-प्रभेदासहित प्रत्येक वस्तुला वेगवेगळे जाणते.

दर्शन उपयोग – निराकारपणाचे नाव दर्शनोपयोग आहे. हा जीव आहे का अजीव आहे किंवा हे द्रव्य आहे – असा कोणताही भेद केल्याशिवाय सामान्य अवलोकनरूप उपयोगाला दर्शनोपयोग म्हणतात.

आता चारित्राच्या मुख्यतेने उपयोगाचे भेद सांगतात. उपयोग ज्ञान

व दर्शन गुणाची पर्याय आहे, चारित्रगुणाची पर्याय नाही; परंतु आचरणाला मुख्य करून उपयोगाचे भेद सांगतात.

१) शुद्धोपयोग – आत्मा ज्ञानरूप आहे, शरीरादी जड आहेत, पुण्य-पाप आत्म्याचे स्वरूप नाही – अशी प्रतीती व ज्ञानासह शुद्ध स्वभावात होणाऱ्या रमणतेलाच शुद्धोपयोग म्हणतात व तोच धर्म आहे.

२) अशुद्धोपयोग – आत्मा ज्ञानस्वरूप आहे – असे न जाणता परपदार्थांकडे स्वत:चे परिणाम विकारसहित होणे, यालाच अशुद्धोपयोग म्हणतात.

तो अशुद्धोपयोग दोन प्रकारचा आहे – १) शुभोपयोग व २) अशुभोपयोग.

शुभोपयोग – स्वत:च्या शुद्ध स्वभावाकडे उपयोग न लावता जीव दया-दानादी मंद कषायरूप परिणामांमध्ये संलग्न होतो, तो शुभोपयोग आहे आणि ते पुण्यरूपी अधर्माचे कारण आहे.

अशुभोपयोग – स्वत:च्या शुद्ध स्वभावाकडे उपयोग न लावता तीव्र कषायरूप परिणामांत संलग्न होणे हाच अशुभोपयोग आहे व तो पापरूपी अधर्माचे कारण आहे.[१]''

वरील गाथा आणि त्यांच्या टीकेमध्ये अत्यंत थोडक्यात हे सांगितले आहे की ज्ञान-दर्शनाला उपयोग म्हणतात आणि तो उपयोग आत्म्याचे स्वरूप आहे. जर चारित्राच्या अपेक्षेने विचार केला तर उपयोग शुद्धोपयोग व अशुद्धोपयोग या भेदांनी दोन प्रकारचा आहे.

अशुद्धोपयोग देखील दोन प्रकारचा असतो – शुभोपयोग आणि अशुभोपयोग. शुभोपयोगाने पुण्यबंध होतो व अशुभोपयोगाने पापबंध होतो – अशाप्रकारे अशुद्धोपयोग बंधाचे कारण आहे आणि शुद्धोपयोग बंधाच्या अभावाचे कारण आहे, मोक्षाचे कारण आहे. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १४३

प्रवचनसार गाथा १५७-१५८

मागील गाथांमधून उपयोगाचे भेद सांगून त्यांच्या स्वरूपाला स्पष्ट करून आता आगामी गाथांद्वारे शुभ आणि अशुभ उपयोगाचे स्वरूप स्पष्ट करतात. मूळ गाथा खालीलप्रमाणे आहेत –

जो जाणदि जिणिंदे पेच्छदि सिद्धे तहेव अणगारे।
जीवेसु साणुकंपो उवओगो सो सुहो तस्स॥१५७॥
विसयकसाओगाढो दुस्सुदिदुच्चित्तदुट्टगोट्ठिजुदो।
उग्गो उम्मग्गपरो उवओगो जस्स सो असुहो॥१५८॥

(हरिगीत)

श्रद्धान सिध-अणगार का अर जानना जिनदेव को।
जीवकरुणा पालना बस यही है उपयोग शुभ॥१५७॥
अशुभ है उपयोग वह जो रहे नित उन्मार्ग में।
श्रवण-चिंतन-संगति विपरीत विषय-कषाय में॥१५८॥

जो जिनेंद्राला जाणतो, सिद्ध व अनगारांची श्रद्धा करतो, तसेच जीवांप्रती दयाभाव ठेवतो, त्याचा तो उपयोग शुभ म्हटला जातो. ज्याचा उपयोग विषय-कषायामध्ये मग्न आहे; कुश्रुत, कुविचार व कुसंगतिमध्ये संलग्न, उग्र व उन्मार्गी लागलेला आहे, त्याचा तो उपयोग अशुभोपयोग आहे.

वरील गाथांचा भाव अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"विशेष प्रकारच्या क्षयोपशमदशेत राहणाऱ्या दर्शनमोहनीय व चारित्र-मोहनीयरूप पुद्गलांनुसार परिणतीत संलग्न असल्याने, शुभ उपरागाला ग्रहण केले असल्याने जो उपयोग परमभट्टारक महादेवाधिदेव अरहंत परमेश्वर, सिद्ध भगवान व साधुंची श्रद्धा करण्यात तसेच सर्व जीवसमूहाच्या अनुकंपेच्या आचरणात प्रवृत्त आहे, तो शुभोपयोग आहे.

विशिष्ट उदय दशेमध्ये राहणाऱ्या दर्शनमोहनीय व चारित्र-मोहनीयरूप पुद्गलानुसार परिणतीमध्ये लागला असल्याने, अशुभ उपरागाला ग्रहण केले असल्याने जो उपयोग परमभट्टारक महादेवाधिदेव परमेश्वर अरहंत-सिद्ध व साधुंव्यतिरिक्त इतर उन्मार्गाची श्रद्धा करण्यात तसेच विषय-कषाय, कुश्रवण, कुविचार, कुसंग व उग्रतेचे आचरण करण्यात प्रवृत्त आहे, तो अशुभोपयोग आहे.''

तसे पाहिले तर आचार्य जयसेनांनी ह्या गाथांचा अर्थ अमृतचंद्रांच्या तत्त्वप्रदीपिकेनुसारच स्पष्ट केला आहे, तरीही शेवटी त्यांनी दुःश्रुति, दुश्चित्त व दुष्ट गोष्टी यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे –

''शुद्धात्मतत्त्वाची प्रतिपादक श्रुति, जिनवाणी, आगम सुश्रुति आहे व याविपरीत दुःश्रुति आहे किंवा मिथ्या शास्त्ररूप श्रुति दुःश्रुति आहे.

चिंतारहित होऊन आत्म्यामध्ये लीन असलेले मन सुचित्त आहे व त्या आत्मलीनतेचा विनाश करणारे मन दुश्चित्त आहे किंवा स्व आणि पर यांच्यासाठी इच्छिलेली काम-भोगांच्या चिंतारूप परिणत रागादी अपध्यान दुःश्चित्त आहे. परमचैतन्य परिणतिला नष्ट करणारी संगती दुष्ट गोष्टी आहे अथवा परमचैतन्य परिणतीचे विरोधी कुशील पुरुष वगैरेंची संगती दुष्ट गोष्टी आहे.''

कविवर वृंदावनदासजींनी ह्या दोन गाथांचा भाव दोन छंदांमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(मत्तगयन्द)

जो जन श्री जिनदेव को जानत, प्रीति सों वृन्द तहाँ लव लावैं।
सिद्धनि को निज ज्ञान तैं देखि कै, ध्यापक होय के ध्यान में ध्यावै॥
औ अनगार गुरूनि में भक्ति, दया सब जीवनि माहिं दिढ़ावै।
ताकहँ श्रीगुरुदेव बखानत, सो शुभरूपपयोग कहावै॥२३॥

जे लोक जिनेंद्र भगवंतांना जाणतात व प्रेमाने त्यांच्यात चित्त लावतात, सिद्धांचे ध्यान करतात व दिगंबर साधुंची भक्ती करतात, तसेच सर्व प्राण्यां-बद्दल दयाभाव ठेवतात, ते शुभोपयोगी आहेत – असे श्रीगुरु म्हणतात.

(मनहरण कवित्त)

इंद्रिनि के विषैं और क्रोधादि कषायनि में,
जाको परिनाम अवगाढ़ागाढ़ रुखिया।
मिथ्याशास्त्र सुनै सदा चित्त में कुभाव गुनै,
दुष्ट संग रंग को उमंग रस चुखिया॥
जीवनि के घातवे को जतन करत नित,
कुमारग चलिवे में उग्रमुख मुखिया।
ऐसो उपयोग सोई अशुभ कहावत है,
जाके उर बसै वह कैसे होय सुखिया॥२४॥

इंद्रियांच्या विषयांमध्ये व क्रोधादी कषायांमध्ये ज्याचे परिणाम खोलवर रुजलेले असतात, ते मिथ्या शास्त्रांना ऐकतात व मनात सदैव वाईट परिणामांचेच चिंतन करतात, दुष्टांच्या संगतीत उत्साहाने वावरतात, जीवांचा घात करण्यात सदा संलग्न असतात, कुमार्गक्रमण करण्यात प्रमुख बनून उत्साहित होतात.

त्यांचा अशा प्रकारचा उपयोग अशुभोपयोग आहे. ज्यांच्या हृदयात हा अशुभोपयोग असतो, तो सुखी कसा होऊ शकतो ?

या गाथांचा भाव स्पष्ट करताना पंडित देवीदासजींनी अशाच प्रकारे अत्यंत सोप्या भाषेत शुभोपयोग व अशुभोपयोगाचे स्वरूप स्पष्ट केले आहे, ते मुळातून पठनीय आहे.

या गाथांचा भाव आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"जेव्हा जीव स्वत:च्या स्वभावात स्थिर होऊ शकत नाही, तेव्हा सम्यक्त्व मोहनीय प्रकृती व चारित्रमोहनीय प्रकृतीचे निमित्त प्राप्त करून क्षयोपशम सम्यग्दृष्टी जीवाचा उपयोग पंचपरमेष्ठींकडे वळणारा बनतो.[१]

जो भाव पंचपरमेष्ठींची श्रद्धा करण्यामध्ये तसेच सर्व जीवांप्रती अनुकंपेमध्ये प्रवर्तन करतो, तो भाव शुभभाव आहे, असे म्हटले जाते.[२]

अशाप्रकारे ज्ञानी जीवाला होणारा शुभ उपयोग पुण्य बंधाचे कारण आहे.[३]

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १४९
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १४९
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १५०

अज्ञानी जीव सर्वज्ञ, देवाधिदेव अरहंत, सिद्ध तसेच मुनींची श्रद्धा करीत नाही व सर्वज्ञांच्या विरुद्ध असणाऱ्यांची श्रद्धा करतो. जो जीव पुण्याने धर्म होतो – असे मानतो, निमित्ताने लाभ होतो – असे मानतो, तो जैन नाही, त्याला पंचपरमेष्ठींची श्रद्धा नाही, तो तर भगवंतांचा विरोध करीत आहे. अज्ञानी जीव विषय-कषाय, कुश्रवण, कुविचार, कुसंग व उग्रतेचे आचरण करीत प्रवर्तमान होतो, तो अशुभोपयोग आहे.[१]''

शुभोपयोग आणि अशुभोपयोग यांचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या वरील गाथांमधून अत्यंत थोडक्यात असे सांगितले आहे की जो व्यक्ती पंचपरमेष्ठींचे स्वरूप जाणून त्यांच्यावर श्रद्धा ठेवतो, त्यांची भक्ती करतो, त्यांचे गुणगान करतो व जीवांप्रती करुणाभाव ठेवतो; त्याचा तो भाव शुभभाव म्हटला जातो व तो शुभभाव पुण्यबंधाचे कारण आहे.

ज्याचा उपयोग विषय-कषायामध्ये मग्न आहे, जो उग्र स्वभावी आहे, उन्मार्गामध्ये लागलेला आहे आणि कुविचार व कुसंगतिमध्ये अडकलेला आहे, तो अशुभोपयोग आहे व तो पापबंध करीत आहे.

जी व्यक्ती या दोन्ही प्रकारच्या अशुद्धोपयोगाने विरक्त राहून आपल्या आत्म्याचे ध्यान करतो, असा तो शुद्धोपयोगी कर्मांचा नाश करतो. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १५१

आचार्य भगवंतांचा केवळ हाच आदेश आहे, हाच उपदेश आहे, हाच संदेश, आज्ञा आहे की संपूर्ण जगावरून दृष्टी काढून केवळ आपल्या आत्म्याची साधना करा, आराधना करा; त्यालाच जाणा, ओळखा; त्यामध्येच मग्न व्हा, त्यामध्येच लीन व्हा, त्यामध्येच सामावून जा, यामुळेच अतींद्रिय आनंदाची प्राप्ती होईल, परम सुखी होण्याचा केवळ हाच उपाय आहे.

पराला सोडण्याकरिता, परापासून सुटण्याकरिता याहून वेगळे असे काहीही करण्याची आवश्यकता नाही, कारण परद्रव्य तर सुटलेलेच आहेत. ते कधी तुझे झालेच नाहीत, तूच त्यांना अज्ञानाने आपले मानलेले होते, आपले जाणलेले होते आणि त्यांच्याशी राग करून व्यर्थच दु:खी होत होता. जर तू स्वत:मध्ये मग्न झाला तर ते सुटलेलेच आहेत. **– बारा भावना : एक अनुशीलन, पृष्ठ : ७०-७१**

प्रवचनसार गाथा १५९

मागील गाथांमधून शुद्धोपयोग व अशुद्धोपयोग यांचे भेद व प्रभेद व त्यांचे फळ सांगून आता या गाथेत परद्रव्याच्या संयोगांच्या कारणांच्या विनाशाचा अभ्यास करवित आहेत. मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

असुहोवओगरहिदो सुहोवजुत्तो ण अण्णदवियम्हि।
होज्जं मज्झत्थोऽहं णाणप्पगमप्पगं झाए॥१५९॥

(हरिगीत)

आतमा ज्ञानात्मक अनद्रव्य में मध्यस्थ हो।
ध्यावे सदा ना रहे वह नित शुभ-अशुभ उपयोग में॥१५९॥

इतर द्रव्यामध्ये मध्यस्थ होऊन मी अशुभोपयोगाने रहित होऊन व शुभोपयोगामध्ये उपयुक्त न होता ज्ञानात्मक आत्म्याचे ध्यान करतो.

ध्यानात ठेवण्यायोग्य बाब ही आहे की या गाथेमध्ये अशुभोपयोगापासून निवृत्ती करण्याची आणि शुभोपयोगामध्ये प्रवृत्ती न करण्याबद्दल सांगितले आहे. दोहोंच्या हेयपणात थोडे-फार अंतर ठेवले आहे.तात्पर्य हे आहे की अशुभोपयोगाला तर बुद्धीपूर्वक सोडावे लागते, परंतु शुभोपयोग सहजच सुटतो; कारण शुद्धोपयोगात गेले असता शुभोपयोग रहातच नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की अशुभापासून निवृत्ती व शुभामध्ये अप्रवृत्ती – या कथनात काही विशेष भाव (तथ्य) भरलेला आहे. त्याला जाणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

या गाथेचा भाव अमृतचंद्राचार्यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''परद्रव्याच्या संयोगांच्या कारणरूप सांगितलेला अशुद्धोपयोग वास्तविक मंद-तीव्र उदयदशेमध्ये राहणाऱ्या परद्रव्यानुसार होणाऱ्या परिणतीच्या आधीन असल्याने प्रवर्तित होतो, इतर कारणाने नव्हे. म्हणून मी सर्व परद्रव्यांमध्ये मध्यस्थ असतो.

अशाप्रकारे मध्यस्थ झालेला मी परद्रव्यानुसार होणाऱ्या परिणतीच्या आधीन नसल्याने शुभाशुभरूप अशुद्धोपयोगापासून मुक्त होऊन फक्त स्वद्रव्यानुसार होणाऱ्या परिणतीला ग्रहण केल्याने शुद्धोपयोगी होऊन उपयोगरूप निजस्वरूप आत्म्यात सदैव निश्चलपणे उपयुक्त राहतो. हा माझा परद्रव्याच्या संयोगाच्या कारणाच्या नाशाचा अभ्यास आहे.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीत पूर्णपणे तत्त्वप्रदीपिकेचेच अनुकरण केले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव १ मत्तगयंद व ४ दोहे - अशा ५ छंदातून स्पष्ट केला आहे –

(मत्तगयन्द)

मैं निज ज्ञानसरूप चिदातम, ताहि सुध्यावत हौं भ्रम टारी।
भाव शुभाशुभ बंध के कारन, तातैं तिन्हैं तजि दीनों विचारी॥
होय मधस्थ विराजत हौं, परदर्व विषैं ममता परिहारी।
सो सुख क्यों मुख सों बरनौं, जो चखै सो लखै यह बात हमारी॥२५॥

मी आपल्या ज्ञानस्वरूप चैतन्य आत्म्याचे ध्यान करून सर्व प्रकारच्या भ्रमांना टाळून बंधाचे कारण असलेल्या शुभाशुभ भावांना सोडण्याचा विचार केला आहे आणि मध्यस्थ भाव धारण करून परद्रव्याबद्दलचे ममत्व सोडले आहे. असे केल्याने अर्थात शुद्धोपयोगाने ज्या सुखाची प्राप्ती होते; ते सुख शब्दांतून कसे बरे सांगितले जाईल ? आम्ही तर असे म्हणतो की त्या सुखाला जी व्यक्ती चाखते, तीच त्याला समजते म्हणजेच जाणते.

(दोहा)

तातैं यह उपदेश अब, सुनो भविक बुधिवान।
उद्दिम करि जिनवचन सुनि, ल्यो निजरूप पिछान॥२६॥
ताही को अनुभव करो, तजि प्रमाद उनमाद।
देखो तो तिहि अनुभवत, कैसो उपजत स्वाद॥२७॥
जाके स्वादत ही तुम्हें, मिलै अतुल सुख पर्म।
पुनि शिवपुर में जाहुगे, परिहरि अरि वसु कर्म॥२८॥

यही शुद्ध उपयोग है, जीवन-मोच्छसरूप।
यही मोखमग धर्म यहि, यही शुद्धचिद्रूप ॥२९॥

म्हणून हे बुद्धिमान भव्य जीवांनो ! माझ्या या उपदेशाला लक्षपूर्वक ऐका. पुरुषार्थ करून जिनवचन ऐकून निजस्वरूपाला ओळखा.

प्रमाद आणि उन्माद यांना सोडून त्याचाच अनुभव करा. जरा पहा तर खरे की त्याचा अनुभव केला असता कशा प्रकारचा स्वाद येतो तो ? त्याचा स्वाद घेताच तुम्हाला अतुलनीय परमसुख मिळेल आणि शेवटी आठही कर्मांचा नाश करून मुक्तीपुरीमध्ये जाल.

हा शुद्धोपयोग जीवांना मोक्षस्वरूपच आहे. हाच मोक्षमार्ग आहे, हाच धर्म आहे आणि हाच शुद्ध चैतन्यस्वरूप परमात्मा आहे.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(कुण्डलिया)

स्वपर विवेकी हौं सु मैं ग्यान स्वरूप सदीव।
सुद्धभाव करि अनुभवौं सुद्ध स्वरूप सु जीव॥
सुद्ध स्वरूप सु जीव सुभासुभ भाव न मैरो।
अपनौं रसु दै करि सु आपु खिरि जात सवैरौ॥
ताथैं मैं मध्यस्तर हौहि थिरता सु न देखी।
करनहार निज ध्यान कौ सु मैं स्वपर विवेकी॥११४॥

स्व-परविवेकी मी सदा ज्ञानस्वरूपी आहे व शुद्ध भावांनी आपल्या शुद्ध स्वरूपाचा अनुभव करतो. मी शुद्धस्वरूपी जीव आहे, शुभाशुभभाव माझे नाहीत, ते फळ देऊन योग्य वेळी खिरून जातात. मी यांच्यात कधीही स्थिरता प्राप्त केली नाही, त्यामुळे मी यांच्यात मध्यस्थ राहतो. स्व-परविवेकी मी तर आपल्या आत्म्याचा अनुभव करणारा आहे.

स्वामीजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"आचार्य भगवंतांना तर ही गाथा लिहिताना शुभोपयोग होत होता, परंतु दृष्टीमध्ये शुभाचा निषेधच होता. शुद्ध स्वभावाचा तर जोर आहे; म्हणून शुभाला गौण करून ज्ञानस्वरूप आत्म्याचा अनुभव करीत आहे

- असे म्हटले आहे. हा ज्ञेय अधिकार आहे व पंचपरमेष्ठी परज्ञेय आहेत, स्वज्ञेय नाहीत; म्हणून त्यांच्यावरील लक्ष सुटून आत्म्यात शुद्धोपयोग प्रगट झाल्याने अशुद्ध उपयोग उत्पन्नच होत नाही. तसेच परद्रव्याच्या संयोगही रहात नाही, म्हणून आचार्य म्हणतात की मी शुद्धोपयोगात राहतो व हाच अशुद्धोपयोगाच्या विनाशाचा अभ्यास आहे.[१]''

१५६ व्या गाथेच्या टीकेमध्ये म्हटले होते की परद्रव्याच्या संयोगाचे कारण अशुद्धोपयोगच आहे आणि तो अशुद्धोपयोग विशुद्धी आणि संक्लेशरूप उपरागाचे कारण आणि शुभ व अशुभरूप द्विविधतेला प्राप्त होऊन पुण्य-पापाच्या बंधाचे कारण होतो. पुण्याने अनुकूल आणि पापाने प्रतिकूल संयोग मिळतात.

आता येथे आचार्यदेवांनी सांगितले आहे की शुद्धोपयोगात राहणेच परद्रव्याच्या संयोगाचे कारणरूप जो अशुद्धोपयोग, त्याच्या विनाशाचे कारण आहे. म्हणून आता मी सर्व परद्रव्यांपासून मध्यस्थ होतो.

अशाप्रकारे शुभाशुभभावरूप अशुद्धोपयोगापासून मुक्त होऊन शुद्धोपयोगी होऊन, पुण्य-पापापासून मुक्त होऊन मी निजात्म्यात निश्चल होतो, कारण अशुद्धोपयोगाच्या विनाशाचा हाच एकमेव उपाय आहे. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १५१

जीव आणि देहाची पारमार्थिक भिन्नता समजाविण्याकरिता अगोदर त्यांच्या व्यावहारिक एकतेच्या वास्तविक स्थितीला जाणणे आवश्यक आहे, अन्यथा व्यावहारिक एकतेच्या तात्कालिक उपयोगितेबरोबर स्वाभाविक भिन्नतेचा परिचय चांगल्याप्रकारे प्राप्त होणार नाही, पारमार्थिक प्रयोजन देखील पूर्ण होणार नाही; त्यामुळे देह आणि आत्म्याच्या पारमार्थिक भिन्नतेबरोबर व्यावहारिक एकतेचे ज्ञान देखील आवश्यकच नव्हे तर अनिवार्य आहे. परंतु लक्षात ठेवण्याजोगी बाब ही आहे की पारमार्थिक भिन्नता केवळ भिन्नता जाणण्याकरिताच आहे, व्यावहारिक एकतेचे स्वरूप देखील पारमार्थिक भिन्नता जाणण्याकरिताच जाणायचे आहे.

– बारा भावना : एक अनुशीलन, पृष्ठ : ७८

प्रवचनसार गाथा १६०-१६१

मागील गाथेमध्ये अशुद्धोपयोगाच्या विनाशाच्या अभ्यासाबाबत सांगून झाल्यावर या गाथांमध्ये शरीरादी परद्रव्यांप्रति माध्यस्थ भाव दर्शवून मन-वचन-काय हे परद्रव्य आहेत – असे समजाविले आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

णाहं देहो ण मणो ण चेव वाणी ण कारणं तेसिं।
कत्ता ण ण कारयिदा अणुमंता णेव कत्तीणं॥१६०॥
देहो य मणो वाणी पोग्गलदव्वप्पग त्ति णिद्दिट्ठा।
पोग्गलदव्वं हि पुणो पिंडो परमाणुदव्वाणं॥१६१॥

(हरिगीत)

देह मन वाणी न उनका करण या कर्ता नहीं।
ना कराऊँ मैं कभी भी अनुमोदना भी ना करूँ॥१६०॥
देह मन वच सभी पुद्गल द्रव्यमय जिनवर कहे।
ये सभी जड़ स्कन्ध तो परमाणुओं के पिण्ड हैं॥१६१॥

मी ना देह आहे, ना मन आहे आणि ना वाणी आहे. मी या मन-वचन-काय यांचेकारण नाही, कर्त्ता नाही, करविणारा देखील नाही, तसेच अनुमोदना करणारा सुद्धा नाही.

देह, मन व वाणी पुद्गलद्रव्यात्मक आहेत व ते पुद्गलद्रव्य परमाणुंचा पिंड आहे - असे वीतरागी देवांनी सांगितले आहे.

या गाथांचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे -

"मी शरीर, वाणी व मन यांना परद्रव्य समजतो, म्हणून मला त्यांच्या विषयी कोणताही पक्षपात नाही. मी त्या सर्वांबाबतीत अत्यंत मध्यस्थ आहे.

आता ही बाब विशेष स्पष्ट करतात - वास्तविक मी शरीर, वाणी

आणि मन यांच्या स्वरूपाचा आधार असे अचेतन द्रव्यरूप नाही. कारण माझ्याशिवायच ते स्वस्वरूपाला धारण करतात, म्हणून मी ह्या शरीर वगैरेंचा पक्षपात करण्याचे सोडून अत्यंत मध्यस्थ होतो.

अशाप्रकारे मी शरीर, वाणी तसेच मन यांचे कारणरूप अचेतन द्रव्य नाही, कारण मी कारण बनल्याशिवायच ते कारणवान आहेत, म्हणून मी त्यांच्या कारणपणाचा पक्षपात करणे सोडून अत्यंत मध्यस्थ होतो.

मी स्वतंत्रपणे शरीर, वाणी व मन यांचा कर्त्तारूप अचेतन द्रव्य नाही, कारण मी कर्ता बनल्याशिवाय ते कार्य करते, म्हणून त्याच्या कर्तृत्वाचा पक्षपात सोडून मी अत्यंत मध्यस्थ होतो.

स्वतंत्रपणे शरीर, वाणी व मनाचे कारकरूप अचेतन द्रव्यांचा मी प्रायोजक (करविणारा) नाही; कारण माझ्याविनाच ते केले जातात, म्हणून मी त्यांच्यात कर्तापणाच्या प्रायोजकपणाचा (करविणाऱ्याचा) पक्षपात सोडून अत्यंत मध्यस्थ होतो.

स्वतंत्रपणे शरीर, वाणी व मनाचे कारक जे अचेतन द्रव्य आहे, मी त्याचा अनुमोदक नाही, कारण माझे अनुमोदक झाल्याशिवायच ते केले जातात. त्यामुळे त्यांच्या कर्त्यापणाच्या अनुमोदनेचा पक्षपात सोडून मी अत्यंत मध्यस्थ होतो.

पुद्गलद्रव्यात्मक असल्याने शरीर, वाणी आणि मन परद्रव्य आहेत. त्यांच्यामध्ये पुद्गलपणा आहे; कारण ते पुद्गलद्रव्याच्या स्वलक्षणभूत स्वरूपास्तित्वामध्ये निश्चित आहेत. शरीररूप पुद्गलद्रव्य हे अनेक परमाणुंचा एक पिंडरूप परिणाम आहे; कारण अनेक परमाणुद्रव्यांचे स्वलक्षणभूत स्वरूपास्तित्व वेगवेगळे असून देखील कथंचित एकत्वरूप अवभासित होते.''

आचार्य जयसेनांनी या गाथेचा भाव त्यांच्या तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये तत्त्वप्रदीपिकेप्रमाणेच स्पष्ट केला आहे.

या गाथेचा भाव कविवर वृंदावनदासजींनी १ मनहरण व २ दोहे असे एकूण ३ छंदांच्या माध्यमातून प्रस्तुत केला आहे –

(मनहरण कवित्त)

मैं जो हों शुद्ध चिनमूरत दरव सो,
त्रिकाल में त्रिजोगरूप भयो नाहिं कबही।
तन मन वैन ये प्रगट पुद्गल यातैं,
मैं तो याको कारन हू बन्यौ नाहिं तब ही॥
तथा करतार और करावनहूहार नाहिं,
करता को अनुमोदक हूँ नाहिं जब ही।
ये अनादि पुग्गलकरम ही तैं होते आये,
ऐसी वृन्द जानी जिनवाणी सुनी अब ही॥३०॥

मी शुद्ध चैतन्यमूर्ती द्रव्य आहे व मी त्रिकाळात कधीही मन-वचन-कायरूपाने त्रियोगरूप झालो नाही; कारण मन-वचन-काय तर स्पष्टपणे पुद्गलच आहेत; म्हणून मी यांचे कधीच कारण बनलो नाही, कर्ताही झालो नाही, करविणारा झालो नाही व अनुमोदक सुद्धा झालो नाही. हे सर्व अनादी काळापासून पौद्गलिक कर्मोदयानेच होत आले आहेत. वृंदावनकवी सांगतात की मी जिनवाणी ऐकून आता हे सगळे जाणले आहे.

(दोहा)

तन मन वचन त्रिजोग हैं, पुद्गलदरवसरूप।
ऐसे दयानिधान वर, दरसाई जिनभूप॥३१॥
सो वह पुद्गल दरव के, अविभागी परमानु।
तासु खंध को पिंड है, यों निहचै उर आनु॥३२॥

मन-वचन-काय हे तिन्ही योग पुद्गल द्रव्यरूप आहेत. दयानिधान भंगवंतांनी हे सांगितले आहे.

हे देहादिक अविभागीरूप पुद्गल परमाणू द्रव्याचे स्कंध आहेत, पिंड आहेत, ही बाब निश्चयनयाची आहे – असे हृदयात धारण करावे.

पंडित देवीदासजींनी या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(छप्पय)

तनमन वचन स्वरूप मैं न वे रूप न मेरो।
'उपादान कारन सु मैं न करता तिनि केरौ॥

मैं न करावनहार पुनि सु जोगनि कौं तीनों।
मो विनु तन मन वचन भाव पुद्गल करि कीनौं॥
तिनि जोगनि करिवे की सकति पुद्गल पिंड विषैं कही।
ताथैं मध्यस्तर हौं सु मैं दरव अचेतन सौं सही॥११५॥

मी न मन-वचन-कायरूप आहे आणि ते माझे स्वरूप नाहीत. मी त्यांचे उपादान कारण नाही, कर्ता सुद्धा नाही, अशाप्रकारे तीन योगांचा करणारा देखील नाही. हे मन-वचन-काय माझ्याशिवाय पुद्गलाने केलेले आहेत; कारण त्यांना करण्याची शक्ती पुद्गलपिंडातच सांगितली आहे. त्यामुळे मी अचेतन पदार्थांहून मध्यस्थ राहतो.

(दोहा)

मैं न नैन तन कान पुनि घ्रान वैन मनु हैं न।
ग्यान प्रान गन जान पन लीन तीन गुन अैंन॥११६॥

मी डोळे, कान, नाक, शरीर व मनरूप नाही. मी तर ज्ञानप्राणाचा धारक व दर्शन-ज्ञान-चारित्र गुणात लीन राहणारा ज्ञायक आत्मा आहे.

(चौपाई)

तन मन वचन जोग ये तीन्हों, जड़ पर दरव स्व रूप सु चीन्हौ।
पुद्गल परमानू अविभागी, तिनके लखौ पिंड बड़भागी॥११७॥

मन-वचन-काय – हे तिन्ही योग जड द्रव्य आहे, परद्रव्य आहेत. हे अविभागी पुद्गल परमाणूंचे पिंड आहेत, मी यांना असेच ओळखले आहे.

या गाथेतील भाव आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''धर्मी जीव शरीर, मन व वाणी यांच्या अवस्थांचा ज्ञाता-दृष्टा असतो. आचार्य भगवंतांनी सांगितले आहे की मी शरीर, वाणी व मन यांना परपदार्थ समजतो. लिहितेवेळी मनाकडील ओढा असूनही स्वभावाच्या अधिकतेमध्ये त्याला गौण केले आहे. जेव्हा वाणी बोलली

जाते, तेव्हा ते अनेकांना लाभाचे कारण ठरते – अशी अनुमोदना मी करीत नाही. वाणी वगैरेंच्या बाबतीत मला पक्षपात नाही.

आत्मा आहे, त्यामुळे शरीर, मन व वाणी यांची क्रिया होत आहे – असे मी मानत नाही. शरीर, मन, वाणी परद्रव्य आहेत. ते स्वत:मुळेच परिणमन करतात. मी त्यांच्या बंधाच्या बाबतीत अत्यंत मध्यस्थ आहे.[१]

ज्ञानी जीव विचार करतो की शरीर, मन व वाणी तर परज्ञेय ओहत ते माझ्या आधाराशिवाय स्वतंत्रपणे परिणमन करीत आहेत. यामुळे यांच्या आधाराचा पक्षपात सोडून मी अत्यंत ज्ञाता-दृष्टा राहतो.[१]

अज्ञानी जीव जड (अजीव) वगैरेंचा कर्ता व कारण स्वत:ला भले ना मानो, पण त्या जड शरीर, मन व वाणी यांचा आधार, कारण, कर्ता, करविता व अनुमोदक मी नाही; कारण आत्मा ज्ञानस्वरूप आहे – असे जाणणे व परज्ञेय स्वतंत्र आहे – असे जाणणेच सम्यग्ज्ञान व धर्म आहे.[२]

शरीर, मन, वाणी यांच्या परमाणुंचे स्वलक्षणभूत स्वरूपास्तित्व वेगवेगळे आहे; तरी देखील रूक्षपणा व स्निग्धपणा यांच्यामुळे बंधरूप असल्याने ते एक आहेत – असे भासते; परंतु आत्म्यामुळे तर त्यांची अशी स्कंधरूप अवस्था होतच नाही. जेव्हा एका परमाणुची अवस्था दुसऱ्या पुद्गल परमाणुमुळे होत नाही, तर मग आत्म्यामुळे शरीर इत्यादींची अवस्था होते – असे मानणे अज्ञान आहे.

तात्पर्य हे आहे की रूक्षपणा व स्निग्धपणा यांच्यामुळे अनेक परमाणू एकत्र येऊन व्यवहाराने एक आहेत – असे भासते; परंतु आत्म्यामुळे व्यवहाराने देखील ते एकत्र होत नाहीत.[३]''

वरील गाथा व त्यांची टीका यांचा भाव हा आहे की आत्मा व त्याच्या संयोगामध्ये राहणारे मन-वचन-काय यांचे स्वरूपास्तित्व

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १५७ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १६३
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १६५

पूर्णपणे भिन्न-भिन्न आहे. ते ना तर एक-दुसऱ्यारूपाने आहेत, ना तर एकमेकाचे स्वामी आहेत.

तसेच ते एकमेकांचे परस्पर कर्ता नाहीत, कारण नाहीत, करविणारे नाहीत व अनुमंता(अनुमोदक)ही नाहीत. तात्पर्य हे आहे की यांच्यात परस्पर एकक्षेत्रावगाह संबंधाव्यतिरिक्त अन्य कोणताही संबंध नाही.

त्यामुळे ज्ञानी धर्मात्मा जीव यांच्या बाबतीत पूर्णपणे मध्यस्थ असतात, शरीरादिमध्ये काही करण्याच्या ओझ्यापासून पूर्णपणे मुक्त असतात. जर कमजोरीच्या कारणाने तत्संबंधी एखादा विकल्प उभा राहिला तर त्याला देखील जाणतात, सहज भावाने ज्ञानाचा ज्ञेय बनवितात; त्यामुळे आकुळ-व्याकुळ होत नाहीत. ●

'एकटेच मरावे लागेल, एकटेच जन्मावे लागेल, सुख-दुःख देखील एकट्यालाच भोगावे लागेल' – अशाप्रकारच्या चिंतवनाने जर खेद उत्पन्न होत असेल तर आम्हाला आपल्या चिंतन-प्रक्रियेवर खोलवर विचार करावा लागेल. जर आमच्या चिंतन-प्रक्रियेची दिशा योग्य असेल तर आह्लाद उत्पन्न झालाच पाहिजे. खोलवर जाऊन विचार केल्यास सर्व काही सहजच स्पष्ट होईल.

आपणास ही तक्रार असेल सुख-दुःख, जीवन-मरण सर्व काही आम्हाला एकट्यालाच भोगावे लागतात, हे भोगताना कोणी सोबती नसतो. तर तुमची ही तक्रार योग्य आहे काय ?

यावर थोडा विचार करा की कोणी सोबती नसतो किंवा कोणी सोबती असू शकत नाही ? वस्तुस्वरूपानुसार जर कोणी सोबती असूच शकत नाही, तेव्हा 'सोबती नसतो' – हा प्रश्नच कोठे उरतो ?

जेव्हा आम्ही सा विचार करतो की कोणी सोबती नसतो तर आम्हाला द्वेष उत्पन्न होतो, परंतु जर आम्ही हा विचार केला की कोणी सोबती असू शकत नाही तर सहजच उदासीनता उत्पन्न होईल, वीतरागभाव जागृत होईल.

– बारह भावना : एक अनुशीलन, पृष्ठ-६७

प्रवचनसार गाथा १६२

मागील गाथांमधून मन-वचन-काय यांचा परद्रव्यपणा दाखवून आता या गाथेत मन-वचन-काय यांच्या कर्तृत्वाचा निषेध करतात.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

णाहं पोग्गलमइओ ण ते मया पोग्गला कया पिंडं।
तम्हा हि ण देहोऽहं कत्ता वा तस्य देहस्य॥१६२॥

(हरिगीत)

मैं नहीं पुद्गलमयी मैंने ना बनाया हैं इन्हें।
मैं तन नहीं हूँ इसलिए ही देह का कर्ता नहीं॥१६२॥

मी पुद्गलमय नाही आणि ते पुद्गल माझ्याद्वारे पिंडरूप केलेले नाहीत, म्हणून मी देह नाही, तसेच त्या देहाचा कर्ता देखील नाही.

या गाथेचा भाव अमृतचंद्राचार्यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"ज्याचे प्रकरण चालू आहे, असे हे शरीर पुद्गलद्रव्यात्मक परद्रव्य आहे, यामध्ये वाणी व मन यांचा सुद्धा समावेश होतो. अशाप्रकारे मन वचन-काय यांचे पिंडरूप असे हे शरीर म्हणजे मी नाही; कारण मी अपुद्गलमय आहे, म्हणून माझा पुद्गलमय शरीर असण्याला विरोध आहे.

अशाप्रकारे शरीराच्या कारणाद्वारे, कर्त्याद्वारे, कारयित्याद्वारे आणि अनुमोदकाद्वारे देखील मी शरीराचा कर्ता नाही; कारण अनेक परमाणू द्रव्यांच्या एक पिंडरूप परिणामाचा अकर्ता असा मी अनेक परमाणू द्रव्यांचा एक पिंडरूप पर्यायरूप परिणामात्मक शरीराचा मी कर्तारूप असण्याला सर्वथा विरोध आहे."

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकमध्ये या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेप्रमाणेच स्पष्ट केला आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(मनहरण कवित्त)

मैं जो हों विशुद्ध चेतनत्वगुनधारी सो तो,
पुग्गल दरवरूप कभी नाहिं भासतो।
तथा देह पुग्गल को पिंड है सुखंध बंध,
सोउ मैंने कीनों नाहिं निहचै प्रकासतो॥
ये तो हैं अचेतन औ मूरतीक जड़ दर्व,
मेरो चिच्चमतकार जोत है चकासतो।
तातैं मैं शरीर नाहिं करता हूँ ताको नाहिं,
मैं तो चिदानंद वृन्द अमूरत सासतो॥३३॥

मी तर विशुद्ध चैतन्यगुणधारी आहे, मी कधीही पुद्गल द्रव्यरूप प्रतिभासित होत नाही. पुद्गलाचा पिंडरूप असा चांगल्यात-हेने बांधलेल्या अशा शरीराला मी बनविलेले नाही. हे अगदी निश्चितच आहे, निश्चयनयाने प्रकाशित आहे. हे शरीर अचेतन आहे, मूर्तिक आहे, जड द्रव्य आहे व माझे स्वरूप जगमगणाऱ्या चित्चमत्कार ज्योतिरूप आहे, म्हणून मी शरीर नाही व शरीराचा कर्ताही नाही. वृंदावन कवींनी सांगितले आहे की मी तर अमूर्तिक शाश्वत ज्ञानानंदस्वभावी द्रव्य आहे.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव खालीलप्रमाणे व्यक्त केला आहे–

(सवैया तेईसा)

चेतनि द्रव्य सु मैं न अचेतन पुग्गल भाव जुदौ निरवारो।
सूछम जो तन की परमानूं यकौ यह पिंड कियौ न हमारो॥
मैं तिहि तैं निज ग्यान स्वरूप सरीरमई सु विकार तैं न्यारो।
पुग्गल द्रव्य स्वरूप सु देह न मैं तिहि कौं उपजावनहारो॥११८॥

मी अचेतन पौद्गलिक पदार्थांहून भिन्न चेतन द्रव्य आहे. ज्या सूक्ष्म परमाणूंनी शरीराची रचना झाली आहे, त्यांचा व त्यांच्या पिंडाचा कर्ता मी नाही. मी तर विकारी परिणामांहून भिन्न ज्ञानशरीरी तत्त्व आहे. पुद्गलमयी देहाला उत्पन्न करणारा मी नाही.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"१) आत्मा ज्ञानस्वरूपी चेतन आहे व शरीर ज्ञानाविना अचेतन आहे.

२) आत्मा अमूर्त - स्पर्श, रस, गंध, वर्ण रहित आहे व शरीर मूर्त स्पर्श-रसवान आहे.

३) आत्मा अखंड एकरूप आहे आणि शरीर पूरन-गलनरूप असल्याने खंड-खंडवान आहे.

या कारणास्तव आत्म्याचे शरीररूप असण्याला विरोध आहे.

शरीराचा कर्ता, कारण, प्रायोजक किंवा अनुमोदक मी नाही, कारण अनेक परमाणुंमध्ये स्वत:च पिंडरूप होण्याची योग्यता असल्याने ते पिंडरूप होतात. वाणीचे परमाणू स्वत: पिंडरूप होऊन शब्दरूप परिणमतात. शरीर अनेक परमाणुंची एक पिंडरूप अवस्था आहे आणि त्याचे कर्ता ते परमाणुच आहेत, आत्मा त्याचा कर्ता नाही.[१]"

ही गाथा व टीकेत केवळ एवढेच म्हटले आहे की आत्मा व शरीर वेगवेगळे पदार्थ आहेत. हा भगवान आत्मा शरीराचा कर्ता नाही, कारण नाही, कारयिता नाही व अनुमंताही नाही. पुद्गल परमाणूंनी बनलेले हे शरीर स्वत: परिणमनशील आहे; ते आपल्या परिणमनाचा कर्ता स्वत: आहे. अशाप्रकारे भगवान आत्मा सुद्धा स्वत: परिणमनशील पदार्थ आहे; त्यामुळे तो सुद्धा आपल्या परिणमनाचा कर्ता स्वत:च आहे. परद्रव्य त्याचे कर्ता नाहीत व तो शरीरादी परद्रव्यांचा कर्ता नाही. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १६७

पराच्या संगतीच्या अभिलाषी प्राण्यांनो ! तुमचा खरा सोबती आत्म्याचे अखंड एकत्वच आहे, दुसरे काहीही नाही. हे एकत्व केवळ तुमचा खरा सोबती नाही तर ऐरावत हत्ती सुद्धा आहे; याचा आश्रय घ्या, यावर चढा व स्वत:च्या अंतरंगातील धर्मतीर्थाचे प्रवर्तक तीर्थंकर बना, धर्माच्या धवल पांडुकशीलेवर तुमचा जन्माभिषेक होईल, पावन परिणतींच्या प्रवाहित अजस्र धारेत स्नान करून तुम्ही धवल निरंजन व्हाल. – बारा भावना : एक अनुशीलन, पृष्ठ : ७१

प्रवचनसार गाथा १६३-१६५

१६२ व्या गाथेमध्ये आत्मा शरीरादींचा कर्ता नाही – हे स्पष्ट केल्यानंतर आता ह्या गाथांमध्ये पुद्गलांमध्ये परस्पर बंधरूप परिणमनाचे स्वरूप स्पष्ट करीत आहेत –

अपदेसो परमाणू पदेसमेत्तो द सयमसद्दो जो।
णिद्धो वा लुक्खो वा दुपदेसादित्तमणुभवदि॥१६३॥
एगुत्तरमेगादी अणुस्स णिद्धत्तणं च लुक्खत्तं।
परिणामादो भणिदं जाव अणंतत्तमणुभवदि॥१६४॥
णिद्धा वा लुक्खा वा अणुपरिणामा समा व विसमा वा।
समदो दुराधिगा जदि बज्झन्ति हि आदिपरिहीणा॥१६५॥

(हरिगीत)

रे अप्रदेशी अणु एक प्रदेशमय अर अशब्द हैं।
अर रूक्षता-स्निग्धता से बहुप्रदेशीरूप हैं॥१६३॥
परमाणु के परिणमन से इक-एक कर बढ़ते हुए।
अनंत अविभागी न हो स्निग्ध अर रूक्षत्व से॥१६४॥
परमाणुओं का परिणमन सम-विषम अर स्निग्ध हो।
अर रूक्ष हो तो बंध हो दो अधिक पर न जघन्य हो॥१६५॥

अप्रदेशी आणि प्रदेशमात्र अशब्द परमाणू स्निग्ध व रुक्ष होऊन द्विप्रदेशीपणाचा अनुभव करतो.

परमाणुच्या परिणमनामुळे एक (अविभागी प्रतिच्छेद) पासून एक-एक वाढताना जोपर्यंत अनंतपणा(अनंत अविभागी प्रतिच्छेदपणा)ला प्राप्त होतो, तोपर्यंत स्निग्धत्व व रुक्षत्व आहे – असे जिनेंद्र भगवंतांनी सांगितले आहे. परमाणू-परिणाम स्निग्ध असो वा रुक्ष, सम अंशवाले असो वा विषम अशंवाले; जर समानापेक्षा दोन अधिक अंशवाले असतील तर बांधले जातात, जघन्य अंशवाले बांधले जात नाहीत.

ह्या गाथांचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''परमाणू दोन वगैरे प्रदेशांच्या अभावामुळे अप्रदेशी आहे व एक प्रदेशाच्या सद्भावामुळे प्रदेशमात्र आहे. तसेच स्वत: अनेक परमाणु द्रव्यात्मक शब्दपर्यायरूप प्रगट करण्यास अशक्य असल्याने अशब्द आहे.

चार स्पर्श, पाच रस, दोन गंध व पाच वर्ण यांच्या अविरोधपूर्वक सद्भावाच्या कारणाने तो परमाणू स्निग्ध अथवा रुक्ष होतो; म्हणून त्याला पिंडपर्यायपरिणतिरूप द्विप्रदेशीपणाची अनुभूती होते.

एका परमाणुची दुसऱ्या परमाणुबरोबर होणारी पिंडरूप परिणती द्विप्रदेशीपणाची अनुभूती आहे. एका परमाणुची इतर दोन परमाणुंबरोबर होणारी पिंडरूप परिणती त्रिप्रदेशीपणाचा अनुभव आहे. अशाप्रकारे परमाणू इतर परमाणुंबरोबर पिंडरूप परिणत झाला असता अनेक प्रदेशी-पणाचा अनुभव करतो. असे हे स्निग्धत्व व रुक्षत्व पिंडपणाचे कारण आहे.

परमाणुचा परिणाम होतो, कारण परिणाम होणे हा वस्तुचा स्वभाव असल्याने त्याचे उल्लंघन केले जाऊ शकत नाही. त्या परिणामामुळे कादाचित्क (कधी-कधी होणारा) विचित्रपणा (अनेकरूपपणा) धारण करून, एकापासून एक-एक वाढणाऱ्या अनंत अविभागप्रतिच्छेदांपर्यंत व्याप्त होणारे स्निग्धत्व किंवा रुक्षत्व परमाणुचे असते; कारण परमाणू अनेक प्रकारे गुणवाला आहे.

समान गुणाहून दोन गुण (अंश) अधिक स्निग्धत्व वा रुक्षत्व असेल तर बंध होतो – हा उत्सर्ग (सामान्य नियम) आहे. कारण स्निग्धत्व वा रुक्षत्व यांची द्विगुणाधिकता होणे परिणमविणारे असल्याने बंधाचे कारण आहे.

जर एक गुण स्निग्धत्व किंवा रुक्षत्व असेल तर बंध होत नाही – हा अपवाद आहे; कारण एक गुण स्निग्धत्व व रुक्षत्व यांचा परिणम्य-परिणामपणांचा अभाव असल्याने बंधाच्या कारणपणाचा अभाव आहे.''

ह्या गाथांचा भाव आचार्य जयसेनांनी उदाहरणासहित विस्ताराने स्पष्ट केला आहे, त्याचा सारांश पुढीलप्रमाणे आहे –

''ज्याप्रमाणे शुद्ध-बुद्ध स्वभावाद्वारे हा आत्मा बंधरहित असूनही नंतर अशुद्धनयाने स्निग्धत्वाच्या जागी असलेला रागभाव व रुक्षत्वाच्या जागी असलेला द्वेषभाव यांच्यारूपाने जेव्हा तो परिणमित होतो; तेव्हा परमागमामध्ये सांगितलेल्या विधीने बंधाचा अनुभव करतो.

त्याप्रमाणे परमाणू देखील स्वभावाने बंधरहित असून सुद्धा जेव्हा बंधाचे कारणभूत असलेले स्निग्ध-रुक्षगुणरूपाने परिणमित होतो, तेव्हा दुसऱ्या पुद्गलाबरोबर विभाव पर्यायरूप बंधाचा अनुभव करतो.

बकरी, गाय व म्हशीच्या दुधात ज्याप्रमाणे क्रमश: स्निग्धपणाची वृद्धी होते, ज्याप्रकारे जीवामध्ये बंधाचे कारणभूत असलेले स्निग्धत्वाच्या जागी असलेला रागपणा व रुक्षत्वाच्या जागी असलेला द्वेषपणा, जघन्य विशुद्धी – संक्लेश स्थानापासून सुरू करून परमागमात सांगितलेल्या क्रमाने उत्कृष्ट विशुद्धी-संक्लेश पर्यंत वाढतात; तसेच पुद्गल परमाणू द्रव्यातही बंधाला कारणीभूत असलेली स्निग्धता व रुक्षता अगोदर सांगितलेल्या जलादीची तारतम्य (क्रमाने वाढणारी) शक्तीच्या उदाहरणाने एक गुण नामक जघन्य शक्तीपासून सुरू करून गुण नावाच्या अविभागी प्रतिच्छेदरूप दुसरे, तिसरे वगैरे शक्ती विशेषाने अनंत संख्यांपर्यंत वाढतात; कारण पुद्गलद्रव्य परिणामी असल्याने परिणामाचा निषेध करणे शक्य नाही.

विशेष हे आहे की – परम चैतन्य परिणती लक्षण परमात्मतत्त्वाचे भावनारूप धर्मध्यान, शुक्लध्यानाच्या बळाने जसे जघन्य स्निग्ध शक्तीच्या जागी असलेला राग क्षीण झाला असता व जघन्य रुक्ष शक्तीच्या जागी असलेला द्वेष क्षीण झाला असता, पाणी व रेतीप्रमाणे जीवाचा बंध होत नाही; तसेच पुद्गल परमाणुच्याही जघन्य स्निग्ध व रुक्ष शक्तीचा प्रसंग येताच बंध होत नाही – असा अभिप्राय आहे.''

येथे विशेष लक्ष देण्यायोग्य बाब ही आहे की येथे आत्म्याच्या बंधाच्या उदाहरणाने आचार्यांनी पुद्गलाच्या बंधाला समजाविले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथांचा भाव ३ मनहरण व ८ दोहे – अशा एकूण ११ छंदाच्या माध्यमातून स्पष्ट केला आहे –

(मनहरण कवित्त)

अप्रदेशी अनू परदेशपरमान दर्व,
सो तो स्वयमेव शब्द परज रहत है।
तामैं चिकनाई वा रुखाई परिनाम बसै,
सोई बंध जोग भाव तास में कहत है॥
ताही सेती दोय आदि अनेक प्रदेशनि की,
दशा को बढ़ावत सुपावत महत है।
ऐसे पुद्गल को सुपिंडरूप खंध बँधै,
यासों चिदानंदकंद जुदोई लहत है॥३४॥

एक प्रदेशाप्रमाण अप्रदेशी अणु स्वत:च शब्द पर्यायाहून रहित आहे. त्यामध्ये असणारा स्निग्ध व रुक्षपणा – हाच स्कंधरूप बंधाचे कारण आहे. त्यामुळेच दोन वगैरे प्रदेशांचा (परमाणुंचा) बंध होतो. अशाप्रकारे स्कंधरूप पुद्गलाचा पिंड बनतो; परंतु भगवान आत्मा यापासून वेगळाच राहतो.

(दोहा)

अविभागी परमानु वह, शुद्ध दरव हैं सोय।
वरनादिक गुन पंच तो, सदा धरैं ही होय॥३५॥
एक वरन इक गंध इक, रस दो फास मँझार।
अंतर भेदनि में धरे, श्रुति लखि लेहु विचार॥३६॥

शुद्ध पुद्गल द्रव्य तर अविभागी परमाणू आहे. तो पाच वर्णादी गुणांना सदैव धारण केलेला असतो.

तो एक वर्ण, एक गंध, एक रस आणि दोन स्पर्श धारण करीत असतो. यांच्या भेदांकरिता शास्त्रात बघितले पाहिजे.

(मनहरण कवित्त)

पुग्गल अनू में चिकनाई वा रुखाई भाव,
एक अंश तैं लगाय भाषे भेदरास है।
एकै एक बढ़त अनंत लौं विभेद बढ़ै,
जातैं परिनाम की शकति ताके पास है॥

जैसे छेरी गाय भैंस ऊँटनी के दूध घृत,
तामें चिकनाई वृद्धि क्रमतैं प्रकास है।
धूलि राख रेत की रुखाई में विभेद जैसे,
तैसे दोनों भाव में अनंत भेद भास है॥३७॥

पौद्गलिक परमाणुमध्ये रुक्षता व स्निग्धता एक अंशापासून भेदांच्या अनेक संख्या आगमामध्ये सांगितल्या आहेत. एक-एकने वाढणाऱ्या अनंतापर्यंत भेदांचा विस्तार आहे. यामुळे त्यामध्ये स्वत: परिणमन शक्ती विद्यमान आहे. ज्याप्रमाणे बकरी, गाय, म्हैस व उंटीण यांच्या दुधामध्ये व तुपामध्ये स्निग्धता क्रमश: वाढलेली आढळून येते आणि धूळ, राख व रेती यांच्या रुक्षतेमध्ये भेद आहे; त्याप्रमाणे पुद्गलाच्या रुक्षतेमध्ये व स्निग्धतेमध्ये अनेक भेद आहेत.

पुग्गल की अनु चीकनाई वा रुखाईरूप,
आपने सुभाव परिनाम होय परनी।
अंशनि की संख्या तामें सम वा विषम होय,
दोय अंश बाढ़ही सों बंधजोग वरनी॥
एक अंश घटे बढ़े बँधत कदापि नाहिं,
ऐसो नेम निहचै प्रतीति उर धरनी।
चीकन रुखाई अनुखंध हू बँधत ऐसे,
आगमप्रमान तैं प्रमान वृन्द करनी॥३८॥

वृंदावन कवींनी आगम-प्रमाणाच्या आधारे ही बाब सांगितली आहे की पुद्गलाची स्निग्धता व रुक्षता आपल्या स्वभावानुसार परिणमित होते. त्याच्या अंशांची संख्या एक तर सम किंवा विषम असते. सम संख्येचा सम संख्येशी व विषम संख्येचा विषम संख्येबरोबर दोन अंश अधिक झाले असता बंध होतो. जर यामध्ये एक अंशही कमी-अधिक झाला तर बंध होत नाही – असा निश्चित नियम आहे – यावर विश्वास ठेवला पाहिजे.

(दोहा)

दोय चार षट आठ दश, इत्यादिक सम जान।
तीन पाँच पुनि सात नव, यह क्रम विषम बखान॥३९॥

चीकनताई की अनू, सम अंशनि परमान।
दोय अधिक होतें बँधै, यह प्रतीत उर आन॥४०॥
रुच्छ भाव के जे अनू, ते विषमांश प्रधान।
दोय अधिक तैं बँधत हैं, ऐसें लखो सयान॥४१॥
अथवा चीकन रूक्ष को, बंध परस्पर होय।
दोय अंश की अधिकता, जोग मिलै जब सोय॥४२॥
एक अनू इक अंशजुत, दुतिय तीनजुत होय।
जदपि जोग है बंध के, तदपि बँधे नहिं सोय॥४३॥
एक अंश अति जघन है, सो नहिं बँधै कदाप।
नेमरूप यह कथन है, श्रीजिन भाषी आप॥४४॥

दोन, चार, सहा, आठ व दहा इत्यादी अंकांना सम जाणा आणि तीन, पाच, सात व नऊ अंकांना विषम – असा क्रम सांगितलेला आहे.

स्निग्धता असणारे अणू सम अंशाच्या अनुसार दोनपेक्षा अधिक असतील तर बंधतात - असा हृदयाने विश्वास ठेवा.

रूक्ष भाववाले जे परमाणू आहेत, त्यांच्यामध्ये विषम अंशांची मुख्यता आहे. यांचा देखील दो अंशांच्या अधिकतेसोबतच बंध होतो. चतुर जण असे जाणतात.

किंवा स्निग्ध व रूक्ष परमाणुंचा जो परस्पर बंध होतो, तो देखील दोन अंशांच्या अधिकतेच्या आधारावरच होतो.

एक अंशवाला एक अणू आणि दुसरा अणू तीन अंशावाला असेल तर हे दोन्ही जरी बंधयोग्य आहेत, तरी देखील त्यांचा बंध होत नाही.

एक अंश अत्यंत जघन्य असल्याने त्याचा कधीही बंध होत नाही, हे सुनिश्चित आहे - असे जिनेंद्र भगवंतांनी सांगितले आहे.

पंडित देवीदासजींनी या गाथांचा भाव १ छप्पय, १ कवित्त आणि १ सवैया इकतीसा पद्यांमध्ये अशाच प्रकारे विस्ताराने स्पष्ट केला आहे, तो मुळातून पठनीय आहे. पुनरावृत्तीच्या भयाने येथे देणे उचित नाही.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी ह्या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''छोट्यात छोट्या अणुचे दोन, तीन इत्यादी प्रदेश नसतात; त्यामुळे तो अप्रदेशी आहे, परंतु तो एक प्रदेशी तर असतोच म्हणजेच तो केवळ एक प्रदेशवान आहे.

एक परमाणू शब्दरूप होत नाही, परंतु जेव्हा अनेक परमाणू स्कंधरूप अवस्था धारण करतील, तेव्हा शब्द उत्पन्न होतो. एका परमाणुमध्ये शब्द उत्पन्न करण्याची शक्ती नाही, त्यामुळे परमाणू अशब्द आहे.

त्या परमाणुमध्ये आठ स्पर्श - हल्का-भारी, रूक्ष-स्निग्ध, कठोर-नरम, शीतल-ऊष्ण, पाच रस (स्वाद), दोन गंध आणि पाच वर्णांचा सद्भाव असतो. त्यापैकी **स्निग्धता किंवा रूक्षतेमुळे** परमाणू द्विप्रदेशादी-पणापासून अनेकप्रदेशीपणा पर्यंत म्हणजेच स्कंधरूप होतो.

एक परमाणू दुसऱ्या परमाणुशी मिळून स्कंधरूप होणे द्विप्रदेशीपणा आहे आणि एका परमाणुचे दुसऱ्या दोन परमाणुंशी स्कंधरूप होणे त्रिप्रदेशीपणा आहे.

अशाप्रकारे एक परमाणू इतर परमाणुंशी पिंडरूप परिणमित होऊन अनेकप्रदेशी होतो. यामुळे हे सिद्ध होते की पुद्गलांच्या स्कंधरूप अवस्थेचे कारण रूक्षता व स्निग्धताच आहे.[१]

शरीर, मन व वाणीच्या पिंडरूप अवस्थेचे कारण आत्मा नसून त्यांचे रूक्षता व स्निग्धतारूप गुण आहेत – असे त्या ज्ञेयांना सत्य जाणले तर परद्रव्याच्या कर्तृत्वाचा अंहकार नाहीसा होऊन सम्यग्ज्ञान प्राप्त होईल.[२]

एखाद्या गुणाच्या पर्यायीत अंशाची कल्पना केली असता त्यामध्ये जो छोट्यात छोटा (निरंशरूप) अंश होतो, त्याला त्या गुणाच्या पर्यायाचा अविभागप्रतिच्छेद म्हणतात. उदाहरणार्थ – बकरीच्या दुधापेक्षा गायीच्या दुधामध्ये व गायीच्या दुधापेक्षा म्हशीच्या दुधात

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १७० २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १७०

स्निग्धतेचे अविभागप्रतिच्छेद अधिक असतात आणि धुळीपेक्षा राख आणि त्याहून अधिक वाळूमध्ये रूक्षत्वाचे अविभागप्रतिच्छेद असतात.

अशाप्रकारे स्कंधांची तारतम्यतेचे कारण त्यांचे स्निग्ध आणि रूक्ष गुण आहेत - असे त्या ज्ञेयांना जाणा.[१]

पुद्गलाची स्कंधरूप अवस्था त्याच्या स्निग्धत्व व रूक्षत्व गुणामुळे होते. दोन अधिक गुणवान परमाणू दोन कमी गुणवान परमाणुला परिणमविण्यामध्ये निमित्त असतो. आत्मा स्कंधाचा कर्त्ता तर नाहीच, शिवाय त्यामध्ये निमित्त देखील नाही.[२]

कमी अंशवाला परमाणू परिणम्य आहे आणि दोन अधिक गुणवान परमाणू परिणामक आहे. एक अंशवाला परमाणू रूक्षत्व किंवा स्निग्धत्ववाला परमाणू परिणामत तर नाहीच नाही आणि जघन्यभावामध्ये असल्यामुळे परिणम्य देखील नाही. अशाप्रकारे जघन्यभाव बंधाचे कारण नाही. परिणम्य अर्थात परिणमन्यायोग्य आणि परिणामक म्हणजे इतराला परिणमविण्यामध्ये निमित्तभूत.

येथे गुणाचा अर्थ त्रिकाळी गुण नसून अंश समजावा.[३]

ज्ञेयांचा अशाप्रकारचा स्वभाव आहे. ज्ञान ज्ञेयांच्या स्वभावाला जाणते; परंतु ते ज्ञेयांचे कर्ता नाही. अशी वास्तविकता जाणली तर पराचा अहंकार दूर होतो आणि स्वत:ला शांती मिळते.[४]''

वरील गाथा आणि त्यांच्या टीकेमध्ये पुद्गल स्कंधांची बनण्याची प्रक्रिया समजावली आहे. एकप्रदेशी पुद्गल परमाणू मूळ पुद्गल द्रव्य आहे आणि अनेक परमाणुंचा स्कंध पुद्गल द्रव्याच्या पर्याय आहेत.

पुद्गलाव्यतिरिक्त इतर द्रव्य एकक्षेत्रावगाहरूपे एकत्र रहात असूनही कधी आपसात मिसळत नाहीत. आकाश, धर्म व अधर्म – हे तर एकेकच

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १७२
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १७४
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १७५
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १७५

आहेत; त्यामुळे ह्यांचा मिसळण्याचा तर प्रश्नच येत नाही. हे आकाशादी द्रव्य देखील आपसात मिसळत नाहीत, वेगवेगळेच राहतात.

कालद्रव्य असंख्यात आहेत; परंतु ते देखील आपसात किंवा अन्य द्रव्यात कधीही मिसळत नाहीत. अशाप्रकारे धर्म, अधर्म, आकाश आणि काल – ह्या चार द्रव्यांमध्ये बंधाचा अभाव असल्यामुळे ह्यांच्यामध्ये बंधप्रक्रियेचा प्रश्नच येत नाही.

जीव अनंत आहेत, परंतु ते आपसात कधीही मिसळत नाहीत. ते आपसात तर मिसळतच नाहीत, शिवाय धर्म, अधर्म, आकाश व काल यांच्यात सुद्धा मिसळत नाहीत. होय, पुद्गलाशी त्यांचा संबंध अवश्य येतो म्हणजे बंध अवश्य होतो.

पुद्गलांचा आपसात बंध तर होतो, ते स्कंधरूप परिणमित होतातच. त्यांच्यामध्ये आपसात आणि जीवाशी त्यांच्या बंधाच्या प्रक्रियेचे काय स्वरूप आहेत – ही बाब येथे समजावली जात आहे.

वरील बंध होण्याचे कारण त्यांच्यात असणारी स्निग्धता आणि रूक्षता आहे. जरी जीवांमध्ये स्निग्धता व रूक्षता नसते, तरी देखील राग-द्वेष तर होतात. जीवाशी पौद्गलिक कर्मांचा बंध आणि नोकर्मांचा संबंध होण्याचे कारण जीवाची रागरूप स्निग्धता आणि द्वेषरूप रूक्षताच आहे. वरील बंध होण्याची संक्षिप्त प्रक्रिया येथे सांगत आहेत.

विशेष बाब ही आहे की पुद्गलांच्या स्कंधरूप परिणमणाला जीव जाणतात तर खरे, परंतु त्यांच्यामध्ये करत मात्र काहीच नाहीत. ●

जरी ही बाब सत्य आहे की सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्ररूप स्वभाव-पर्याय अनादी काळापासून नाही, तरी देखील अनादी-अनंत सदा उपलब्ध ज्ञानस्वभावाच्या दर्शनाचे नाव सम्यग्दर्शन, जाणण्याचे नाव सम्यग्ज्ञान आणि त्यामध्येच मग्न होण्याचे नाव सम्यक्चारित्र आहे, त्यामुळे सदा उपलब्ध त्रिकाळी ध्रुव आत्म्याचे दर्शन देखील स्वाधीन असल्याने सुलभच आहे. परंतु लौकिक संयोग पराधीन असल्याने सहज सुलभ नसून दुर्लभ आहेत.

– बारा भावना : एक अनुशीलन, पृष्ठ : १५६

प्रवचनसार गाथा १६६-१६७

जी बाब मागील गाथांमध्ये सांगितली आहे, तिलाच ह्या गाथांमध्ये आणखी विशेष विस्ताराने समजावित आहेत आणि हे सुद्धा सांगत आहेत की आत्मा त्या पुद्गल पिंडांचा कर्ता नाही.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

णिद्धत्तणेण दुगुणो चदुगुणणिद्धेण बंधमणुभवदि।
लुक्खेण वा तिगुणिदो अणु बज्झदि पंचगुणजुत्तो॥१६६॥
दुपदेसादी खंधा सुहुमा वा बादरा ससंठाणा।
पुढविजलतेउवाऊ सगपरिणामेहिं जायंते॥१६७॥

(हरिगीत)

दो अंश चिकने अणु चिकने-रूक्ष हो यदि चार तो।
हो बंध अथवा तीन एवं पाँच में भी बंध हो॥१६६॥
यदि बहुप्रदेशी कंध सूक्षम-थूल हों संस्थान में।
तो भूजलादि रूप हों वे स्वयं के परिणमन से॥१६७॥

दोन अंशवाला स्निग्ध परमाणुचा चार अंशवाल्या स्निध वा रूक्ष परमाणुशी बंध होतो किंवा तीन अंशवाल्या परमाणुचा पाच अंशवाल्या परमाणुशी बंध होतो.

दोन पासून अनंत प्रदेशवाल्या संस्थांनानी (आकारांनी) सहित सूक्ष्म आणि स्थूल स्कंध पृथ्वी, जल, अग्नी व वायुरूप स्वत:च्या परिणामांनीच होतात.

या गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"यथोक्त हेतुंनी परमाणुंचे पिंडत्व निर्धारित करून हे जाणावयास हवे की दोन व चार गुणवाल्या आणि तीन व पाच गुणवाल्या दोन स्निग्ध परमाणुंचा किंवा दोन रूक्ष परमाणुंचा अथवा दोन स्निग्ध-रूक्ष

परमाणुंचा म्हणजेच एक स्निग्ध व एक रूक्ष परमाणुचा आपसात बंध होतो – हे प्रसिद्ध आहे. म्हटले देखील आहे –

''णिद्धा णिद्धेण बज्झंति लुक्खा लुक्खा य पोग्गला।
णिद्धलुक्खा य बज्झंति रूवारूवी य पोग्गला॥''

''णिद्धस्स णिद्धेण दुराहिएण लुक्खस्स लुक्खेण दुराहिएण।
णिद्धस्स लुक्खेण हवेदि बंधो जहण्णवज्जे विसमे समे वा॥''

पुद्गल 'रूपी' व 'अरूपी' असतात. त्यांच्यापैकी स्निग्ध पुद्गलांचा स्निग्धाशी बंध होतो, रूक्ष पुद्गलांचा रूक्ष पुद्गलांशी बंध होतो, स्निग्ध व रूक्ष पुद्गलांचाही बंध होतो. जघन्याव्यतिरिक्त सम अंशवाला असो वा विषम अंशवाला असो, स्निग्धाचा दोन अधिक अंशवाल्या स्निग्ध परमाणुशी, रूक्षाचा दोन अधिक अंशवाल्या रूक्ष परमाणुशी व स्निग्धाचा (दोन अधिक अंशवाल्या) रूक्ष परमाणुशी बंध होतो.

कोण्या एका परमाणुच्या अपेक्षेने विसदृशजातीवाल्या समान अंशवाल्या दुसऱ्या परमाणुला 'रूपी' म्हणतात व शेष सर्व परमाणुंना त्या अपेक्षेने 'अरूपी' म्हणतात. जसे - पाच अंश स्निग्धतावाल्या परमाणुला पाच अंश रूक्षतावाला दुसरा परमाणू 'रूपी' आहे व शेष सर्व परमाणू त्याच्याकरिता 'अरूपी' आहेत. याचा अर्थ हा आहे की विसदृशजातीचे समान अंशवाले परमाणू आपसात 'रूपी' आहेत आणि सदृशजातीचे किंवा असमान अंशवाले परमाणू परस्पर 'अरूपी' आहेत.

अशाप्रकारे विशिष्ट अवगाहनशक्तीने सूक्ष्म किंवा स्थूल आणि विशिष्ट आकार धारण करण्याच्या शक्तीने अनेक प्रकारचा आकार धारण करणारे द्विप्रदेशादीक स्कंध आपल्या योग्यतेनुसार स्पर्शादी चतुष्काच्या आविर्भाव आणि तिरोभावाच्या स्वशक्तीने पृथ्वी, जल, अग्नी आणि वायुरूप आपल्या परिणामांनीच होतात.

यावरून हे निश्चित होते की द्विअणुक इत्यादी अनंतानंत पुद्गलांचा पिंडकर्ता आत्मा नाही.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीत ह्या गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिके-समानच स्पष्ट केला आहे. त्यामध्ये एवढी समानता आहे की ज्या गाथा तत्त्वप्रदीपिकेत उद्धृत केल्या आहेत, तात्पर्यवृत्तीमध्ये उदाहरणाच्या रूपात त्यांनाच उद्धृत केले आहे.

ह्या गाथांचा भाव कविवर वृंदावनदासजींनी १ मनहरण, १ छप्पय आणि ४ दोहे, अशाप्रकारे एकूण ६ छंदांच्या माध्यमातून प्रस्तुत केला आहे; त्यांच्यापैकी दोहे अणि छप्पय पुढीलप्रमाणे आहेत -

(दोहा)

चीकन की सम अंश तैं, विषम अंश तैं रुच्छ।
दोय अधिक होतें बँधैं, पुग्गलानु के गुच्छ ॥४६॥
चीकनता गुन की अनू, पाँच अंशजुत जौन।
सात अंश चीकन मिलै, बंध होतु है तौन ॥४७॥
चार अंश जुत रुच्छ सों, षट जुत सों बँध जात।
यही भाँति अनंत लगु, जानों भेद विख्यात ॥४८॥
दोय अनू अंशनि गिनैं, होहिं बराबर जेह।
ताको बँध बँधै नहीं, यों जिनवैन भनेह ॥४९॥

स्निग्ध सम अंशामध्ये आणि रूक्ष विषम अंशामध्ये एकापेक्षा दुसऱ्यामध्ये दोन अंश अधिक असल्यावर पुद्गल परमाणुंचा बंध होतो, त्यांचे स्कंध बनतात, गुच्छे बनतात. जो स्निग्धतेच्या गुणाचा अणु पाच अंशवाला असेल, त्याचा सात अंशवाल्या स्निग्ध अणुशी बंध होतो. चार अंशवाला रूक्ष गुण असणाऱ्याचा सहा अंशवाल्याशी बंध होतो. अशाच प्रकारे अनंत पर्यंत बंधनाची प्रक्रिया जाणावी.

दोन अणुंचा अंश जर समान असेल तर त्यांच्यामध्ये आपसात बंध होत नाही - असे जिनेंद्र भगवान म्हणतात.

(छप्पय)

दो प्रदेश आदिक अनंत, परमानु खंध लग।
सूच्छिम-बादररूप, जिते आकार धरे जग ॥
तथा अवनि जल अनल, अनिल परजाय विविध गन।
ते सब निग्ध रु रुच्छ, सुभावहितैं उपजे भन ॥

यह पुद्गलदरवरचित सरव, पुग्गल करता जानिये।
चिनमूरति यातैं भिन्न है, ताहि तुरित पहिचानिये ।।५०।।

ज्यांच्यामध्ये पृथ्वी, जल, अग्नी आणि हवा देखील सामिल आहे असे दोन प्रदेशांपासून अनंत प्रदेशांपर्यंत परमाणुंचे सूक्ष्म आणि स्थूल आकाराचे सर्व स्कंध स्निग्ध स्वभावामुळेच उत्पन्न झाले आहेत.

हे सर्व पुद्गलद्रव्याने निर्मित आहेत व पुद्गलच यांचे कर्ता आहे; चैतन्यमूर्ती आत्मा यांच्याहून पूर्णपणे वेगळा आहे. आत्मकल्याणाची भावना असेल तर त्याला तत्काळ जाणावे व ओळखावे लागेल.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी ह्या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''पाच अंश स्निग्ध परमाणुकरिता पाच अंश रूक्ष असा दुसरा परमाणू रूपी आहे व बाकीचे सर्व परमाणू त्याच्याकरिता अरूपी आहेत. याचा अर्थ हा झाला की विसदृश जातीचे समान अंशवाले परमाणू आपसात रूपी आहेत; सदृश जातीचे किंवा असमान अंशवाले परमाणू आपसात अरूपी आहेत.[१]

जघन्य एका अंशवाल्या परमाणुंना सोडता दोन अंशवाला असो वा तीन अंशवाला असो, त्यापैकी दोन अधिक अंशवाला परमाणू रूक्ष रूक्षाबरोबर, स्निग्ध स्निग्धाशी आणि स्निग्ध रूक्षाशी आपसात पिंडरूप होतात.[२]

केवळ एक अंशवाल्या परमाणुमध्ये जघन्यभाव असल्यामुळे त्यामध्ये स्कंधरूप होण्याची योग्यता नाही; त्यामुळे एक अंशवाला स्निग्ध किंवा रूक्ष परमाणुचा तीन अंशवाल्या स्निग्ध किंवा रूक्ष परमाणुशी बंध होत नाही.[३]

एक अंशवाला परमाणू सोडता दोन परमाणुंमध्ये दोन अंशांचे अंतर

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १७८
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १७८
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १७९

असेल तरच त्यांचा बंध होतो. दोनपेक्षा अधिक किंवा कमी अंशांचे अंतर असेल तर त्यांच्यात बंध होत नाही. उदाहरणार्थ पाच अंशवाल्या परमाणुचा सात अंशवाल्याशी बंध होतो; परंतु आठ अंशवाल्या किंवा सहा अंशवाल्या परमाणुशी बंध होत नाही.[१]

स्कंध स्वत:च्या विशिष्ट अवगाहनशक्तीमुळे सूक्ष्म आणि स्थूलरूप होतो. शरीर, लाकूड इत्यादी स्थूल स्कंध आहेत आणि भाषावर्गणा, कार्मणवर्गणा इत्यादी सूक्ष्म स्कंध आहेत.[२]

स्कंधांमध्ये स्वत:च एक **विशिष्ट अवगाहन शक्ती** आहे, त्यामुळेच ते स्मूक्ष आणि स्थूलरूप धारण करतात. आत्मा त्यांचा कर्ता-हर्ता नाही. आत्मा आहे, त्यामुळे शरीरादींची, लाकडाची किंवा घराची स्थूल अवस्था होते, ही बाब पूर्णपणे मिथ्या आहे. स्थूल किंवा सूक्ष्म कोणत्याही स्कंधाचा कर्ता, हर्ता किंवा प्रेरक आत्मा अजिबात नाही.

ते स्कंध स्वत:च्या विशिष्ट आकार धारण करण्याच्या शक्तीमुळे विचित्र आकार धारण करतात. ते आकार घडण्याचे कारण आत्मा नाही. मातीच्या पिंडापासून माठाचा आकार तयार होतो, तो मातीमुळेच होतो; कुंभारामुळे नव्हे. निमित्त असतील तर आकार बदलतो व निमित्त आले नाहीत तर आकार बदलत नाही - असे मानणे मोठी चूक आहे.[३]

अशाप्रकारे हे निश्चित होते की दोन परमाणुंच्या स्कंधापासून अनंतानंत परमाणुंच्या स्कंधांपर्यंत सर्व स्वत:मुळेच परिणमित होत आहेत, त्यांचा कर्ता आत्मा नाही. अज्ञानी जीव मानतो की मी आहे तर पुद्गलांच्या अवस्था होतात; परंतु हा जीवाचा भ्रम आहे. संयोगी दृष्टी असणारा जीव नेहमी स्व व पर – दोहोंना संयोगाच्या दृष्टीनेच पाहतो; परंतु हा आत्मा पराच्या संयोगाने रहित, निमित्त व विकारानेही रहित आहे, जो जीव आपल्या आत्म्याला ज्ञाता-दृष्टास्वभाववान आहे – असे जाणतो, तो परपदार्थांना त्यांच्या स्वभावाच्या दृष्टीने जाणतो.

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १७९
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १८१
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १८३

अशाप्रकारे स्कंधांच्या विविध अवस्थांचा कर्ता-हर्ता किंवा व्यवस्थापक आत्मा नसून जड स्कंध स्वत:च स्वत:चा व्यवस्थापक आणि कर्ता-हर्ता आहे – असे स्कंधांना, ज्ञेयांना जाणणेच धर्माचे कारण आहे.[१]''

वरील संपूर्ण कथनाचा सारांश हा आहे की पुद्गलपरमाणू द्रव्यांची आपसामध्ये स्कंधरूप बंधण्याची एक सुनिश्चित प्रक्रिया आहे. त्या प्रक्रियेचे संक्षिप्त विवेचन येथे केलेले आहे. याचे विस्तृत विवेचन करणानुयोगाच्या ग्रंथांमध्ये मिळेल. ह्या संदर्भात ज्यांना विशेष जिज्ञासा असेल, त्यांनी आपली जिज्ञासा वरील ग्रंथांच्या अध्ययनाने शांत करावी.

येथे संक्षिप्त कथन केल्यानंतर ह्या गोष्टीवर विशेष बळ दिले आहे की पुद्गल परमाणू आणि स्कंधांपैकी जी शरीरादींची रचना होते, त्यामध्ये देखील आत्मा केवळ निमित्तरूपच आहे; ती संपूर्ण रचना पुद्गलांच्या पर्यायगत योग्यतेमुळे स्वसमयामध्ये स्वयमेव होते.

त्यामुळे आत्मार्थी बांधवांनी त्यामध्ये आपल्या इच्छेनुसार फेरफार करण्याचा विकल्प तर करूच नये आणि कोणत्याही प्रकारची आकुलता देखील करू नये.

जर चारित्रगत कमजोरीमुळे विकल्प उत्पन्न झालाच, थोडी-फार आकुलता झाली तरी त्या विकल्प व आकुलतेला सहजतेने आपल्या ज्ञानाचे ज्ञेय बनवावे. त्यावर अधिक क्रिया-प्रतिक्रिया व्यक्त करण्याची आवश्यकता नाही, शिवाय व्यर्थ अधिक आकुलता करण्याची सुद्धा आवश्यकता नाही.

ह्या गाथांमध्ये आणि त्यांच्या टीकेमध्ये एक तर हे स्पष्ट केले आहे की भगवान आत्मा ज्ञानावरणादी कर्म आणि शारीरिक नोकर्मांचा कर्ता-धर्ता नाही आणि दुसरी बाब ही सांगितली आहे की आत्मा ज्ञानावरणादी कर्मांकरिता कार्माण वर्गणा कोठून आणतही नाही.

आणण्याची आवश्यकताही नाही; कारण जसे संपूर्ण लोकाकाशात

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १८४

संसारी जीव ठसाठस व्याप्त आहेत, कोठेही किंचितही जागा रिकामी नाही; त्याचप्रमाणे कार्माण वर्गणा देखील संपूर्ण लोकात सर्वत्र विद्यमान आहेत; त्यामुळे त्यांना कोठूनही आणण्याची आवश्यकताच नाही.

जेथे जीव आहेत आणि त्यांच्या स्वत:मुळेच त्यांना ज्याप्रकारचे रागादी भाव होतात, त्याच समयी तेथे विद्यमान कार्मणवर्गणा स्वत:च तदनुरूप कर्मरूप परिणमित होतात, त्यांना इतरत्र बाहेरून वगैरे आणावे लागत नाही.

जरी दोहोंमध्ये सहज निमित्त-नैमित्तिकभाव असतो; तरीही ते स्वत: आप-आपल्या पर्यायगत योग्यतेमुळे परिणमित होतात.

अशाप्रकारे ह्या गाथा व त्यांच्या टीकेमध्ये हे स्पष्ट केले आहे की पौद्गलिक स्कंधांचा आपसात बंध आणि कार्माण वर्गणांच्या स्कंधांचा आत्म्याशी बंध कशाप्रकारे होतो आणि त्या बंधाच्या क्रियेचा कर्ता-धर्ता कोण आहे.

●

एकाच भूमिकेत ज्ञानी जीवांच्या संयोग व संयोगी भावांमध्ये महान अंतर असू शकते. कोठे क्षायिक सम्यग्दृष्टी सौधर्म इंद्र आणि कोठे सर्वार्थसिद्धीचे क्षायिक सम्यग्दृष्टी अहमिंद्र. सौधर्म इंद्र तर जन्मकल्याणकामध्ये येऊन नाभिरायाच्या दरबारात तांडव नृत्य करतो आणि सर्वाथसिद्धीचे अहमिंद्र दीक्षाकल्याणक, ज्ञानकल्याणक आणि मोक्षकल्याणकामध्येही येत नाहीत, दिवध्वनी ऐकण्याकरिता सुद्धा येत नाहीत.

संयोग आणि संयोगी भावांमध्ये महान अंतर असून देखील दोहोंची भूमिका समान आहे, सारखीच आहे. त्यामुळे संयोगीभावांच्या आधारे राग किंवा वैराग्याचा निर्णय करणे उचित नाही, ज्ञानी-अज्ञानीचा निर्णय देखील संयोग व संयोगीभावांच्या आधारे केला जाऊ शकत नाही. **–पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव, पृष्ठ : ३९**

प्रवचनसार गाथा १६८-१६९

१६६ व १६७ व्या गाथेमध्ये 'आत्मा पुद्गलपिंडांचा कर्ता नाही' – हे सिद्ध केल्यानंतर आता आगामी गाथांमध्ये हे सिद्ध करीत आहेत की ज्याप्रमाणे हा आत्मा पुद्गलपिंडांचा कर्ता नाही; त्याचप्रमाणे त्यांना आणणारा देखील नाही आणि पुद्गलपिंडांना कर्मरूप देखील करीत नाही.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

ओगाढगाढणिचिदो पोग्गलकायेहिं सव्वदो लोगो।
सुहुमेहि बादरेहि य अप्पाओग्गेहिं जोग्गेहिं॥१६८॥
कम्मत्तणपाओग्गा खंधा जीवस्स परिणइं पप्पा।
गच्छंति कम्मभावं ण हि ते जीवेण परिणमिदा॥१६९॥

(हरिगीत)

भरा है यह लोक सूक्ष्म-थूल योग्य-अयोग्य जो।
कर्मत्व के वे पौद्गलिक उन खंध के संयोग से॥१६८॥
स्कन्ध जो कर्मत्व के हों योग्य वे जिय परिणति।
पाकर करम में परिणमें न परिणमावे जिय उन्हें॥१६९॥

हे लोक कर्मत्वाला योग्य व अयोग्य सूक्ष्म आणि बादर – पुद्गल स्कंधांनी संपूर्णपणे व्याप्त आहे.

जीवाच्या परिणतीला निमित्तरूपे प्राप्त करून कर्मत्वाला योग्य स्कंध कर्मरूप परिणमित होतात; जीव त्यांना परिणमवित नाही.

आचार्य अमृतचंद्रांनी ह्या गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''अति सूक्ष्म व अति स्थूल नसल्यामुळे कर्मरूप परिणमित होण्याच्या शक्तीने संपन्न आणि अति सूक्ष्म व अति स्थूल असल्यामुळे कर्मरूप परिणत होण्याच्या शक्तीने रहित पुद्गल स्कंधांद्वारे अवगाहनेच्या वैशिष्ट्यामुळे आपसात बाधा उत्पन्न न करता स्वयमेव सर्व प्रदेशांनी

संपूर्ण लोक व्याप्त आहे.

यामुळे निश्चित होते की आत्मा पुद्गल पिंडांना घेऊन येत नाही.

आता हे स्पष्ट करतात की आत्मा पुद्गल पिंडांना कर्मरूप करीत नाही. कर्मरूप परिणमित होण्याच्या शक्तीने संपन्न पुद्गल स्कंध तुल्य क्षेत्रावगाही बाह्य कारणरूप जीवाच्या मात्र परिणामाचा आश्रय घेऊन स्वत:च कर्मभावरूप परिणमित होतात. यामुळे हे निश्चित होते की आत्मा पुद्गलपिंडांना कर्मरूप करणारा नाही.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये जरी ह्या गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिकेसमानच प्रस्तुत केला, तरीही ह्या विवेचनेचा निष्कर्ष त्यांनी पुढीलप्रमाणे लिहिला आहे –

''आता हा अर्थ आहे की निश्चयाने शुद्धस्वरूप असूनही, व्यवहाराने कर्मोदयाच्या अधीन असल्याने पृथ्वी इत्यादी पाच सूक्ष्म-स्थावरत्वाला प्राप्त जीवांनी लोक जसे भरलेले असते, तसेच पुद्गलांनी सुद्धा व्याप्त असते. यावरून हे ज्ञात होते की ज्या शरीरावगाहक्षेत्रात जीव राहतो, त्यामध्ये बंधयोग्य पुद्गलही राहतात; जीव त्यांना बाहेरून आणत नाही.''

ह्या गाथांचा भाव कविवर वृंदावनदासजींनी १ दोहा आणि २ मनहरण छंदांच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे समजाविला आहे –

(मनहरण कवित्त)

लोकाकाश के असंख प्रदेश प्रदेश प्रति,
कारमानवर्गना भरी है पुद्गल की।
सूच्छिम और बादर अनंतानंत सर्वठौर,
अति अवगाढागाढ संधिमाहिं झलकी॥
आठ कर्मरूप परिनमन सुभाव लियैं,
आतमा के गहन करन जोग बल की।
तेईस विकार उपयोग को संजोग पाय,
कर्मपिंड होय बंधै रहै संग ललकी॥५१॥

अनंतानंत सूक्ष्म व बादर पौद्गलिक कार्मण वर्गणा लोकाकाशाच्या

असंख्य प्रदेशांमध्ये प्रत्येक प्रदेशावर ठसाठस भरलेल्या आहेत. आठ कर्मरूप परिणमन-स्वभाव धारण करणाऱ्या ह्या वर्गणा आत्म्याच्या विकारी उपयोगाच्या संयोगामुळे कर्मपिंड होऊन आत्म्याशी बांधल्या जातात.

(दोहा)

तातैं पुद्गल करम को, आतम करता नाहिं।
भूल भावतैं जीव कै, करम धूलि लपटाहिं ॥५२॥

त्यामुळे पौद्गलिक कर्मांचा कर्ता आत्मा नाही. आत्म्याच्या चुकीच्या परिणामांचे निमित्त मिळाल्याने कर्मरूप धूळ आत्म्याशी चिकटते.

(मनहरण कवित्त)

कर्मरूप होन की सुभाव शक्ति जामैं वसै,
ऐसे जे जगत माहिं पुग्गल के खंध हैं।
तेई जब जगतनिवासी जग जीवनि के,
परिनाम अशुद्ध को पावैं सनबंध हैं॥
तबै ताईं काल कर्मरूप परिनवैं सोई,
ऐसो वृन्द अनादि तैं चलो आवै धंध है।
ते वै कर्मपिंड आतमा ने प्रनवाये नाहिं,
पुग्गल के खंध ही सों पुग्गल को बंध है॥५३॥

कर्मरूप परिणमनाची स्वाभाविक शक्ती असणारे जे पुद्गल स्कंध ह्या विश्वात आहेत, ते संसारी जीवांच्या अशुद्ध परिणामांचे निमित्त मिळाल्याने त्याच समयी कर्मरूप परिणमित होऊन जीवांशी बाधले जातात.

कविवर वृंदावनदासजी म्हणतात की अशाप्रकारचा हा धंदा अनादी काळापासून चालत आला आहे. वास्तविक बाब ही आहे की त्या कर्मपिंडांना आत्म्याने परिणमित केले नाही; त्यामुळे हे नक्की आहे की पुद्गलांचा बंध तर पुद्गलाशीच आहे, आत्म्याशी नव्हे.

वास्तविक बाब ही आहे की बंधप्रक्रियेसंबंधी हे प्रकरण करणानुयोगाशी संबंधित आहे. त्यामुळे सर्व विद्वानांचे वर्णन समान होऊ शकत नाही. म्हणून सर्वांचे उद्धरण दिल्याने पुनरावृत्ती अधिक होते, ही बाब लक्षात घेता येथे देवीदासजींचे उद्धरण दिलेले नाही.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी ह्या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''कर्म होण्यायोग्य परमाणू अति सूक्ष्म नसतात; कारण कर्म अनंत परमाणुंचा समूह आहे. एका परमाणुपासून असंख्य परमाणू सुद्धा कर्मरूप होण्योयाग्य नाहीत. अनंत परमाणू मिळून कर्मरूप परिणमित होतात.

तसेच अति स्थूलरूप परमाणू देखील कर्मरूप परिणमित होत नाहीत. कर्म परमाणू जसे अति सूक्ष्म नसतात, तसेच ते अति स्थूल देखील नसतात.

कर्मरूप परिणमित होणे किंवा न परिणमणे ही परमाणुंची योग्यता आहे. ही परमाणुंच्या समया-समयाच्या योग्यतेची बाब आहे.[१]

ज्याप्रमाणे घर बनविण्याकरिता गावाबाहेरून लाकूड आणावे लागते; तसेच आत्मा राग-द्वेष करतो तेव्हा कर्माची लाकडे बाहेरून आणावी लागतात – असे नव्हे. जीव जेवढ्या प्रमाणात राग-द्वेष करतो, तेवढ्या प्रमाणात कर्मयोग्य तेवढे परमाणू स्वत:च (स्वत:मुळेच) परिणमतात. आत्मा त्या परमाणुंना बाहेरून आणत नाही.[२]

कर्मरूप परिणमित होण्याची योग्यता असणारे पुद्गल स्कंध जीवाशी एक क्षेत्रावगाही होतात. ते जीवाच्या परिणामांचे निमित्त मिळाल्याने कर्मरूप परिणमितात. त्या स्कंधांचे ज्ञानावरणादी प्रकृतीरूप परिणमणे अंतरंग साधन आहे व जीवाचे परिणाम केवळ बाह्य साधन आहेत.

दोहोंचे स्वतंत्र परिणमन एकाच समयात होते, त्यामध्ये काळाचा फरक नसतो. यावरून हे सिद्ध होते की आत्मा पुद्गलपिंडांना कर्मरूप परिणमवित नाही.

एका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या जीवाचे विकारी परिणामांना केवळ निमित्त बनवून कर्मयोग्य पुद्गल आपल्या अंतरंग शक्तीने ज्ञानावरणादी कर्मरूप परिणमित होतात. जीव त्यांना परिणमवित नाही.[३]''

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १८६ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १८७
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १८९

अशाप्रकारे ह्या गाथा व त्यांच्या टीकेत म्हटले आहे की ज्याप्रमाणे हे लोक अनंत जीवांनी ठासून भरलेले आहे; त्याचप्रमाणे ते अनंत कार्मण वर्गणांनी देखील भरलेले आहे; त्यामुळे जेव्हा ह्या आत्म्याच्या रागादी परिणामांचे निमित्त मिळते, तेव्हा कार्मण वर्गणा आपल्या पर्यायगत योग्यतेने कर्मरूप परिणमित होतात; तेव्हा त्या वर्गणांना इतर कोणत्या जागेहून आणावे लागत नाही, तर जेथे जीव आहे, त्याच स्थानावर असणाऱ्या कार्मणवर्गणाच कर्मरूप परिणमित होतात.

अशाप्रकारे हे सुनिश्चित झाले की आत्मा पौद्गलिक कार्मणवर्गणांना कर्मरूप परिणमवित नाही आणि त्यांना कोठून आणत देखील नाही. तेथेच असणाऱ्या कार्मणवर्गणा आत्म्याच्या रागादी परिणामांच्या निमित्ताने कर्मरूप परिणमित होतात, आत्म्याशी त्यांचा बंध होतो – असा सहज निमित्त-नैमित्तिक भाव बनतो. ●

समवशरणामध्ये बाग-बगीचे आहेत, नृत्यशाळा-नाट्यगृह आहेत, त्यांचे दर्शन सम्यग्दर्शनाचे निमित्त होत नाही, तर दिव्यध्वनीमध्ये येणारा जो मूळ तत्त्वोपदेश आहे, तोच सम्यग्दर्शनाचे देशनालब्धीरूप निमित्त आहे.

रंगारंग कार्यक्रम तर राग-रंगामध्येच निमित्त ठरतात, वीतरागतारूप धर्माचे निमित्त तर वीतरागतेचे पोषक कार्यक्रमच असू शकतात. त्यामुळे सम्यग्दर्शनाच्या निमित्तभूत या महोत्सवांमध्ये यावर विशेष लक्ष दिले पाहिजे की अधिकतम कार्यक्रम वीतरागतेचेच पोषक असावेत. तदर्थ शुद्धात्म्याच्या स्वरूपाच्या प्रतिपादक प्रवचनांचे समायोजन अधिकाधिक केले जावे. इतर कार्यक्रमांमध्येही वीतरागतेच्या पोषक चर्चांचे समायोजन सर्वाधिक व्हावे.

– पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव, पृष्ठ : ७२-७३

प्रवचनसार गाथा १७०-१७१

'आत्मा पुद्गल कर्मांचाही कर्ता नाही आणि त्यांना तो कोठून घेऊन देखील येत नाही' – मागील गाथांमधून हे सिद्ध केल्यानंतर आता ह्या गाथांमध्ये हे समजावित आहेत की औदारिक इत्यादी शरीर पौद्गलिक आहेत व ते जीवाशी स्वत:च बंधतात.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

ते ते कम्मत्तगदा पोग्गलकाया पुणो वि जीवस्स।
संजायंते देहा देहंतरसंकमं पप्पा ॥१७०॥
ओरालिओ य देहो देहो वेउव्विओ य तेजसिओ।
आहारय कम्मइओ पोग्गलदव्वप्पगा सव्वे ॥१७१॥

(हरिगीत)

कर्मत्वगत जड़पिण्ड पुद्गल देह से देहान्तर।
को प्राप्त करके देह बनते पुन-पुनः वे जीव की ॥१७०॥
यह देह औदारिक तथा हो वैक्रियक या कार्मण।
तेजस अहारक पाँच जो वे सभी पुद्गलद्रव्यमय ॥१७१॥

कर्मरूप परिणमित ते-ते पुद्गलपिंड देहांतररूप परिवर्तित होऊन पुन:-पुन: शरीर बनतात.

औदारिक शरीर, वैक्रियिक शरीर, आहारक शरीर, तैजस शरीर आणि कार्मण शरीर – हे सर्व पुद्गलद्रव्यात्मक आहेत.

ह्या गाथांचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये संक्षेपात खालीलप्रमाणे समजाविला आहे –

''ज्या जीवाच्या परिणामांना निमित्तमात्र करून जे-जे पुद्गलकाय (पुद्गलपिंड) स्वयमेव कर्मरूप परिणमित होतात; अनादी संततीरूप प्रवर्तमान देहांतर (भवांतर) रूप परिवर्तनाचा आश्रय घेऊन ते-ते पुद्गलकाय स्वयमेव शरीर बनतात. यावरून हे निश्चित होते की कर्मरूप परिणत पुद्गलद्रव्यात्मक शरीराचा कर्ता आत्मा नाही.

औदारिक, वैक्रियिक, आहारक, तैजस व कार्मण शरीर पुद्गल द्रव्यात्मक आहेत. यावरून हे निश्चित होते की शरीर आत्मा नाही.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेत वरील गाथांचा अर्थ तत्त्वप्रदीपिकेसमानच स्पष्ट केला आहे, परंतु यावरून काय सांगितले ? – असा प्रश्न उपस्थित करून त्याच्या उत्तरादाखल निष्कर्ष लिहिला आहे की औदारिक शरीर नामक नामकर्मरहित परमात्म्याला प्राप्त न करणाऱ्या अज्ञानी जीवांद्वारे उपार्जित औदारिक शरीर नामकर्म त्यांना भवांतरामध्ये प्राप्त होते व उदयाला येते; त्यांच्या उदयामुळे पुद्गल औदारिकादी शरीराच्या आकारामध्ये स्वतःच परिणमित होतात.

यामुळेच तर जीव औदारिकादी शरीरांचा कर्ता होत नाही.

कविवर वृंदावनदासजींनी ह्या गाथांचा भाव दोन छंदांच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मनहरण कवित्त)

जे जे दर्वकर्म परिनये रहे पुग्गल के,
कारमानवर्गना सुशक्ति गुप्त धरिके।
तेई फेर जीव के शरीराकार होहि सब,
देहान्तर जोग पाये शक्त व्यक्त करिके॥
जैसे बटबीज में सुभाव शक्ति वृच्छ की सो,
वटाकार होत वही शक्ति को उछरिके।
ऐसे दर्वकर्म बीजरूप लखो वृन्दावन,
ताही को सुफल देह जानों मर्म हरिके॥५४॥
औदारिक देह जो विराजै नरतीरक के,
नानाभाँति तास के अकार की है रचना।
तथा वैक्रीयक शरीर देव-नारकी के,
जथाजोग ताहू के अकार की है रचना॥
तैजस शरीर जो शुभाशुभ विभेद औ,
अहारक तथैव कारमान की विरचना।
ये तो सर्व पुग्गल दरव के बने हैं पिंड,
यातैं चिदानंद भिन्न ताहीसों परचना॥५५॥

गुप्त शक्तीची धारक पौद्गलिक कार्मण वर्गणा ज्या-ज्या द्रव्यकर्मरूप परिणमित झाल्या आहेत; ते कर्म उदयाला आल्यानंतर आहारादी वर्गणा औदारिक इत्यादी शरीररूप परिणमित होऊन भवांतरामध्ये देखील देहादीरूप परिणमित होतात.

ज्याप्रमाणे वटवृक्ष बनण्याची शक्ती वटबीजामध्ये विद्यमान असते आणि ती योग्य समयी उल्हसित होऊन वटवृक्षरूप होते; त्याचप्रमाणे द्रव्यकर्माला बीजरूप जाणावे आणि त्याच्या सुफळाच्या रूपात ह्या देहाला जाणावयास हवे. तात्पर्य असे आहे की नोकर्मरूप देह हा देह नामक नामकर्माच्या उदयाचा परिणाम आहे.

ज्याची रचना अनेक प्रकारची होते – असे औदारिक शरीर मनुष्य आणि तिर्यंचांचे असते. यथायोग्य ज्याची रचना असते – असे वैक्रियिक शरीर देव आणि नारकी जीवांचे असते. शुभ आणि अशुभ अशा दोन प्रकारे तैजस शरीर दोन प्रकारचे असते. आहारक आणि कार्मण शरीराची रचना देखील विशेष प्रकारे होते.

वरील सर्व शरीर तर पुद्गलाचे पिंड आहेत आणि भगवान आत्म्याची संरचना यांच्याहून पूर्णपणे भिन्नच आहे.

ह्या गाथांचा भाव आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''येथे मुख्यता तर शरीराच्या चर्चेची आहे, त्यामध्ये मन, वाणीचे परमाणू देखील सोबतच ग्रहण करावेत. त्यामुळे जे परमाणू मनरूप किंवा वाणीरूप परिणमित होतात, त्यामध्येही कर्म निमित्तरूप असते.[१]

येथे तर शरीर, मन, वाणी इत्यादी नोकर्माच्या कारणरूप कर्म पुद्गलच घेतले आहेत व आत्म्याला निमित्तरूपही म्हटले नाही. त्यामुळे आत्मा त्यांचा कर्ता नाही.[२]

ज्याप्रमाणे दिव्यध्वनी स्वत:च परिणमित होते; त्याचप्रमाणे संसारी जीवाच्या भाषेचे पुद्गल देखील आपल्या स्वत:च्या परिणमनाच्या स्वकाळात वाणीरूप होऊन बाहेर पडतात.

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १९१ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १९१

अनंतवीर्यवान तीर्थंकर भगवान देखील भाषेची पर्याय करू शकत नाहीत तर मग त्यांच्यापेक्षा अनंतपट कमी ज्याचे वीर्य आहे – असा संसारी जीव भाषेची पर्याय करू शकणे कसे शक्य आहे ?[१]

जैन सिद्धांत प्रवेशिकेमध्ये म्हटले आहे की मनुष्य आणि तिर्यंचाचे औदारिक शरीर असते, नारकी व देवांचे वैक्रियिक शरीर असते तसेच एखाद्या मुनिराजांचे आहारक शरीर असते, शिवाय तैजस व कार्मण शरीर तर सर्वच संसारी जीवांना असते आणि येथे तर म्हणत आहेत की जीवाला शरीर नसतेच, शरीर तर पुद्गल जड परमाणुंचे बनेलेले आहे. सिद्धांत प्रवेशिकेमध्ये संसारी दशेतील संयोगाबद्दल ज्ञान करविले आहे; परंतु शरीर आत्म्याचे आहे – असा आशय येथे नाही. पाच शरीर पुद्गल परमाणुंनी बनलेले आहेत. रूक्ष-स्निग्धतेमुळे पुद्गल स्कंध बनलेले आहेत, अवगाहनेमुळे स्थूल-सूक्ष्म बनलेले आहेत, आकारामुळे भिन्न-भिन्न संस्थान असते.

कर्माच्या योग्यतेमुळे स्कंध कर्मरूप होतात आणि कर्माचे निमित्त मिळाल्याने वेग-वेगळे शरीर होतात. आत्मा त्यांचा कर्ता नाही, त्यामुळे आत्मा शरीर नाही – असे निश्चित होते.[२]''

वरील संपूर्ण कथनाचा सारांश हा आहे की हे औदारिक शरीर शरीर नामक नामकर्माच्या उदयानुसार होणारे नोकर्मरूप परिणमन आहे. नामकर्म देखील पौद्गलिक आहे आणि त्याच्या उदयानुसार होणारे नोकर्मरूप शरीर देखील पूर्णपणे पुद्गलाची रचना आहे; त्यामुळे यांचा कर्ता-धर्ता पुद्गलच आहे, आत्मा नव्हे.

वास्तविक बाब ही आहे की हा ज्ञानानंदस्वभावी भगवान आत्मा आणि मन-वचन-कायरूप औदारिक शरीर पूर्णपणे भिन्न-भिन्न आहेत; त्यामुळे ते शरीरादी स्वतःच स्वतःचे स्वामी आहेत आणि स्वतःच स्वतःचे कर्ता-भोक्ता आहेत. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १९२ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : १९४

प्रवचनसार गाथा १७२

मागील गाथेत 'औदारिक वगैरे शरीरे आत्मा नाहीत' – हे स्पष्ट केल्यानंतर आता सांगत आहेत की शरीरादी सर्व परद्रव्यांहून आत्म्याला भिन्न सांगणाऱ्या आत्म्याचे असाधारण स्वलक्षण काय आहे ?

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

अरसमरूवमगंधं अव्वत्तं चेदणागुणमसद्दं।
जाण अलिंगग्गहणं जीवमणिद्दिट्ठसंठाणं॥१७२॥

(हरिगीत)

चैतन्य गुणमय आतमा अव्यक्त अरस अरूप है।
जानो अलिंगग्रहण इसे यह अनिर्दिष्ट अशब्द है॥१७२॥

जीवाला असे जाणा की तो अरस आहे, अरूप आहे, अगंध आहे, अव्यक्त आहे, अशब्द आहे, अनिर्दिष्टसंस्थान आहे, चेतना गुणाने युक्त आहे आणि अलिंगग्रहण आहे.

आत्म्याच्या स्वरूपाला स्पष्ट करणारी सर्वाधिक महत्त्वपूर्ण ही तीच गाथा आहे, जी आचार्य कुंदकुंदांच्या पाचही ग्रंथांमध्ये आढळते. समयसार ग्रंथाची ४९ वी, नियमसारातील ४६ वी, पंचास्तिकायमध्ये १२७ वी, अष्टपाहुड ग्रंथाच्या भावपाहुडमध्ये ६४ वी आणि ह्या प्रवचनसार ग्रंथामध्ये ही १७२ वी गाथा तर आहेच.

आचार्य कुंदकुंदांच्या ग्रंथांव्यतिरिक्त इतर ग्रंथात सुद्धा ही गाथा आढळते. धवला ग्रंथाच्या तिसऱ्या भागातही ही गाथा आहे व पद्मनंदी पंचविंशतिका, द्रव्यसंग्रह इत्यादी ग्रंथात ही गाथा उद्धृत केलेली आहे.

अशाप्रकारे आत्म्याच्या स्वरूपाचे प्रतिपादन करणारी ही गाथा जिनागमाची सर्वाधिक महत्त्वपूर्ण गाथा आहे.

ह्या गाथेमध्ये अरस, अरूप, अगंध इत्यादी आठ विशेषणांद्वारे आत्म्याचे स्वरूप समजाविले आहे.

ही बाबही कोणापासून लपलेली नाही की आचार्य अमृतचंद्रांनी कुंदकुंदत्रयीवर महत्त्वपूर्ण टीका लिहिल्या आहेत. समयसारवर आत्मख्याती, पंचास्तिकायवर समयव्याख्या व प्रवचनसारवर तत्त्वप्रदीपिका नावाच्या टीका लिहिल्या आहेत.

त्यांनी आपल्या ह्या तिन्ही टीकांमध्ये ह्या गाथेचा अर्थ भिन्न-भिन्न प्रकारे स्पष्ट केला आहे. तो अर्थ अद्भूत आहे व मुळातून पठनीय आहे, मननीय आहे, सखोलतेने अध्ययन करण्यास योग्य आहे व विशिष्ट प्रयोजनाची सिद्धी करविणारा आहे.

समयसाराच्या आत्मख्याती टीकेत अरस, अरूप, अगंध, अव्यक्त व अशब्द पदांच्या व्याख्येवर बळ देण्यात आले आहे, त्यांच्यापैकी प्रत्येकाचे सहा-सहा अर्थ सांगितले आहेत व अनिर्दिष्टसंस्थानचे चार अर्थ सांगितले आहेत; परंतु अलिंगग्रहणाचा सामान्य असा एकच अर्थ सांगून त्याला सोडून दिले आहे; परंतु प्रवचनसाराच्या ह्या तत्त्वप्रदीपिका टीकेत परिस्थिती एकदम वेगळी आहे. यामध्ये अरसादी विशेषणांचा एकेकच अर्थ सांगितला आहे व अलिंगग्रहणाच्या एका सामान्य अर्थाव्यतिरिक्त वीस आणखी अर्थ सांगितले आहेत. ते सर्वच अद्भूत आहेत, सखोल अध्ययन करण्यायोग्य आहेत, मंथन करण्यायोग्य आहेत.

तत्त्वप्रदीपिकेत सांगितलेल्या विशेष अर्थांवर विचार करण्यापूर्वी एक बाब आणखी जाणणे आवश्यक आहे. ती म्हणजे मूळ गाथेत पुद्गलाच्या स्पर्श गुणाचा निषेध करणारा कोणताही शब्द नाही, त्यामुळे त्याला आत्मख्यातीमध्ये छंदानुरोधाने सुटलेला मानून सामिल केले आहे व त्याचेही सहा अर्थ सांगितले आहेत, परंतु प्रवचनसारच्या तत्त्वप्रदीपिका टीकेत अव्यक्त शब्दाचाच अर्थ अस्पर्श सांगितला आहे, परंतु आत्मख्यातीमध्ये अव्यक्त शब्दाचे वेगळे चार अर्थ सांगितले आहेत.

वरील सामान्य माहिती दिल्यानंतर आता हे स्पष्ट करीत आहोत की ह्या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी ह्या प्रवचनसार ग्रंथाच्या तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये कशाप्रकारे केला आहे. टीकेचा मराठी अनुवाद पुढीलप्रमाणे आहे –

''रस गुणाच्या अभावरूप स्वभाववाला असल्याने, रूप गुणाच्या अभावरूप स्वभाववाला असल्यामुळे, गंध गुणाच्या अभावरूप स्वभाववाला असल्याने, स्पर्श गुणरूप व्यक्ततेच्या अभावरूप स्वभाव-वाला असल्याने, शब्द पर्यायाच्या अभावरूप स्वभाववाला असल्याने व ह्या सर्वांमुळे लिंगाद्वारे अग्राह्य असल्याने व सर्व संस्थानांच्या अभावरूप स्वभाववाला असल्याने आत्मा अरस आहे, अरूप आहे, अस्पर्श (अव्यक्त) आहे, अशब्द आहे, अलिंगग्रहण आहे व अनिर्दिष्टसंस्थान-वाला आहे; यामुळे हा आत्मा पुद्गलाहून भिन्न आहे.

पुद्गल आणि अपुद्गल – अशा समस्त अजीव द्रव्यांहून विभागाचे मूळ साधन तर चेतना गुणवान असणे आहे. केवळ तोच स्वजीवद्रव्याश्रित असल्यामुळे स्वलक्षणपणाला धारण करीत आत्म्याला अन्य द्रव्यांहून भिन्न सिद्ध करतो.

जरी येथे अलिंगग्राह्य म्हणावयास हवे होते, तरी देखील येथे अलिंगग्रहण म्हटले आहे – यावरून हा संकेत मिळतो की या विशेषणाचे अनेक अर्थ आहेत.

ते अनेक अर्थ पुढीलप्रमाणे आहेत –

१) ज्ञायक आत्मा लिंग अर्थात इंद्रियांद्वारे जाणत नाही, त्यामुळे अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा अतींद्रिय ज्ञानमय आहे – हा अर्थ निघतो.

२) ज्याला लिंग अर्थात इंद्रियांद्वारे जाणले जात नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा इंद्रियप्रत्यक्षाचा विषय नाही – हा अर्थ निष्पन्न होतो.

३) ज्याप्रमाणे धुराहून अग्नीचे ग्रहण (ज्ञान) होते, त्याचप्रमाणे लिंग अर्थात इंद्रियगम्य (इंद्रियाने जाणण्यायोग्य) चिह्नाद्वारे ज्याचे ग्रहण होत नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा इंद्रियप्रत्यक्षपूर्वक अनुमानाचा विषय नाही – हा अर्थ यावरून होतो.

४) इतरांद्वारे केवळ लिंगाद्वारेच (अनुमानाद्वारेच) ज्याचे ग्रहण

होत नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा केवळ अनुमानानेच ज्ञात करण्यायोग्य नाही – हा अर्थ स्पष्ट होतो, कारण आत्मा अनुमानाव्यतिरिक्त प्रत्यक्षादी प्रमाणांद्वारे देखील जाणला जातो.

५) जो केवळ लिंग अर्थात अनुमानाद्वारेच पराचे ग्रहण (ज्ञान) करीत नाही, त्यामुळे तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा केवळ अनुमाताच (अनुमान करणाराच) नाही – हा अर्थ होतो, कारण तो आत्मा प्रत्यक्षादी प्रमाणांनी देखील पराला जाणतो.

६) आत्मा लिंगाद्वारे नव्हे तर स्वभावाने ग्रहण करतो म्हणजेच जाणतो. अशाप्रकारे आत्मा प्रत्यक्ष ज्ञाता आहे – असा अर्थ प्राप्त होतो.

७) जो उपयोगलक्षण लिंगाद्वारे ज्ञेय पदार्थांचे ग्रहण करीत नाही म्हणजे ज्ञेय पदार्थांचे अवलंबन घेत नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्म्याचे बाह्य पदार्थांच्या अवलंबनावाले ज्ञान नाही – हा अर्थ स्पष्ट होतो.

८) जो उपयोगलक्षण लिंगाला ग्रहण करीत नाही, अर्थात उपयोगलक्षण लिंगाला बाहेरून आणत नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा बाहेरून न आणल्या जाणाऱ्या ज्ञानवाला आहे – असा अर्थ निष्पन्न होतो.

९) ज्याच्या उपयोगलक्षण लिंगाचे पराद्वारे हरण होऊ शकत नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्म्याच्या ज्ञानाचे हरण करू शकत नाही – असा अर्थ स्पष्ट होतो.

१०) ज्याच्या उपयोगलक्षण लिंगाला सूर्याला लागणाऱ्या ग्रहणासमान ग्रहण लागत नाही, म्हणजेच त्यामध्ये मलीनता नाही, विकार नाही; तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा शुद्धोपयोगस्वभावी आहे – असा अर्थ निघतो.

११) ज्याच्या उपयोगलक्षण लिंगाद्वारे पौद्गलिक कर्मांचे ग्रहण होत नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा द्रव्यकर्मांहून असंयुक्त आहे – असा अर्थ स्पष्ट होतो.

१२) ज्याला लिंग अर्थात इंद्रियांद्वारे ग्रहण म्हणजेच विषयांचा उपभोग नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा विषयांचा उपभोक्ता नाही – असा अर्थ यावरून निष्पन्न होतो.

१३) लिंग अर्थात मन किंवा इंद्रिय इत्यादी लक्षणांद्वारे ग्रहण म्हणजेच जो जीवत्वाला धारण करून राहू शकत नाही, तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा रज व वीर्यानुसार होणारा नाही – अशा अर्थाची प्राप्ती होते.

१४) लिंग म्हणजेच मेहनाकाराचे (पुरुषादींच्या गुप्तेंद्रियाच्या आकाराचे) ग्रहण ज्याला नाही, तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा केवळ लौकिक साधन नाही – असा अर्थ होतो.

१५) लिंग अर्थात अमेहनाकाराद्वारे ज्याचे ग्रहण म्हणजेच लोकामध्ये व्यापकत्व नाही, तो आत्मा पाखंडींच्या प्रसिद्ध साधनरूप आकारवाला-लोकव्याप्तीवाला नाही – असा अर्थ स्पष्ट होतो.

१६) जो स्त्री, पुरुष व नपुंसक लिंगांना (वेदांना) ग्रहण करीत नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा द्रव्याने आणि भावाने स्त्री, पुरुष व नपुंसक नाही – हा अर्थ स्पष्ट होतो.

१७) ज्या आत्म्याच्या लिंगांचे म्हणजेच धर्मचिह्नांचे ग्रहण नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्म्याला बहिरंग यतिलिंगांचा अभाव आहे – असा अर्थ यावरून निघतो.

१८) लिंग अर्थात गुण, ग्रहण म्हणजेच अर्थावबोध (पदार्थज्ञान) ज्याला नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा गुणविशेषाने आलिंगित न होणारे शुद्धद्रव्य आहे – असा अर्थ होतो.

१९) लिंग अर्थात पर्याय, ग्रहण म्हणजे अर्थावबोध विशेष ज्याला नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा पर्यायविशेषाने अलिंगित न होणारे शुद्धद्रव्य आहे – असा अर्थ याद्वारे स्पष्ट होतो.

२०) लिंग म्हणजे प्रत्यभिज्ञानाच्या कारणीभूत जे ग्रहण म्हणजेच अर्थावबोध सामान्य ज्याला नाही, तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे द्रव्याने आलिंगित नसलेली शुद्धपर्याय आहे – असा अर्थ प्राप्त होतो.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीत ह्या गाथेचा भाव स्पष्ट करताना अलिंगग्रहण पदाला सोडता इतर पदांचा अर्थ तर तत्त्वप्रदीपिकेसमानच स्पष्ट केला आहे, परंतु अलिंगग्रहणाचा अर्थ स्पष्ट करताना अनेक अर्थ सांगूनही त्यांनी तत्त्वप्रदीपिकेसमान वीस अर्थ सांगितले नाहीत.

त्यानी लिंग शब्दाचे मुख्यपणे तीन अर्थ सांगितले आहेत – १) इंद्रिय, २) अनुमान आणि ३) चिह्न.

आत्मा केवळ इंद्रियांद्वारे पराला जाणत नाही व पराद्वारे इंद्रियांच्या माध्यमातूनही जाणला जात नाही, त्यामुळे अलिंगग्रहण आहे म्हणजेच अतींद्रिय ज्ञानाद्वारे जाणतो आणि अतींद्रिय ज्ञानाद्वारेच जाणला जातो.

अशाप्रकारे आत्मा अनुमानाद्वारेही पराला जाणत नाही आणि पराद्वारे अनुमानाने देखील जाणला जात नाही, त्यामुळे अलिंगग्रहण आहे. अतींद्रिय ज्ञानमय असल्यामुळे अतींद्रिय ज्ञानानेच जाणतो आणि त्याद्वारेच जाणला जातो.

आत्मा कोण्या चिह्नांद्वारे जाणत नाही व कोण्या चिह्नांद्वारे जाणलाही जात नाही, म्हणून अलिंगग्रहण आहे. अतींद्रिय ज्ञानमय असल्याने त्याला चिह्नांद्वारे जाणणे आणि चिह्नांद्वारेच जाणल्या जाण्याची (ज्ञानात येणे) आवश्यकता नाही.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथांचा भाव १ मनहरण, १ दोहा आणि १० चौपाई यांच्या माध्यमातून समजाविला आहे, परंतु त्यांनी २० अर्थांना पूर्णपणे समजाविले नाही, काहीनांच समजाविले आहे.

(मनहरण कवित्त)

अहो भव्यजीव तुम आतमा को ऐसो जानो,
जाके रस रूप गंध फास नाहिं पाइये।
शब्द परजाय सों रहित नित राजत है,
अलिंगग्रहन निराकार दरसाइये॥
चेतना सुभाव ही मैं राजै तिहूँकाल सदा,
आनंद को कंद जगवंद वृन्द ध्याइये।

भेदज्ञान नैनतैं निहारिये जतन ही सों,
ताके अनुभव रस ही में झर लाइये ।।५६।।

हे भव्य जीवांनो ! तुम्ही आत्म्याला असे जाणा की त्यामध्ये पुद्गलाचे रूप, रस, गंध आणि स्पर्श गुण व शब्द पर्याय नाहीत आणि तो त्या पर्यायांविनाच शोभायमान आहे, अलिंगग्रहण आहे, निराकार आहे आणि तिन्ही काळी चेतना स्वभावानेच सुशोभित होत आहे.

कविवर वृंदावनदासजींनी म्हटले आहे की अशा आनंदाचा पिंड, संपूर्ण जगाला वंदनीय भगवान आत्म्याला भेदज्ञानाच्या चक्षुंनी पुरुषार्थपूर्वक निहारा, त्याचेच ध्यान करा आणि त्याच्या अनुभवरसामध्येच भिजून जा.

(दोहा)

शब्द अलिंगग्गहन गुरु, लिख्यौ जु गाथामांहि।
कछुक अरथ तसु लिखत हों, जुगतागम की छांहि ।।५७।।

गुरुदेवांनी गाथेमध्ये अलिंगग्रहण शब्द लिहिला आहे. त्याच्या काही अर्थांना युक्ती आणि आगमानुसार लिहितो.

(चौपाई)

चिह्न सुपुद्गल के हैं जिते। फरस रूप रस गंध जु तिते।
तिन करि तासु लखिय नहिं चिह्न। याहूतैं सु अलिंगग्गहन ।।५८।।
अथवा तीन लिंग जगमाहिं। नारि नपुंसक नर ठहराहिं।
ताहूकरि न लखिय तसु चिह्न। याहूतैं सु अलिंगग्गहन ।।५९।।
अथवा लिंग जु इंद्रिय पंच। ताहूकरि न लखिय तिहि रंच।
अतिइन्द्रियकरि जानन सहन। याहूतैं सु अलिंगग्गहन ।।६०।।
अथवा इन्द्रियजनित जु ज्ञान। ताकरि है न प्रतच्छ प्रमान।
नहिं है आतम को यह चिह्न। याहूतैं सु अलिंगग्गहन ।।६१।।
अथवा लिंग नाम यह जुग्न। लच्छन प्रगट लच्छ जसु गुग्न।
धूम अग्नि जिमि तिमि नहिं चिह्न। याहूतैं सु अलिंगग्गहन ।।६२।।
अथवा आनमती बहु बकैं। दोषसहित लच्छन अन तकैं।
ताहूकरि न लखिय तसु चिह्न। याहूतैं सु अलिंगग्गहन ।।६३।।

इत्यादिक बहु अरथविधान। शब्द अलिंगगहन को जान।
सो विशाल टीकातैं देखि। पंडित मन में दियौ विशेखि॥६४॥
यह चेतन चिद्रूप अनूप। शुद्ध सुभाव सुधारसकूप।
स्वसंवेदनहिकरि सो गम्य। लखहिं अनुभवी समरसरम्य॥६५॥
शब्दब्रह्म को पाय सहाय। करि उद्दिम मन-वचन-काय।
काललब्धि को लहि संजोग। पावैं निकटभव्य ही लोग॥६६॥
तातैं गुन अनंत को धाम। वचन अगोचर आतमराम।
वृन्दावन उर नयन उघारि। देखो ज्ञानज्योति अविकारि॥६७॥

रूप, रस, गंध व स्पर्श इत्यादी पुद्गलाचे जेवढेही चिह्न आहेत, त्या सर्वांनी आत्म्याची ओळख होत नाही; त्यामुळे आत्मा अलिंगग्रहण आहे.

किंवा ह्या जगात स्त्रीलिंग, पुंल्लिंग व नपुंसक लिंग - हे तीन लिंग प्रसिद्ध आहेत; यांनी सुद्धा आत्म्याची ओळख होत नाही; त्यामुळे सुद्धा आत्मा अलिंगग्रहण आहे.

किंवा पाच इंद्रियच लिंग आहेत, चिह्न आहेत, त्यांनी सुद्धा आत्म्याची ओळख किंचितही शक्य नाही; कारण तो तर अतींद्रियज्ञानाने जाणणारे किंवा जाणले जाणारे तत्त्व आहे; त्यामुळे आत्मा अलिंगग्रहण आहे.

किंवा इंद्रियजनित ज्ञानाने प्रत्यक्ष न झाल्याने (जाणला न गेल्याने), ते देखील आत्म्याचे चिह्न नाही; त्यामुळे आत्मा अलिंगग्रहण आहे.

किंवा लिंग नामक जी युक्ती आहे, ती प्रगट आहे; अशाप्रकारे लक्षण प्रगट आहे, परंतु लक्ष्य गुप्त आहे. जसे धुराने अग्नी जाणला जातो; तसेच आत्मा लिंग नामक चिह्नाद्वारे जाणला जात नाही; त्यामुळे तो अलिंगग्रहण आहे.

किंवा अन्यमती आत्म्याचे बरीच लक्षणे सांगतात, ती सर्व सदोष आहेत. त्यांनी देखील आत्मा जाणला जाऊ शकत नाही; त्यामुळे आत्मा अलिंगग्रहण आहे.

अलिंगग्रहण शब्दाचे अनेक प्रकारे खूप अर्थ होतात. त्यांना आचार्य अमृतचंद्र रचित विशाल टीका तत्त्वप्रदीपिकेमधून जाणावयास हवे. त्यांना जाणून पंडितजनांना विशेष हर्ष होईल.

हा चेतन आत्मा अनुपम आहे, अमृतरसाची विहीर आहे, शुद्धस्वभावी आहे, स्वसंवेदन ज्ञानानेच गम्य आहे, स्वसंवेदनानेच जाणला जातो. रमणीय समतारसाने संपन्न उक्त आत्म्याला अनुभवी आत्मेच पहातात, जाणतात.

काललब्धीचा संयोग झाल्यावर, शब्दब्रह्माच्या सहकार्याने, मन-वचन-कायेपूर्वक पुरुषार्थ केल्यावर निकट भव्य जीवच त्या आत्म्याची प्राप्ती करतात.

वृंदावन कवींनी म्हटले आहे की वचन अगोचर, अनंत गुणांचे धाम आत्मारामाला आम्ही हृदयरूपी नयनांना उघडून अविकारी ज्ञानज्योतीने पाहिले आहे.

पंडित देवीदासजींनी प्रवचनसार भाषा कवित्तमध्ये ह्या महत्त्वपूर्ण गाथेला केवळ एकाच छंदामध्ये प्रस्तुत केले आहे. याचे कारण असे आहे की त्यांनी आचार्य अमृतचंद्र आणि आचार्य जयसेनकृत टीकांना आधार न बनविता मूळ ग्रंथाच्या आधारेच आपल्या प्रवचनसार भाषाकवित्ताला प्रस्तुत केले आहे.

त्यांचा छंद पुढीलप्रमाणे आहे -

(सवैया इकतीसा)

जाकैं पंच रस नांही पंच ही वरन नाहीं
दुविध प्रकार जाकैं गंध सो न आनियै।
आठ ही सपर्स गुन नाहीं सो स्वरूप गुप्त
ग्यान और दर्शन मई सु पहिचानियै॥
सब्द पर्जाय नय सुभाव जाकौ निश्चैकरि
पुग्गलीक चिन्ह करि ग्राहज न मानियै।
सवइ संस्थानि विना निराकार सुद्ध रूप
भैया भव्य अैंसो जीव द्रव्य ताहि जानियै॥१३३॥

ज्याच्या स्वभावामध्ये पाच रस नाहीत, पाच वर्ण नाहीत, दोन प्रकारचे गंध आणि आठ प्रकारचे स्पर्श देखील नाहीत. जो आपल्या ज्ञान-दर्शन स्वरूपामध्ये गुप्त आहे, ज्ञान-दर्शनमय आहे. निश्चयाने

ज्याच्या स्वभावाचे ग्राहक पौद्गलिक शब्द पर्याय किंवा चिह्न विशेष नाही. सर्व संस्थानांनी रहित निराकार शुद्धरूप जो जीवाचा स्वभाव आहे, हे बंधो ! हे भव्य जीवांनो !! तुम्ही त्याला जीवद्रव्य जाणा.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी ह्या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''आत्म्याला सर्वप्रथम पुद्गलापासून भिन्न केले, नंतर इतर अजीवांपासून भिन्न केले. आता अन्य जीवांपासून भिन्न करतात. आपला चैतन्यगुण आपल्या आत्म्याच्या आश्रयाने आहे, इतर आत्म्यांच्या आश्रयाने नाही. तो स्वत:चा चेतना गुण स्वत:ला अनंत केवली, सिद्ध, अनंत निगोद इत्यादी अनंत जीवांपासून भिन्न करतो; कारण स्वत:चा चेतना गुण स्वत:चे स्वलक्षण आहे. त्याला स्वत: सदा धारण करून राहतो. साधकदशेमध्ये धर्माच्या साधनेकरिता चेतना गुण प्रयुक्त होतो.[१]

ह्या ज्ञेयतत्त्व अधिकारामध्ये अलिंगग्रहण म्हणण्याचे कारण हे आहे की आत्मा ज्ञान-दर्शन इत्यादी अनंत गुणांचा व पर्यायांचा पिंड आहे. या ज्ञेय पदार्थाने (आत्म्याने) इंद्रियांच्या द्वारे कार्य करावे - असा त्याचा स्वभाव नाही. इंद्रियांच्या अवलंबनाविना स्वत:च जाणू शकतो, असा त्या ज्ञेयाचा स्वभाव आहे. आत्मा इंद्रियांद्वारे ज्ञात होऊ शकेल असा तो ज्ञेयपदार्थ नाही, तो अंतर्मुख पाहिल्याने ज्ञात होतो - असा तो आहे.[२]

१) आत्मा अतींद्रिय ज्ञानमय आहे; असे तू जाण.[३]

२) आत्मा इंद्रियप्रत्यक्षाचा विषय नाही; असे तू जाण.

३) आत्मा इंद्रियप्रत्यक्षपूर्वक अनुमानाचा विषय नाही; असे तू जाण.[४]

४) आत्मा स्वतत्त्व आहे, तो परतत्त्वाद्वारे जाणत नाही, परतत्त्वाद्वारे ज्ञात होत नाही, त्याचप्रमाणे परतत्त्वाच्या अनुमानाद्वारे देखील ज्ञात होत नाही, तर तो स्वतत्त्वानेच जाणतो आणि ज्ञात होतो; असे तू जाण.[५]

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २०१
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २११
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २१७
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २१८
५) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २१९

सर्वज्ञ देवाधिदेव, अरहंत व सिद्ध आणि आचार्य, उपाध्याय, मुनी इत्यादींना आत्म्याला जाणावयाचे असेल तर केवळ अनुमानाद्वारे ज्ञात होऊ शकेल असा तो आत्मा नाही.[१]

चौथ्या मुद्द्यामध्ये म्हटले आहे अन्य जीव तुझ्या किंवा पंचपरमेष्ठींच्या आत्म्याला केवळ अनुमानाद्वारे जाणण्याचा प्रयत्न करतील तर ते ज्ञात होणार नाहीत.

आता पाचव्या मुद्द्यामध्ये म्हटले आहे की तू केवळ अनुमान करणाराच नाहीस. आत्मा केवळ अनुमान करणारा असेल तर अनुमानरहित प्रत्यक्ष केवलज्ञान प्रगट करण्याचा प्रसंगच येणार नाही.[२]

येथे हे म्हटले आहे की आत्मा इंद्रियांद्वारे स्व-पराला जाणत नाही, आत्मा इंद्रियांद्वारे ज्ञात होत नाही, आत्मा इंद्रियप्रत्यक्षपूर्वक अनुमानाचा विषय नाही, आत्मा केवळ अनुमान ज्ञानाने ज्ञात होत नाही, आत्मा केवळ अनुमान ज्ञानाने स्व-पराला जाणत नाही. – ह्या पाच लिंगांद्वारे आत्मा ज्ञात होत नाही, त्यामुळे आत्मा प्रत्यक्ष ज्ञाता आहे, असा भाव प्राप्त होतो.[३]

पहिल्या पाच मुद्द्यांमध्ये द्रव्याचे (आत्म्याचे) नास्तिने कथन केले आहे. आत्मा कोण्या बाह्य चिह्नाने ज्ञात होऊ शकणारा नाही; अशाप्रकारे नास्तिने आत्मद्रव्याचे कथन केले. सहाव्या मुद्द्यामध्ये आत्मद्रव्याचे कथन अस्तिने केले. आता सातव्या मुद्द्यात आत्म्याच्या ज्ञान गुणाची पर्याय म्हणजेच उपयोगाचे कथन केले जात आहे.

येथे लिंगाचा अर्थ उपयोग सांगितला आहे. ज्याच्या लिंगाद्वारे म्हणजे उपयोग नामक लक्षणाद्वारे ग्रहण अर्थात ज्ञेय पदार्थांचे अवलंबन नाही, तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्म्याला बाह्य पदार्थांचे अवलंबन घेणारे ज्ञान नाही – असा अर्थ प्रगट होतो.[४]

ज्या उपयोगाला ज्ञेय पदार्थांचे अवलंबन नाही, तर स्व पदार्थाचे

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २२०
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २२३
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २२६
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २२८-२२९

अवलंबन आहे - असा उपयोग लक्षणवाला तुझा आत्मा आहे. अशाप्रकारे तुझ्या आत्म्याला बाह्य पदार्थांच्या अवलंबनावाले ज्ञान नाही तर स्वभावाच्या अवलंबनावाले ज्ञान आहे.

आता ह्या आठव्या मुद्द्यामध्ये उपयोग बाहेरून आणला जात नाही - हे सांगतात.[१]

मुद्दा १) आत्मा द्रव्य आहे, इंद्रियांनी स्व व पराला जाणू शकेल, असे त्याचे स्वरूप नाही.

मुद्दा २) आत्मा स्वत: इंद्रियांनी ज्ञात होऊ शकेल असे त्याचे स्वरूप नाही.

मुद्दा ३) धुराद्वारे अग्नीचे ज्ञान होते, त्याप्रमाणे आत्मा इंद्रियांच्या अनुमानाने ज्ञात होऊ शकेल, असा त्याचा स्वभाव नाही.

मुद्दा ४) इतरांद्वारे आत्मा केवळ अनुमानाने ज्ञात होऊ शकेल, असा तो प्रमेय पदार्थ नाही. इतर जीव रागरहित स्वसंवेदनज्ञानाद्वारे आत्म्याला जाणतील तर तो ज्ञात होऊ शकतो.

मुद्दा ५) स्वत: इतर आत्म्यांना केवळ अनुमानाने जाणू शकेल, असा स्वत:चा स्वभाव नाही, तो स्वसंवेदनाने जाणू शकतो.

मुद्दा ६) आत्मा प्रत्यक्ष ज्ञाता आहे. परपदार्थाच्या अपेक्षेने रहित, इंद्रिय व मनाच्या अवलंबनाने रहित, स्वत:ला प्रत्यक्ष जाणू शकेल, असा त्याचा ज्ञातास्वभाव आहे.

मुद्दा ७) सहा मुद्द्यांमध्ये द्रव्याचे कथन केले. सातव्या बोलापासून ज्ञान उपयोगाचे कथन करतात. उपयोग देखील ज्ञेय आहे. त्या ज्ञेयाचा स्वभाव कसा आहे, ते सांगतात[२] –

उपयोगाला पराचे अवलंबन असू शकत नाही, असे सातव्या मुद्द्यामध्ये म्हटले आहे; त्याला बाहेरून आणले जात नाही, असे आठव्या मुद्द्यामध्ये म्हटले आहे आणि त्याचे कोणी हरण करू शकत नाही - असे नवव्या मुद्द्यामध्ये म्हटले आहे.

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २३४ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २३५

ज्ञेयांचे अवलंबन घेणे हे ज्ञानाचे कार्य नाही, बाहेरून वृद्धी प्राप्त करणे ज्ञानाचे कार्य नाही आणि कोणाद्वारे हीन होईल – असे देखील ते ज्ञान नाही.[१]

ज्याला लिंगामध्ये म्हणजेच उपयोग नामक लक्षणामध्ये ग्रहण नाही अर्थात सूर्यासमान उपराग (मलिनता, विकार) नाही, तो अलिंगग्रहण आहे; अशाप्रकारे 'आत्मा शुद्धोपयोगस्वभावी आहे', असा अर्थ प्राप्त होतो.

द्रव्य, गुण तर अनादी-अनंत शुद्ध आहेत; परंतु उपयोगातही मलिनता नाही, असे ह्या मुद्द्यात सांगितले आहे. चंद्राला कलंकित म्हणतात, परंतु सूर्यावर कोणताही डाग नाही. जसे सूर्यामध्ये कोणत्याही प्रकारची मलिनता नाही; तसेच उपयोगही सूर्यासमान कलंक रहित आहे.[२]

जसे द्रव्य शुद्ध आहे, गुण शुद्ध आहे, तसेच ज्ञानाची पर्यायही शुद्ध आहे – असे म्हटले आहे. आपला ज्ञाता-दृष्टा स्वभाव शुद्ध आहे, त्यामध्ये जी पर्याय एकाकार होते, येथे त्या पर्यायीलाच उपयोग म्हटले आहे व शुद्धोपयोगस्वभावी आत्म्यालाच आत्मा म्हटले आहे.[३]

लिंगाद्वारे अर्थात उपयोग नामक लक्षणाद्वारे ग्रहण म्हणजेच पौद्गलिक कर्मांचे ग्रहण जो करीत नाही, तो अलिंगग्रहण आहे; अशाप्रकारे 'आत्मा द्रव्यकर्मांनी असंयुक्त (असंबद्ध) आहे', असा अर्थ प्राप्त होतो.

उपयोग द्रव्यकर्माला ग्रहणच करीत नाहीत आणि द्रव्यकर्म येण्यामध्ये निमित्त देखील होत नाही – असे येथे सांगणे आहे.[४]

आत्मा द्रव्य आहे आणि उपयोग त्याची पर्याय आहे किंवा आत्मा लक्ष्य आहे आणि उपयोग त्याचे लक्षण आहे. लक्षणाशिवाय लक्ष्य असू शकत नाही आणि लक्ष्याशिवाय लक्षण असू शकत नाही. आत्मा ओळखण्यायोग्य पदार्थ लक्ष्य आहे आणि उपयोग त्याचे लक्षण आहे, त्या लक्षणामुळे आत्मा ओळखला जाऊ शकतो.

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २४२
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २४२-२४३
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २४३
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २४४

१) सातव्या मुद्द्यामध्ये उपयोग नामक लक्षण, लक्ष्य अशा आत्म्याचेच अवलंबन घेते; त्यामुळे त्याला परपदार्थांचे अवलंबन नाही.

२) आठव्या मुद्द्यामध्ये उपयोग नामक लक्षण, लक्ष्य अशा आत्म्यामधून येते, त्यामुळे ज्ञान परपदार्थांमधून येत नाही.

३) नवव्या मुद्द्यामध्ये उपयोग नामक लक्षण, लक्ष्य अशा आत्म्याचाच आश्रय घेते, त्यामुळे ज्ञानाला परद्रव्याद्वारे हरण केले जाऊ शकत नाही.

४) दहाव्या मुद्द्यामध्ये उपयोग नामक लक्षण, लक्ष्य अशा आत्म्यामध्येच एकाग्र होते, परपदार्थांमध्ये एकाग्र होत नाही, त्यामुळे त्यामध्ये मलिनता येत नाही.

५) अकराव्या मुद्द्यामध्ये उपयोग नामक लक्षण, लक्ष्य अशा आत्म्यातच एकाग्र होते, परंतु परपदार्थ, कर्म इत्यादींचे ग्रहण करीत नाही, त्यामुळे ते असंयुक्त आहे.[३]

अशाप्रकारे आपला ज्ञानोपयोग देखील ज्ञेय आहे. तो ज्ञेय पुद्गलकर्माला ग्रहण करीत नाही; त्यामुळे उपयोगलक्षणयुक्त आत्मा देखील पुद्गलकर्माला ग्रहण करीत नाही – असे तुझे स्वज्ञेय जसे आहे, तसे तू जाण; असा आचार्य भगवान आदेश देतात.

ज्ञेय जसे आहे, तसेच यथार्थ जाणणे सम्यग्दर्शन आहे आणि सम्यग्ज्ञानाचे कारण आहे आणि त्यामुळे धर्म व शांतीची प्राप्ती होते.[४]

ज्याला लिंगाद्वारे अर्थात इंद्रियांद्वारे ग्रहण म्हणजेच विषयांचा उपभोग नाही, तो अलिंगग्रहण आहे; अशाप्रकारे 'आत्मा विषयांचा उपभोक्ता नाही' – असा अर्थ प्राप्त होतो – हा १२ वा मुद्दा आहे.

लिंगाद्वारे म्हणजेच मनाद्वारे किंवा इंद्रिय वगैरे लक्षणाद्वारे ग्रहण अर्थात जीवतत्त्वाला धारण करणे नाही तो अलिंगग्रहण आहे; अशाप्रकारे 'आत्मा शुक्र आणि आर्तवाला अनुविधायी (अनुसार होणारा) नाही', असा अर्थ प्राप्त होतो – हा १३ वा मुद्दा आहे.

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २४६
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २४७
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २४९

पाच इंद्रिय, तीन बल, शासोच्छ्वास व आयु - हे दहा प्राण आहेत; परंतु जीव त्यांच्यामुळे जीवित रहात नाही; कारण ते दहा प्राण जड (अजीव) आहेत व आत्मा तर शाश्वत चैतन्यप्राणवान आहे. जडप्राणांचा आत्म्यात अभाव आहे; त्यामुळे आत्मा जड प्राणांनी जीवित रहात नाही.[१]

अशाप्रकारे आत्मा माता-पित्यांच्या रज आणि शुक्राचे अनुसरण करून होणारा नाही आणि त्यांच्याद्वारे उत्पन्न होत नाही.[२]

लिंगाचे अर्थात मेहनाकाराचे (पुरुषादींच्या इंद्रियाचा आकार) ग्रहण ज्याला नाही तो अलिंगग्रहण आहे; अशाप्रकारे 'आत्मा केवळ लौकिक साधन नाही' – असा अर्थ प्राप्त होतो – हा १४ वा मुद्दा आहे.

ज्या पुरुषाच्या इंद्रियांच्या, स्त्रीच्या इंद्रियांच्या, नपुंसकाच्या इंद्रियांच्या आकृती दिसून येतात; त्या सर्व पुद्गलांच्या अवस्था आहेत. त्या आकृतींचा आत्म्यामध्ये अभाव आहे आणि त्या आकारामध्ये आत्म्याचा अभाव आहे. ज्या वस्तुचा ज्यामध्ये अभाव असतो, त्या अभावरूप वस्तुचे ग्रहण होणे शक्यच होऊ शकत नाही. त्यामुळे आत्मा इंद्रियाच्या आकाराचे ग्रहण करीत नाही.[३]

आत्मा पुरुषादींच्या इंद्रियाच्या आकाराचे ग्रहण करीत नाही, त्यामुळे आत्मा केवळ लौकिक साधन नाही.

आचार्य भगवान म्हणतात की तू जड इंद्रियांचा आश्रय सोडून दे व जो चैतन्य ज्ञाता-दृष्टा शुद्ध चिदानंद स्वरूप आहे, त्याचे श्रद्धान-ज्ञान करून त्यामध्ये स्थिर हो, तेव्हाच तुझ्यात अनंतज्ञान, अनंतदर्शन, अनंतसुख, अनंतवीर्यरूप पर्याय प्रगट होईल, म्हणून आत्मा लोकोत्तर साधन आहे.

अशाप्रकारे आत्मा केवळ लौकिक साधन नाही तर लोकोत्तर साधन आहे; असे स्वज्ञेयाचे ज्ञान-श्रद्धान करणे धर्माचे कारण आहे.[४]

लिंगाद्वारे म्हणजे मेहनाकाराद्वारे ज्याचे ग्रहण नाही अर्थात विश्वात

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २५७
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २५२
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २५३
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २५४

व्यापकत्व नाही, तो अलिंगग्रहण आहे; अशाप्रकारे 'आत्मा पाखंडी लोकांच्या प्रसिद्ध साधनरूप-लोकव्याप्तीवाला नाही' – असा अर्थ प्राप्त होतो – हा १५ वा मुद्दा आहे.[१]

प्रत्येक आत्मा ज्याप्रमाणे संसारामध्ये प्रत्येक शरीरामध्ये भिन्न-भिन्न राहतो; तसेच मुक्त झाल्यानंतर देखील तो भिन्न-भिन्नच राहतो. तो विश्वामध्ये व्याप्त होत नाही, आपल्या असंख्य प्रदेशांना सोडून विश्वामध्ये व्याप्त होणे, हा त्याचा स्वभाव नाही. आत्मा शुद्ध झाल्यानंतर आपल्या अंतिम शरीरापेक्षा किंचित न्यून आपल्या आकारामध्ये, निश्चयाने आपल्या असंख्य प्रदेशांमध्ये राहतो आणि ऊर्ध्वगमन स्वभावामुळे व्यवहाराने लोकाकाशाच्या अग्रभागी विराजमान होतो.[२]

ज्याला लिंगांचे म्हणजेच स्त्री, पुरुष व नपुंसक वेदांचे ग्रहण नसते, तो अलिंगग्रहण आहे; अशाप्रकारे 'आत्मा द्रव्याने आणि भावाने स्त्री, पुरुष व नपुंसक नाही' - असा अर्थ प्राप्त होतो, हा १६ वा मुद्दा आहे.

शरीराचा आत्म्यात अभाव आहे. चौदाव्या मुद्द्यात म्हटले होते की पुरुषादींच्या इंद्रियाचा आकार आत्म्यात नाही. येथे म्हणत आहेत की स्त्री, पुरुष वा नपुंसक शरीराचा आत्म्यात अभाव आहे; कारण ते जड, अजीवतत्त्व आहेत व आत्मा तर जीवतत्त्व आहे.[३]

आत्मा भाववेद आणि द्रव्यवेदाने रहित अवेदी आहे, आपल्या ज्ञाता-दृष्टा शुद्ध आनंदाचा भोग घेणारा आहे, अशी स्वदृष्टी केली आणि परद्रव्यावरून दृष्टी काढून घेतली तर सम्यग्दर्शन होते व धर्म होतो.[४]

आत्मा आपल्या ज्ञान, दर्शन, सुख इत्यादींचा वेदक आहे; परंतु शरीर आणि विकारी भावांचा वेदक नाही.[५] पुरुषादींच्या आकाराला आत्मा मानने, जीवाला जड मानण्यासमान आहे आणि भाववेदाला आत्मा मानणे, ते पापतत्त्वाला जीवतत्त्व मानण्यासमान आहे. अजीवाला जीव मानणे व पापाला जीव मानणे अधर्म आहे; परंतु शरीर व भाववेदाने

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २५४
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २५५
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २५६
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २५७
५) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २५८

रहित आत्मा शुद्धचिदानंदस्वरूप आहे असे श्रद्धान-ज्ञान करणे धर्म आहे, जीवनकला आहे; सुखी जीवन कसे जगावे, त्याची ही गुरुकिल्ली आहे.

लिंगांचे म्हणजे धर्मचिह्नांचे ग्रहण ज्याला नाही, तो अलिंग्रगहण आहे; अशाप्रकारे 'आत्म्याला बहिरंग यतिलिंगांचा अभाव आहे' - असा अर्थ प्राप्त होतो, हा १७ वा मुद्दा आहे.[१]

लिंग अर्थात गुण असे ग्रहण म्हणजे अर्थावबोध (पदार्थ ज्ञान) ज्याला नाही, तो अलिंगग्रहण आहे; अशाप्रकारे 'आत्मा गुणविशेषाने आलिंगित न होणारे असे शुद्धद्रव्य आहे' – अशा अर्थाची प्राप्ती होते, हा १८ वा मुद्दा आहे.

आत्मा वस्तु आहे. तो अनंत गुणांचा पिंड आहे. तो केवळ ज्ञानगुणवाला नाही. अभेद आत्मा गुणांच्या भेदांना स्पर्श करीत नाही.[२]

आत्म्यामध्ये ज्ञानादी अनंत गुण आहेत. ज्ञानगुण, दर्शनगुण इत्यादी गुणभेद आत्म्यामध्ये असून सुद्धा अनंत गुणांचा एक पिंडरूप आत्मा गुणभेदाला स्पर्श करीत नाही. 'मी ज्ञानाचा धारक आहे आणि ज्ञान माझा गुण आहे' असे गुण-गुणीच्या भेदाला अभेद आत्मा स्वीकार करीत नाही. अभेद आत्म्याने जर भेदाला स्पर्श केला तर तो देखील भेदरूप होऊन जाईल, भेदरूप झाल्यावर अभेद होण्याचा प्रसंग कधी प्राप्त होणार नाही आणि अभेद मानल्याशिवाय कधीही धर्म होत नाही.[३]

आत्मा त्रिकाळी गुणांचा पिंड आहे, तो सामान्य आहे व दर्शनादी गुण विशेष आहेत. सामान्य विशेषाला स्पर्श करीत नाही. सामान्य सामान्यात आहे, विशेष विशेषात आहे. सामान्य विशेषात नाही व विशेष सामान्यात नाही. सामान्य आत्म्याने विशेष ज्ञानगुणाला स्पर्श केला तर सामान्य व विशेष एक होऊन जातील, दोन्ही पृथक राहणार नाहीत. अनंत गुणांचा समूहरूप एकाकार आत्मा केवळ ज्ञान गुणाला स्पर्श करीत नाही. येथे शुद्ध द्रव्याची श्रद्धा करविली आहे. शरीररहित, कर्मरहित, विकाररहित,

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २५९ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २६१
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २६१-२६२

गुणभेदरहित – अशा अभेद शुद्धद्रव्याची येथे श्रद्धा करवावयाची आहे.[१]

लिंग अर्थात पर्याय असे जे ग्रहण अर्थात अर्थावबोधविशेष ज्याला नाही, तो अलिंगग्रहण आहे; अशाप्रकारे 'आत्मा पर्यायविशेषाने आलिंगित न होणारे असे शुद्धद्रव्य आहे' – असा अर्थ प्राप्त होतो, हा १९ वा मुद्दा आहे.[२]

१८ व्या मुद्द्यामध्ये 'अर्थावबोध' शब्द आला होता आणि म्हटले होते की गुणभेद झाल्यावर देखील अभेद आत्मा गुणभेदाला स्पर्श करीत नाही, अशाप्रकारे गुणभेदाचा निषेध करवून अभेद आत्म्याची श्रद्धा करविली आहे. येथे असे म्हणतात की साधक दशेमध्ये सम्यग्ज्ञानाच्या निर्मल पर्यायीला किंवा केवलज्ञानाच्या समयी केवलज्ञानाच्या पूर्ण पर्यायीचे आत्मा चुंबन घेत नाही, स्पर्श करीत नाही. द्रव्य, पर्यायाएवढाच नाही; अशाप्रकारे सांगून पर्याय-अंशाचे लक्ष सोडविले आहे आणि अंशी द्रव्याची श्रद्धा येथे करवावयाची आहे.

आत्मा ज्ञाता-दृष्टा शुद्ध स्वभावी आहे, त्याचे श्रद्धा-ज्ञान केल्याने जी निर्मल पर्याय प्रगट होते, त्या पर्यायीला आत्मा स्पर्श करीत नाही, आलिंगन करीत नाही, तर आत्मा नित्य शुद्ध द्रव्य आहे. असा तुझा ज्ञेयस्वभाव आहे. जसा ज्ञेयस्वभाव आहे, तसाच जाणला तर सम्यग्दर्शन-ज्ञान प्रगट होईल. ही अपूर्व बाब अनंत काळात आता ऐकावयास मिळाली आहे. यथार्थता समजून सम्यक प्रतीती केली तर धर्म होईल, परंतु ज्याला ही बाब ऐकावयास मिळाली नाही, त्याला धर्म कोठून होईल ?[३]

शुद्धस्वभावी द्रव्य नित्य आहे व निर्मल पर्याय एका समयाची असल्याने अनित्य आहे. नित्य शुद्धद्रव्याने अनित्य सम्यग्ज्ञानाच्या किंवा केवलज्ञानाच्या पर्यायीला निश्चयाने स्पर्श केला तर द्रव्य नित्य रहात नाही म्हणजेच द्रव्य क्षणिक होण्याचा प्रसंग उत्पन्न होईल; परंतु असे कधीही होत नाही.

ज्याप्रमाणे १८ व्या मुद्द्यामध्ये म्हटले होते की अभेद आत्म्यामध्ये

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २६३
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २६४
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २६५

भेदाचा अभाव आहे; त्यामुळे अभेद आत्मा गुणभेदाला स्पर्श करीत नाही; त्याचप्रमाणे येथे नित्य ज्ञानानंदस्वभावी आत्मा त्रिकाळी आहे, तो एका समयाच्या अनित्य निर्मल पर्यायीला स्पर्श करीत नाही.[१]

लिंग अर्थात प्रत्यभिज्ञानाचे कारण असे जे ग्रहण अर्थात अर्थावबोध सामान्य ज्याला नाही तो अलिंगग्रहण आहे, अशाप्रकारे 'आत्मद्रव्याने आलिंगित नाही अशी शुद्धपर्याय आहे' असा अर्थ निष्पन्न होतो, हा २० वा मुद्दा आहे.

अठराव्या मुद्द्यात त्रिकाळी द्रव्य, सामान्य, तो ज्ञानरूप गुणभेदाला स्पर्श करीत नाही, आत्म्यात ज्ञानगुणाचा भेद नाही म्हणजेच आत्मा सामान्य अभेदरूप आहे, असे म्हटले होते. १९ व्या मुद्द्यात त्रिकाळी द्रव्यसामान्यामध्ये ज्ञानाची पर्याय नाही, म्हणजेच सामान्यात विशेष नाही, सामान्यामध्ये विशेषाचा अभाव आहे – असे म्हटले होते. येथे २० व्या मुद्द्यात असे सांगत आहेत की एका समयाच्या पर्यायीमध्ये त्रिकाळी द्रव्याचा अभाव आहे. ज्ञानगुणाची पर्याय त्रिकाळी ज्ञान गुणाच्या आधारे नाही, विशेष सामान्याच्या आधारे नाही. एका समयाची सम्यग्ज्ञानाची पर्याय किंवा केवलज्ञानाची पर्याय निरपेक्ष आहे. त्रिकाळी गुणाच्या आधारे ती प्रगट होत नाही; अशाप्रकारे निरपेक्षता सांगितली आहे.

अशाप्रकारे आत्मा त्रिकाळी ज्ञानाने स्पर्शित नाही अशी शुद्धपर्याय आहे, असे येथे सांगितले आहे.

सामान्याच्या आधारे विशेषाला मानले असता विशेष निरपेक्ष सिद्ध होत नाही. विशेषाला पराधीन मानले तर पराधीनदशा होते, ती पर्यायबुद्धी आहे.[२]

ज्याप्रमाणे १८ व्या मुद्द्यात म्हटले होते की द्रव्य अभेद आहे, त्याच वेळी ज्ञानादी गुणभेद आहेत तर खरे, परंतु अभेदस्वभावामध्ये ज्ञानादी गुणांचा अभाव आहे; त्यामुळे द्रव्य ज्ञानाला स्पर्श करीत नाही.

१९ व्या मुद्द्यामध्ये म्हटले होते की गुण सामान्य आहे, त्याच

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २६५ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २७५

समयी ज्ञानाची निर्मल पर्याय आहे; परंतु सामान्य शक्तीस्वरूप द्रव्यामध्ये ज्ञानाच्या निर्मलपर्यायीचा अभाव आहे म्हणजेच सामान्यामध्ये विशेषाचा अभाव आहे; त्यामुळे द्रव्य पर्यायीला स्पर्श करीत नाही.

२० व्या मुद्द्यात अशाप्रकारे म्हटले आहे की जेव्हा शुद्धपर्याय आहे, त्याच समयी त्रिकाळी ध्रुव द्रव्य आहे; परंतु ज्ञानाच्या शुद्धपर्यायीमध्ये द्रव्यसामान्याचा अभाव आहे म्हणजेच विशेषामध्ये सामान्याचा अभाव आहे; त्यामुळे शुद्धपर्याय सामान्यद्रव्याला स्पर्श करीत नाही.

शुद्धपर्यायामध्ये सामान्याचा अभाव आहे; कारण विशेषामध्ये सामान्याचा अभाव नसेल तर विशेष आणि सामान्य एक होतील; वस्तुस्वरूप असे नाही. विशेष विशेषामुळे आहे, सामान्यामुळे नव्हे. येथे विशेष निरपेक्ष आहे, हे सिद्ध करावयाचे आहे.[१]

समया-समयाची पर्याय सत अहेतुक आहे. ती निमित्ताची किंवा रागाची तर अपेक्षा ठेवतच नाही; परंतु ज्ञानगुण सामान्य आहे, त्याची देखील अपेक्षा ठेवत नाही. अशाप्रकारे तिची निरपेक्षता दर्शविली आहे. जो शुद्धपर्यायरूप परिणमित आहे, तोच आत्मा आहे, आत्मा स्वत:च शुद्धपर्याय आहे. अशाप्रकारे सांगून द्रव्यदृष्टी करविली आहे. सामान्य व विशेष असा भेदवाला आत्मा सम्यग्दर्शनाचे ध्येय नाही. शुद्धपर्यायच आत्मा आहे, अशाप्रकारे सांगून अभेददृष्टी करविली आहे.[२]

अशाप्रकारे आत्मा त्रिकाळी ज्ञानाने स्पर्शित नाही अशी शुद्धपर्याय आहे. आत्मा स्वत:च शुद्धपर्याय आहे. आत्मा व शुद्धपर्यायीत अंतर नाही.

असे तुझ्या स्वज्ञेयात आत्म्याला जाणणे, श्रद्धा करणे धर्म आहे.[३]''

वरील संपूर्ण कथनाचा सारांश हा आहे की भगवान आत्मा औदारिक इत्यादी शरीररूप पुद्गलांहून भिन्न तर आहेच; शिवाय अचेतन आकाश, काल आणि धर्म व अधर्म – ह्या अरूपी द्रव्यांहून देखील पृथक् आहे; एवढेच काय तर तो इतर जीवांहून देखील भिन्नच आहे.

परद्रव्यांहून आत्म्याच्या भिन्नतेचे ज्ञान करविणाऱ्या ह्या गाथेमध्ये

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २७६
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २७८
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २७८

अरसादी विशेषणांच्या माध्यमातून पुद्गलाहून; चेतनागुणवाल्या विशेषणाच्या माध्यातून आकाशादी अमूर्त अजीवद्रव्यांहून व स्वत:च्या चेतनेच्या माध्यमातून इतर जीवांहून भिन्नता सिद्ध केली आहे.

ह्या प्रवचनसार परमागमामध्ये १७२ व्या गाथेच्या रूपात आलेल्या ह्या गाथेच्या आचार्य अमृतचंद्रकृत तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये **अलिंगग्रहण** पदावर विशेष लक्ष दिले आहे.

जरी सामान्यपणे हेच म्हटले आहे की रूप-रसादी चिह्नांद्वारे ग्राह्य नसल्यामुळे हा भगवान आत्मा अलिंगग्रहण आहे; तरी देखील हा प्रश्न उभा करून म्हटले आहे की जर ही बाब आहे तर मग अलिंगग्रहण का म्हटले आहे, अलिंगग्राह्यच म्हणावयास हवे होते ?

याच्या उत्तरादाखल म्हटले आहे की विशिष्ट अर्थांच्या निष्पत्तीसाठी **अलिंगग्रहण** पदाचा प्रयोग केला आहे.

यानंतर अलिंगग्रहण पदाचे २० अर्थ सांगितले आहेत. 'लिंग' आणि 'ग्रहण' पदांचे विभिन्न अर्थ असल्यामुळे हे सर्व शक्य झाले आहे. अलिंगग्रहणाच्या आरंभीचा 'अ' तर सर्वत्र निषेधवाचकच आहे.

सर्वाधिक महत्त्वपूर्ण ही बाब आहे की हा ज्ञेयाधिकार आहे व आपला भगवान आत्मा एक ज्ञेय पदार्थ आहे. अरसादी समान त्याचा स्वभाव अलिंगग्रहण सुद्धा आहे. ज्याप्रमाणे आत्म्याला जाणण्याकरिता त्याच्या ज्ञानस्वभावाला जाणणे आवश्यक आहे; त्याचप्रमाणे त्याच्या ज्ञेयस्वभावाला जाणणेही आवश्यक आहे. त्या भगवान आत्म्याचे ग्रहण (जाणणे) कसे होते – हे जाणणेही आवश्यक आहे, अनिवार्य आहे. 'आत्म्याचे ग्रहण कसे होते' – हे जाणण्याबरोबरच कसे होत नाही – हे जाणणे सुद्धा अत्यंत आवश्यक आहे. ह्या अलिंगग्रहण प्रकरणात भगवान आत्म्याच्या ह्या ज्ञेयस्वभावालाच समजाविले आहे.

'अलिंगग्रहण' पदाच्या २० अर्थांचे संक्षिप्त विवरण पुढीलप्रमाणे आहे–

१) 'हा भगवान आत्मा अतींद्रिय ज्ञानमय आहे' – ह्या अर्थाची निष्पत्ती करविणाऱ्या पहिल्या मुद्यामध्ये लिंग शब्दाचा अर्थ इंद्रिय

आणि ग्रहण शब्दाचा अर्थ जाणणे असा केला आहे. अशाप्रकारे हे स्पष्ट झाले की हा ज्ञायक आत्मा इंद्रियांद्वारे जाणत नाही; त्यामुळे अलिंगग्रहण आहे, अतींद्रियज्ञानमय आहे.

२) 'हा भगवान आत्मा इंद्रिय प्रत्यक्षाचा विषय नाही' – हा अर्थ प्राप्त करविणाऱ्या दुसऱ्या मुद्यामध्ये जरी लिंगाचा अर्थ इंद्रिय आणि ग्रहणाचा अर्थ जाणणेच केला आहे; तरीही हे म्हटले आहे की ज्याला इंद्रियांद्वारे जाणले जाऊ शकत नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे.

अशाप्रकारे वरील दोन्ही अर्थांमध्ये 'लिंग' शब्दाचा अर्थ इंद्रिय, 'ग्रहण' शब्दाचा अर्थ 'जाणणे' व 'अ' चा अर्थ 'नाही' – असा केला आहे. अशाप्रकारे न तर आत्मा इंद्रियांद्वारे स्व-पराला जाणण्याचे कार्य करतो व न तो स्व-पराद्वारे इंद्रियांच्या माध्यमातून जाणलाही जातो.

तात्पर्य हे आहे की इंद्रियांशी आमचा कोणताही संबंध नाही; कारण की आत्मा त्यांच्याद्वारे जाणत नाही व त्यांच्याद्वारे जाणलाही जात नाही. शेवटी इंद्रिय तर देहाचेच भाग आहेत व आत्मा देहाहून भिन्नच आहे.

३) 'भगवान आत्मा इंद्रियप्रत्यक्षपूर्वक अनुमानाचा विषय नाही' – हा अर्थ निष्पन्न करविणाऱ्या तिसऱ्या मुद्यामध्ये म्हटले आहे की इंद्रियांद्वारे दिसून येणारे असे कोणतेही लिंग (चिह्न) नाही की ज्याद्वारे आत्म्याचे अनुमान केले जाऊ शकावे.

जसे धुराला पाहून अग्नीचे अनुमान केले जाते, अनुमान ज्ञानाने जाणले जाते; तसेच असे कोणतेही इंद्रियगम्य लिंग (चिह्न) नाही की ज्याच्या माध्यमातून अनुमानाद्वारे आत्म्याला जाणले जाऊ शकेल.

पहिले दोन मुद्दे इंद्रियांसंबंधी होते आणि तिसरा मुद्दा इंद्रिय व अनुमानाचे मिश्रित रूप आहे. पुढील तीन मुद्दे अनुमानाशी संबंधित आहेत.

४) हा आत्मा केवळ अनुमानानेच ज्ञान करण्यायोग्य नाही; कारण प्रत्यक्षादी प्रमाणांनी देखील तो जाणला जातो. अशाप्रकारे इतरांद्वारे केवळ अनुमानानेच ज्याचे ग्रहण (ज्ञान) होत नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे.

५) आत्मा केवळ लिंग म्हणजेच अनुमानाने पराला जाणत नाही;

त्यामुळे आत्मा अलिंगग्रहण आहे. यावरून हे सिद्ध होते की आत्मा केवळ अनुमाता नाही, अनुमानानेच जाणणारा नाही, कारण तो प्रत्यक्षादी प्रमाणांनी देखील पराला जाणतो.

चवथ्या व पाचव्या मुद्यात केवळ एवढेच अंतर आहे की चवथ्यात म्हटले आहे की आत्मा केवळ अनुमानाने जाणला जात नाही आणि पाचव्या मुद्यामध्ये म्हटले आहे की केवळ अनुमानानेच जाणत नाही.

अशाप्रकारे हे दोन्ही मुद्दे विशुद्ध अनुमानासंबंधी नास्तिपरक-नकारात्मक (निगेटिव्ह) मुद्दे आहेत; कारण आतापर्यंतच्या सर्व मुद्यांमध्ये हेच म्हटले आहे की आत्मा कशाप्रकारे जाणत नाही आणि कशाप्रकारे जाणला जात नाही. त्यामुळे आतापर्यंतचे सर्व पाच मुद्दे नास्तिपरक-नकारात्मक (निगेटिव्ह) मुद्दे आहेत.

६) 'आत्मा प्रत्यक्ष ज्ञाता आहे' – हा अर्थ प्राप्त करविणाऱ्या सहाव्या मुद्यामध्ये हे म्हटले आहे की आत्मा लिंग अर्थात इंद्रिय आणि अनुमानाने नव्हे, तर स्व-पर पदार्थांना प्रत्यक्ष जाणतो.

आरंभीचे पाच मुद्दे नास्तिपरक-नकारात्मक (निगेटिव्ह) होते; कारण त्यांच्यामध्ये हेच म्हटले होते की आत्मा इंद्रिय व अनुमानाने जाणतही नाही आणि जाणला देखील जात नाही; आता ह्या सहाव्या मुद्यामध्ये म्हटले आहे की आत्मा प्रत्यक्ष ज्ञाता आहे; त्यामुळे हा अस्तिपरक-सकारात्मक (पॉजिटिव्ह) मुद्दा आहे.

आतापर्यंतचे मुद्दे इंद्रिय, अनुमान व प्रत्यक्षासंबंधी होते आणि पुढील सातव्यापासून अकराव्या पर्यंतचे पाच मुद्दे उपयोगासंबंधी आहेत.

हे लक्षात असू द्यावे की उपयोग आत्म्याचे लक्षण आहे व आत्मा उपयोगलक्षणाने ज्ञानात येणारे लक्ष्य आहे. अशाप्रकारे आत्मा व उपयोगात लक्ष्य-लक्षण संबंध आहे. आत्म्याची ओळख उपयोग लक्षणानेच होते.

७-९) सातव्या मुद्यामध्ये हे म्हटले आहे की उपयोग लक्षण लिंगाद्वारे ज्ञेयपदार्थांना ग्रहण करीत नाही म्हणजेच त्यांचे अवलंबन घेत नाही; त्यामुळे आत्मा अलिंगग्रहण आहे. तात्पर्य हे आहे की आत्म्याला बाह्य पदार्थांच्या अवलंबनावाले ज्ञान नाही.

आठव्या मुद्यामध्ये हे म्हटले आहे की आत्मा उपयोग लक्षण लिंगाला बाहेरून आणत नाही आणि नवव्या मुद्यामध्ये म्हटले आहे की आत्म्याच्या उपयोग लक्षण लिंगाचे पराद्वारे हरण होत नाही.

अशाप्रकारे भगवान आत्म्याच्या उपयोगलक्षणाला ज्ञेयांच्या अवलंबनाची आवश्यकता नाही व ते लक्षण बाहेरून आणण्याचीही आवश्यकता नाही, तसेच त्याच्या अपहरणाच्या भयाने आक्रांत होण्याची सुद्धा आवश्यकता नाही.

१०) 'भगवान आत्मा शुद्धोपयोगस्वभावी आहे' – ह्या अर्थाच्या सूचक दहाव्या मुद्यामध्ये हे म्हटले आहे की ज्याप्रमाणे सूर्यामध्ये मलिनता नाही; त्याचप्रमाणे भगवान आत्म्याच्या उपयोग लक्षणामध्ये देखील मलीनता नाही, विकार नाही. चंद्रामध्ये कलंक आहे, मलिनता आहे, परंतु सूर्यामध्ये कलंक नाही, मलिनता नाही. यामुळेच येथे चंद्राचे उदाहरण न देता सूर्याचे उदाहरण दिले आहे.

११) 'आत्मा द्रव्यकर्माने असंयुक्त आहे' – असे भाव व्यक्त करणाऱ्या ११ व्या मुद्यात म्हटले की ज्याच्या उपयोग लक्षण लिंगाद्वारे पौद्गलिक कर्मांचे ग्रहण नाही, बंध नाही; तो आत्मा अलिंगग्रहण आहे.

उपयोगासंबंधी दहाव्या मुद्यामध्ये हे म्हटले आहे की भगवान आत्म्यामध्ये मलिनता नाही, शुभाशुभरूप भावकर्म नाही आणि ११ व्या मुद्यामध्ये म्हटले आहे की तो द्रव्यकर्मांनी असंयुक्त आहे. तात्पर्य हे आहे की तो आत्मा शुभाशुभभावरूप भावकर्म आणि ज्ञानावरणादी द्रव्यकर्मांनी रहित शुद्धोपयोगस्वभावी निर्लेप तत्त्व आहे.

उपयोगासंबंधी अथवा लक्ष्य-लक्षणासंबंधी वरील ७ ते ११ व्या पर्यंत ५ मुद्यांना लक्ष-लक्षणाच्या मुख्यतेने पुढीलप्रमाणे समजू शकतो –

(१) उपयोग लक्षण आपल्या आत्मारूपी लक्ष्याचे अवलंबन घेते; त्यामुळे त्याला परपदार्थांच्या अवलंबनाची काय आवश्यकता आहे ?

(२) उपयोग लक्षण आपल्या लक्ष्य आत्म्यातूनच येते; त्यामुळे त्याला पर-पदार्थांमधून येण्याची काय आवश्यकता आहे ?

(३) उपयोग लक्षण आपल्या लक्ष्य आत्म्याच्या आश्रयामध्ये राहते; त्यामुळे त्याचे अपहरण कोण करू शकतो ?

(४) उपयोग लक्षण आपल्या लक्ष्य आत्म्यातच एकाग्र होते, पर-पदार्थांमध्ये एकाग्र होत नाही; त्यामुळे त्यामध्ये मलिनता का बरे असावी?

(५) उपयोग लक्षण आपल्या लक्ष्य आत्म्यालाच ग्रहण करते, परपदर्थांना ग्रहण करीत नाही; त्यामुळे ते पराने संयुक्त का बरे व्हावे ?

तात्पर्य असे की उपयोग नामक लक्षण पराचे अवलंबन घेत नाही, परामधून येत नाही, पराकडून अपहृत होत नाही, मलिन होत नाही व पराशी संयुक्तही होत नाही.

१२-१३) 'आत्मा विषयांचा उपभोक्ता नाही'–हा अर्थाच्या १२ व्या मुद्यात म्हटले आहे की ज्याच्या लिंग अर्थात इंद्रियांद्वारे विषयांचे ग्रहण अर्थात उपयोग नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे.

'आत्मा मातेचे रज व पित्याच्या वीर्यानुसार होणारा नाही' – ह्या अर्थाच्या १३ व्या मुद्यामध्ये म्हटले आहे की ज्या आत्म्याचे लिंग म्हणजेच मन किंवा इंद्रियादी लक्षणांद्वारे ग्रहण अर्थात जीवत्व धारण करून राहणे नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे.

उपभोगासंबंधी वरील दोन्ही मुद्यांचा निष्कर्ष हा आहे की आत्मा पंचेंद्रियांच्या भोगांचा भोक्ता नाही व स्पर्शनेंद्रियाच्या भोगांनी एकत्र झालेल्या रज व वीर्याची रचना सुद्धा नाही; कारण रज व वीर्याच्या मिश्रणाचे फळ तर देहाची रचना आहे आणि आत्मा देहाहून पूर्णपणे भिन्नच आहे.

१४-१५) मेहनाकार व अमेहनाकार संबंधी ह्या मुद्यांमध्ये हे स्पष्ट केले आहे की आत्मा केवळ लौकिक साधन नाही व पाखंडींच्या प्रसिद्ध साधनरूप आकारवाला देखील नाही, लोकव्याप्तीवाला देखील नाही.

लिंग अर्थात मेहनाकाराचे ग्रहण ज्याला नाही, तो अलिंगग्रहण आहे. पुरुषाच्या गुप्तेंद्रियाला (लिंग-जननेंद्रियाला) मेहन म्हणतात आणि त्याच्या आकारासमान ज्याचा आकार आहे, त्याला मेहनाकार म्हणतात. असा मेहनाकार जो नाही, तो आत्मा अलिंगग्रहण आहे.

पुत्रादींच्या उत्पत्तीच्या साधनाला लौकिक साधन म्हणतात. ज्याप्रमाणे मेहनाकार अर्थात लिंगाकार पुत्रादींच्या उत्पत्तीचे केवळ साधन आहे; तसा लौकिक साधनमात्र आत्मा नाही.

पहा, ध्यान देण्यायोग्य बाब ही आहे की येथे लिंगाचा अर्थ मेहनाकार व अमेहनाकार – दोन्ही केला आहे. पुरुषाच्या गुप्तेंद्रियाच्या आकाराला मेहनाकार म्हणतात व लोकव्यापी आकाराला अमेहनाकार म्हणतात. हा भगवान आत्मा केवली समुद्घाताच्या काळाला सोडता शेष काळात लोकव्यापी आकारवालाही नाही; कारण संसारावस्थेत तर हा प्राप्त देहाच्या आकारामध्येच असतो व सिद्धावस्थेमध्येही किंचित न्यून अंतिम देहाकार असतो. अशाप्रकारे हा आत्मा अमेहनाकारही नाही.

अशाप्रकारे मेहनाकार नाही, त्यामुळे देखील अलिंगग्रहण आहे आणि अमेहनाकार नाही, त्यामुळे देखील अलिंगग्रहण आहे.

१६) ह्या सोळाव्या मुद्याचा सरळ व सोपा अर्थ हा आहे की हा भगवान आत्मा द्रव्य व भावाने स्त्री नाही, पुरुष नाही व नपुंसक सुद्धा नाही; तिन्ही लिंगांनी हा रहित आहे, तिन्ही लिंगांना ग्रहण करीत नाही, म्हणून अलिंगग्रहण आहे.

द्रव्यपुरुषादींना आत्मा मानणे जडाला आत्मा मानणे आहे आणि भावपुरुषादींना आत्मा मानणे पापतत्त्वाला, आस्रवतत्त्वाला आत्मा (जीवतत्त्व) मानणे आहे.

१७) धर्मचिह्नांना सुद्धा लिंग म्हणतात. जसे मुनिलिंग, गृहस्थलिंग इत्यादी. ज्या आत्म्याला ह्या धर्मचिह्नांचा अर्थात लिंगांचा अभाव आहे, तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्म्याला बहिरंग यतिलिंगाचा अभाव आहे, तो अलिंगग्रहण आहे.

लिंग शब्दाचे दोन लोकप्रसिद्ध अर्थ आहेत – १) वेद व २) वेष. स्त्रीलिंग, पुल्लिंग व नपुंसकलिंग – हे तीन लिंग वेद आहेत आणि मुनिवेष इत्यादी वेष आहेत. १६ व्या मुद्यात वेदरूप लिंगांची बाब आहे व १७ व्या मुद्यात धर्मचिह्नांसंबंधी वेषाची चर्चा आहे. ह्या दोहोंद्वारे सुद्धा आत्म्याचे ग्रहण होत नाही; त्यामुळे तो दोन्ही अपेक्षेने अलिंगग्रहण आहे.

अलिंगग्रहणासंबंधी वरील संपूर्ण प्रकारणामध्ये गुण, पर्याय व द्रव्यासंबंधी १८,१९ व २० वा मुद्दा सर्वाधिक महत्त्वपूर्ण आहे.

ह्या मुद्यांमध्ये भगवान आत्म्याला गुणविशेषाने आलिंगित न होणारे शुद्धद्रव्य, पर्यायविशेषाने आलिंगित न होणारे शुद्धद्रव्य व सामान्यद्रव्याने आलिंगित न होणारी शुद्धपर्याय म्हटले आहे; कारण अलिंगग्रहण आत्म्याला लिंग म्हणजेच गुण, ग्रहण अर्थात अर्थावबोध नाही, लिंग म्हणजे पर्याय, ग्रहण म्हणजे अर्थावबोध विशेषही नाही व लिंग अर्थात प्रत्यभिज्ञानाचे कारण द्रव्य व ग्रहण म्हणजे अर्थावबोध सामान्यही नाही.

तात्पर्य हे आहे की भगवान आत्म्याला अर्थावबोधरूप गुण नाही, अर्थावबोध विशेषरूप पर्याय नाही व प्रत्यभिज्ञानाला कारणीभूत अर्थावबोध द्रव्यसामान्यही नाही.

विशेष हे आहे की लिंग शब्दाचे द्रव्य, गुण व पर्याय – हे तीन अर्थ सांगितले आहेत. द्रव्याला देखील लिंग शब्द वापरला आहे, गुणाला सुद्धा लिंग शब्द वापरला आहे व पर्यायीलाही लिंग शब्द वापरला आहे.

ग्रहण शब्दाचा अर्थ गुणाच्या संदर्भात अर्थावबोध, पर्यायाच्या संदर्भात अर्थावबोध विशेष आणि द्रव्याच्या संदर्भात अर्थावबोध सामान्य सांगितला आहे.

वरील तिन्ही मुद्यांच्या माध्यमातून आचार्यदेव हे सांगू इच्छितात की परम पवित्र पर्याय सहित भगवान आत्मा गुणभेदरूप नाही, पर्यायभेदरूप नाही आणि द्रव्यासंबंधी विकल्परूप देखील नाही. तात्पर्य हे आहे की तो समस्त विशेषांच्या विकल्पांनी रहित निर्विकल्प सामान्यरूप महातत्त्व आहे; कारण येथे अत्यंत स्पष्ट शब्दांमध्ये सांगितले आहे की तो अलिंगग्रहण भगवान आत्मा गुणविशेषांनी आलिंगित नाही, पर्यायविशेषाने आलिंगित नाही आणि सामान्य द्रव्याने देखील आलिंगित नाही; तो तर शुद्धद्रव्य आणि शुद्धपर्यायरूप आहे.

भगवान आत्म्यामध्ये अनंत गुण आहेत, तो अनंत गुणांचा अखंड

पिंड आहे; तो केवळ अर्थावबोध अर्थात केवळ ज्ञानगुण नाही. केवळ ज्ञानगुणाला ग्रहण करणे गुणविशेषाला ग्रहण करणे आहे. येथे अलिंगग्रहण आत्म्यात गुणांचा निषेध नाही, गुणविशेषाचा निषेध आहे.

असेच पर्यायाच्या संदर्भात समजावे. अलिंगग्रहण भगवान आत्मा पर्यायांच्या अखंड प्रवाहरूप तर आहे, परंतु एक-एक पर्यायरूप नाही.

अशाप्रकारे दृष्टीचा विषयभूत आत्मा अनंत गुणांचा अखंड पिंड तर आहे, परंतु विशेष गुणरूप नाही, गुणभेदरूप नाही; अनंत पर्यायांच्या अनादी-अनंत अखंड प्रवाहरूप तर आहे, परंतु क्षणवर्ती विशेष पर्यायरूप नाही, पर्याय भेदरूप नाही.

तसेच हा भगवान आत्मा अनादी-अनंत, असंख्यातप्रदेशी, अनंत गुणात्मक द्रव्यरूप तर आहे, परंतु द्रव्यासंबंधी विकल्परूप नाही; निर्विकल्प शुद्धपर्यायरूप आहे.

अशाप्रकारे हा आत्मा द्रव्य-गुण-पर्यायमय असून देखील यांच्या भेदरूप नाही, विकल्परूप नाही.

येथे द्रव्य, गुण आणि पर्यायीला निरपेक्ष सिद्ध करावयाचे आहे. त्यांना आपल्या अस्तित्वाकरिता इतरांची अपेक्षा नाही. ते एकमेकांना स्पर्श करीत नाहीत – याचा दुसरा कोणता अर्थ असू शकतो ?

वरील २० मुद्यांच्या माध्यमातून भगवान आत्म्याच्या अलिंगग्रहण स्वरूपाला स्पष्ट केले आहे. हे अरसादी व अलिंगग्रहण भाव भगवान आत्म्याचे ज्ञेयस्वभाव आहेत. ज्ञानस्वभावासमानच आत्म्याच्या ज्ञेयस्वभावाला जाणणेही आवश्यक आहे. ज्ञेयस्वभाव व ज्ञानस्वभाव – दोन्ही स्पष्ट झाल्यानंतरच भगवान आत्म्याचे स्वरूप स्पष्ट होते. ●

जरी निर्वाण महोत्सव देखील आनंदाचा महोत्सव आहे, कारण हा आत्म्याच्या सर्वोच्च उपलब्धीचा दिवस आहे, तरी देखील ह्या आनंदामध्ये चंचलता, नाचणे-बागडणे, पक्वान्नाचे सेवन इत्यादींना स्थान नाही, कारण हा भगवंतांच्या संयोगाचा नसून वियोगाचा दिवस आहे.

– पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव, पृष्ठ-८२

प्रवचनसार गाथा १७३-१७४

मागील १७२ व्या गाथेमध्ये हे स्पष्ट केले आहे की आत्मा अरस आहे, अरूप आहे, अगंध आहे आणि अस्पर्श आहे; त्यामुळे आता हा प्रश्न उपस्थित होतो की अरूपी आत्म्याचा रूपी पौद्गलिक कर्मांशी बंध कसा होऊ शकतो ?

आगामी १७३-१७४ व्या गाथांमध्ये वरील प्रश्नाला उपस्थित करून त्याचे समाधान प्रस्तुत केले आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

मुत्तो रूवादिगुणो बज्झदि फासेहिं अण्णमण्णेहिं।
तव्विवरीदो अप्पा बज्झदि किध पोग्गलं कम्मं॥१७३॥
रूवादिएहिं रहिदो पेच्छदि जाणादि रूवमादीणि।
दव्वाणि गुणे य जधा तह बंधो तेण जाणीहि॥१७४॥

(हरिगीत)

मूर्त पुद्गल बंधे नित स्पर्श गुण के योग से।
अमूर्त आतम मूर्त पुद्गल कर्म बाँधे किसतरह॥१७३॥
जिसतरह रूपादि विरहित जीव जाने मूर्त को।
बस उसतरह ही जीव बाँधे मूर्त पुद्गलकर्म को॥१७४॥

मूर्त पुद्गल तर रूपादी गुणांनी युक्त असल्यामुळे स्पर्श गुणाद्वारे परस्पर बंधनाला प्राप्त होतात; परंतु त्याहून विपरीत अमूर्त आत्मा पौद्गलिक कर्मांद्वारे कशाप्रकारे बांधला जातो ?

ज्याप्रमाणे रूपादी गुणांनी रहित जीव रूपी द्रव्य व त्यांच्या गुणांद्वारे पाहतो-जाणतो; तसेच अरूपीचा रूपीशी बंध होतो – असे जाणा.

आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये ह्या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"रूपादी गुणांनी युक्त असल्यामुळे मूर्त पुद्गल द्रव्य तर स्निग्ध-

रूक्षत्वरूप बंधयोग्य स्पर्शविशेषामुळे परस्पर बांधले जातात, बंधनाला प्राप्त होतात – ही बाब तर लक्षात येते; परंतु आत्मा आणि पुद्गल परस्पर बंधनाला प्राप्त होतात – हे कसे मानले जाऊ शकते ?

जरी मूर्त कर्मपुद्गलामध्ये रूपादी गुण आढळतात; त्यामुळे त्यांच्यात यथायोग्य स्निग्ध-रूक्षत्व स्पर्शविशेष होतात; तरीही अमूर्त आत्म्यात रूपादी गुणांचा अभाव असल्याने आत्म्यात यथोचित स्निग्ध-रूक्षत्वरूप स्पर्शविशेष अशक्य असल्याने एका अंगाची विकलता आहे.

त्यामुळे जीव व पौद्गलिक कर्मांचा परस्पर बंध कसा होऊ शकतो ?

तात्पर्य हे आहे की परस्पर बंधणाऱ्या दोन्ही द्रव्यांमध्ये यथोचित स्निग्ध-रूक्षत्व विशेष स्पर्श गुण असेल तरच बंध होऊ शकतो. आत्म्यामध्ये स्पर्श गुणाचा अभाव आहे, त्यामुळे एका अंगाची विकलता आहे, म्हणून आत्म्याचे कर्माशी बंधणे शक्य नाही.

येथे शिष्याची शंका आहे, समाधान आचार्यांनी पुढे केले आहे –

ज्याप्रमाणे रूपादी गुणांनी रहित जीव, रूपी द्रव्यांना आणि त्यांच्या गुणांना पाहतो-जाणतो, त्याचप्रमाणे रूपादी रहित जीव, कर्म पुद्गलांशी बंधतो. जर असे होत नसेल तर पाहण्या-जाणण्यासंबंधी देखील हा प्रश्न अनिवार्य ठरेल की अमूर्त मूर्ताला कसे जाणू शकतो ?

ही बाब अत्यंत दुर्घट आहे, त्यामुळे तिला दार्ष्टांत रूप बनविले आहे – असे देखील नाही. ही बाब आबाल-गोपाळ सर्वांच्या लक्षात यावी, म्हणून दृष्टांताद्वारे समजाविली गेली आहे.

ज्याप्रमाणे बालक किंवा वृद्ध वा गवळ्याचा, त्याहून पृथक राहणाऱ्या मातीच्या बैलाला किंवा वास्तविक बैलाला पाहले-जाणले असता देखील बैलाशी कोणताही संबंध नाही; तरीही विषयरूप (ज्ञेयरूप) राहणारा बैल ज्याचे निमित्त आहे; अशा उपयोगारूढ वृषभाकार ज्ञान-दर्शनाशी असलेला संबंध बैलाशी असलेल्या संबंधरूप व्यवहाराचा साधक अवश्य आहे.

तसेच अरूपित्वामुळे आत्मा स्पर्शशून्य आहे; म्हणून त्याचा कर्म

पुद्गलांशी संबंध नाही; तरीही एकक्षेत्रावगाहरूप राहणारे कर्मपुद्गल ज्याचे निमित्त आहेत – अशा उपयोगारूढ राग-द्वेषादी भावांशी असणारा संबंध कर्मपुद्गलांशी असलेल्या बंधरूप व्यवहाराला साधक अवश्य आहे.''

'बाल' शब्दाचे बालक, मूर्ख, अज्ञानी इत्यादी अनेक अर्थ होतात व गोपाल शब्दाचे गवळी, वृद्ध, भगवानादी अनेक अर्थ होतात. आबाल-गोपाळ शब्दाचा अर्थ बालकापासून वृद्धापर्यंत, अज्ञानीपासून भगवंतांपर्यंत आणि बालक व गवळ्यासमान स्थूल बुद्धीवाले लोक सुद्धा होऊ शकतो.

गवळ्याला जगात अत्यंत स्थूलबुद्धीवाला समजले जाते; त्यामुळे येथे हे म्हटले आहे की बालक आणि गवळ्यासमान स्थूलबुद्धीवाल्यांना देखील समजावे, म्हणून दृष्टांताद्वारे समजाविले आहे.

तसेच बालकापासून वृद्धापर्यंत म्हणजेच सर्व जण आणि अज्ञानीपासून भगवंतांसमान बुद्धीमानापर्यंत सर्व जीव सहज भावाने समजू शकावेत, म्हणून दृष्टांताद्वारे समजाविले आहे.

आचार्य जयसेनांनी ह्या गाथांचा भाव मुक्त जीव, भेदज्ञानाने रहित अज्ञानी जीव व भेदज्ञानी जीवाला आधार बनवून नयविभागाने समजाविला आहे. त्यांचे ते कथन मुळातून पठनीय आहे.

वरील गाथांचा भाव कविवर वृंदावनदासजींनी पुढीलप्रमाणे छंदोबद्ध केला आहे –

(मनहरण)

मूरतीक रूप आदि गुन को धरैया यह,
पुग्गल दरव सों फरस आदिवान सों।
आपुस में बंधै नाना भांति परमानू खंध,
सो तो हम जानी सरधानी परमान सों॥
तासों विपरीत जो अमूरत चिदातमा सो,
केसे बँधे पुग्गल दरव मूर्तिमान सों।
यह तौ अचंभौ मोहि ऐसो प्रतिभासै वृन्द,
अमिलमिलाप ज्यों ''नितंब जुरे कान सों''॥६८॥

मूर्तिक रूपादी गुणांना धारण करणारे हे पुद्गल द्रव्य स्पर्शवान असल्याने अनेक प्रकारच्या परमाणुंशी बांधले जाऊन स्कंध बनते – ही बाब तर आम्ही प्रमाणाने जाणतो आणि मानतो देखील; परंतु मूर्तिक पुद्गलाहून विपरीत अमूर्तिक आत्मा मूर्तिक पुद्गलाशी कसा बांधला जाऊ शकतो ? ही बाब आश्चर्यजनक आहे.

मला तर हा अमिलमिलाप असा वाटतो की जणु नितंबाला कानाशी जोडले आहे.

(मनहरण)

रूपी दर्व घट-पट आदिक अनेक तथा,
ताके गुन-परजाय विविध वितान सौ।
तिनको अरूपी जीव देखै जानै भली-भांत,
यह तो अबाध सिद्ध प्रतच्छ प्रमान सों॥
जो न होत अस्तरूप वस्त यह आतमा तौ,
कैसे ताहि देखतौ औ जानतौ महान सों।
तैसे ताके बंध को विधान हु सुजानौ वृन्द,
समिलमिलाप ज्यों "शबद जुरैं कान सों"॥७०॥

विविध गुण-पर्यायवाले घट-पट इत्यादी अनेक रूपी द्रव्यांना अरूपी जीव चांगल्याप्रकारे पाहतो-जाणतो – हे तर अबाधित प्रत्यक्षप्रमाणाने सिद्ध बाब आहे.

जर ह्या आत्म्याचे अस्तित्व नसते तर आत्म्याने त्यांना कसे पाहले-जाणले असते?

तसेच जीव आणि पुद्गलकर्मांच्या बंधाचे विधान जाणावे. अशाप्रकारे हा अमिलमिलाप नाही, तर ज्याप्रमाणे शब्द कानाशी जुळतात, त्याच प्रकारचा हा सहज मिलाप आहे.

(दोहा)

देखन जानन की शकति, जो न जीवमँह होत।
तब किहि विधि संसार में, बंधन होत उदोत॥७१॥

मोह राग रुष भावकरि, देखत जानत जीव।
ताही भाव विकार सों, आपु हि बँधत सदीव॥७२॥
राग चिकनताई भई, दोष रुच्छता भाय।
याही के सुनिमित्त तैं, पुद्गलकरम बँधाय॥७३॥
आतम के परदेश प्रति, दर्वित कर्म अनाद।
तिनसों नूतन करम को, बंध परत निरवाद॥७४॥
यह विवहारिक बंधविधि, निहचै बंध न सोय।
जहँ अशुद्ध उपयोग है, मोह त्रिकंटक जोय॥७५॥

जर जीवामध्ये पाहण्या-जाणण्याची शक्ती नसती तर मग संसारामध्ये बंधनाचे ज्ञान देखील कसे झाले असते.

हा पाहणारा-जाणणारा जीव मोह-राग-द्वेषरूप विकारी भावांनी नेहमी स्वत: बंधनाला प्राप्त होत आहे.

राग स्निग्धभाव आहे आणि द्वेषभाव रूक्ष आहे – यांच्याच निमित्ताने पुद्गल कर्मांचा बंध होतो.

आत्म्याच्या प्रदेशांमध्ये अनादी काळापासून द्रव्यकर्मांचे बंधन आहे; त्यांच्यामुळे नवीन कर्मांचा बंध होतो – ही बाब निर्विवाद आहे.

ही बंधनाची प्रक्रिया व्यवहाराने म्हटली आहे. निश्चयनयाने तर बंध होतच नाही. जेथे अशुद्धोपयोग आहे, तेथे तीनप्रकारचा मोह असतोच.

(मनहरण)

जैसे ग्वालबालगन बैल सांचे माटीनि के,
देखि जानि तिन्हें अपनाये राग जोर सों।
तिनके निकट कोऊ मारै छोरै बैलनि कों,
तबै ते अधीर होंय रोवैं धोवैं शोर सों॥
तहां अब करो तो विचार भेदज्ञानी वृन्द,
बंधे वे वयल सो की ममता की डोर सों॥
तैसें पुद्गल कर्म बाहिज निमित्त जानो,
बंध्यो जीव निहचै अशुद्धता मरोर सों॥७६॥

जसे गवळ्याचे बालक खऱ्या किंवा मातीच्या बैलांना पाहून-जाणून रागाच्या बळावर त्यांच्यामध्ये आपलेपण स्थापित करतात. जेव्हा त्यांचे जवळचे कोणी त्या बैलांना सोडून घेऊन जातो, त्यांना मारतो, तेव्हा ते खूप अधीर होतात, रडतात व आरडा-ओरड करतात.

हे भेदज्ञानी जीवांनो ! वरील परिस्थितीमध्ये विचार करून पहा कि ते बालक बैलांशी स्वत:च्या ममतेच्या धाग्याने बांधले गेले आहेत. त्याचप्रमाणे पुद्गलकर्म तर केवळ बाह्य निमित्त आहे; निश्चयनयाने तर जीव अशुद्धोपयोगाच्या पिळ्याने बांधलेला आहे.

पंडित देवीदासजींनी ह्या गाथांचा भाव एकेका पद्यामध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(कवित्त छन्द)

पुग्गलखंध वा सु परमानू विषै गुन सु वरनादिक चार।
पुनि चीकनैं परसपर रूखे अंसनि सौं सुबंध निरधार॥
पुग्गल के सु चीकनैं रूखे गुन करि रहित आतमा सार।
पूछत सिष्य वरगना पुद्गल बाँधै जीव कौन परकार॥१३४॥

पुद्गल स्कंध असो वा परमाणू असो, त्यामध्ये वर्णादी चार गुण आढळतात आणि त्यांच्यापैकी स्पर्श गुणामध्ये स्निग्धता-रूक्षतेच्या अंशामध्ये बंधाचे निर्धारण होते. ज्यांच्यामुळे बंध होतो, असे स्निग्धता-रूक्षतारूप शक्त्यंश पुद्गलाचेच असतात आणि आत्मा ह्या गुणांनी रहित असतो.

जर असे आहे तर मग शिष्य विचारतो की आत्म्यामध्ये स्निग्धता-रूक्षता नाहीच तर पुद्गल कार्माणवर्गणांना जीव कसा बांधू शकतो ?

(छप्पय)

जीव अमूरतिवंत गुन सुवरनादि रहित है।
वरनादिक गुन घटपटादि पुद्गल सु सहित है॥
गुन घट पटनि विषैं सुपेत पीतादि बखानैं।
विकलपता करिकैं तिन्हैं सु देखैं अरु जानैं॥

परकार सु इहि पुद्गल दरव बंधै जीव सौं जाइकैं।
तुम सिष्य सुनौ उत्तर सु यहु कहै सुगुरु समुझाइ कैं॥१३५॥

जीव अमूर्तिक आहे आणि वर्णादी गुणांनी रहित आहे. घट-पटादी पुद्गलच वर्णादी गुणांनी युक्त आहेत. हे वस्त्र शुभ्र वा पिवळे – अशाप्रकारे वर्णादी गुण घट-पटरूप पुद्गल स्कंधांमध्ये आहेत आणि अमूर्तिक आत्मा त्या श्वेत-पीतादींना जाणतो-पाहतो. येथे गुरु शिष्याला समजावून सांगत आहेत की हे शिष्य ! तू आपले उत्तर ऐक. ज्याप्रमाणे अमूर्तिक आत्मा वर्णादी गुणसंपन्न पुद्गलाला जाणतो; त्याचप्रमाणे अमूर्तिक आत्मा वर्णादी गुणवान कार्माणवर्गणांशी बांधला जातो.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजी स्वामींनी ह्या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"एका बालकाकडे मातीचा बैल आहे आणि एका वृद्धाजवळ एक खराखुरा बैल आहे. तो मातीचा बैल बालकाहून भिन्न आहे आणि वास्तविक बैल वृद्धाहून भिन्न आहे. ते भिन्न असूनही बालक मातीच्या बैलाला जाणतो आणि वृद्ध सुद्धा खऱ्या बैलाला जाणतो.

बैलाला जाणत असताना बालक व वृद्ध दोन्ही बैलांपासून भिन्न आहेत. बैलांशी त्यांचा कोणताही संबंध नाही. जसे बालक बैलाला जाणत-पहात असताना ज्ञान-दर्शन उपयोगस्वरूप आहे, तसेच वृद्ध सुद्धा बैलाला जाणत-पहात असताना ज्ञान-दर्शन उपयोगस्वरूप आहे.[१]

ज्ञान आत्म्याचे आहे आणि त्यामध्ये बैल निमित्त आहे. ज्ञान व बैल वेगवेगळे असून देखील त्यांच्या ज्ञान-ज्ञेयाचा संबंध, बैलाशी संबंधरूप व्यवहाराचा साधक अवश्यक आहे.[२]

ह्याच दृष्टांताने आत्मा अरूपी आहे, स्पर्श शून्य आहे; त्यामुळे आत्म्याचा स्पर्शादी कर्मपुद्गलांशी संबंध नाही; तरी देखील जो जीव स्वत:च्या ज्ञाता-दृष्टा स्वभावाहून दूर होऊन मिथ्यात्व, राग-द्वेष करतो;

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २८३-२८४ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २८४

त्याच्या राग-द्वेषामध्ये कर्म निमित्त आहे, त्यामुळे आत्म्याचा कर्मपुद्गलाशी संबंध होतो. अशाप्रकारे कर्माशी आत्म्याचा बंधरूप व्यवहार सिद्ध होतो.

ज्याप्रमाणे अमूर्त ज्ञानाचा मूर्त ज्ञेयाशी संबंध होतो, त्याचप्रमाणे अमूर्त आत्म्याचा मूर्त कर्माशी संबंध होतो.[१]

गाथा क्रमांक १७२ मध्ये म्हटले होते की जो जीव चैतन्य ज्ञाता-दृष्टा स्वभावाचा आश्रय घेतो, त्याला सम्यग्दर्शन होते व विशेष स्थिरता झाल्यावर मोक्ष प्राप्त होतो.

येथे म्हणतात की जो जीव बाह्य-पदार्थांना ज्ञेयरूपे न जाणता त्यांच्यात आपलेपण करतो, त्याला संसार राहतो. जो जीव जाणणे-पाहणेरूप व्यापार करीत नाही व परसन्मुख राहतो, त्याला राग-द्वेष होतातच आणि राग-द्वेष होतात तर त्यामध्ये जडकर्म निमित्त होते. अशा पर्यायदृष्टीवाल्या जीवाचा कर्माशी निमित्त-नैमित्तिक संबंध राहतोच. ते येथे सांगितले आहे.

जो जीव स्व कडे जातो, त्याला जुन्या कर्मांचे निमित्त होत नाही आणि नवीन कर्म बांधले जात नाहीत; परंतु जो जीव पर्यायबुद्धी करून राग-द्वेष करतो, त्याला जुने कर्म निमित्त होतात आणि नवीन कर्म बांधले जातात आणि तो जेवढ्या प्रमाणात राग-द्वेष करतो, त्याला तेवढ्या प्रमाणात कर्म बांधले जातात.[२]

स्त्री-पुत्र बंधाचे कारण आहेत - हे उपचाराचे कथन आहे. आत्म्याचा ज्ञानावरणादी आठ कर्मांशी संबंध नाही; कारण त्यांचा आत्म्यामध्ये अत्यंत अभाव आहे. असे असूनही जो जीव ममता करतो, पर-पदार्थामध्ये योग्य-अयोग्य बुद्धी करून स्वभावापासून दूर होऊन परद्रव्यामध्ये अडकतो, तो जीव स्वत:च्या पर्यायीमध्ये राग-द्वेषादीरूप भावबंध करतो.

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २८३-२८४ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २८४

तो भावबंध निश्चयाने आहे व त्या भावबंधामध्ये स्त्री-पुत्रादी निमित्त आहेत; त्यामुळे रागी जीवाला स्त्री-पुत्रादींचे बंधन होते - असे व्यवहाराने म्हटले जाते.[१]

अशुद्धता स्वत:च्या पर्यायामध्ये स्वत:मुळे झाली आहे व होत आहे, त्यामध्ये जडकर्म केवळ निमित्त आहे; कारण स्वत:ला लक्ष बनविल्याने अशुद्धता होत नाही, तर जडकर्मांच्या लक्ष्यानेच अशुद्धता होते. पर्यायामध्ये बिलकुल अशुद्धता नाही - असे मानने देखील मिथ्या आहे आणि मलिनता असूनही मलिनतेचे निमित्त मानले नाही, तरी व्यवहार खरा नाही. मलिन पर्याय देखील ज्ञेय आहेत. मलिन पर्याय व कर्मांचा निमित्त-नैमित्तिक संबंध आहे - असे येथे सांगितले आहे.[२]

जो जीव भावबंध व स्वत:च्या पर्यायीचे सत्य स्वरूप जाणत नाही, तो भावबंधाने रहित आपल्या निजस्वरूपाला जाणू शकत नाही. त्यामुळे भावबंधाचा द्रव्यबंधाशी निमित्त-नैमित्तिक संबंध दर्शवून म्हटले आहे की ते दोन्ही जीवाचे स्वरूप नाहीत. जीव तर अबंधस्वभावी आहे - असे यथार्थ जाणणेच प्रयोजनवान आहे.[३]''

वरील संपूर्ण विवेचनाचा सारांश हा आहे की बंधासंबंधी शास्त्रांचे कथन असे आहे की दोन द्रव्यांमध्ये बंधाचे कारण स्निग्धता व रूक्षता आहे, ती स्पर्श गुणरूप असल्याने केवळ पुद्गलद्रव्यातच आढळतात; त्यामुळे विविध पुद्गल परमाणुंचा स्कंधरूप बंध तर शक्य आहे; परंतु अरूपी असल्याने आत्म्यामध्ये स्पर्श गुणाचा अभाव आहे; म्हणून त्यामध्ये स्निग्धता व रूक्षता असणे शक्य नाही. अशा परिस्थितीत आत्म्याशी पौद्गलिक कर्मांचा बंध कसा होऊ शकतो ?

वरील शंकेचे समाधान करीत येथे म्हटले आहे की ज्याप्रमाणे अमूर्त आत्मा मूर्त पुद्गलाला पाहतो-जाणतो; त्याचप्रमाणे तो अमूर्त आत्मा मूर्त पौद्गलिक कर्मांशी बांधला देखील जातो.

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २८८ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २८९
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २८९

तात्पर्य हे आहे की निश्चयनयाने तो पौद्गलिक कर्मांना पहात-जाणतही नाही व त्यांच्याशी बांधलाही जात नाही; परंतु जसा तो व्यवहार नयाने पौद्गलिक कर्मांना जाणतो-पाहतो, तसाच तो बांधलाही जातो.

आचार्यदेव म्हणतात की आत्म्याचे रूपी पदार्थांना पाहणे-जाणणे दुर्घट देखील नाही; कारण पराला जाणणे-पाहणे तर निरंतर होतच आहे. आत्मा पराला जाणतो-पाहतो - ही बाब तर जगप्रसिद्ध आहे. उदाहरण देखील तेच दिले जाते की जे प्रतिवादीला देखील स्वीकार व्हावे. जी बाब संपूर्ण जगाला स्वीकार्य होते, ती बाब तर वादी-प्रतिवादी दोहोंना स्वीकार्य तर असतेच असते.

ही बाब येथे मातीचा बैल आणि त्याला जाणणारा बालक - ह्या उदाहरणाच्या माध्यमातून समजाविली आहे.

जरी बालक व मातीच्या बैलामध्ये अत्यंताभावाची वज्राची भींत उभी आहे, कारण ते भिन्न-भिन्न पदार्थ आहेत आणि भिन्न-भिन्न पदार्थांमध्ये अत्यंताभाव असतो; तरी देखील बालक त्या मातीच्या बैलाला जाणतो-पाहतोच.

तो बालक त्या बैलाला पाहून त्यावर मोहित होतो, त्याला आपला मानतो, त्यावर प्रेम करतो. जर कोणी त्याला मारले, तोडले तर तो दु:खी होतो आणि तोड-फोड करणाऱ्याशी द्वेष करतो.

अशाप्रकारे ह्या आपलेपण आणि राग-द्वेषामुळे तो बालक स्वत:च दु:खी होतो आणि बंधनात अडकतो.

त्याचप्रमाणे हा आत्मा परपदार्थांना जाणत-पहात असताना, त्यांच्यात आपलेपण करतो, त्यांच्याशी राग-द्वेष करतो आणि स्वत:च बंधनात अडकतो.

जरी बालकाचा जाणण्यात येणाऱ्या मातीच्या बैलाशी पारमार्थिक संबंध नाही, तरी देखील ज्ञेयरूप बैलाच्या निमित्ताने त्याच्या ज्ञानात देखील एक बैल तयार झाला आहे, बैलाचा आकार बनला आहे; त्याच्याशी बालकाचा संबंध आहे; कारण तो त्याच्या ज्ञानाची रचना

आहे, त्यामुळे ज्ञानाकार आहे. तो संबंध त्याच्या निमित्तरूप बैलाशी असलेल्या संबंधाला व्यवहार म्हणतो.

त्याचप्रमाणे जरी आत्म्यामध्ये ज्ञात होणाऱ्या कर्मपुद्गलांशी आत्म्याचा पारमर्थिक संबंध नाही, तरी देखील एकक्षेत्रावगाह राहणारे कर्मपुद्गल ज्याचे निमित्त आहेत - अशा उपयोगात येणाऱ्या राग-द्वेष भावांशी असलेला संबंध कर्मपुद्गलांशी बंधरूप व्यवहाराला अवश्य दर्शवितो.

तात्पर्य हे आहे की परस्पर अत्यंत भिन्न-भिन्न द्रव्यांमध्ये ज्याप्रमाणे व्यवहाराने ज्ञेय-ज्ञायक संबंध आढळतो; त्याचप्रमाणे त्यांच्यात व्यवहाराने बंध-बंधकभाव देखील आढळतो.

धर्म विज्ञानाचा विरोधी नाही तर मार्गदर्शक आहे. धर्माच्या मार्गदर्शनामध्ये कार्य करणाऱ्या विज्ञानाचा विकास विनाश नव्हे तर निर्माण करेल. घोडा आणि घोडेस्वार एकमेकांचे प्रतिद्वंदी नसून एकमेकांचे सहायक आहेत, शर्यतीमध्ये पळणार तर घोडाच, जिंकणार सुद्धा घोडाच, परंतु घोडेस्वाराच्या मार्गदर्शनाशिवाय घोड्याचे जिंकणे शक्य नाही. पळायचे तर घोड्यालाच आहे, परंतु कोठे पळायचे, केव्हा आणि कसे ? ह्या सर्वांचा निर्णय घोडा नाही तर घोडेस्वार करणार. योग्य घोडेस्वार नसेल तर घोडा उपद्रवच करणार, महावत नसेल तर हत्ती विनाशच करणार, निर्माण नव्हे. ज्याप्रमाणे घोड्याला घोडेस्वार आणि हत्तीला महावताच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणे विज्ञानाला धर्माच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे, परंतु दुर्भाग्याने आज धर्माला आपली उपयोगिता आणि आवश्यकता सिद्ध करण्याकरिता विज्ञानाचे सहाय्य घ्यावे लागत आहेत.

काहीही असो, जर आम्हाला सुख आणि शांती हवी असेल तर धर्माला आपल्या जीवानाचे अंग बनवावेच लागेल.

– आत्मा ही है शरण, पृष्ठ : २६, २७

प्रवचनसार गाथा १७५-१७६

अशाप्रकारे मागील गाथांमध्ये जीव व पौद्गलिक कर्मांच्या बंधनाचे स्वरूप उदाहरणासहित स्पष्ट करून आता भावबंध व द्रव्यबंधाचे स्वरूप स्पष्ट करतात.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

उवओगमओ जीवो मुज्झदि रज्जेदि वा पदुस्सेदि।
पप्पा विविधे विसये जो हि पुणो तेहिं संबंधो ।।१७५।।
भावेण जेण जीवो पेच्छदि जाणादि आगदं विसये।
रज्जदि तेणेव पुणो बज्झदि कम्म त्ति उवदेसो ।।१७६।।

(हरिगीत)

प्राप्त कर उपयोगमय जिय विषय विविध प्रकार के।
रुष-तुष्ट होकर मुग्ध होकर विविधविध बंधन करे।।१७५।।
जिस भाव से आगत विषय को देखे-जाने जीव यह।
उसी से अनुरक्त हो जिय विविधविध बंधन करे।।१७६।।

उपयोगमयी जीव विविध विषयांना प्राप्त करून मोह करतो, राग करतो आणि द्वेष करतो; तो जीव त्या मोह-राग-द्वेषांद्वारे संबंधरूप होतो, बंधनामध्ये अडकतो.

जीव विषयागत पदार्थांना ज्या भावाने पाहतो-जाणतो; त्यानेच उपरक्त होतो आणि त्यामुळेच कर्म बंधन करतो – असा उपेदश आहे.

या गाथांचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''सविकल्प (ज्ञान) आणि निर्विकल्प (दर्शन) प्रतिभासस्वरूप असल्याने हा आत्मा पूर्णपणे उपयोगमय आहे.

काळ्या, पिवळ्या किंवा लाल भांड्यात ठेवलेल्या स्फटिकाच्या काळ्या, पिवळ्या आणि लाल रंगाने उपरक्त स्वभाववाला स्फटिकमणी ज्याप्रमाणे स्वत: एकटाच तद्रूप परिणमित होतो; त्याचप्रमाणे हा

आत्मा विविधाकार प्रतिभासित होणाऱ्या पदार्थांना प्राप्त करून मोह-राग-द्वेष करतो आणि मोह-राग-द्वेषांद्वारे उपरक्त (विकारी) आत्मस्वभाववाला असल्याने स्वत: एकटाच बंधरूप आहे; कारण मोह-राग-द्वेषभावच याला दूसरे आहेत.

साकार (ज्ञान) व निराकार (दर्शन) प्रतिभासस्वरूप असल्याने हा आत्मा प्रतिभासित होण्यायोग्य पदार्थसमूहाला ज्या मोह-राग-द्वेषरूप भावाला पाहतो-जाणतो, त्यानेच उपरक्त होतो. जो हा उपराग (विकार) आहे, तो स्निग्ध-रूक्षत्व स्थानीय भावबंध आहे व त्यानेच पौद्गलिक कर्मांचा बंध होतो. अशाप्रकारे हा भावबंध निमित्तिक द्रव्यबंध आहे.''

बंध होण्याकरिता दोन पदार्थांचे असणे आवश्यक आहे; कारण केवळ एका पदार्थामध्ये बंध कसा होऊ शकतो ? त्यामुळे येथे असे म्हटले आहे की आत्म्याच्या बंधामध्ये एक आत्मा व मोह-राग-द्वेष दूसरे – अशाप्रकारे आत्मा व मोह-राग-द्वेष ह्या दोहोंत बंध झाला आहे.

आचार्य जयसेनांनी देखील वरील गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेसमानच स्पष्ट केला आहे.

कविवर वृंदावनदासजींनी वरील गाथांचा भाव एकेका छंदामध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(माधवी)

उपयोगसरूप चिदातम सो, इन इन्द्रिनि की सतसंगति पाई।
बहु भांति के इष्ट-अनिष्ट विषैं, तिनको तित जोग मिलैं जब आई॥
तब राग रु दोष विमोह विभावनि, सो तिनमें प्रनवै लपटाई।
तिनही करि फेरि बँधे तहँ आपु, यों भाविकबंध की रीति बताई॥७७॥

हा उपयोगस्वरूप चैतन्य आत्मा इंद्रियांची संगती मिळाल्याने अनेक प्रकारच्या इष्ट-अनिष्ट पदार्थांमध्ये मोह-राग-द्वेषरूप परिणमित होतो, त्यांच्याशी लिपटतो (एकरूप होतो) व मग त्या मोह-राग-द्वेष भावांनीच बंधनात अडकतो. भावबंधाची हीच रीत आगमामध्ये सांगितली आहे.

(मनहरण)

रागादि विभावनि में जौन भावकरि जीव,
देखै जानै इन्द्रिनि के विषय जे आये हैं।
ताही भावनि सों तामें तदाकार होय रमै,
तासों फेरी बँधै यही भावबंध भाये हैं॥
सोई भावबंध मानों चीकन रुखाई भयो,
ताही के निमित्त सेती दर्वबंध गाये हैं।
जामें आठ कर्मरूप कारमानवर्गना है,
ऐसे सर्वज्ञ भनि वृन्द को बताये हैं॥७८॥

हा आत्मा इंद्रिय विषयांना ज्या रागादी भावांनी पाहतो-जाणतो, त्याच भावांमध्ये तदाकार होऊन रमतो आणि बंधनात अडकतो. हाच भावबंध आहे.

हाच भावबंध जणु राग-द्वेषरूप स्निग्धता आणि रूक्षतारूप आहे आणि याच निमित्ताने द्रव्यबंध होतो. त्या द्रव्यबंधामध्ये कार्माण वर्गणा आठ प्रकारच्या कर्मरूपाने परिणमित होतात. वृंदावन कवींनी म्हटले आहे की सर्वज्ञ भगवंतांनी ही बाब सांगितली आहे.

पंडित देवीदासजींनी ह्या गाथांचा भाव एकेका पद्यामध्ये खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(कवित्त छन्द)

देखैं जिहि प्रकार अरु जानैं गुन सजीव उपयोग अनूप।
सो पुनि विविधि पाइ इंद्रिनि के विषय इष्ट अनइष्ट स्वरूप॥
मोही तिन्हि विषैं सु पुनि रागी दोषी होहि करि सु बहूतूप।
तिनही राग दोष भावनि करि बूडत विषैं बंध के कूप॥१३६॥

जीव आपल्या अनुपम उपयोग गुणाने ज्याप्रमाणे जाणतो-पाहतो; त्याचप्रमाणे तो अनेक प्रकारच्या इंद्रिय विषयांना जाणता-पाहतांना इष्ट किंवा अनिष्ट भाव करू लागतो, तेव्हा ते इंद्रिय विषयच इष्ट वा अनिष्ट स्वरूपावाले आहेत - असे म्हणतात. मूढ जीव ह्या इंद्रिय-

विषयांमध्ये रागी-द्वेषी होत असतो आणि ह्याच राग-द्वेषादी भावांमध्ये विषय-भोगांमध्ये बुडून जातो आणि बंधरूपी विहीरीत पडतो.

(सवैया इकतीसा)

तेई राग भाव और दोष भाव मोह भाव
याही लोक माँहि ये सु तीन हु अधर्म सौं।
आये जे सु इंद्रिनि विषैं अनिष्ट इष्ट भाव
तिन्हि कौं विलोकैं जानैं महा अति मर्म सों॥
देखि जानि तिनही स्वरूप होकैं परिनवै।
रागादिक तिसही विभाव ताकै मर्म सौं।
सोई भाववंध कौ निमित्त पाइ बंधै जीव।
ग्यानावरनी जु आदि दै सु अष्टकर्म सौं॥१३७॥

जीवाचे जे रागभाव, द्वेषभाव व मोहभाव आहेत; ते तिन्ही लोकात अधर्म म्हटले जातात. जीवाला आपल्या पुण्य-पाप कर्माच्या उदयानुसार जे-जे इंद्रियविषय प्राप्त होतात, तो त्यांच्यात इष्ट वा अनिष्ट भाव करूनच त्यांना जाणतो व अत्यधिक मूढता किंवा महाभ्रमामुळे त्यांना चांगला-वाईट वा सुख-दुःखरूप मानू लागतो. तसेच त्या इष्ट-अनिष्ट पदार्थांनाच जाणून तो त्यांच्यास्वरूप परिणमित होऊन म्हणजेच त्यांच्या इष्ट-अनिष्ट बुद्धीने त्यांच्यात सुख-दुःख मानतो व रागादी विभावरूप परिणमन करीत राहतो. त्याच विभाव परिणामांच्या मंदता-तीव्रतारूप शक्तीने तो भावबंधस्वरूप होतो. अशाप्रकारे भावबंधाचे निमित्त मिळाल्यानेच भावबंधस्वरूप जीव ज्ञानावरणादी अष्टविध कर्मांनी बांधला जातो.

वरील गाथांचा भाव आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे -

"जीव स्वतःच्या स्वभावाला न जाणता जगातील पदार्थांमध्ये इष्ट-अनिष्ट कल्पना करून त्यांच्यात अडकतो, हाच भावबंध आहे आणि हाच संसार आहे.

संसार कोण्या बाह्य पदार्थांमध्ये नसून स्वत:च्या अज्ञानभावात आणि राग-द्वेष पर्यायांमध्येच संसार आहे.[१]

१) जगातील इतर पदार्थ आहेत, म्हणून भावबंध होतो - असे नव्हे, कारण ते पदार्थ भगवंतांच्या ज्ञानात ज्ञात होतात, तरी देखील त्यांना भावबंध होत नाही.

जो जीव ह्या पदार्थांपासून स्वत:ला लाभ-हानी मानून भ्रांतीने ह्यांचे सेवन करतो, त्याला भावबंध होतो.

२) त्या वस्तुंशी असलेला एकक्षेत्रावगाह संबंध सुटला तर भावबंध सुटेल – असे देखील नव्हे; कारण द्रव्यलिंगीला कोणत्याही वस्तुचा परिग्रह नाही, तरीही भावबंध सुटत नाही; कारण परपदार्थ माझा आहे व मी त्यांना सोडू शकतो, अशी त्याची मान्यता आहे. ही मान्यताच भावबंध आहे. ही मान्यता तर दूर झाली नाही; त्यामुळे परपदार्थ सुटूनही भावबंध सुटत नाही, पराशी असलेले ममत्व सुटल्यावर भावबंध सुटतो.[२]

उपयोगमय आत्मा म्हणजे ज्ञाता-दृष्टा स्वभावी आत्मा जीवतत्त्व आहे, शरीर व कर्म अजीव तत्त्व आहेत. दया-दानादीचे शुभभाव पुण्यतत्त्व आहेत. हिंसा, असत्य, चोरीचे अशुभभाव पापतत्त्व आहेत. पुण्य-पाप दोन्ही आस्रव आहेत व त्यांच्यात अडकणे भावबंध आहे.

स्वत:च्या आत्म्याची श्रद्धा करून शुद्धी प्रगट होणे संवर तत्त्व आहे. विशेष लीनता झाल्यावर शुद्धीची वृद्धी होणे निर्जरा तत्त्व आहे आणि परिपूर्ण शुद्धी होणे मोक्ष तत्त्व आहे.[३]

पर्यायदृष्टीवाला जीव स्वत:च भावबंधरूप परिणमित होतो. आत्मा स्फटिक मण्यासमान निर्मळ आहे; परंतु स्फटिक काळ्या, पिवळ्या व लाल रंगाच्या संयोगात आल्यावर आपल्या योग्यतेनुसार काळा, पिवळा व लाल रंगरूप परिणमित होतो.

रंगाला तर निमित्त म्हणतात; परंतु ती रंगीत अवस्था स्फटिक मण्याचा मूळ स्वभाव नाही. त्याचा मूळ स्वभाव तर स्वच्छरूप आहे.

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २९० २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २९१
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २९१-२९२

त्याचप्रमाणे आत्मा ज्ञाता-दृष्टास्वभावमय आहे; परंतु जेव्हा तो स्वत:च्या स्वभावाला विसरून परावर उपयोग केंद्रित करतो, तेव्हा त्यामध्ये मलिनता म्हणजेच शुभाशुभ भाव उत्पन्न होतात.

अनुकूल पदार्थांमध्ये राग करणे, प्रतिकूल पदार्थांमध्ये द्वेष करणे, पैसे कमविणे इत्यादी अशुभभावात सुख मानणे, दया-दानादी पुण्यभावात धर्म मानणे – हे सर्व मोह-मिथ्यात्वाचे भाव औपाधिक भाव आहेत.

अशा मलिन परिणामरूप परिणमित आत्मा स्वत:च बंधरूप आहे.

येथे कोणी म्हणतो की बंध तर दोन वस्तुंचा होतो, एकटा आत्मा बंधस्वरूप कसा असू शकतो ?

त्याचे उत्तर देतात की एक तर आत्मा आणि दुसरा मोह-राग-द्वेषादीभाव – असे असल्यामुळे मोह-राग-द्वेषादी परिणामांनी मलिन स्वभाववाला आत्मा स्वत:च भावबंध आहे.[१]

येथे प्रश्न उत्पन्न होतो की आत्म्याची पर्याय मोह-राग-द्वेष 'द्वितीय' का झाली ?

उत्तरादाखल म्हणतात की भावबंध आत्म्याची अरूपी विकारी पर्याय आहे, ती जडामध्ये उत्पन्न होत नाही व जडामुळे तिचे अस्तित्व नाही. मलिनता आत्म्याची अवस्था असल्याने ती आत्म्याच्या स्वच्छतेला अडवून सुख उत्पन्न होऊ देत नाही; त्यामुळे तिला (मोह-राग-द्वेषाला) 'द्वितीय' वस्तू म्हटले आहे.

जर मलिनता व त्रिकाळी स्वभाव एक असता तर मलिनतेने सुखाला अडविले नसते व त्रिकाळी स्वभाव मलिन झाला असता, त्यामुळे त्रिकाळी स्वभावाच्या अपेक्षेने मलिनता दुसरी वस्तू आहे. बंध दोन वस्तुंचा होतो म्हणजेच आत्मा व मलिनतेचा परिणाम या दोहोंचा बंध झाला; इतर परपदार्थांशी बंध नव्हे.[२]

पदार्थ व त्याचे ज्ञान मलिनतेचे कारण नाही. ज्ञानस्वभावात सर्व पदार्थ जाणण्यायोग्य आहेत, त्या पदार्थांना जाणणे आत्म्याचा स्वभाव आहे.

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २९० २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : २९१

ते पदार्थ किंवा त्या पदार्थांचे ज्ञान मलिनतेचे कारण नाही; केवलज्ञानींच्या ज्ञानात तिन्ही लोकांचे पदार्थ ज्ञात होतात; तरी देखील त्यांना राग होत नाही. अज्ञानी जीव त्या पदार्थांमध्ये मोह करतो, तेच संसाराचे कारण आहे.[१]

भावबंधामुळे द्रव्यबंध होत नाही, भावबंध तर केवळ निमित्त आहे.

अहो ! वस्तुस्वरूप स्वतंत्र आहे. अजीवाची क्रिया जीव करू शकतो - असे जो मानतो, त्याला नवतत्त्वांच्या व्यवहार श्रद्धेची जाणीव देखील नाही. जो जीव बाह्य संयोगांमध्ये अडकला आहे, तो जीव विकार व स्वतःचा त्रिकाळी स्वभाव - ह्या दोहोंमध्ये भेद करू शकत नाही. पराधीन दृष्टी करणेच मोह, राग आणि द्वेष आहे आणि तोच भावबंध आहे. त्याचे निमित्त मिळाल्याने जडकर्मांचा संयोग होतो. राग-द्वेष केल्यामुळे द्रव्यबंध झाला - असे नव्हे, तो तर आपल्या काळातच होतो, तेथे भावबंध केवळ निमित्त आहे.[२]

जडकर्म जडकर्मामुळे आणि भावबंध भावबंधामुळे आहे. जेव्हा भावबंध होतो, तेव्हा जडकर्मांचा बंध होतो - असा निमित्त-नैमित्तिक संबंध जाणावा. तरीही तेथे राग-द्वेष जडकर्मांचे कर्ता नाहीत.

बाह्य वस्तुंच्या संयोगामध्ये अनेक वेळा निमित्त-नैमित्तिक संबंध आढळून येत नाही, कारण जीव इच्छा करतो, तेव्हा तोंडातून शब्द बाहेर पडतात व कधी पडतही नाहीत, कोण्या वस्तुची इच्छा केली असता संयोग मिळतातही व मिळतही नाहीत. म्हणजेच बाह्य संयोगांचा व जीवाच्या परिणामांचा निमित्त-नैमित्तिक संबंध नेहमी होत नाही, कधी-कधीच होतो; परंतु जेथे राग व जडकर्माचा अनिवार्य निमित्त-नैमित्तिक संबंध आहेच, तेथेही राग जडकर्माचा कर्ता नाही; तर मग जेथे निमित्त-नैमित्तिक संबंध नेहमी होत नाही, कधी-कधीच होतो, तेथे पदार्थांचा कर्ता-भोक्ता किंवा आणणारा आत्मा कसा होऊ शकतो.[३]''

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३०१
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३०९
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३११

तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये ह्या गाथांचा भाव स्पष्ट करताना स्फटिक मण्याचे उदाहरण देऊन सिद्ध केले आहे की ज्याप्रमाणे अत्यंत स्वच्छस्वभावी स्फटिक मणी काळा, पिवळा व लाल भांड्याच्या संयोगाने स्वत: एकटाच काळा, पिवळा व लाल होतो; त्याचप्रमाणे हा आत्मा विभिन्न पदार्थांना ज्ञेयरूपाने प्राप्त करून, जाणून, त्यांच्यात आपलेपण करतो, त्यांच्याशी राग-द्वेष करतो, तेव्हा त्या मोह-राग-द्वेषाने उपरक्त झाल्याने स्वत: एकटाच बंधरूप होतो.

येथे एक प्रश्न संभवतो की कोण्या वस्तुचा बंध इतर दुसऱ्या वस्तुशीच शक्य आहे, एका वस्तुचे स्वत:शीच बंधन कसे होऊ शकते ?

उत्तरादाखल म्हटले आहे की आत्मा एकटा कोठे आहे, त्याच्या सोबत ज्ञेयांवर उपयोग केंद्रित केल्याने आत्म्यात उत्पन्न होणारे मोह-राग-द्वेष सुद्धा आहेत. त्यामुळे हा भावबंध एक आत्मा व दुसऱ्या मोह-राग-द्वेषांमध्ये होणारा बंध आहे.

ह्या भावबंधामध्ये कर्मोदय उदयरूपे व ते ज्ञेयपदार्थ केवळ निमित्त आहेत. यांनी आत्म्यामध्ये काहीही केले नाही; कारण हे पदार्थ व आत्म्यामध्ये अत्यंताभावाची वज्राची भींत उभी आहे. कर्मांच्या उदयकाळात ज्ञेयांवर उपयोग केंद्रित केल्याने हा आत्मा स्वत:च मोह व राग-द्वेषरूप परिणमित झाला आहे. जरी मोह-राग-द्वेषभाव आत्म्याच्याच विकारी पर्याय आहेत; परंतु दु:खाचे कारण असल्याने आत्म्याच्या मर्यादेच्या बाहेरचे आहेत; त्यामुळे हे द्वितीय आहेत.

येथे एक प्रश्न शक्य आहे की जर राग-द्वेष-मोह द्वितीय आहेत, तर मग 'एकटाच बंधरूप होतो' - असे का लिहिले आहे ?

परद्रव्याशी होणाऱ्या बंधाच्या निषेधाकरिता असे लिहिले आहे.

आत्म्यामध्ये तर केवळ भावबंधच आहे, नवीन द्रव्यकर्मांचा बंध जुन्या द्रव्यकर्मांशी स्निग्धता-रूक्षतेच्या आधारे होतो.

वस्तुस्थिती अशी आहे की याच भावबंधाचे निमित्त लाभल्यामुळे नवीन द्रव्यकर्म पूर्वीच्या द्रव्यकर्मांशी स्निग्धता व रूक्षतेच्या आधारे बंधनात पडतात.

सोबतच त्या द्रव्यकर्मांचे प्रदेश आत्मप्रदेशांबरोबर एकक्षेत्रावगाहपणे बांधले जातात, प्रकृतीरूप परिणमित होतात, स्थितीबंधानुसार तेवढ्या काळापर्यंत राहतात आणि योग्य समयी फळ देऊन निघून जातात. अशाप्रकारे येथे प्रदेशबंध, प्रकृतीबंध, स्थितीबंध आणि अनुभागबंध – हे चारही बंध घटित होतात.

अशाप्रकारे हे सुनिश्चितच आहे की द्रव्यकर्म व भावकर्मामध्ये आपसात निमित्त-नैमित्तिक संबंध आहे, कर्ता-कर्म संबंध नव्हे आणि आत्मा व द्रव्यकर्मामध्ये केवळ एकक्षेत्रावगाह संबंधच आहे.

बंधो ! हे बनणाऱ्या भगवंतांचे वर्णन नाही, हे तर पूर्वीपासूनच भगवान असलेल्या भगवंतांचे वर्णन आहे. स्वभावाच्या अपेक्षेने तुला भगवान बनावयाचे नाही, तर स्वभावाने तू भगवान आधीच आहेस – असे जाणणे आणि मानणे, स्वत:मध्ये मग्न होणे, रमणे पर्यायीमध्ये भगवान बनण्याचा उपाय आहे. तू एकदा शुद्ध अंत:करणाने अंतरंगातून ही बाब स्वीकार तर कर, अंतरंगातून स्वीकृती मिळताच तुझी दृष्टी परपदार्थांवरून निघून सहजच स्वभाव-सन्मुख होईल, ज्ञान देखील अंतरोन्मुख होईल आणि तू अंतरंगात सामावून जाशील, लीन होशील, समाधिस्थ होशील. असे झाल्यावर तुझ्या अंतरंगात अतींद्रिय आनंदाचे असे कारंजे उसळू लागतील की तू पूर्ण संतुष्ट होशील, कृतकृत्य होशील. एकदा असे स्वीकार करून तर पहा. – **आत्मा ही है शरण, पृष्ठ : ८३**

प्रवचनसार गाथा १७७-१७८

मागील गाथांमध्ये हे म्हटले होते की हा जाणणारा-पाहणारा आत्मा ज्ञेयरूप विषयांना प्राप्त करून मोह-राग-द्वेषरूप परिणमन करतो. त्याचे हे मोह-राग-द्वेषादी भावच भावबंध आहेत आणि त्यांच्या निमित्ताने द्रव्यकर्माचा बंध होतो.

आता आगामी गाथांमध्ये द्रव्यबंध आणि भावबंधाचे स्वरूप स्पष्ट करून हे सांगत आहेत की द्रव्यबंधाचा हेतु (कारण) भावबंधच आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

फासेहिं पुग्गलाणं बंधो जीवस्स रागमादीहिं।
अण्णोण्णमवगाहो पोग्गलजीवप्पगो भणिदो॥१७७॥
सपदेसो सो अप्पा तेसु पदेसेसु पोग्गला काया।
पविसंति जहाजोग्गं चिट्ठंति हि जंति बज्झंति॥१७८॥

(हरिगीत)

स्पर्श से पुद्गल बंधे अर जिय बंधे रागादि से।
जीव-पुद्गल बंधे नित ही परस्पर अवगाह से॥१७७॥
आतमा सप्रदेश है उन प्रदेशों में पुद्गला।
परविष्ट हों अर बंधें अर वे यथायोग्य रहा करें॥१७८॥

स्पर्शांनी पुद्गलाचा बंध, रागादींनी जीवाचा बंध आणि एकमेकात राहण्याला (एकक्षेत्रावगाही) पुद्गलजीवात्मक उभयबंध म्हटले आहे.

आत्मा सप्रदेशी आहे आणि त्या प्रदेशांमध्ये पुद्गलसमूह प्रवेश करतात आणि यथायोग्य राहतात व बांधले जातात.

या गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे -

"स्निग्ध-रूक्षत्व स्पर्शविशेषांबरोबर कर्मांचा एकत्व परिणाम केवळ पुद्गलबंध आहे व मोह-राग-द्वेषरूप औपाधिक भावांशी जीवाचा एकत्व परिणाम केवळ जीवबंध आहे. जीव व कर्मपुद्गलाच्या एकत्र परिणमनाच्या

केवळ निमित्ताने जीव व पुद्गलाचे आपसात विशिष्ट असे जे अवगाहन आहे, तो उभयबंध म्हणजेच पुद्गलजीवात्मक बंध आहे.

लोकाकाशतुल्य असंख्यात प्रदेशी असल्याने हा आत्मा सप्रदेशी आहे. त्याच्या असंख्यात प्रदेशात कायवर्गणा, वचनवर्गणा व मनोवर्गणेच्या अवलंबनावाले परिस्पंदन (कंपन) जसे होते, तसेच कर्मपुद्गलाचे समूह स्वयमेव कंपन करीत प्रवेश करतात, राहतात व निघूनही जातात. तसेच जर जीवाचे मोह-राग-द्वेष भाव झाले तर त्यांचा बंधही होतो.

यामुळे निश्चित होते की द्रव्यबंधाचे कारण भावबंध आहे.''

आचार्य जयसेनांनी या गाथांचा भाव मुळात तर तत्त्वप्रदीपिकेसमानच स्पष्ट केला आहे; परंतु दुसरा अर्थ सांगताना त्यांनी म्हटले की ते प्रवेश करतात म्हणजे प्रदेशबंध, राहतात म्हणजे स्थितीबंध, फळ देऊन निघून जातात म्हणजे अनुभागबंध व बांधले जातात म्हणजे प्रकृतीबंध – अशाप्रकारे ह्या गाथांमध्ये चारही प्रकारच्या बंधांची चर्चा आली आहे.

कविवर वृंदावनदासजींनी ह्या गाथांचा भाव दोन मनहरण कवित्त व तीन दोहा पद्यात छन्दोबद्ध करून खालीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मनहरण)

पुव्वबंध पुग्गल सों फरस विभेद करि,
नयो कर्मवर्गना के पिंड को गथन है।
जीव के अशुद्ध उपयोग राग आदि करि,
होत मोह रागादि विभाव को नथन है॥
दोऊ को परस्पर संजोग एक थान सोई,
जीव पुग्गलातम के बंध को कथन है।
ऐसे तीन बंधभेद वेद में निवेद वृन्द,
भेदज्ञानीजनित सिद्धांत को मथन है॥७९॥

पूर्वी बांधलेल्या पौद्गलिक कर्मांच्या स्निग्ध-रूक्ष स्पर्शांनी नवीन कार्माण वर्गणा कर्मरूप पिंडाचे गठन करतात. जीवाच्या रागादीरूप अशुद्धोपयोगाने नवीन मोह-राग-द्वेषादी विभावांची संरचना होते.

वरील दोहोंचा एका ठिकाणी संयोग झाल्यावर जीव-पुद्गलात्मक बंध होतो - असे म्हटले जाते. भेदज्ञानी जीवांनी सिद्धांत शास्त्रांचे मंथन करून बंधाचे पुद्गलबंध, जीवबंध आणि उभयबंध - असे तीन प्रकार सांगितले आहेत.

(मनहरण)

असंख्यात प्रदेश प्रमान यह आतमा सो,
ताके परदेश विषै ऐसे उर आनिये।
पुग्गलीक कारमान वर्गना को पिंड आय,
करत प्रवेश जथाजोग सरधानिये॥
फेरि एक छेत्र अवगाह करि बंधत है,
थिति परमान संग रहैं ते सुजानिये।
देय निज रस खिर जाहिं पुनि आपुहि सों,
ऐसो भेद भर्म छेद भव्य वृन्द मानिये॥८०॥

असंख्यात प्रदेशी ह्या आत्म्याच्या प्रदेशांमध्ये पौद्गलिक कार्माण वर्गणाचा पिंड आकार यथायोग्य प्रवेश करतो. ही बाब हृदयात धारण करून यथायोग्य श्रद्धान करावे. मग आत्मा आणि पौद्गलिक कार्माण वर्गणा एकक्षेत्रावगाहरूप बांधले जातात आणि स्थितीबंधानुसार सोबत राहतात व वेळ आल्यानंतर रस (फळ) देऊन आपोआप खिरून जातात.

हे भव्य जीवांनो ! भ्रम नष्ट करून अशा रहस्याला जाणावयास हवे.

(दोहा)

काय-वचन-मन जोगकरि, जो आतम परदेश।
कंपरूप होवैं तहां, जोग बंध कहि तेस॥८१॥
तासु निमित्त तैं आवही, करमवरगना खंध।
सो ईर्यापथ नाम कहि, प्रकृति प्रदेश सुबंध॥८२॥
राग विरोध विमोह के, जैसे भाव रहाहिं।
ताहि के अनुसार तैं, थिति अनुभाग बँधाहि॥८३॥

आत्म्याच्या प्रदेशांमध्ये मन-वचन-कायेच्या योगाने जे कंपन होते, त्याला योगबंध म्हणतात.

त्याच्या निमित्ताने जे कार्मण वर्गणांचे स्कंध येतात आणि बांधले जातात; तो ईर्यापथ आस्रव आहे आणि प्रकृती-प्रदेश बंध आहे.

मोह-राग-द्वेषाचे ज्याप्रकारचे भाव राहतात, त्यांच्यानुसारच स्थिती व अनुभाग बंध होतो.

पंडित देवीदासजींनी ह्या गाथांचा भाव एकेका पद्यामध्ये खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(सवैया इकतीसा)

पुग्गलवर्गनानि कौ सु बंध जे सपर्स गुन
गुन के सु भेद चीकनैं सु रूखे भाव सौं।
जीव कौ सु बंध कह्यौ वीतराग देव जू नैं
राग द्वेष और मोह भाव के उपाव सौं॥
परसपर जीव कर्म कौ सुबंध परिनाम
दोऊ कौ निमित्त पाइ हौइ उरझाव सौं।
पुग्गल वरगना कौ बंध जीव कौ सु बंध
जीव-कर्म बंध ऐसौ कह्यौ तीनि दाव सौं॥१३८॥

वीतरागी जिनेंद्र देवांनी म्हटले आहे की पुद्गल वर्गणांचा बंध त्यांच्या स्पर्श गुणाचा भेद स्निग्धता-रूक्षतेच्या शक्त्यंशरूप भावामुळे होतो आणि जीवाला जो भावबंध होतो, तो त्याच्या मोह-राग-द्वेषरूप परिणामांच्या उपायामुळे होतो आणि जीव व कर्मांचा जो आपसात बंध परिणाम आहे, तो दोहोंचेही निमित्त मिळाल्याने आपसात संश्लेषरूप अडकल्यामुळेच होतो.

अशाप्रकारे येथे तीन प्रकारचा बंध सांगितला आहे - १) पुद्गल वर्गणांचा आपसात बंध, २) जीवाचा विभाव परिणामरूप भावबंध आणि ३) जीव व कर्मांचा आपसात निमित्त-नैमित्तिक संबंधासहित एकक्षेत्रावगाहस्वरूप संश्लेषात्मक बंध.

(सवैया इकतीसा)

जीव है सु असंख्यात प्रदेसी प्रमान लोक
जहाँ तनपिण्ड वर्गना सु अनुसरै हैं।
मन वचन काय वर्गनानि के सु अवलंब
करिकैं प्रदेस परिनाम थरहरै हैं॥
तिनही सु माफिक प्रदेसनि विषैं सु जिन्हि
कर्म वर्गना सु आइकैं प्रवेस करैं हैं।
बंधै एक राग दोष मोह के सु अनुसार
लैकैं थिति आप रस दैकैं खिरि परै हैं॥१३९॥

जीव लोकप्रमाण असंख्यातप्रदेशी आहे. ह्या लोकामध्ये हा संसारी जीव पुद्गल पिंडरूप वर्गणांनी निर्मित शरीराचे अनुसरण करतो. मन, वचन आणि कायेच्या वर्गणांच्या अवलंबनाने आत्मप्रदेशांचे कंपन होते. त्यानुसारच आत्मप्रदेशांमध्ये कार्माणवर्गणा प्रवेश करतात आणि मोह-राग-द्वेषानुसार बांधल्या जातात, स्थितिनुसार (काळानुसार) राहतात आणि वेळेवर रस देऊन खिरून जातात.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजी स्वामींनी ह्या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"ज्ञेय दोन प्रकारचे आहेत – चेतन ज्ञेय व अचेतन ज्ञेय. कर्माची पर्याय अचेतन ज्ञेय आहे, ती चेतनपर्यायीला काहीही नुकसान पोहचवीत नाही. अजीवाचे द्रव्य-गुण-पर्याय अजीवात आहेत व जीवाचे द्रव्य-गुण-पर्याय जीवामध्ये आहेत; त्यामुळे अजीव कर्माची पर्याय जीवाचे नुकसान करीत नाही - असे पुद्गलबंधाचे (द्रव्यबंधाचे) स्वरूप जाणावे.[१]

परपदार्थाबरोबर एकत्वाच्या परिणामाला किंवा अज्ञानवश मोह-राग-द्वेषरूप परिणामालाच भावबंध म्हणतात.[२]

जगातील सर्व पदार्थ ज्ञेय आहेत, त्या ज्ञेयांमध्ये इष्ट-अनिष्टपणा नाही, तरी अज्ञानी जीव ज्ञेयात दोन भाग पाडून त्यापैकी काहींना इष्ट व

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३१४ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३१४

काहींना अनिष्ट मानतो. मोह-राग-द्वेष करून स्वत:च्या शुद्ध स्वभावाला विसरून पराशी एकत्वाचा परिणाम करतो, तोच भावबंध आहे.[१]

एकामध्ये बंधन होऊ शकत नाही. एकीकडे चिदानंद ज्ञाता-दृष्टा शुद्धस्वरूप जीव आणि दुसरीकडे अनुकूल-प्रतिकूल पदार्थांमध्ये मोह-राग-द्वेषवाली पर्यायबुद्धी - दोहोंनी भावबंध होतो.[२]

निरुपाधी तत्त्वाचे उपाधीवाल्या पर्यायाशी बंधन होते. शुद्धस्वरूपाचे अशुद्ध पर्यायाशी बंधन होते. निराकुल स्वभावाचे आकुलतारूप राग-द्वेषाशी बंधन होते; परंतु जडकर्माशी किंवा पर-पदार्थांशी बंधन होत नाही. असे सर्वप्रथम निश्चित करावे. जीव तर शुद्ध अनाकुल शांतरसरूप आहे, त्याचे अशांतरस - राग-द्वेष, आकुलता यांच्याशी बंधन होते.[३]

त्रिकाळी आत्मद्रव्य शुद्ध, त्रिकाळी ज्ञान-दर्शन शुद्ध आणि राग-द्वेष इत्यादी भावबंध अशुद्ध - हे तिन्ही स्वज्ञेय सांगितले आहेत.[४]

त्रिकाळी परमाणू शुद्ध, त्रिकाळी स्पर्शादी गुण शुद्ध आणि स्निग्ध-रूक्षतेमुळे होणारी अवस्था - हे तीन परज्ञेय आहेत.[५]

जीवद्रव्याच्या विकारी पर्यायाचा व पुद्गलपरमाणूच्या कर्मरूप अवस्थेचा निमित्त-नैमित्तिक संबंध आहे. जीवाने राग केला, त्यामुळे कर्मबंध झाला आणि कर्माचा उदय आला, त्यामुळे राग-द्वेष झाले - अशाप्रकारचा कर्ता-कर्म संबंध नाही आणि तो उभयबंध नाही.[६]

जेव्हा जीव राग करतो, तेव्हा त्याचे निमित्त मिळाल्याने धर्म, अधर्म, आकाश इत्यादी द्रव्यांची कोणतीही अवस्था फेरफार होत नाही; परंतु पुद्गलपरमाणू कर्मरूप अवश्य परिणमतात. तीव्र राग करतो; तेव्हा तीव्र स्थिति-अनुभाग सहित कर्मबंध होतो आणि मंद राग करतो तेव्हा मंद स्थिति-अनुभागसहित कर्मबंध होतो. रागामुळे त्या कर्माचा

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३१४
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३१४
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३१५-३१६
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३१७
५) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३१७
६) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३१८

बंध होत नाही. त्या कर्मपरमाणुंचा बंध स्वत:मुळे होतो. राग-द्वेषाच्या प्रमाणात जीवाशी एकक्षेत्रावगाह कर्म राहतात. दुसऱ्या धर्मादी द्रव्यांशी असा निमित्त-नैमित्तक संबंध नाही; त्यामुळे विशिष्टतर परस्पर अवगाह म्हटले आहे. जीवाशी कर्म स्कंधाचे परस्पर अवगाहरूप राहणेच उभयबंध म्हटले जाते.[१]

भावबंध, द्रव्यबंध व उभयबंध तिन्ही पर्याय आहेत, ज्ञेय आहेत; यांचे स्वरूप जाणून निज आत्मा 'ह्या तिन्ही बंधांनी रहित आहे' - अशी श्रद्धा व ज्ञान करणेच धर्म आहे.[२]

द्रव्यबंध स्वतंत्र आहे, त्यामध्ये भावबंध केवळ निमित्त आहे. जेव्हा आत्म्याच्या प्रदेशांमध्ये कंपन होते, तेव्हा कर्मपुद्गलांचा समूह स्वत:च्या योग्यतेमुळे आत्म्याच्या क्षेत्रात राहतो; परंतु जेव्हा आत्म्याच्या प्रदेशांचे कंपन होते, तेव्हा कर्मांना यावे लागेल – असे नव्हे; तसेच कर्म येतात, म्हणून आत्म्याच्या प्रदेशांना कंपित व्हावे लागेल – असेही नाही. दोन्ही स्वतंत्र आहेत. कर्म स्वत:मुळे येतात व जातात, त्यामध्ये कंपन केवळ निमित्त आहे. कंपन योग गुणाची विकारी पर्याय आहे. त्या योगाच्या निमित्ताने जडकर्मामध्ये प्रकृतिबंध व प्रदेशबंध होतो.[३]

कषायाच्या निमित्ताने कर्मामध्ये स्थितिबंध आणि अनुभागबंध होतो. जीव स्वत:च्या ज्ञाता-दृष्टा स्वभावाला विसरून पर-पदार्थांमध्ये मोह करतो, तेव्हा कर्म येऊन बांधले जातात. स्थिति आणि रसाचा बंध (अनुभाग बंध) कर्मामध्ये स्वत:च्या योग्यतेने होतो.[४]''

वरील संपूर्ण कथनाचा सारांश हा आहे की जुन्या पौद्गलिक द्रव्यकर्मांशी नवीन पौद्गलिक द्रव्यकर्मांचे बंधन नियमानुसार होते. जिनागमामध्ये स्कंधरूप बंधाचे काही नियम आहेत. स्निग्ध आणि रूक्षामध्ये बंध होतो, दोन गुण अधिक असतील तर बंध होतो, जघन्य गुणांमध्ये बंध होत नाही इत्यादी नियमानुसार होणारा बंध स्पर्शरहित

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३१४
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३१४
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३१५-३१६
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३१७

जीव आणि पुद्गलामध्ये कसा होऊ शकतो ? यामुळेच येथे म्हटले आहे की नवीन द्रव्यबंधाचा बंध जुन्या द्रव्यबंधाशी होतो आणि जीवाशी मोह-राग-द्वेषादी भावबंध होतो. भावकर्म व द्रव्यकर्मांचा आपसात निमित्त-नैमित्तिक संबंध आहे, त्याला येथे विशिष्टतर विशेषणाने संबोधित केले आहे.

विशिष्टतर शब्दाच्या माध्यमातून आचार्य हे सांगू इच्छितात की रागी जीव आणि पुद्गल कर्मामध्ये निश्चयाने तर कोणताही संबंध नाही; परंतु जो एकक्षेत्रावगाह संबंध आहे, तो देखील विशेष प्रकारचा आहे; कारण एकक्षेत्रावगाह तर धर्मादी द्रव्यांबरोबर देखील आहे, तो तसा नाही, जसा जीव आणि द्रव्यकर्मांमध्ये आहे.

धर्मादी द्रव्यांशी जो एकक्षेत्रावगाह संबंध आहे, त्यामध्ये कर्मोदयादींचे निमित्त नाही, कोणतेही बंधन नाही; परंतु द्रव्यकर्म आणि देहादी नोकर्माशी होणाऱ्या एकक्षेत्रावगाहामध्ये कर्मोदय निमित्त आहेत आणि सुनिश्चित काळाकरिता एका क्षेत्रामध्ये राहणेरूप बंधन आहे.●

अनिर्णयाच्या स्थितीत पडलेल्या संशयग्रस्त प्राण्यांच्या भय व दीनतेचे एकच कारण आहे आणि ते म्हणजे इतरांना आपल्या जीवन-मरणाचा आणि सुख-दुःखाचे कारण मानणे. असेच अभिमानाचे कारण हे आहे की मी इतरांना मारू शकतो, वाचवू शकतो, सुखी-दुःखी करू शकतो.

'मी दुसऱ्यांना मारू शकतो' – या मान्यतेने उत्साहित होऊन हा दुसऱ्यांना धमकी देतो, आपल्या आधीन करू इच्छितो. असेच 'मी दुसऱ्यांना वाचवू शकतो' – या मान्यतेच्या आधारे तो दुसऱ्यांना आपल्या आधीन करू इच्छितो. सुखी-दुःखी करू शकण्याच्या मान्यतेच्या आधारे देखील अशा प्रकारच्या प्रवृत्ती विकसित होतात.

– आत्मा ही है शरण, पृष्ठ : १११

प्रवचनसार गाथा १७९

मागील गाथांमध्ये द्रव्यबंध आणि भावबंधाचे स्वरूप स्पष्ट करून हे सांगितले आहे की द्रव्यबंधाचा हेतु भावबंध आहे.

आता ह्या १७९ व्या गाथेमध्ये हे स्पष्ट करीत आहेत की द्रव्यबंधाचा हेतु असल्यामुळे भावबंधच वास्तविक बंध आहे, निश्चयबंध आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे -

रत्तो बंधदि कम्मं मुच्चदि कम्मेहिं रागरहिदप्पा।
एसो बंधसमासो जीवाणं जाण णिच्छयदो॥१७९॥

(हरिगीत)

रागी बाँधे कर्म छूटें राग से जो रहित हैं।
यह बंध का संक्षेप है बस नियतनय का कथन यह॥१७९॥

रागी आत्मा कर्म बांधतो आणि राग रहित आत्मा कर्मांपासून मुक्त होतो - निश्चयाने हा जीवांच्या बंधाचा संक्षेप जाणा.

ही गाथा ह्या प्रकरणाच्या निष्कर्षाची गाथा आहे आणि यामध्ये स्पष्ट शब्दात सांगितले आहे की बंधाचे कारण केवळ रागादी भावच आहेत.

आचार्य अमृतचंद्रांनी ह्या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"मोह-राग-द्वेषरूप परिणत जीवच नवीन द्रव्यकर्मांशी बांधला जातो; वैराग्यपरिणत जीव कर्मांशी बांधला जात नाही. त्याचप्रमाणे मोह-राग-द्वेष परिणत जीव नवीन द्रव्यकर्मांपासून मुक्त होत नाही आणि वैराग्य परिणत जीवच मुक्त होतो.

राग परिणत जीव संपर्कात येणाऱ्या नवीन द्रव्यकर्मांशी व चिरसंचित जुन्या द्रव्यकर्मांशी बांधला जातोच, मुक्त होत नाही व वैराग्य परिणत जीव संपर्कात येणाऱ्या नवीन द्रव्यकर्मांशी व जुन्या द्रव्यकर्मांपासून मुक्तच होतो, बांधला जात नाही.

यावरून हे निश्चित होते की द्रव्यबंधाचा साधकतम हेतु असल्यामुळे राग परिणामच निश्चयाने बंध आहे.''

आचार्य जयसेनांनी ह्या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिकेसमानच स्पष्ट करताना शेवटी लिहिले की रागपरिणाम बंधाचे कारण आहे - हे जाणून संपूर्ण रागादी विकल्पांच्या त्यागापूर्वक विशुद्ध ज्ञान-दर्शनस्वभावी निजात्मतत्त्वाची भावना निरंतर असावी.

बंधाच्या मर्माला अत्यंत स्पष्ट शब्दांमध्ये व्यक्त करणारी ही गाथा आणि तिच्या टीकेचा भाव सहज बोधगम्य भाषेत कविवर वृंदावनदासजींनी पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(द्रुमिला)

परदर्व विषैं अनुराग धरै, वसु कर्मनि को सोइ बंध करै।
अरु जो जिय रागविकार तजै, वह मुक्तवधूकहँ बेगि बरै॥
यह बंध रु मोच्छसरूप जथारथ, थोरहि में निरधार धरै।
निहचै करिके जगजीवनि के, तुम जानहु वृन्द प्रतीत भरै॥८४॥

जे जीव परद्रव्यांमध्ये अनुराग करतात, ते जीव आठ कर्मांशी बांधले जातात आणि जे जीव रागादी विकारी भावांना त्यागतात; ते जीव मुक्तीवधुचे शीघ्रच वरण करतात. संक्षेपात वर्णित हे बंध व मोक्षाचे यथार्थ स्वरूप जे व्यक्ती निर्धारित करतात, त्या जीवांना निश्चयाने बंध आणि मोक्षाचे सत्य श्रद्धान होते. असे कविवर वृंदावनदासजी म्हणतात.

(चौपाई)

रागभाव प्रनवैं जे आंधे। नूतन दरब करम ते बांधे।
वीतराग पद जो भवि परसै। ताकौ मुक्त अवस्था सरसै॥८५॥

जे अंध प्राणी रागभावरूप परिणमित होतात, ते नवीन द्रव्यकर्मांचा बंध करतात व जे जीव वीतरागभावाला स्पर्श करतात, ते सरस मुक्त अवस्था प्राप्त करतात.

(दोहा)

रागादिक को त्यागि जे, वीतराग हो जाँह।
चले जाहिं वैकुंठ में, कोइ न पकरै बाँह॥८६॥

रागादी भावांचा त्याग करून जे जीव वीतरागी होतात; ते जीव वैकुंठाला (मोक्ष) जातात. त्यांना अडविण्यासाठी कोणी त्यांचा हाथ पकडत नाही.

पंडित देवीदासजींनी ह्या गाथेचा भाव दोन पद्यांत पुढे स्पष्ट केला आहे –

(चौपाई)

जे जिय राग भाव करि अंधे अष्ट प्रकार कर्म करि बंधे।
परनति नहीं राग तिन्हि मांहिं जिन्हिकैं करमबंध सो नांही॥१४०॥

जे जीव रागाने अंध झाले आहेत, ते जीव आठ प्रकारच्या कर्मांशी बांधले जातात व ज्यांना कर्मबंध होत नाही, त्यांच्या परिणतीत म्हणजे भावांमध्ये रागही होत नाही.

(दोहा)

संसारी जियकैं सु पुनि भावरूप रागादि।
सो असुद्ध उपयोगमय कारन बंध अनादि॥१४१॥

संसारी जीवाच्या अनादी काळाच्या बंधाचे कारणरूप अशुद्धोपयोगमय रागादीभाव विद्यमान आहेत.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी ह्या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"जेवढ्या प्रमाणात जीव राग-द्वेष करतो, तेवढ्या प्रमाणात द्रव्यकर्म स्वतंत्रपणे बांधले जातात – असा निमित्त-नैमित्तिक संबंध आहे; परंतु जेवढ्या प्रमाणात कर्माचा उदय होतो, तेवढ्या प्रमाणात जीवाला राग-द्वेष करावेच लागतील, असे नव्हे.[१]

शुद्धस्वभावाचे भान असणारा वैराग्य परिणत जीव नवीन कर्मांच्या बंधनात अडकत नाही. येथे वैराग्य परिणत शब्दाचा विशेष अर्थ आहे.[२]

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३२६
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३२६

शरीराच्या क्रियेने व दया-दानाच्या भावाने मला लाभ होतो – असा भाव राग-परिणत भाव आहे. निमित्त व संयोगांची दृष्टी सोडून पुण्य-पाप माझा स्वभाव नाही, मी तर ज्ञानानंदस्वभावी आत्मा आहे – अशा भानापूर्वक ज्ञायकस्वभावाची श्रद्धा असणारा जीव वैराग्य परिणत आहे.[१]

निमित्त, पुण्य व गुणभेदाची रुची सोडून, स्वत: ऐश्वर्यवान अभेद शुद्धस्वभावाला भजतो, तो जीव वैराग्य परिणत आहे आणि त्याला कर्मबंध होत नाही. अशाप्रकारे खरी श्रद्धा करणे धर्माचे कारण आहे.[२]

पर-पदार्थांचा आत्म्यात अभाव आहे व ते आत्म्याला लाभ वा नुकसानाचे कारण नाहीत. पुण्य-पाप उपाधीभाव आहे, त्याहून रहित आत्मा शुद्ध चिदानंदस्वरूप आहे - अशी श्रद्धा-ज्ञान करून स्वभावाच्या श्रद्धेचा आदर करणे दृष्टीचे वैराग्य आहे.[३]

शुभाशुभ भाव माझे स्वरूप नाही, मी तर शुद्ध चिदानंद स्वरूप आहे – असे प्रथम दृष्टीचे वैराग्य तर झाले आहे व सोबत चिदानंद स्वभावामध्ये विशेष स्थिरतारूप चारित्र व उपशांत निर्विकल्प रमणता प्रगट करणे चारित्राचे वैराग्य आहे.

दृष्टीवंत वैराग्यवाल्या जीवाला मुख्य तर बंध होत नाही, अस्थिरतेमुळे बंध होतो, तो अल्प आहे. त्याला बंध होत नाही – असे दृष्टीच्या अपेक्षेने म्हटले जाते आणि चारित्र वैराग्यवाला जीव स्वत:च्या स्वभावामध्ये लीन आहे; त्यामुळे त्याला बंध होत नाही.[४]

जुने कर्म तर प्रतिसमय आपल्या स्वकाळी खिरून जातात; तरीही जुन्या द्रव्यकर्मांशी बांधला जातो - हे कसे म्हटले आहे ? स्वत:ची पर्यायबुद्धी चालू आहे. बंधनाची योग्यता आहे, बंधनभाव चालू आहे, त्यामुळे जुने कर्म खिरल्यावरही नवीन कर्म बांधले जातात; म्हणून जुन्या कर्मांशी बांधला जातो - असे म्हटले आहे.[५]

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३२७
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३२८
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३२९
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३२९
५) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३३०

नवे कर्म बांधले नाहीं तर जुने खिरून गेले म्हणावे लागले, म्हणून अज्ञानीचे जुने वा नवीन कोणतेही कर्म खिरत नाही, बांधलेच जाते.

ज्ञानी जीव जुन्या कर्मांपासून वेगळा होतो.[१]

स्वभावदृष्टीमध्ये स्थिर झाल्यावर नवीन कर्म उत्पन्न होत नाही आणि जुने द्रव्यकर्म प्रति समयी येऊन खिरून जातात आणि नवीन कर्मबंध होत नाही, त्यामुळे जुन्या द्रव्यकर्माहून मुक्त आहे - असे म्हटले आहे. येथे अस्थिरतेच्या अल्पबंधाची बाब गौण आहे, मुख्यपणे ज्ञानीला बंध होत नाही - हे अपेक्षाकृत कथन आहे. विशेष स्थिरता झाल्यावर ज्ञानी जीवाला अस्थिरतेचा अल्पबंध देखील होत नाही. तो जुन्या कर्मांशी बांधला जात नाही व जुन्या कर्मांहून मुक्तच राहतो.[२]

त्यामुळे द्रव्यबंधाचे निमित्त भावबंध अर्थात मिथ्यात्व, राग-द्वेषच निश्चयाने बंध आहे. असे स्वतंत्र पर्यायाचे ज्ञान झाल्यावर कर्मावरील उपयोग काढून भावबंध देखील माझे त्रिकाळी स्वरूप नाही, मी तर स्वत: त्रिकाळी शुद्ध आहे - अशी खरी श्रद्धा-ज्ञान करणेच धर्म आहे.[३]''

बंध आणि मोक्षाच्या कारणांना अत्यंत संक्षेपात साररूपात प्रस्तुत करणाऱ्या ह्या गाथेत अत्यंत स्पष्ट शब्दात ही घोषणा केली आहे की निश्चयाने रागी जीव कर्म बांधतो आणि रागरहित आत्मा कर्मबंधनातून मुक्त होतो - मूळ बाब ही आहे.

येथे रागी जीवाला केवळ रागभावाने परिणत जीवच समजू नये तर रागामध्ये धर्म मानणेरूप मिथ्यात्व, अज्ञान व असंयम - ह्या तिन्हींनी संयुक्त जीव समजावे.

तात्पर्य हे आहे की मिथ्यादृष्टी, अज्ञानी व असंयमी जीव कर्म बांधतो.

त्याचप्रमाणे रागरहितचा अर्थही सम्यग्दृष्टी, ज्ञानी व संयमी जीव समजावा. निष्कर्ष हा समजावा की रत्नत्रयाने रहित जीव कर्मांशी बांधला

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३३०
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३३१
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३३१

जातो आणि रत्नत्रयाने परिणत जीव कर्मांहून मुक्त होतो. अशाप्रकारे हा आत्मा जेवढ्या-जेवढ्या रूपात रत्नत्रयाने परिणत होतो, तेवढ्या-तेवढ्या रूपात कर्मांहून मुक्त होत जातो.

अशाप्रकारे हे सुनिश्चित झाले की निश्चयाने रागी अर्थात मिथ्यादर्शन, मिथ्याज्ञान आणि मिथ्याचारित्राने परिणत जीव कर्मबंधनात अडकतो आणि सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राने परिणत जीव कर्मबंधनातून मुक्त होतो. त्यामुळे भव्य जीवांनी रागभावाहून विरक्त आणि सम्यक्त्वादीरूप वीतरागीभावामध्ये अनुरक्त झाले पाहिजे. ●

ज्ञानी गुरूंच्या संरक्षण आणि मार्गदर्शनातच आत्म्याचा शोध प्रारंभ होतो. जर गुरूंचे संरक्षण मिळाले नाही तर हा आत्मा कुगुरूंच्या चक्रांत फसून आपले जीवन व्यर्थ घालवू शकतो, तसेच जर गुरूंचे योग्य मार्गदर्शन मिळाले नाही तर अप्रयोजनभूत बाबींमध्ये संपूर्ण जीवन निघून जाईल, त्यामुळे आत्मोपलब्धीमध्ये गुरूंच्या संरक्षण आणि मार्गदर्शनाचे स्थान महत्वपूर्ण आहे.

गुरुजी आपले कार्य (आत्मोन्मुखी उपयोग) सोडून शिष्याचे संरक्षण व मार्गदर्शन करतात, त्याबद्दल त्यांना श्रेयाव्यतिरिक्त मिळते तरी काय ? आत्मोपलब्धी करणाऱ्याला तर आत्मा मिळाला, परंतु गुरूंचा तर वेळ वाया गेला, त्यांना काही मिळालेही नाही, परंतु जर आम्ही श्रेय देखील देऊ इच्छित नाही, हा तर न्याय नाही. त्यामुळे निमित्तरूपाचे श्रेय तर गुरूंनाच मिळते, मिळावयासही हवे, उपादान-निमित्ताची हीच संधी आहे, हाच सुमेळ आहे.

– आत्मा ही है शरण, पृष्ठ : १६७

प्रवचनसार गाथा १८०-१८१

मागील गाथेमध्ये हे स्पष्ट केल्यानंतर की मोह-राग-द्वेषरूप भावबंधच वास्तविक बंध आहे, निश्चय बंध आहे; आता पुढील गाथांमध्ये वरील मोह-राग-द्वेष भावांचे विशेष स्पष्टीकरण करतात.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

परिणामादो बंधो परिणामो रागदोसमोहजुदो।
असुहो मोहपदोसो सुहो व असुहो हवदि रागो॥१८०॥
सुहपरिणामो पुण्णं असुहो पावं ति भणिदमण्णेसु।
परिणामो णण्णगदो दुक्खक्खयकारणं समये॥१८१॥

(हरिगीत)

राग-रुष अर मोह ये परिणाम इनसे बंध हो।
राग है शुभ-अशुभ किन्तु मोह-रुष तो अशुभ ही॥१८०॥
पर के प्रति शुभभाव पुण पर अशुभ तो बस पाप है।
पर दुःखक्षय का हेतु तो बस अनन्यगत परिणाम है॥१८१॥

परिणामांनी बंध होतो आणि परिणाम मोह-राग-द्वेषाने युक्त आहेत. त्यांच्यात मोह व द्वेष तर अशुभच आहेत; परंतु राग शुभ आणि अशुभ - दोन्हीरूप असतो.

पराबद्दल शुभ परिणाम पुण्य आहे व अशुभ परिणाम पाप आहे - असे म्हटले आहे. जो परिणाम दुसऱ्यांबद्दल प्रवर्तमान नाही, तो योग्य वेळेवर दुःखक्षयाचे कारण आहे किंवा शास्त्रांमध्ये असे म्हटले आहे की तो परिणाम दुःखक्षयाचे कारण आहे.

आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये ह्या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे -

"द्रव्यबंध विशिष्ट परिणामाने होतो. परिणाम विशिष्टता मोह-राग-द्वेषमयतेचे कारण आहे. तो परिणाम शुभत्व व अशुभत्वामुळे

दोनरूप होतो. त्यांच्यात मोह आणि द्वेषभाव अशुभरूपच असतात आणि रागभाव शुभ व अशुभ – दोन्ही प्रकारचा असतो; कारण राग विशुद्धी व संक्लेशयुक्त असतो.

परिणाम दोन प्रकारचा असतो – परद्रव्यप्रवृत्त व स्वद्रव्यप्रवृत्त. पराद्वारे उपरक्त असल्याने परद्रव्यप्रवृत्त परिणाम विशिष्ट परिणाम आहे व पराद्वारे उपरक्त नसल्यामुळे स्वप्रवृत्तपरिणाम अविशिष्ट परिणाम आहे.

विशिष्ट परिणामाचे पूर्वोक्त दोन प्रकार आहेत – शुभ व अशुभ परिणाम. पुण्यरूप पुद्गल बंधाचे कारण असल्याने शुभ परिणाम पुण्य आहे व पापरूप पुद्गल बंधाचे कारण असल्याने अशुभपरिणाम पाप आहे.

अविशिष्ट परिणाम तर शुद्ध असल्याने एक आहे; त्यामुळे त्याचे प्रकार नाहीत. तो अविशिष्ट परिणाम यथासमय संसार दु:खाच्या हेतुभूत कर्मपुद्गलाच्या क्षयाचे कारण असल्याने संसार दु:खाचे हेतभूत कर्मपुद्गलाचा क्षयस्वरूप मोक्षच आहे.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये ह्या गाथांचा भाव मुळात तर तत्त्वप्रदीपिकेसमानच स्पष्ट केला आहे; परंतु शेवटी आलेल्या 'समय' शब्दाचा अर्थ 'परमागम' आणि 'काललब्धी' असा सांगितला आहे.

शेवटी 'किंच' म्हणून त्यांनी विषयवस्तुचे गुणस्थान परिपाटीने विशेष स्पष्टीकरण केले आहे; ते मुळातून पठनीय आहे.

कविवर वृंदावनदासजींनी ह्या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मनहरण)

परिनाम अशुद्ध तैं पुग्गलकरम बंधै,
सोई परिनाम राग-दोष-मोहमई है।
तामें मोह दोष तो अशुभ ही हैं सदा काल,
राग में दुभेद वृन्द वेद वरनई है॥
पंच परमेश्वर की भक्ति धरमानुराग,
यह शुभराग भाव कथंचित लई है।

विषय कषायादिक तामें रतिरूप सो,
अशुभ राग सरवथा त्यागजोग तई है॥८७॥

अशुद्ध परिणामांनी पौद्गलिक कर्मांचा बंध होतो व अशुद्धपरिणाम मोह-राग-द्वेषरूप आहेत. यांच्यापैकी मोह (दर्शनमोह-मिथ्यात्व) व द्वेष तर नेहमी अशुभच असतात, त्यामुळे त्यागण्यायोग्यच आहेत.

कवी म्हणतात की शास्त्रांमध्ये रागाचे दोन प्रकार सांगितले आहेत - पंचपरमेष्ठींच्या भक्तीरूप धर्मानुराग शुभभाव आहे आणि तो कथंचित उपादेय आहे; परंतु पंचेंद्रिय विषयांचा अनुराग व कषायरूप भाव अशुभराग आहे, तो सर्वथा त्यागण्यायोग्य सांगितला आहे.

(मनहरण)

परवस्तु मांहिं जो पुनीत परिनाम होत,
ताको पुन्य नाम वृन्द जानो हुलसंत है।
तैसे ही अशुभ परिनाम परवस्तु विषैं,
ताको नाम पाप संकलेशरूप तंत है॥
जहाँ परवस्तुविषैं दोऊ परिनाम नहिं,
केवल सुसत्ता ही में शुद्ध वरतंत है।
सोई परिनाम सब दुःख के विनाशन को,
कारन है ऐसे जिन शासन भनंत है॥८८॥

परवस्तुंच्या लक्ष्याने जे पवित्र परिणाम होतात; त्यांना पुण्य नावाने संबोधले जाते, ते प्रसन्नतारूप असतात. तसेच परवस्तुच्या लक्ष्याने जे संक्लेशरूप परिणाम होतात; त्या अशुभ परिणामांना पाप म्हणतात.

जेथे परवस्तुच्या लक्ष्याने होणारे शुभाशुभ - दोन्ही परिणाम नसून स्वसत्तेच्या लक्ष्याने केवळ शुद्ध परिणाम होतात, ते परिणामच सर्व दुःखांच्या नाशाचे कारण आहेत - असे जिनशासनात सांगितले आहे.

पंडित देवीदासजींनी ह्या गाथांचा भाव दोन पद्यांमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(सवैया इकतीसा)

पुग्गल वरगना स्वरूप द्रव्य बंध सोई
असुद्धोपयोग परिनाम तैं सु ठीक है।

परिनाम जो सु राग दोष मोह भाव लियै
जामैं मोह भाव दोष भाव निंदनीक है।।
देव अरिहंत और गुरु निरगंथ की सु
भक्ति माहिं लीन सुभराग की सु लीक है।
विषय-कषायरूप असुभोपयोग भाव
भैया दोउ बंध के करैया तहकीक है।।१४२।।

जीवाच्या अशुद्धोपयोग परिणामांनी पौद्गलिक वर्गणारूप द्रव्यकर्माचा बंध होतो, हे तर योग्यच आहे. जीवामध्ये मोह-राग-द्वेषांनी युक्त जे परिणाम होतात, ते सर्व अशुद्धोपयोग आहेत, त्यांच्यापैकी विशेष करून मोहभाव व द्वेषभाव निंदनीय मानले आहेत; कारण मुख्यपणे ते अशुभभावरूपच असतात. अरहंत देव व निर्ग्रंथ गुरुच्या भक्तीत लीन जीवाच्या शुभरागरूप परिणामांना शुभोपयोग म्हणतात. जीवाचे विषय-कषायासंबंधी परिणाम, मग ते कसेही असोत, त्यांना अशुभोपयोगच म्हटले जाते. शुभोपयोग व अशुभोपयोगरूप दोन्ही परिणाम बंध करविणारे आहेत - ही बाब परम सत्य आहे.

(सवैया इकतीसा)

पंच परमेष्ठी की सु भक्ति आदि परिनाम
जो प्रसस्त रागरूप जाकौ नाम पुन्न है।
जो सरीर इंद्रियादि परद्रव्य सौं ममत्व
विषैं अनुराग मई पाप सौं जवुन्न है।।
अन्य द्रव्य की प्रवर्त्ति विना वीतराग भाव
आतमीक दूसरो न और छुन्न मुन्न है।
सुद्ध उपयोग वंत मुकति स्वरूप संत
जाकैं पराधीन सुख-दुःख कौ सु सुन्न है।।१४३।।

अरिहंतादी पंच परमेष्ठींची सद्भक्ती इत्यादी प्रशस्त रागरूप परिणामांचे नाव पुण्य आहे व शरीर, इंद्रिय इत्यादी परद्रव्यांहून ममत्व व विशेषानुरागरूप परिणती पाप आहे. अन्य द्रव्य किंवा तद्विषयक विकल्पांमध्ये प्रवृत्ती झाल्याविना जे पुण्य-पापाने रहित आत्मिक

वीतराग भाव होतो, त्याला शुद्धोपयोग म्हणतात. अशा शुद्धोपयोगाने युक्त शुद्धोपयोगी संत मुक्तिस्वरूप आहेत; त्यांना पराधीन सुख-दुःख होत नाहीत. तात्पर्य हे आहे की शुद्धोपयोगी संत पुण्य-पापाच्या उदयामध्ये होणाऱ्या इंद्रियविषयक सुख-दुःखाने शून्यच असतात.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी ह्या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''परवस्तू बंधाचे कारण नाही. सम्यग्दृष्टी चक्रवर्तीजवळ अमाप वस्तू आहेत, जर वस्तुंमुळे बंधन झाले असते, तर त्यांना बंधन खूप झाले पाहिजे आणि मिथ्यादृष्टी त्यागीला अल्प वस्तुंचा परिग्रह असल्यामुळे त्यांना अल्पबंध झाला पाहिजे; परंतु असे होत नाही. परवस्तू तर मरण झाल्यावर तेथेच सुटते, परंतु बंधन मात्र सुटत नाही; त्यामुळे परवस्तू बंधनाचे कारण नाही, ममताभाव बंधनाचे कारण आहे. मिथ्यादृष्टी जीवाला संसाराचे कारणरूप बंध आहे आणि सम्यक्त्वी जीवाला अल्पबंधन आहे आणि ते देखील सुटणारे आहे.[१]

मिथ्यात्व तर अशुभामध्ये मोडते. राग दोन प्रकारचा आहे, एक शुभराग आणि दुसरा अशुभराग. विशुद्धीवाला असल्यामुळे धर्मानुरागमय परिणाम शुभ आहे. संक्लेशवाला असल्यामुळे विषयानुरागमय परिणाम अशुभ आहे.[२]

आत्म्याचा शुद्ध चिदानंद स्वभाव अखंडतेने परिपूर्ण आहे. जो पारिणामिक भाव अनादी-अनंत एकरूप आहे, त्यामध्ये पर्याय पूर्णपणे एकाग्र होते, अभेद होते, तेव्हा केवलज्ञान आणि मोक्षदशा प्रगट होते; त्यामुळे मोक्षाचे कारण शुद्धस्वभाव एकच आहे.

अशाप्रकारे मिथ्यादृष्टी जरी शुभभावही करतो, तरी देखील मिथ्यात्वामुळे अत्यंत अशुभ आणि अनंत संसाराच्या बंधाचे कारण त्याला आहे. त्यामुळे ज्याला पाप टाळावयाचे आहे, त्याने पराहून दृष्टी काढून, पुण्य-पापाची रुची सोडून, अबंध स्वभावाची श्रद्धा व

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३३३
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३३४

ज्ञान करावयास हवे. त्यामुळे मिथ्यात्वरूपी मोठे पाप दूर होईल आणि संसाराचा नाश होऊन धर्मदशेची प्राप्ती होईल.[१]

शुद्ध चिदानंदस्वरूप आत्मा परपदार्थ व विकारभावांनी रहित आहे. अशा ज्ञाता-दृष्टारूप शुद्धस्वभावाच्या आश्रयाने होणाऱ्या परिणामांमध्ये पराचे अवलंबन नसल्यामुळे ते अविशिष्ट म्हणजेच शुद्ध परिणाम आहेत.

अशुद्ध परिणाम शुभ व अशुभ असे दोन प्रकारचे सांगितले आहेत.

देव-गुरु-शास्त्राची भक्ती व दया-दान-पूजा इत्यादीचे परिणाम शुभभाव आहेत.

(अ) कितीतरी अज्ञानी कोमलता किंवा दया-दानाच्या परिणामांना पापभाव म्हणतात; परंतु ही बाब असत्य आहे; कारण शुभभाव तर पुण्यतत्त्व आहे व पुण्यतत्त्व पापतत्त्वाने भिन्न आहे. पुण्याला पाप मानल्याने तर नवतत्त्वच राहणार नाहीत.

(ब) तसेच कितीतरी अज्ञानी शुभभावाने निर्जरा मानतात, ते देखील असत्य आहे; कारण शुभभाव पुण्यतत्त्व आणि आस्रव-बंधतत्त्व आहे. बंधाच्या कारणाला निर्जरा मानणारा बंधतत्त्व आणि निर्जरातत्त्व दोहोंनाही जाणत नाही; त्यामुळे त्याला नवतत्त्वांची श्रद्धाच नाही.

(स) कित्येक अज्ञानी जीव शुभभावांची उत्पत्ती परामुळे किंवा कर्मामुळे मानतात. असे मानल्याने एक जीव दुसऱ्या जीवरूप किंवा अजीवाशी एकरूप होतो. त्यामुळे त्यांना देखील जीव किंवा अजीवाची श्रद्धा नाही. त्यांची मान्यता देखील खोटी आहे.[२]

शुभभावांनी साता वेदनीय कर्म, चांगले नाम कर्म, उच्च गोत्र कर्म, शुभ आयु आणि चांगली गती इत्यादी पुण्य प्रकृतींचा बंध होतो व त्याच्या फळस्वरूपी शुभसंयोग मिळतात; परंतु धर्माची प्राप्ती होत नाही. शुभाच्या फळस्वरूपी पुण्यप्रकृतींचा बंध होतो; त्यामुळे कारणात कार्याचा उपचार करून शुभाला पुण्य म्हटले जाते. साधकदशेमध्ये

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३३६ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३३९

अशुभापासून वाचण्याकरिता शुभ परिणाम होतात व त्यांना उपचाराने पुण्य म्हटले जाते, परंतु त्याची मर्यादा समजली पाहिजे. साक्षात त्रिलोकीनाथ व संत मुनिराजही निज आत्म्याच्या अपेक्षेने पर आहेत व त्यांना लक्ष्य बनविल्याने होणारा शुभभाव पुण्यबंधाचे कारण आहे.[१]

आपल्या शुद्ध चैतन्यस्वरूपाचे लक्ष्य सोडून शरीराला लक्ष्य बनविल्याने होणारे सर्व भाव अशुभ आहेत. मी पर-पदार्थांचा कर्ता आहे – असा ममताभाव मिथ्याभाव आहे. चैतन्यस्वभावाहून च्युत झाल्याने होणारे सर्व सांसारिक भाव अशुभभाव आहेत.

अविशिष्ट परिणाम शुद्ध असल्याने एक आहे, त्याचे भेद नाहीत.[२]

येथे शुद्ध परिणामालाच मोक्ष म्हटले आहे. साधकदशेत उत्तरोत्तर स्वभावाची लीनता वाढल्याने निर्मलतेची अनेक प्रकारची तारतम्यता झाल्यावरही त्यामध्ये (शुद्ध परिणामात) भेद पडत नाही. प्रतिसमयी निर्मल पर्याय द्रव्याशी अभेद राहते; त्यामुळे तिला एकच म्हटले आहे. अशी निर्मलता झाल्यावर संसारदु:खाला कारणीभूत कर्मपुद्गलांचा नवीन बंध होत नाही व प्रत्येक समयी निर्मलता वाढत जाते.

ज्ञानीला पर्यायबुद्धीचा नाश झाल्याने स्वभावबुद्धी प्रगट झाली, त्यामुळे त्याला कर्म बांधले जात नाहीत व सर्व कर्मांचा क्षय झाल्यावर मोक्षाची शुद्ध पर्याय प्रगट होते, त्यामुळे शुद्ध परिणाम स्वत:च मोक्ष आहे.[३]''

वरील संपूर्ण कथानाचा सारांश हा आहे की बंध आणि मोक्ष परिणामांनीच होतात, कोण्या क्रियाविशेषाने नव्हे.

परिणाम दोन प्रकारचे आहेत – परद्रव्यप्रवृत्त आणि स्वद्रव्यप्रवृत्त. येथे परद्रव्यप्रवृत्त परिणामांना विशिष्ट परिणाम आणि स्वद्रव्यप्रवृत्त परिणामांना अविशिष्ट परिणाम म्हणतात. विशिष्ट परिणाम म्हणजे अशुद्ध परिणाम - शुभ परिणाम व अशुभ परिणाम असे दोन प्रकारचे आहेत. पुण्यबंधाचे कारण असल्याने शुभ परिणामांना पुण्य वा

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३३९
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३४०
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३४०

पुण्यपरिणाम म्हणतात आणि पापबंधाचे कारण असल्याने अशुभ परिणामांनी पाप किंवा पापपरिणाम म्हणतात.

अविशिष्ट परिणाम अर्थात शुद्ध परिणाम एकच प्रकारचा आहे, त्याचे भेद नाहीत. जसे पुण्यबंधाचे कारण असल्याने शुभभावाला पुण्य व पापबंधाचे कारण असल्याने अशुभभावाला पाप म्हटले जाते; तसेच अविशिष्ट परिणाम अर्थात शुद्धभाव मोक्षाचे कारण असल्याने तो मोक्षच आहे – असे म्हणणे अनुचित नाही.

हे अशुद्ध -शुभाशुभ परिणाम मोह-राग-द्वेषरूपच आहेत. यांच्यात मोह अर्थात दर्शनमोह-मिथ्यात्व आणि द्वेष तर अशुभरूपच असतात; परंतु राग शुभ व अशुभ – असा दोन प्रकारचा असतो; कारण तो राग विशुद्धी व संक्लेशरूप आहे.

अशाप्रकारे ह्या मोह-राग-द्वेष भावांना रागभाव आणि ह्या मोह-राग-द्वेष भावांनी रहित परिणामांना वीतरागभाव म्हणतात. मिथ्यादर्शन-ज्ञान-चारित्राला रागभाव आणि सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राला वीतराग भाव म्हणतात.

रागी जीव बंधनाला प्राप्त होतो व रागरहित जीव बंधनातून मुक्त होतो. याचे तात्पर्य हेच आहे की मिथ्यादर्शन-ज्ञान-चारित्र संसाराचे कारण आहेत व सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र मोक्षाचे कारण आहेत. ●

अरहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि साधू – हे सर्व कोण आहेत ? शेवटी आहेत तर आत्म्याच्या अवस्थाच ना ? निज भगवान आत्म्याच्या आश्रयाने उत्पन्न झालेल्या अवस्थाच आहेत ना ? तर मग आम्ही यांच्या आश्रयाला का जावे ? आम्ही तर त्या भगवान आत्म्याच्या आश्रयाला जातो, ज्याच्या ह्या अवस्था आहेत, ज्याच्या आश्रयाने ह्या अवस्था उत्पन्न झाल्या आहेत. सर्वाधिक महान, सर्वाधिक उपयोगी, ध्यानाचा ध्येय, श्रद्धानाचा श्रद्धेय आणि परमशुद्धनिश्चयनयरूप ज्ञानाचा ज्ञेय तर निज भगवान आत्माच आहे, त्याच्या आश्रयाला गेल्याने मुक्तीचा मार्ग प्रारंभ होतो, मुक्ती पथावर गमन होते आणि मोक्ष महालात पोहोचणे शक्य होते.

– आत्मा ही है शरण, पृष्ठ-१९५

प्रवचनसार गाथा १८२-१८३

मागील गाथांमध्ये केलेल्या शुभाशुभरूप अशुद्ध भाव आणि शुद्ध भावांच्या स्पष्टीकरणानंतर ह्या गाथांमध्ये आता स्वद्रव्यामध्ये प्रवृत्ती आणि परद्रव्यांहून निवृत्ती करिता स्व-पराचे भेदविज्ञान करवित आहेत.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

भणिदा पुढविप्पमुहा जीवणिकायाध थावरा य तसा।
अण्णा ते जीवादो जीवो वि य तेहिंदो अण्णो॥१८२॥
जो णवि जाणदि एवं परमप्पाणं सहावमासेज्ज।
कीरदि अज्झवसाणं अहं ममेदं ति मोहादो॥१८३॥

(हरिगीत)

पृथ्वी आदि थावरा त्रस कहे जीव निकाय हैं।
वे जीव से हैं अन्य एवं जीव उनसे अन्य है॥१८२॥
जो न जाने इसतरह स्व और पर को स्वभाव से।
वे मोह से मोहित रहे 'ये मैं हूँ' अथवा 'मेरा यह'॥१८३॥

पृथ्वी इत्यादी स्थावर व त्रसरूप जीव निकाय सांगितले आहेत; ते जीवापेक्षा अन्य आहेत आणि जीव देखील त्यांच्याहून भिन्न आहे.

जो जीव अशाप्रकारच्या स्वभावाला प्राप्त करून पर आणि स्व ला जाणत नाही; तो मोहाने 'हा मी आहे, हा माझा आहे' - अशाप्रकारे अध्यवसान करतो.

ह्या गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"त्रस-स्थावर असे प्रकारांनी सहित जे पृथ्वी इत्यादी सहा जीवनिकाय मानले जातात; ते अचेतनत्वामुळे जीवाहून अन्य आहेत आणि जीव देखील चेतनत्वामुळे त्यांच्याहून भिन्न आहे. तात्पर्य हे आहे की आत्म्याकरिता आत्माच एक स्वद्रव्य आहे, सहा प्रकारचे जीवनिकाय आत्म्याकरिता परद्रव्य आहेत.

जो आत्मा जीवाच्या चेतनत्व व पुद्गलाच्या अचेतनत्वस्वरूप स्वभावाद्वारे स्व-पराच्या विभागाला जाणत नाही; तो आत्मा 'हा मी आहे, हा माझा आहे' – अशाप्रकारे मोहाने परद्रव्यामध्ये आपलेपणाचे अध्यवसान करतो, इतर कोणी नव्हे.

त्यामुळे हे निश्चित आहे की जीवाला परद्रव्यामध्ये प्रवृत्तीचे निमित्त स्व-पराच्या ज्ञानाचा, भेदविज्ञानाचा अभावच आहे. अशाप्रकारे सांगितल्याविनाच, स्व-सामर्थ्याने सिद्ध झाले की स्वद्रव्यात प्रवृत्तीचे निमित्त स्व-पराच्या ज्ञानाच्या अभावाचा अभाव आहे म्हणजेच स्व-पराच्या ज्ञानाचा सद्भाव आहे.

तात्पर्य हे आहे की स्वद्रव्यामध्ये प्रवृत्तीचे कारण भेदविज्ञान आहे आणि परद्रव्यामध्ये प्रवृत्तीचे कारण भेदविज्ञानाचा अभाव आहे."

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये ह्या गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेसमानच स्पष्ट केला आहे.

कविवर वृंदावनदासजींनी प्रवचनसार परमागमामध्ये वरील गाथांचा भाव दोन मत्तगयंद सवैयांमध्ये पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मत्तगयन्द)

थावर जीव निकायनि के, पृथिवी प्रमुखादिक भेद घने हैं।
औ त्रसरासि निवासिन के, तन के कितनेकन भेद बने हैं॥
सो सब पुग्गलदर्वमई, चिनमूरति तैं सब भिन्न ठने हैं।
चेतन हू तिन देहनि तैं, निहचै करि भिन्न जिनिंद भने हैं॥९०॥

स्थावर जीव निकायाचे पृथ्वी इत्यादी अनेक प्रकार आहेत व त्रस राशिमध्ये राहणाऱ्यांचेही अनेक प्रकार आहेत. हे सर्व पुद्गलद्रव्यमय आहेत. चैतन्यमूर्ती आत्म्याहून सर्व भिन्न आहेत आणि निश्चयाने चेतन देखील त्या सर्व देहादी पदार्थांहून भिन्न आहे - असे जिनेंद्रदेव म्हणतात.

(मत्तगयन्द)

जो जन या परकार करी, निज औ पर को नहिं जानत नीके।
आप सरूप चिदानंद वृन्द, तिसे न गहै मदमोह वमी के॥
सो नित मैं तनरूप तथा, तन है हमरो इमि मानत ठीके।
भूरि भवावलि माहिं भमै, निहचै वह मोह महामद पी के॥९१॥

अशाप्रकारे जे निज व पराला चांगल्या तऱ्हेने जाणत नाहीत आणि मोह-मदिरेचे वमन करून चिदानंद स्वरूप निज आत्म्याला ग्रहण करीत नाहीत, 'मी शरीररूप आहे व शरीर माझे आहे' – निरंतर असेच मानतात; ते जीव निश्चयाने मोहमदिरेचे प्राशन करून वारंवार भवार्णवातच भटकणारे, भ्रमण करणारे आहेत.

पंडित देवीदासजींनी ह्या गाथांचा भाव दोन पद्यांमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(सवैया इकतीसा)

प्रथवी सु पानी आगि वाउ वंसपती और
त्रसकाय जीव छै प्रकार जे जताये हैं।
अथवा सु थावर तथा सु जीव जंगम हैं
जे तौ तिनही के ये सु करे दो किताये हैं॥
तेई सब चेतना स्वरूप जीव तैं सु भिन्न
तनपिण्डरूप सो अचेतन बताये हैं।
जीव द्रव्य निश्चै करिकैं सु तिनि तैं सु जुदौ
ग्यानरूप चिन्ह जाके जाही सौं बताये हैं॥१४४॥

पृथ्वी, जल, अग्नी, वायु, वनस्पती आणि त्रसकायरूप सहा प्रकारचे जीव आगमामध्ये सांगितले आहेत किंवा त्याच संसारी जीवांचे स्थावर आणि जंगम - हे दोन प्रकार देखील केलेले आहेत. त्या चेतनास्वरूप जीवांहून भिन्न जे शरीररूप पुद्गल पिंड आहेत, ते सर्व अचेतनच आहेत. शरीरादी अनेक पुद्गल पिंडांहून जीव निश्चितपणे वेगळाच आहे. ज्यांचे ज्ञानरूप चिह्न प्रगट आहेत - असे जीव त्या पृथ्वीकायिक इत्यादीमध्ये राहतात; त्यामुळे त्यांना उपचाराने जीव म्हणतात.

(सवैया इकतीसा)

यह लोक के मझार प्रानी जे सु राग दोष
मोह मदिरा की गहलाई सौं भुलानैं हैं।
चेतन अचेतन की ठीक तातैं भिन्न-भिन्न
जीवद्रव्य पुद्गल स्वरूप सो न जानैं हैं॥

चिदानंद रूप सुद्ध नित्य आतमीक भाव
उपादेय अंगीकार करिकैं न मानैं हैं।
सरीरादि रूप मैं सु मेरे सरीरादि द्रव्य
परिणाम अैंसे जे अलीक उर आनैं हैं॥१४५॥

ह्या संसारात जे प्राणी मोह-राग-द्वेषाच्या मदिरेच्या नशेमध्ये स्वत:ला विसरले आहेत, चेतन-अचेतनाची योग्य ओळख नसल्यामुळे जीव आणि पुद्गलद्रव्याचे स्वरूप वेगवेगळे जाणत नाहीत, सदा शुद्ध चिदानंदमयी आत्मिक भावाला उपादेय मानून अंगीकार करीत नाहीत, शरीरादीरूप मी आहे किंवा शरीरादी माझे आहेत - अशा मिथ्या परिणामांनाच मनात उत्पन्न होऊ देतात म्हणजेच त्या मिथ्या-मोहजन्य परिणामांमध्ये मग्न राहतात, ते जीव अज्ञानी आहेत.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजी स्वामींनी ह्या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''पृथ्वीकायिक, जलकायिक, अग्निकायिक, वायुकायिक व वनस्पतिकायिक – ह्या पाच जीवांना स्थावर व दो इंद्रियापासून असंज्ञी व संज्ञी पंचेंद्रियापर्यंतच्या जीवांना त्रस म्हटले आहे. यांचे शरीर अचेतन आहे व अचेतनपणामुळे हे जीवाहून भिन्न आहे. हिरव्या भाजीला सचित्त म्हटले आहे, त्यामध्ये हिरवी भाजी सचित्त नसून अचेतन आहे, परंतु आत राहणारा आत्मा चेतन आहे. शरीर जीव नाही. हिरव्या भाजीचे शरीर व जीव वेगळे होतात. केवळ तैजस-कार्मण शरीरच जीवासोबत जातात, पण ते सुद्धा अचेतन आहेत, त्यांच्याहूनही जीव भिन्न आहे. नारकी, तिर्यंच, मनुष्य व देवांचे शरीर जड (अजीव) आहेत, ते आत्म्याहून भिन्न आहेत.

जीव सुद्धा स्वत:च्या ज्ञान-दर्शन स्वभावामुळे त्यांच्याहून भिन्न आहे.[१]

षट्जीव निकाय आत्म्याला परद्रव्य आहेत व केवळ आत्माच स्वद्रव्य आहे.[२]

अशाप्रकारे परद्रव्याहून निवृत्त होऊन, स्वद्रव्य-चेतनास्वरूपामध्ये

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३४२ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३४२

प्रवृत्ती करणेच ज्ञेयांचे खरे ज्ञान करण्याचे फळ आहे व तेच धर्म व शांतीचे कारण आहे.[१]

परपदार्थ परज्ञेय आहेत व आत्मा स्वज्ञेय आहे. परजीवाचे द्रव्य-क्षेत्र-काल भाव निज आत्म्याहून वेगळे आहेत. जो पदार्थ भिन्न आहे, तो कोणाचे काय करू शकतो?[२]

मिथ्यात्वरूपी मुळाच्या नाशाविना संसाररूपी वृक्षाचा नाश होत नाही. आत्मा शरीराहून आणि इतर सर्व जीवांहून भिन्न आहे. माझा स्वभाव माझ्यात आहे – असे भेदविज्ञान जो करीत नाही, तो जीव मानतो की मी बोलू शकतो, परजीवावर दया करू शकतो, कुटुंब-देशाचे रक्षण करू शकतो, शब्दाने मला ज्ञान होते, इत्यादी. जो असे मानतो की अचेतन पदार्थांची पर्याय चेतन पदार्थांमुळे होते; तो स्व-पराच्या भिन्नत्वाला जाणत नाही.[३]

प्रत्येक द्रव्य व पर्याय सत आहे, स्वतंत्र आहे; परामुळे तिचे अस्तित्व नाही. लाकडाच्या स्कंधात प्रत्येक रजकण स्वतंत्र राहतात. प्रत्येक परमाणू स्वत:च्या आधाराने आहे, इतर परमाणुंच्या आधारे नव्हे. प्रत्येक परमाणू व जीवाचे कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान व अधिकरण – हे सहा कारक स्वत:तच आहेत व पराचे सहा कारक परामध्ये आहेत. निगोदातील अनंत जीव सोबत राहतात, ते सर्व स्वतंत्र आहेत व त्यांचे सहा कारण स्वत:मध्ये आहेत, परामध्ये त्यांचा अभाव आहे. जर त्यांचा अभाव आहे तर मग ते परामध्ये काय करतील ?[४]

ज्या जीवाला स्वत:च्या ज्ञाता-दृष्टारूप शुद्ध स्वभावाचे श्रद्धा-ज्ञान नसते, त्या जीवाला स्व-पराचे भेद-विज्ञान होत नाही. तो जीव 'शरीर मी आहे, माझ्याकडून एवढ्या जीवांचे रक्षण झाले, पुण्यामुळे हळूहळू धर्म होईल, वाणीमुळे ज्ञान होईल' - असा मोहवश परद्रव्यामध्ये अहंपणा करतो; परंतु ज्ञानी जीव असे अध्यवसान करीत नाही. त्यामुळे

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३४४
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३४४
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३४७
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३४८

निश्चित होते की जीवाला परद्रव्यामध्ये प्रवृत्तीचे कारण केवळ भेदविज्ञानाचा अभावच आहे.

स्वद्रव्यात प्रवृत्तीचे कारण भेदविज्ञानाचा सद्भाव आहे. आत्मा ज्ञानस्वरूपी आहे. पर-पदार्थ आत्म्याचे नाहीत. विकार विकृत अवस्था आहे. आत्म्याच्या शुद्ध स्वभावात श्रद्धा-ज्ञानाच्या प्रवृत्तीचे कारण भेदविज्ञानाचा सद्भाव आहे. भेद-विज्ञानी स्व आणि पराची ओळख करतो व पर-पदार्थांमध्ये अहंकार, ममकार करीत नाही. स्वभावदृष्टीवान जीव समस्त स्वभावाचा कर्ता आहे आणि निमित्त व संयोगांना देखील त्यांच्या स्वभावाने पाहणारा आहे. निमित्त व संयोगांचा स्वभावही स्वत:मध्ये कार्य करण्याचा आहे; उपादानामध्ये कार्य करण्याचा त्यांचा स्वभाव नाही. ज्ञानी जीव संयोगांनी ज्ञान होते – असे मानत नाही.[१]

मोहाच्या प्रवृत्तीमुळे भेदविज्ञानाचा अभाव आहे आणि स्वद्रव्यामध्ये प्रवृत्तीचे कारण भेदविज्ञान आहे.

अशाप्रकारे भेदविज्ञान प्रगट करून मोह नष्ट करावयास हवा.[२]''

ह्या गाथांमध्ये मुळात तर हे सांगितले आहे की परद्रव्यांमध्ये प्रवृत्तीचे केवळ एकच कारण भेदविज्ञानाचा अभाव आहे आणि स्वद्रव्यामध्ये प्रवृत्तीचा केवळ एकच उपाय भेदविज्ञान आहे.

पृथ्वीकायिक इत्यादी जे संसारी जीव आहेत; ते सर्व देहसहित आहेत. तात्पर्य हे आहे की अनादी काळापासून आजपर्यंत शरीरापासून यांचा एका समयाकरिता देखील वियोग झाला नाही. विग्रहगतीमध्ये औदारिक-वैक्रियिक शरीर नसले तरीही कार्मण व तैजस शरीरांचा संबंध तर विग्रहगतीमध्ये देखील असतो.

अशाप्रकारे ह्या मनुष्यादी पर्याय एक आत्मा व अनंत पुद्गल परमाणुंचा पिंड अशा रूपात आहेत; तरीही अज्ञानी जग त्यांना जीव म्हणते. केवळ अज्ञानी जगातच नव्हेत तर जिनवाणीमध्ये देखील

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३५०
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३५०

प्रयोजनवश सदाचाराच्या सिद्धीकरिता अनुपचरित असद्भूत व्यवहारनयाने ह्या मनुष्यादी पर्यायांना जीव म्हटले आहे.

अरे ! ह्या मनुष्यादी पर्यायांमध्ये जीव द्रव्य तर केवळ एकच आहे आणि पुद्गलद्रव्य मात्र अनंत आहेत. अशाप्रकारे जीवाहून अनंतपट पुद्गल ज्या असमानजातीय द्रव्यपर्यायांमध्ये असतील, त्यांना जीव म्हणणे कसे योग्य ठरेल ? ही एक विचारणीय बाब आहे.

वरील संदर्भात ह्या गाथांमध्ये हे म्हटले आहे की हे पृथ्वीकायिक इत्यादी जीवनिकाय भिन्न आहेत व भगवान आत्मा वेगळा आहे. जो हे जाणत नाही, तो आत्मा अज्ञानी आहे व जो आत्मा ह्या दोहोंना भिन्न-भिन्न जाणतो, तो भेदज्ञानी आत्मज्ञानी आहे, धर्मात्मा आहे. ●

आत्म्याचे ध्यान करण्याकरिता त्याला जाणणे आवश्यक आहे. तसेच आपल्या आत्म्याच्या दर्शनाकरिता देखील आत्म्याला जाणणे आवश्यक आहे. अशाप्रकारे आत्मध्यानरूप चारित्राकरिता आणि आत्मदर्शनरूप सम्यग्दर्शनाकरिता आत्म्याला जाणणे आवश्यक आहे, तसेच आत्मज्ञानरूप सम्यग्ज्ञानाकरिता तर आत्म्याला जाणणे गरजेचे आहेच. शेवटी निष्कर्ष हा निघाला की धर्माच्या साधनेकरिता केवळ भगवान आत्म्याला जाणणेच सार्थक आहे.

ऐकून नव्हे, वाचून नव्हे, आत्म्याला प्रत्यक्ष अनुभूतीपूर्वक जाणणेच आत्मज्ञान आहे आणि अशाच प्रकारे जाणत राहणे आत्मध्यान आहे. असे आत्मज्ञान सम्यग्ज्ञान आहे आणि असेच आत्मध्यान सम्यक् चारित्र आहे. जेव्हा असे आत्मज्ञान आणि आत्मध्यान होते, त्याच समयी आत्मप्रतीती देखील सहजच होते, आत्म्यामध्ये आपलेपणा सुद्धा सहज येतो, अतींद्रिय आनंदाचे वेदन देखील त्याच समयी होते; सर्व काही एकदम उत्पन्न होते आणि सर्वांचे मिळून एकच नाव आत्मानुभूती आहे.

– आत्मा ही है शरण, पृष्ठ-२२१

प्रवचनसार गाथा १८४-१८५

मागील गाथांमध्ये हे स्पष्ट केले आहे की जरी हा आत्मा त्रस-स्थावर इत्यादी जीव निकायांहून भिन्न आहे; तरीही हा आत्मा त्यांच्यात एकत्व-ममत्व करतो व त्याच्या फळस्वरूपी अनंत दुःख प्राप्त करतो.

ह्या गाथांमध्ये हे सांगत आहेत की शेवटी आत्म्याचे कार्य आहे तरी काय?

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

कुव्वं सभावमादा हवदि हि कत्ता सगस्स भावस्स।
पोग्गलदव्वमयाणं ण दु कत्ता सव्वभावाणं॥१८४॥
गेण्हदि णेव ण मुंचदि करेदि ण हि पोग्गलाणि कम्माणि।
जीवो पोग्गलमज्झे वट्टण्णवि सव्वकालेसु॥१८५॥

(हरिगीत)

निज भाव को करता हुआ निजभाव का कर्ता कहा।
और पुद्गल द्रव्यमय सब भाव का कर्ता नहीं॥१८४॥
जीव पुद्गल मध्य रहते हुए पुद्गलकर्म को।
जिनवर कहें सब काल में ना ग्रहे-छोड़े-परिणमे॥१८५॥

आपल्या परिणामांना करणारा हा जीव वास्तविक पाहता आपल्या परिणामांचाच कर्ता आहे; पुद्गलद्रव्यमय सर्व भावांचा कर्ता नाही.

पुद्गलामध्ये राहून देखील हा जीव खरे पाहता त्या पौद्गलिक कर्मांना ग्रहण देखील करीत नाही, त्यांना सोडतही नाही आणि हा त्यांचा कर्ता देखील नाही.

या गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"वास्तविक पाहता हा भगवान आत्मा आपल्या स्वभावाचा कर्ता आहे; कारण तो भाव त्याचा स्वधर्म आहे. आत्म्यात तसे परिणमित होण्याची शक्ती आहे. त्यामुळे ते अवश्यमेव आत्म्याचे कार्य आहे.

अशाप्रकारे हा आत्मा आपल्या स्वभावाला स्वतंत्रपणे करीत, त्या भावाचा कर्ता आहे व आत्म्याद्वारे केला जाणारा तो भाव त्या आत्म्याद्वारे प्राप्य असल्याने आत्म्याचेच कार्य आहे. अशाप्रकारे आपला परिणाम आत्म्याचे कर्म आहे.

परंतु हा भगवान आत्मा पौद्गलिक भावांना करीत नाही; कारण ते पराचे धर्म आहेत; त्यामुळे आत्म्यामध्ये त्यांच्यारूप होण्याची शक्ती नसल्यामुळे ते आत्म्याचे कर्म (कार्य) नाहीत.

अशाप्रकारे हा आत्मा त्या पौद्गलिक भावांना न करता, त्यांचा कर्ता होत नाही व ते पौद्गलिक भाव आत्म्याद्वारे न केले गेल्यामुळे आत्म्याचे कर्म नाहीत.

खरे पाहता बाब ही आहे की पुद्गल परिणाम आत्म्याचे कर्म नाही; कारण ज्याप्रमाणे अग्नी लोहाच्या गोळ्याच्या ग्रहण-त्यागाने रहित असते; तसेच हा आत्मा परद्रव्याच्या ग्रहण-त्यागाने रहित आहे.

जो ज्याला परिणमविणारा असतो, तो त्याच्या ग्रहण-त्यागाने रहित नसतो. आत्मा परद्रव्याशी एकक्षेत्रावगाही असून देखील परद्रव्याच्या ग्रहण-त्यागाने रहितच आहे. त्यामुळे हा आत्मा पुद्गलांना कर्मभावाने परिणमविणारा नाही.''

आचार्य जयसेनांनी ह्या गाथांचा भाव स्पष्ट करताना एक बाब अत्यंत स्पष्टपणे सांगितली आहे की येथे 'स्वभाव' शब्दाने रागादीभाव ग्रहण करावेत.

त्यांनी लिहिले आहे की जरी शुद्धनिश्चयनयाने शुद्ध-बुद्ध एकस्वभावच सांगितला आहे; तरी देखील कर्मबंधाच्या प्रसंगी अशुद्धनिश्चयनयाने रागादी परिणामांना देखील स्वभाव म्हटले आहे.

अशाप्रकारे येथे आत्म्याला रागादी भावांचा कर्ता म्हटले आहे आणि पराच्या कर्तृत्वाचा निषेध केला आहे.

आचार्य जयसेनांची एक बाब आणखी उल्लेखनीय आहे. त्यांनी म्हटले आहे की जसे सिद्ध भगवान पुद्गलांमध्ये राहूनही परद्रव्याचे कर्ता नाहीत,

त्यांना ते ग्रहण करीत नाहीत व सोडतही नाहीत; तसेच शुद्धनिश्चयनयाच्या अपेक्षेने शक्तीरूपे संसारी जीवही या सर्वांहून रहित आहेत.

ह्या गाथांचा भाव कविवर वृंदावनदासजींनी १ मनहरण आणि १ द्रुमिला छंदाच्या माध्यमातून प्रस्तुत केला आहे –

(मनहरण)

आतमा दरब निज चेतन सुपरिनाम,
ताही को करत सदा ताही में रमत है।
आपने सुभाव ही को करता है निहचै सो,
निजाधीन भाव भूमिका ही में गमत है॥
पुग्गलदरवमई जेते हैं प्रपंच संच,
देहादिक तिनको अकरता समत है।
ऐसे भेद भेदज्ञान नैनतैं विलोको वृन्द,
याही बिना जीव भव भांवरी भमत है॥९२॥

हे आत्मद्रव्य आपल्या चेतन परिणामांना करते आणि त्यांनाच भोगते. निश्चयाने ते आपल्या स्वभावभावांचेच कर्ता-भोक्ता आहे; त्यामुळे ते स्वाधीनपणे आपल्या भूमिकेचा निर्वाह करते.

पुद्गलद्रव्याचा जेवढाही विस्तार आहे, देहादिक रचना आहे; त्या सर्वांचा आत्मा अकर्ता आहे. वृंदावनदासजी कवींनी म्हटले आहे की आम्ही अशाप्रकारचा भेद भेदज्ञानांच्या चक्षुंनी पाहतो व यांच्या विना संसारात भ्रमण करतात.

(द्रुमिला)

यह जीव पदारथ की महिमा, जग में निरखो भ्रम को हरिके।
मधि पुग्गल के परिवर्ततु है, सब कालविषैं निहचै करिके॥
तब हू तिन पुग्गल कर्मनि को, न गहै न तजै न करै धरिके।
वह आपुहि आप सुभावहि तैं, प्रनवै सतसंगति में परिके॥९३॥

हे भव्य जीवांनो ! भ्रम दूर करून जगात जीव नावाच्या पदार्थाचा महिमा तर पहा, तो सदा पुद्गलांच्या मध्ये राहतो; तरीही निश्चयाने

पौद्‌गलिक कर्मांना तो ग्रहण करीत नाही व त्यांचा कर्ता देखील नाही व त्यांचा त्याग सुद्धा करीत नाही. तो पुद्‌गलकर्माच्या सत्संगतीमध्ये आपल्या स्वभावाने आपोआप परिणमित होतो.

पंडित देवीदासजींनी ह्या गाथांचा भाव दोन पद्यांमधून स्पष्ट केला आहे –

(सवैया तेईसा)

ग्यानस्वरूप सुजीव सही अपने परिनामनि कौं करता है।
जो अपनैं परिनामनि कौ करता निहचै गुन आचरता है॥
पुग्गल द्रव्य स्वरूप सु कर्म च फंद विषैं सु नहीं परता है।
जो तन आदि पदारथ हैं तिनिकौ सु नहीं करता हरता है॥१४६॥

हा ज्ञानस्वभावी जीव आपल्या परिणामांचा कर्ता आहे. आपल्या परिणामांना करणारा जीव आपल्या स्वभावाचे आचरण करतो. तो पौद्‌गलिक कर्मांच्या बंधनात अडकत नाही; कारण तो शरीरादी पदार्थांचा कर्ता-हर्ता बनत नाही.

(सवैया तेईसा)

सो जिय कौ चिरकाल प्रवर्तन जद्यपि पुग्गल बीच रहै है।
निश्चय सौं क़रता सु नहीं अपनै निज आपु प्रवाह वहै है॥
जो वसु कर्म मई सु उपाधि कही तिहि कौं सु न छोड़ै चहे है।
जैसैं न लोह के पिंड कौं आगि सुभाव सौं त्याज करै न ग्रहै है॥१४७॥

जरी हा आत्मा चिर काळापासून पुद्‌गलांमध्ये रहात आला आहे, तरी देखील हा निश्चयाने पुद्‌गलांचा कर्ता नाही, तो तर आपल्या स्वभावाच्या प्रवाहामध्येच प्रवाहमान राहतो. ज्याप्रमाणे अग्नी लोहपिंडाला स्वभावाने ग्रहण करीत नाही आणि त्याचा त्याग देखील करीत नाही; त्याचप्रमाणे हा आत्मा अष्टकर्मांच्या उपाधीला स्वभावानेच ग्रहण करीत नाही आणि सोडत देखील नाही.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी ह्या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

जीव जर नरक-निगोदामध्ये जातो तर स्वत:मुळेच आणि सिद्धदशा प्राप्त करतो, ती देखील स्वत:मुळेच, इतर कोणामुळे नव्हे. आत्मा समया-समयाच्या परिणामांना स्वत:च करतो.[१]

आत्मा स्वत:च्या समया-समयाच्या योग्यतेनुसार विकारी वा अविकारी परिणाम करतो, त्याला येथे धर्म म्हटले. येथे निर्मल पर्यायरूप धर्माची बाब सांगितली नाही. प्रतिसमय भावरूप होणे आत्म्याचा धर्म आहे; परंतु त्या भावाला जड (अजीव) धारण करू शकत नाही.[२]

आत्म्यामध्ये स्वत: प्रतिसमयाला विकार किंवा अविकाररूप परिणमनाची शक्ती असल्याने तो भाव अवश्य आत्म्याचे कार्य आहे व त्या भावाला आत्मा स्वतंत्रपणे करतो, त्यामुळे तो कर्ता आहे. कर्त्याची व्याख्याही अशाप्रकारे आहे की जो स्वतंत्रपणे करतो, तो कर्ता व कर्त्याला जे इष्ट आहे, ते कर्म आहे. निमित्ताने किंवा कर्माच्या उदयाने एखादे कार्य झाले – असे म्हटल्याने त्या वस्तुचा कर्तापणा रहात नाही; त्यामुळे द्रव्य कारण आहे व पर्याय त्याचे कार्य आहे. पर्याय विकारी असो वा अविकारी असो, त्यांचा कर्ता आत्मद्रव्य स्वत:च आहे.[३]

प्रत्येक पदार्थ कायम राहून पूर्व पर्यायीचा व्यय करून नवीन पर्याय उत्पन्न करतो. येथे जी पूर्वपर्याय व्यय झाली, अभाव झाला, तिने वर्तमान पर्यायाचे काय करावे ? जर निमित्ताने उत्पाद होतो, तर कोणी स्वतंत्र राहणार नाही. तसेच जर पूर्व पर्यायीमुळे वर्तमान पर्याय उत्पन्न होत असेल तर उत्पाद स्वतंत्र राहणार नाही.

अहो ! वस्तुस्वरूप अलौकिक आहे. केवळ वर्तमान व त्रिकाळी द्रव्य - ह्या दोहोंमध्येच संबंध आहे. कर्माशी, निमित्ताशी किंवा पूर्व पर्यायीशी वर्तमानाचा थोडासाही संबंध नाही. प्रत्येक समयाची विकारी किंवा अविकारी पर्याय स्वत: आहे.[४]

आत्मा रूपी पदार्थांच्या भावांना देखील करीत नाही; कारण

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३५२
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३५२
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३५२
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३५३

आत्म्यामध्ये रूपी (मूर्तिक) होण्याची शक्ती नाही; त्यामुळे तो त्या कार्यांचा अकर्ताच आहे. अशाप्रकारे आत्मा परपदार्थांच्या परिणामांचा कर्ता नाही आणि ते पर-पदार्थ आत्म्याद्वारे केलेले नाहीत; त्यामुळे आत्म्याचे कार्य नाहीत. जो जीव असे खरे जाणतो, त्याचे पर-कर्तृत्व आणि ममत्व नष्ट होऊन धर्म प्रगट होतो.[१]

जो ज्याला परिणमविताना दिसून येतो, तो त्याच्या ग्रहण-त्यागाने रहित दिसून येत नाही आणि जो ज्याच्या ग्रहण-त्यागाने रहित दिसून येतो, तो त्याला परिणमविणारा होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे आत्मा शरीर, कुटुंब, लक्ष्मीच्या ग्रहण-त्यागाने रहित असल्याने त्यांना परिणमवू शकत नाही; त्याचप्रमाणे त्यांचा ग्रहण-त्याग देखील करू शकत नाही. जर आत्मा लक्ष्मीला परिणमवू शकला असता तर लक्ष्मीच्या ग्रहण-त्यागाने रहित कधीही नसता. मृत्युच्या वेळी शरीर, कुटुंब, लक्ष्मी येथेच पडून राहतात आणि जीव निघून जातो. यावरून लक्षात येते की आत्म्याने वस्तुचा ग्रहण किंवा त्याग केलाच नाही. जर वस्तुचा ग्रहण-त्याग केलाच नाही तर त्या वस्तुला आत्मा कसा परिणमवू शकतो ? अशाप्रकारे सिद्ध झाले की आत्मा शरीर, लक्ष्मी, कुटुंब इत्यादी परपदार्थांना परिणमवू शकत नाही.[२]

एवढे विशेष जाणावे की आत्मा स्वत:च्या परिणामांचा कर्ता असल्याने तो त्या परिणामांच्या ग्रहण-त्यागाने रहित असलेला दिसून येत नाही. आत्मा स्वत:च्या पर्यायीमध्ये शुभाशुभ भावांचे ग्रहण करतो; परंतु त्याचा देखील त्याग करून शुद्ध भावाला ग्रहण करतो, ते देखील पर्यायदृष्टीने आहे. वस्तुस्वभावामध्ये तर शुभाशुभ भावांचा देखील ग्रहण-त्याग होत नाही. पर्यायदृष्टीने आत्मा प्रतिसमयी स्वत:च्या परिणामांचा कर्ता आहे; त्यामुळे तो स्वत:च्या परिणामाला प्रतिसमयी ग्रहण करतो व सोडतो. अशाप्रकारे परिणामी आत्मा स्व परिणामाला ग्रहण करतो व सोडतो; परंतु तो पर-वस्तुचे ग्रहण करीत नाही व सोडतही नाही.

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३५४
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३५७

परपदार्थांचे ग्रहण किंवा त्याग करू शकतो – असे मानणाऱ्या जीवाला धर्म होत नाही.[१]

अशाप्रकारे शरीर, कर्म इत्यादी आत्म्याशी एका क्षेत्रात असूनही आत्मा परपदार्थांच्या ग्रहण-त्यागाने रहित आहे – असे निश्चित होते.

हा ज्ञेय अधिकार आहे. स्वज्ञेयामध्ये आपले परिणाम तू करू शकतोस; परंतु शरीर, कर्म इत्यादी परज्ञेयांच्या परिणामांचा कर्ता तू नाहीस; म्हणून त्यांचे ग्रहण किंवा त्याग तू करू शकत नाहीस. त्यामुळे परपदार्थांचे ममत्व सोडून तुझ्या पर्यायीमध्ये तुझ्यामुळे ममता तू स्वत: करतोस – असे निश्चित करून स्वभावाला ममतारहित मानले असता ममता दूर होते आणि धर्मदशा प्रगट होते.[२]''

वरील संपूर्ण कथनाचा सारांश हा आहे की हा आत्मा आपल्या विकारी भावांचा कर्ता-भोक्ता तर आहे; परंतु पराचा कर्ता-भोक्ता तो कदापी नाही. अशाप्रकारे हा भगवान आत्मा परपदार्थांचा न कर्ता आहे, न त्यांचे ग्रहण करतो आणि त्यांना सोडत देखील नाही. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३५८ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३५८

जर आपणास ह्या जगाचा उतावळेपणा पहायचा असेल तर एखाद्या शहरातील व्यस्त चौकात उभे रहा आणि पहा – चौकात मृत्युची निशानी लाल लाईट आहे, एक पोलिस शिपाई सुद्धा उभा आहे, आपणास थांबविण्याकरिता, तरी सुद्धा तुम्ही थांबत नाहीत. तुम्ही जाणता की लाल लाईट चालू असताना रस्ता ओलांडणे धोकादायक आहे, कोणत्याही वाहनामुळे अपघात होऊ शकतो, तो पोलिस देखील थांबवत आहे, तरी सुद्धा तुम्ही पळत आहात. काय हा उताविळपणाचा कळस नव्हे, एवढी घाई काय कामाची ? परंतु असा उताविळपणा कोठे दिसून पडतो.

तुम्ही तुमच्या उताविळपणामुळे लाल लाईट चालू असताना कोण्या वाहनाखाली चिरडून मरू नये, केवळ एवढ्यासाठीच लाखो पोलिस शिपाई चौका-चौकात उभे करावे लागतात, हे या देशाचे दुर्भाग्य नव्हे काय ?

– क्रमबद्धपर्याय, पृष्ठ : २२१

प्रवचनसार गाथा १८६-१८७

वास्तविक पाहता हा आत्मा आपल्या रागादी विकारी भावांचा कर्ता असूनही परद्रव्यांचा कर्ता नाही आणि त्यांच्या ग्रहण-त्यागाचा देखील तो कर्ता नाही - हे मागील गाथांमध्ये स्पष्ट केल्यानंतर आता ह्या गाथांमध्ये हे स्पष्ट करीत आहेत की परमार्थाने परपदार्थांच्या कर्तृत्व आणि ग्रहण-त्यागाने रहित असूनही हा आत्मा व्यवहाराने आपल्या विकारी भावांना करीत कदाचित कर्मरजाद्वारे ग्रहण केला जातो आणि सोडला जातो, तसेच ती कर्मरज ज्ञानावरणादीरूप परिणमितं होते.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

स इदाणिं कत्ता सं सगपरिणामस्स दव्वजादस्स।
आदीयदे कदाइं विमुच्चदे कम्मधूलीहिं॥१८६॥
परिणमदि जदा अप्पा सुहम्हि असुहम्हि रागदोसजुदो।
तं पविसदि कम्मरयं णाणावरणादि भावेहिं॥१८७॥

(हरिगीत)

भवदशा में रागादि को करता हुआ यह आतमा।
रे कर्मरज से कदाचित् यह ग्रहण होता-छूटता॥१८६॥
रागादियुत जब आतमा परिणमे अशुभ-शुभ भाव में।
तब कर्मरज से आवरित हो विविध बंधन में पड़े॥१८७॥

आत्मद्रव्य संसारावस्थेत उत्पन्न होणाऱ्या आपल्या अशुद्ध परिणामांचा कर्ता होऊन कर्मरजाद्वारे कदाचित ग्रहण केले जाते आणि सोडले जाते.

जेव्हा आत्मा राग-द्वेषयुक्त होऊन शुभ व अशुभामध्ये परिणमित होतो, तेव्हा कर्मरज ज्ञानावरणादीरूपे त्यामध्ये प्रवेश करते.

ह्या गाथांचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''परद्रव्याच्या ग्रहण-त्यागाने रहित होऊन देखील संसारावस्थेत हा आत्मा परद्रव्याच्या परिणामांचे केवळ निमित्त होऊन केवळ स्वपरिणामाच्या कर्तृत्वाचा अनुभव करीत, त्याच्या ह्याच परिणामाला केवळ निमित्त बनवून कर्मपरिणामाला प्राप्त होणाऱ्या पुद्गलरजाद्वारे विशिष्ट अवगाहनरूप कदाचित ग्रहण केला जातो आणि सोडला जातो.

ज्याप्रमाणे नवीन ढगांच्या पाण्याच्या भूमिसंयोग परिणामाशी इतर पुद्गलपरिणाम स्वत:च विचित्रतेला प्राप्त होतात; त्याचप्रमाणे आत्म्याच्या शुभाशुभपरिणामांच्या समयी कर्मपुद्गल परिणाम स्वत:च विचित्रतेला प्राप्त होतात.

जसे नवीन ढगांचे पाणी भूमिच्या संयोगात येते, तेव्हा इतर पुद्गल स्वत:च विचित्र होतात, म्हणजे हिरवळ, कुत्र्याची छत्री, आणि इंद्रगोप इत्यादीरूप परिणमित होतात; तसेच ज़ेव्हा हा आत्मा राग-द्वेषांच्या वशीभूत होऊन शुभाशुभभावरूप परिणमित होतो, तेव्हा योग द्वारांमधून प्रविष्ट होऊन इतर कर्मपुद्गल स्वत:च विचित्रतेला प्राप्त ज्ञानावरणादी भावरूप परिणमित होतात.

यावरून हे सिद्ध होते की कर्मांची विचित्रता त्यांच्या स्वभावकृतच आहे, आत्मकृत नव्हे.''

आचार्य जयसेनांनी ह्या गाथांचा भाव तात्पर्यवृत्ती टीकेसमानच स्पष्ट केला आहे.

कवीवर वृंदावनदासजींनी ह्या गाथांचा भाव २ मनहरण कवित्त आणि १ दोहा पद्यांच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मनहरण)

सोई जीव दर्व अब संसार अवस्था मांहि,
अशुद्ध चेतना जो विभाव की ढरनि है।
ताही को बन्यौ है करतार ताके निमित्त सों,
याके आठ कर्मरूप धूलि की धरनि है॥

सेई कर्म धूल मूल भूल को सुफल देहि,
फेरी काहू कालमाहिं तिनकी करनि है।
ऐसे बंधजोग भाव आपनो विभाव जानि,
त्यागै भेदज्ञानी जासों संसृत तरनि है॥९४॥

तेच जीवद्रव्य संसारावस्थेमध्ये विभावभावरूप अशुद्ध चेतनेमध्ये परिणमित होऊन त्याचा कर्ता बनते आणि त्याच्या निमित्ताने आठ कर्मांच्या धुळीमध्ये मिसळते.

ही कर्मधूळ जेव्हा उदयाला येते, तेव्हा त्याच्या निमित्ताने नवीन मोह-राग-द्वेष भाव उत्पन्न होतात. अशाप्रकारे बंधयोग्य भाव तर आपले विभावभावच आहेत. त्यामुळे भेदज्ञानी जीव त्यांचा त्याग करून संसारसमुद्रातून पार होतात.

(मनहरण)

जबै जीव राग-दोष समल विभावजुत,
शुभाशुभरूप परिनाम को ठटत है।
तबै ज्ञानावरनादि कर्मरूप परज याके,
जोग द्वार आय कै प्रदेश पै पटत है॥
जैसे रितु पावस में धाराधर धारनि तैं,
धरनि में नूतन अंकुरादि अटत है।
तैसे ही शुभाशुभ अशुद्ध रागदोषनि तैं,
पुग्गलीक नयौ कर्म बंधन वटत है॥९५॥

जेव्हा हा जीव राग-द्वेषरूप समल विभाव भावांनी युक्त होतो, शुभाशुभभावरूप परिणमित होतो; तेव्हा योगांद्वारे कार्माणवर्गणा आत्मप्रदेशांमध्ये एकक्षेत्रावगाहरूप होतात आणि ज्ञानावरणादीरूप परिणमित होतात.

ज्याप्रमाणे वर्षा ऋतुमध्ये पाऊस पडल्यामुळे पृथ्वी नवीन अंकुरांनी आच्छादित होते; त्याचप्रमाणे राग-द्वेषरूप शुभाशुभ अशुद्धभावांनी पौद्गलिक वर्गणा नवीन कर्मबंधनाच्या रूपात परिणमित होतात.

(दोहा)

तातैं पुद्गल दरव ही, निज सुभाव तैं भीत।
अति विचित्रगति कर्म को, कर्ता होत प्रतीत॥९६॥

त्यामुळे पुद्गलद्रव्य आपल्या स्वभावानेच अत्यंत विचित्र गतिवाल्या कर्माचा कर्ता होऊन परिणमित होते – असे प्रतीत होते.

पंडित देवीदासजींनी ह्या गाथांचा भाव एकेका पद्यामध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(सवैया इकतीसा)

सोई जीव द्रव्य या ही जग मांहिं परद्रव्य
के निमित्त सौं असुद्ध परिनाम धरै है।
सो असुद्ध चेतनामई सु परिनामनि कौ
पाइ कैं निमित्त कर्म रूप अनुसरै है॥
ग्यानावरनादि अष्ट भाव कौ सु परिनये
कर्म धूलि ग्रहिकैं सु बंध मांहिं परे है।
काहु और काल के विषैं सु रसु दैकैं आपु
कर्म रज जाकौ आप हूँ सु त्याज करै है॥१४८॥

तेच संसारी जीवद्रव्य ह्या जगात परद्रव्याच्या निमित्ताने शुभाशुभ भावरूप अशुद्ध परिणामांना धारण करते व त्या अशुद्ध चैतन्य परिणामांचे निमित्त मिळाल्याने कर्मांचे अनुसरण करीत ज्ञानावरणादी अष्टभावरूप परिणमन करून कर्मरज ग्रहण करून बंधनात अडकते. नंतर अन्य काळात ती कर्मरज फळ देऊन आपोआप खिरून जाते, आत्म्याच्या संपर्काचा त्याग करते.

(गीतिका)

जिहि काल यह चेतनि सु राग विरोध करि संजुक्त है।
तिस ही समैं सुभ असुभ भावनि के मझार सु धुक्त है॥
तव ही सुग्यानावरन आदि सु अष्ट कर्मनि सौं रसै।
जो कर्म धूलि त्रिजोग दरवाजे सु हो करिकैं धसे॥१४९॥

ज्यावेळी हा आत्मा राग-द्वेषांनी युक्त होतो, त्याच समयी शुभाशुभ

परिणामांमध्ये मग्न होतो आणि ज्ञानावरणादी आठ कर्मांमध्ये त्याला आनंद येऊ लागतो आणि त्रियोगाच्या द्वारातून कर्मरज ग्रहण करून तो त्यामध्ये फसतो.

ह्या गाथांचा भाव आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेला आहे –

"ज्याप्रमाणे समुद्रातील लाटा हवेमुळे उत्पन्न होत नसून स्वत:च्या योग्यतेनेच उत्पन्न होतात; त्याचप्रमाणे आत्म्याच्या पर्यायीमध्ये झालेले मिथ्यात्व, अविरती, प्रमाद, कषाय आणि योगाच्या परिणामांना जीव स्वत:च्या योग्यतेने करतो; कर्म, काळ किंवा बाहेरचे संयोग त्या परिणामांना आत्म्याकडून करवित नाहीत. ते परिणाम स्वत:ला न जाणल्यामुळे होतात. त्या वेळी लक्ष्य जर परपदार्थ किंवा कर्मावर असेल तर त्यांना निमित्त म्हटले जाते.

निगोदी जीवाला तीव्र कर्माचा उदय आहे; त्यामुळे तो विकार करतो – असे नव्हे. तसेच संज्ञी जीवाला कर्माचा मंद उदय आहे; त्यामुळे तो धर्माचा पुरुषार्थ करतो – असेही नाही. ते परिणाम स्वत:च्या द्रव्यामधून प्रवाहित होतात; परामुळे नव्हे.

अशाप्रकारे परावर लक्ष केंद्रित करून आत्मा स्वत: विकार उत्पन्न करून मिथ्यात्व, राग-द्वेषादींचा कर्ता होतो.

रागाचे निमित्त मिळाल्याने पुद्गलकर्म स्वतंत्रपणे बांधले जातात. जीव जेव्हा रागादीरूप परिणाम करतो, तेव्हा नवीन कर्म परमाणू त्या परिणामांचे निमित्त मिळाल्याने आत्म्याच्या क्षेत्रात बांधले जातात. आत्मा ज्या-ज्या प्रकारचे विकारी परिणाम करतो, त्या-त्या प्रकारचे कर्म येतात. जेव्हा तीव्र अनुभागवाले परिणाम करतो, तेव्हा तीव्र रसवाले कर्म बांधले जातात आणि जेव्हा मंद अनुभागवाले परिणाम करतो, तेव्हा तीव्र रसवाले कर्म बांधले जातात. तसेच जेवढ्या प्रमाणात परिणाम करतो, तेवढ्याच प्रमाणात कर्मबंध होतो.[१]

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३६१

ह्या जगात जेवढे आत्मा आहेत, त्यांच्यापेक्षा अनंतपट कार्मणवर्गणांचा समूह लोकामध्ये व्याप्त आहे. त्यांच्यापैकी ज्यांच्यात कर्मरूप होण्याची योग्यता आहे, तेवढे परमाणू कर्मरूपे परिणमित होतात आणि आत्म्याबरोबर एका क्षेत्रात राहतात.[१]

पाऊस पडल्यानंतर पुद्गल हिरवे, पांढरे व लालरूप परिणमित होते; तसेच जीव स्वत:च्या ज्ञाता-दृष्टा स्वभावाला विसरून शुभाशुभ भावरूप परिणमित होतो, तेव्हा पुद्गल परमाणू स्वत:मुळेच ज्ञानावरण, दर्शनावरण इत्यादी विचित्रतारूप वेगवेगळ्या बंधरूप होतो.[२]

प्रथम तर जीवाने हे निश्चित केले पाहिजे की प्रत्येक पर्याय स्वतंत्र होते. विकार परामुळे होत नाही. स्वभावामध्ये विकार नाही. स्वभाव तर ज्ञाता-दृष्टा शुद्धस्वरूप आहे. अशाप्रकारे संयोगावरून आणि अंशावरून रुची काढून अंशी स्वरूपावर लक्ष केंद्रित केले असता शांती प्रगट होते.

प्रतिसमय पर्याय क्रमबद्ध होत आहे. त्या क्रमावर केंद्रित असलेले लक्ष काढून अक्रम शांत ज्ञाता-दृष्टारूप शुद्धस्वभावाकडे वळले, त्याचे श्रद्धा-ज्ञान केले तर क्रमबद्धपर्यायीचा निर्णय हा खरा निर्णय म्हटला जातो. अक्रमस्वभावाच्या निर्णयाशिवाय जे होणार असेल, ते होईल – असे वर-वर बोलले तर तो क्रमबद्धपर्यायाचा निर्णय नाही.[३]

जो एका समयाच्या विकाराला स्वतंत्र स्वीकारतो, तो अंशी स्वभावाला देखील स्वतंत्र स्वीकार करतो – अशी स्वभावदृष्टी करणाऱ्याचा निर्णय सम्यक आहे.[४]

द्रव्यकर्मांच्या विचित्रतेचा बंध स्वतंत्र होतो, त्यामध्ये शुभाशुभ परिणाम केवळ निमित्त आहेत – असे यथार्थ जाणून पर्यायीच्या स्वतंत्र क्रमावरून लक्ष काढून अक्रमस्वभावाचे श्रद्धा-ज्ञान करणेच धर्म आहे.[५]''

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३६१
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३६४
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३६६-३६७
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३६७
५) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३६७

वरील संपूर्ण कथनाचा सारांश हा आहे की प्रत्येक पदार्थ स्वत:च्या परिणमनाचा कर्ता स्वत:च आहे. कर्त्यासंबंधी म्हटले आहे की **'स्वतंत्र: कर्ता'**. जो आपल्या कार्याला स्वतंत्रपणे करतो, त्याला कर्ता म्हणतात.

जीव द्रव्य आपल्या निर्मल परिणामांना स्वतंत्रपणे करतो, त्यामुळे तो त्यांचा कर्ता तर आहेच; परंतु अज्ञानावस्थेत विकारी परिणामांचा कर्ता देखील तोच आहे. जरी विकारी परिणामांमध्ये कर्मोदय निमित्त असतो; तरी देखील तो कर्मोदय तर केवळ निमित्तच आहे, कर्ता नव्हे.

तात्पर्य हे आहे की वास्तविक कर्ता तर उपादानच असतो. म्हटले सुद्धा आहे की **'य: परिणमति स कर्ता:**[१]' जो परिणमित होतो, तोच कर्ता आहे.

अशाप्रकारे हे सुनिश्चित होते की ज्ञानी जीव ज्ञानभावाचा (निर्मल परिणाम – शुद्धभावाचा) कर्ता आहे आणि अज्ञानी जीव अज्ञानभावाचा कर्ता आहे.

याला आपण असे सुद्धा म्हणू शकतो की हा जीव ज्ञानावस्थेमध्ये ज्ञानभावांचा आणि अज्ञानावस्थेत अज्ञानभावांचाच कर्ता आहे.

भावकर्म जीवाचे विकारी परिणाम आहेत; त्यामुळे अज्ञानावस्थेत तो त्यांचा कर्ता आहे व द्रव्यकर्म पौद्गलिक कार्मणवर्गणांचे कार्य आहे; त्यामुळे त्यांचा कर्ता पुद्गलच आहे, जीव नव्हे. म्हटलेही आहे की –

ग्यान-भाव ग्यानी करै, अग्यानी अग्यान।
दर्वकर्म पुद्गल करै, यह निहचै परवान॥१७॥[२]

ज्ञानी ज्ञानभावांचा आणि अज्ञानी अज्ञानभावांचा कर्ता आहे आणि पौद्गलिक द्रव्यकर्मांचा कर्ता पुद्गल आहे – हे निश्चयनयाचे कथन आहे.

येथे प्रश्न निर्माण होतो की जर रागादी भाव अज्ञानभाव आहेत तर ज्ञानी जीवाला सुद्धा रागादी होताना आढळतात; त्यांचा कर्ता कोण आहे?

१) समयसार कलश, कलश : ५१
२) समयसार नाटक, कर्ताकर्मक्रियाद्वार, छन्द : १७, पृष्ठ : ८०

मिथ्यात्वासोबत राहणारे अनंतानुबंधी संबंधी रागादींचे नावच अज्ञानभाव आहे. असा अज्ञानभाव ज्ञानी जीवांना नसतो. असा अज्ञानभाव तर अज्ञानी जीवांनाच असतो; त्यामुळे तेच रागादीभावांचे कर्ता आहेत.

ज्ञानी जीवाला होणाऱ्या अप्रत्याख्यानावरणादी संबंधी रागादी भावांचा कर्ता ज्ञानी नसून तो केवळ त्यांचा ज्ञाताच आहे; कारण तो त्यांना जाणतो तर, परंतु त्यांचा कर्ता होत नाही. त्यामुळे तो त्यांना जाणणेरूप क्रियेचा कर्ता तर आहे, परंतु त्या रागादी भावांचा कर्ता नाही. पराचा कर्ता तर ज्ञानी व अज्ञानी दोघेही नाहीत.

प्रवचनसार परिशिष्टामध्ये ४७ नयांच्या प्रकरणात आत्म्याला कर्तानयाने अप्रत्याख्यानावरणादी रागादी भावांचा कर्ता म्हटले आहे; परंतु सोबतच तोच जीव त्याच समयी अकर्तानयाने त्या रागादींचा अकर्ता सुद्धा आहे – असेही म्हटले आहे.

विभिन्न ठिकाणी विभिन्न अपेक्षांनी कथन केले जाते. त्यामुळे कोठे कोणत्या अपेक्षेने कथन केलेले आहे – हे बारकाईने समजणे अत्यंत आवश्यक आहे.

येथे मूळ बाब ही सांगितली आहे की जरी भगवान आत्मा अशुद्धनिश्चयनयाने रागादींचा कर्ता आहे तरी देखील तो पराचा कर्ता नाही; तथापी असद्भूतव्यवहार नयाने आत्मा आपल्या रागादी भावांना करताना पुद्गल कर्मांचा कर्ता होतो, त्यांना ग्रहण करतो आणि त्यांचा त्याग देखील करतो.

वरील दोन्ही गाथांपैकी पहिल्या गाथेत निश्चयाने पराचा अकर्ता म्हटले आहे आणि दुसऱ्या गाथेत व्यवहाराने कथंचित पराचा कर्ता देखील म्हटले आहे.

आचार्य जयसेनांच्या तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये ह्या गाथानंतर एक गाथा आणखी येते, जी आचार्य अमृतचंद्रकृत तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये उपलब्ध नाही.

ती गाथा मुळात पुढीलप्रमाणे आहे –

सुहपयडीण विसोही तिव्वो असुहाण संकिलेसम्मि।
विवरीदो दु जहण्णो अणुभागो सव्वपयडीणं॥१३॥

(हरिगीत)

विशुद्धतम परिणाम से शुभतम करम का बंध हो।
संक्लेशतम से अशुभतम अर जघन हो विपरीत से॥१३॥

तीव्र अर्थात अधिक विशुद्धी झाल्यावर शुभप्रकृतींचा तीव्र म्हणजेच उत्कृष्ट अनुभागबंध होतो आणि तीव्र संक्लेशपरिणामांनी अशुभ प्रकृतींचा तीव्र अर्थात उत्कृष्ट बंध होतो, तसेच याहून विपरीत परिणामांनी सर्व प्रकृतींचा जघन्य अनुभाग बंध होतो.

वरील गाथेत हे स्पष्ट केले आहे की कोणत्या प्रकारच्या शुभाशुभभावांपैकी कोणत्या प्रकारच्या भावाने कोणत्या प्रकारचा बंध होतो. टीकेमध्ये देखील हेच उदाहरणासहित पुन्हा सांगितले आहे; अधिक विस्ताराने काही सांगितले नाही.

वरील संदर्भात विस्ताराने जाणण्याची जिज्ञासा असेल तर तत्संबंधी करणानुयोगाच्या शास्त्रांचा स्वाध्याय करावा.

परकर्तृत्व-भोक्तृत्वासंबंधी जेवढेही कथन आहे, ते सर्व असद्भूत व्यवहारनयाचे कथन आहे. जरी हे कथन प्रयोजनापुरेतच उपयोगी आहे, जाणण्यायोग्य आहे, उपादेय आहे; तरी देखील करणानुयोगाचा मूळ आधार देखील हेच आहे; कारण करणानुयोग आत्म्याचे विकारी भाव आणि पौद्गलिक कार्मणवर्गणांमध्ये होणाऱ्या निमित्त-नैमित्तिक संबंधाना आधार मानूनच आपले म्हणणे प्रस्तुत करतो. ●

धर्माचा आरंभही आत्मानुभूतीने होतो आणि पूर्णता देखील आत्मानुभूतीच्या पूर्णतेतच आहे. आत्मानुभूतीशिवाय धर्माची कल्पनाही केली जाऊ शकत नाही. आत्मानुभूतीच आत्मधर्म आहे. साधकाकरिता केवळ हीच इष्ट आहे. ही प्राप्त करणेच साधकाचे मूळ प्रयोजन आहे. **–मैं कौन हूँ, पृष्ठ : १०**

प्रवचनसार गाथा १८८

मागील गाथांमध्ये बंधाचे स्वरूप निश्चय-व्यवहाराच्या संधीपूर्वक स्पष्ट केल्यानंतर आता आगामी गाथांमध्ये म्हणत आहेत की हा आत्मा स्वत:च बंध आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

सपदेसो सो अप्पा कसायिदो मोहरागदोसेहिं।
कम्मरएहिं सिलिट्ठो बंधो त्ति परूविदो समये॥१८८॥

(हरिगीत)

सप्रदेशी आतमा रुस-राग-मोह कषाययुत।
हो कर्मरज से लिप्त यह ही बंध है जिनवर कहा॥१८८॥

सप्रदेशी हा आत्मा यथासमयी मोह-राग-द्वेषाद्वारे कषायित झाल्याने कर्मरजाशी बांधला जातो, तेव्हा त्याला 'बंध' म्हटले जाते.

ह्या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''ज्याप्रमाणे प्रदेशवान असल्यामुळे वस्त्र लोध-तुरटीने कषायित होते आणि कषायित होऊन मंजीष्टादी रंगाशी संबद्ध होऊन एकटेच रंगलेले दिसून येते; त्याचप्रमाणे सप्रदेशी असल्यामुळे हा आत्मा देखील यथाकाळ मोह-राग-द्वेषाद्वारे कषायित झाल्यामुळे कर्मरजाशी लिप्त होतो आणि एकटाच बंधात अडकतो – असे जाणावे; कारण निश्चयाचा विषय शुद्धद्रव्य आहे.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये ह्या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रकृत तत्त्वप्रदीपिकेसमानच स्पष्ट केला आहे.

कविवर वृंदावनदासजींनी ह्या गाथेचा भाव एका पद्याच्या माध्यमातून खालीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मनहरण)

सो असंख प्रदेश प्रमान जगजीवनि के,
मोह राग दोष ये कषायभाव संग है।
ताही तैं करमरूप रजकरि बँधै ऐसे,
सिद्धांत में कही वृन्द बंध की प्रसंग है॥
जैसे पट लोध फटकड़ी आदि तैं कसैलो,
चढत मजीठ रंग तापै सरवंग है।
तैसे चिदानंद के असंख परदेश पर,
चढत कषाय तैं करम रज रंग है॥९७॥

असंख्यातप्रदेशी संसारी जीवांना मोह-राग-द्वेषरूप कषायभावांची सोबत आहे. ह्या मोह-राग-द्वेषभावांनी संसारी जीव कर्मरूपी रजाशी लिप्त होतात – ही बाब करणानुयोगासंबंधी सिद्धांतशास्त्रांमध्ये बंधाच्या प्रसंगी सांगितली आहे.

ज्याप्रमाणे वस्त्र लोध, तुरटी इत्यादीच्या संयोगाने कषायित (तुरट) होतो; तेव्हा ते वस्त्र सर्वांग लाल रंगाचे होतो; त्याचप्रमाणे आत्म्याच्या असंख्य प्रदेशांवर कषायाने कर्मरजाचा रंग चढतो.

तात्पर्य हे आहे की संसारी जीवांना अशाप्रकारे कर्मबंध होतो.

पंडित देवीदासजींनी ह्या गाथेचा भाव एका पद्यामध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(छप्पय)

ज्यों हररा फटकरिय लोधु तिहि कौ सुपाइ संगु।
सेत वस्त्र सो होहि अरू न गहि कैं मजीठ रंगु॥
जैसें सप्रदेसी सु जीव संसार विषैं इय।
राग दोष अरु मोहभाव करिकैं प्रकार तिय॥
ग्यानावरनादि सु अष्टविधि कर्मनि सौं सु वधै सही।
इहि भांति जिनेस्वरदेव नैं बंध कथा परगट कही॥१५०॥

जसे लोध*, हरड* व तुरटीची* संगती मिळाल्याने यांच्याद्वारे संस्कारित होऊन पांढरे वस्त्र मंजीष्टाच्या* रंगाला ग्रहण करून सर्वांग

* वस्त्र रंगविण्याकरिता उपयोगी पदार्थ

लाल होते; तसेच संसारात सप्रदेशी जीव मोह-राग-द्वेष करून ज्ञानावरणादी अष्ट कर्म सर्वांग बांधतो. अशी जिनेश्वरदेवांनी बंधाची कथा सांगितली आहे म्हणजेच बंधाचे स्वरूप सांगितले आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजी स्वामींनी ह्या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''अज्ञानी व ज्ञानी जीवाला स्वत:च्या परिणामांचे बंधन आहे, कर्मांचे बंधन नाही. ज्याप्रमाणे वस्त्राचे धागे-दोरे दाट आहेत व ते दोऱ्यावाले वस्त्र स्वत:च मंजीष्ट इत्यादींच्या वेगवेगळ्या रंगामध्ये रंगलेले आहे; तसेच स्वभावाचे श्रद्धा-ज्ञान झाले नसता अज्ञानी जीव मोह-राग-द्वेषाने रंगला आहे आणि ज्ञानी जीव स्वत:च्या स्थिरतेहून च्युत होऊन अस्थिरतेच्या राग-द्वेषांच्या रंगामध्ये रंगला आहे. अशाप्रकारे आत्मा स्वत:च्या भावबंधाने बांधलेला आहे; जडकर्मांनी नव्हे.[१]

ज्ञानी किंवा अज्ञानीचे मोजमाप बाह्य संयोगावरून होत नाही, तर अंतरंग परिणमनाने होते. कोणी म्हणतो की एक व्यक्ती पूजा-भक्ती करीत होता; परंतु खरे वस्तुस्वरूप समजल्यावर त्याने पूजा-भक्ती करणे सोडून दिले; त्यामुळे तो धार्मिक नाही; अशाप्रकारे आपण बाह्यसंयोग किंवा क्रियांनी मोजमाप करू नये; कारण धार्मिक जीव एखादे वेळेस विशेष चिंतन करीत स्वाध्यायात मग्न असतील किंवा स्वत:च्या स्वरूपाविषयी विचारांमध्ये मग्न असतील तर त्यांना पूजा-भक्तीचा विकल्प कदाचित उत्पन्न होत नाही, तो अशा वेळी अशा बाह्य संयोगांमध्येही दिसत नाही; परंतु यामुळे त्याला खऱ्या देव-गुरु-शास्त्राबद्दल आदर नाही – असे एकांताने मानू नये; कारण बाह्यक्रिया तर ज्ञानी व अज्ञानी दोघेही करू शकत नाहीत.[२]

जो विकार होतो, तो निश्चयाने तुमच्या द्रव्यात होतो; तुमच्या द्रव्यामध्ये जे काही होते, ते पराच्या निमित्ताविनाच होते – असे सांगून येथे निश्चयाचा विषय विशेष द्रव्य म्हणजेच विकारी द्रव्य आहे – असे

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३६८ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३६९

म्हटले आहे आणि समयसारामध्ये विकार तुमचे स्वरूप नाही – असे सामान्य शुद्धद्रव्याला लक्ष बनवून सामान्य शुद्धद्रव्याला निश्चयनयाचा विषय म्हटले आहे. येथे प्रवचनसारमध्ये ज्ञानाच्या मुख्यतेने कथन असल्यामुळे विकारी पर्यायीलाच जीव म्हटले आहे, कर्मकृत म्हटलेले नाही. असे पराहून भिन्न सांगून निश्चयाचा विषय विकारी द्रव्य आहे – असे म्हटले आहे; त्यामुळे योग्य अपेक्षा समजणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे आत्मा एकटाच स्वत:च्या भावाशी बंधरूप होतो – असे समजून बंधरहित शुद्धस्वभावाचे श्रद्धा-ज्ञान करावे; कारण हाच धर्म आहे.[१]''

वरील तथ्याला अत्यंत रोचक शैलीमध्ये कविवर पंडित भूधरदासजींनी पुढीलप्रमाणे व्यक्त केले आहे –

(मनहरण)

कहै एक सखी स्यानी सुन री सुबुद्धि रानी
तेरौ पति दु:खी देख लागे उर आर है।
महा अपराधी एक पुद्गल है छहों मांहि।
सोई दु:ख देत दीसै नाना परकार है॥
कहत सुबुद्धि आली कहा दोष पुद्गल कौ
अपनी ही भूल लाल होत आप ख्वार है।
खोटौ दाम आपनो सराफै कहा लगे वीर
काहू कौ न दोष मेरौ भोंदू भरतार है॥

सुबुद्धी राणीला तिची एक सखी म्हणते की हे सुबुद्धी राणी ! तू माझे म्हणणे लक्ष देऊन ऐक. तुझा पति दु:खी आहे – हे पाहून मला असे वाटते की त्याच्या हृदयात काहीतरी बोचत आहे. माझे म्हणणे तर हे आहे की लोकातील ह्या सहा द्रव्यांपैकी केवळ पुद्गलद्रव्यच महा अपराधी आहे. हे कर्मरूपी पुद्गल द्रव्यच तुझ्या पतिला अनेक प्रकारचे दु:ख देते – असे दिसून पडते.

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३७१

तिला उत्तर देताना सुबुद्धी राणी म्हणते की हे सखी ! ह्यामध्ये पुद्गलाचा काय दोष आहे ? माझा पति स्वत:च्याच चुकीने दु:खी होत आहे. जर आपलेच सोने खोटे असेल तर सराफाला दोष दिल्याने काय फायदा ? अगं ! यामध्ये दुसऱ्या कोणाचा दोष नाही; माझा स्वत:चाच पति बावळट, अज्ञानी आहे.

म्हटले देखील आहे –

कर्म विचारै कौन भूल मेरी अधिकाई।
अग्नि सहै घनघात लौह की संगति पाई॥

यामध्ये कर्मांचा काय दोष आहे, चूक तर माझीच आहे. लोखंडाची सोबत केल्याने अग्नीला सुद्धा घनाचे आघात सहन करावे लागतात.

तात्पर्य हे आहे की हा आत्मा स्वत: आपल्या चुकीनेच दु:खी आहे व आपल्या आत्म्याच्या आश्रयाने आपली चूक दुरूस्त करून सुखी देखील होऊ शकतो.

वरील संपूर्ण कथनाचा सारांश हा की असे जे म्हटले आहे की आत्मा आपल्या पर्यायस्वभावाने रागादीरूप परिणमित होत आहे; यामध्ये कर्मोदयरूप निमित्ताचा काहीही दोष नाही.

येथे हे लक्षात ठेवावे की उक्त कथनाला शुद्धद्रव्याचे निरूपण करणाऱ्या शुद्धनिश्चयनयाचे कथन म्हटले आहे. पुढील गाथेच्या टीकेमध्ये ही बाब आणखी स्पष्ट करून सांगितली जाईल.

नयांचे वर्णन करणाऱ्या ग्रंथांमध्ये अशाप्रकारचे प्रयोग आढळून येत नाहीत, अन्यत्र सुद्धा ते विरळ आहेत. ●

आत्मानुभूतीची अवस्था शुद्ध भाव आहे आणि आत्मानुभूती प्राप्त करण्याचा विकल्प शुभभाव. आत्मानुभूती प्राप्त करण्याचे विकल्प अशुभ भावांच्या अभावपूर्वकच येतात. आत्मानुभूतीच्या प्राप्तीच्या प्रयत्नाच्या काळात हिंसादी व भोगादींचे विकल्प कायम राहणे शक्य नाही. –**मैं कौन हूँ, पृष्ठ : १४**

प्रवचनसार गाथा १८९

मागील गाथांमध्ये निश्चय-व्यवहाराच्या संधीपूर्वक अनेकप्रकारे संबंधित विषयवस्तु प्रस्तुत करण्यात आली आहे; आता ह्या गाथेमध्ये हे सांगत आहेत की निश्चय-व्यवहारामध्ये कोणत्याही प्रकारचा विरोध नसून अविरोधच आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

ऐसो बंधसमासो जीवाणं णिच्छयेण णिद्दिट्ठो।
अरहंतेहिं जदीणं ववहारो अण्णहा भणिदो॥१८९॥

(हरिगीत)

यह बंध का संक्षेप जिनवरदेव ने यतिवृन्द से।
नियतनय से कहा है व्यवहार इससे अन्य है॥१८९॥

अरहंत भगवंतांनी गणधरादी आचार्यांच्या समक्ष निश्चयनयाने जीवांच्या बंधाचे संक्षिप्त विवरण वरील प्रकारे प्रस्तुत केले आहे; परंतु व्यवहार नयाचे कथन याहून भिन्न केले आहे.

अमृतचंद्रांनी ह्या गाथेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"रागपरिणामच आत्म्याचे कर्म आहे आणि तोच रागपरिणाम पुण्य-पापरूप द्वैत आहे. आत्मा रागपरिणामाचाच कर्ता आहे, त्याचेच ग्रहण करणारा आहे व त्याचाच त्याग करणारा आहे. हा शुद्धद्रव्याचे निरूपणस्वरूप निश्चयनय आहे.

जो पुद्गलपरिणाम आत्म्याचे कर्म आहे, तोच पुण्य-पापरूप द्वैत आहे. आत्मा पुद्गल परिणामाचाच कर्ता आहे, त्याला ग्रहण करणारा व सोडणारा आहे – असा जो नय आहे, तो अशुद्ध द्रव्याचे निरूपणस्वरूप व्यवहारनय आहे. हे दोन्ही नय आहेत; कारण शुद्ध व अशुद्धरूप दोन्ही प्रकारे द्रव्याची प्रतीती करविली जात आहे.

परंतु येथे निश्चयनय साधकतम असल्याने त्याचे ग्रहण केले जाते;

कारण साध्य शुद्ध असल्याने, द्रव्याच्या शुद्धत्वाचे द्योतक (प्रकाशक) असल्याने निश्चय नयच साधकतम आहे व अशुद्धत्वाचा द्योतक व्यवहार नय साधकतम नाही.''

जरी आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये ह्या गाथेचा अर्थ आचार्य अमृतचंद्रकृत तत्त्वप्रदीपिकेसमानच प्रस्तुत केला आहे; तरी देखील शेवटी त्यांनी एक प्रश्न निर्माण करून त्याचे समाधान पुढीलप्रमाणे प्रस्तुत केले आहे –

''येथे प्रश्न उत्पन्न होतो की आत्मा रागादींचा कर्ता-भोक्ता आहे –हे निश्चयनयाचे लक्षण सांगितले आहे, तो उपादेय कसा असू शकतो?

याच्या उत्तरस्वरूपी म्हणतात की आत्मा रागादींनाच करतो; द्रव्यकर्मांना करीत नाही. रागादीच बंधाचे कारण आहे, जेव्हा जीव असे जाणतो, तेव्हा राग-द्वेष इत्यादी विकल्पजाळाला सोडून रागादींच्या विनाशाकरिता निज शुद्धात्म्याची भावना करतो. त्यामुळे रागादींचा नाश होतो आणि रागादी नष्ट झाल्यावर आत्मा शुद्ध होतो; त्यामुळे परंपरेने शुद्धात्म्याचा साधक असल्यामुळे ह्या अशुद्धनयाला देखील उपचाराने शुद्धनय म्हटले आहे, निश्चयनय म्हटले आहे आणि यामुळेच त्याला उपदेय म्हटले जाते – असा अभिप्राय आहे.''

कविवर वृंदावनदासजींनी वरील गाथेचा भाव २ मनहरण, २ छप्पय, २ दोहे आणि १ चौबोला – अशा ७ पद्यांच्या माध्यमातून स्पष्ट केला आहे; ते सर्व मुळातून पठनीय आहेत.

नमुन्यादाखल एक पद्य येथे प्रस्तुत केले जात आहे –

(मनहरण)

पुण्य-पापरूप परिनाम जो हैं आतमा के,
रागादि सहित ताको आपु ही है करता।
तिन परिनामनि कौं आप ही गहन करै,
आपु ही जतन करै ऐसी रीति धरता॥
तातैं इस कथन को कथंचित् शुद्धदरवारथीक,
नय ऐसे भनी भर्महरता।

पुग्गलीक दर्व कर्म को है करतार सो,
अशुद्ध विवहारनयद्वार तैं उचरता ॥९९॥

रागादी सहित असणाऱ्या आत्म्याचे जे पुण्य-पापरूप परिणाम आहेत, त्यांचा कर्ता आत्मा स्वत:च आहे. त्या परिणामांना आत्मा स्वत:च ग्रहण करतो, धारण करतो व त्यांना कायम ठेवण्याचा प्रयत्न करतो, त्यांचा सांभाळ करतो. भ्रमाचे निवारण करणाऱ्या अरहंत भगवंतांनी वरील पद्धतीला धारण केल्याने ह्या कथनाला कथंचित शुद्धद्रव्यार्थिकनय म्हटले आहे व त्याच अरहंत भगवंतांनी असे म्हटले आहे की अशुद्ध व्यवहारनयाच्या अपेक्षेने आत्मा पौद्गलिक द्रव्यकर्मांचा कर्ता आहे.

वरील गाथेचा भाव पंडित देवीदासजींनी एका पद्यातून पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

(सवैया इकतीसा)

राग दोस मोहरूप परिनाम सौं सु बंध
जग मांहिं दयो समुझाइ पुनि पुनि कैं।
सुद्ध जीव कथन सु निश्चै नय जाके कथैं
बंध है सु निश्चै बंध लखौ एक मुनि कैं ॥
बाकी और संसारी सु जीवनि कैं द्रव्यकर्म
बंध व्यवहार सौं सु जानौं भव्य सुनि कैं।
निश्चय सु बंध उपादेय सुद्ध विवहार
हेय सो असुद्ध कह्यौ केवली की धुनि कैं॥१५१॥

जगामध्ये मोह-राग-द्वेष परिणामांनी संसारी जीव कर्मबंधनात अडकतात – हे आचार्यांनी चांगल्याप्रकारे समजावून सांगितले आहे. शुद्ध (असंयोगी) जीवाला सुद्धा बंध होतो असे अशुद्ध निश्चयनयाने म्हटले आहे. कारण संज्वलनासंबंधी रागादीरूप परिणमित झाल्याने मुनिराजांनाही बंध होतो. इतर संसारी जीवांना होणारा द्रव्यकर्माचा बंध याहून वेगळा आहे. भव्यजीवांनो! हे कथन व्यवहारनयाचे जाणावे. केवली भगवंतांच्या दिव्यध्वनीमध्ये तर म्हटले आहे की निश्चयनयाने बंध होतो, परंतु व्यवहारनयाने शुद्धव्यवहार उपादेय आहे व अशुद्धव्यवहार हेय आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी ह्या गाथेचा भाव पुढील शब्दात स्पष्ट केला आहे –

''विकाराच्या वेळी कर्म निमित्त आहे – असे जाणणे व्यवहारनय आहे. पुद्गल परिणाम आत्म्याचे कर्म आहे, याचा अर्थ हा नाही की आत्म्याचे राग-द्वेष जडकर्माच्या अवस्थेला करू शकतात; तर असा आहे की जेव्हा जीव राग-द्वेष करतो, तेव्हा कर्मबंध अवश्य होतो; त्यामुळे व्यवहाराने आत्म्याला जडकर्मांचा कर्ता म्हटले आहे.[१]

विकार स्वत:च्या पर्यायीचा अपराध आहे, हे अनारोपित कथन आहे; तसेच कर्माच्या निमित्ताने राग होतो, हे आरोपित कथन आहे – हे देखील जाणले पाहिजे.[२]

अशाप्रकारे विकारी पर्यायीला जाणणारा निश्चयनय अविकारी स्वभावाचे स्वतंत्र कथन करण्याकरिता उत्कृष्ट साधन आहे – असे यथार्थ जाणून शुद्धस्वभावाकडे जाणेच कार्यकारी आहे.[३]

राग परिणाम आणि वीतराग परिणाम आत्मा स्वतंत्रपणे करतो. तसेच शुभ-अशुभ परिणामांना करणारा देखील आत्मा स्वत:च आहे. जडामुळे किंवा परपदार्थांमुळे विकार होत नाही. निगोदामध्येही जीव स्वत:च्या अज्ञानामुळे राहतो; तीव्र कर्मोदयामुळे नव्हे. अकराव्या गुणस्थानातून पतित होऊन जीव निम्न गुणस्थानात येतो, ते देखील स्वत:च्या पुरुषार्थाच्या मंदतेमुळेच येतो, कर्माच्या उदयामुळे नव्हे. यावरून हे सिद्ध होते की जीव विकारी परिणामांना स्वतंत्रपणे करतो.[४]

पर्यायीला पराधीन मानणाऱ्या जीवाला द्रव्यसामान्याचे खरे ज्ञान होत नाही. अहो ! जो जीव स्वत:च्या पर्यायीचे कारण पराला मानतो, तो आपला उपयोग परावरून आत्म्याकडे कसा वळवू शकतो ? विकारी पर्याय, अविकारी अपूर्ण पर्याय, मोक्षमार्ग आणि मोक्ष – हे सर्व विशेष आहेत, अंश आहेत. अंशाला पराधीन मानणारा अंशीला स्वतंत्र मानू

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३७४ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३७४-३७५
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३७६ ४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३७६-३७७

शकत नाही. ज्याला विशेषाचे खरे ज्ञान नाही, तो सामान्य वस्तुस्वभावाला जाणू शकत नाही.[१]

पर्यायीला स्वतंत्र मानणाराच पर्यायवानाकडे दृष्टी करू शकतो; त्यामुळे निश्चयनयाला उपादेय म्हटले आहे. निश्चयनय विशेषाचे स्वतंत्र ज्ञान करवितो.[२]

निश्चयनय शुद्धत्वाचा प्रकाशक आहे आणि व्यवहारनय अशुद्धत्वाचा प्रकाशक आहे. पर्याय अंशाला स्वतंत्र स्वीकार करणाऱ्याची दृष्टी द्रव्याकडे वळते; त्यामुळे पर्यायीला स्वतंत्र सांगणारा निश्चयनयाला उत्कृष्ट साधक असल्यामुळे उपादेय म्हटले आहे. शुद्ध आत्मा साध्य आहे आणि निश्चयनय त्याचा साधक आहे.

अशाप्रकारे विकार स्वतंत्रपण होतो – असे ज्ञान करविणारा नय शुद्धनयाकडे जातो, त्यामुळे त्याला द्रव्याच्या शुद्धत्वाचा प्रकाशक म्हटले आहे. निश्चयनयच साधकतम आहे. संयोग आणि कर्माचे स्वरूप सांगणारा व्यवहारनय अशुद्धत्वाचे द्योतक आहे. तो उपयोग पराकडे वळवितो आणि परलक्ष्याने विकार उत्पन्न होतो, त्यामुळे व्यवहारनय साधकतम नाही. अशाप्रकारे व्यवहारनयाला हेय समजून निश्चयनयाला यथार्थ जाणून द्रव्यसामान्याकडे जाऊन खरे श्रद्धान, ज्ञान करणेच निश्चयनयाला जाणण्याचे फळ आहे.[३]''

एक बाब विशेष लक्ष्य देण्यायोग्य आहे की येथे शुद्धतेचा अर्थ परद्रव्यांहून भिन्नता आणि अशुद्धतेचा अर्थ परद्रव्यांहून अभिन्नता आहे.

यामुळेच येथे आत्म्याला रागादी भावांचा कर्ता शुद्धनिश्चयनयाने म्हटले आहे; परंतु इतरत्र सर्वत्रच आत्म्याला रागादींचा कर्ता अशुद्धनिश्चयनयाने म्हटले गेले आहे.

आचार्य जयसेनांचे लक्ष्य देखील याकडे गेले होते. यामुळेच त्यांनी परंपरेने शुद्धात्म्याचा साधक असल्याने अशुद्धनयाला देखील उपचाराने शुद्धनय म्हटले आहे आणि यामुळेच त्याला उपादेय म्हटले आहे –

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३७९
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३८०
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३८१

असे म्हणून त्यांनी समाधान करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

आचार्य जयसेनांच्या वरील कथनामध्ये आलेल्या **'परंपरेने शुद्धात्म्याचा साधक व अशुद्धनयाला सुद्धा उपचाराने शुद्धनय** म्हटले जाते व यामुळेच तो उपादेय आहे' – हे वाक्य लक्ष देण्यायोग्य आहे; कारण यामध्ये अत्यंत स्पष्ट शब्दात हे सांगितले की आत्म्याला रागादींचा कर्ता म्हणणारा नय मुळात तर अशुद्धनिश्चयनयच आहे; परंतु त्याला येथे प्रयोजनवश उपचाराने शुद्धनिश्चयनय म्हटले आहे.

तसेच येथे याला परंपरेनेच शुद्धात्म्याचा साधक म्हटले आहे; साक्षात साधक म्हटलेले नाही.

येथे 'आत्मा रागादीरूप आहे, रागादींचा स्वामी आहे व रागादींचा कर्ता-भोक्ता आहे' – हे शुद्धनिश्चयनयाचे कथन आहे. असे कथन करून हे सांगू इच्छितात की आत्मा स्वत: रागादीरूप परिणमित होतो, रागादींचा स्वामी बनून परिणमित होतो व रागादींचे कर्तृत्व-भोक्तृत्वरूप होतो. हे सर्व आत्म्याच्या पर्यायगत योग्यतेमुळे स्वत:नेच होते, परामुळे होत नाही, कर्मादीमुळे देखील होत नाही.

याचे कारण परद्रव्य आहे – असे जर स्वीकारले तर मग आत्मा यांचा कर्ता-भोक्ता देखील राहणार नाही; कारण **स्वतंत्र: कर्ता** – कर्ता त्यालाच म्हणतात जो आपल्या परिणमनामध्ये स्वतंत्र आहे. पराहून निरपेक्षताच याची शुद्धता आहे, स्वतंत्रता आहे. हे सांगण्यासाठीच याला शुद्धनिश्चयनयाचे कथन म्हटले आहे.

ज्या द्रव्याची जी परिणती आहे, त्या परिणतीला त्याच द्रव्याची म्हणणे शुद्धनिश्चयनय आहे आणि त्या परिणतीला इतर द्रव्याची म्हणणे अशुद्धनिश्चयनय म्हणजे व्यवहारनय आहे. ह्या परिभाषेनुसार रागादीभाव जीवद्रव्याची परिणती आहे; म्हणून तिला जीवद्रव्याची परिणती म्हणणेच सत्य आहे, त्यामुळे हे निश्चयनयाचे कथन आहे आणि पराहून भिन्नता आणि स्वत:हून अभिन्नताच शुद्धता आहे; त्यामुळे हे कथन शुद्धनयाचे आहे; अशाप्रकारे रागादींचा स्वामी, कर्ता-भोक्ता आत्मा आहे – हे शुद्धनिश्चयनयाचे कथन आहे. ●

प्रवचनसार गाथा १९०-१९१

मागील गाथेत निश्चय व व्यवहारामध्ये अविरोध दर्शविल्यानंतर आता ह्या गाथांमध्ये अशुद्धनयाने अशुद्धात्मा आणि शुद्धनयाने शुद्धात्म्याची प्राप्ती होते – हे सांगत आहेत.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

ण च यदि जो दु ममत्तिं अहं ममेदं ति देहदविणेसु।
सो सामण्णं चत्ता पडिवण्णो होदि उम्मग्गं॥१९०॥
णाहं होमि परेसिं ण मे परे संति णाणमहमेक्को।
इदि जो झायदि झाणे सो अप्पाणं हवदि झादा॥१९१॥

(हरिगीत)

तन-धनादि में 'मैं हूँ यह' अथवा 'ये मेरे हैं' सही।
ममता न छोड़े वह श्रमण उनमार्गी जिनवर कहें॥१९०॥
पर का नहीं ना मेरे पर मैं एक ही ज्ञानात्मा।
जो ध्यान में इस भाँति ध्यावे है वही शुद्धात्मा॥१९१॥

जो देह, धनादीकांमध्ये 'मी हा आहे व हा माझा आहे' – अशा ममत्वाला सोडत नाही; तो श्रामण्याला सोडून उन्मार्गाचा आश्रय घेतो.

'मी पराचा नाही व पर माझे नाहीत, मी एक ज्ञान आहे, ज्ञानस्वरूप आहे' – जो असे ध्यान करतो, तो ध्याता ध्यानाच्या काळात आत्मा होतो.

आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''शुद्धद्रव्यनिरूपणात्मक निश्चनयाहून निरपेक्ष राहून अशुद्धद्रव्य निरूपणात्मक व्यवहारनयामध्ये मोहित जो आत्मा 'मी हा आहे व हे माझे आहे' – अशा आत्मीयतेमुळे देह व धनादी परद्रव्यातील ममत्व सोडत नाही; तो आत्मा शुद्धपरिणतीरूप श्रामण्य नावाच्या मार्गाला दुरूनच सोडून अशुद्धात्मपरिणतीरूप उन्मार्गाचा आश्रय घेतो.

यावरून निश्चित होते की अशुद्धनयाने अशुद्धात्म्याचीच प्राप्ती होते.

केवळ आपल्या विषयात प्रवर्तमान अशुद्धद्रव्यनिरूपणात्मक व्यवहारनयामध्ये अविरोधपणे मध्यस्थ राहून शुद्धद्रव्यनिरूपणात्मक निश्चयनयाद्वारे ज्याने मोह दूर केला आहे, असा तो आत्मा 'मी पराचा नाही, पर माझे नाही' – अशाप्रकारे स्व-पराचा आपसातील स्व-स्वामी संबंध सोडून 'मी केवळ शुद्ध ज्ञानच आहे' – असे अनात्म्याला सोडून आत्म्यालाच आत्मरूपे ग्रहण करून परद्रव्याहून भिन्नत्वामुळे केवळ आत्म्यातच चिंतवनाला मग्न करतो; तो एकाग्रचिंतानिरोधक आत्मा त्या एकाग्रचिंतानिरोधाच्या वेळी वास्तविक शुद्धात्माच होतो.

यावरून हे निश्चित होते की शुद्धनयानेच शुद्धात्म्याची प्राप्ती होते.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये या गाथांचा भाव समजाविताना शंभर टक्के आचार्य अमृतचंद्रांचेच अनुकरण केलेले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथांचा भाव एक-एक मनहरण आणि एक-एक दोहा – अशाप्रकारे चार पद्यांच्या माध्यमातून प्रस्तुत केला आहे; त्यापैकी मनहरण पद्य पुढीलप्रमाणे आहे –

(मनहरण)

जाकी मति मैली ऐसी फैली जो शरीर पर,
दर्व ही को कहै की हमारो यही रूप है।
तथा यह मेरो ऐसो चेरो भयो मोह ही को,
छोड़ै न ममत्वबुद्धि धरै दौरधूप है॥
सो तो साम्यरसरूप शुद्ध मुनिपद ताको,
त्यागि के कुमारग में चलत कुरूप है।
ताको ज्ञानानंदकंद शुद्ध निरद्वंद सुख,
मिलै न कदापि वह परै भवकूप है॥१०५॥

ज्या जीवाची मलिन मति शरीररूपी परद्रव्यावर अशाप्रकारे पसरली आहे की तो म्हणतो की हे शरीर आमचेच रूप आहे. हा मोहाचा असा दास आहे की शरीराचे अपनत्व सोडतच नाही आणि निरंतर त्याच्याच सेवेमध्ये संलग्न असतो – अशी मान्यता आणि परिणतीवाले जीव साम्यरसरूप शुद्ध मुनिपदाला सोडून कुमार्गाला लागतो. अशा जीवांना ज्ञानानंदकंद शुद्धात्म्याच्या आश्रयाने उत्पन्न निर्द्वंद सुख कधीही मिळत नाही आणि ते संसाररूपी विहीरीमध्ये पडून राहतात.

(मनहरण)

मैं जो शुद्ध बुद्ध चिनमूरत दरव सो तौ,
परदर्वनि को न भयो हों काहू काल में।
देहादिक परदर्व मेरे ये कदापि नाहिं,
ये तौ निजसत्ता ही में रहैं सब हाल में॥
मैं तो एक ज्ञानपिंड अखंड परमजोत,
निर्विकल्प चिदाकार चिदानंद चाल में।
ऐसे ध्यानमाहिं जो सुध्यावत स्वरूप वृन्द,
सोई होत आतमा को ध्याता वर भाल में॥१०७॥

जो मी शुद्ध-बुद्ध चैतन्यमूर्ती द्रव्य आहे, ते तर कधीही, कोणत्याही काळी परद्रव्याचे झाले नाही व हे देहादिक परद्रव्य कधी माझे झालेले नाहीत; हे तर सर्व परिस्थितीत निजसत्तेतच राहिले आहेत. मी तर एक ज्ञानाचा पिंड, अखंड, परमज्योतीस्वरूप, निर्विकल्प, चिदाकार चिदानंद स्वभावात राहणारे चेतन द्रव्य आहे – असे जो व्यक्ती स्वरूपाचे ध्यान करतात; वृंदावन कवी म्हणतात की ते व्यक्ती आत्म्याचे ध्याता असतात.

पंडित देवीदासजींनी ह्या गाथांचा भाव दोन पद्यांच्या माध्यमातून खालीलप्रमाणे स्पष्ट केलेला आहे –

(चौपाई)

सरीरादि पररूप सु मेरो, मैं पर सरीरादि तिनि कैरौ।
यह ममकार बुद्धि तसु हो है मुनि नांहीं कुमारगी सो है॥१५२॥

'पररूप शरीरादी माझे आहेत आणि मी शरीरादीरूप आहे' – ज्यांना अशी ममत्वबुद्धी असते; ते मुनि, मुनि नसून कुमार्गी आहेत.

(सवैया इकतीसा)

मैं हौं सुद्धजीव सरीरादि पर कौ सु नांहीं
सरीरादि परद्रव्य सो न पुनि मेरौ है।
सवै परभाव तैं सुभिन्न परमात्मा हौं
एक ग्यानभावरूप मैं सु हम केरौ है॥
याही भांति ध्यान के समैं सु ममिता मिटाई
आप ही मैं आपनौं सुभाव तिनि हेरौ है।
सोइ निज आपनैं सु ध्यान के करैया आपु
परमार्थ तिन्हि तैं महा सु अति नेरौ है॥१५३॥

'मी स्वत: शुद्धजीव आहे, शरीरादी परपदार्थांचा मी नाही आणि शरीरादी परद्रव्य देखील माझे नाहीत.' अशाप्रकारे मी सर्व परभावांहून भिन्न एक ज्ञानभावरूप परमात्मा आहे व तोच ज्ञानस्वभाव माझा आहे. अशाप्रकारे ध्यानाच्या समयी ज्या जीवाने ममता सोडून स्वत:मध्येच आपल्या स्वभावाला पाहिले आहे, शोधले आहे; तो जीवच स्वत:मध्ये आपले ध्यान करणारा आहे आणि त्याला परमार्थ अत्यंत निकट आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजी स्वामींनी या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''आत्मा स्वत:च्या अपराधामुळे ज्ञानस्वभावाला न जाणता स्वत:च परपदार्थांबद्दल मोह-राग-द्वेष परिणाम करतो, कोण्या बाह्य संयोग किंवा निमित्तामुळे करीत नाही. ज्ञानाच्या मुख्यतेने केलेल्या कथनामध्ये आत्मा स्वत:च्या राग-द्वेषाचा ग्रहण-त्याग करतो, परंतु तो परपदार्थाचा ग्रहण-त्याग करीत नाही. अशाप्रकारे स्वत:च्या विकारी परिणामाचा कर्ता स्वत: आत्मा आहे – असे सांगणाऱ्या नयाला येथे शुद्धद्रव्याचे निरूपणस्वरूप निश्चयनय म्हटले आहे. उदयभाव स्वतत्त्व आहे – असे सांगणारा निश्चयनय आहे.[१]

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३८३

येथे म्हटले आहे की आत्मा शुद्ध द्रव्याच्या निरूपणस्वरूप निश्चयनयाला न जाणता स्वत:च्या अपराधाने स्वत:ला न मानता पराला मानतो, तो निश्चयनयाहून दूर आहे.[१]

स्वत:चे परिणाम स्वत:मुळे होतात आणि परपदार्थांचे परिणाम परामुळे होतात – असे न मानता स्वत:चे परिणाम परामुळे होतात आणि पराचे परिणाम माझ्यामुळे होतात – असे जो जीव मानतो, तो जीव निश्चयनयापासून अजाण राहतो आणि व्यवहारनयामध्ये मोह उत्पन्न करतो.[२]

बंधो ! विकारी परिणाम तू स्वतंत्रपणे करतोस – एकदा असे नक्की तर कर.[३]

राग किंवा वैराग्याचे परिणाम तू स्वतंत्रपणे करतोस – असे सांगून तुझ्या पर्यायीला तुझ्या पर्यायवानाकडे म्हणजेच स्वभावाकडे घेऊन जातात; संयोग व निमित्ताकडे घेऊन जात नाहीत.[४]

जेव्हा जीवाचे परिणाम स्वतंत्र आहेत, तर परिणामी आत्मपदार्थ देखील स्वतंत्र आहे – असे आमच्या सांगण्याचे तात्पर्य आहे.[५]

अशाप्रकारे स्वज्ञेय व परज्ञेयांना स्वतंत्रपणे जाणून, विकार स्वत:मुळे होतो – असे जाणून, त्रिकाळी स्वभावाचे श्रद्धा-ज्ञान केले पाहिजे आणि नंतर विशेष स्थिरता झाल्यानंतर चारित्राची वीतराग शुद्ध परिणती प्रगट केली पाहिजे; परंतु अज्ञानी जीव पराच्या क्रियेचा कर्ता स्वत:ला मानतो. परवस्तुच्या ग्रहण-त्यागामध्ये धर्म-अधर्माची कल्पना करतो.[६]

अशाप्रकारे निश्चित होते की अशुद्धनयाने म्हणजे संयोगदृष्टीने संसाराची प्राप्ती होते.[७]

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३८४
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३८५
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३८७
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३८७
५) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३८८
६) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३८८
५) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३८९

अशाप्रकारे ह्या गाथेमध्ये आचार्य भगवंतांच्या कथनाचे तात्पर्य असे आहे की जो जीव अशुद्धनयाचे कथन समजत नाही आणि संयोगाने लाभ-हानी मानतो, त्याला अशुद्ध आत्म्याची प्राप्ती होते. त्यामुळे हे ज़ीवा ! तू असे खोटे ज्ञान न करता परद्रव्याच्या ग्रहण-त्यागाने रहित आपल्या आत्म्याचे श्रद्धा-ज्ञान कर, तर तुला धर्मदशेची प्राप्ती होईल.[१]

शुद्ध द्रव्याचे निरूपण करणारा निश्चयनय सांगतो की जीवामध्ये उत्पन्न झालेले विकारी परिणाम जीवाचे आहेत. ते परिणाम कोण्या कर्माने किंवा परद्रव्याने उत्पन्न करविलेले नाहीत. 'शुद्ध द्रव्या'चा अर्थ येथे 'पराहून भिन्न' – असा समजावा.[२]

स्वभावाला समोर ठेवून ध्यान करणेच शुद्धात्म्याच्या प्राप्तीचे कारण आहे. धर्मी जीवाचा भाव कसा असतो, त्याचे ध्यान कसे असते ? त्याची चर्चा करीत आहेत. प्रथम तर तो परपदार्थांची रुची सोडतो. परपदार्थ, निमित्त, कर्म व विकाराबरोबर स्व-स्वामी संबंध मानत नाही. पुण्य-पाप रहित आत्म्याला आत्मापणे ग्रहण करतो. परद्रव्याकडे तो लक्ष देत नाही.

परपदार्थ, विकारादींना गौण करून, केवळ आत्म्याला समोर करून आपले परिणाम स्थिर करून आत्म्यात लीन होणे ध्यान आहे. परपदार्थ, क्षेत्र, संहनन, देव-गुरु-शास्त्र लाभ-हानीचे कारण नाहीत. महाव्रतादींचे परिणाम विकार आहेत, त्यांची दृष्टी सोडून स्वमध्ये लीन होणेच शुद्धात्मा आहे. परसन्मुख दृष्टीवाल्या जीवाला शुद्धात्मा म्हटले नाही.

त्यामुळे शुद्धनयानेच शुद्धात्म्याची प्राप्ती होते म्हणजेच धर्म होतो.[३]''

वरील संपूर्ण कथनाचा सारांश हा आहे की जो रुपये-पैसे, धन-धान्य, घर, देश, गांव, इत्यादीमध्ये एकत्वबुद्धी, ममत्वबुद्धी, कर्तृत्वबुद्धी आणि भोक्तृत्वबुद्धी सोडत नाही, तो श्रामण्याला (मुनिपणाला) सोडून

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३८९ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३७४-३९२
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ९६

उन्मार्गाचा आश्रय घेतो आणि उन्मार्गी होतो. तसेच जे स्त्री-पुत्रादी, धन-धान्य, रुपये-पैसे इत्यादी परपदार्थांबद्दल हे माझे नाहीत आणि मी यांचा नाही; हे माझे स्वामी नाहीत आणि मी यांचा स्वामी नाही, मी यांचा कर्ता-भोक्ता नाही आणि हे माझे कर्ता-भोक्ता नाहीत – अशाप्रकारे परामध्ये एकत्व-ममत्व आणि कर्तृत्व-भोक्तृत्व बुद्धी सोडून 'मी तर एक शुद्धज्ञानमय भावच आहे' – अशाप्रकारे स्वत:मध्ये आपलेपण स्थापित करतात, ते आपला उपयोग पराद्रव्यावरून काढून स्वमध्ये लीन करतात आणि सन्मार्गी होतात, शुद्धात्मा बनतात.

विशेष लक्ष देण्यायोग्य बाब ही आहे की येथे मागील गाथेनुसार राग-द्वेष परिणामांना स्वच्या मर्यादेमध्ये सामिल करून त्यांचा स्वामी, कर्ता-भोक्तापणाला शुद्धद्रव्याचे निरूपण करणारा निश्चयनय म्हटले आहे आणि परद्रव्यांचे स्वामित्व व कर्तृत्व-भोक्तृत्वाला अशुद्धद्रव्याचे निरूपण करणारा व्यवहारनय म्हटले आहे.

हे तर पूर्वीच म्हटले होते की असे कथन खूप कमी आहेत आणि हे कथन नयाच्या मूळ धारेपासून काही वेगळेच आहेत. ●

एकाच भूमिकेतील ज्ञानींना संयोग व संयोगी भावांमध्ये महान अंतर असू शकते. कोठे क्षायिक सम्यग्दृष्टी सौधर्म इंद्र आणि कोठे सवार्थसिद्धीचे क्षायिक सम्यग्दृष्टी अहमिंद्र. सौधर्म इंद्र जन्मकल्याणकामध्ये येऊन नाभिरायांच्या दरबारात तांडव नृत्य करतो आणि सर्वार्थसिद्धीचे अहमिंद्र दीक्षा कल्याणक, ज्ञानकल्याणक व मोक्षकल्याणकामध्येही येत नाहीत, दिव्यध्वनी ऐकण्याकरिता सुद्धा येत नाहीत.

संयोग आणि संयोगी भावांमध्ये महान अंतर असून देखील दोहोंची भूमिका एकच आहे, समान आहे. त्यामुळे संयोगी भावांच्या आधारे राग वा वैराग्याचा निर्णय करणे योग्य नाही, ज्ञानी-अज्ञानीचा निर्णय देखील संयोग व संयोगी भावांच्या आधारे केला जाऊ शकत नाही.

– पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव, पृष्ठ : ३९

प्रवचनसार गाथा १९२-१९३

'अशुद्धनयाने अशुद्धात्म्याची व शुद्धनयाने शुद्धात्म्याची प्राप्ती होते' – मागील गाथेत हे स्पष्ट केल्यानंतर आता ह्या गाथांमध्ये सांगत आहेत की ध्रुव असल्यामुळे केवळ शुद्धात्माच प्राप्त करण्यायोग्य आहे आणि याशिवाय देहादी सर्व पदार्थ अध्रुव असल्यामळे प्राप्त करण्यायोग्य नाहीत.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

एवं णाणप्पाणं दंसणभूदं अदिंदियमहत्थं।
धुवमचलमणालंबं मण्णेऽहं अप्पगं सुद्धं।।१९२।।
देहा वा दविणा वा सुहदुक्खा वाध सत्तुमित्तजणा।
जीवस्स ण संति धुवा धुवोवओगप्पगो अप्पा।।१९३।।

(हरिगीत)

इसतरह मैं आतमा को ज्ञानमय दर्शनमयी।
ध्रुव अचल अवलंबन रहित इन्द्रियरहित शुध मानता।।१९२।।
अरि-मित्रजन धन्य-धान्य सुख-दुख देह कुछ भी ध्रुव नहीं।
इस जीव के ध्रुव एक ही उपयोगमय यह आतमा।।१९३।।

अशाप्रकारे मी आत्म्याला ज्ञानात्मक, दर्शनभूत, अतींद्रिय महापदार्थ, ध्रुव, अचल, निरालंब आणि शुद्ध मानतो.

जीवाचे शरीर, धन, सुख-दु:ख किंवा शत्रु-मित्र – हे सर्व ध्रुव नाहीत, ध्रुव तर केवळ उपयोगात्मक आत्माच आहे.

वरील गाथांचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचद्रांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेला आहे –

''शुद्धात्मा सत आणि अहेतुक असल्यामुळे अनादी-अनंत आणि स्वत:सिद्ध आहे; त्यामुळे ह्या आत्म्याकरिता शुद्धात्माच ध्रुव आहे, इतर काहीही ध्रुव नाही.

परद्रव्यांहून भिन्नत्व आणि स्वधर्मांहून अभिन्नत्वच आत्म्याचे एकत्व आहे आणि ह्या एकत्वामुळेच आत्मा शुद्ध आहे.

ज्ञानात्मक, दर्शनभूत, अतींद्रिय महापदार्थ, अचल आणि निरालंबपणामुळे आत्मा एक आहे.

प्रतिनियत स्पर्श, रस, गंध, वर्णरूप गुण आणि शब्दरूप पर्यायींना ग्रहण करणारी अनेक इंद्रिये आणि शब्दरूप पर्यायींना जाणणाऱ्या महापदार्थरूप आत्म्याचे इंद्रियात्मक परद्रव्यांहून भिन्नत्व आणि स्पर्शादींना जाणणाऱ्या ज्ञानरूप स्वधर्मांहून अभिन्नत्वच एकत्व आहे.

प्रतिक्षण नष्ट होणाऱ्या ज्ञानपर्यायींना ग्रहण करणे व सोडण्याचा अभाव असल्याने अचल आत्म्याला ज्ञेयपर्यायरूप परद्रव्याहून विभाग अर्थात भिन्नत्व व तन्निमित्तक ज्ञानस्वरूप स्वधर्मांहून अविभाग म्हणजे अभिन्नत्व असल्याने एकत्व आहे.

नित्यरूपे प्रवर्तमान ज्ञेयद्रव्यांच्या अवलंबनाचा अभाव असल्याने जो निरालंब आहे – अशा आत्म्याचे ज्ञेयरूपे परद्रव्यांहून भिन्नत्व आणि तन्निमित्तिक ज्ञानस्वरूप स्वधर्मांहून अभिन्नत्व असल्याने एकत्व आहे.

अशाप्रकारे एकत्वस्वरूप आत्मा शुद्ध आहे; कारण चैतन्यमात्रग्राही शुद्धनय आत्म्याला शुद्धच निरूपित करतो. एखाद्या पथिकाच्या शारीरिक अंगांच्या संसर्गात येणाऱ्या मार्गावरील अनेक वृक्षांच्या सावलीसमान जे अध्रुव पदार्थ आहेत; त्यांच्याशी ह्या आत्म्याला काय प्रयोजन आहे ?

परद्रव्यांहून अभिन्न व परद्रव्यांद्वारे उपरक्त होणाऱ्या स्वधर्मांहून भिन्न असल्यामुळे, आत्म्याव्यतिरिक्त असा कोणताही अन्य पदार्थ, जो आत्म्याच्या अशुद्धपणाला कारण असेल, तो ध्रुव नाही; कारण ते असत् व हेतुमान असल्याने आदि-अंतवाला व परत: सिद्ध आहे; ध्रुव तर केवळ उपयोगात्मक शुद्ध आत्माच आहे.

असे असल्याने उपलभ्यमान अध्रुव शरीरादी उपलब्ध झाल्यावरही मी त्यांना उपलब्ध करीत नाही व ध्रुव शुद्धात्म्याला उपलब्ध करतो.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये या गाथांचा भाव सामान्यपणेच स्पष्ट केला आहे. त्याच्या स्पष्टीकरणामध्ये नवीन असे काही नाही.

कविवर पंडित वृंदावनदासजींनी ह्या गाथा व त्यांच्या टीकेचा भाव २ मनहरण व ४ दोहे अशाप्रकारे एकूण ६ पद्यांच्या माध्यमातून प्रस्तुत केला आहे, तो मुळातून वाचण्यायोग्य आहे. नमुन्यादाखल ३ दोहे प्रस्तुत आहेत –

(दोहा)

ज्ञानरूप दरसनमई, अतिइन्द्री ध्रुव धार।
महा अरथ पुनि अचलवर, अनालंब अविकार॥११०॥
सात विशेषनि सहित इमि, लख्यौ आतमाराम।
ताही शुद्ध सरूप में, हम कीनों विसराम॥१११॥
तन-धन सुख-दुख मित्र अरि, अधुव भने जिनभूप।
ध्रौव निजातम ताहि गहु, जो उपयोगसरूप॥११४॥

ज्ञानरूप, दर्शनमय, अतींद्रिय महापदार्थ, ध्रुव, अचल, अविकारी (शुद्ध) व अनावलंबी – ह्या सात विशेषणांनी सहित आत्म्याला पहा; आम्ही तर त्याच आत्म्याच्या शुद्धस्वरूपामध्ये विश्राम केला आहे.

शरीर, धन, सुख-दुःख, मित्र-शत्रु – ह्या सर्वांना जिनेंद्र भगवंतांनी अध्रुव म्हटले आहे. उपयोगस्वरूपी आपला आत्माच ध्रुव आहे; त्यामुळे त्याचाच आश्रय ग्रहण करा.

पंडित देवीदासजींनी ह्या गाथांचा भाव एकेका पद्यांच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(सवैया इकतीसा)

निश्चल सुभाव ग्यान दर्शन मई प्रधान
सुद्धता समेत सौ प्रकार एक मानौं हौं।

आपनैं अतिंद्रिय सुभाव करिकैं समस्त
वस्तु कौ महा सु अर्थ ग्याइक बखानौं हौं॥
अनालंब अचल अनोपम अबाधावंत
एक सौ प्रवर्तन त्रिकाल जाकौ जानौं हौं।
मैं हौं भेदग्यानी है हमारे यानि सानी मैं सु
याही भांति जीव कौ स्वरूप हिये आनौं हौं॥१५४॥

मुख्यपणे माझा ज्ञान-दर्शनमय निश्चल स्वभाव शुद्धतेने पूर्ण आहे. मी त्याला सर्व प्रकारे एक मानतो. मी आपल्या अतींद्रिय स्वभावाद्वारे समस्त वस्तुमध्ये आपल्या ज्ञायकस्वरूपी आत्म्याला एक महान पदार्थ म्हणतो. ज्याचे प्रवर्तन त्रिकाळ समान आहे – असा मी स्वत:ला अनावलंबी, अचल, अनुपम आणि अबाधित महापदार्थ जाणतो. मी भेदविज्ञानी आहे, माझी बरोबरी करणारा कोणताही पदार्थ नाही. मी आपल्या हृदयामध्ये जीवाचे हेच स्वरूप धारण केले आहे.

(छप्पय)

औदारिक आदिक सरीर जे पंच लहिज्जई।
धन-धान्यादिक भेद परिग्रह के सु कहिज्जई॥
विषय इष्ट अनइष्ट जे सु इनि इंद्रिनि केरे।
सत्रु मित्र आदिक सु और जग मैं बहु तेरे॥
एते समस्त संजोग जे विनासीक जिय के न हुअ।
दरसन सुग्यान मय सुद्धता सहित जीव अविचल सु धुअ॥१५५॥

पाच प्रकारचे औदारिक इत्यादी शरीर, धन-धान्यादी जेवढ्या प्रकारचा परिग्रह आहे व इंद्रियांचे इष्ट-अनिष्ट विषय व शत्रु-मित्र इत्यादी अनेक प्रकारचे जे संयोग जगात आहेत, ते सर्व संयोग विनाशिक आहेत व जीवाला ते कधीही प्राप्त झाले नाहीत; कारण जीव तर दर्शन-ज्ञानमय, शुद्धतासहित, अविचल व ध्रुव पदार्थ आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजी स्वामींनी या गाथांचा आणि त्यांच्या टीकेचा भाव खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''शुद्ध आत्मा सत् व अहेतुक आहे, त्याला दुसऱ्या पदार्थांची गरज नाही. जर आत्म्याला कोणी बनविले असेल तर त्याची नित्यता शक्य होत नाही व जे नित्य आहे, त्याची सुरूवात होऊ शकत नाही.[१]

शुद्धचैतन्यतत्त्व अनादी-अनंत आहे. ते स्वत:मुळे आहे, इतरामुळे नव्हे. त्याला बनविणारा कोणी नाही; त्यामुळे आत्मा अनादी-अनंत स्वत:सिद्ध पदार्थ आहे.

शुद्धात्माच ध्रुव आहे, त्यामुळे केवळ तोच आश्रय घेण्यायोग्य आहे.

१) कुटुंब, पैसे, देव-गुरु-शास्त्र, शरीर, कर्म इत्यादी ह्या आत्म्याच्या अपेक्षेने ध्रुव नाहीत. संयोग बदलून जातात, त्यामुळे ते अध्रुव आहेत, त्यांचा आश्रय घेतल्याने धर्म होत नाही.

२) शुभाशुभभाव प्रतिसमय होतात, ते अध्रुव आहेत. विकल्प देखील शरणभूत नाही. व्यवहाररत्नत्रय सुद्धा अध्रुव आहे, त्यामुळे त्यांच्या आश्रयाने धर्म होत नाही.

३) नित्य, स्वत:सिद्ध, अकारणीय आत्माच ध्रुव आहे, इतर कोणी ध्रुव नाही. केवळ तो ध्रुव आत्माच आश्रय घेण्यायोग्य आहे.[२]

आत्मा ध्रुव, शुद्ध, चैतन्य आहे – अशी श्रद्धा झाल्यावर जे स्व-परप्रकाशक ज्ञान विकसित झाले, त्यापैकी शरीर व संयोगांचे ज्ञान खरे ज्ञान आहे; परंतु पराशी तन्मय झालेले एकत्वबुद्धीसहित केवळ परप्रकाशक ज्ञान मिथ्या आहे.[३]

आत्म्याचा परद्रव्याशी विभाग आणि स्वधर्माशी अविभाग असल्यामुळे एकता आहे. त्यांची एकता पाच कारणांमुळे आहे –

१) आत्मा ज्ञानस्वभावी आहे, राग व पराचे काही करणे त्याचे स्वरूप नाही, त्यामुळे एक आहे.

२) आत्मा दर्शनस्वभावी आहे, त्यामुळे एक आहे.

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३९७
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३९८
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ३९९

३) इंद्रियांचे अवलंबन न घेता जाणतो, त्यामुळे अतींद्रिय महापदार्थपणामुळे एक आहे.

४) दुसरे पदार्थ चलायमान आहेत, शुभाशुभभाव देखील चल आहेत. आत्मा एक अचल आहे, म्हणून अचलपणामुळे एक आहे.

५) निमित्तांचे अवलंबन नाही, त्यामुळे निरालंबपणामुळे एक आहे.[१]

आत्मा एक आहे, त्यामुळे शुद्ध आहे आणि तोच ध्रुव आहे. ध्रुव आत्माच शरणभूत आहे, त्याद्वारेच धर्म प्रगट होतो.[२]

आत्मा ज्ञानात्मकपणामुळे, दर्शनभूतपणामुळे, अतींद्रिय महापदार्थपणामुळे, अचलपणामुळे आणि निरालंबपणामुळे एक आहे. एकतेमुळे आत्मा शुद्ध आहे आणि शुद्धताच ध्रुव आहे. ध्रुव आत्मा सम्यग्दर्शनाचे ध्येय आहे, त्याचे श्रद्धान-ज्ञान केल्याने निर्मल पर्याय प्रगट होते. त्यामुळे ध्रुव आत्माच अनुभव करण्यायोग्य आहे. बायको, कुटुंब व पैसा आत्म्याला शरणभूत नाहीत, देव-गुरु-शास्त्र देखील शरणभूत नाहीत; त्यामुळे त्यांचे अवलंबन सोडून, स्वपदार्थाचे अवलंबन घेऊन आत्म्याशी एकत्वाचा अनुभव करणेच मोक्षमार्ग आहे. पराहून भिन्न होऊन स्वमध्ये एकाग्र होणेच शुद्धता आहे आणि तोच ध्रुव आहे व ध्रुव आत्माच सम्यग्दर्शनाचा विषय आहे.[३]

निगोदापासून पंचपरमेष्ठी व परमाणूपासून अचेतन महास्कंधापर्यंत सर्व परपदार्थ आत्म्याहून भिन्न आहेत. जेव्हा जीव स्वलक्ष करतो, तेव्हा विकार होत नाही; परंतु जेव्हा परलक्ष करतो, तेव्हा विकार होतात, त्या वेळी परपदार्थांना निमित्त म्हटले आहे; कारण त्यांना लक्ष बनविल्याने शुद्धता प्रगट न होता अशुद्धताच प्रगट होते.

म्हणून माझ्याकरिता कोणताही परपदार्थ शरणभूत नाही, केवळ आत्माच ध्रुव आहे आणि तोच शरणभूत आहे. परपदार्थ असत् आहे,

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४०१
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४०१
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४०२-४०३

अहेतुक आहे, आदि-अंतवाला आहे, परत:सिद्ध आहे, त्यामुळे त्याद्वारे धर्म होत नाही.[१]

येथे आचार्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे की हे बंधो ! जर तुला धर्म करायचा असेल तर परपदार्थांवरून दृष्टी काढून घे. कुटुंबापासून देव-गुरु, तीर्थंकर व सिद्ध जीव; एका परमाणुपासून अचेतन महास्कंधापर्यंत जड पदार्थ, लौकिक ग्रंथांपासून समयसारापर्यंतचे शास्त्र – सर्व परत: सिद्ध आहेत व आदि-अंतवाले आहेत.

जसे कोणी मनुष्य वेगवेगळ्या रस्त्याने येऊन मिळतात व वेगवेगळ्या रस्त्यांनी निघून जातात, तसेच कुटुंब, देव, गुरु–सर्व संयोग आहेत, त्यामुळे यांचा वियोग होतोच. तसेच हे परत: सिद्ध असल्याने अध्रुव आहेत. यांच्यावर लक्ष्य केंद्रित केल्याने धर्म किंवा सुख होत नाही, म्हणून यांची दृष्टी सोडून ध्रुव आत्म्याची श्रद्धा कर, तेव्हाच तुला धर्म होईल.

बाह्य संयोग असल्यावर देखील धर्मी जीवाची त्यावर दृष्टी नाही, तर ध्रुव शुद्ध आत्म्यावरच दृष्टी आहे.[२]''

वरील गाथेत एकूण एवढेच सांगितले आहे की भगवान आत्मा ज्ञानात्मक आहे, दर्शनरूप आहे, अतींद्रिय महापदार्थ आहे, अचल आहे व निरालंब आहे.

ज्ञानोपयोग व दर्शनोपयोग तर आत्म्याचे लक्षण आहेत आणि या भगवान आत्म्याचा स्वभाव इंद्रियांच्या माध्यमातून जाणणे-पाहणे नाही आणि इंद्रियांच्या माध्यमातून हा जाणला-पाहिला देखील जाऊ शकत नाही; त्यामुळे हा भगवान आत्मा अतींद्रिय महापदार्थ आहे.

हा भगवान आत्मा ज्ञेयरूप परपदार्थांच्या पर्यायींचे ग्रहण-त्याग करीत नाही, त्यामुळे अचल आहे आणि त्याच ज्ञेयरूप परपदार्थांचे अवलंबन घेत नसल्यामुळे निरालंब आहे.

अशाप्रकारे वरील पाच विशेषणांमुळे हा भगवान आत्मा एक आहे आणि एक असल्याने शुद्ध आहे. तात्पर्य हे आहे की ही एकताच याची

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४२१-४२२ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४२३

शुद्धी आहे. असा शुद्धात्माच ध्रुव असल्याने उपलब्ध करण्यायोग्य आहे.

आत्म्याच्या संयोगात येणारे शरीर, धन, शत्रु, मित्र, सांसारिक सुख-दुःख इत्यादी सर्व संयोग ध्रुव नाहीत, अध्रुव आहेत; त्यामुळे उपलब्ध करण्यायोग्य नाहीत.

जरी १९२ व्या गाथेत आत्म्याची सात विशेषणे दिलेली आहेत, ती पुढीलप्रमाणे आहेत – ज्ञानात्मक, दर्शनरूप, अतींद्रिय महापदार्थ, अचल, अनालंब, ध्रुव व शुद्ध. वृंदावनदासजींनी सुद्धा सात विशेषणे सांगितली आहेत, परंतु अमृतचंद्रांनी त्यांना वेगळ्या रूपात प्रस्तुत केले आहे.

त्यांनी असे प्रस्तुत केले आहे – ज्ञानात्मक, दर्शनभूत, अतींद्रिय महापदार्थ, अचल आणि निरावलंब – ह्या पाच विशेषणांमुळे आत्मा एक आहे. ही एकताच शुद्धता आहे. सत्, अहेतुक, स्वतःसिद्ध आणि अनादी-अनंत असल्याने ध्रुव आहे. प्रस्तुतिकरण कसेही असो, शेवटी सात विशेषणे तर सर्वांनीच सांगितली आहेत.

शिथिलाचार थांबविणे काही साधारण कार्य नाही, ते तर शक्तिशाली समर्थ लोकांचे काम आहे. त्या चार हजार नवदीक्षित राजांना देखील इंद्राने थांबविले होते, कोण्या साधारण व्यक्तीने नव्हे. हे कार्य तर समाजाच्या त्या कर्णधारांचे आहे, जे समाजाचे प्रतिनिधित्व करतात, समाजाला संचालित करतात. जर ते स्वत: शिथिलाचाराचे पोषण करीत असतील तर मग तुम्ही आणि आम्ही काय करू शकतो ? त्यामुळे मी तर आपणा सर्व आत्मार्थी बांधवांना हाच अनुरोध करतो की यामध्ये स्वत:ला गुंतवू नका. जो जसे करेल, तसे त्याला फळ मिळेल, आपण कोणा-कोणाला वाचवित फिरणार? वस्तुचे सत्य स्वरूप समजून घेऊन आपण स्वत: मात्र अवश्य वाचू शकतो.

– पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव, पृष्ठ : ५३

प्रवचनसार गाथा १९४-१९५

'ध्रुव असल्याने एक आत्माच उपलब्ध करण्यायोग्य आहे; अन्य देहादी सर्व संयोग अध्रुव असल्याने उपलब्ध करण्यायोग्य नाहीत' – मागील गाथेत हे स्पष्ट केल्यानंतर आता ह्या गाथांमध्ये हे समजावित आहेत की शुद्धात्म्याच्या उपलब्धीने मोहग्रंथीचा नाश होतो व मोहग्रंथीच्या नाशाने अक्षय अतींद्रिय सुखाची प्राप्ती होते.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

जो एवं जाणित्ता झादि परं अप्पगं विसुद्धप्पा।
सागारोऽणागारो खवेदि सो मोहदुग्गंठिं॥१९४॥
जो णिहदमोहगंठी रागपदोसे खवीय सामण्णे।
होज्जं समसुहदुक्खो सो सोक्खं अक्खयं लहदि॥१९५॥

(हरिगीत)

यह जान जो शुद्धात्मा ध्यावें सदा परमातमा।
दुठ मोह की दुर्ग्रन्थि का भेदन करें वे आतमा॥१९४॥
मोहग्रन्थी राग-रुष तज सदा ही सुख-दुःख में।
समभाव हो वह श्रमण ही बस अखयसुख धारण करें॥१९५॥

असे जाणून जो आत्मा विशुद्धात्मा होऊन परम आत्म्याचे ध्यान करतो, तो साकार उपयोगामध्ये (सविकल्प) असो किंवा अनाकार उपयोगामध्ये (निर्विकल्प) असो; तो मोहदुर्ग्रंथीचा नाश अवश्य करतो.

ज्याची मोहग्रंथी नष्ट झाली आहे, तो आत्मा राग-द्वेषाचे क्षय करून सुख-दुःखामध्ये समता भाव ठेवून श्रमणतेमध्ये परिणमित होतो आणि अक्षय सुख प्राप्त करतो.

आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''यथोक्त विधीने जो शुद्धात्म्याला ध्रुव जाणतो, त्याला त्यामध्येच

प्रवृत्ती केल्याने शुद्धात्मतत्त्व प्राप्त होते आणि त्यामुळे अनंत शक्तीवान चिन्मात्र परम आत्म्याचे एकाग्र संचेतन लक्षणवाले ध्यान होते. नंतर त्या ध्यानामुळे साकार (सविकल्प) उपयोगवाल्या किंवा अनाकार (निर्विकल्प) उपयोगावाल्या – दोहोंची अविशेषरूपे एकाग्र संचेतनाची प्रसिद्धी झाल्यामुळे अनादी संस्काराने बांधलेली अत्यंत दृढ अशी मोहाची दृष्ट गाठ सुटते. अशाप्रकारे शुद्धात्म्याच्या उपलब्धीचे फळ मोहग्रंथीचे भेदन म्हणजेच ती नष्ट होणे आहे.

मोह ग्रंथी ज्यांचे मूळ आहे, अशा राग-द्वेषांचा क्षय देखील या मोह ग्रंथीच्या क्षयाने होतो. राग-द्वेषांच्या क्षयाने परम मध्यस्थता ज्याचे लक्षण आहे – अशी सुख-दु:खामध्ये समानबुद्धीरूप श्रमणता (मुनीपणा) प्रगट होते आणि त्यामुळे अनाकुलता ज्याचे लक्षण आहे, असे अक्षय सुख प्राप्त होते.

अशाप्रकारे मोहग्रंथीचे भेदन झाल्याने अक्षयसुखरूप फळाची प्राप्ती होते.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये ह्या गाथांचा भाव स्पष्ट करताना तत्त्वप्रदीपिका टीकेचेच अनुकरण करीत साकार-अनाकार उपयोगासोबतच सागाराचा अर्थ श्रावक आणि अणगाराचा अर्थ श्रमण सांगितला आहे. तात्पर्य हे आहे की श्रावक व श्रमण – दोहोंच्या मोहग्रंथीचा नाश याच विधीने होतो.

येथे एक प्रश्न संभवतो की श्रावक व श्रमणांना दर्शनमोहरूपी गाठ आहेच कोठे ?

जोपर्यंत दर्शनमोहाच्या मिथ्यात्व नामक प्रकृतीचा क्षय (मुळासकट नाश होत नाही, अस्तित्त्वच नष्ट होत नाही) होत नाही, तोपर्यंत एक प्रकारे मोहग्रंथी विद्यमानच आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथांचा भाव एकेका पद्याच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मत्तगयन्द)

जो भवि होय महाव्रतधारक, या सु अनुव्रतधारक कोई।
या परकार सों जो परमातम, जानि के ध्यावत है थिर होई॥
सो सुविशुद्ध सुभाव अराधक, मोह की गांठि खपावत सोई।
ग्रंथनि को सब मंथनि कै, निरग्रंथ कथ्यौ रससार इतोई॥११५॥

मग तो महाव्रती असो वा अणुव्रती असो; जे भव्यजीव अशाप्रकारे निजातमरूप परमात्म्याला जाणून, त्यामध्ये स्थिर होऊन त्याचे ध्यान करतात, ते आपल्या सुविशुद्ध-स्वभावाचे आराधक आहेत व ते मोहग्रंथीचा क्षय करतात. निर्ग्रंथ संतांनी सर्व ग्रंथांचे मंथन करून हे सांगितले आहे की सर्व ग्रंथांचा सारांश एवढाच आहे.

(मनहरण)

अनादि की मोह दुरबुद्धि मई गांठि ताहि,
जाने दूर कियौ निज भेदज्ञान बल तैं।
ऐसो होत संत वह इन्द्रिनि के सुख दुख,
सम जानि न्यारे रहै तिनके विकल तैं॥
सोई महाभाग मुनिराज की अवस्था माहिं,
राग दोष भाव को विनाशै मूल थल तैं।
पावै सो अखंड अति इन्द्रिय अनंत सुख,
एक रस वृन्दावन रहै सौ अचल तैं॥११६॥

ज्यांनी निज भेदज्ञानाच्या बळाने अनादीकालीन दुर्बुद्धीमय मोहग्रंथीला दूर केले आहे, अशा संतांची सुख-दुःखामध्ये समान बुद्धी असते. अशा महान मुनिराजांना अवस्थेबद्दल असणाऱ्या राग-द्वेष भावांचा मूळासकट नाश होतो. असे मुनिराज अखंड अतींद्रिय अनंत सुख प्राप्त करतात. वृंदावन कवींनी म्हटले आहे की ते तर आपल्या अतींद्रिय आनंदामध्ये समरस होऊन अचल राहतात.

पंडित देवीदासजींनी या गाथांचा भाव अत्यंत सोप्या भाषेत पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(चौपाई)

श्रावक सुधी अनोव्रतधारी अथवा महाव्रती गुनभारी।
सुस्थिर एक ठौर चित ल्यावै सुद्ध स्वरूप आतमा ध्यावै ॥१५६॥

(दोहा)

मोह रूप विपरीति मति की सुगांठि निरवारि।
निर्मल होहि सु आप ही सर्वथा सु भ्रम डारि॥९७॥

जे अणुव्रतधारी ज्ञानी श्रावक किंवा गुणवान मुनिराज, यापैकी कोणीही आपल्या आत्म्यामध्ये चित्त लावून सुस्थिर होऊन आत्म्याच्या शुद्धस्वभावाचे ध्यान करतात, ते मोहरूपी मिथ्यामतीच्या ग्रंथीचे निवारण करून आपोआप भ्रमाचा नाश करून निर्मल होतात.

(सवैया इकतीसा)

बंधी चिरकाल ही की भेदग्यान चैंहुटी सौं
अति ही विषम तिनि मोह गांठि छोरी है।
पंच इंद्री जनित सुख औ दुख एक ही से
देखि समदिष्टि कैं दुहु सौं तार टोरी है॥
जती की अवस्था विषैं अनइष्ट सौं अप्रीति
करैं जे न इष्ट वस्तु सौं न प्रीति जोरी है
अचल अबाधित अनंत आतमीक सुख
लहैं मुक्ति माहिं कर्म सकति मरोरी है॥१५८॥

भेदज्ञानरूपी चिमट्याने ज्यांनी चिरकाळापासून बांधलेली अतिविषम मोहाची गाठ सोडली आहे, पंचेंद्रियजनित सुख-दुःखाला समानच पाहून त्या दोहोंपासून आपल्या श्रद्धेचे तार तोडले आहेत, मुनी अवस्थेमध्ये अनिष्टाशी अप्रीती आणि इष्टाशी प्रीती ज्यांनी जोडली नाही, ते मुनिराज कर्माच्या शक्तीला पिळून काढून मुक्तीच्या अचल, अबाधित, अनंत आत्मिक सुखाला प्राप्त करतात.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेला आहे –

''उपयुक्त विधीनुसार जो परज्ञेयांकडून वळून स्वज्ञेय अशा ध्रुवाकडे येऊ लागतो, त्याची प्रवृत्ती शुद्धात्म्यामध्येच होते. निमित्त तर आदी-अंतवाले आणि परत:सिद्ध आहेत व आत्मा अनादी-अनंत स्वयंसिद्ध आहे – असे जाणून निज ज्ञाता-दृष्टा स्वभावामध्ये एकाकार झाल्यावर शुद्धात्म्याची प्राप्ती होते; परंतु व्यवहार प्रवृत्तीद्वारे शुद्धात्म्याची प्राप्ती होत नाही. परपदार्थ असत् आहेत, शरणभूत नाहीत; निज आत्माच केवळ शरणभूत आहे, तोच ध्यान करण्यायोग्य आहे.[१]

साकार उपयोग : हे शरीर आहे, हा जीव आहे, हा मनुष्य आहे – असा भेद करून जाणणारा चेतनाचा उपयोगच साकार उपयोग आहे.

अनाकार उपयोग : हा जीव आहे, हा अजीव आहे – असा भेद केल्याशिवाय केवळ सत्तेच्या प्रतिभासाला अनाकार उपयोग म्हणतात.[२]

साकार व अनाकार दोन्ही उपयोगवाल्याला एका विषयाचा अनुभव होतो. ध्यान लक्ष्य आहे व एकाग्रसंचेतन त्याचे लक्षण आहे. आत्मा ज्ञाता-दृष्टा शुद्धस्वरूपीच आहे. तो पराचा कर्ता नाही, राग-द्वेष त्याचे स्वरूप नाही – असे जाणून जो केवळ ध्रुव आत्म्यालाच अग्र ठेवून ध्यान करतो, अनुभवतो, त्याला धर्माची प्राप्ती होते आणि त्याला अनादीकाळापासून बांधल्या गेलेल्या मोहग्रंथीचा नाश होतो. स्वभावामध्ये एकाग्र झाल्यावर मोह उत्पन्नच होत नाही, तेव्हा मोहाचा नाश केला – असे म्हटले जाते.[३]

परपदार्थाने फायदा किंवा नुकसान होते, पुण्याने धर्म होतो – अशी मान्यताच मोहाची गाठ आहे. अशा मोहाचा नाश झाल्यावर राग-द्वेषांचा नाश होतो, राग-द्वेषाचे मूळ मिथ्यात्व आहे. तो मोह नष्ट झाल्याशिवाय राग-द्वेषांचा नाश होत नाही.[४]

मला परद्रव्यामुळे नफा-नुकसान होते – अशा मान्यतेरूपी या

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४२४-४२५
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४२५
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४२५
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४२९

जीवाचा मोह जेव्हा नष्ट होतो, तेव्हा संसाराच्या परिभ्रमणाचा अंत होतो. त्यामुळे ज्याला राग-द्वेषांचा नाश करायचा असेल, त्याने सर्वप्रथम दर्शनमोहाचा नाश करावयास हवा. कारण मिथ्यात्वाचा नाश केल्याशिवाय राग-द्वेषांचा नाश होत नाही व राग-द्वेषांचा नाश झाल्याशिवाय चारित्र प्रगट होत नाही व चारित्राशिवाय मुक्ती होत नाही.[१]

स्वज्ञेय पराहून वेगळे आहे, त्यामुळे एक आहे, एक असल्याने शुद्ध आहे, शुद्ध असल्याने ध्रुव आहे व तेच अनुभव करण्यायोग्य आहे, त्याने मोहाचा नाश होतो. असे जो जीव स्वज्ञेयाचा आश्रय घेऊन सम्यग्दर्शन प्रगट करतो, त्यालाच त्यामध्ये स्थिर झाल्यानंतर चारित्रदशा प्रगट होते.[२]

अशा रीतीने मुनिराज राग-द्वेषांचा नाश करतात. ते मुनी परम मध्यस्थता धारण करतात. श्रामण्य अर्थात मुनिपणाचे लक्षण परम मध्यस्थता आहे.[३]

अशाप्रकारे मुनी मुनीपणात विशेष स्थिरता करून अक्षय अविनाशी सुखाला प्राप्त करतात. त्या सुखाचे लक्षण अनाकुलता आहे. अज्ञानी जीव पैसा, पुत्र, पत्नी, जंगलात आनंद यांना सुखाचे लक्षण मानून बसला आहे; परंतु ते तर दुःखरूप आकुलता आहे. अशाप्रकारे स्वभावाच्या लीनतेने शांत समभावामुळे मुनिराज आनंद व मुक्तीला प्राप्त करतात.

परज्ञेयाचे लक्ष्य सोडून स्वज्ञेयाची श्रद्धा व ज्ञान करणेच सम्यग्दर्शन-ज्ञान आहे, त्याने चारित्र प्रगट होते आणि चारित्ररूपी मध्यस्थतेनेच अक्षय सुखाची प्राप्ती होते.

अशा मोहरूपी ग्रंथीचा भेद केल्यामुळे म्हणजेच मिथ्यात्वाचा नाश केल्याने अविनाशी सुखाची प्राप्ती होते.[४]''

या गाथांचा सारांश असा हा आहे की मागील गाथेत सांगितलेले आत्म्याचे स्वरूप जाणून आत्मा आत्म्याचा अनुभव करतो, ध्यान

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४३०
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४३०
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४३०
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४३१

करतो, तो मोह म्हणजेच मिथ्यात्वाच्या ग्रंथीचे भेदन करतो, मोहाची गाठ सोडतो.

मोहाची गाठ सोडल्यानंतर म्हणजेच मिथ्यात्व व अनंतानुबंधी कषायांचा नाश केल्यानंतर तो आत्मा अप्रत्याख्यानावरणादी राग-द्वेषांचा क्षय करतो आणि समताभाव धारण करून खरा श्रमण (मुनिराज) बनतो आणि नंतर महाश्रमण (अरिहंत) बनून अक्षयसुख प्राप्त करतो.

अशाप्रकारे मोहग्रंथीचा नाश करण्याच्या प्रक्रियेमध्ये श्रावक व श्रमण – दोघेही सक्रिय असतात; कारण दर्शनमोह अर्थात् मिथ्यात्वाचा नाश तर मिथ्यादृष्टी श्रावकच करतात, सम्यग्दृष्टी श्रावकांना तर मिथ्यात्व नसतेच. अशाप्रकारे अप्रत्याख्यानावरणी इत्यादी राग-द्वेषांचा क्षय मुनिराजच करतात. ●

पहा ! विधीची विडंबना, जो स्वत: तीर्थंकर असेल, ज्याच्या जन्मकल्याणकामध्ये इंद्रांनी अतिशययुक्त महोत्सव साजरा केला असेल, जो गर्भात येण्यापूर्वीच स्वर्गातील देव्या मातेची सेवा करण्याकरिता आल्या असतील; ज्याने संपूर्ण जगाला कर्मभूमीच्या आरंभी सर्व प्रकारे शिक्षित केले असेल, त्याने दीक्षा घेतल्यानंतर आहाराचा देखील योग मिळाला नाही. सातिशय पुण्याचे धारक आणि धर्मात्मा भावलिंगी खरे मुनिराज असून देखील त्या समयी त्यांच्याकडे एवढे पुण्य सुद्धा नव्हते की त्यांना एक वेळ आहार मिळाला असता.

पुण्याची कमी होती, अशातली बाब नव्हती. सत्तेत तर तीर्थंकर प्रकृती पडून होती व निरंतर बंध देखील होत होता, परंतु सत्तेत असलेले कर्म कार्यकारी नसते. जोपर्यंत कर्म उदयाला येत नाही, तोपर्यंत ते कार्याच्या उत्पत्तीमध्ये निमित्त देखील होत नाही आणि तीर्थंकर प्रकृतीचा उदय तेराव्या गुणस्थानात होतो, त्यामुळे त्यापूर्वी ती कोणत्याही कार्यात निमित्त होऊ शकत नाही.

इतर कोणत्याही प्रकारच्या पुण्याची कमी नव्हती, नाही तर लोकांनी त्यांना अनेक प्रकारच्या वस्तू भेट का दिल्या असत्या ? परंतु निरंतर आहाराच्या उपलब्धीचा पुण्योदय नव्हता शिवाय त्या समयाच्या पर्यायीची योग्यताच अशी होती. पाचही समवाय आहार न मिळण्याचे होते. **– पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव, पृष्ठ : ५६-५७**

प्रवचनसार गाथा १९६

"शुद्धात्म्याच्या उपलब्धीने मोहग्रंथीचा नाश आणि मोहग्रंथीच्या नाशाने अतींद्रिय सुखाची प्राप्ती होते" – मागील गाथांमध्ये हे स्पष्ट केल्यानंतर आता या गाथेमध्ये हे सांगत आहेत की आत्म्याचे ध्यान अशुद्धतेचे कारण नसते.

मूळ गाथा खालीलप्रमाणे आहे –

जो खविदमोहकलुसो विसयविरत्तो मणो णिरुंभित्ता।
समवट्ठिदो सहावे सो अप्पाणं हवदि झादा॥१९६॥

(हरिगीत)

आत्मध्याता श्रमण वह इन्द्रियविषय जो परिहरे।
स्वभावथित अवरुद्ध मन वह मोहमल का क्षय करे॥१९६॥

जे संत मोहमलाचा क्षय करून, विषयांहून विरक्त होऊन, मनाचा निरोध करून, स्वभावामध्ये समवस्थित आहेत, ते संत आत्म्याचे ध्यान करणारे आहेत.

या गाथेचा भाव तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"मोहमलाचा क्षय करणाऱ्या आत्म्याला ज्याचे मूळ मोहमल आहे, अशा परद्रव्यप्रवृत्तीचा अभाव असल्याने विषयविरक्तता असते.

ह्या विषयविरक्ततेने समुद्राच्या मध्यभागी असणाऱ्या जहाजावरील पक्षासमान, अधिकरणभूत द्रव्यांतराचा अभाव असल्याकारणाने ज्याला अन्य शरण राहिले नाही, अशा मनाचा निरोध होतो.

मनाचा निरोध झाल्यामुळे ज्याचे मूळ मन आहे, अशा चंचलतेचा विलय झाल्याने अनंत सहज चैतन्यात्मक स्वभावसमवस्थान होतो. त्या स्वभाव समवस्थानाला स्वरूपामध्ये प्रवर्तमान, अनाकुल, एकाग्रसंचेतन असल्याने ध्यान म्हणतात.

यावरून हे निश्चित होते की ध्यान स्वभावसमवस्थानरूप असल्याने आणि आत्म्याहून अनन्य असल्याकारणाने अशुद्धतेचे कारण नसते.''

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये इतर बाबी तत्त्वप्रदीपिके-समानच प्रस्तुत केल्या आहेत, परंतु उत्थानिका व निष्कर्ष बदलले आहेत, नकारात्मक बाब त्यांनी सकारात्मकपणे प्रस्तुत केली आहे.

तत्त्वप्रदीपिकेच्या उत्थानिका व निष्कर्ष वाक्यामध्ये म्हटले आहे की आत्म्याचे ध्यान अशुद्धतेचे कारण नाही. या उलट तात्पर्यवृत्तीमध्ये म्हटले आहे की शुद्धात्म्याच्या ध्यानाने जीव विशुद्ध होतो.

यानंतर त्यांनी 'किंच' म्हणून चार प्रकारच्या ध्यानांची चर्चा केली. ध्यानाच्या चार प्रकारांना सुद्धा त्यांनी तीन प्रकारे प्रस्तुत केले आहे.

१) प्रथम प्रकारामध्ये ध्यान, ध्यान संतती, ध्यान चिंता आणि ध्यानाचा अन्वयसूचन – या चौघांची चर्चा केली आहे.

यांना स्पष्ट करताना त्यांनी म्हटले आहे की एकाग्रचिंतानिरोध ध्यान आहे आणि ते शुद्ध व अशुद्ध असे दोन प्रकारचे असते.

अंतर्मुहूर्त पर्यंत ध्यान आणि नंतर अंतर्मुहूर्तापर्यंत तत्त्वचिंतन. तसेच निरंतर ध्यान नंतर चिंतन, पुनः ध्यान व पुनः चिंतन – अशी स्थिती ध्यान संतती आहे.

जेथे ध्यानसंततीसमान ध्यानाचे परिवर्तन तर नाही, परंतु ध्यानासंबंधी चिंतन आहे, कधी-कधी ध्यान होते, अशा स्थितीला ध्यानचिंता म्हणतात.

जेथे बारा भावना इत्यादी वैराग्यरूप चिंतन असते, ते ध्यानान्वयसूचन आहे.

२) दुसऱ्या प्रकारामध्ये ध्याता, ध्यान, धानाचे फळ आणि ध्येय – ह्या चार रूपांमध्ये प्रस्तुत केले आहे.

३) तिसऱ्या प्रकारामध्ये आर्त, रौद्र, धर्म व शुक्ल अशा चार रूपात ध्यान प्रस्तुत केले आहे.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव १ मनहरण व ७ दोहे अशा एकूण ८ पद्यांच्या माध्यमातून प्रस्तुत केला आहे. अत्यंत उपयोगी असल्याने येथे सर्वच पद्यांना प्रस्तुत केले जात आहे.

(मनहरण)

मोहरूप मैल को खिपावै भेदज्ञानी जीव,
इन्द्रिनि के विषै सों विरागता सु पुरी है।
मन को निरोधि के सुभाव में सुथिर होत,
जहाँ शुद्ध चेतना की ज्ञानजोत फुरी है॥
सोई चिनमूरत चिदातमा को ध्याता जानो,
परवस्तु से भी जाकी प्रीति रीति दुरी है।
ऐसे कुन्दकुन्दजी बखानी ध्यान ध्याता वृन्द,
सोई सरधानै जाकी मिथ्यामति चुरी है॥११७॥

भेदज्ञानी जीव मोहरूपी मळाला धुवून, पंचेंद्रिय विषयांहून पूर्ण विरागता धारण करून, मनाच्या निरोधपूर्वक स्वभावामध्ये स्थिर होतो, तेव्हा शुद्ध चेतनेची ज्ञानज्योती स्फुरायमान होते, परवस्तूहून त्याची प्रीती तुटली आहे, त्याच भेदज्ञानी जीवाला चिन्मूरत चिदात्म्याचा ध्याता जाणावे.

वृंदावन कवी म्हणतात की असे जीवच ध्यानाचे ध्याता असतात. याचे श्रद्धान त्यालाच होईल, ज्याची मिथ्यामती चूर्ण झाली आहे.

(दोहा)

प्रश्न – जो मन चपल पताकपट, पवन दीपसम ख्यात।
सो मन कैसे होय थिर, उत्तर दीजे भ्रात॥११८॥

जे चपळ मन झेंड्याचे कापड व हवेवर झोके घेणाऱ्या दीपकासमान चंचल आहे, ते स्थिर कसे होऊ शकते ? बंधो ! याचे उत्तर द्या.

उत्तर – पांचों इन्द्रिन के जिते, विषय भोग जगमाहिं।
तिनही सों मन रात दिन, भ्रमतो सदा रहाहि॥११९॥

मोह घटे वैरागता, होत तजैं सब भोग।
निज सुभाव सुखमाहिं तब, लीन होय उपयोग॥१२०॥
तहां सुमन को खैंच के, एक निजातम भाव।
तामधि आनि झुकाइये, भेदज्ञानपरभाव॥१२१॥
तहां सो मन की यह दशा, होत और से और।
जैसे काग-जहाज को, सूझै और न ठौर॥१२२॥
जोकहुँ इत उतको लखै, तौ न कहूं विसराम।
तब हि होय एकाग्र मन, ध्यावै आतमराम॥१२३॥
ऐसे आतम ध्यान तैं, मिलै अतिन्द्री शर्म।
शुद्ध बुद्ध चिद्रूपमय, सहज अनाकुल धर्म॥१२४॥

या जगात पाच इंद्रियांचे जेवढेही विषय आहेत, हे मन रात्रं-दिवस त्यांच्यातच भ्रमण करीत असते.

मोह कमी झाला, सर्व भोगांचा त्याग केला, वैराग्य आले, तेव्हा निज स्वभावाच्या अतींद्रिय सुखामध्ये उपयोग लीन होतो.

भेदज्ञानाच्या प्रभावाने मनाला इंद्रिय-विषयांहून काढून घेऊन आपल्या आत्म्याकडे वळवा.

जसे समुद्राच्या मध्यभागी जहाजावर बसलेल्या कावळ्याला दुसरे स्थान दिसून येत नाही; तसेच आत्म्यामध्ये रुची असणाऱ्या मनाची हीच दशा होते, त्याला दुसरे काही दिसूनच येत नाही.

ते मन इकडे-तिकडे पाहते; परंतु त्याला कोठेही विश्रामाचे स्थान दिसत नाही, तेव्हा मन एकाग्र होऊन आत्म्याचे ध्यान करते.

अशाप्रकारच्या आत्मध्यानाने अतींद्रिय सुखाची प्राप्ती होते. शुद्ध, बुद्ध आणि चिद्रूपमय असा हा सहज अनाकुलतारूप धर्म आहे.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव असा प्रस्तुत केला आहे –

(सवैया इकतीसा)

मोह मल सहज सुभाव जल सौं सु धोइ
पंच इंद्री विषय विकार तैं विमुक्त है।

चित्त की चपलताई रोकि करि वाहिर तैं
निज आतमा स्वरूप के विषैं सुजुक्त है।।
सुद्ध आतमीक ध्यान कौ सु करतार हो है
सोई संत कही अैसी आगम सु उक्त है।
आसरे विना सु ज्यों समुद्र के जिहाज कौ सु
पंछी उड़ि कहुँ और अंत कौं न धुक्त है।।१५९।।

आपल्या सहजस्वभावरूपी जलाने मोहरूपी मळाला धुवून पंचेंद्रियांच्या विषयांच्या विकारापासून जे मुक्त झाले आहेत व मनाच्या चंचलतेला आळा घालून आपल्या उपयोगाला बहिरंगातून काढून घेऊन आत्मस्वभावात संयुक्त झाले आहेत.

ज्याप्रमाणे समुद्राच्या मध्यभागी जहाजावर बसलेल्या पक्षाला अन्य आश्रयाअभावी जहाज सोडून जाता येत नाही; त्याचप्रमाणे आत्मा आत्मध्यानामध्ये राहतो, आत्मध्यानच करतो – ही बाब आगमामध्ये सांगितली आहे आणि संतांनी देखील असेच सांगितले आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजीस्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेला आहे –

"परद्रव्यामुळे फायदा किंवा नुकसान होतो – असे मानणे दर्शनमोह आहे आणि परद्रव्याच्या प्रवृत्तीमध्ये आसक्ती असणे चारित्रमोह आहे. ज्याने दर्शनमोह व चारित्रमोहाचा अभाव केला आहे, त्याला परद्रव्याच्या प्रवृत्तीचा अभाव असतो.

१) चारित्राचे मूळ सम्यग्दर्शन आहे. ज्या जीवाला ज्ञानस्वभावाची खरी प्रचिती येते, त्याला अंतरंग रमणतारूप चारित्र प्रगट होते, परंतु सम्यग्दर्शनाशिवाय चारित्र प्रगट होत नाही.

२) राग-द्वेषांचे मूळ दर्शनमोह आहे. जे राग-द्वेष होतात, त्याचे कारण परपदार्थाबद्दल एकत्वबुद्धीरूप मोह आहे. दर्शनमोह नष्ट झाल्याशिवाय राग-द्वेष दूर होत नाहीत.[१]

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४३०

मुनिराजांनी मोह-राग-द्वेष दूर केले आहेत, त्यामुळे परद्रव्यात प्रवृत्ती होत नाही व राग-द्वेषाचा अभाव असल्याने परद्रव्याबद्दल विरक्तता आहे.[१]

स्वज्ञेयाचे विवेकपूर्ण श्रद्धान-ज्ञान केल्याने सम्यग्दर्शन होते, त्यामुळे दर्शनमोहाचा नाश होतो आणि दर्शनमोहाचा नाश झाल्यानंतर आत्मस्थिरता केल्यावर चारित्रमोह म्हणजेच राग-द्वेषांचा देखील नाश होतो; मोह-राग-द्वेषांचा नाश झाल्यावर मनाच्या चंचलतेचा नाश होतो, मनाची चंचलता नष्ट झाल्याने आत्म्यात एकाग्रता होते, तेव्हा त्याला ध्यान होते व ध्यानाच्या फळस्वरूपी केवलज्ञान व सिद्धपद मिळते.[२]

जरी अरिहंत तीनलोक व त्रिकाळवर्ती सर्व पदार्थांना एकदम एकाच समयी जाणतात, त्यांचे अठरा दोष नष्ट झाले आहेत; तरी देखील त्यांनी परिपूर्ण स्वज्ञेय दशेला प्राप्त केलेले नाही. आत्ताही त्यांना योगगुण व प्रतिजीवी गुणांची अशुद्धता कायम आहे व अघाती कर्म देखील शिल्लक आहेत, एवढी त्यांच्या स्वज्ञेयामध्ये कमतरता आहे; त्यामुळे अरहंतांना ध्यानावस्था आहे. सिद्धावस्था परिपूर्ण पूर्णज्ञेय आहे, त्यांना ध्यान होत नाही. अरहंतांना सध्या अशुद्धता असल्यामुळे ध्यान शिल्लक आहे. अशा ज्ञेयाचे यथार्थ स्वरूप सांगण्यासाठी अरहंतांच्या शुक्लध्यानाची चर्चा ज्ञेय अधिकारामध्ये केली आहे.[३]''

ह्या गाथेमध्ये ध्याताचे स्वरूप सांगितले आहे. असे म्हटले आहे की ज्यांनी मिथ्यात्वाचा नाश केला आहे, म्हणजेच सम्यग्दर्शन-ज्ञान प्राप्त केले आहे, ते भव्य जीव जेव्हा विषयांपासून विरक्त होऊन, मनाचा निरोध करून, स्वभावामध्ये लीन होतात, तेव्हा ते आत्म्याचे ध्यान करणारे ध्याता संत बनतात.

मनाच्या निरोधाला येथे सागराच्या मध्यभागी असलेल्या जहाजावरील पक्षाच्या उदाहरणाद्वारे समजाविले आहे.

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४३३ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४३४-४३५
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४३५

पाण्याचे ज़हाज जेव्हा समुद्रकिनाऱ्यावर होते, तेव्हा त्यावर एक पक्षी बसला. जहाज प्रवासाला निघाले व समुद्राच्या मध्यभागी आले. आता पक्षाला उडून जायचे असेल तर त्याने कोठे जावे ? दूरपर्यंत वृक्ष इत्यादी नाहीत व घरेही नाहीत.

त्यामुळे आपले मन मारून तो जहाजावरच बसून राहतो. जरी उडाला तरी त्याला पुन: परत जहाजावरच यावे लागते, कारण तेथे दुसरा कोणताही आश्रय नाही.

हिंदीचे महाकवी सूरदासजींनी लिहिलेले आहे –

जैसे उड़ जहाज कौ पंखी फिर जहाज पर आवे

जहाजावरील पक्षी उडाला तरी तो उडून कोठे जाणार ? अन्य आश्रय नसल्यामुळे त्याला परत जहाजावरच यावे लागणार.

अशाप्रकारे तत्त्वज्ञानाच्या आधारे हे जाणले की आपल्या आत्म्याला सोडता इतर कोणताही परपदार्थ आश्रय घेण्यायोग्य नाही, ध्यान करण्यायोग्य नाही; कारण त्यांच्या ध्यानाने अशांतीव्यतिरिक्त काहीही हाती लागणार नाही.

त्यामुळे हे मन अन्य आश्रयांचा अभाव असल्यामुळे आत्म्यामध्येच मग्न होईल. जरी मन कोठे गेले तरी पुन: परत आत्म्यावरच येईल.

वास्तविक बाब ही आहे की वास्तविक सुख-शांती आत्म्याचा आश्रय घेण्यातच आहे, आत्म्याच्या ज्ञान-ध्यानातच आहे, त्यामुळे आश्रय करण्यायोग्य केवळ आत्माच आहे. ●

योग्य वेळ आल्याशिवाय आणि भाग्यापेक्षा अधिक कोणाला काही मिळत नाही. जेव्हा ऋषभदेवांच्या आहाराच्या प्राप्तीची उपादानगत योग्यतेचा काळ आला, तेव्हा आहार देणाऱ्यांना देखील जातिस्मरण झाले. यावरून हेच सिद्ध होते की जेव्हा आपल्या अंतरंगात तयारी असेल, तेव्हा निमित्त तर हजरच असते, परंतु जर आमची पात्रताच नसेल तर निमित्तही मिळत नाहीत. उपादानगत योग्यता आणि निमित्तांचा असा सहज संयोग आहे. त्यामुळे निमित्तांना दोष देणे योग्य नाही, आपल्या पात्रतेचा विचार करणेच कल्याणकारी आहे.

– पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव, पृष्ठ : ५८

प्रवचनसार गाथा १९७-१९८

मागील गाथेत ज्ञानी श्रावक व मुनिराजांच्या ध्यानाची चर्चा केल्यावर आता आगामी गाथांमध्ये सर्वज्ञ भगवंतांच्या ध्यानाची चर्चा करीत आहेत. केवलज्ञानी कोणाचे ध्यान करतात ? ते या गाथांमध्ये सांगत आहेत.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहेत –

णिहदघणघादिकम्मो पच्चक्खं सव्वभावतच्चण्हू।
णेयंतगदो समणो झादि कमट्ठं असंदेहो॥१९७
सव्वाबाधविजुत्तो समंतसव्वक्खसोक्खणाणड्ढो।
भूदो अक्खातीदो झादि अणक्खो परं सोक्खं॥१९८॥

(हरिगीत)

घन घातिकर्म विनाश कर प्रत्यक्ष जाने सभी को।
संदेहविरहित ज्ञेय ज्ञायक ध्यावते किस वस्तु को॥१९७॥
अतीन्द्रिय जिन अनिन्द्रिय अर सर्व बाधा रहित हैं।
चहुँ ओर से सुख-ज्ञान से समृद्ध ध्यावे परमसुख॥१९८॥

घनघाती कर्मांचे नाशक, सर्व पदार्थांचे प्रत्यक्ष ज्ञाता आणि ज्ञेयांना संपूर्णपणे जाणणारे, संपूर्ण ज्ञेयांचे संदेहरहित जाणणारे श्रमण म्हणजेच अरहंत भगवान कोणत्या पदार्थाचे ध्यान करतात ?

अनिंद्रिय व इंद्रियातीत झालेल्या सर्वबाधारहित परिपूर्ण सुखाने आणि संपूर्ण ज्ञानाने समृद्ध आत्मा अर्थात् अरहंत भगवान परमसुखाचे ध्यान करतात.

वरील गाथांचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''लौकिक जणांना मोहाचा व ज्ञानशक्तीच्या प्रतिबंधकाचा सद्भाव असल्याने तृष्णासहित असल्यामुळे आणि त्यांच्या प्रत्यक्षज्ञानाचा अभाव असल्याने ते लौकिक जण आपल्या विषयाला स्पष्टपणे जाणत नाहीत; त्यामुळे ते लौकिक जण ज्यांची अभिलाषा आहे अशा

अभिलषित, ज्यांना जाणण्याची इच्छा आहे, अशा जिज्ञासित व संदिग्ध पदार्थांचे ध्यान करताना दिसून येतात; परंतु सर्वज्ञ भगवंतांना घातीकर्मांचा अभाव असल्याने मोहाचा अभाव आहे आणि ज्ञान-शक्तीच्या प्रतिबंधकाचा अभाव असल्याने, तृष्णा नष्ट झाल्यामुळे सर्वज्ञ भगवंतांनी समस्त पदार्थांना प्रत्यक्ष जाणले आहे म्हणजेच ज्ञेयांना संपूर्णपणे जाणले आहे; त्यामुळे त्या सर्वज्ञ भगवंतांना अभिलाषा नसते, त्यांना जिज्ञासा व संदेह नसतो, तर मग त्यांना अभिलषित, जिज्ञासित व संदिग्ध पदार्थ कसे असू शकतात ?

जर असे आहे तर ते ध्यान का करतात व कोणाचे ध्यान करतात ?

सहज सुख आणि ज्ञानाला बाधक तसेच अपूर्ण व असर्वांग सुख आणि ज्ञानाचे आयतन इंद्रियांचा अभाव असल्याने जेव्हा हा आत्मा स्वत: अनिंद्रियरूपपणे परिणमित होतो, त्याच समयी दुसऱ्यांना इंद्रियगोचर होऊन निराबाध सहजसुख व ज्ञानवाला असल्याने सर्वबाधारहित व सर्व प्रकारच्या सुख व ज्ञानाने परिपूर्ण असल्याने सुख व आनंदाने समृद्ध होतो.

अशाप्रकारे या आत्म्यामध्ये सर्व अभिलाषा, जिज्ञासा आणि संदेह अशक्य असून देखील अपूर्व व अनाकुलत्व लक्षण परम सौख्याचे ध्यान करतो अर्थात् अनाकुलतेसोबत राहणाऱ्या एक आत्मारूपी विषयाच्या अनुभवरूपेण स्थित राहतो. अशाप्रकारे स्थित राहणे, सहजज्ञान व आनंद ज्याचा स्वभाव आहे, अशा सिद्धत्वाची प्राप्ती झालीच आहे.''

आचार्य जयसेनांनी या गाथांचा अर्थ स्पष्ट करताना केवली भगवान कोणाचे ध्यान करतात ?– ही बाब सोदाहरण समजाविली आहे.

''ज्याप्रमाणे एक देवदत्त नावाचा पुरुष विषयसुखाच्या प्राप्तीकरिता एखाद्या विद्येच्या आराधनेरूप ध्यान करतो, परंतु जेव्हा विद्या सिद्ध होते व वांछित विषयसुख देखील प्राप्त होते, नंतर तो त्या विद्येच्या आराधनेरूप ध्यान करीत नाही.

तसेच केवली भगवान केवलज्ञानरूप विद्या प्राप्तीकरिता व त्याच्या फळस्वरूपी अनंत सुखाच्या प्राप्तीकरिता छद्मस्थ अवस्थेत शुद्धात्म्याच्या भावनेरूप ध्यान करीत होते. आता त्या ध्यानाने केवलज्ञानरूप विद्या सिद्ध झाली आहे व त्याच्या फळस्वरूपी अनंतसुखही प्राप्त झाले आहे; मग ते कशाकरिता ध्यान करतात किंवा कोण्या पदार्थाचे ध्यान करतात – शिष्याचा असा प्रश्न आहे किंवा तो असा आक्षेप करीत आहे.

या प्रश्न वा आक्षेपाचे दुसरे कारणही आहे, पदार्थ परोक्ष असल्यावर ध्यान होते, परंतु केवलींना तर सर्व पदार्थ प्रत्यक्ष आहेत, मग ते ध्यान कसे करतात ?

याच्या उत्तरदाखल आचार्यदेवांनी म्हटले आहे की ते केवली भगवान अतींद्रिय अनंत आत्म्याच्या आश्रयाने उत्पन्न सुखाचे ध्यान करतात, अनुभव करतात, त्यारूप परिणमित होतात.

यावरून ज्ञात होते की केवली भगवंतांना अन्य विषयांमध्ये चिंतेचा निरोध लक्षणरूप ध्यान नाही, परंतु ह्या परमसुखाच्या अनुभवाला किंवा ध्यानाच्या कार्यभूत कर्मांच्या निर्जरेला पाहून, ध्यान शब्दाने उपचरित केले जाते.

सयोग केवलींना तिसरे शुक्लध्यान आणि अयोग केवलींना चवथे शुक्लध्यान होते – असे जे कथन आहे, ते उपचाराने केलेले कथन जाणावे – असा गाथेचा अभिप्राय आहे.''

कविवर वृंदावनदासजींनी या गाथांचा व त्यांच्या तत्त्वप्रदीपिका टीकेचा भाव ३ मनहरण आणि ३ दोहे – अशा एकूण ६ पद्यांच्या माध्यमातून विस्ताराने समजाविला आहे, तो पुढीलप्रमाणे आहे –

(मनहरण)

प्रश्न – घातिकर्म घाति भलीभांत जो प्रतच्छ सर्व,
वस्तु कौ सरूप निज ज्ञानमाहिं धरै है।
ज्ञेयनि के सत्ता में अनंत गुन-पर्ज शक्ति,
ताहू को प्रमानकरि आगे विसतरै है॥

असंदेहरूप आप ज्ञाता सिरताज वृन्द,
संशय विमोह सब विभ्रम को हरै है।
ऐसा जो श्रमण सरवज्ञ वीतराग सो,
बतावो अब कौन हेत काको ध्यान करै है॥१२५॥

ज्यांनी घाती कर्मांचा नाश करून वस्तुस्वरूपाला योग्य प्रकारे जाणून आपल्या ज्ञानात धारण केले, ज्ञेयांच्या सत्तेत अनंत शक्ती आहेत, गुण आहेत, पर्याय आहेत, त्यांचेही जे प्रमाणाने असंदिग्ध ज्ञाता आहेत, सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहेत; वृंदावन कवींनी म्हटले आहे की ते सर्वप्रकारे संशय, विभ्रम व विमोहाने रहित आहेत. असे सर्वज्ञ वीतरागी श्रमण म्हणजेच अरहंत भगवान आता कशाला व कोणाचे ध्यान करतात ?

मोह उदै अथवा अज्ञानता सों जीवनि के,
सकल पदारथ प्रतच्छ नाहि दरसै।
यातैं चित्त चाह की निवाह हेत ध्यान करे,
अथवा संदेह के निवारिवे को तरसै॥
सो तो सरवज्ञ वीतराग जू के मूल नहिं,
घातिविधि घातें ज्ञानानंद सुधा बरसै।
इच्छा आवरन अभिलाष न संदेह तब,
कौन हेत ताको ध्यावै ऐसो संशै परसै॥१२६॥

संसारी जीवांना मोहाच्या उदयामुळे किंवा अज्ञानतेमुळे संपूर्ण पदार्थ दिसत नाहीत; त्यामुळे ते मनाची इच्छा पूर्ण करण्याकरिता ध्यान करतात किंवा संदेहाचे निवारण करण्याकरिता आकुलित होतात, म्हणून ध्यान करतात.

ही बाब तर वीतरागी-सर्वज्ञ भगवंतांच्या मुळातच नाही, कारण त्यांनी घाती कर्मांचा तर नाश केला आहे, त्यामुळे त्यांना निरंतर ज्ञानानंद अमृताचा वर्षाव होत असतो. त्यांना इच्छा नाही, आवरण नाही, अभिलाषा नाही, संदेह नाही; तर मग ते कशासाठी ध्यान करतात ? माझ्या हृदयात असा संशय उत्पन्न झाला आहे.

उत्तर – ज्ञानावरनादि सर्व बाधा सों विमुक्त होय,
पायो है अबाध निज आतम धरम है।
ज्ञान और सुख सरवंग सब आतमा के,
जासों परिपूरित सो राजैं अभरम है॥
इन्द्री सों रहित उतकिष्ट अतिइन्द्री सुख,
ताही को एकाग्ररूप ध्यावत परम है।
ये ही उपचार करि केवली के ध्यान कह्यौ,
भेदज्ञानी जानै यह भेद को मरम है॥१२७॥

ज्ञानावरणादी सर्व कर्मांच्या बाधेपासून मुक्त होऊन ज्यांनी अबाध आत्मधर्म प्राप्त केला आहे आणि जे आत्म्याच्या सर्वांगात ज्ञान व सुखाने परिपूर्ण असे शोभायमान होत आहेत, सर्व प्रकारच्या भ्रमांनी रहित आहेत, त्यांना इंद्रियांनी रहित उत्कृष्ट अतींद्रिय सुखाची प्राप्ती झाली आहे; त्यामुळे ते एकाग्र होऊन त्याचेच ध्यान करतात.

याच उपचाराने केवली भगवान ध्यान करतात, असे म्हटले आहे. हे मार्मिक रहस्य भेदज्ञानीच जाणतात.

(दोहा)

अतिइन्द्री उतकिष्ट सुख, सहज अनाकुलरूप।
ताही को एकाग्र निज, अनुभवते जिनभूप॥१२८॥
अनइच्छक बाधा रहित, सदा एकरस धार।
यही ध्यान तिनके कह्यौ, नय उपचार आधार॥१२९॥
पुव्व कर्म की निरजरा, नूतन बांधै नाहिं।
यही ध्यान को फल लखौ, वृन्दावन मनमाहिं॥१३०॥

जिनराजांना अनाकुल, अतींद्रिय, उत्कृष्ट सुख सहज प्राप्त आहे; ते त्याचाच एकाग्रचित्ताने अनुभव (ध्यान) करतात.

इच्छा आणि बाधांनी रहित केवळ अतींद्रिय सुखाची एकरसधार त्यांच्या अंतरंगात निरंतर वहात असते. उपचाराने असे म्हटले जाते की सर्वज्ञ भगवान हेच ध्यान करतात.

वृंदावन कवी मनात विचार करतात की जुन्या कर्मांची निर्जरा आणि नवीन कर्मांच्या बंधनाचा अभाव – ध्यानाचे हेच फळ त्यांना प्राप्त झाले आहे.

पंडित देवीदासजींनी या गाथांचा भाव कविवर वृंदावनदासजींच्या समानच प्रस्तुत केला आहे.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजी स्वामींनी या गाथांचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेला आहे –

"जगातील सामान्य जीवांना मोहाच्या निमित्ताने आणि स्वत:च्या योग्यतेने तृष्णा विद्यमान आहे, त्यामुळे त्यांना कोणत्या न कोणत्या पदार्थाची इच्छा असते आणि ते स्वत:च्या योग्यतेमुळे व ज्ञानावरणरूप कर्माच्या निमित्ताने संपूर्ण पदार्थांना जाणूही शकत नाहीत आणि ज्यांना जाणतात, त्यांना सुद्धा सूक्ष्मतेने जाणत नाहीत; त्यामुळे ज्यांना ते जाणत नाहीत, त्यांना जाणण्याची जिज्ञासा असते आणि अस्पष्टपणे जाणलेल्या पदार्थांबद्दल शंका असते – असे असल्यामुळे ते अभिलाषा, जिज्ञासा आणि शंका असणाऱ्या पदार्थांचे ध्यान करतात.

परंतु सर्वज्ञ भगवंतांना निमित्तरूप मोहनीय कर्माचा अभाव असल्याने व स्वत:च्या योग्यतेने वीतरागता आहे, त्यामुळे त्यांना इच्छा नाही. सर्वज्ञदशा प्रगट झाली असल्याने निमित्तरूप ज्ञानावरण कर्म नाही, म्हणून भगवान सर्व पदार्थांना अत्यंत स्पष्टपणे परिपूर्ण जाणतात; त्यामुळे त्यांना कोणत्याही पदार्थाबद्दल अभिलाषा, जिज्ञासा किंवा शंका नसते. तर मग त्यांना कोणत्या पदार्थाचे ध्यान असते ?[१]

केवली भगवंतांना परिपूर्ण अवस्था प्रगट होईपर्यंत शुक्लध्यान होत असते, कारण ते अनाकुलपणे केवळ आत्मविषयामध्ये अनुभवरूपे मग्न राहतात, असे असूनही केवली भगवान अपूर्व व अनाकुल लक्षणवाल्या परमसुखाचे ध्यान करतात व असे आत्मस्थित राहिल्याने सहज ज्ञान, आनंदस्वभावरूप सिद्धदशेची प्राप्ती होते. छद्मस्थावस्थेत जसे ध्यान होते,

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४३३

अरहंत भगवंतांना तसे ध्यान करावे लागत नाही, परंतु अव्याबाध सुख प्रगट झालेले नाही व योग गुणांसंबंधी अशुद्धता आहे. चार प्रतिजीवी गुणांच्या पर्यायीमध्ये अशुद्धता आहे, ऊर्ध्वगमन स्वभावही शुद्धरूपे प्रगट झालेला नाही, अरहंत भगवंतांच्या आत्म्यात एवढीच कमतरता आहे व निमित्तरूप चार अघातीकर्म शिल्लक आहेत. स्वपर्यायीची एवढी अपूर्णता मिटविण्याकरिता अरहंत भगवंतांना छद्मस्थासमान कोणताही विकल्प/पुरुषार्थ करावा लागत नाही, आत्मानुभवामध्ये मग्न राहिल्याने क्रमा-क्रमाने मलिनता समाप्त होऊन सिद्धावस्था प्रगट होते; त्यामुळे एका आत्म्यातच अवस्थित राहिल्यामुळे भगवंतांना शुक्लध्यान होते – असे म्हटले आहे.[१]

सर्व आत्मपद्रेशात परिपूर्ण आनंद व ज्ञानाने परिपूर्ण सर्वज्ञ भगवान परमानंदरूप आपल्या निजात्म्यात केवळ स्वरूप संवेदन करणारे असल्याने त्यांना परमानंदाचे ध्यान असते अर्थात ते परमसुखाचे ध्यान करतात.[२]''

वरील गाथा व त्यांच्या टीकेत अनेक युक्तींनी या शंकेचे समाधान केले आहे की अरहंत भगवंतांना अभिलाषा नाही, जिज्ञासा नाही व कोणत्याही प्रकारची शंकाही नाही; कारण ते वीतरागी व सर्वज्ञ आहेत. वीतरागी असल्याने अभिलाषा नाही व संपूर्ण पदार्थांना प्रत्यक्ष जाणल्यामुळे जिज्ञासा व शंका असू शकत नाही. अशाप्रकारे कोणतीही कमतरता नसूनही ते ध्यान कशाकरिता करतात व कशाचे ध्यान करतात ?

ह्या शंकेचे समाधान करताना म्हटले आहे की ते सिद्धत्वाच्या प्राप्तीकरिता परमसुखाचे ध्यान करतात.

आचार्य जयसेनांच्यानुसार हे उपचरित कथन आहे; कारण अनंत अतींद्रिय सुख प्राप्त झाल्यामुळे वास्तविक पाहता ते ध्यान करीतच नाहीत; परंतु आगमामध्ये असे म्हटले आहे की तेराव्या व चौदाव्या गुणस्थानात शुक्लध्यानाचे अंतिम दोन प्रकार आढळतात. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४४२ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४४५

प्रवचनसार गाथा १९९

'जर केवली भगवंतांना अभिलाषा, जिज्ञासा आणि शंका नाही तर मग ते ध्यान कशाला करतात आणि कोणाचे करतात' – हा प्रश्न व त्याचे उत्तर मागील गाथांमध्ये दिलेले आहे; आता या गाथेत हे सांगत आहेत की मोक्षमार्ग शुद्धात्म्याच्या उपलब्धीरूपच आहे.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

एवं जिणा जिणिंदा सिद्धा मग्गं समुट्ठिदा समणा।
जादा णमोत्थु तेसिं तस्स य णिव्वाणमग्गस्स ॥१९९॥

(हरिगीत)

निर्वाण पाया इसी मग से श्रमण जिन जिनदेव ने।
निर्वाण अर निर्वाणमग को नमन बारंबार हो॥१९९॥

जिन, जिनेंद्र आणि श्रमण अर्थात सामान्य केवली, तीर्थंकर केवली आणि मुनिगण पूर्वोक्त मार्गावर आरूढ होऊनच सिद्ध झाले आहेत. त्यांना आणि त्या निर्वाणमार्गाला नमस्कार असो.

आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये या गाथेचा खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

"सर्व सामान्य चरमशरीरी, चरमशरीरी तीर्थंकर व अचरमशरीरी मुमुक्षू यथोक्त शुद्धात्मप्रवृत्ती ज्याचे लक्षण आहे, अशा विधीने प्रवर्तमान मोक्षमार्गाला प्राप्त करून सिद्ध झाले आहेत; इतर कोणत्याही विधीने आजपर्यंत कोणी सिद्ध झाले नाही.

यामुळे निश्चित होते की एकच मोक्षमार्ग आहे, अन्य कोणताही नाही.

अधिक प्रपंचाने (विस्तार) काय लाभ आहे ? त्या शुद्धात्मतत्त्वात प्रवर्तित सिद्धांना व शुद्धात्मप्रवृत्तीरूप मोक्षमार्गाला, ज्यामध्ये भाव्य व भावकाचा विभाग अस्त झाला आहे – असा नोआगमभावनमस्कार असो.

अशाप्रकारे मी मोक्षमार्ग निर्धारित केला आहे व त्यामध्ये प्रवर्तन करीत आहे.''

वरील कथनामध्ये लक्ष देण्यायोग्य बाब ही आहे की गाथेत जिन, जिनेंद्र व श्रमण शब्द आले आहेत, त्यांचा सामान्य अर्थ चरमशरीरी सामान्य केवली आणि तीर्थंकर केवली व चरमशरीरी आणि अचरमशरीरी सर्व मुनिराज तर असू शकतो; परंतु येथे 'श्रमण' शब्दाने अचरमशरीरी म्हणजे त्याच भवात मोक्षाला न जाणारे मुमुक्षू सुद्धा ग्रहण केले आहेत, त्यांच्यात ज्ञानी श्रावक व मुनिराज सर्व गर्भित आहेत.

तसेच हे लिहिले आहे की हे सर्व शुद्धात्मप्रवृत्तीरूप मोक्षमार्गाने सिद्ध झाले आहेत.

येथे सहजच एक प्रश्न संभवतो की जे अचरमशरीरी आहेत, ते सिद्ध कसे होऊ शकतात ?

आचार्य जयसेनांच्या मनात देखील हा प्रश्न निर्माण झाला असेल की अचरमशरीरींना सिद्धपणा कसा घटित होऊ शकतो ? यामुळेच त्यांनी अशा प्रकारची शंका उपस्थित करून समाधान पुढीलप्रमाणे प्रस्तुत केले आहे –

''त्याच भवात मोक्ष न जाणाऱ्या अचमशरीरींना सिद्धपणा कसा शक्य आहे? जर कोणी असा प्रश्न केला तर त्याचे उत्तर आगमात पुढीलप्रमाणे दिले आहे –

तवसिद्धे णयसिद्धे संजमसिद्धे चरित्तसिद्धे य।
णाणम्मि दंसणम्मि य सिद्धे सिरसा णमंसामि॥

तपाने सिद्ध, नयाने सिद्ध, संयमाने सिद्ध, चारित्राने सिद्ध, ज्ञान आणि दर्शनाने सिद्ध झालेल्या भगवंतांना मी मस्तक नमवून नमस्कार करतो.

अशाप्रकारे वरील गाथेत सांगितलेल्या क्रमाने एकदेश शुद्धता अचरमशरीरी जीवांना देखील मानली गेली आहे.''

इतर सर्व गोष्टी तात्पर्यवृत्तीमध्ये तत्त्वप्रदीपिकेसमानच आहेत.

कविवर वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव १ मनहरण व २ दोहे, अशा एकूण ३ पद्यांच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे प्रस्तु केला आहे –

(मनहरण)

या प्रकार पूरवकथित शिवमारग में,
सावधान होय जो विशुद्धता संभारी है।
चरमशरीरी जिन तथा तीरथंकर,
जिनिंददेव सिद्ध होय वरी शिवनारी है॥
तथा एक दोय भवमाहिं जे मुकत जाहिं,
ऐसे जे श्रमन शुद्ध भाव अधिकारी हैं।
तिन्हैं तथा ताही शिवमारग को वृन्दावन,
बार बार भली-भांति वंदना हमारी है॥१३१॥

अशाप्रकारे पूर्वोक्त मुक्तीच्या मार्गामध्ये सावधान होऊन आपल्या विशुद्धभावांना ज्यांनी सांभाळले आहे, अशा चरमशरीरी सामान्य केवली आणि तीर्थंकर केवलींनी शिवनारीचे वरण केले आहे म्हणजेच सिद्धावस्था प्राप्त केली आहे. याशिवाय जे एक-दोन भवात मोक्षाला जातील, असे अचरमशरीरी श्रमण देखील शुद्धभावांचे अधिकारी आहेत. वृंदावन कवींनी म्हटले आहे की त्या सर्व सिद्धांना आणि त्या मुक्तीमार्गाला वारंवार योग्य प्रकारे आमचे वंदन असो.

(दोहा)

बहुत कथन कहैं लगु करो, जो शुद्धातम तत्त।
ताही में परवर्त करि, भये जु तदगत-रत्त॥१३२॥
ऐसे सिद्धनि कों तथा, आतम अनुभवरूप।
शुद्ध मोक्षमग को नमों, दरवितभाव सरूप॥१३३॥

मी अधिक काय सांगू, बाब तर केवळ एवढीच आहे की जे जीव शुद्धात्मतत्त्वामध्ये प्रवृत्ती करून त्यामध्ये मग्न झाले आहेत, अशा सिद्धांना आणि आत्मानुभवरूप जो शुद्ध मोक्षमार्ग आहे, त्याला द्रव्य-भाव नमस्कार करतो.

पंडित देवीदासजींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(सवैया इकतीसा)

सम्यक् दरस ग्यान चरन प्रवर्त्ति सुद्ध
आत्मा स्वरूप मोख मारग बतायौ है।
सामान्य सु केवली कहे सु और तीर्थंकर
जसु मुनि जे सु मुक्ति गामी तिनि पायौ है॥
अैसे मोख के सु अभिलाषी जती कर्म हनि
हूँ हैं सिद्ध अैसो मोख पंथ दरसायो है।
सोई महामुनि कौं सु और मोखमारग कौं
देवीदास हाथ जोरिकैं सु सीसु नायौ है॥१६२॥

अरहंत भगवंतांनी सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्रामध्ये प्रवृत्तीरूप शुद्धात्मस्वरूपाला मोक्षमार्ग म्हटले आहे. जे मोक्षाला गेले आहेत, असे सामान्य केवली, तीर्थंकर केवली व जे मोक्षाला जाणार आहेत, अशा मुनिराजांनी कर्मांचा नाश करून मुक्ती प्राप्त केली आहे व त्यांनी असाच मोक्षमार्ग सांगितला आहे. अशा तीर्थंकर, महामुनिराजांना व मोक्षमार्गाला देवीदास हात जोडून मस्तक नमवितो.

आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजी स्वामींनी या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''सर्व केवली भगवान, तीर्थंकर व एक भवावतारी संतांनी शुद्धात्म्यात प्रवृत्तीच्या विधीनेच मोक्षमार्ग प्राप्त केला व याच विधीने सिद्धपदाची प्राप्ती केली आहे.[१]

चवथ्या काळातही हाच विधी होता आणि आता पंचम काळातही हाच विधी आहे. पंचमकाळाकरिता दुसरा विधी नाही. महाविदेह क्षेत्र असो वा भरतक्षेत्र असो किंवा इतर कोणतेही क्षेत्र असो, सर्वत्र मोक्षाचा विधी एकच आहे.[२]

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४४६-४४७ २) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४४७

शुद्धात्मस्वभावामध्ये मग्न असणाऱ्या सिद्ध भगवंतांना आणि आत्मस्वभावाच्या श्रद्धा-ज्ञान-चारित्ररूप मोक्षमार्गाला माझा नोआगमभाव नमस्कार असो.

येथे शुद्ध आत्मा भाव्य आहे, ध्येय आहे, ध्यान करण्यायोग्य आहे व माझी पर्याय ध्यान करणारी आहे, भावक आहे – अशा भाव्य-भावकाचा भेद अस्त होतो. शुद्ध आत्मा वंद्य आहे व मी वंदन करणारा आहे, शुद्ध आत्मा आराध्य आहे व माझी पर्याय आराधना करणारी आहे. असा भेद अस्त झाला आहे. अशाप्रकारे नोआगमभाव नमस्कार असो. आत्मा परिपूर्ण ज्ञायकस्वरूप आहे, त्याच्या ज्ञानरूप परिणमणेच भाव नमस्कार आहे. आत्म्याच्या त्या ज्ञानाला आगम भाव नमस्कार म्हणतात व या ज्ञानासहित एकाग्रतेरूप परिणमणे नोआगमभाव नमस्कार आहे.[१]''

ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकाराच्या अंतमंगलाचरणरूप या गाथेमध्ये मुक्तात्म्यांना आणि मुक्तीमार्गाला नमस्कार केला आहे. टीकेमध्ये यावर बळ दिले आहे की मुक्तीमार्ग शुद्धात्मप्रवृत्तीरूप आहे आणि आजपर्यंत जे सिद्ध झाले आहेत, होत आहेत आणि होतील, ते सर्व याच मार्गाने मुक्त झाले आहेत. मी देखील याच मार्गावर चालून निर्विकल्परूपे सिद्ध भगवंतांना व मुक्तीमार्गाला नमस्कार करीत आहे.

तात्पर्य हे आहे की माझा हा नमस्कार भेदरूप नमस्कार नसून अभेदरूप नोआगमभावनमस्कार आहे. ●

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४४८

पर्यायांची परिवर्तनशीलता वस्तुचा पर्यायगत स्वभाव असल्याने आत्मार्थी जीवासाठी हितकरच आहे; कारण की जर पर्याय परिवर्तनशील नसत्या तर संसार पर्यायाचा अभाव होऊन मोक्षपर्याय प्रगट होण्यास अवकाशच उरला नसता.

अनंतसुखस्वरूप मोक्ष-अवस्था सर्व संयोगांच्या अभावरूपच होते. जर संयोग अस्थाई नसून स्थाई असते तर मग मोक्ष कसा मिळाला असता ?

त्यामुळे संयोगांची विनाशीकता देखील आत्म्याला हितकरच आहे.

– बारा भावना : एक अनुशीलन, पृष्ठ : २८

प्रवचनसार गाथा २००

मागील गाथेत सिद्ध भगवान आणि मोक्षमार्गाला नमस्कार करून एक प्रकारे ज्ञेयतत्त्व प्रज्ञापन महाधिकाराचे अंतमंगल केले आहे.

आता या गाथेत आचार्यदेवांनी ५ व्या गाथेत केलेल्या प्रतिज्ञेनुसार निर्ममत्वात मग्न होऊन ममतेच्या त्यागाचा संकल्प करतात.

मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

तम्हा तह जाणित्ता अप्पाणं जाणगं सभावेण।
परिवज्जामि ममत्तिं उवट्ठिदो णिम्ममत्तम्हि॥२००॥

(हरिगीत)

इसलिए इस विधि आतमा ज्ञायकस्वभावी जानकर।
निर्ममत्व में थित मैं सदा ही भाव ममता त्याग कर॥२००॥

शुद्धात्म्यामध्ये प्रवृत्तीद्वारे मोक्ष प्राप्त होतो; त्यामुळे मी आत्म्याला स्वभावाने ज्ञायक जाणून निर्ममत्वामध्ये लीन होऊन ममतेचा परित्याग करतो.

या गाथेचा भाव आचार्य अमृतचंद्रांनी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''मी मोक्षाधिकारी, ज्ञायकस्वभावी आत्मतत्त्वाच्या परिज्ञानपूर्वक, ममत्वाच्या त्यागरूप आणि निर्ममत्वाच्या ग्रहणरूप विधीद्वारे सर्व आरंभाने (उद्यमाने) शुद्धात्म्यामध्ये प्रवृत्त होतो; कारण अन्य कृत्याचा अभाव आहे.

हीच बाब खाली विशेष स्पष्ट केली आहे –

प्रथम तर मी स्वभावाने ज्ञायकच आहे. केवळ ज्ञायक असल्याने माझा विश्वातील समस्त पदार्थांशी सहज ज्ञेय-ज्ञायक लक्षण संबंधच आहे, स्व-स्वामी लक्षण संबंध नाही; त्यामुळे मला कोणाबद्दलही ममत्व नाही, मी तर सर्वत्र निर्मर्मत्वच आहे.

ज्ञायकभावाचा सर्व ज्ञेयांना जाणण्याचा स्वभाव असल्याने क्रमश: प्रवर्तमान अनंत भूत, वर्तमान आणि भावी विचित्र पर्यायसमूहवाल्या अगाध स्वभाव आणि गंभीर अशा समस्त द्रव्यमात्राला, जणु ते द्रव्य ज्ञायकामध्ये उत्कीर्ण झाले आहेत, चित्रित झाले आहेत, अंतरंगात प्रविष्ट झाले आहेत, कीलित झाले आहेत, बुडले आहेत, सामावले आहेत आणि प्रतिबिंबित झाले आहेत; अशाप्रकारे एका क्षणातच जो शुद्धात्म्याला प्रत्यक्ष जाणतो, ज्ञेय-ज्ञायक संबंधाच्या अनिवार्यतेमुळे ज्ञेय-ज्ञायकाला भिन्न करणे अशक्य असल्याने विश्वरूपतेला प्राप्त झाल्यावरही जो शुद्धात्मा सहज अनंतशक्तीवान ज्ञायकस्वभावाद्वारे एकरूपतेला सोडत नाही. जो अनादी संसारापासून याच स्थितीत ज्ञायकभावरूपच राहिला आहे आणि जो मोहाद्वारे दुसऱ्या रूपात जाणला-मानला गेला आहे, त्या शुद्धात्म्याला हा मी मोहाला मुळासकट उपटून टाकून अतिनिष्कंप राहून जशाच्या तसाच प्राप्त करतो.

अशाप्रकारे दर्शनविशुद्धीमूलक समस्त ज्ञानामध्ये उपयुक्ततेमुळे अत्यंत अव्याबाध (निर्विघ्न) लीनता असल्यामुळे साधु असूनही साक्षात सिद्धभूत अशा या आत्म्याला आणि सिद्धभूत परमात्म्यांना, त्यामध्येच एकपरायणतारूप भाव नमस्कार सर्वदा स्वयमेव असो.''

या गाथेचा भाव आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये तत्त्वप्रदीपिकेनुसारच स्पष्ट केला आहे.

कविवर पंडित वृंदावनदासजींनी या गाथेचा भाव ३ मनहरण पद्यांमध्ये पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(मनहरण)

तातैं जैसे तीरथेश आदि निजरूप जानि,
शुद्ध सरधान ज्ञान आचरन कीना है।
कुन्दकुन्द स्वामी कहैं ताही परकार हम,
ज्ञायक सुभावकरि आपै आप चीना है॥
सर्व परवस्तु सों ममत्वबुद्धि त्यागकरि,
निर्ममत्व भाव में सु विसराम लीना है।

सोई समरसी वीतराग साम्यभाव वृन्द,
मुकत को मारग प्रमानत प्रवीना है॥१३४॥

ज्याप्रमाणे तीर्थंकर इत्यादींनी आपल्या स्वरूपाला जाणून त्याचे सम्यक् श्रद्धान, ज्ञान व आचरण केले आहे. कुंदकुंद स्वामी म्हणतात की आम्ही देखील त्याच प्रमाणे आपल्या ज्ञायकस्वभावाला ओळखून त्यामध्ये अपनत्व धारण केले आहे व समस्त परवस्तूंच्या ममत्वाला त्यागून निर्ममत्व भावात विश्राम केला आहे.

वृंदावन कवी म्हणतात की आम्ही देखील त्याच समरसी वीतरागी साम्यभावाला मुक्तीचा मार्ग मानले आहे, प्रमाणित केले आहे.

मेरा यह ज्ञायक सुभाव जो विराजत है,
तासों और ज्ञेयनि सों ऐसो हेत झलकै।
कैंधों वे पदारथ उकीरे ज्ञान थंभमाहिं,
कैंधों ज्ञान पटविषैं लिखे हैं अचलकै॥
कैंधों ज्ञान कूप में समानै हैं सकल ज्ञेय,
कैधों काहू कीलि राखे त्याग तन पलकै।
कैधों ज्ञानसिंधुमाहिं डूबे धों लपटि रहे,
कैधों प्रतिबिंबित हैं सीसे के महल कै॥१३५॥

माझा जो ज्ञायकस्वभाव शोभायमान होत आहे, त्यामध्ये ज्ञेयांचा वात्सल्यभाव असा झळकतो की ते ज्ञेयपदार्थ ज्ञानाच्या स्तंभामध्ये उत्कीर्ण केले आहेत किंवा ज्ञानरूपी पटावर (वस्त्रावर) लिहिले (चित्रित केले) आहेत किंवा त्यांना ज्ञानामध्ये कीलित केले आहे किंवा ज्ञानसागरामध्ये सर्व ज्ञेय बुडले आहेत, ज्ञानस्वभावामध्ये मग्न होत आहेत आणि दर्पणांनी शोभायमान महालात प्रतिबिंबित होत आहेत.

ऐसो ज्ञान ज्ञेय को बन्यो है सनबंध तऊ,
मेरो रूप न्यारो जैसें चंद्रमा फलक में।
अनादि सों और रूप भयो है कदापि नाहिं,
ज्ञायक सुभाव लिये राजत खलक में॥

ताको अब निहचै प्रमान करि वृन्दावन,
अंगीकार कियौ भेदज्ञान की झलक में।
त्यागी परमाद परमोद धारी ध्यावत हों,
जातैं पर्म धर्म शर्म पाइये पलक में॥१३६॥

जरी ज्ञान आणि ज्ञेयांचा अशा प्रकारचा संबंध बनलेला आहे, तरी ज्याप्रमाणे दर्पणात झळकणारा चंद्र दर्पणाहून भिन्न आहे; त्याचप्रमाणे माझे रूप भिन्न आहे आणि त्यामध्ये झळकणारे पदार्थ भिन्न आहेत. संपूर्ण विश्वात आत्मा ज्ञायकस्वभाव रूपात शोभायमान होत आहे. हा आत्मा अनादी काळापासून आजपर्यंत पररूप कधीही झाला नाही. वृंदावन कवी म्हणतात की मी भेदज्ञानाच्या प्रकाशात निश्चयाने प्रमाणित केले आहे आणि मी प्रमादाला त्यागून, प्रमोद धारण करून, त्यामध्येच ज्ञायकस्वभावी आत्म्याचे ध्यान करतो, यामुळे मी क्षणभरात परम धर्माने अतींद्रिय सुखाला प्राप्त करेन.

पंडित देवीदासजींनी एका पद्यामध्ये या गाथेचा भाव पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

(सवैया इकतीसा)

सुद्ध आतमा कौं साधि निजग्यान कौं अराधि
जैसैं भव्यजीव जे अनंत मुक्ति गये हैं।
तैं ही भांति तीर्थंकर आदि और सुद्ध रूप
जानि आप अनुभौ करैं विसुद्ध भये हैं॥
तैंसे ही सु सबको जनैया जो सु जान्यौ हम
परद्रव्य सौं ममत्व भाव त्यागि दिये हैं।
होइ कैं सु निश्चल स्वरूप पाइकैं सु एक
वीतराग भाव तिहि रूप परिनयै हैं॥१६३॥

जसे भूतकाळात अनंत भव्य जीव शुद्धात्म्याची साधना करून, निजज्ञानाची आराधना करून मुक्तीला गेले आहेत, तसेच तीर्थंकरादी महापुरुषही आपल्या शुद्ध स्वरूपाला जाणून, अनुभव करून विशुद्ध झाले आहेत; तसेच आम्ही सुद्धा सर्वांना जाणणाऱ्याला जाणले आहे,

परद्रव्यांशी असलेला ममत्वभाव त्यागला आहे व स्वरूपाला प्राप्त करून त्यामध्ये निश्चल होऊन वीतरागभावरूप परिणमित झालो आहे.

या गाथेचा भाव आध्यात्मिकसत्पुरुष श्री कानजी स्वामींनी पुढीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे –

''आचार्य भगवंतांनी म्हटले आहे की मी मोक्षाधिकारी, ज्ञायक स्वभावी आत्मतत्त्वाच्या परिज्ञानापूर्वक ममत्वाचा त्याग व निर्ममत्वाच्या ग्रहणरूपी विधीने सर्व उद्यमपूर्वक शुद्धात्म्यामध्ये प्रवृत्त होतो.

पहा ! येथे तत्त्वाच्या परिज्ञानपूर्वक म्हटले आहे, कारण की तत्त्वांच्या खऱ्या ज्ञानाशिवाय ममत्वाचा त्याग व निर्ममत्वाचा आश्रय घेतला जाऊ शकत नाही.[१]

आचार्य भगवान म्हणतात की विश्वातील समस्त पदार्थांशी माझा ज्ञेय-ज्ञायक संबंध आहे, त्यामुळे मला त्यांच्याशी ममत्व नाही, पूर्णपणे निर्ममत्व आहे. कोणी बिगडो वा सुधरो, माझा त्यांच्याशी काहीही संबंध नाही. शिष्याच्या धर्मपालनाने माझे काही सुधरत नाही आणि त्याने धर्म न पाळल्याने माझे काही बिगडत नाही.

शिष्य म्हणतो की हे भगवान ! आपण तर धर्माचे स्तंभ आहात. आपण स्वर्गवासी झाल्यानंतर या शासनाला कोण चालवणार ?

आचार्य भगवंतांनी उत्तर दिले की मी तर अगोदरच हा निर्णय केला आहे की शासनाशी माझा कोणताही संबंध नाही, पूर्वीपासूनच शासन माझ्या आधारे नाही.

जीवांच्या स्वत:च्या योग्यतेने धर्माची प्राप्ती होते. शासन रक्ष्य व मी त्याचा रक्षक – असा संबंधच नाही. केवळ ज्ञेय-ज्ञायक संबंध आहे. अंतरंगात चैतन्याचा ज्ञायक स्वभाव कधीही पररूप झाला नाही.

घराबाहेरील खड्ड्यामध्ये एखादी म्हैस चिखल पसरवीत असेल आणि एखादा व्यक्ती हे पाहून म्हणेल की म्हैस चिखल पसरवीत आहे

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४५२

तर घराचा स्वामी म्हणतो की ही म्हैस माझी नाही व पाणीही माझे नाही. यावर लक्ष ठेवणे माझे काम नाही.

त्याचप्रमाणे परपदार्थ स्वत:मुळेच नष्ट होतात, त्यांच्याशी माझा कोणताही संबंध नाही. कोणी आचार्य भगवंतांकडे तक्रार केली की पुस्तक फाटले, घर पडले, एखादा शिष्य मेला. आचार्य उत्तर देतील की पुस्तक माझे होतेच कोठे ? कोण शिष्य ? माझा कोणताही शिष्य नाही, पराशी माझा कसलाही संबंध नाही, परामुळे माझे काही कार्य होत नाही किंवा काम अडत नाही. येथे श्रद्धापूर्वक विशेष लीनतेबद्दल सांगितले आहे. आचार्यदेव म्हणतात की सर्वत्र निर्ममत्वच रहा.[१]

ज्ञायकभावाचा केवळ सर्व ज्ञेयांना जाणण्याचा स्वभाव असल्याने क्रमाने प्रवर्तित अनंत भूत-वर्तमान-भावी विचित्र पर्यायसमूहवाला, अगाध स्वभाव आणि गंभीर अशा समस्त द्रव्यांना जाणतो. ते द्रव्य ज्ञायकामध्ये उत्कीर्ण झाले आहेत, चित्रित झाले आहेत, अंतरंगात प्रविष्ट झाले आहेत, कीलित झाले आहेत, बुडले आहेत, सामावले आहेत, प्रतिबिंबित झाले आहेत.[२]

या ज्ञेय पदार्थांना छद्मस्थ जीव जरी एकानंतर एक अशा क्रमाने जाणतात, परंतु हा ज्ञायकाचा मूळ स्वभाव नाही. समस्त द्रव्यांच्या भूत-वर्तमान-भावी काळात होणाऱ्या अनेक प्रकारच्या अनंत पर्यायींनी सहित एका समयातच प्रत्यक्ष जाणणे – हा आत्म्याचा स्वभाव आहे.[३]

ज्ञायकस्वभाव दर्पणासमान द्रव्यांना जाणतो. जसे श्रीफळ आरशात दिसते, परंतु श्रीफळ आरशामध्ये नसून बाहेर आहे, तसेच चैतन्यमूर्तीरूपी आरशामध्ये भूत-वर्तमान-भावी अनंत पर्यायीवाला ज्ञेय ज्ञात होत असूनही ज्ञानात प्रविष्ट झाले नाही, ज्ञानाच्या बाहेरच आहे. ज्याप्रमाणे आरशात बाहेरच्या सर्व वस्तू दिसतात, तसेच निज चैतन्य दर्पणामध्ये पाहिल्यावर सर्व ज्ञेय दिसतात.[४]

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४५९
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४६१
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४६१
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४६१

सम्यग्ज्ञानाचे मूळ दर्शनविशुद्धी आहे, दर्शनविशुद्धीशिवाय सम्यग्दर्शन होत नाही. अशाप्रकारे ज्ञानासोबत दर्शनविशुद्धी असल्यामुळे ज्ञानस्वभावात अव्याबाध लीनता होते. वर्तमानात मुनिदशा झाल्यावर साक्षात सिद्धासमान माझ्या निजात्म्याला व अशा सिद्धावस्था प्राप्त करणाऱ्या सिद्ध भगवंतांना सदैव भाव नमस्कार असो. स्वत: भाव्यरूप जी वस्तू आहे, त्यामध्ये एकाग्र होणे – हे भाव नमस्काराचे लक्षण आहे.[१]''

ही गाथा व तिची टीका, दोहोंत समागत भावाचा सारांश हा आहे की आत्मार्थ्याकरिता आत्मपरिज्ञानपूर्वक निर्ममत्व होऊन शुद्धात्म्यात प्रवृत्ती करण्याव्यतिरिक्त इतर कोणतेही कार्य करण्यायोग्य नाही.

आचार्यदेवांनी घोषणा केली आहे की माझा समस्त परपदार्थांशी केवळ ज्ञेय-ज्ञायक संबंधच आहे, याशिवाय इतर कोणताही संबंध नाही.

तात्पर्य हे आहे की आत्म्याचा पराशी तादात्म्य संबंध नाही, स्व-स्वामी संबंध नाही, लक्ष्य-लक्षण संबंध नाही, गुरु-शिष्य संबंध नाही, विशेषण-विशेष्य संबंध नाही, गुण-गुणी संबंध नाही, वाच्य-वाचक संबंध नाही, ग्राहक-ग्राह्य संबंध नाही, कर्ता-कर्म संबंध नाही, आधार-आधेय संबंध नाही आणि रक्ष्य-रक्षक संबंध देखील नाही. अशाप्रकारे आत्मा पराहून निर्ममत्वच आहे.

ज्ञेय-ज्ञायक संबंधाच्या स्वरूपाला स्पष्ट करीत आचार्यदेवांनी म्हटले आहे की ज्ञायकभावाचा स्वभाव सर्व ज्ञेयांना जाणणे असल्यामुळे समस्त द्रव्य आपल्या गुण आणि पर्यायींनी सहित ज्ञायकभावात अशाप्रकारे ज्ञात होतात ही जणु ते ज्ञायकामध्येच उत्कीर्ण झाले आहेत, चित्रित झाले आहेत, आत प्रविष्ट झाले आहेत, कीलित झाले आहेत, बुडले आहेत, सामावले आहेत आणि प्रतिबिंबित झाले आहेत.

अशाप्रकारे ज्ञेय-ज्ञायक संबंधाची अनिवार्यता असल्याने खोलवर संबंधित असूनही ज्ञायकभाव ज्ञेयांहून भिन्नच आहे, भिन्नच राहतो.

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४६४

त्यामुळे मी तर निज ज्ञायकभावाला जसा त्याचा मूळ स्वभाव आहे, तसाच प्राप्त करतो.

जरी आचार्यदेव सध्या मुनिअवस्थेत आहेत, तरी देखील आपल्या आत्म्याला सिद्धात्म्यांबरोबर स्थापित करतात आणि म्हणतात की हा माझा सिद्धात्म्यांना अभेदरूप निर्विकल्प भावनमस्कार आहे.

यानंतर आचार्य जयसेनांच्या तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये एक अशी गाथा प्राप्त होते, जी तत्त्वप्रदीपिकेमध्ये आढळत नाही.

ती मूळ गाथा पुढीलप्रमाणे आहे –

दंसणसंसुद्धाणं सम्मण्णाणोवजोगजुत्ताणं।
अव्वाबाधरदाणं णमो णमो सिद्धसाहूणं॥१४॥

(हरिगीत)

सुशुद्धदर्शनज्ञानमय उपयोग अन्तरलीन जिन।
बाधारहित सुखसहित साधु सिद्ध को शत्-शत् नमन॥१४॥

दर्शनाने संशुद्ध, सम्यग्ज्ञानरूप उपयोगाने सहित निर्बाधपणे स्वरूपलीन सिद्ध व साधूंना वारंवार नमस्कार असो.

आचार्य जयसेनांच्या टीकेमध्ये आढळणारी ही गाथा देखील या अधिकाराची अंतमंगलरूप गाथा आहे.

आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्ती टीकेमध्ये या गाथेचा भाव स्पष्ट करीत म्हटले आहे की ३ मूढता इत्यादी २५ दोषांनी रहित सम्यग्दर्शनाने शुद्ध, संशय इत्यादी दोषांनी रहित, सम्यग्ज्ञानाने सहित, विकल्परहित, स्वरूपलीनतारूप वीतरागचारित्र सहित, निराबाध अनंत सुखामध्ये लीन सिद्ध म्हणजेच अरहंत-सिद्धांना आणि सिद्धदशेची साधना करणाऱ्या साधूंना म्हणजेच आचार्य, उपाध्याय आणि साधूंना मी भक्तीपूर्वक वारंवार नमस्कार करतो.

येथे हे लक्षात घ्यावे की मूळ गाथेत सिद्ध आणि साधूंचाच उल्लेख आहे, परंतु टीकेमध्ये सिद्धांमध्ये अरहंत व सिद्धांना आणि साधुमध्ये आचार्य, उपाध्याय व साधूंना ग्रहण केले आहे.

अशाप्रकारे प्रवचनसाराच्या ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकाराचे आता समापन होत आहे. महाधिकाराच्या शेवटी तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी २ शालिनी व १ वसंततिलका, असे एकून ३ पद्य लिहिले आहेत, ते पुढीलप्रमाणे आहेत –

(शालिनी)

जैनं ज्ञानं ज्ञेयतत्त्वप्रणेतृ स्फीतं शब्दब्रह्म सम्यग्विगाह्य।
संशुद्धात्मद्रव्यमात्रैकवृत्त्या नित्यं युक्तैः स्थीयतेऽस्माभिरेवम्॥१०॥
ज्ञेयीकुर्वन्नञ्जसासीमविश्वं ज्ञानीकुर्वन् ज्ञेयमाक्रान्तभेदम्।
आत्मीकुर्वन् ज्ञानमात्मान्यभासि स्फूर्जत्यात्मा ब्रह्म संपद्य सद्यः॥११॥

(दोहा)

ज्ञेयतत्त्व के ज्ञान के प्रतिपादक जो शब्द।
उनमें डुबकी लगाकर निज में रहें अशब्द॥१०॥
शुद्ध ब्रह्म को प्राप्त कर जग को कर अब ज्ञेय।
स्वपरप्रकाशक ज्ञान ही एकमात्र श्रद्धेय॥११॥

अशाप्रकारे ज्ञेयतत्त्वाला समजाविणाऱ्या शब्दब्रह्मरूप जैन तत्त्वज्ञानात योग्यप्रकारे अवगाहन करून आम्ही केवळ शुद्धात्मद्रव्यरूप एका वृत्तीने (परिणतीने) सदा युक्त राहतो.

हा आत्मा ब्रह्माला (परमात्मतत्त्व-सिद्धत्वाला) शीघ्र प्राप्त करून असीम विश्वाला शीघ्रतेने एका समयात ज्ञेयरूप करीत भेदांना प्राप्त ज्ञेयांना ज्ञानरूप करीत व ज्ञानाला आत्मारूप करीत दैदीप्यमान होत आहे.

वरील पद्यांचा भाव स्वामीजींनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''अशाप्रकारे ज्ञेयतत्त्वाला समजाविणारे सर्वज्ञांशिवाय दुसरे कोणी नाहीत. वीतरागता प्रगट झाल्यावर सर्वज्ञता प्रगट झाली आणि दिव्यध्वनीमध्ये जे वस्तुचे परिपूर्ण स्वरूप प्रगट झाले आहे, त्याला शब्दब्रह्म म्हणतात. त्या शब्दब्रह्माला समजाविण्याकरिता कुंदकुंदांनी ह्या शास्त्राची रचना केली आहे.

सहा द्रव्य स्वतंत्र आहेत, प्रत्येक द्रव्यात अनंत गुण आहेत. आत्मा

ज्ञान, दर्शन, चारित्र इत्यादी अनंत गुणांचा पिंड आहे. प्रतिसमय प्रत्येक द्रव्याची अवस्था बदलते.[१]

कर्मादी परपदार्थ ज्ञेय आहेत, त्यांचीही स्वत:ची योग्यता आहे. कोणीही स्वज्ञेय-परद्रव्यात काहीही करू शकत नाही. अशाप्रकारे हा आत्मा प्रत्येक रजकण व अन्य आत्म्याहून भिन्नच आहे. अशी स्वतंत्रतेची चर्चा ज्ञेयाधिकारात केली आहे.[२]

भगवान आत्मा परमब्रह्म आहे व त्याचे वर्णन करणारी वाणी शब्दब्रह्म आहे.[३]

आचार्यदेवांनी म्हटले आहे की शब्दब्रह्माचे सम्यक् अवगाहन करून आम्ही केवळ शुद्धात्म्यामध्येच लीन राहतो. कोणताही विकल्प मला शरणभूत नाही; केवळ स्व-ज्ञेय शुद्धात्माच शरणभूत आहे.[४]

जो आत्म्याचे खरे स्वरूप जाणतो, तो केवलज्ञान अवस्था प्रगट करतो. आत्मा पराच्या, पुण्य-पापाच्या क्रियेने रहित आहे – अशा श्रद्धेपूर्वक चारित्रदशा होते आणि चारित्र पूर्ण होताच केवलज्ञानावस्था प्राप्त होते.[५]''

वरील पद्यांमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी म्हटले आहे की मी या जिनप्रवचनाच्या सारभूत प्रवचनसाररूप जिनवाणीमध्ये अवगाहन करून ज्ञेयतत्त्वाला चांगल्याप्रकारे समजून निजात्मरमणतारूप परिणमित होत आहे. अशाप्रकारे माझा हा आत्मा परमात्मतत्त्वाला प्राप्त करून संपूर्ण विश्वाला ज्ञेयरूप बनवून, भेदांना प्राप्त ज्ञेयांना जाणून, ज्ञानाला आत्मरूप करीत शोभायमान होत आहे.

या महाधिकाराच्या शेवटच्या ३ पद्यांमधून अंतिम पद्य पुढीलप्रमाणे आहे –

(वसन्ततिलका)

द्रव्यानुसारि चरणं चरणानुसारि
द्रव्यं मिथो द्वयमिदं ननु सव्यपेक्षम्।

---

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४६५
२) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४६६
३) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४६६
४) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४६७
५) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४६७

तस्मान्मुमुक्षुरधिरोहतु मोक्षमार्गं
द्रव्यं प्रतीत्य यदि वा चरणं प्रतीत्य ॥१२॥

(दोहा)

चरण द्रव्य अनुसार हो द्रव्य चरण अनुसार।
शिवपथगामी बनो तुम दोनों के अनुसार॥१२॥

चरण द्रव्यानुसार होते व द्रव्य चरणानुसार होते – अशाप्रकारे हे दोन्ही परस्पर सापेक्ष आहेत, त्यामुळे एक तर द्रव्याचा आश्रय घेऊन किंवा चरणाचा आश्रय घेऊन मुमुक्षू म्हणजेच ज्ञानी श्रावक व मुनिराजांनी मोक्षमार्गावर आरोहण करावे.

या पद्यावर प्रवचन करताना स्वामीजींनी आपले भाव पुढीलप्रमाणे प्रस्तुत केले ? आहेत –

"बंधो ! चरण द्रव्यानुसार होते. द्रव्याचे श्रद्धान-ज्ञान करून यथाशक्ती स्थिरता झाल्यानंतर राग सहजच निघून जातो आणि द्रव्याच्या ज्ञानाशिवाय राग वास्तविक पाहता मंद देखील होत नाही.

आत्म्याचे ज्ञान चरणानुसार होते. जो जीव मांस भक्षण करतो, मद्य प्राशन करतो, लंपट असेल, काळे व्यापार-धंदे करीत असेल, हजारो लोकांचे नुकसान व्हावे – असे त्याला वाटत असेल, अनीति करीत असेल, निंद्य कार्य करीत असेल; त्याला तर कधीच आत्म्याचे भान होऊ शकत नाही, तो मुमुक्षुपणाच्या लायकच नाही; परंतु मी आपले हित करू शकतो – असा वैराग्यभाव असणाऱ्या जीवाचा जेवढ्या प्रमाणात राग कमी झाला आहे, त्याला कुदेव-कुगुरु-कुशास्त्राला भजण्याचे परिणाम रहात नाहीत.

अशाप्रकारे वरील दोन्ही भाव एकमेकांच्या अपेक्षेसहित आहेत. त्यामुळे आत्म्याचे खरे ज्ञान करून मोक्षमार्गामध्ये आरोहण करा किंवा आत्म्याच्या भानासहित राग कमी करून मोक्षमार्गामध्ये आरोहण करा. जो जीव खरे श्रद्धान-ज्ञान करेल, तो राग कमी करून हळूहळू शुद्धतेकडे

जाऊ लागेल आणि पूर्ण वीतरागी अवस्था प्राप्त करेल, म्हणून हे मुमुक्षुंनो ! मोक्षमार्गामध्ये आरोहण करा.[१]''

येथे आचार्य अमृतचंद्रदेवांनी असे समापन केले आहे की जणु ग्रंथच समाप्त झाला आहे. असे वाटते की ते ज्ञानतत्त्व व ज्ञेयतत्त्वाच्या प्रतिपादनालाच या ग्रंथाचे मूळ प्रतिपाद्य मानतात. यामुळेच त्यांनी आगामी प्रकरणाला चूलिका म्हटले आहे. त्याला ते ज्ञानतत्त्व प्रज्ञापन आणि ज्ञेयतत्त्व प्रज्ञापना समान महाधिकाराचा दर्जा देऊ इच्छित नाहीत.

ज्ञान व ज्ञेयपणा आत्म्याचा मूळ स्वभाव आहे. तो आत्मा ज्ञानस्वरूपही आहे व ज्ञेयरूप सुद्धा आहे; त्यामध्ये ज्ञान नामक गुणही आहे व प्रमेयत्व गुण सुद्धा आहे.

आत्म्याला समजण्याकरिता आत्म्याच्या ज्ञानस्वभावालाही जाणले पाहिजे आणि ज्ञेयस्वभावाला सुद्धा जाणले पाहिजे. आत्म्याच्या ज्ञानस्वभाव व ज्ञेयस्वभावाला जाणल्याशिवाय आत्म्याला योग्यप्रकारे समजणे शक्य नाही. त्यामुळे वरील दोन्ही महाधिकारांमध्ये याची विस्ताराने चर्चा केली.

या अधिकारांच्या परिज्ञानापूर्वक आत्म्याच्या ज्ञानस्वभाव व ज्ञेयस्वभावाला जाणून ज्ञान-ज्ञेयस्वभावी आत्म्यात आचरण व रमण करण्याकरिता शेवटी चरणानुयोग सूचक चूलिका लिहिली आहे.

वास्तविक बाब ही आहे की आतापर्यंतची संपूर्ण चर्चा द्रव्यानुयोगासंबंधी होती व आता जी चर्चा होईल, ती चरणानुयोगासंबंधी होईल. याचा संकेत या शेवटच्या पद्यात दिला आहे. म्हटले आहे की आचरण द्रव्यानुयोगाच्या ज्ञान-श्रद्धानपूर्वक तदनुसार होते आणि द्रव्याचे स्वरूप देखील त्यामध्ये आचरण करण्याकरिता, लीन होण्याकरिता जाणले जाते.

अशाप्रकारे हे पद्य केवळ या अधिकाराचे समापनच नाही तर

१) दिव्यध्वनिसार भाग-४, पृष्ठ : ४७०

यामध्ये आगामी अधिकाराची सूचना देखील आहे. द्रव्याची चर्चा झाली आणि आता चारित्राची चर्चा आरंभ होईल. पुढील प्रकरणाच्या पहिल्या पद्याची संगती देखील या पद्याशी बसते, त्यामुळे तत्त्वानुसार आचरण व आचरणानुसार तत्त्वाला ग्रहण करीत मोक्षमार्गावर आरोहण करणेच सर्व आत्मार्थी बांधवांचे कर्तव्य आहे.

हे तर सर्वांना माहितच आहे की आचार्य जयसेनांनी आचार्य अमृतचंद्रकृत तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये आलेल्या नावांचा स्वीकार करून सुद्धा या अधिकारांचे नाव तात्पर्यवृत्ती टीकेत क्रमश: सम्यग्ज्ञानाधिकार, सम्यग्दर्शनाधिकार आणि सम्यक्चारित्राधिकार ठेवले आहे.

ज्ञानतत्त्वप्रज्ञापन महाधिकाराचे नाव सम्यग्ज्ञानाधिकार ठेवण्याचे एक कारण हे देखील असू शकते की या अधिकारामध्ये अतींद्रिय ज्ञान अर्थात सर्वज्ञतेची चर्चा खूप विस्ताराने केलेली आहे.

ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकाराचे नाव सम्यग्दर्शनाधिकार याकरिता ठेवले आहे की यामध्ये प्रतिपादित वस्तुस्वरूपाला समजल्याशिवाय सम्यग्दर्शन होऊ शकत नाही.

जेव्हा हे दोन्ही अधिकार सम्यग्ज्ञानाधिकार व सम्यग्दर्शनाधिकार झाले तर चरणानुयोग चूलिकेला सम्यक्चारित्राधिकार व्हायचेच होते.

असे असूनही आचार्य जयसेनांनी तात्पर्यवृत्तीमध्ये देखील या ग्रंथाला येथेच समाप्त मानले आहे. त्यांनी याचे कारण सांगताना टीकेच्या अंतिम ओळीत लिहिले आहे की प्रतिज्ञेची पूर्णता झाल्यामुळे ग्रंथाची पूर्णता येथेच जाणावी.

आचार्य अमृतचंद्रांनी या महाधिकारांना श्रुतस्कंध देखील म्हटले आहे. त्यांनी तत्त्वप्रदीपिका टीकेच्या अंतिम वाक्यात लिहिले आहे की आचार्य अमृतचंद्र विरचित प्रवचनसाराच्या तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन नामक द्वितीय श्रुतस्कंध समाप्त झाला.

असेच वाक्य प्रथम महाधिकाराच्या शेवटी देखील आढळते. ●

प्रवचनसार पद्यानुवाद

ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन महाधिकार

द्रव्यसामान्यप्रज्ञापनाधिकार

सम्यक् सहित चारित्रयुत मुनिराज में मन जोड़कर।
नमकर कहूँ संक्षेप में सम्यक्त्व का अधिकार यह॥१०॥•

गुणात्मक हैं द्रव्य एवं अर्थ हैं सब द्रव्यमय।
गुण-द्रव्य से पर्यायें पर्ययमूढ़ ही हैं परसमय॥९३॥

पर्याय में ही लीन जिय परसमय आत्मस्वभाव में।
थित जीव ही हैं स्वसमय – यह कहा जिनवरदेव ने॥९४॥

निजभाव को छोड़े बिना उत्पादव्ययध्रुवयुक्त गुण-
पर्ययसहित जो वस्तु है वह द्रव्य है जिनवर कहें॥९५॥

गुण-चित्रमयपर्याय से उत्पादव्ययध्रुवभाव से।
जो द्रव्य का अस्तित्व है वह एकमात्र स्वभाव है॥९६॥

रे सर्वगत सत् एक लक्षण विविध द्रव्यों का कहा।
जिनधर्म का उपदेश देते हुए जिनवरदेव ने॥९७॥

स्वभाव से ही सिद्ध सत् जिन कहा आगमसिद्ध है।
यह नहीं माने जीव जो वे परसमय पहिचानिये॥९८॥

स्वभाव में थित द्रव्य सत् सत् द्रव्य का परिणाम जो।
उत्पादव्ययध्रुवसहित है वह ही पदार्थस्वभाव है॥९९॥

भंगबिन उत्पाद ना उत्पाद बिन ना भंग हो।
उत्पादव्यय हो नहीं सकते एक ध्रौव्यपदार्थ बिन॥१००॥

पर्याय में उत्पादव्ययध्रुव द्रव्य में पर्यायें हैं।
बस इसलिए तो कहा है कि वे सभी इक द्रव्य हैं॥१०१॥

उत्पादव्ययथिति द्रव्य में समवेत हों प्रत्येक पल।
बस इसलिए तो कहा है इन तीनमय हैं द्रव्य सब॥१०२॥

उत्पन्न होती अन्य एवं नष्ट होती अन्य ही।
पर्याय किन्तु द्रव्य ना उत्पन्न हो ना नष्ट हो॥१०३॥

• आचार्य जयसेनांच्या टीकेमध्ये प्राप्त गाथा १०

गुण से गुणान्तर परिणमें द्रव्य स्वयं सत्ता अपेक्षा।
इसलिए गुणपर्याय ही हैं द्रव्य जिनवर ने कहा ।।१०४।।
यदि द्रव्य न हो स्वयं सत् तो असत् होगा नियम से।
किम होय सत्ता से पृथक् जब द्रव्य सत्ता है स्वयं ।।१०५।।
जिनवीर के उपदेश में पृथक्त्व भिन्नप्रदेशता।
अतद्भाव ही अन्यत्व है तो अतत् कैसे एक हों।।१०६।।
सत् द्रव्य सत् गुण और सत् पर्याय सत् विस्तार है।
तदरूपता का अभाव ही तद्-अभाव अर अतद्भाव है।।१०७।।
द्रव्य वह गुण नहीं अर गुण द्रव्य ना अतद्भाव यह।
सर्वथा जो अभाव है वह नहीं अतद्भाव है।।१०८।।
परिणाम द्रव्य स्वभाव जो वह अपृथक् सत्ता से सदा।
स्वभाव में थित द्रव्य सत् जिनदेव का उपदेश यह।।१०९।।
पर्याय या गुण द्रव्य के बिन कभी भी होते नहीं।
द्रव्य ही है भाव इससे द्रव्य सत्ता है स्वयं ।।११०।।
पूर्वोक्त द्रव्यस्वभाव में उत्पाद सत् नयद्रव्य से।
पर्यायनय से असत् का उत्पाद होता है सदा।।१११।।
परिणमित जिय नर देव हो या अन्य हो पर कभी भी।
द्रव्यत्व को छोड़े नहीं तो अन्य होवे किसतरह।।११२।।
मनुज देव नहीं है अथवा देव मनुजादिक नहीं।
ऐसी अवस्था में कहो कि अनन्य होवे किसतरह।।११३।।
द्रव्य से है अनन्य जिय पर्याय से अन-अन्य है।
पर्याय तन्मय द्रव्य से तत्समय अत: अनन्य है।।११४।।
अपेक्षा से द्रव्य 'है' 'है नहीं' 'अनिर्वचनीय है'।
'है है नहीं' इसतरह ही अवशेष तीनों भंग हैं।।११५।।
पर्याय शाश्वत नहीं परन्तु है विभावस्वभाव तो।
है अफल परमधरम परन्तु क्रिया अफल नहीं कही।।११६।।
नाम नामक कर्म जिय का पराभव कर जीव को।
नर नारकी तिर्यंच सुर पर्याय में दाखिल करे।।११७।।
नाम नामक कर्म से पशु नरक सुर नर गति में।
स्वकर्म परिणत जीव को निजभाव उपलब्धि नहीं।।११८।।

उत्पाद-व्यय ना प्रतिक्षण उत्पादव्ययमय लोक में।
अन-अन्य हैं उत्पाद-व्यय अर अभेद से हैं एक भी॥११९॥
स्वभाव से ही अवस्थित संसार में कोई नहीं।
संसरण करते जीव की यह क्रिया ही संसार है॥१२०॥
कर्ममल से मलिन जिय पा कर्मयुत परिणाम को।
कर्मबंधन में पड़े परिणाम ही बस कर्म है॥१२१॥
परिणाम आत्मा और वह ही कही जीवमयी क्रिया।
वह क्रिया ही है कर्म जिय द्रवकर्म का कर्ता नहीं॥१२२॥
करम एवं करमफल अर ज्ञानमय यह चेतना।
ये तीन इनके रूप में ही परिणमे यह आत्मा॥१२३॥
ज्ञान अर्थविकल्प जो जिय करे वह ही कर्म है।
अनेकविध वह कर्म है अर करमफल सुख-दुक्ख हैं॥१२४॥
ज्ञान कर्मरु कर्मफल परिणाम तीन प्रकार हैं।
आत्मा परिणाममय परिणाम ही हैं आत्मा॥१२५॥
जो श्रमण निश्चय करे कर्ता करम कर्मरु कर्मफल।
ही जीव ना पररूप हो शुद्धात्म उपलब्धि करे॥१२६॥

द्रव्यविशेषप्रज्ञापनाधिकार

द्रव्य जीव अजीव हैं जिय चेतना उपयोगमय।
पुद्गलादी अचेतन हैं अतःएव अजीव हैं॥१२७॥
आकाश में जो भाग पुद्गल जीव धर्म अधर्म से।
अर काल से समृद्ध है वह लोक शेष अलोक है॥१२८॥
जीव अर पुद्गलमयी इस लोक में परिणमन से।
भेद से संघात से उत्पाद-व्यय-ध्रुवभाव हों॥१२९॥
जिन चिह्नों से द्रव ज्ञात हों रे जीव और अजीव में।
वे मूर्त और अमूर्त गुण हैं अतद्भावी द्रव्य से॥१३०॥
इन्द्रियों से ग्राह्य बहुविधि मूर्त्त गुण पुद्गलमयी।
अमूर्त्त हैं जो द्रव्य उनके गुण अमूर्त्तिक जानना॥१३१॥
सूक्ष्म से पृथ्वी तलक सब पुद्गलों में जो रहें।
स्पर्श रस गंध वर्ण गुण अर शब्द सब पर्याय हैं॥१३२॥

आकाश का अवगाह धर्माधर्म के गमनागमन।
स्थानकारणता कहे ये सभी जिनवरदेव ने ॥१३३॥
उपयोग आतमराम का अर वर्तना गुण काल का।
है अमूर्त द्रव्यों के गुणों का कथन यह संक्षेप में ॥१३४॥ युगलम्॥
हैं बहुप्रदेशी जीव पुद्गल गगन धर्माधर्म सब।
है अप्रदेशी काल जिनवरदेव के हैं ये वचन ॥१३५॥
कालद्रव को छोड़कर अवशेष अस्तिकाय हैं।
बहुप्रदेशीपना ही है काय जिनवर ने कहा ॥११॥•
गगन लोकालोक में अर लोक धर्माधर्म से।
है व्याप्त अर अवशेष दो से काल पुद्गलजीव हैं ॥१३६॥
जिसतरह परमाणु से है नाप गगन प्रदेश का।
बस उसतरह ही शेष का परमाणु रहित प्रदेश से ॥१३७॥
पुद्गलाणु मंदगति से चले जितने काल में।
रे एक गगनप्रदेश पर परदेश विरहित काल वह ॥१३८॥
परमाणु गगनप्रदेश लंघन करे जितने काल में।
उत्पन्नध्वंसी समय परापर रहे वह ही काल है ॥१३९॥
अणु रहे जितने गगन में वह गगन ही परदेश है।
अरे उस परदेश में ही रह सकें परमाणु सब ॥१४०॥
एक दो या बहुत से परदेश असंख्य अनंत हैं।
काल के हैं समय अर अवशेष के परदेश हैं ॥१४१॥
इक समय में उत्पाद-व्यय यदि काल द्रव में प्राप्त हैं।
तो काल द्रव्यस्वभावथित ध्रुवभावमय ही क्यों न हो ॥१४२॥
इक समय में उत्पाद-व्यय-ध्रुव नाम के जो अर्थ हैं।
वे सदा हैं बस इसलिए कालाणु का सद्भाव है ॥१४३॥
जिस अर्थ का इस लोक में ना एक ही परदेश हो।
वह शून्य ही है जगत में परदेश बिन न अर्थ हो ॥१४४॥

ज्ञान-ज्ञेयविभागाधिकार

सप्रदेशपदार्थनिष्ठित लोक शाश्वत जानिये।
जो उसे जाने जीव वह चतुप्राण से संयुक्त है ॥१४५॥

• आचार्य जयसेनांच्या टीकेमध्ये प्राप्त गाथा ११